म. ग्रं. सं. ठाणे

विषय

REFBK-0001274

9268

म. ग्रं. स. ठाणे
विषय चारित्र
सं. क्र.

म. ग्रं. सं. ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम........................ दि:
क्रमांक ........................ नों. दि

श्रीदत्त ...

# ब्र० श्री० प. प. वासुदेवानंदसरस्वती

# ( टेंब्ये ) स्वामीचें चरित्र.

हें पुस्तक

श्रीमंत रा. रा. गांडेबुवाब्रह्मचारी

यांणीं लिहिलें.

तें

रामचंद्र शंकर सप्रे यांणी

सावंतवाडी येथें

“ श्रीगुरु दत्तात्रेय प्रेसांत ” छापून

REFBK-0001274

शके १८३७ सन. १९१६

किं २ रुपये.

# अर्पण पत्रिका.

हा ग्रंथ मीं परम प्रिय ब्रह्मीभूत

श्रीमत्परमहंस प० वासुदेवानंदसरस्वतीस्वामी

महाराज यांचे चरणीं

अर्पण केला.

देशाची उन्नती होण्यास ज्या अनेकविध साधनांची आवश्यकता असतें, त्यापैकींच धर्मनीति हें एक साधन आहे. सर्वसाधनांची नंबरवारीकेल्यास ह्याचा नंबर बराच वर किंबहुना पहिलाच येईल. धर्मानें सामान्यजनसमाज एकमेकांशीं एका विशिष्ट प्रकारानें संलग्न झालेला असतो. लोकांच्या धर्मश्रध्देचा ऱ्हास होत असतां ती पूर्ववत दृढकरण्याचें किंवा वृद्धिंगत करण्याचें काम फार अवजड आहे. द्रव्यबल, सामर्थ्यबल किंवा विद्याबल ह्यापैकीं कोणत्याही एकाबलानें किंवा तीनही बलसमुच्चयानें हें काम होणार नसतें. त्याला भगवंताची इच्छा हेंच सबल कारण होय. खुद्दभगवान् श्रीकृष्णानेंच अर्जुनाला ह्मटलें आहे.

**यदायदाहिधर्मस्यग्लानिर्भवतिभारत अभ्युत्थानमधर्मस्यतदात्मानंसृजाम्यहं परित्राणायसाधूनांविनाशायचदुष्कृतां धर्मसंस्थापनार्थायसंभवामियुगेयुगे ॥**

ज्या ज्या वेळीं सामान्य जनसमूह आपल्या वर्णाश्रमधर्माचा त्याग करून परधर्मरत होतात, नीतिहीन बनत जातात, स्वेच्छाचरण करूं लागतात, तेंव्हां तेंव्हां त्यांच्या उच्छृंखल वर्तनास आळा घालून त्यांला धर्मशील व नीतिमान बनविण्याकरितां ईश्वराला अवतीर्ण व्हावें लागतें. अशाप्रकारचे प्रसंग पुराणांतरीं आपण वारंवार वाचितों. सदरहू चरित्र हें तशाच प्रकारच्या अंशभूत आधुनिक कालांतील विभूतीचें आहे.

मुंबई इलाख्यांतील सावंतवाडी संस्थानापैकीं माणगांव ह्या गावीं टेंब्ये या उपनावाचे कऱ्हाडेब्राह्मण राहात असत. हे ऋग्वेदी आश्वलायन शाखेंतील होत. त्यांच्या वंशांत पुढें गणेशभट्ट झाले. त्यांला तीन मुलगे होते त्यापैकीं वडील मुलगा वासुदेव हाच ह्या चरित्राचा नायक होय. ह्याचा जन्म वरील गावीं शके १७७६ त झाला. लहानपणापासून ह्यांचा ओढा ईश्वर भजनीं होता. त्यांची बुद्धी चलाख असल्यामुळें त्यानीं अल्पावकाशांतच वेदविद्येंत व संस्कृत भाषेंत आणि ज्योतिःशास्त्रांत बरेंच प्राविण्य मिळविलें. त्यांला श्रीगुरुदत्तात्रेयाचा प्रत्यक्ष साक्षात्कार होऊन त्यांच्या साक्षात्कारावरून त्यानीं चातुर्थाश्रम [ संन्यासदीक्षा ] घेतला होता. श्रीदत्तकृपेनें यांच्याकडून लोकांच्या अनेक कामना पूर्ण होऊं लागल्यामुळें पुष्कळ लोकांची त्यांच्या ठिकाणीं श्रद्धा ठरली व हजारों शिष्य झाले. हे अखिल भारत वर्षांत श्री० प० प० वासुदेवानंदसरस्वतीस्वामी ह्या नावानें प्रसिद्ध आहेत. ह्यानीं सर्व हिंदुस्थानांत संचार करून भजनमार्गाच्या अभिवृद्ध्यर्थ ठिकठिकाणीं दत्तमंदिरें,

भजनालयें वगैरे स्थापन केलीं. भजनाकारितां अभंग, पदें, आरत्या वगैरे मराठी व संस्कृत भाषेंत अनेक कविता केल्या. शिवाय संस्कृतज्ञांकारितां संस्कृत भाषेंत अनेक ग्रंथ लिहिले व त्यां पैकीं काही छापून प्रसिद्धझाले असून विद्वन्मान्य झाले आहेत. अशा प्रसिद्धपुरुषाचें चरित्र भाविकलोकांच्या वाचनांत यावें व त्यांची भक्तिमार्गावरील श्रद्धा दृढ राहावी; ह्या हेतूनें ठिकठिकाणची माहिती परिश्रमानें एकत्र करून त्यांच्या परमपूज्य शिष्यानें हें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. कादंबऱ्यांप्रमाणें मोहक भाषा व नवरस परिप्लुत मनोल्हादक कथानकांचा ह्या चरित्रांत पूर्ण अभाव असल्यामुळें जरी हें चित्ताकर्षक झालेलें नसेल तरी परमार्थेच्छु प्रापंचिकांस मार्गदर्शक, बोधप्रद, अनुकरणीय अशा बऱ्याच साधुपुरुषांची प्रसंगाप्रमाणें यांत माहिती आलेली आहे. सत्पुरुष कसे असतात, त्यांच्या समागमानें काय लाभ होतात. इत्यादि माहिती ह्याच्या वाचनानें मिळेल व प्रत्यक्ष साधुपुरुषांचा समागमझाल्याचें श्रेयही प्राप्तहोईल. तरी प्रत्येक मुमुक्षुनें हें चरित्र एकवेळ तरी अवश्य समग्र वाचावें अशी मी त्यांस शिफारस करितों.

ब्र. श्री. प. प. वासुदेवानंदसरस्वति स्वामिशिवाय त्यांच्याच योग्यतेचे किंबहुना श्रेष्ठ अशा अनेक साधुपुरुषांचीं त्रोटक चरित्रें ठिकठिकाणीं आलेलीं आहेत, त्यामुळें वाचकांस हेंचरित्र बऱ्याच सत्पुरुषांचा परिचय करून देणार आहे.

हेंचारित्र लिहिणारा कसलेला लेखक ह्यादृष्टीनें आपली कृति वाचकांपुढें ठेवित नसून गुरुभक्तीनें युक्तहोऊन गुरुसेवा करीत आहे. तरी याचे वाचकानीं हें चरित्र वाचताना यांत कदाचित् चुकीचीं विधानें किंवा लहान मोठीं कमिजास्त दोषस्थलें आढळल्यास तीं कृपाकरुन प्रकाशकांकडे कळविण्याची तसदी घेतल्यास ग्रंथ लेखक व प्रकाशक त्यांचे बहूत आभारी होतील व सदर पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढण्याचा सुयोग परमेश्वरकृपेनें व सत्पुरुषांच्या इच्छेनें आल्यास त्यावेळीं त्यांचा योग्याविचार करून तीं तितकीं दुरुस्त करण्याचा प्रयत्न करितील.

ज्या जगन्नियंत्या परमेश्वराच्या कृपेनें व दीनोद्धारक श्रीसद्गुरु ब्र. श्री. प. प. वासुदेवानंदसरस्वतीस्वामी व अन्यसत्पुरुष यांच्या आशीरवादानें हें चारित्र प्रसिद्ध होऊन वाचकांला सादर करितां आलें त्यांचे चरणीं लीन होऊन ही लांबलेली प्रस्तावना पूर्ण करितों.

आकेरी ता. २८।१२।१५ पां. सि. हरिदास.

ठाणे



ब्रह्मीभूत श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य

**श्री वासुदेवानंद सरस्वती ( टेंब्ये ) स्वामिमहाराज.**

जन्म शा. शक १७७६. ]　　　　[ समाधि शक १८३६.

मनोरंजन प्रेस, मुंबई.

॥ गणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री सद्गुरवे नमः ॥

# श्रीगुरु ( ब्र. प. प. वासुदेवानंद सरस्वति स्वामी)

## चरित्र प्रारंभः

अहो! श्री सद्गुरुनाथा! आपले चरणी मस्तक ठेवून अनन्य भावानें मी नमस्कार करीत आहें. हे सद्दाता! आपण परमपद जे मोक्ष त्याचे दाते असून आपल्या दासास हें पद देत अहां ह्मणून आपणांस सर्व लोक गुरु ह्मणून वंदन करितात. ज्या परमात्म्यानें आपले मायेच्या योगानें ब्रह्मा, विष्णु, रुद्र, गणेश, शक्ति, इंद्र, चंद्र, सूर्य, वरुण, अग्नि आणि रामकृष्णादि रूप धारण केलें, तेच माझे इष्ट देव श्रीदत्तभगवान् आणि श्रीसद्गुरु **वासुदेवानंदसरस्वति** स्वामीमहाराज होत. त्यांचेजवळ हा गांडा नांवाचा अज्ञानी बालक अनन्यभावें नमस्कार करून मागणें मागत आहे कीं, हेगुरुनाथ! आपण माझ्या हृदयांत निवास करून अज्ञानरूप हृदयग्रंथीचें छेदन करावें. व सर्व संशयाचें निरसन करावें. आणि सर्व वासनांचा क्षय करून आपल्या सत्स्वरूपीं मन, बुद्धि, आणि अहंकाराचा लय करावा ह्मणजे मी तूं पण जाऊन माझ्यानें आपलें सत्स्वरूप ओळखलें जाईल आणि या योगें आपले गुणानुवाद गाण्यास हें मन, बुद्धि, आणि वाणि यास प्रमाद यावयाचा नाहीं. हे गुरुदेव, आपण शुद्ध, बुद्ध, नित्य, निःसंग, आणि अभिन्न असून या जगतांत आपली बरोबरी करूं शकेल असा एकही मिळूं शकणार नाहीं. ह्मणून मी आपणास नमस्कार करीत आहें. हे ज्ञान-

दाता! आपल्या स्वयंज्योतीनें या दासाच्या हृदयांत ज्ञानज्योतीचा प्रकाश कर. म्हणजे हा भवसागर तरून जाणें कठीण जाणार नाहीं. हे सद्गुरुनाथ! हा भवसागर तरून जाण्यास आपल्या चरणीं शरण येणें हें सुलभ उपाय होय. त्यामुळें या वाणीनें जयजयकार करीत आहे. हे भक्तवत्सला! आपण निर्गूण असूनही भक्तांच्या विनवण्या ऐकून स्वमायेनें मनुष्यरूप धारण करून धावूंन आलांत हा केवढा उपकार! ज्या प्रभूनें एवढा उपकार केला तो भगवान या दासाच्या हृदयांत ज्ञानज्योती प्रकट करणार नाहीं काय.? आणि ज्यावेळीं ज्ञानज्योती प्रकट होईल त्यावेळीं श्रीसद्गुरुनाथाचे गुणानुवाद गावविणार नाहींत काय? ही प्रार्थना ऐकून श्रीगुरुदेव प्रसन्न होऊन या दासाच्या हृदयांत त्यानीं वास करून हा गुरुचरित्र नांवाचा ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ करविला.

## पूर्व पीठिका आणि जन्मकाल.

कोकण प्रांतीं संस्थान सावंतवाडी नजीक **माणगांव** या गांवीं आमचे चरित्रनायकां (ब्रह्मीभूत श्रीमत्परमहंस स्वामी वसुदेवानंद सरस्वती यां) चे वडील **गणेश** भट्टजी टेंब्ये अत्रिगोत्री कऱ्हाडे जातीचे ब्राह्मण हे राहत असत. त्यांच्या पत्नीचें नांव रमाबाई असें होतें. कांहीं कालानंतर ते गाणगापुरीं जाऊन श्रीदत्त भगवानाची उपासना करीत असतां त्यानां वैराग्य उत्पन्न झालें. तेव्हां त्यानीं सन्यास घेण्याचा विचार केला, त्यावेळीं त्यानां श्री दत्ताचा असा दृष्टांत झाला कीं, तुह्मीं घरीं जाऊन आधीं गृहस्थाश्रम पुरा करा. आज्ञेप्रमाणें ते घरीं येऊन त्या प्रमाणें वागूं लागले. रमाबाई आपल्या पतीस परमात्मा रूप समजून घरीं आलेल्या अतिथींची पतिच्या इच्छेनुरूप सेवा करीत असत. आणि दररोज पतिच्या आज्ञेनें श्री गुरुचरित्रास प्रदक्षिणा व श्री दत्त मंत्रांचा जप करीत असत. याप्रमाणें त्या पतिपत्नीची भक्ति पाहून श्री दत्त भगवान यानीं त्या ठिकाणीं जन्म घेण्याचा विचार क-

रून रमाबाईच्या उदरीं गर्भरूपाने येऊन ब्रह्मज्ञान बोलूं लागले. "या संसार सुखाचा त्याग करून मजला सन्यास मार्गाच्या मर्यादेनें निवृत्त राहून परम-पद जे मोक्ष, त्यांची प्राप्ति करावयाची आहे. मजला हल्लीं कोणतीही वस्तू प्रिय वाटत नाहीं. आणि कशावरही इच्छा नाहीं. माझ्या मनांत तर वनांतरीं जाऊन तपश्चर्या करावी असें वाटतें" हें ऐकून गणेश भट्टजींस असें वाटलें कीं, आपल्या पत्नीस पिशाच्च बाधा तर झाली नसेलना? हे ऐकून गर्भरूपानें अ-सलेले श्री दत्त स्वप्नांत ह्मणाले कीं, तुमच्या पत्नीस पिशाच्चबाधा नसून त्यांचे उदरीं ब्रह्मज्ञानी अवतारी पुरूष आहे तो, असें बोलत आहे. हें ऐकू-न गणेश भटजींस फार आनंद झाला, आणि गर्भाचे यथाविधी संस्कार करविले. यांस श्रीशके १७७६ आनंदनाम संवत्सरीं नवमास पूर्ण होऊन शक मजकुरीं दाहावे मासीं (श्रावण मासीं कृष्ण पक्षीं पंचमी दिवशीं सू-र्योदयानंतर घटी २६ या समयीं) रमाबाईस पुत्ररत्न प्राप्त झालें. हें ऐकून ग-णेश भटजींनीं स्नान करून जातकर्म केलें, आणि ब्राह्मणांस दक्षिणा दिली. बारावे दिवशीं बारसा करून मुलाचें नांव **वासुदेव** ठेविलें.

## बाळपण.

हे पांच वर्षांचे होतांच त्यांस त्यांच्या आजोबांनीं (हरिभट्टजी-नीं) उपग्रंथ शिकविण्यास प्रारंभ केला, आणि आठवे वर्षीं व्रतबंध सं-स्कार करवून ब्राह्मणाचें षट्कर्म शिकविलें. या दिवसापासून वासुदेव ब्रह्म-चाऱ्याचे नियमानें राहून संध्या होमादि कर्में व भिक्षान्न ग्रहण करून वेदाध्य-न करूं लागले. यांस त्यांचे गुरू विष्णु भट्टजी उकिडवे हे ऋक्संहिता शि-कवीत असतां ते त्या मंत्राचे प्रयोग करून गुरूंस दाखवूं लागले. हें पाहून गुरुजी विचार करूं लागले कीं, हे कोणी अवतारी पुरूष असावेत.

सह्याद्रि घांट उतरून येणाऱ्या ब्राह्मणांचा माणगां

---

**टीपः**— १ शिक्षा, ज्योतिष, छंद, निघंट व अष्टाध्यायी २ यज्ञ करणें व करविणे; अध्ययन करणें व करविणें; दान देणें व प्रतिग्रह घेणें.

यचे भास्कर भट्ट ओळकर खाण्यापिण्याचा बंदोबस्त ठेवीत होते. काहीं कालानंतर त्यांची पत्नी परलोकवासी झाल्यानें त्यांच्या सुनेस ही उपाधी वाटूं लागली. त्यामुळें तिनें घरांत कलह करून घरीं ब्राह्मणांस येऊं देणें बंद केलें, त्यामुळें भास्करभट्ट घराचा त्याग करून दुसरे जागीं राहावयास गेले. याप्रसंगी एक सत्पात्र ब्राह्मण घांट उतरून भास्करभट्टांचे घराजवळ येऊन पाहातो तों दार लावलेलें दिसलें ह्मणून त्यानें शेजारीं टेब्यांचे घरीं येऊन तपास केला, तेव्हां वासुदेवानें सर्व हकिगत कळविली. हें ऐकून तो ब्राह्मण ह्मणाला कीं " अरेरे ! त्या बाईनें फारच वाईट केलें. याचें फळ तिला मिळेल. अरे बाबा ! मला भूक लागली आहे. तूं मला जेऊं घालशील ?" त्यावरून वासुदेवानें झालेली हकिगत आपल्या मातेस कळविली. रमाबाई ह्मणाल्या कीं बाबा, तूं त्या ब्राह्मणास घेऊन ये; स्वयंपाक तयार आहे हें ऐकून वासुदेवानें त्या ब्राह्मणास आणून जेऊं घातलें. दहा वर्षांच्या या बालकाचा विवेक पाहून ब्राह्मण ह्मणाला कीं हे बाळा! तुझ्या शेजाऱ्यानें ब्राह्मणाची उपाधी समजून दार बंद केलें, ह्मणून आजपासून तूं ब्राह्मणाचें आदरातिथ्य करीत जा. माझा आशिरवाद आहे. वासुदेव ह्मणाला कीं आपल्यासारख्या सुपात्र ब्राह्मणाच्या आशिरवादानें मी हें काम हातीं घेईन. ह्या दिवसापासून ते आल्या गेल्याचा परामर्ष घेऊं लागले. शेवटीं दरवाजा बंद करणाऱ्या भास्कर भट्टाचे पुत्रावर त्यानें आपल्या स्त्रीचें ऐकल्या मुळें अशी विपत्ती आली कीं त्यानां अन्न वस्त्र मिळणें दुरापास्त झालें. कोणीही चालत आलेला धर्म बंद करूं नये. पूर्व पुण्याईनें कदाचित् धर्मावर पाय देणाऱ्याचें काहीं दिवस ठीक चालून एका एकीं विपत्ती येणार नाहीं, परंतु तेंच पुण्य क्षय झाल्यावर त्याजवर एकामागून एक संकटें येत जाऊन शेवटीं त्यास नरक प्राप्ति होईल. ह्मणून प्रत्येकानें चालत आलेला आपला धर्म मार्ग सोडूं नये, आणि तो चालू ठेवण्याची काळजी ठेयावी. वासुदेव स्वतः एकपाठी असल्यानें, बारा वर्षांचें वय असतानांच, ऋग्वेदी संहिता, पदें, घन इत्यादि शिकून दशग्रंथी या उपनांवानें प्रसिद्धीस आले. आणि रघुवंशाचे पंधरा श्लोक शिकून लोकांस पुराण सांगूं लागले. हे दररोज प्राकृत

गुरुचरित्र वाचीत असत. शिक्षणांत सांगितलेल्या नियमावर हुकूम त्यांचें वर्तन होतें, त्यामुळें वेद मंत्राच्या सिद्धीचा अनुभव लोक देऊं लागले, आणि वासुदेव बाळचेष्टा करून लोकांस गम्मत दाखवूं लागले.

एके दिवशीं एका गृहस्थाच्या गाईनें धिंगाणा घालून दूध दिलें नाहीं, त्यावरून वासुदेवानें तिजवर मंत्रप्रयोग करून तिजला शांत केली व तिनें दूध काढूं दिलें. एखादेवेळीं सर्प निघाल्यास त्याजवर मंत्रप्रयोग करून, त्यास बंदिवान करीत. तसेंच कोणास पिशाच्चादि बाधा असेल तर त्याला त्यांतून मुक्त करीत. एकदां विनाकारण जंगलांत एका सर्पास बंधन करून घरीं आले इतक्यांत त्यानां विचार उत्पन्न झाला कीं, श्री दत्त कृपेनें मला मंत्रसिद्धीचा अनुभव मिळाला, पण विनाकारण जर मी कोणत्याही प्राण्यास उपद्रव केला तर, पुढें मागें या मंत्राचा उपयोग होणार नाहीं, करितां इत:पर अशी चेष्टा करणें बरें नाहीं, असा निश्चय करून त्या सर्पास सोडून दिलें. पंधरा-व्या वर्षापासून शिकूं इच्छिणाऱ्यास ते शिकवूं लागले, त्यामुळें त्यानां सर्व लोक शास्त्रीबुवा ह्मणूं लागले. ते स्वत: विरक्त असल्यामुळे जरुरी शिवाय फाजील वस्तूचा ते संग्रह करीत नसत. त्यांचें वैराग्य व विवेक पाहून मो-ठमोठे विद्वान त्यांनां अवतारी पुरूष ह्मणूं लागले. शास्त्रार्थाच्या जरूरीच्या वेळीं शास्त्रीबुवांस विचारूं लागले. ते पंचायतन पूजा व श्रीदत्त पादुकांचें पूजन करीत असत, तसेंच अतित अभ्यागताचा परामर्ष घेऊन वेळ पड-ल्यास अनाथ ब्राह्मणाच्या शवाचा संस्कार [ करणारा कोणी न भेटल्यास स्वत: जाऊन तें काम] करीत असत. ज्योतिष व वैद्यकशास्त्र शिकून लोकांवर उ-पकार करीत असत. आठ वर्षांपासून त्यांचा नियम असे कीं, त्रिकाल स्नान संध्या करावयाची; कोणत्याही वाहनावर न बसतां पायीं प्रवास करावयाचा, शूद्रास शिवावयाचें नाहीं; छत्री, जोडा, किंवा पादुका वापरावयाच्या नाहींत; ब्राह्मण सेवा, व एकादशी आदिकरून व्रतें पाळावयाचीं, आणि कोणाबरोबर शास्त्राचा वादविवाद करावयाचा नाहीं. जन्मापासून शोक

किंवा मोह नसल्यानें त्यांचें वदन कमलासारखें प्रफुल्लित दिसे. त्यांनीं विधि-पुरःसर चांद्रायण व्रत पाळून गायत्री पुरश्चरण केलें, हे स्वतः श्रीपाद श्रीव-ल्लभ महाराज आणि नारायण स्वामी यांच्या समाराधनेच्या वेळीं नरसोबाचे वाडीस वारंवार जात असत.

## नारायणस्वामींचें संक्षिप्त चरित्र.

नारायणस्वामींची जन्मभूमी कर्नाटक देशांत होती. ते गृहस्थाश्रमांत राहून श्रीदत्त उपासना करीत असत. त्यांची पत्नी दोन मुलींस मागें ठेवून परलोकवासी झाल्यानें त्या दोघी मुलींस घेऊन नारायणस्वामी नरसोबाचेवाडीस आले, व तेथें राहून सोहं शब्दानें इष्ट देवाचें ध्यान करीत असत. त्यांच्या मुली लहानवयाच्या असल्यानें एके दिवशीं रात्रीं मुलींस निजवून ब्रह्मरंध्रीं प्राण स्थिरकरून दत्तचिंतन करीत असतां शौचास झाल्यामुळें मुलगी जागी होऊन त्यानां हाक मारूं लागली. हें पाहून श्रीदत्तभगवानानें नारायणस्वामींचें रूप धारण करून दिवा लावून, त्या मुलीस शौच करून आणिलें, व तिची गुदा धुवून खाऊ देऊन तिजला खेळवूं लागले, इतक्यांत नारायणस्वामी देहभानावर आलेसें पाहून श्रीदत्तभगवान गुप्त झाले. आपल्यामुलीस जागी झालेली पाहून, व दिवा लावला आहे असें पाहून, त्यानीं आपल्या मुलीस विचारिलें कीं, हे बाळे! दिवा कोणी लावीला; मुलीनें सांगितलें कीं, दादा! आतांच तुह्मीं दिवा लाविलात, आणि मजला शौचास घेऊन जाऊन माझी गुदा धुतली, व खाऊ दिला, आणि आतां असें कां विचारतां? नारायणस्वामी ह्मणाले, बाळे, तूं कोणत्या ठिकाणीं परसाकडे बसली होतीस? व तुझी गुदा कोणत्या ठिकाणीं धुतली ती जागा दाखीव. त्यावरून कन्येनें शौचास गेलेली व ज्याठिकाणीं गुदा धुण्यांत आली ती जागा दाखविली. हें पाहून नारायणस्वामींस फारच खेद झाला, आणि त्यांना रडूं कोसळलें. ते ह्मणाले, हे दीनानाथ! भक्तवत्सला! हे दत्त महाराज! आपण आज या दुर्भाग्यासाठीं असें हलकें काम कां केलें? अरेरे! माझ्यासारखा हतभागी दुसरा कोणीही नसेल! आज मी माझ्या इष्ट देवापासून सेवा करवि-

ली असें ह्मणून त्यानीं आपल्या मुली भावाच्या हवालीं केल्या, व आपण निवृत्त होऊन ईश्वर भजन करूं लागले. कांहीं दिवस लोटल्यावर श्री दत्त प्रभूनें पंचगंगेच्या घाटावर त्यांनां संन्यासदीक्षा दिली. दंड घेऊन गांवांत येतांच सर्व लोक त्यांची निंदा करूं लागले, व त्यानां बहिष्कार घातला. भक्ताभिमानी श्री दत्त भगवानांस हें सहन न होऊन गुप्तरूपानें दरवाजांत बसून ज्या वेळीं नारायणस्वामी ध्यान धरून बसत, व कोणी नारायण ह्मणून नमस्कार करीत, त्या वेळीं उलट नारायण नांवाचा उच्चार करून आशिर्वाद देत. हें पाहून लोकांस आश्चर्य वाटूं लागलें कीं, नारायणस्वामी तर ध्यानस्थ बसले आहेत, आणि हे दुसरे कोणीतरी बोलत आहेतसें दिसतें. ही गोष्ट मठाधिपतीस समजतांच त्यानीं तपास केला, व निश्चय केला कीं, हे शब्द स्वामींचे नव्हेत. एकेदिवशीं मठाधिपति मानसीक ध्यान धरून देवास नैवेद्य अर्पण करीत होते, इतक्यांत हातास भिंतीचा धक्का लागून हातचा नैवेद्य खालीं पडला, तेव्हां नारायणस्वामी मधुकरी मागून जात होते त्यांनीं सांगीतलें कीं, स्वामी, खुशालीची जागा पाहून बसा व देवास नैवेद्य अर्पण करून तृप्त करा. हें ऐकून मठाधिपतींनीं चटदिशीं नारायणस्वामींचे पाय धरिले, व झालेल्या अपराधांची क्षमा मागितली. हें पाहून नारायण स्वामी ह्मणाले कीं, यांत आपला कांहींच अपराध नाहीं. मीं सन्यास घेतांनां कोणी ब्राह्मणानें किंवा संन्याशानें पाहिलें नाहीं, आणि हें कर्म ब्राह्मणाशिवाय होत नसतें, आणि संन्यासाशिवाय दंड घेतां येत नाहीं, ह्मणून सर्वजण माझी निंदा करितात, यांत काय आश्चर्य आहे ! आज मी आपणास खरी हाकिगत सांगत आहें, ती आपण ऐका. बाबानों ! पंचगंगेच्या घाटावर श्री दत्तभगवानांनीं स्वतः मजला संन्यास दीक्षा दिली. प्रथम गंगेंत बुडी मारतांच माझें क्षौर झालें. दुसऱ्या बुडीसरशीं प्रेपोच्चार करून भगवीं वस्त्रें दिलीं, आणि तिसऱ्या वेळीं दंड कमंडलू दिले, आणि योग पटांत माझें नांव **नारायण सरस्वती** ठेविलें. श्री दत्त प्रभू माझे गुरू होत, आणि त्यांचे आज्ञेनुसार मी वर्तन करीत आहे हें ऐकून सर्व खजील झाले व झालेल्या अपराधांची क्षमा मागितली. त्यानंतर नारायणस्वामी वाडीच्या मंड—

ळीसह दक्षिण यात्रेस निघाले. प्रवासांत जंगलांतून जात असतां, वाटेवर एक भयंकर वाघ पाहून सर्व लोक घाबरले, त्यामुळें नारायणस्वामींनीं त्या वाघाजवळ जाऊन त्याचे शरीरावर हात फिरविला व ह्मणाले कीं, बाबा! तूं वाटेंत कां बसला आहेस; इतक्यांत त्यांची नजर त्या वाघाच्या पायांकडे गेली, त्यावरून त्यांस समजलें कीं, पायांस कांटा लागला असावा. नराणीनें तो काढून टाकला, व त्यास सांगितलें कीं बाबा! आतां तूं रस्ता सोडून एके बाजूस बैस. हें ऐकून तो वाघ जंगलांत निघून गेला. हें पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. तेथून रामेश्वरची यात्रा केली, नंतर वैजनाथास येऊन, सर्व मंडळी सोडून स्वामी भिक्षेसाठीं गावांत आले. तेथें एका मृतब्राह्मणाचे शवास बांधतांना पाहून "नारायण" ह्मणून भिक्षा मागितली. हें पाहून ब्राह्मण ह्मणाले कीं स्वामी महाराज! या वीस वर्षांच्या मृत ब्राह्मण पुत्रास आह्मीं बांधीत आहों, तें आपण प्रत्यक्ष पहात असतां भिक्षा कशी मागतां? हें ऐकून नारायण स्वामी ह्मणाले कीं अरे वाहवारे ब्राह्मणानों! संन्याशास भिक्षा द्यावी लागेल एव-ढ्याकरितां. बतावणी करतां कीं काय? तुमचा हा पुत्र जीवंत असेल तर भिक्षा घालना; नारायणस्वामींचें असें वचन ऐकून ब्राह्मण आपापसांत कुजबुजूं लागले कीं, हे स्वामी, आपला कैवारी जो श्रीपार्वती पति, ते असावेत, त्याशिवाय असें वाक्य त्यांच्या तोंडांतून कदापि निघालें नसतें. असा निश्चय करून ते लोक ह्मणाले कीं हे दीनानाथ! आपण आह्मांस या दुःखांतून मुक्त कराल तर जरूर आह्मीं भिक्षा घालूं. त्यावर स्वामीमहाराज ह्मणाले कीं. अरे बाबांनो! तुह्मी त्या ब्राह्मणास मोकळा करून सर्व बाजूस व्हा या-प्रमाणें सर्वांनीं करतांच तो मृतब्राह्मण उठून बसला व सर्वांबरोबर बोलूं लागला. हें पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें, आणि नारायणस्वामी तेथून गुप्त झाले व आपल्या मंडळीस येऊन मिळाले हें पाहून वैजनाथचे ब्राह्मण भि-क्षा देण्यासाठीं स्वामी महाराजांचा शोध करूं लागले आणि नरसोबाच्या वाडीच्या मंडळींत त्यांस पाहून सर्वांनीं त्यांचे चरण धरिले व ह्मणाले कीं, हे भगवन् आपण भिक्षेस यावें. हें पाहून वाडीच्या मंडळींस विचार पडला

कीं हे ब्राह्मण स्वामीमहाराजांस भिक्षेसाठीं फार आग्रह कां करितात; ह्मणून त्यानीं आलेल्या ब्राह्मणांस सांगितलें कीं, बाबांनों स्वामीमहाराज दररोज आमच्याबरोबर भिक्षा करितात त्या प्रमाणें आजही भिक्षा घेतील हें ऐकून त्या ब्राह्मणांनां अत्यंत आनंद झाला व त्याच आवेशांत गद्गदीत कंठानें ह्मणाले कीं, बाबानों हे स्वामीमहाराज पार्वतिपति आहेत त्यांनीं माझ्या मेलेल्या मुलास जिवंत केलें असें सांगून झालेली सर्व हकीगत कळविली हें ऐकून वाडीच्या मंडळीस आश्चर्य वाटलें व स्वामीमहाराजांस विनंती केली कीं, हे भगवन् या गांवकरी लोकांचा फार आग्रह आहे, याकरितां यांचे येथें जऊन भिक्षा घेतली पाहिजे; शेवटीं सर्वांबरोबर स्वामीमहाराजांनीं त्यांच्या घरीं जाऊन भिक्षा घेतली व त्यानां आशिर्वाद देऊन शके १७२७ चे चैत्र वद्य ३० स नरसोबाचे वाडीस शरीर त्याग केला त्यावेळीं ते ह्मणाले कीं, मी संध्या करीत होतों ती जागा जो झाडून साफ करील, त्याजवर श्री दत्तमहाराजांची कृपा होईल इतकेंच नव्हे तर त्याला सद्गति मिळेल असें ह्मणून शरीर त्याग केला व विदेह मुक्ति प्राप्त झाली. पाठीमागून वासुदेव शास्त्रीबुवांची मावशी दुर्गाबाई ती जागा साफसूफ ठेऊं लागल्यामुळें श्री दत्त भगवानांचा अनुग्रह तिच्यावर मिराबाई प्रमाणें झाला. ह्या बाई अद्याप जिवंत आहेत.

## मंत्रोपदेश व श्रीदत्तदर्शन.

येथें ज्या वेळीं प्रथमतः वासुदेव शास्त्रीबुवा आले त्यावेळीं श्रीमत् प. प. **गोविंदस्वामी** नारायणस्वामीच्या देवळांत पूजा करीत बसले होते. शास्त्रीबुवांस पाहून ह्मणाले कीं, हा मुक्काम तुमचा आहे व आपण येथेंच बिन्हाड करावें व त्यांनां सर्व व्यवस्था करवून दिली. त्यावेळेपासून शास्त्रीबुवा व गोविंद स्वामी महाराज यांचें सख्य झालें. पुढें एके दिवशीं शास्त्रीबुवा ह्मणाले कीं, हे भगवन्! कृपा करून मला मंत्रोपदेश करा. त्यावर गोविंदस्वामी ह्मणाले कीं, तुह्मांस उपदेश करण्याचा मला अधिकार नाहीं ज्यांनां जरूर असेल ते तुह्मांस मंत्र देतील. हें ऐकून

शास्त्रीबुवांनीं आग्रह केला नाहीं. त्यारात्रीं श्रीदत्त पादुकांची शयनारती झाल्यावर मध्य रात्रीच्या सुमारास कृष्णातीरीं जाऊन हातपाय धुऊन पादुकांजवळ बसून थोडा जप करण्याचा विचार करून तेथें आले पण दार बंद केलेलें पाहून देवानजिक बसणें चांगलें नाहीं असा विचार करून प्रदक्षिणा घालण्यासाठीं दक्षिणद्वारीं जातांच भगवीं वस्त्रें परिधान केलेलीं आहेत असा एक तेजस्वी पुरुष पाहून त्याला महाराजानीं नमस्कार केला. हे श्रीदत्तभगवान् असूनही शास्त्रीबुवांस कळलें नाहीं. त्याला पाहून श्रीदत्तप्रभू ह्मणाले कीं अरे तूं कोण आहेस? ह्यावेळीं तूं कां आलास? शयनारती झाल्यावर येथें कोणीही येऊं नये असा नियम आहे हें तुला ठाउक नाहीं काय? हें ऐकून शास्त्रीबुवा ह्मणाले महाराज ह्या स्थळीं मी प्रथमच आलों आहें त्यामुळें मला नियम माहित नाहींत अतःपर मी येणार नाहीं असें ह्मणून नमस्कार केला. तोंच तें स्वरूप नाहींसें झालें ह्मणून खिन्न अंतःकरणानें विचार करूं लागले कीं ते श्रीदत्तभगवान असले पाहिजेत. अरेरे मीं अभागी असल्यानें त्याचे पाय धरण्याची मला बुद्धि झाली नाहीं. हे करुणासागरा! भक्तवत्सला! अनसूयात्रीनंदना! आपणास वारंवार नमस्कार करून अपराधाची क्षमा याचीत आहें. हे आई! या बालकाचे अपराध मनांत आणाल तर ह्या जगांत माझें संरक्षण कोण करील? हाय हाय. मजकडून वारंवार अपराध होत आहेत ते मनांत न आणून या दासाचें चित्त शांत करा. हे दीनबंधो! मजला सोडून आपण या वेळीं कां गुप्त झालां! हे कृष्णातीरवासी! आपण माझे आई बाप असून सदा सर्वकाळ माझ्या सर्व भयाचें हरण करणारे आहांत. जय जय पतित पावना! गुरु मूर्ते! या अनाथच्या मस्तकीं वरदहस्त ठेवून या दासाचे शांतवन करा. हे भक्ताभिमानी दत्ता! चोर ब्राह्मणाचाप्राण घेण्यास तत्पर होतांच आपण प्रगट होऊन त्यांना मारिलेंत व मृतब्राह्मणास जीवंत करून अभयदान दिलेंत व पोटशूळ झालेल्या ब्राह्मणासाठीं आणि पतिव्रतेचा पति मरण पावल्यानंतर तिच्या साठीं ज्या प्रमाणें धावून आलांत त्या प्रमाणें धावून येऊन हे प्रभो! ह्या बालकास शांत करा. हे श्रीदत्ता! आपण सर्व-

ह्म असल्यामुळें माझी भावना आपणास ठाऊक आहे, त्या कारितां आपणास अधीक तें काय सांगू असें ह्मणून:—

**प्रार्थना.**

दत्ता मजला प्रसन्न होसी जरिं तूं वर देसी ॥
तरि मी आन न मागें तुजसी निर्धारूनी मानसी ॥ ध्रु० ॥
स्मरण तुझें मज नित्य असावें तव गुण भावें गावे ॥
अनासक्तिनें मी वागावें ऐसें मन वळवावें ॥ दत्ता० ॥ १ ॥
सर्व इंद्रियें आणि मन हें तुझे हातीं आहे ।
यास्तव आतां तूं लवलाहे, स्वपदीं मन रमवावें ॥ द. ॥ २ ॥
विवेक आणि सत्संगति हे नेत्रद्वय वा आहे ।
वासुदेवा निर्मल दे हें, जेणें त्वत्पदिं राहे ॥ दत्ता. ॥ ३ ॥

या प्रमाणें प्रार्थना पूर्वक नमस्कार करून मठांत आल्यावर गोविंदस्वामीस आणि मौनी स्वामींस झालेली हकीगत कळविली हें ऐकून गोविंदस्वामी म्हणाले कीं शास्त्रीबुवा तुमची भक्ति पाहून श्रीदत्तप्रभू आज दर्शन देऊन गुप्त [illegible] शास्त्रीबुवा म्हणाले हे भगवन् हें आपल्या कृपेचेंच फळ आहे, परंतु [illegible] चरण धरवले नाहींत गोविंदस्वामी ह्मणाले कीं शास्त्रीबुवा आप[illegible] आहे तर तशी वेळ येईल हें ऐकून शास्त्रीबुवांस आनंद झाला. [illegible] चें स्मरण करून निजावयास गेले. प्रातःकाळीं स्वप्न पडलें [illegible] महाहात, मस्तकावर जटाजूट, शेषछत्र, कानांत कुंडलें, गळ्या[illegible] वैजयंतीमाळा, कटीला पीतांबर आणि हातांत केयूर कंकण आहे अशा प्रभूचें दर्शन झालें जगूंकाय हजारों सूर्य प्रकट झाले आहेत असें अलौकिक स्वरूप पाहून नमस्कार केल्यावर श्रीदत्तप्रभू ह्मणाले भक्तराज आज घांटावर तुजला दर्शन दिलें आणि आतां मंत्र देत आहें असें ह्मणून तीन वेळ मंत्रोच्चार करविला आणि सांगितलें कीं गोविंदस्वामीजवळून मंत्र विधान लिहून घे इतक्यांत तें स्वरूप गुप्त झालें व शास्त्रीबुवा जागे होऊन दत्त दत्त ह्मणत पाहिलेल्या स्वरूपाचा शोध करूं लागले परंतु तें स्वरूप पाहण्यांत न आल्यानें शोक करूं लागले कीं, अरेरे ! देवाचा मी असा काय

अपराध केला आहे कीं, जेणें करून देव दर्शन देऊन गुप्त होतात. या ठिकाणीं माझें पूर्व कर्म आड येत आहे, असें ह्मणून ध्यानधरून दिलेल्या मंत्राचा जप करूं लागले आणि सूर्योदय होतांच स्नान संध्यादि आटोपून गोविंदस्वामी जवळ जातांच ते हसून ह्मणाले कीं, कां? शास्त्रीबुवा, तुमच्या मंत्राचें विधान या पुस्तकांत अमूक ठिकाणीं आहे तें लिहून घ्या हें ऐकून शास्त्रीबुवांस अत्यानंद झाला. सद्गदित कंठानें विचार करूं लागले कीं, गोविंदस्वामी स्वतःच दत्त भगवान आहेत आणि माझेसाठींच अवतार घेऊन आले आहेत असें वाटतें असा निश्चय करून त्यानां साष्टांग नमस्कार घातला व स्वप्नांत घडलेली सर्व हकिगत कळविली हें ऐकून गोविंदस्वामी ह्मणाले कीं, शास्त्रीबुवा आजपासून तुह्मीं श्रीदत्तभगवानाचीं पूजा व ध्यान करावें आणि अन्यशास्त्रास सोडून उपनिषद्– भाष्याचा विचार करावा ह्मणजे सर्व शास्त्रांत गति होईल.

## पिशाच्च संग्रहाचा परिणाम.

माणगांवीं एक शूद्र पिशाच्चास वश करून, त्याचे जवळून लोकांचे शेतखळ्यांतील व घरांतील धान्य लांबवीत असे हा मनुष्य फक्त शास्त्रीबुवा व त्यांचे शेजारी यांस मात्र त्रास देत नसे. या प्रमाणें बारा वर्षे क्रम चालु होता एकदां तें पिशाच्च त्या शूद्रास ह्मणालें कीं तूं मला मनुष्याचा बळी दे, शूद्र कबूल न झाल्यामुळें पिशाच्च ह्मणालें कीं अन्य मनुष्य न मिळाल्यास तुझ्या चार पुत्रांतून एकाचा बळी दे. तेंही कबूल न झाल्यामुळें त्या पिशाच्चानें भयंकर गर्जना केली व ह्मणूं लागलें कीं, तूं आजपर्यंत मजकडून काम करविलेंस आणि त्याबद्दल बळीदान करीत नाहींस का? ठीक आहे, मीं तुझ्या वंशाचा नाश करीन. असें ह्मणून प्रथमतः त्याचे चार मुलगे व घरचीं सर्व माणसें त्यानें मारून टाकिलीं. आणि त्याचाही प्राण शेवटीं घेतला. याप्रमाणें भूत विद्येचा शेवट झाला, ह्मणून कोणीही अशा क्षुद्र विद्येच्या नादीं न पडतां ईश्वर प्रसन्न करण्यास कर्म शास्त्रोक्त करावें. भूतविद्येच्या साधकास आरंभीं तात्कालिक फळ मिळतें तें चांगलें वाटतें; परंतु शेवटीं

असे लोक आपल्या वंशाचा नाश करून नरकाला जातात. भगवद्गीतेमध्यें याविषयीं उल्लेख केला आहे कीं:—

यांति देवव्रता देवान् पितॄन्यांति पितृव्रताः
भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनोऽपि माम् ॥

## योगाभ्यास व ढोरे शास्त्री यांचा सल्लामसलतीचा परिणाम.

श्रीदत्त भगवानांचा अनुग्रह होतांच शास्त्रीबुवा थोड्या वेळांत उपनिषदाचें भाष्य शिकून दुसऱ्यास शिकवूं लागले, आणि अनेक विद्या संपादन केलेल्या असल्यामुळें लोकांवर उपकार करूं लागले, त्यामुळें सर्व विद्वानांत त्यांची ख्याति झाली. शास्त्रांत ज्या गोष्टी सांगितल्या असतील त्याचा प्रत्यक्ष अनुभव दुसऱ्यास देऊं लागले. परिणामीं त्यांचेजवळ लोकांची फार दाटी होऊं लागली. त्यांची उपासना पाहून देव प्रसन्न होऊन दर्शन देते झाले, व सांगितलें कीं, सर्व विद्यांचा जसा अनुभव घेतला तसा अष्टांग योगाचा अनुभव पण मिळाला पाहिजे; त्याशिवाय सर्वज्ञपणा येत नाहीं कारितां योगाभ्यास कर. असें सांगून देवांनीं अभ्यासाचे नियम दाखविले. त्याप्रमाणें अभ्यास सुरु ठेविल्यानें प्राणायाम सिद्ध झाला येवढ्यांत मुंबईचे **ढोरेशास्त्री** जे अभ्यास करावयास आले होते त्यांच्याशीं बोलत असतानां ढोरेशास्त्री, शास्त्रीबुवांस ह्मणूं लागले कीं, अभ्यासाचे वेळीं तुमचें गुदद्वार फार संकोच पावतें त्यामुळें मूळव्याध होण्याचा संभव आहे ह्मणून दररोज थोडें तूप खाऊन अभ्यासास बसत जा. ढोरेशास्त्री यांचें हें सांगणें शास्त्रीबुवांस पटून तूप खाण्यास कबूल झाले. परंतु ही गोष्ट श्रीदत्त भगवंतास न आवडल्या मुळें दृष्टांत दिला कीं, वः!! ढोरेशास्त्री यानीं तुला चांगलें सांगितलें आहे. दुसऱ्या दिवशीं तूप खाऊन अभ्यासास बसल्याबरोबर एकदम पोट खळबळून आलें, त्यामुळें शौचास उठावें लागलें.

याप्रमाणें वारंवार शौचास गेल्यानें शेवटीं संग्रहणीचा उपद्रव झाला. प्रारब्धयोगेंकरून या रोगानें शास्त्रीबुवांस इतकें पछाडिलें कीं, अशक्ततेनें उभें राहण्यास शक्ति राहिली नाहीं. अशा वेळीं देवांनीं दृष्टांत दिला कीं नारायण स्वामींचा उत्सव जवळ आला आहे, या करितां तुह्मी नरसोबाचे वाडीस जा. शास्त्रीबुवा विचार करूं लागले कीं, अशा अवस्थेंत गांवाबाहेर जाणें ही अशक्य आहे. तर सह्याद्रीचा घांट चढून पाउणशें मैल दूर कसें जावयेल! हेमना! तूं कां याबद्दल विचार करतोस? चल. ऊठ उत्सव जवळ आला आहे. जें व्हावयाचें असेल तें होईल. सद्गुरु आज्ञेचें उल्लंघन प्राणांतींही करूं नये. जो शिष्य गुर्वाज्ञेचें उल्लंघन करतो, त्यास या लोकीं व परलोकीं सुख मिळत नाहीं. अरे! तूं विचार कर. तुला श्रीगुरुरायांनीं योगाभ्यासाचे सर्व नियम दाखविले तरी ही, ढोरेशास्त्री यांचें ह्मणणें मान्य केलेंस, व ह्मणूनच ही विपत्ति तुजवर आली. त्याच वेळीं श्रीदत्तगुरूंस विचारून ढोरेशास्त्री यांचें सांगण्याप्रमाणें केलें असतें तर ही दशा आली नसती. हे मना! आजपासून निश्चयकर कीं, वाटेलतें असो. श्रीगुरूंच्या आज्ञेशिवाय कांहींही करावयाचें नाहीं. जो गुरुपुत्र असेल तो माझें वचन विसरणार नाहीं, असा विचार करून नरसोबाचे वाडीस जाण्यास निघाले. गांव सोडून पुढें जात असतां वाटेंत एका मनुष्यानें हाक मारिली व ह्मणाला कीं, शास्त्रीबुवा हें औषध घ्या ह्मणजे तुमचा रोग बरा होईल. शास्त्रीबुवा विचारांत पडले कीं, हा मनुष्य आग्रह करीत आहे, आतां काय करावें? इतक्यांत कानीं आवाज आला कीं, 'औषध खावें' शास्त्रीबुवा ह्मणाले कीं, मला माझें प्रारब्ध भोगावयाचें आहे; ह्मणून औषध घेणार नाहीं. हे प्रभो! आपली आज्ञाच असेल तर मी वाडीहून परत येई पावेतों या रोगाचें शमन व्हावें आणि पुन्हां घरीं आल्यावर माझा रोग सुरु व्हावा. हें ऐकून श्रीदत्तभगवान ह्मणाले कीं, तूं औषध खा तुझ्या इच्छे प्रमाणें होईल. त्याप्रमाणें औषध घेतल्यावर उपद्रव कमी झाला व ह्मणूनच उत्सवांत वेळेवर हजर होऊन श्री दत्तपादुकांस वंदन करून प्रार्थना केली:—

# दत्तात्रेयाचें अष्टक.

तापत्रयानें मम देह तापला, विश्रांति कोणी नच देतसे मला ॥
दैवें तुझें हें पद लाधलें मला, दत्ता कृपासाउलि दे नमूं तुला ॥ १ ॥
कामादि षड्वैरि सदैव पीडिती, दुर्वासना अंग सदैव ताडिती ।
त्राता दुजा कोण न भेटला मला । दत्ता० ॥ २ ॥
देहीं अहंता जडली न मोडवे । गृहात्मजस्त्रीममदा न सोडवे ॥
त्रितापदावानळ पोळितो मला । दत्ता ० ॥ ३ ॥
अंगीं उठे हा अविचार दुर्धर । तो आमुचें हें बुडवीतसे घर ॥
पापामुळें जाळितसे त्वरें मला ॥ दत्ता० ॥ ४ ॥
तूंची कृपासागर मायबाप तूं । तूं विश्व हेतू हरि पाप ताप तूं ॥
न तूजवांचूनि दयाळु पाहिला ॥ दत्ता० ॥ ५ ॥
दारिद्र्य दावें द्विज पोळला तया । श्रीद्यावया तोडिसि वेल चिन्मया
तयापरी पाहिं दयार्द्र तूं मला ॥ दत्ता० ॥ ६ ॥
प्रेतासि तूं वांचविसी दयाघना । काष्ठासि तूं पल्लव आणिसी मना ॥
हें आठवीं मी तरि जीव कोमला । दत्ता० ॥ ७ ॥
ह्या अष्टकें जे स्तविती तयांवरी । कृपा करी हात धरीं तया शिरीं ॥
साष्टांग घालूं प्रणिपात वा तुला ॥ दत्ताकृ० ॥ ८ ॥

या प्रमाणें प्रार्थना पूर्वक साष्टांग नमस्कार घालून अपराधाची क्षमा मागितली. नंतर मठांत येऊन मौनीस्वामीस व गोविंदस्वामीस नमस्कार केला. उत्सव संपल्यावर माणगांवीं परत आल्याबरोबर पूर्वीचा उपद्रव सुरु झाला. या प्रमाणें बारा महिने लोटल्यावर श्रीदत्तभगवान ह्मणाले कीं या शरीराचा प्रारब्धभोग संपला आहे. तर दहीं व सुरण खा ह्मणजे तुझा रोग बरा होईल. आज्ञेप्रमाणें केल्याबरोबर व्याधीचें शमन झालें. आणि खेचरी मुद्रेच्या नियमान्वयें योगाभ्यास चालू ठेविला. कांहीं काळ लोटल्यावर योगाभ्यास सिद्ध होऊन सर्वगुण संपन्नता प्राप्त झाली आणि हेंच शिक्षण दुसऱ्यास देऊं लागले.

# रामतीर्थावरील बुवांचा समागम व त्यांचें वृत्त.

सह्याद्रीच्या घांटावर आजरें या गांवाजवळ रामतीर्थावर **आजरेकर** बुवा नांवाचे मारुती उपासक राहत असून ते जातीचे गौडब्राह्मण आहेत. त्यांची उपासना पाहून मारुतीनें प्रसन्न होऊन त्यानां वचन सिद्धि दिली आणि सांगितलें कीं, जरूर पडल्यास माझें ध्यान करावें असें ह्मणून मारुती गुप्त झाले. हे बुवा ज्यावेळीं मारुतीचें ध्यान धरून बसत त्यावेळीं ते तद्रूप होऊन शेर दोनशेर शेंदूर खाऊन त्यावर दोनचार शेर तेल पीत असत, आणि त्यावेळीं आपल्या झोळींतून वाटेल तें काढून सर्वांस देत असत. त्याप्रसंगीं ते शुद्धीवर नसतात. यांचे वयाचा कोणास पत्ता लागत नाहीं. शंभर वर्षांमागें ज्यांनीं, यांना पाहिले आहेत ते सुद्धां असें ह्मणतात कीं, ज्या दिवसापासून आह्मीं यानां पाहिले आहेत तसेच आज कायम दिसतात. शास्त्रीबुवांवर प्रेम असल्यामुळें हे माणगांवीं कधीं कधीं येत असत. एकदां हे बुवा पाडगांवीं आले होते. तेथें दत्त मंदिरांत श्री दत्ताची मूर्ती एका बाजूस पडलेली पाहून गांवकऱ्यांस सांगितलें कीं, देवाच्या मूर्तीस अशी अस्ताव्यस्त ठेविली हें चांगलें नव्हे. ज्या गांवीं पुरातन देवालयाची व्यवस्था गांवकऱ्यांनीं केली नाहीं त्या गांवाची दुर्दशा झाली आहे. त्यावर गांवकरी ह्मणाले कीं, हे भगवन्! आपण साक्षात् मारुती अहां कारितां आपल्या हातानें या मूर्तीची प्रतिष्ठा व्हावी. बुवा ह्मणाले कीं, तुह्मी मूर्ति स्थापन करा, मी हजर राहीन. गांवकऱ्यांनी कामास सुरवात केली. तेथील जहागीरदार गोसावी यांस हें न आवडल्यामुळें त्यानीं वाजंत्रीवाल्यांस तेथें जाण्यास मनाई केली. हें पाहून आजरेकरबुवा ह्मणाले कीं, हें देवाचें काम आहे आपण न याल तर खरोखर नुकसान होईल. त्या लोकांनीं त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केल्यानें गांवांत प्रथमतः महामारी सुरु झाली; त्यांत त्या लोकांस पहिल्या सपाट्यांत उपद्रव सुरु झाला. त्यामुळें ते लोक आजरेकर बुवांचे पायांपडून ह्मणूं लागले कीं, हे मायबाप! आमचे अपराध क्षमा करून शरण आलेल्यास या विपत्तींतून सोडवा. आजरेकर बुवा ह-

णाले कीं, उत्सव समाप्त होईपर्यंत वाजंत्रें वाजविण्यास कबूल होत असाल तर महामारी बंद करूं. त्यावर ते हीन जातीचे लोक ह्मणूं लागले कीं, 'हे भगवन्! आपल्या आज्ञेप्रमाणें आह्मीं वाजविण्यास येऊं.' नंतर बुवांनीं भस्म देतांच त्या लोकांचा रोग बरा झाला. आणि उत्सवास सुरुवात झाली. हें पाहून त्या जहागीरदारानें ब्राह्मणांस सांगितलें कीं, या उत्सवांत स्वयंपाक करणारा अनाचारी पतित आहे तें ऐकून कोणीही ब्राह्मण जेवावयास गेले नाहींत. त्यामुळें सर्व अन्न शूद्रांस वांटून आजेरेकरबुवा जंगलांत जाऊन बसले. शास्त्रीबुवांस ही बातमी लागतांच ते आजेरेकर बुवांस समजावून माणगांवीं घेऊन आले त्या दिवसापासून पाडगांवावर अनेक विपत्ती येत गेल्या. त्यामुळें पाडगांवचे लोक माणगांवीं घेऊन आजेरेकर बुवांस पाडगांवीं येण्यासाठीं विनंति करूं लागले, परंतु बुवांनीं ऐकिलें नाहीं. शेवटीं सर्व जणांनीं शास्त्रीबुवांस सांगितलें कीं, 'हे भगवन्! आजेरेकर बुवांस घेऊन आपण पाडगांवीं यावेंच.' शास्त्रीबुवा आजेरेकर बुवांस ह्मणाले कीं, 'बुवा! हे लोक रुदन करीत आहेत. तरी आपण कृपा करून पाडगांवीं चलावें. मी आपणाबरोबर येत आहें.' त्यावरून आजेरेकर बुवा शास्त्रीबुवांबरोबर पाडगांवीं येऊन श्रीदत्तमंदिरांत राहिले. जहागीरदारास हें समजतांच तो दोन ब्राह्मण बरोबर घेऊन तेथें येऊन त्यांस ह्मणाला कीं हे पाखंडी! लुच्चांनो! आतांच मी तुमची वाढलेली दाढी उपटून टाकितों. हें ऐकून आजेरेकर बुवांस अत्यंत क्रोध चढला, व तो पाहून लगेच शास्त्रीबुवा बोलूं लागले कीं, 'हे जहागीरदार! हा ब्राह्मण कांहीं बोलत नसतां आपण विनाकारण इतके कां संतापतां? तुह्मीं आपल्या भविष्याचा विचार करा. असें केलें तर परिणाम बरा नाहीं.' हें ऐकून जहागिरदार गप्प बसला. नंतर त्यांनीं आजेरेकरबुवांस सांगितलें कीं, 'महाराज! आपल्या शरीरांत या चांडाळानें प्रवेश केला आहे, तरी आपण स्नान करून यावें.' आजेरेकरबुवा स्नान करून आणि हातांत भस्म घेऊन शाप देण्यास तयार झाले. शास्त्रीबुवा ह्मणाले कीं 'महाराज, शाप दिल्यानें आपल्याच तपोबलाचा नाश होतो. कारितां असें करूं नका. प्रत्येकास केलेल्या कर्माचें फळ ईश्वर देत असतोच.' हें ऐकून ते

बुवा शान्त होऊन शास्त्रीबुवांस घेऊन पुढें चालले. पुढें एकाएकी त्या गांवांत भयंकर आग लागली, व तिरस्कार करणाऱ्या ब्राह्मणांचीं घरें जळून फस्त झालीं. आणि नंतर त्या जहागीरदारावर अशी विपत्ती आली कीं, हल्लीं त्याला सुखानें अन्न पण खावयास मिळत नाहीं. करितां ज्यांनां स्वहित साधावयाचें असेल त्यानीं हा दृष्टांत लक्षांत ठेऊन साधुपुरुषाची अवहेलना करूं नये. हे आजेरकरबुवा अद्याप जिवंत आहेत.

या गांवांत मौनीबुवा नांवाचे एक साधु राहात होते त्यांच्या कुलगोत्राची कोणास माहिती नव्हती, हे स्वतः ब्रह्मनिष्ठ असूनही उन्मत्त वृत्तीनें राहून कोणाशीं बोलत नसत. घांटावरून येणाऱ्या जाणाऱ्यास कधीं काळीं विचारीत कीं, 'तुमच्यापाशीं काय आहे ?' तर दरएक आपल्यापाशीं जें असेल त्याचें नांव सांगत. एकदां एक वाणी बैलावर पोतीं वाहून जात होता. त्या पोत्यांत किराणा व उधराणीचे रुपये होते. त्यास मौनीबुवांनीं विचारिलें कीं, या पोत्यांत काय आहे ? वाणी ह्मणाला, माती आहे. फिरूनही तोच प्रश्न विचारतां वाण्यानें तेंच उत्तर दिलें, व गांवीं आला घरीं येऊन पोतें सोडून पहातांच रुपये व किराण्याचे ऐवजीं माती निघाली. हें पाहून त्या वाण्यानें कपाळीं हात मारून घेतला, व म्हणाला कीं, 'हाय! हाय! हें काय झालें!' गांवकऱ्यांस हें वर्तमान समजतांच त्या लोकांनीं त्याला विचारिलें कीं, 'रस्त्यांत तुला कोणी भेटले होते काय?' वाणी ह्मणाला, 'बावांनों, रस्त्यांत एक वेड्यासारखा मनुष्य भेटला,' आणि त्यानें विचारिलें कीं, 'पोत्यांत काय आहे.' माती आहे. असें मीं सांगितलें. त्यानीं फिरून प्रश्न केला, त्याचें उत्तर मातीच आहे असें दिलें. हें ऐकून गांवकरी ह्मणाले, 'अरेरे! ते मौनीबुवा असावेत, त्यांचे समोर असत्य बोलल्याचा हा परिणाम आहे.!'

वाण्यांची जात वरून वरून शांत दिसते खरी, परतु ईश्वरानें ती रजस्तमोगुणयुक्त केल्यामुळें कपटी लोकांप्रमाणें वरून शहाण्यासारखी दिस-

ते. परंतु सत्वगुणांच्या अभावीं, संशयी असल्यामुळें आपल्या बापाचाही विश्वास धरीत नाहीं. त्यामुळेंच हा वाणी मौनीबुवाशीं खोटें बोलला, आणि त्याच्या बोलण्याप्रमाणेंच शेवटीं झालें. ही हकिगत पाडगांवच्या सर्व मंडळींस माहीत आहे. या गांवी मौनीबुवांनीं जिवंत समाधी घेतली आहे. त्या स्थानीं जाऊन पूजा केली असतां, मनुष्यांचीं अनेक कार्ये सिद्ध होतात. या कलियुगांत साधुपुरुषाच्या वचनानें किराणा आणि रुपये माती होऊन जातात, तर सत्यनारायणाचे कथेंत वाण्याचे असत्य बोलण्यानें नावेंतील द्रव्याचें लतापत्र होऊन गेलें यांत काय आश्चर्य आहे ? कारण ही गोष्ट सत्ययुगांत झालेली आहे.

नरसोबाचे वाडीस नरक चतुर्दशीच्या दिवशीं प्रातःकाळीं गोविंदस्वामी, शास्त्रीबुवा, आणि अष्टेकर शिवराम, हे शौचास बाहेर निघाले. त्यावेळीं पुजाऱ्यांचीं मुलें समोर येऊन ह्मणालीं कीं, ‘ स्वामीमहाराज ! देवाचा प्रसाद घ्या. ’ गोविंदस्वामी ह्मणाले कीं, ‘ मी शौचास जात आहें. तर हा प्रसाद तुह्मी मठांत ठेवून द्या. ’ मुलें ह्मणालीं कीं, ‘ स्वामीमहाराज आतां प्रसाद खात असाल तर देतों. पण मठांत कांहीं ठेवणार नाहीं. स्वामीमहाराज विचार करूं लागले कीं, आज देव माझी परिक्षा पहात आहेत, असें दिसतें. ’ ह्मणून प्रसादांत फळ होतें तें घेऊन खाऊन गेले. त्यानंतर मुलांनीं शास्त्रीबुवांजवळ जाऊन प्रसाद दिला व त्यांनींही तो खाऊन टाकला; त्यांच्या पाठीमागें शिवराम होते त्यानां प्रसाद देण्यास आले, तो घेण्यास त्यांनीं नाकारिलें, व तसेच पुढें गेले. स्नान संध्या करून मठांत आल्यावर शिवरामास एकाएकीं ताप आला, व बेफाम होऊन पडला. त्यांच्या स्त्रीस रात्रीं स्वप्नांत देवानें दृष्टांत दिला कीं, तुझ्या पतीनें प्रसादाचा त्याग केल्यामुळें ही शिक्षा केली आहे. ही हकिगत त्या बाईनें गोविंदस्वामींस व शास्त्रीबुवांस कळविली. त्यावरून स्वामीमहाराज ह्मणाले कीं, ‘ हे बाई ! तुझ्या पतानें आह्मां समक्ष प्रसादाचा त्याग केला. त्यामुळें तुह्मीं उभयतां पतिपत्नी देवाच्या पादुकांसमोर जाऊन झालेल्या अपराधांची क्षमा मागा. आणि या

चुर्कीबद्दल पादुकांवर लघुरुद्राचा अभिषेक करावा.' त्याप्रमाणें केल्यानें शिवरामास त्वरित गूण आला. त्यादिवसापासून शास्त्रीबुवांचा नियम असे कीं, देवाचा शुद्ध ( फळफळादि ) प्रसादाचा त्याग न करतां खाऊन जावा. या दुष्ट कलियुगांत श्रद्धाळू लोकांनीं देवाच्या प्रसादाचा त्याग केल्यास शिक्षा होते, तर सत्य युगांत सत्यनारायणाचे कथेंत वैश्यकन्या आणि राजाविषयीं जी कथा सांगितली आहे ती कशी खोटी असेल ? या करितां श्रद्धावानानें मूर्ख जनांच्या नादीं लागून शास्त्राची अवज्ञा करूं नये. जरीं ब्राह्मणेतरानीं प्रसाद ह्मणून फळ दिलें तर त्याचा अवश्य स्वीकार करावा. या विरहीत दुसरें कांहीही घेऊं नये, भलतीच वस्तू प्रसाद ह्मणून दिली तर त्याचा त्याग करण्यांत दोष येत नाहीं.

एके समयीं शास्त्रीबुवांनीं आपल्या बरोबर शंकर भट्ट सप्रे यांस श्री नरसोबाचे वाडीमध्यें न येण्याबद्दल सांगितलें असतांही ते हट्टानें आले. तेव्हां त्यांस तेथें फार ताप येऊन ते बेशुद्ध पडले. देवानें शास्त्रीबुवांस माणगांवीं जाण्याबद्दल आज्ञा केली. देवाची आज्ञा झाल्यानें शास्त्रीबुवा मनांत विचार करूं लागले कीं, आजारी मनुष्यास सोडून कसें जावें ? शास्त्रीबुवांचा असा हेतू जाणून देवाची आज्ञा झाली कीं, या मनुष्यास वासुदेव मळियाळकर स्वामी आहेत, त्यांच्या हवाली करून जावें. ह्याप्रमाणें आज्ञा झाल्यावर सप्रे यांस त्या स्वामींच्या हवालीं करून शास्त्री बुवा माणगांवीं जाण्यास निघाले. दिवसेंदिवस सप्रे फार आजारी होऊं लागल्यामुळें वासुदेवस्वामी यांनीं देवाची प्रार्थना केल्यावरून त्यांस दृष्टांत झाला कीं, सप्रे यांस देवाच्या तीर्थानें स्नान घालून अंगारा लावावा. आज्ञेप्रमाणें त्या आजाऱ्यास कृष्णा नदींत उभे करून देवास अभिषेक केलेल्या जलानें स्नान घालून देवाचा अंगारा लावून निजविले त्याबरोबर त्यांस एकदम घाम येऊन ताप उतरला; व ते माणगांवीं परत गेले. याकरितां कोणीही मनुष्यानें साधुपुरुषासमोर हट्ट करूं नये व दृष्टांत दिला तर तसें अवश्य वागावें.

सावंतवाडी नजीक सांगेली या गांवीं दिवाकर हरी भट्ट जडये या नांवाचे गृहस्थ राहत असत. त्यांच्या बागेंत एक फणसाचें झाड होतें. कोणा सत्पुरुषाच्या आज्ञेप्रमाणें दिवाकर भट्टजींचे पूर्वज त्या झाडाची पूजा करीत असत. तें झाड गांवच्या लोकांनीं व घरच्या मंडळींनीं तोडूं नये असें सांगितलें. परंतु तें न ऐकतां दिवाकर भट्टजींनीं उन्मत्तपणानें "झाडांत देव असतो काय" असें म्हणून तोडून टाकिलें. त्यावेळीं एक मूल त्या झाडाखालीं सांपडून मेलें, इतकेंच नव्हे तर त्यावर एकामागून एक विपत्ति येऊन त्याची सर्व संपत्ति नाहींशी झाली. गाई, म्हशी वगैरे जनावरें मेलीं. जमीन होती तींत पीक होईनासें झालें. बागेंत फणस इत्यादि दुसरीं फळ-झाडें होतीं त्यांचीं फळें वरून पिकल्यासारखीं दिसत परंतु आंत सडून जंतु होऊं लागल्यामुळें खाण्याचेही उपयोगीं येत नसत, तसेंच त्यांच्या कच्चा फळांची भाजी केल्यास शिजत नसे त्यामुळें भाजीच्याही उपयोगीं येईनाशीं झालीं. तात्पर्य बागेंतील फळें कोणाचेही उपयोगीं येत नसत. शेवटीं घरचे मंडळीस अन्न मिळण्याचीही पंचाईत पडूं लागल्यामुळें त्यांचें बंधू कलह करूं लागले; यासाठीं दिवाकरभट्ट बडोदें संस्थानांत त्याचा एक मित्र रहात होता त्याचे आश्रयास गेले असतां ते तेथें मृत्यु पावले. नंतर त्याचा भाऊ भास्करभट्ट माणगांवीं येऊन शास्त्रीबुवाजवळ खिन्न वदन करून रडूं लागला व म्हणाला "महाराज! मी दुःखी व अनाथ आपणास शरण आलों आहें; माझा अपराध क्षमा करून माझें रक्षण करावें."

शास्त्री०— तूं कां रडत आहेस? असें विचारतांच त्या मनुष्यानें सर्व हकीगत सांगितली. तें ऐकून शास्त्रीबुवा म्हणाले तुझ्या भावानें बागेंत एका फणसाचे झाडावर देवाचे गण रहात असत तें झाड कापून टाकल्यामुळें ही उपाधी लागली आहे: तरी तें झाड पुनः लावावें, व मोठें झालें कीं त्याचेखालीं एक मूर्ती बसवून पहिल्याप्रमाणें पूजा करीत जावी. म्हणजे ही आपत्ती दूर होईल; असें सांगितलें. त्यावेळेस शास्त्रीबु-वाजवळ कित्येक मंडळी बसली होती त्यांनीं या इसमाचें दुःख पाहून त्या-

स मदत करण्याचा विचार केला. त्यावर शास्त्रीबुवा म्हणाले आता मदत करण्याचें कारण नाहीं. यानें माझ्या सांगण्या प्रमाणें केलें तर आपोआप या दुःखाचें निवारण होऊन तो पूर्ववत स्थितीला प्राप्त होईल. शास्त्रीबुवांच्या सांगण्याप्रमाणें त्या मनुष्यानें सांगेलीस येऊन आपल्या बागेंत झाड लाविलें; त्याबरोबर बागेतील फळें पूर्वीप्रमाणें पिकूं लागलीं; व सर्व सुखाची प्राप्ती झाली. हें पाहून शंकर सत्ते यानें आपली कन्या त्याचे मुलास दिली. पुढें तें झाड मोठें झाल्यावर त्याचे खालीं मूर्ती स्थापन न केल्यामुळें शंकर सत्ते याचा जांवई हरीभट्ट भ्रमिष्ट होऊन गांव सोडून परगांवीं चालता झाला. शंकर सत्ते यानें शास्त्रीबुवांकडे येऊन जांवयासंबंधीची ही हकीगत निवेदन केली. त्यावर शास्त्रीबुवा म्हणाले कीं तुम्हास प्रत्यक्ष अनुभव आला असतां तुम्ही मूर्ती स्थापन केली नाहीं त्यामुळें हें झालें आहे, तर आतां झाडाचें उद्यापन करून त्याच्याखालीं मूर्तीची स्थापना करावी; म्हणजे तुमचा जांवई येईल. आज्ञेप्रमाणें झाडाचें उद्यापन करून मूर्ती स्थापन केल्याबरोबर शंकर सत्ते याचा जांवई पूर्व स्थितीला येऊन घरीं परत आला. या साठीं एवढें लक्षांत ठेवावें कीं, आपले वाडवडील साधुपुरुषाचे वचनानीं जें शुभ कर्म करीत आले असतील त्याचे आड येऊं नये.

•

सह्याद्रि घाटाचे खालीं दुकान वाडी या नांवाचें गांव आहे तेथें एक भाविक ब्राह्मण स्वतःचा बगीचा करून त्यांत आपल्या कुटुंबासह राहत असून कोणी अतीथी अभ्यागत आल्यास त्यांचा सत्कार करीत असे; काहीं दिवसानंतर त्या ब्राह्मणाचा भोळेपणा पाहून एका वैश्यानें खोटा दस्तैवज करून त्याचा बगीचा बळकाविण्याचा प्रयत्न केला. ही खबर त्या ब्राह्मणाचे पत्नीस समजतांच तिनें ही हाकिगत आपले पतीस सांगितली त्याबरोबर तो रडून बोलूं लागला कीं, ‘ याची आपणाला बिलकूल माहिती नाहीं ’ त्यानंतर कित्येक चांगल्या मनुष्यानीं वैश्यास सांगितलें कीं, ‘ हें काम तूं चांगलें केलें नाहींस. ’

**वैश्य—** हा पट्टा रजिस्टर्ड दस्तैवज असें ह्मणून स्वतः त्या जमीन्याची वहिवाट करूं लागला. शास्त्रीबुवांस ही हाकिगत समजतांच त्या भोळ्या ब्राह्मणातर्फे एका चांगल्या ब्राह्मणास अनुष्ठानास बसविले. अनुष्ठानास आरंभ होतांच वैश्याचे मनास अतिशय त्रास होऊं लागला आणि आठ दिवसांत तो घाबरून जाऊन त्या ब्राह्मणास नमस्कार करून खोटा केलेला दस्तैवज परत देऊन आपल्या अपराधाची क्षमा मागितली. या प्रमाणें मंत्राची शक्ती आहे परंतु चांगला अनुभव दाखविणारा मात्र पाहिजे, व अनुष्ठान करणारा श्रद्धावान् पाहिजे त्यावांचून मंत्राचें फळ मिळत नाहीं.

एकदां माणगांवचा घन:शाम विठ्ठल कुळकर्णी या नांवाचा गृहस्थ शास्त्रीबुवांकडे येऊन ज्योतिष शास्त्राची निंदा करूं लागला. व थट्टा करून विचारूं लागला कीं, हल्लीं मला कोणती दशा चालू आहे.

**शास्त्री०—** हल्लीं शनीची महादशा तुह्मांस आहे.

**कुळकर्णी—** शनीचे महा दशेंत मला मोठा फायदा झाला आहे, ह्मणून तुह्मी व तुमचें ज्योतिषशास्त्र खोटें आहे.

**शास्त्री०—** दीर्घदृष्टीच्या ज्योतिषाचें सांगणें खरें असेल तर तुह्मांला ह्या बाबतीचा अनुभव लवकरच येईल.

**कुळकर्णी—** मी पण पाहतों ग्रह काय करतो तें. असें बोलून तो चालता झाला. थोडे दिवस गेल्यानंतर रामनवमीच्या उत्सवाचे दिवशीं त्या कुळकर्ण्यावर खून केल्याचे तोहमती बद्दल वारंट आल्यानें त्यास धरून घेऊन गेले व कैद केलें. त्यावेळीं त्यास शास्त्रीबुवांनीं सांगितलेल्या गोष्टी बद्दल स्मरण होऊन मनास फार खेद वाटला व झालेल्या अपराधाची क्षमा मागून मी या संकटांतून केव्हां मुक्त होईन असें शास्त्रीबुवांस विचारिलें. शास्त्रीबुवांनीं त्याला ग्रह शांति करण्या बद्दल सांगून पाठविलें आणि त्याबरोबर असेंही सांगितलें कीं, थोडे दिवसानंतर तुझे घरीं चोरी होईल परंतु

मुद्देमाल तुला मिळेल. शास्त्रीबुवांचे सांगण्यप्रमाणें कुळकर्ण्याचे घरांत चोरी झाली. व मुद्देमाल परत मिळाला. तसेंच शास्त्रीबुवांचे वचनानुसार वागल्यानें आलेल्या तोहमतींतून मुक्त झाला. तेव्हां पासून कुळकर्णी आपलें वाईट वर्तन सोडून देऊन व शास्त्रीबुवांची सेवा करून उत्तम सद्गतीला पावला सारांश ज्योतिष शास्त्र खरें आहे. परंतू नित्य नैमित्तिक कर्म करून अंतःकरण शुद्ध ठेवलें तरच या शास्त्राचें खरें रहस्य समजेल. नाहींतर समजणार नाहीं.

सावंतवाडीच्या एका सारस्वत ब्राह्मणास पुत्र नसल्यानें त्यानें दत्तक मुलगा घेतला व आपल्या मिळकतीपैकीं, मुलीस जें कांहीं देण्याचें तें दिलें. दत्तक मुलाला पुरलेलें द्रव्य दाखविण्यापूर्वी तो ब्राह्मण निवर्तला तेव्हां त्याचे स्त्रीने तें दत्तक पुत्रास नकळत आपली मुलगी जी गोठोस गांवीं दिली होती तिला तें द्रव्य काढून दिलें. पुढें थोडेदिवसानंतर त्या मुलीचे घरांत पिशाच्चानें उपाधी करण्यास आरंभ केला. त्यामुळें घरांतील सर्व मंडळी कंटाळून जाऊन शास्त्रीबुवांजवळ माणगांवीं येऊन त्यांस सर्व हकिगत निवेदन केली. योगबळाच्या योगानें त्या पिशाच्चास शास्त्रीबुवांनीं जवळ बोलावून विचारिलें ‘ तूं या बाईस कां पिडा देत आहेस ? ’

**पिशाच्च**-- महाराज ! ही बाई माझी मुलगी आहे आणि मी तिचा पिता आहें, इचा हक्क नसतां हिचे आईनें माझें पुरलेलें द्रव्य काढून इला दिलें, त्यामुळें मी इला पिडा करीत आहें. ही जर माझे दत्तक घेतलेले मुलास तें द्रव्य परत देईल तर मी पीडा करणार नाहीं. सर्व मिळकतीचा वारस माझा दत्तक घेतलेला मुलगा आहे. पिशाच्चानें सांगितलेली हकिगत शास्त्रीबुवांनीं त्या मुलीस व तिचे नवऱ्यास विचारतांच त्यांनीं ही गोष्ट कबूल केली.

**शास्त्री०**— तुम्हास जर या पिडेंतून मुक्त होणे असेल तर घेतलेलें सर्व द्रव्य दत्तक पुत्रास परत द्या. परंतु ती गोष्ट त्यांनीं [illegible] न

गेल्यामुळें ती दुःख भोगीत राहिली. तात्पर्य वाईटाचा परिणाम वाईटच होत असतो ह्मणून तसें न करण्याकडे लक्ष ठेवीत असलें पाहिजे.

सावंतवाडीमध्यें एका ब्राह्मणास क्षय रोगाची पीडा होती. त्यास एका अनुभवी मनुष्यानें सांगितलें कीं, तुह्मीं दररोज गुरुचरित्राचा पाठ करीत जावा व निमित्तमात्र औषध घ्यावें ह्मणजे रोग बरा होईल. त्याप्रमाणें त्यानें श्रद्धेनें नित्य पाठ करण्यास आरंभ केला व त्याचा रोग बरा झाला. पुढें कित्येक दिवसानंतर त्या ब्राह्मणास एका शुष्क वेदांत्याची संगती झाली. त्यानें त्यास भाष्य वगैरे ऐकविलें तेव्हां पासून त्याची कर्मावरील श्रद्धा उडून जाऊन स्नान संध्या व गुरुचरित्राचा पाठ करण्याचें सोडून दिलें व असले गुरुचरित्रासारखे प्राकृत ग्रंथ वाचण्यांत विनाकारण वेळ वालेविणें यांत अर्थ नाहीं असें समजून वागूं लागला; त्यामुळें त्याजवर देवाची अवकृपा होऊन पूर्ववत क्षय रोगी झाला व दिवसेंदिवस त्याजवर विपत्ती येऊं लागल्या. पुढें त्यानें ही गोष्ट शास्त्रीबुवांस कळविली त्यावर ते ह्मणाले ‘ तुह्मीं ब्राह्मण होऊन संध्यादि कर्म व गुरुचरित्राचा पाठ सोडून दिल्यामुळें देवाच्या अवकृपेपासून असा परिणाम झाला आहे. तरी तुह्मीं वेदांत्यापाशीं जाऊन रोग बरा करवावा. जों पावेतों हें शरीर आहे तों पावेतों आपण ईश्वराचे दास आहोंत असें समजून त्याची सेवा केली पाहिजे. मी ब्रह्म आहें असें ब्रह्मज्ञानी कधींही बोलत नसतात.’ असें सांगून त्यास पाठवून दिलें व पुढें तो मरण पावला. सारांश अशा शुष्क वेदांती लोकांच्या संगतीस लागून कर्म सोडणें चांगलें नव्हे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

माणगांवांत शास्त्रीबुवांपाशीं एक गाय होती तिच्या लहान वांसराची सेवा एक कुणबी करीत असे. त्या नयनानंदक वांसरास पाहून एका वाण्यास मोह उत्पन्न होऊन त्यानें त्या कुणब्यास हें वांसरूं कोणाचें आहे ह्मणून विचारिलें.

**कुणबी**— हें वांसरूं गणेश भट्ट टेंब्ये यांचें आहे.

**वाणी**— वाहवा ! हें **वांसरूं** चांगलें आहे असें ह्मणून त्यानें तिच्या पाठीवरून हात फिरविल्याबरोबर तिला रक्त पडूं लागलें व सायंकाळ पावेतों तें मरणोन्मुख झालें. ही गोष्ट आजुबाजूचे लोकांस समजतांच त्यानीं व त्या कुणब्यानें कांहीं कामाचें निमित्त करून त्या वाण्यास घरांत बोलावून त्याचा डाव साधण्याचा विचार केला. त्यामुळें तो घाबरून जाऊन झालेल्या चुकीबद्दल पश्चात्ताप करूं लागला. तेव्हां तें **वांसरूं** चटकन जाग्यावर उठून बसलें व गवत खाऊं लागल्यामुळें हुशार झालें.

एके दिवशीं शास्त्रीबुवांस ज्वर आलेला एका बाईनें पाहिला होता. दुसरे दिवशीं शास्त्रीबुवा पुराण वाचण्यास जातांना रस्त्यांत त्या बाईनें पाहिलें तेव्हां ती बाई आश्चर्य चकित होऊन शास्त्रीबुवांस ह्मणाली शास्त्रीबुवा काल तुह्मांस उठण्याची सुद्धां शक्ती नव्हती आणि एका दिवसांत कसे बरे झालांत ? असें ह्मणतांच तिच्या दुष्टदृष्टीचा परिणाम तात्काल होऊन शास्त्रीबुवांस एकदम जोरानें ताप भरून आला व घाबरून गेले तेव्हां लोकांनीं ही हकीगत विचारतांच त्यानां सर्व घडलेली हकीगत समजून आली. त्यावरून दृष्टी दोष काढतांच शास्त्रीबुवांची प्रकृती चांगली झाली तात्पर्य ज्यांच्यांत पूर्वार्जित अनेक पापें असतील त्यांच्या वाणींत व दृष्टींत अशाप्रकारचे दोष उत्पन्न होत असतात ह्मणूनच संध्या भोजनादि वेळीं अमूक अमूक जातीचे लोक जवळ असूं नयेत असें शास्त्र सांगत आहे. तैलंग, द्राविडादि देशांत भोजन इत्यादि समयीं आपल्यावर हलक्या जातीच्या मनुष्यांची दृष्टी पडल्यास अन्न खात नाहींत. ह्मणून शास्त्रांनीं ज्या ज्या गोष्टी निषिद्ध मानल्या आहेत त्या त्या संबंधीं योग्य काळजी ठेवावी.

शास्त्रीबुवांस पांच बहिणी आणि दोन भाऊ होते ते त्यांच्या पेक्षां लहान होते. एकाचें नांव हरिभट्टजी व दुसऱ्याचें नांव सिताराम. सिताराम याचें वय बारा वर्षाचें असतां एका गृहस्थानें गोप्रदानाचा संकल्प करून यांचे हातावर उदक सोडतांच एकदम सितारामबुवांची प्रकृति फारच बिघ-

डली ही गोष्ट शास्त्रीबुवांस कळतांच गोप्रदान घेतल्याबद्दल सितारामाकडून प्रायश्चित्त घेववून ती गाय व त्या गाईचे किमतीचे दुप्पट द्रव्य ब्राह्मणांस दिलें तेव्हां सितारामबुवाची प्रकृति चांगली झाली. यास्तव बुद्धिमान मनुष्यानें संकल्पपूर्वक दान घेऊं नये.

जीं मनुष्यें पापकर्मांत बुडलीं आहेत त्यांस याचा अनुभव येत नाहीं. ज्याप्रमाणें उकरड्यांत थोडा केर टाकल्यानें उकरडा वाढत नाहीं व थोडा काढल्यानें कमी दिसत नाहीं त्याप्रमाणें पापी मनुष्याचें समजावें.

शके १७९७ त शास्त्रीबुवांस श्रीदत्त महाराजांची आज्ञा झाली कीं ' तुह्मी ब्रह्मचर्याची समाप्ती करून गृहस्थाश्रम करावा. तुह्मास योग्य अशी सावंतवाडीस बाबाजीपंत गोडे यांची कन्या आहे; ते गृहस्थ आपल्याकडे लग्न ठरविण्याकारितां येतील. ' आज्ञा होतांच शास्त्रीबुवांनीं लग्न करण्याची इच्छा नाहीं अशाबद्दल देवास प्रार्थना केली. परंतु देवाचे आग्रह पूर्वक आज्ञेवरून व पूर्वजन्माचे योगानुरूप तसें करण्यास कबूल झाले. ते एकवीसावे वर्षी ब्रह्मचर्याची समाप्ती करून गृहस्थाश्रमी झाले. त्यांच्या पत्नीचें नांव अन्नपूर्णाबाई असें होतें व नांवाप्रमाणें त्यांचे अंगीं गूणही होते. त्यांनीं शरीर त्याग करीपर्यंत घरांतून कोणीही अतिथि अभ्यागत यास विन्मूख जाऊं दिलें नाहीं. पतीस ईश्वर समजून त्यांची सेवा एकनिष्ठेनें करीत असत आजकालच्या स्त्रियांप्रमाणें अन्नपूर्णाबाई आपणास वस्त्रालंकारानेंच शोभा आहे असें समजत नसत; स्त्रियांचें खरें भूषण पातिव्रत्यच आहे असें समजत असत. पती लवणरहित पदार्थ खात असत, तर त्याही त्याच प्रमाणें खाऊन पतीची सेवा करीत असत. अन्नपूर्णाबाईची या प्रमाणें भक्ती पाहून श्रीदत्तमहाराजानीं त्यांस दृष्टांत दिला कीं, एक दिवसापेक्षां जास्त दिवस माहेरीं राहूं नये व त्याप्रमाणें त्या वागत असत. एकेसमयीं अन्नपूर्णाबाईनें आपल्यापतीस आनंदांत पाहून त्यांस साष्टांग नमस्कार करून विनंती केली कीं, प्राणनाथ ! मला स्त्रियांचे दरएक वेळचे धर्म सांगण्याची कृपा करावी कीं, जेणेंकरून मला तसें वर्तन करण्यास ठीक पडेल.

शास्त्री०—हे प्रिये ! तूं हे धर्म एकाग्र चित्तानें श्रवण कर. गर्भिणी, स्त्रियांनीं घोडा, उखळ, मुसळ, राख इत्यादिकांवर किंवा उंच जागेवर बसूं नये. पाण्यांत बुडी मारून स्नान करणें, ओसाड घरीं राहणें, झाडाखालीं बसणें, तंटा करणें, आळस देणें, घाइघाईनें चालणें, तामस गुणी जडपदार्थ खाणें, संध्याकाळीं भोजन, मैथून, शोक, शरीरांतून रक्त काढणें, दिवसा निजणें, रात्रीचें जागरण करणें, राख, कोळसा किंवा नखें यांनींजमिनीवर रेघा ओढणें, खोटें बोलणें, अपशब्द बोलणें, फार हसणें, कासोटा घातल्याशिवाय चालणें, केस मोकळे सोडणें, यापैकीं कांहीही करूं नये. जर चूक झाली असेल तर मूल अपंग किंवा रोगी होतें. गर्भिणी स्त्रियांनीं पवित्र रहावें. दान करावें. वाडिलांची सेवा करावी. हळद कुंकूं लावावें. काजळ घालावें. विडा खावा. चांगले व पवित्र अलंकार घालावे. चवथ्या सहाव्या व आठव्या मासीं यात्रेस किंवा परगांवी जाऊं नये. स्त्रीस चांगले पदार्थ खाण्यास द्यावेत. स्त्री गर्भिणी असल्यास तिजकडून पुंसवन, अनवलोभन, सिमंतोन्नयन, हे तीन संस्कार करवावे. हे संस्कार न करविल्यास आसुरी व मंद प्रजा उत्पन्न होते. स्त्री प्रसूत झाल्यावर बालकाचे पित्यानें आणि सावत्रआई असल्यास तिनें स्नान करावें, बाल रक्षणार्थ दहा दिवसपर्यंत शांतिसूक्तादिकाचा पाठ करावा. जात कर्म करून दान द्यावें. पांचवे व सहावे दिवशीं जन्मदा नांवांच्या देवींचें पूजन करावें. दहाव्या दिवशीं बली दान करून आप्त मंडळींस मुलांबाळांसह जेऊं घालावें. जन्मकालीं दुष्टग्रह आला असल्यास शांती करावी. आईनें मुलाची जोपासना फारच दक्षतेनें करावी. त्यास पिडा होऊं नये म्हणून तें जोंपावेतों पीत असेल तों पर्यंत सात्विक अन्न आईनें खावें व व्याधि वगैरे झाल्यास न भितां औषधोपचार करावे. मुलामुलींचा नामकरण संस्कार ब्राह्मणांनीं अकरावे किंवा बारावे दिवशीं, क्षत्रियानीं तेरावे किंवा सोळावे दिवशीं, वैश्यांनीं सोळावे किंवा विसावे दिवशीं, आणि शूद्रांनीं बाविसावे किंवा तिसावे दिवशीं करावा. कन्येस पाळण्यांत घालण्याचा दिवस तेरावा व मुलास बारावा शुभ होय. प्रसूत झाल्या दिवसापासून चाळी

स दिवसांनीं जलाशयादिकांस स्पर्श करावा. कित्येक स्त्रिया पन्नास दिवसांनंतर स्पर्श कारितात. यासाठीं ज्यांची जी वहिवाट असेल त्याप्रमाणें वर्तन करावें. तिसरे मासीं सूर्याची पूजा करून पुत्रास सूर्य दर्शन करवावें. चवथे मासीं त्यास घेऊन घराबांहेर किंवा गांवाबाहेर जावें. पांचवे मासीं मंगळग्रह बलवान असल्यास बालकास जमिनीवर बसवावें. मुलास सहावें, आठवे, दहावे मासीं किंवा वर्ष अखेरीस व कन्या असल्यास तिला पांचवे, सातवे किंवा नववे मासीं अन्न प्राशन संस्कार करवावा. मुलाचे कान दहा, बारा, किंवा सोळाव्या दिवशीं टोपावेत, नाहींतर सहाव्या, आठव्या किंवा बारावे मासीं, अथवा पहिल्या किंवा तिसऱ्या वर्षीं टोपावेत. या कारितां पहिल्यानें लाखेचें चिन्ह करून ब्राह्मणांनीं रुप्याची आठ अंगुलें लांब सुई करवावी, व त्यानें कान टोपावेत. क्षत्रियांनी सोन्याची व शूद्रांनी लोखंडाची सुई मापाची करवून तिनें कान टोपावेत.

मुलाचा वाढदिवस करणें झाल्यास ज्या दिवशीं जन्म झाला असेल तो दिवस धरून, पहिल्या वर्षीं दर महिन्यानीं, तो दिवस उजवावा ह्म० पूजा विधी करून ब्राह्मण भोजन घालावें. मुलाचें चौलकर्म पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, किंवा पांचवे वर्षीं करावें. ज्या जातींत मुलीचें चौलकर्म करण्याची वहिवाट आहे त्यांनीं तें अवश्य करावें. जे लोक कन्येचें चौलकर्म कारीत नाहींत त्यांनी तिच्या लग्नाच्या वेळीं त्याबद्दल प्रायश्चित्त करावें. वरील सर्व संस्कार करतेवेळीं मुलाच्या आईबापांस व इतर गणगोतास धर्मसिंधूंत सांगितल्या प्रमाणें नियमपाळणें जरूर आहे कारितां त्यांनीं तो ग्रंथ वाचून पहावा. अन्नप्राशन संस्कार होईपर्यंत, मुलाची शिशु अवस्था असते अशा मुलास रजस्वला, धेड, भंगी इत्यादिकांचा विटाळ झाल्यास पाणी शिंपडावें ह्मणजे शुद्ध होतें. तीन वर्षाचें होईपर्यंत बाळपण असतें अशास रजस्वलादिकांचा स्पर्श झाल्यास मार्जन करवून तीन आचमनें करवावीं. तीन पासून आठ वर्षांपर्यंत कुमार अवस्था असते, त्यास विटाळ झाल्यास स्नान घालावें. आईनें सुर्योदयापूर्वीं उठून आपले मुलास लोणीं वगैरे लावून डोकें विंचरणें व स्नान

चालणें. कन्या असल्यास कपाळीं कुंकूं लावणें व पुत्र असल्यास भस्म लावणें, मुलीचें वय चार-पांच वर्षांचें झाल्यावर तिला देवाचीं उपकरणीं घासणें, केर काढणें, उंबरा धुणें, आंगण झाडून साफ करणें व रांगोळ्या घालणें वगैरे कामें करण्यास शिकवावीं. पुजेचें सामान, व आसन वगैरे इतर जिन्नस देवघरांत ठेवण्यास सांगावेत. व स्वयंपाक करतेवेळीं तिला जवळ ठेवून तिच्याकडून जरूर पडल्यास ओंवळ्यांतील पदार्थ काढून घ्यावे. जेवण्यास बसावयाचे ठिकाणीं पाट मांडणें, पाणी पिण्यास तांब्या पंचपात्री भरून डावे बाजूस ठेवणें; चटण्या, कोशिंबिरी वाढण्यास शिकवून जसजसें वय अधीक होत जाईल तसतसें तिजकडून अधीक काम करून घेत जावें. इतकेंही करून वेळ मिळाल्यास, तिला वाचण्यास व कशिदा काढण्यास शिकवावें. तसेंच शौचादिक विधी कोणत्या प्रकारें पाळावयाचा तेंही तिला समजावून सांगावें. शौच झाल्यावर गुह्य इंद्रियास पांच वेळ माती लावून धुवावें. नंतर गुदद्वार तीन वेळ माती लावून धुवावें. हातास पांच वेळ व पायांस एक एक वेळ माती लावावी व सहा वेळ चूळ भरून तीन आचमन करून मुखमार्जन करवावें. लघुशंका केल्यावर गुह्य इंद्रियास दोन वेळ, हातांस दोन वेळ आणि पायास एक एक वेळ माती लावून धुवून टाकण्यास शिकवावें. व नंतर सहावेळ चूळभरून तीन आचमनें करण्यास सांगावें. नेसलेलें वस्त्र स्नानानंतर फिरून नेसूं देऊं नये. स्नान झाल्याशिवाय मुलांस खावयास देऊं नये. याप्रमाणें मुलासही वळण लावावें. त्यास दररोज इष्ट देवतेचा जप करण्यास सांगावें. लहान मुलास संस्कारिक व हीन जातींचें अन्न पाणी देऊं नये. कांदा, लसूण, शिळें अन्न, उष्टें अन्न, रजस्वलेनें स्पर्श केलेलें अन्न, मद्य, मांस, इत्यादि खावयास देऊं नये. कारण हे पदार्थ महा दोषित आहेत. ज्या मानानें आहार शुद्ध असेल त्या प्रमाणें बुद्धि ऐश्वर्य मुलाचे ठायीं उत्पन्न होतें. मुलांनीं घरांत कधींही थुंकूं नये. याविषयीं खबरदारी ठेवावी. मुलास त्याचे पांचवेवर्षी उत्तरायणांत शिकविण्यास आरंभ करावा. त्या वेळीं सरस्वती पूजन करून लहान मुलां-

स खाऊ वांटावा. लहान मुलानें शिविगाळ करूं नये या विषयीं जपत असावें व त्याचे माता पितरांनीं अशा शब्दाचा उच्चार करूं नये. मुलास नम्र वाणीनें बोलणें व कोणत्याही प्राण्याची हिंसा न होईल असें वळण लावावें. कन्येचें वय पांच वर्षांचे झाल्यावर ती सूर्योदयापूर्वीं उठून स्नान करूं लागेल असें शिकवावें. स्नानापूर्वीं वेणी फणी करणें, काजळ कुंकू आदिकरून सौभाग्यालंकार घालणें इत्यादि कामें तिचीं तिनेंच करावींत असें शिक्षण लावावें. तिचें वय सहा सात वर्षांचें झालें कीं, तिनें स्वतःचा चोळी परकर आपल्या हातानींच धुणें, वाळत टांकणें, व नीट घडीकरून ठेवण्यास शिकवावें. घरांत सारवणें, भांडीं घासणें, पाणी भरणें, दळण, कांडण, मीठ, मसाला, तयार करणें इत्यादि कामें आस्ते आस्ते तिजकडून करवून घ्यावींत. तिचें वय आठ वर्षांचें झाल्यावर स्वयंपाक करण्यास शिकवावें. तसेंच विवेक विचार करण्यास सांगावें. मुलासही आचार विचार पाळण्यास परोपरीनें शिकवीतजावें. हे प्रिये ! ब्राह्मणांनीं आपल्या मुलाचा व्रतबंध पांचवे अगर आठवे वर्षीं करणें फार चांगलें. पंधरा वर्षांपर्यंत झाल्यास हरकत नसून त्याचें प्रायश्चित्त नाहीं. परंतु यापुढें झाल्यास त्याचें प्रायश्चित्त घावें. कन्येचें लग्न, तिच्या वयाच्या आठ पासून अकरावे वर्षांपर्यंत करावें. या नंतर झाल्यास तिच्या आई बापानां कन्यादानाचें फळ मिळत नाहीं. इतकेंच नव्हे पण त्यानां व तिच्या भावंडानां चांडालत्व प्राप्त होतें. व कन्येस शूद्री आणि तिच्याबरोबर लग्न करणारास शूद्र पति ह्मणतात. कन्यादान करण्यास कोणी नसल्यामुळें तिचें उशिरां लग्न झाल्यास दोष नाहीं. तिच्यापेक्षां तिजबरोबर लग्न करणाऱ्या वराचें वयमान सात आठ वर्षांनीं अधीक असलें पाहिजे. तिला चांगले कुळांत द्यावी. ३५ वर्षांपेक्षां ज्याचें वय अधीक आहे अशाशीं तिचें लग्न करूं नये. मंगळादि ग्रहामुळें वैधव्यदशा प्राप्त होण्याचा संभव असल्यास अगोदर कुंभ विवाह करून नंतर तिचें लग्न करावें. लग्नकालीं मुलीस गुरुबळ चांगलें असलें पाहिजें व वरास रवि बलवान असला पाहिजे. मन व वाणी, यांच्या योगानें दिलेली, सप्तपदी झालेली, पर पुरुषानें भोगलेली, एकच गोत्राची अशा क-

न्येशीं विवाह करणारा या लोकीं व परलोकीं भ्रष्ट होतो. ज्या घरीं आपली कन्या दिली असेल त्यांचेरची कन्या आपल्या मूलास करूं नये. एक गोत्र व एक प्रवर ज्याचे आहेत अशाशीं आपल्या कन्येचा विवाह करूं नये. याविषयीं विशेष खुलासा पाहिजे असल्यास मनुस्मृत्यादि ग्रंथ ऐकावे. एक गोत्री व समान प्रवरी कन्येशीं विवाह करणारानें आपल्या बहिणीशीं लग्न केलें आहे असें समजावे व तिच्याशीं गमन करणारा मातृगमनी समजावा. अशा संबंधानें जन्मलेलें मूल चंडाळ होय व हीच वर्णसंकर जात समजली पाहिजे. ह्मणून अशा प्रजेचे कोणतेही संस्कार करूं नयेत. त्यास चांडाळ गृहीं नेऊन ठेवावें.

यमस्मृतींत सांगितलें आहे कीं, संन्याशाच्या पोटचें मूल, उच्च वर्णाच्यो स्त्रीनें खालच्या वर्णाशीं संग केल्यानें झालेलें मूल, आणि सगोत्र विवाह करून झालेली प्रजा ह्या सर्व जाती चंडाल आहेत या करितां त्यांचा त्याग करावा.

वडील भावाचें लग्न झाल्याशिवाय लहान भावाचें लग्न करूं नये. मुलीच्याहि लग्नास हाच नियम लागू आहे. दत्तकांनीं दोन्ही पितरांचीं गोत्रें वर्ज्य करावीत. क्षत्रिय व वैश्य लोकांचे गोत्र त्यांच्या त्यांच्या पुरोहिताच्या गोत्रावरून धरतात. कन्येचा विक्रय करूं नये. कन्येचा पैसा घेणारा पिता चर्मकाराहून हीन समजला पाहिजे- ह्मणून अशांचा स्पर्श झाला तर सचैल स्नान करावें. त्याचप्रमाणें वरपक्ष्यानींही पैसे मागूं नयेत. वराच्या व कन्येच्या विवाहसमयीं प्रथमतः वाग्दान करावें.

हेप्रिये ! ब्राह्म[1], दैव[2], आर्ष[3], प्राजापत्य[4], आसुर[5], गांधर्व[6], राक्षस[7], आणि पैशाच्च[8] असे विवाहाचे आठ प्रकार आहेत.

---

**टीपः**—१ सालंकृतकन्येचें दान २ वैतानिककर्मामध्यें ऋत्विजास सालंकृत कन्यादेणें. ३ गोमिथुनघेऊन कन्यादेणें. ४ तुह्मी उभयतां एकमेकांस अनुकूल वागून धर्माचरण करा अशा बोलीनें झालेला विवाह. ५ यथेष्ट पैसा घेऊन कन्यादेणें. ६ मी तुझा पतिहोतों तूं माझी स्त्री हो. ७ युद्धकरून कन्या हरण करणें. ८ बेसावध असलेल्या व निजलेल्या कन्येस नेऊन विवाह करणें.

लग्नाचे दिवशीं वराची सीमंत पूजा करावी. वधूचे घरीं नवरा जात असतां त्या वेळीं वरपक्ष्यानीं वधूसाठीं वस्त्रालंकार अवश्य न्यावेत. लग्नाच्या वेळीं व इतर शुभकार्य प्रसंगीं हस्तिदंती चूडा घालण्यास देऊं नये. बांगड्या भराव्यात. ज्या जातींत चूडा घालण्याची वहिवाट आहे त्यांनीं हस्तिदंता ऐवजीं लांकडाचा चूडा करून घालावा. कारण हस्तिदंताचा चूडा शास्त्रांत निषिद्ध मानला आहे. विवाह समई वधुवरांस उभे करून पुष्पांचे हार घालावे. ज्यांच्यांत एकमेकांवर थुंकणें इत्यादि वाईट चेष्टा करण्याची वहिवाट असेल त्यांनी ती बंद करावी. तीन रात्र वधुवरानीं लवण रहित पदार्थ खावे व जमिनीवर निजावें. विवाहानंतर सोळा दिवसांत वधूस गृह प्रवेश करवावा. सोळा दिवसांनंतर एक महिना पावेतों वधूस घरीं आणावयाची झाल्यास विषम दिवस पाहून आणावी. महिन्यानंतर आणावयाची झाल्यास विषम मासांमध्यें आणावी. पहिल्या वर्षीं वधुप्रवेश झाला नाहीं तर तो पुढें विषम वर्षांत करावा. सोळा दिवसानंतर जर " बेकी दिवसीं, बेकी मासीं व बेकी वर्षीं " वधुप्रवेश केला तर तिला वैधव्यदशा किंवा दुःख प्राप्त होतें. या कारितां सम दिवस, सम मास, व सम वर्ष वर्ज्य केलें पाहिजे. हा नियम पांच वर्षे पर्यंत आहे. त्या पुढें वधुप्रवेशास समविषमाचा दोष राहत नाहीं. वधूस द्वितीय गृह प्रवेश कालीं चातुर्मास, सम वर्ष आणि संमुख शुक्रादि दोष वर्ज्य करावे.

मुलगी लग्न झाल्यानंतर पहिल्या आषाढ मासांत सासरीं राहिल्यास सासवेचा, क्षय मासामध्यें राहिल्यास आपल्या देहाचा, ज्येष्ठ मासांत राहिल्यास दिराचा, पौष मासांत राहिली असतां सासऱ्याचा व अधीक महिन्यांत राहिली असतां नवऱ्याचा नाश होतो या कारितां वरील महिन्या मध्यें लग्न झालेल्या मुलीनें पतीच्या घरीं राहूं नये. तसेंच चैत्र महिन्यामध्यें बापाच्या घरींही राहूं नये.

कन्येचे घरीं कन्येस मूल होईपर्यंत मातापितरांनी जेऊं नये. वैधव्य दशा प्राप्त झाल्यास पुनः कोणींही विवाह करूं नये.

ब्राह्मणाशिवाय इतर वर्णांचे लोक कधींही ब्राह्मण होऊं शकत नाहींत. काहीं लोक वाल्मिकी व विश्वामित्र यांचे दृष्टांत देतात. परंतु त्या दोहोंपैकीं वाल्मिकी तर ब्राह्मण होताच. व विश्वामित्रानें आपल्या तपोबलाच्या योगेंकरून स्वतःचें शरीर भस्म करून नवीन देह उत्पन्न केला, तेंव्हां ते क्षत्रिय असलेले विश्वामित्र ब्राह्मण झाले.

[ या कलियुगांत ब्राह्मणांनीं इतर वर्णांच्या कन्येशीं विवाह करूं नये व त्यांच्या हातचें अन्न ही पण खाऊं नये. ]

कलियुगामध्यें ब्राह्मणाच्या जाती दहा प्रकारच्या सांगितल्या आहेत. त्यांचीं नावें.— १ देव. २ मुनी. ३ ब्राह्मण. ४ क्षत्रिय. ५ वैश्य. ६ शूद्र. ७ पशू. ८ वर्णसंकर. ९ म्लेंछ. १० चांडाल. या जाती पैकीं शूद्र जातीपर्यंत संन्याशी वगैरे लोकांनीं व्यवहार ठेवावा. पशू, वर्णसंकर, म्लेच्छ व चांडाल या जातीशीं संबंध ठेवूंनये. कलियुगामध्यें ब्राह्मणेतर वर्णांस श्रुतिस्मृतीचा अधिकार नाहीं.

हे प्रिये ! कन्येनें लग्न झाल्यानंतर ऋतुकाल प्राप्त होईपर्यंत सासरीं राहून सासुसाऱ्यांच्या आज्ञेंत वागावें. हें तिचें ब्रह्मचर्य होय. अशा वेळीं तिनें ज्या नियमानीं राहावयाचें आहे ते नियम खालीं दिले आहेत.

तिनें लवकर उठून पतीच्या स्वरूपाचें ध्यान करून त्यास नमस्कार करावा. नंतर आरश्यामध्यें मुखावलोकन करावें. मस्तकाचें कुंकूं पुसून गेलें असल्यास तें लावावें. तीन वेळ चुळा भरून डाव्या बाजूस टांकाव्या. व तीन आचमनें करून सौभाग्य वृद्धीसाठीं ( पतीच्या आयुष्य वृद्धीसाठीं ) ईश्वराची प्रार्थना करावी. नंतर शौचास जाऊन मृत्तिका व उदक यांच्या योगानें गुदपादादि स्थानें शुद्ध करून सहावेळ चुळा टांकल्यावर दांत घांसून तोंड धुवावें आणि तीन आचमनें करावीं व कुंकूं लावावें. नंतर सूर्यास नमस्कार करून उष्टीं व खरकटीं भांडीं बाहेर ठेवून घर व अंगण झाडून साफ करावें. नंतर स्वयंपाक घरांत पोतेरें घालून घराच्या इतर भागां-

त आणि अंगणांत सडा टाकावा. भांडीं वगैरे घांसून गाईचाही गोठा झाडून साफ करावा. पति व सासु सासरे उठल्यावर त्यांस नमस्कार करावे. वडील मंडळी उठल्यावर शौचास जाण्यासाठीं पाणी व माती तयार ठेवावी. तोंड धुण्यास पाणी, दोनबाजू ठेंचलेलें दंतकाष्ठ व दांतवण ओसरीवर आणून ठेवावें. इतकें काम आटोपल्यावर वेणी फणी करून सचैल स्नान करावें. नग्नपणानें कधींही स्नान करूं नये. स्नान करतानां अंगावरचें वस्त्र कोरें न राहील अशी काळजी ठेवावी. स्तन व गुह्य इंद्रियें लोकांच्या दृष्टीस न पडतील अशा रितीनें संभाळून स्नान करावें. व पातिव्रत्याचें संरक्षण करावें. नेसलेलें लुगडें फिरून नेसूं नये, व कांसोट्यावांचून क्षणमात्रही राहूं नये. कारण कच्छहीनपणानें फिरल्यास सुरापानाबरोबर पाप सांगितलें आहे. व त्याचें प्रायश्चित्त त्यांस भोगावें लागेल. झिरझिरीत वस्त्र कधींही नेसूं नये व त्यावर स्नानही करूं नये. लुगडें नेसून चोळी घालावी व तीन आचमनें करून मस्तकीं कुंकू लावावें. डोळ्यांत काजळ घालून घरांत व बाहेरील सोप्यावर रांगोळी घालावी. आपल्या नवऱ्याचीं व इतर वडील माणसांचीं धुतलेलीं अंगावरील व नेनसावयाचीं निऱ्या काढलेलीं वस्त्रें, संध्योपासनेचीं आसनें मांडून त्यावर ठेवावीं. पतीच्या व इतर मंडळीच्या स्नानाचे वेळीं स्नानाच्याजागीं थंड व ऊन पाणी आणून ठेवावें. संध्येच्या जागेवर तांब्या, पळी, पंचपात्री, तामण, भस्म, व गोमुखी ठेवावी. तसेंच पूजेसाठीं एका तबकांत गंध, फुलें, तुळशी, बेल, दूर्वा, शमी, अक्षता, अबीर, गुलाल, कुंकू, हळद, उदबत्ती, फुलवाती, कापूर, नीराजन, नैवेद्यासाठीं गूळ किंवा साखर व यथालाभ फळें ठेवावीं. संभव असेल तर पंचामृतासाठीं दूध, दहीं, तूप, मध, व साखर हीं ठेवावीं. सर्वांशीं गोडी गुलाबीनें वागून त्यांची मर्जी संपादन करावी. माहेरीं ही याच पद्धतीनें वागावें.

हें सर्व आटोपल्यानंतर स्वयंपाकास लागणारें सामान बाहेर काढावें व तें साफ दुरुस्त करावें. दुरुस्त करिते वेळीं कोणत्याही वस्तूस फुंक मारूं नये. सवड असल्यास स्वयंपाकासाठीं ताजें पाणी आणून

गाळावें व नंतर उपयोगांत आणावें. शूद्राच्या हातचें पाणी वापरूं नये. तोंडानें, अग्नीस व कोणत्याही वस्तूस फुंक मारूं नये. फुंकणीनें अग्नी फुंकावा. लघुशंकेस किंवा शौचास ज्या ज्या वेळीं जाण्याचा प्रसंग येईल त्या त्या वेळीं वस्त्रावर शिंतोडे उडणार नाहींत अशा बेतानें लघुशंका व मलोत्सर्ग करून पूर्वी सांगितल्याप्रमाणें हस्त पाद प्रक्षालन करून आचमन करावें. मलोत्सर्ग केल्यावर जर, स्वयंपाक करण्याचा प्रसंग असेल तर स्नान केलें पाहिजे. स्वयंपाकाचें काम आटोपून वेळ मिळाल्यास इष्ट देवतेचा जप करावा. क्रोध व द्वेष या वृत्ती केव्हांही उद्भवूं देऊं नये. स्वयंपाकसंमयीं तर या वृत्तींबद्दल विशेष जपलें पाहिजे. स्वयंपाक सिद्धझाल्याची सूचना वैश्वदेव करणारांस देऊन वैश्वदेवासाठीं सर्व सामग्री तयार ठेवावी. चतुष्कोण मंडलें करून त्यावर जेवण करणाऱ्या मंडळींचीं पात्रें मांडावीं व पाणी भरलेलीं भांडीं आणि पाट ठेवावे. वैश्वदेवाचें कुंड सारवून त्याजागीं गंध, फुलें, अक्षता, गोवऱ्या, बारीक धलप्या, फुंकणी, अग्नी व चूर तयार ठेवून देवाचा नैवेद्य आणि गोग्रास तयार करावा. वैश्वदेव करणारा काक बली टाकण्यास जाईल त्यावेळीं हस्तपादप्रक्षालनाकरितां पाण्याची व्यवस्था ठेवून तो काकबली टाकून घरांत येण्यापूर्वी बलिहरण एकत्र केलें पाहिजे; कारण घातलेलें बलिहरण वैश्वदेव कर्त्यानें पाहतां नये. संन्याशी किंवा ब्रह्मचारी वेळेवर भिक्षेस आले तर त्यांना मधुकरी घालावी. कदाचित वैश्वदेव होण्यापूर्वी जर ते भिक्षेसाठीं आले तर वैश्वदेवाकरितां चरू काढून ठेवून नंतर भिक्षा द्यावी. सिद्ध केलेल्या पदार्थांतून थोड थोडे सर्व पदार्थ भिक्षेंत असावे. संन्याशांना भिक्षा देतेवेळीं अगोदर व नंतर उदक दिलें पाहिजे. संन्याशी भिक्षेला निघाल्या वेळेपासून तों भिक्षाकार्य संपेपर्यंतच्या दरम्यान त्यांना कोणीही वंदन करितां नये. जर यावेळीं कोणी वंदन (नमस्कार) करील तर संन्याशी लोकांनीं उपवास केला पाहिजे. कांदा, लसूण, गाजर, कलिंगण, इत्यादि निषिद्ध पदार्थ वाढूं नये. सवड असेल तर संन्याशी व ब्रह्मचारी यांना भिक्षेसाठीं घरीं बोलावून जेवण घालावें. भोजन पात्रांत सोन्या चांदीचीं भांडीं किंवा पळस, कमळ, महुडा, जांभूळ, फणस, आंबा,

चांफा, उदुंबर व केळी यांचीं पानें उत्तम आहेत. रुईचीं, वडाचीं व अश्वत्थाचीं पानें निषिद्ध आहेत. पितळेचीं ताटें व भांडीं मध्यम आहेत. कल्हईचीं व कल्हई लावलेलीं भांडीं वापरण्यांत घेऊं नयेत. पात्रें वाढते वेळीं लोणचें, चटणी, कोशिंबीर, सांडगे, पापड, मीठ वगैरे पदार्थ व पक्वान्नें जेवणाऱ्यांच्या डावे बाजूस आणि भाजी पाला उजव्या हाताकडे वाढून मध्यभागीं वरण, भात वाढावा. जेवणाऱ्यांच्या उजव्या बाजूस पात्राच्या बाहेर द्रोण्यांतून दूध, ताक, ताकाची कढी, तिखटामिठाचें वरण, तूप व आंबटी वाढावी. तुपाचा द्रोण पात्रामध्यें ठेवूं नये. सिद्ध पदार्थांपैकीं जेवणारे जें मागतील तें वाढावें. जेवणारांस व त्यांच्या पात्रांस हात न लागेल अशा बेतानें वाढावें. भात व इतर पदार्थ अशा बेतानें वाढावे कीं, ते सांडणार नाहींत. जेवणारांस किंवा त्यांच्या उच्छिष्टास स्पर्श झाला असतां स्पर्श कालीं हातांत असलेल्या अन्नाचा त्याग करून हातपाय धुवावे व तीन चुळा भरून अचमनें करावींत; नंतर स्वयंपाक घरांत जावें. मंडळीचीं जेवणें झाल्यावर हस्तपाद प्रक्षालनाच्या जागीं हात धुण्याकारितां पाणी ठेऊन तयार केलेले विडे मुखशुद्धीकारितां द्यावे. याप्रमाणें सर्वांची जेवणें झाल्यावर वडील माणसांची किंवा नवऱ्याची आज्ञा घेऊन आपण भोजन करावें. आचमन करून पतीचें उच्छिष्ट अगोदर भक्षण करावें. जेवतनां मांडी घालून बसावें. जेवतनां डावे हातावर भार देऊन, बसूं नये. नंतर आचमन करून उठावें आणि बाहेर जाऊन हस्तमुखप्रक्षालन करावें. घरांत किंवा पानांतच हात धुवूं नये. जेवतानां डाव्या हातानीं घेतलेले पदार्थ उष्टे होतात. पाटावर बसून जेऊं नये व जेवतानां कोणास स्पर्श करूं नये. शूद्रास जेवण घालणें झाल्यास घराबाहेर बसवून दुसऱ्या करवीं वाढवावें. पुरुषासमोर बसून स्त्रियानीं कधींही जेऊं नये. मुखशुद्धीशिवाय कांहीं पदार्थ खाल्ला असेल तर सहा चुळा भरून तीन आचमनें करावीं. एका हातांत अन्न घेऊन दुसऱ्या हातानें खाऊं नये. तांब्याच्या भांड्यांतील दूध, दहीं, कांस्यपात्रांतील उसाचा रस, गुळांत मिळविलेलें आलें व दहीं खाऊं नये. समुद्रमीठ व सैंधव या शिवाय दुसरे प्रत्यक्ष क्षार खाऊं नयेत. जेवतानां अपानवायू जाऊं

देऊं नये. भोजन करीत असतां आशौच आल्यास तोंडांतील ग्रास काढून टाकावा व आचमन करावें, जेऊं नये. व्यालेल्या गाई महिषीचें दूध त्या व्याल्या दिसापासून दहा दिवस पर्यंत खाऊं नये. लसूण, गाजर, कलिंगड, इत्यादि निषिद्ध पदार्थ खाऊं नये. स्त्रियानीं वाढीत असतां रजस्वलात्व प्राप्त झाल्यास हातांत असलेलें अन्न घेऊन बाहेर जावें. स्वयंपाक करीत असतां हा प्रसंग प्राप्त झाल्यास याच नियमानें वागावें. जेवतानां रजोदर्शन झाल्यास तोंडांतील ग्रास थुंकावा व तोंड धुवून आचमनें करावीं. जेवण झाल्यवर मुखशुद्धीसाठीं पानसुपारी खावी. नंतर जेवलेली जागा प्रथमतः शेणाच्या गोळ्यानें टिपावी, व पाणी घालून चांगलें शेण लावावें. शूद्राजवळून ब्राह्मणांनीं आपल्या जातीचीं उष्टीं काढवूं नयेत. जरूर पडल्यास आपल्या हातानीं जेवलेलीं ताटें किंवा पानें आणि चित्राहुती बाहेर काढून ठेवाव्या, नंतर शूद्रांनीं घेतल्यास हरकत नाहीं. श्रेष्ठ वर्णाचें उष्टें त्याच्याहून हलक्या वर्णानीं काढलें तर उष्टें काढणारा, जेवणारा आणि भोजन घालणारा हे तिघेही नरकाला जातात. त्याचप्रमाणें हलक्या जातीचें उष्टें श्रेष्ठ वर्णांच्या लोकांस काढण्यास सांगितलें तर सांगणारा व त्याप्रमाणें वर्तन करणारा हे दोन्हीं नरकाला जातात. शूद्रांस स्वयंपाक घरांत जाऊं देऊं नये. भांडीं कुंडीं घासून झाल्यावर पतीचीं व इतर मंडळीचीं वस्त्रें धुवावीं, आणि घरांत दुसरीं कामें असल्यास तींही करावीं. वेळांतवेळ काढून पतिव्रतेच्या धर्माचीं पुस्तकें वाचावींत. दुसऱ्यांचे घरीं जाणें अवश्य असल्यास वडील माणसांची आज्ञा घेऊन जावें.

हे प्रिये ! ज्या दिवशीं श्राद्ध असेल त्या दिवशीं स्वयंपाकघर व श्राद्ध करण्याची जागा या दोन्ही गाईच्या शेणानें सारवाव्या. श्राद्ध क्रियेंत, स्वयंपाक करिते वेळीं लोखंडाची भांडीं, पळी, उलथनें हीं उपयोगी नाहींत. पत्रावळी पळस, केळ, कमळ आणि मोहाच्या पानाच्या कराव्यात स्वयंपाक स्वतः करावा अथवा आप्त स्त्रियांनां सांगावा. श्राद्धांत स्वयंपाक करिते वेळीं स्वजातीच्या लोकांनीं आणलेलें पाणी

वापरावें. या क्रियेस पवित्र ब्राह्मण मिळाल्यास उत्तम. तीर्थाच्या ठिकाणी त्याच ठिकाणचे ब्राह्मण बसवावेत. मग ते विद्वान असोत अगर नसोत. श्राद्धाच्या दिवशीं श्राद्ध झाल्याशिवाय संन्याशासही भिक्षा घालूं नये. तीन पंचमांश दिवस लोटल्यावर श्राद्धास प्रारंभ करावा. या दिवशीं पतीस ऋतुदान देऊं नये. तांदूळ, यव, तीळ, उडीद, गहूं, सांवा, कांग, मूग, सर्षप, चणे, जोंधळे, चवलाईकेळी, वाल, वाटणें, केळीं, आंबे, सुरण, फणस, कांकडी, दोडकें, कोथिंबीर, बोर, आंवळे, खजूर, चिंच, आलें, सुंठ, मुळे, द्राक्ष, लंवगा, वेलदोडे, तमालपत्र, जिरें, हिंग, डाळिंब, ऊंस, साखर, काळागूळ, कापूर, सैंधव, समुद्रमीठ, सुपारी, विड्याचींपानें, गाईचें दूध, दहीं, म्हशीचें तूप, लोणीकाढल्याशिवाय म्हशीच्या दुधाचें ताक, खडीसाखर मिळविलेलें म्हशीचें दूध, अक्रोर, शिंगाडे, चिबडें, रताळीं, आमसोलें, लिंबू, तांदूळज्याची भाजी, जंगली सुरण, कमरकांकडी, मध हे पदार्थ श्राद्धक्रियेस शुद्ध आहेत. मध फक्त पिंडावरच घालावा. याशिवाय दुसरे पदार्थ वापरण्यांत येऊं नयेत. श्राद्ध करण्याच्या जागीं पादुका, उपानह, जोडे, छत्री, तांबड्या रंगाची वस्त्रें, तांबडीं फुलें, मांजर, घांट, गोंडा, धोतरा, शंख, आणि शिंपा येवढ्या वस्तू असूं नयेत. श्राद्धास कमींत कमी दोनब्राह्मण असावे. गरीब स्थिती असेल अथवा ब्राह्मणांचा अभाव असेल तर देवांच्यास्थानीं शालिग्राम शिला ठेवून पितृस्थानीं ब्राह्मण बसवावा. ब्राह्मण मिळाले नाहीं तर चटांवर श्राद्ध करावें आणि ब्राह्मणास यथाशक्ति दक्षिणा द्यावी. व पिंडांस दोन दोन आणे द्यावे. श्राद्ध क्रिया करण्यासाठीं दुसरा इसम नेमला असेल तर त्यासही यथाशक्ति दक्षिणा द्यावी. दक्षिणा दिल्या शिवाय केलेलें श्राद्ध निरर्थक आहे. श्राद्ध कारितेवेळीं दोन तामणें, दोन पळ्या. दोन पंचपात्र्या पाण्यानें भरलेला तांब्या, दर्भासन, पाट, दूध, दहीं, तूप, मध, साखर. तुपाचा दिवा, पैसा, सुपारी, उदबत्ती, गंध, श्वेतपुष्पें, तुलसी, दूर्वा, भृंगराज, कापूर, केशर, सर्षप, यव, तीळ, वस्त्र, जानवें, भस्म, पत्रावळी, द्रोण वगैरे इतर उपयुक्त पदार्थ आणून ठेवावेत. सुवासिनीचें श्राद्ध असल्यास शेंदूर, हळद, कुंकू, काजळ, चोळखण, इतके जिन्नस जास्त

असावेत. श्राद्धादिवशीं वैश्वदेवाकरितां आणि देवांच्या नैवेद्यासाठीं अन्न काढून ठेऊं नये. श्राद्ध समाप्त झाल्यानंतर श्राद्ध शेषान्नानें नैवेद्य आणि वैश्वदेव करावा. जेवतेवेळीं पदार्थांचे गुण विचारूं नयेत. श्राद्ध झाल्यानंतर मधल्या पिंडाचा वास न घेतां तो पिंड स्त्रियांनीं खावा. श्राद्धाचें अन्न इतर जातींस देऊं नये. जर दिलें असेल तर पितरांसहीत रौरव नरकवास प्राप्त होईल. ब्राह्मणाशिवाय इतरानीं श्राद्धाचे दिवशीं आप्त मंडळींस जेवण घालावें. आणि ब्राह्मणांस शिधा द्यावा. उपवास असल्यास अन्नाचा वास घ्यावा. उरलेलें अन्न रात्रीं खाऊं नये. ब्रह्मचारी, संन्यासी, व विधवा यांणीं श्राद्धान्न खाऊं नये. सुवासिनीचें श्राद्ध असल्यास तिच्या नांवें एक सुवासिनी जेवावयास ब्राह्मणाशिवाय सांगावी. तिचा महालय भाद्रपद कृष्ण नवमीचे दिवशीं करावा. प्रेतकर्म करणें झाल्यास तें आपल्या जातीच्या मनुष्यांचेंच करावें. मृत मनुष्याच्या उद्देशानें उचित कालीं आणि देशीं पक्वान्नाचें किंवा आमान्नाचें आणि हिरण्याचें दान करावें. याचेंच नांव श्राद्ध. या क्रियेंत अग्नौकरण, पिंडदान आणि ब्राह्मणभोजन हीं कर्में मुख्य आहेत. जे लोक श्राद्ध करीत नाहीं त्याचें रक्त पितर पीत असतात. आणि शरीरांत अनेक जातीचे रोग उत्पन्न करितात. इतकेंच नव्हे तर त्यांची बुद्धी तमोगुणी करून शेवटीं नरकांत घालतात. सपिंडी श्राद्ध झाल्यावर त्याच्या तीन श्राद्धांत दुसऱ्यांनीं भोजन करूं नये. श्राद्धाच्या दिवशीं स्त्री रजस्वला झाली असल्यास त्या दिवशीं श्राद्ध करूं नये. पांचवे दिवशीं करावे.

हे प्रिये ! आतां कृच्छ्रादिक प्रायश्चित्ताचीं नांवें सांगतों तीं ऐक पादकृच्छ्र, प्राजापत्यकृच्छ्र, सांतपनकृच्छ्र, महासांतपन, अतिसांतपन, तप्तकृच्छ्र, शीतकृच्छ्र, पराककृच्छ्र, चांद्रायण, यवमध्य, पिपीलिकाचांद्रायण, पंचगव्य इत्यादि प्रायश्चित्तें ज्यांस करणें शक्य नाहीं त्यांणीं गोदान, ब्राह्मणभोजन इत्यादि करावें.

हे प्रिये ! स्त्रीस प्रथम रजोदर्शनाचे वेळीं आषाढादिक मास, प्रतिप

द्वादि तिथी, रविवारादिक वार, भरण्यादि नक्षत्रें, अपराण्ह काळ व जुनें, काळें, तांबडें, अथवा चित्र विचित्र रंगाचें वस्त्र नेसलेली असल्यास चांगलें नाहीं. नग्नपणीं, परक्यास्थळीं, आणि दुसरे गांवीं रजोदर्शन निंदित आहे. तें अल्प, अधीक, आणि काळसर रंगाचें असेल तर दुष्ट फळाची प्राप्ती होते. हातांत केरसुणी, लांकुडें, गवत, अग्नी, सूप असतानां प्रथम रजोदर्शन झालें तर ती स्त्री व्यभिचारिणी होईल. वस्त्रांत रुधिराचे बिंदू विषम असल्यास पुत्र आणि सम असल्यास कन्या होईल असें समजावें. निंदित कालीं रजोदर्शन झाल्यास भुवनेश्वरी शांती करावी. प्रथम रजोदर्शनीं कन्येस सुशोभित जागीं तांदुळांच्या आसनावर बसवून सुवासिनी स्त्रियानीं तिला हळद कुंकूं देऊन मांगलीक करावें.

## रजस्वलेचे नियम.

हे स्त्रिये ! रजस्वलेचे सर्व साधारण नियम सांगतों ते तू लक्षपूर्वक ऐक. रजोदर्शन झालेल्या स्त्रीनें तीन दिवस पावेतों कोणास शिवुं नये. स्नान करणें, काजळ घालणें, दिवसा निजणें, अग्नीला स्पर्श करणें, जलाशयास शिवणें, दांतवणाने दांत घांसणें, कांदा, लसूण इत्यादि वर्ज्य पदार्थांचें भक्षण करणें; सूर्य, देव, संन्याशी, पती आणि वडिलांचें दर्शन व त्यानां नमस्कार करणें, जमिनीवर रेषा काढणें व उकरणें, कांबळ आंथरल्याशिवाय जमिनीवर निजणें, ओंजळीनें पाणी पिणें, तांब्याच्या किंवा लोखंडाच्या भांड्यांतून पाणी पिणें, घर काम करणें, नखांचें छेदन करणें, लहान भांड्यांतून अथवा द्रोण्यांतून पाणी पिणें, प्रवास करणें, विनाकारण चालणें, अलंकार धारण करणें; दहीं, दूध, ताक खाणें; पाटावर बसणें, हें सर्व वर्ज्य करावें. रजस्वला स्त्रीनें मातीच्या अगर लोखंडाच्या स्वच्छ पात्रांत अथवा गाईच्या शेणानें जमीन सारवून त्या जागेवर अन्न घेऊन भोजन करावें. ग्रहणादि पर्वकाळीं स्नान करणें झाल्यास पाण्यांत उतरून तें करूं नये. पाणी बाहेर मागवून घ्यावें व निराळ्या ठिकाणीं स्नान करावें.

ग्रहणकाल संपेपर्यंत त्याच ओल्यावस्त्रानिशीं रहावें. ग्रहणकाल संपल्यावर पुन्हा पाणी मागवून स्नान करावें. दोन सख्ख्या बहिणींचा किंवा ज्यांचें गोत्र एक आहे अशा दोन सजातीय स्त्रियांचा रजस्वला असतां नकळत परस्परांस स्पर्श झाला तर उभयतांनीं ताबडतोब स्नान करावें. परंतु त्या जाणून बुजून एकमेकींस शिवल्या असतील तर वरील प्रमाणें स्नान करून दोघींनींही एकरात्र उपोषण करावें. एकगोत्राचा संबंध नसेल व नकळत स्पर्श झाला असेल तर स्नान करून त्या दिवशीं उपोषण करावें. समजून उमजून स्पर्श झाल्यास चौथ्या दिवसापर्यंत उपोषीत रहावें. नंतर पंचगव्य प्राशन करून मग अन्न ग्रहण करावें. भिन्न भिन्न जातींच्या रजस्वला स्त्रियांचा एकमेकींस स्पर्श झाल्यास उभयतांनींही चार दिवस पर्यंत उपोषण करावें. नंतर उच्च वर्णाच्या स्त्रियेनें कृच्छ्र प्रायश्चित्त करावें व नीच जातीच्या स्त्रीनें पादकृच्छ्र प्रायश्चित्त करावें. रजस्वलेला किंवा बाळंतीणीला चांडाळाचा स्पर्श झाल्यास तिनें शुद्धिपर्यंत उपवास करून अतिकृच्छ्र प्रायश्चित्त करावें. नकळत स्पर्श झाला तर प्राजापत्य प्रायश्चित्त करावें. काठीनें किंवा अशाच अन्य प्रकारें स्पर्श झाल्यास स्नानानेंच शुद्धि होते. रजस्वलेनें भोजन समयीं चांडाळाचा स्पर्श झाल्यास प्राजापत्य प्रायश्चित्त करून आणखी बारा ब्राह्मणांस भोजन द्यावें. सजातीय परंतुबाटलेल्या मनुष्याचा किंवा अंत्यजाचा स्पर्श झाल्यास रजस्वलेनें शुद्धीपर्यंत उपवास करावे. पहिल्याच दिवशीं वरील प्रमाणें स्पर्श झाल्यास तीन दिवस, दुसरे दिवशीं झाल्यास दोन दिवस, तिसरे दिवशीं झाल्यास एक दिवस ह्या प्रमाणें उपोषण करावें. कावळा, कुत्रा किंवा परीट ह्यांचा स्पर्श झाल्यास हाच निर्णय समजावा. रजस्वलेस ज्यानें भोजन केलें आहे परंतु मुख व हस्त प्रक्षालन केले नाहीत अशा मनुष्याचा स्पर्श झाल्यास स्नान करून कृच्छ्र प्रायश्चित्त करावें. ऊर्ध्वोच्छिष्ट ब्राह्मणाचा स्पर्श झाल्यास तीन उपवास करावे. अधरोच्छिष्ट ब्राह्मणाचा स्पर्श झाल्यास एक दिवस उपवास करावा. ब्राह्मणांवांचून अन्य जातीचे उच्छिष्ठ लोकांचा स्पर्श

झाल्यास वरील प्रायश्चित्ताच्या दुप्पट [illegible] करावें. रजस्वलेस मृताशौच असलेल्याचा स्पर्श झाल्यास तिनें [illegible] भोजन करूं नये. पशु पक्ष्यादिकांचा स्पर्श झाल्यास हाच [illegible] समजावा. रजस्वलेस कुत्रा चावला असेल तर शुद्धीपर्यंत उपोषित [illegible] व शुद्धि झाल्यावर आणखीं पांच रात्री जेऊं नये. बेंबीच्या वर [illegible] दंश झाल्यास दहा रात्री व डोक्यास दंश झाल्यास वीस रात्री [illegible]. रजस्वला स्त्रीनें जेवतेवेळीं दुसऱ्या रजस्वला स्त्रीकडे अगर [illegible] पाहूं नये. रजस्वलेस शवाचा किंवा बाळंतिणीचा स्पर्श झाल्यास शु[illegible] उपवास करून पुढें तीन रात्री उपोषणें करावीं. स्पर्श झाल्यावर [illegible] केलें तर अधिकाराप्रमाणें कृच्छ्र प्रायश्चित्त करावें. वरील सर्व नि[illegible] सांगितलेल्या दरएक शुद्धीचे दिवशीं पंचगव्य प्राशन करावें. सुतका[illegible] पाळीत असतां मध्यंतरींच जर कोणी स्त्री रजस्वला होईल तर [illegible] दिवस पर्यंत जेवण करूं नये. उच्छिष्ट पणांत रजस्वला झाल्यास [illegible]नंतर तीन दिवस उपवास करावे. रजस्वला होऊन ही जर ए[illegible] तें समजण्यांत आलें नाहीं तर कोणत्याही पदार्थांस स्पर्श झा[illegible] लागत नाहीं. या विषयींचे नियम सुतकाचे नियमाप्रमाणेंच [illegible] असें समजावे.

जी [illegible] विधिपूर्वक रजस्वलेचे नियम पाळीत नाहीं, तिला रोगी, दु[illegible], [illegible]ल्पायुषी, दरिद्री अशा प्रकारची संतति होते. शिवाय ती मरण[illegible] अधोगतीस जाऊन अनेक ठिकाणीं चांडाळ योनींत जन्माला येते.

[illegible] रजस्वलेनें शौच, मुखमार्जन, इत्यादि सर्व विधि रहदारीच्या [illegible] दूर अशा एकांत स्थळीं करावे. चवथे दिवशीं गुह्य इंद्रि[illegible] वेळां माती लावून धुवावें. सहा घटिका दिवस येतांच स्नान [illegible] पवित्र वस्त्र धारण करावें, कपाळास कुंकू लावावे, नंतर पतीस [illegible] करावा; आणि रजस्राव बंद झाला असल्यास पांचवे दिवशीं

स्वयंपाक करावा. रजस्वला झाल्याचे पूर्वी जो पुरुष आपल्या स्त्रीस भोगि-तो त्यास ब्रह्महत्येचें पातक लागतें.

## गर्भाधान संस्कार.

हे प्रिये! तुला गर्भाधान संस्कार संबंधीं कांहीं माहिती सांगतों ती ऐक. हा संस्कार शक्य झाल्यास प्रथम रजोदर्शन झाल्यापासून सोळा दिवसांत शुभ दिवस पाहून करावा. होम हवनादिक कर्में आपआपल्या सूत्रांत सांगितल्या प्रमाणें अवश्य करावीं. गर्भाधान संस्कार झालेल्या स्त्रीस जी संतति होते ती सद्गुणी होऊन, मातापितरांस इह लोकीं सुख देऊन मरणोत्तर स्वर्ग सुखाची प्राप्ती करून देण्यास समर्थ होते.

कन्येचें लग्न झाल्यावर तिच्या नवऱ्याचा तिजवर अधिकार पोंचतो. हास्तव त्यानें तिला वस्त्रालंकारादि देऊन तिचें पालन पोषण केलें पाहिजे. तिच्या पालन पोषणाचा व वस्त्रालंकाराचा भार तिच्या मातापितरांवर पडूं देणें हें नवऱ्यास लांच्छनास्पद आहे. जो नवरा अशा समर्थी स्त्रीच्या आईबापांकडून द्रव्य लाभ करून घेण्याची इच्छा कारितो किंवा [illegible] कारितो तो त्या स्त्रीचा पती समजण्यापेक्षां सेवक समजणें जास्त योग्य होईल.

स्त्री ऋतुस्नात झाल्यावर जर ऋतुदान दिलें नाहीं तर त्या पुरुषास प्रत्येक वेळीं गर्भहत्येचें पातक लागतें. जी स्त्री चवथे दिवशीं शुद्ध झाल्यावर आपल्या पतीस कळवून नमस्कार करीत नाहीं तिला बालहत्येचें पातक लागतें.

## पत्नीचें पतीशीं वर्तन.

हे प्रिये! पतिव्रता स्त्रीनें आपल्या पतीशीं कसें वागावें याबद्दलचे कांहीं नियम मी तुला सांगतों ते तूं ऐक.

पहांटेस स्त्रीनें पतीच्या पूर्वी निद्रेचा त्याग करून उठावें. स्वतःचा शौच मुखमार्जनादि विधि आटपून पतीला नमस्कार करावा व त्याला शौच विधीसाठीं लागणारी तयारी करून द्यावी. नंतर नित्यगृहकर्में करावीं. गृहकर्में झाल्यानंतर स्वतः स्नान करून नवऱ्याच्या स्नानसंध्यादिकांची व्यवस्था करून स्वयंपाकास लागावें. दररोज पतीच्या मूर्तीचें ध्यान, पूजा, आणि जप करावा. पतीची प्रत्यक्ष पूजा करून त्याच्या पायांचें तीर्थ सेवन करावें. सासू व सासरा यांस नमस्कार करून संतुष्ट करावें. घरांतील सर्व मंडळीशीं ममतेनें वागावें. कोणावर केव्हांही रागावूं नये. पतीला आवडेल अशा प्रकारची वागणूक ठेवावी. वडील मंडळी समोर उभें राहावें. पती बाहेरून आल्याबरोबर हसतमुखानें सामोरें जाऊन त्याला नमस्कार करावा. पाय धुण्यासाठीं पाणी आणून द्यावें व काय आज्ञा आहे ह्मणून विचारावें. पाय पसरून घरांत बसूं नये. पुरुष मंडळी जाण्या येण्याच्या वाटेवर व उंबरठ्यावर बसूं नये. कोणी बोलत असतां मध्यें तोंड घालूं नये. मनानें सुद्धां पतीचा तिरस्कार करूं नये. पतीच्या गुह्यगोष्टी, व्यंगें, इत्यादि बाहेर पडूं देऊं नयेत. पतीची आज्ञा मिळाल्याशिवाय व्रतें, उद्यापनें करूं नये. घरांत जसजशी स्थिती प्राप्त होईल तसतशा स्थितीला साजेसें आपलें वर्तन ठेवावें. पतीस सोडून देवदर्शनास जाऊं नये. पतीशिवाय इतरांस श्रेष्ठ समजूं नये. पतीवांचून अन्य कोणासही साष्टांग नमस्कार करूं नये. पतिवांचून अन्य पुरुषास स्पर्श करूं नये हें पूर्ण ध्यानांत ठेवावें. कोणाकडून मंत्रदीक्षा घेऊं नये. कदाचित् घेतली असली तरी त्याला स्पर्श करूं नये. पातिव्रत्यभंग होण्याचा संभव असल्यास आई, बाप, सासु, सासरा, इत्यादिकांचेंही ऐकूं नये. परपुरुषाशीं भाषण करूं नये. परपुरुषाबरोबर परगांवीं जाऊं नये. त्याच्या समागमें एकट्यानें राहूं नये व त्याच्या समागमें तसेंच एकट्यानें प्रवास करूं नये. पतीचें भाषण शांतमनानें ऐकून घ्यावें. त्याला वाईट वाटणार नाहीं अशा रितीनें गोड शब्दांनीं त्याच्याशीं बोलावें. पतीच्या मित्रांस आपल्या भावाप्रमाणें समजून त्यांप्रमाणें त्यांजवर प्रेम करावें

संध्याकाळीं झाडलोट करून दिवेलावून प्रथमतः पतीला नमस्कार करून नंतर स्वयंपाक करण्यास लागावें. त्या पूर्वीं पतीला संध्यादिकांची तयारी करून द्यावी. एकमेकांनीं एकमेकांस नांव घेऊन हाक मारूं नये. उपनांवानें किंवा सांकेतिक नावानें बोलावें.

## शयन व्यवस्था.

हे प्रिये ! निजतेवेळीं मस्तक पूर्व किंवा दक्षिण दिशेला होईल अशारीतीनें आंथरूण पसरावें. स्वच्छ पाण्यानें भरलेलें पात्र तोंडावर झांकण घालून उशाशीं ठेवावें. बिछाना वामट होऊं देऊं नये. तसेंच त्यांत ढेकूण, पिसा होऊं देऊं नये. त्यावर रोज धुतलेलें वस्त्र आंथरावें. पतीला नेसावयास धुतलेलें वस्त्र बिछान्यावर ठेवावें. ओसाड, पडकें, बहुत दिवस वस्ती नसलेलें, एकटेंच असणारें, स्मशानांत असलेलें असें किंवा ज्यावर जुनाट झाड आहे, पिशाचाची वस्ती आहे, ओल आलेली आहे अशा घरांत, तसेंच अपवित्र जागीं कधींही निजूं नये. गर्भाधान संस्कार युक्त स्त्रीनें एक प्रहर रात्र लोटल्यावर हात पाय धुवून तीन आचमनें घ्यावीं. पती शयनगृहांत जाऊन निजल्यावर अलंकारांनीं शरीर सुशोभित करून पांढरें शुभ्र पातळ नेसून, सौभाग्य युक्त चोळी काढून, गंध, फुलांचा हार, विडा व नीराजन इतकें साहित्य घेऊन, आनंदीत अंतःकरणानें पति सांनिध जाऊन त्याच्या चरणावर मस्तक ठेवून आशीर्वाद घ्यावा (या वेळीं पतीनें आशीर्वाद द्यावा) पूजा करून तीर्थ घ्यावें, व नमस्कार करून एकाच बिछान्यावर पतीचे डावे कुशीस निजावें. दीड प्रहर रात्र झाल्यावर पतीनें तिच्या उजव्या नाकांत मंत्र युक्त अस्कंदाचा रस घालून ऋतुदान द्यावें. यानंतर उभयतांनीं आपापलीं गुह्य इंद्रियें मातीं लावून धुवावीं व नंतर हातपाय धुवून आचमनें करावीं. पुढें त्या स्त्रीनें वस्त्रालंकाराचा त्याग करून पांढरें पातळ सोडावें व पुरुषानें बनल्यास त्यावेळीं स्नान करावें. ऋतुदान प्रसंगीं काळें व चित्र विचित्र रंगाचें वस्त्र परिधान करून पतीजवळ गेल्यास संतति वैकल्य होतें, ह-

णून तशा प्रकारचीं वस्त्रें त्यावेळीं धारण करूं नयेत. रजोदर्शनापासून सोळा दिवस पर्यंत ऋतुकाळ असतो. ह्या पैकीं पहिले चार, अकरावा व तेरावा हे वर्ज्य आहेत. बाकी मुख्य दहा दिवस राहतात, त्यापैकीं ज्यांस पुत्र प्राप्तीच्या इच्छा असेल त्यानीं सम दिवशीं व कन्या लाभाची इच्छा करणरांनीं विषम दिवशीं स्त्री संग करावा. संध्येचे तीन काळ, चतुर्दशी, अमावास्या, पर्वणी, वृद्धी, सुतक व श्राद्धदिवस या दिवशीं स्त्रीनें ऋतुदान मागूं नये व पतीनें देऊं नये. जो पुरूष आपल्या तरूण स्त्रीस सोडून जातो, तो सात जन्मीं स्त्री होऊन, प्रत्येक जन्म वैधव्य दशेंत कंठितो. संभोग समयीं उभयतां स्त्रीपुरुषांचीं जशी मनोभावना असेल, त्याप्रमाणें संतति निर्माण होते. निषिद्ध दिवशीं ऋतुदान केल्यास, उभयतांनीं स्नान करून इष्ट देवतेचें भक्तिपुरःसर ध्यान करावें.

हे प्रिये ! स्त्रीपुरुषांनीं याप्रमाणें रात्र आनंदांत घालवावी व पहाटेंची सहा घटिका रात्र उरल्यावर उठून, हातपाय धुवून, तीन चूळ भरावे. नंतर तीन आचमनें करावीं. आचमनें घेतल्याशिवाय मल मूत्राचा त्याग करावयास जाणें चांगलें नाहीं. नंतर स्नान करावें. स्वप्नांत वीर्यस्राव झाल्यास किंवा संभोग केल्यास गुह्य इंद्रियास दहा वेळां माती लावून धुवून साफ करावें. दुष्ट स्वप्नें पडल्यास स्नान करून सूर्याची प्रार्थना करावी. नवरा जागा असून स्त्रीला निजण्याची जरूर पडल्यास, अंथरुणावर न निजतां, तिनें जमिनीवर निजावें. स्त्रीला वस्त्रालंकारांनी खरी शोभा येत नसून ज्याप्रमाणें सोन्याच्या कोंदणांत बसविल्यानें हिऱ्यांची शोभा वाढते त्याप्रमाणें पातीव्रत्य व पतिसेवा ह्यांनींच तिला शोभा येत असते. अशी स्त्री त्रिभुवनांत शोभते. योगी लोकांस ईश्वराच्या एकनिष्ठ भक्तीमुळें ज्या सिद्धी प्राप्त होतात, त्या सर्व एकनिष्ठेनें पती सेवा करणाऱ्या स्त्रीला सहज प्राप्त होतात. ह्मणून इंद्रादिदेव अशा स्त्रीच्यां दर्शनाची वारंवार अपेक्षा कारितात.

## पतिव्रतांचे प्रकार.

पातिव्रतास्त्रियांचे तीन प्रकार आहेत. प्रकार १ ला— जी स्त्री स्वप्नांतही परपुरुषाचें दर्शन करीत नाहीं ती सर्वांत श्रेष्ठ पतिव्रता होय.

रा– जी स्त्री आपल्या पतीवांचून इतर सर्व पुरूष बंधुसम मानिते ती ध्यम होय. ३ रा– जीचें मन परपुरुषावर असूनही जी आपलें मन ावरून धरिते ती कनिष्ठ पतिव्रता समजावी. ह्या प्रमाणें हे तीन प्रकार ाहेत.

## स्त्रियांचे प्रकार.

हेप्रिये ! स्त्रियांचे पांच प्रकार आहेत. ते असेः– पद्मिनी, हंसिनी, शंखिनी, चित्रिणी व हस्तिनी. यापैकीं पद्मिनी कामविकारानें अंध होत नाहीं. तिला आपला काम आपल्या ताब्यांत ठेवितां येतो. ह्या मुळें ती विषय वासनेनें स्वप्नांतही परपुरुषाचें दर्शन घेत नाहीं व पतिसेवा मनोभावेंकरून कृतकृत्य होते.

हंसिनी ही परपुरुषाचें खरें खोटें प्रेम समजून पतिसेवेंत तत्पर राहते. इची सुद्धां विषयवासना इच्छाधीन असते.

शंखिनी ह्मणजे शंखासारखी पोकळ. जी स्त्री पतिव्रतेचे धर्म काय आहेत हें जाणत नाहीं व जाणण्याचे श्रम किंवा इच्छाही करीत नाहीं. फक्त पतीचे भीतीमुळें त्याची सेवा करिते. पति समोर शांत राहते परंतु पति शिवाय इतरांशीं कलह करिते. तिला विषयवासना फार असते. व त्यामुळें ती दुसऱ्यास सुखी पाहून आपल्या पतीस धिक्कारिते. पतीच्या नकळत त्याची निंदा करिते. तिला वडील माणसांची सेवाकरणें आवडत नाहीं. रात्रंदिवस रुसल्यासारखी राहाते. ती हसतमुख क्वचितच असते. तिच्या चेहऱ्यावर निराशेची छाया नेहमीं दिसत असते. ती दुसऱ्याचें ऐकून न घेतां आपल्याच मताप्रमाणें वागते. गृहछिद्रें लोकांनां सांगत सुटते. अपवित्र व मलीन राहते. शौचविधी पाळित नाहीं. ईश्वर, व सत्पुरुष यांला शिव्या देते. हिचा स्वभाव भोळा असल्यामुळें ही कृत कर्मां बद्दल मागाहून पश्चात्ताप करिते. अशी स्त्री मरणानंतर अधोगतीला जाऊन, सात जन्म विधवा होऊन दुःखें भोगिते.

चित्रिणी स्त्रीच्या आंगांत वर वर्णिलेले सर्व गुणदोष असून शिवाय जे अधीक गुणावगूण आहेत तेवढेच सांगतों. ह्या स्त्रीचें काळीज वाघासारखें असून ती आपल्या पतीस जिवंत फाडून खाते. ती पतीच्या भाषणावर वाटेल तशीं उत्तरें देते. प्रसंग विशेषीं रागाच्या भरांत नवऱ्याला मारावयासही भीत नाहीं. कलह करीत राहणें हेंच तिचें आद्य व प्रिय कर्तव्य होय. व्यभिचार करणें, वडील माणसांचा उपमर्द करणें, त्यांस मारहाण करणें हे तिचे स्वाभावीक गूण होत. ती खोटें बोलण्यांत पटाईत असते. आपण नवऱ्याची सेवा न करितां उलट आपलीच सेवा नवऱ्याकडुन करवून घेते. अशा स्त्रीचा त्याग केल्यास दोष लागत नाहीं. अशी स्त्री मरण पावल्यावर अनेक जन्म नरकवासांत काढिते, नंतर चांडाळ योनींत शंभर जन्म घेऊन तें सर्व आयुष्य पतिसुखविरहीत राहून अत्यंत कष्टानें वेंचिते.

आतां हस्तिनी स्त्रीचें लक्षण सांगतों:– या स्त्रीचे अंगीं वरील दोन्ही जातींच्या स्त्रियांच्या आंगचे दोष असूनही विशेषतः तिला हत्तिणीप्रमाणें प्रबल विषय वासना असते. त्यामुळें नित्य नवे नवे अनेक पुरूष भोगूनही ही तिची विषयलालसा तिळप्रायही कमी होत नाहीं. हें अपलक्षण पाहून तिच्या पतीनें तिला हरकत न करणें हेंच उत्तम होय. कारण नाहींपेक्षां अशा स्त्रिया आपल्या पतीचा प्राण घेण्यास बिलकूल चुकणार नाहींत. पति जिवंत असतांना प्रत्यक्ष व्यभिचार आचरण करितात व पतीच्या मरणानंतर यार पुरूष घरांतच आणून ठेवितात. इतर सुस्वभावी स्त्रियांस आपल्यासारख्या व्यभिचारी बनविण्याचा प्रयत्न करितात. अशा बायका ह्मातारपणीं कुंटिणपणाचा धंदा चालवितात. त्यांच्या आंगीं पवित्रपणाचा यत्किंचित लेशही मिळावयाचा नाहीं. अशा स्त्रिया प्रसंगानुरूप वर्तन करून, वाटेल त्या मनुष्याला, आपल्या कपटजालांत अडकवून, फशीं पाडण्याच्या कामांत अत्यंत पटाईत असतात. खुमासेदार नाटकीवर्तन दाखवून सभ्य स्त्रियांच्या वर्तनाचा आव घालितात. अशा दुर्वर्तनी स्त्रिया मरणा-

नंतर कोटिजन्मपर्यंत भयंकर नरकांत पडून, दुर्धर अशा प्रकाराच्या यमयातना भोगून, अनेकजन्म महाव्याधियुक्त अनिवार तापत्रयांत घालवितात. अशा स्त्रियांस कित्येक जन्म अन्न, पाणी, घरदार, वस्त्रप्रावरण यांविरहित घालवावे लागतात. अशांची सावलीही कोणी घेऊं नये. स्त्रियांनीं पांच दहा एकत्र जमून शौचशुद्धीस न जातां एकटे एकटेंच जाण्याची चाल पसंत करावी. शौचप्रसंगीं भाषण करूं नये, कारण हीं लक्षणें हस्तिनी स्त्रियांचीं होत. या शिवाय—स्वतंत्रतेनें वागणें, स्वच्छंदपणानें फिरणें, पतीची आज्ञा उल्लंघन करणें, चित्रविचित्र वस्त्रालंकार लेववून नटणें, मुरडणें, फेरफटके करणें, मनास वाटेल तें भाषण करणें, सभा भरविणें अगर सभांस जाणें इत्यादि लक्षणें ह्या जातीच्या स्त्रियांचीं होत. कारितां, कुलीन गणिल्या जाणाऱ्या स्त्रियांनीं हीं कर्मे पसंत करणें श्रेयस्कर नाहीं.

हे प्रिये ! पति परदेशीं गेला असेल तर त्या मुदतीत स्त्रियेनें वडील मंडळीच्या आज्ञेनुरूप वर्तन करावें. आपलें घर सोडून दुसऱ्याचे घरीं जाऊं नये. अलंकार व चांगलीं वस्त्रें परिधान करूं नये. पतीच्या मानसकल्पीत मूर्तीची किंवा कृत्रीमप्रतिमेची अगर छायाचित्राची पूजा करावी आणि उत्तम प्रकारें ब्रह्मचर्य पाळीत जावें. पति जर जातिभ्रष्ट झाला असून प्रायश्चित्त घेतल्याशिवाय राहील, एक गोत्रांत लग्न झालें असेल, किंवा पतीनें संन्यास दीक्षा घेतली असेल तर स्त्रियेनें पतीचा त्याग करून ईश्वर भजनीं सादर राहावें. अशा पतीशीं संबंध ठेविल्यास ती पत्नी पतीत होते. व मरणोत्तर नरकास जाते. पति आदिकरून मंडळी ईश्वरी कृत्यांत गुंतलेली असेल अशा वेळीं त्यानां नमस्कार करूं नये. तसेंच अपरिचीत, नास्तीक, पाखंडी, भिक्षा ग्रहण करून जाणारे संन्याशी व आपल्याहून कमी जातीचे लोक, यांस नमस्कार करूं नये. शूद्रांवांचून इतर जातीच्या लोकांनीं दहीं, दूध, ताक विकूं नये. स्त्री ज्या ज्या मानानें आपलें आचरण निष्कलंक ठेवीत जाईल त्या त्या मानानें तिचीं सर्व सुखें वृद्धिंगत होत जातील.

# विधवा स्त्रियांसाठीं कांहीं नियम.

हे प्रिये! पूर्व संचितानुसार ज्या स्त्रिया गतभर्तृका झाल्या असतील त्यांच्या करितां कांहीं नियम सांगतों. ते तूं सादरचित्तानें ऐक.

विधवा स्त्रियांनीं केशवपन करावें व पुढें प्रत्येक पंधरावड्यानें किंवा निदान एक महिन्यानें ह्या प्रमाणें आमरण मुंडण करावें. कोणतेही अलंकार घालूं नयेत. शुभ्र वस्त्रें धारण करावीं. कंचुकी घालूं नये. अंगिरा ऋषि ह्मणतात:—

**विधवां कंचुकोपेतां । सधवां कंचुकं विना ॥**
**यतिं च कंचुकोपेतं । दृष्ट्वा चक्षुर्निमीलयेत ॥ १ ॥**

आपणच स्वयंपाक करावा व भोजन करावें. रात्रौ जेवण न करितां एकभुक्त राहावें. सात्वीक अन्न सेवन करावें. स्वहस्तानें आणिलेलें किंवा शुचिर्भूत ब्राह्मणांनीं आणून दिलेलें पाणी पिण्यासाठीं उपयोगांत आणावें. वडील माणसांच्या आज्ञेंत राहून, मनःपूर्वक ईश्वरभजन करावें. यात्रा करण्याची इच्छा झाल्यास भलत्या मनुष्यांबरोबर जाऊन ती न करितां, आपला जवळचा किंवा दूरचा नातेवाईक यांची संगती घेऊन ती करावी. उपदेश घ्यावयाचा झाल्यास एखाद्या पवित्र ब्राह्मणाकडून तो घेऊन दूर राहूनच त्याची सेवा करावी. रजोदर्शनाचे नियम यथायोग्य पाळण्याची खबरदारी घ्यावी. गुरुगृहीं किंवा इतर कोणत्याही घरीं कारणा वांचून जाऊं नये. कारण प्रसंगीं तुरळकच जावें. उपोषणें व व्रतें अवश्य करावीं. जमिनीवर शयन करावें. कोणासही न शिवण्याची आठवण ठेवावी. शरीरास तैल किंवा इतर सुगंधी पदार्थ लावूं नयेत. प्राणांत समय प्राप्त झाला तरीही बैलावर बसूं नये. विडा खाऊं नये. कांशाच्या पात्रांत जेऊं नये. थंडपाण्यानें स्नान करावें. कपाळीं भस्म लावावें. सर्वांबरोबर गोडीगुलाबीनें वागावें. प्रत्येक वेळीं प्रारब्धाचा विचार करावा. तितिक्षा असावी. आठ

हीं प्रकारचें ब्रह्मचर्य पाळण्याची खबरदारी घ्यावी. श्राद्धाचें अगर संस्कारी अन्न भक्षण करूं नये. वस्त्र विरहित होऊन स्नान करूंनये. माफक निद्रा घ्यावी. व उरलेली रात्र हरिभजनांत घालवावी. कांदा लसूण इत्यादि शास्त्रानें निषिद्ध मानलेले पदार्थ असतील त्यांचें सेवन करूं नये. दुराचरणीस्त्रियांची संगती धरूंनये. घरांतील आपल्याहून लहान वयाच्या बायकांस आचार विचार शिकवावे. मलमूत्रादि विसर्जन प्रसंगीं जे नियम पाळण्या विषयीं मागें सांगितले आहेत ते नियम अशा स्त्रियांनीं दुप्पटीच्या प्रमाणानें आचरण करावें. ग्रहणादिवशीं कोणत्याही वस्तु तसेंच अन्न व पाणी हीं ग्रहण करूं नये. दंतमंजनादि सुवासीक पदार्थांनीं दंतधावन करूंनये. कासोटा घातल्याशिवाय मार्ग चालूंनये. रजस्वलास्थितीमध्यें जेवण करूंनये.

मनुष्यप्राण्यांच्या आंगीं परमेश्वरानें सारसार विचार बुद्धी ठेविली असूनही, जीं स्त्रीपुरुषें, आपत्ति काळीं त्या बुद्धीचा उपयोग करून, धैर्यानें स्वतःच्या धर्माचरणाचें रक्षण करीत नाहींत, तीं मनुष्याकृती धारण करणारीं, श्वान, सूकर, कावळे व गिधाडेंच होत असें सज्जन समजतात, मानव शरीर हें पशुपक्षांच्या शरिराप्रमाणें केवळ विषयोपभोग भोगण्या करितांच परमेश्वरानें निर्माण केलें नसून, सत्यासत्याचा निर्णय करून ईश्वर स्वरूपाची ओळख करून घेऊन, परम पदाची प्राप्ती करून घेण्याच्या हेतूनेंच निर्मिलें आहे. ह्याकरितां प्रत्येकानें आपत्ति काळीं स्वधर्माचें संरक्षण अवश्य करावें. अशा प्रसंगीं दुर्जनांची संगती सोडून, ज्याला धर्माचीं रहस्यें पूर्णपणें अवगत आहेत, अशा सदाचारी, पवित्र पुरुषांच्या सहवासांत राहावें.

## व्रतें, उद्यापनें ह्यांविषयीं कांहीं नियम.

हे स्त्रिये! अतां तुला व्रतें, उद्यापनें इत्यादिकांविषयींचे कांहीं नियम सांगतों ते शांतमनानें व शुद्धभावनेनें श्रवण कर.

मल मास दोन प्रकारचे असतात. एक अधिकमास व दुसरा क्षय मास. या अधिक व क्षयमसांत प्रतिदिवशीं प्रातःकाळीं स्नान करून यथाशक्ति योग्य पात्रीं दानें करावीं. प्रत्येक बारा वर्षांनीं सिंहस्थाच्या गुरूंत गोदावरीचे व कन्यागतगुरू असतां कृष्णेचें स्नान प्रत्यहीं करावें. तीन घटिका रात्र झाल्यावर भोजन करावें. प्रत्येकानें एकादशी निराहार करावी. उपवासाचे दिवशीं श्राद्धतिथी आल्यास, अन्नाचा फक्त वास ग्रहण करावा. व्रतांच्या व उपोषणाच्या दिवशीं तांबूल भक्षण करूं नये. त्रयोदशीच्या संध्याकाळास प्रदोषव्रत ह्मणतात. या दिवशीं शिव पूजन करावें. कृष्ण पक्षांतील चतुर्दशीच्या मध्यरात्रीस शिवरात्र ह्मणतात. त्या दिवशीं शिवरात्री व्रत करावें. दर अमावास्येस प्रत्येकानें दर्शश्राद्ध करावें. पौर्णिमेस चंद्रग्रहण व अमावास्येस सूर्यग्रहण असतें अशा वेळीं स्नान, दान करून जप करावा. ग्रहणापूर्वी दानसंकल्प केला असेल व ग्रहण सुटल्यावर तें दान करावयाचें असेल तर संकल्पाच्या दुप्पट दान करावें. ग्रहणवेध बरोबर पाळावे. पर्वणीशिवाय समुद्रस्नान करूं नये. शनिवाराशिवाय अन्य दिवशीं पिंपळास शिवूं नये.

चैत्रमासीं **मेष** संक्रांत येते. चैत्र **शुद्ध** प्रतिपदेनें नवीन वर्ष सुरू होतें. या दिवसापासून **रामनवरात्रास** आरंभ होतो. तृतीयेस मत्स्यावतार झाला आहे. नवमीस **श्रीराम**चंद्राचा जन्म झाला, पौर्णिमेस एकनिष्ठ रामभक्त हनुमान जन्मास आला. ह्या हनुमज्जन्मदिवसापासून **वैशाख स्नानास** आरंभ करावा.

वैशाखमासीं वृषभ संक्रांत येते. या महिन्यांत वसंतपूजा करावीं. वैशाखशुद्धतृतीयेच्या मध्यान्ह काळीं श्री परशुराम जन्मास आले. पंचमीस श्री **शं**कराचार्य महाराज जन्मास आले. शुद्ध सप्तमीस वृद्ध **गंगे**चा जन्म झाला. शुद्ध चतुर्दशीस भक्तवत्सल परमात्म्यानें **ना**रसिंहावतार धारण केला व पौर्णिमेस कूर्मावतार सुरू झाला.

ज्येष्ठांत मिथुन संक्रांत येते. ह्या महिन्याचे शुद्ध प्रतिपदेस करवीर व्रत करावें. तृतीयेस रंभाव्रत करावें. याच महांतील शुद्ध चतुर्थीस उमा देवीचा जन्म झाला. अष्टमीस शुक्लादेवीची पूजा करावी. दशमीस गंगा व नर्मदा ह्यांचा अवतार झाला. पौर्णिमेस बिल्वत्रिरात्रीव्रत करावें. शुद्ध त्रयोदशीपासून पौर्णिमेपर्यंत तीन दिवस उपवास करून वटसावित्रीचें व्रत करावें.

आषाढांत कर्क संक्रांत येते. त्या दिवसापासून दक्षिणायन सुरू होतें. ह्यांतील शुद्ध द्वितीयेस श्री रामचंद्राची रथयात्रा करावी. सप्तमीस तापी मातेचा जन्म झाला. शुद्ध एकादशीस विष्णू क्षीरसागरीं जाऊन शयन करिते झाले ह्मणून तिला शयनी एकादशी असें ह्मणतात. द्वादशीस अनुराधा नक्षत्र असेल तर हरिवासर समजावा. हविष्यान्नांत तांदूळ, मूग, यव, तीळ, कांग, कांकडी, सांवा, गहुं, सुरण, सैंधव, मीठ, गाईचें दूध, दहीं, तूप; फणस, आंबा, नारळ, हिरडे, पिंपळी, जिरें, सुंठ, चिंच, केळीं, आंवळे, आमचूर, साखर ह्या सर्व जिनसा घृतयुक्त वापराव्या. आषाढी पौर्णिमेस शिवाचा शयनोत्सव करावा. कोकिळाव्रत व शिवा देवीचें पूजन हीं एकमास पावेतों प्रतिदिवशीं करावीं. हें व्रत फक्त स्त्रियांकरितां आहे. या पौर्णिमेस व्यासपूजा ह्मणजे आपल्या गुरूची पूजा प्रत्येकानें करावी. आषाढ कृष्ण द्वितीयेस अशून्य शयन व्रत पाळावें.

श्रावणांत सिंह संक्रांत येते. या महिन्यांत नक्त भोजन करावें. माघ मासीं आणि बुधवारीं ह्मैस, श्रावणांत दिवसा घोडी, आणि सिंहसंक्रांतींत गाय व्याली तर फार वाईट. श्रावणांत सोमवारांचीं व्रतें करावीं. शुद्ध पंचमीस नाग पूजा करावी. शुद्ध षष्ठीस कलंकी अवतार होणार आहे. पौर्णिमेस श्रावण्या कराव्या. वद्य चतुर्थीपासून गणपतीच्या व्रतास आरंभ करावा. वद्य अष्टमीस रात्रौ श्रीकृष्णाचा गोकुळांत जन्म झाला. ह्या अष्टमीस गोकुळाष्टमी ह्मणतात. त्या दिवशीं श्रीकृष्णजन्माष्टमीव्रत करावें. ह्या अमावास्येस दर्भ आणून ठेवावे.

भाद्रपद मासीं कन्या संक्रांत येते. शुद्ध तृतीयेस स्त्रियांनीं हरितालिकाव्रत करावें. या दिवशीं वराह अवतार झाला. शुद्ध चतुर्थीस विनायकी चतुर्थी ह्मणतात. यादिवशीं चंद्र दर्शन करूं नये- पंचमीस ऋषि पंचमी व अष्टमीस दुर्गाष्टमी अगर दूर्वाष्टमी ह्मणतात. द्वादशीस वामन अवतार झाला आहे. चतुर्दशीस अनंतव्रत करावें. भाद्रपद वद्यांत महालयश्राद्ध प्रत्येकानें करावें. वद्य षष्ठीस व्यतिपातादी योग आल्यास त्यास कपिलाषष्टि ह्मणतात.

आश्विनांत तूळसंक्रांत येते. शुद्ध प्रतिपदे पासून नऊ दिवस देवीच्या नवरात्रांचे असतात. दशमीस विजयादशमी ह्मणतात. त्या दिवशीं बुद्धावतार झाला. पौर्णिमे पासून कार्तिक स्नानास आरंभ करावा. या पौर्णिमेस शरद् पौर्णिमा असें ह्मणतात. वद्य चतुर्थीस करकचतुर्थी ह्मणतात. द्वादशीस गुरुद्वादशी ह्मणतात. त्रयोदशीस यम किंवा धन त्रयोदशी व चतुर्दशीस नरक चतुर्दशी असें ह्मणतात. चतुर्दशी, अमवास्या व कार्तिक शुद्ध प्रतिपदा मिळून तीन दिवस दिवाळीचे असतात.

कार्तिकांत वृश्चिक संक्रांत येते. शुद्ध प्रतिपदेस बळि राजाची पूजा करावी. यादिवशीं नवें वर्ष सुरु होतें. द्वितीयेस यमद्वितीया ह्मणतात. अष्टमीस गोपाष्टमी येते. एकादशी पासून पांच दिवस भीष्मपंचक करावें. या शुद्ध एकादशीस प्रबोधिनी ह्मणतात. आणि द्वादशीस रेवती नक्षत्र असेल तर हरिवासर समजावें. या पौर्णिमेस चातुर्मास्याची समाप्ती करावी. त्रिपुरदीप दान करावें. कार्तीक वद्य अष्टमीस कालाष्टमी अथवा कृष्णाष्टमी ह्मणतात.

मार्गशीर्ष मासांत धनुसंक्रांत येते. शुद्ध षष्ठीस चंपाषष्ठी ह्मणतात. पौर्णिमेस प्रदोष काळीं त्रिगुणात्मक श्रीदत्तावतार झाला. हे योग्यांचे ईश्वर आहेत. ह्मणून त्यांना योगेश्वर असें ह्मणतात.

पौषांत मकरसंक्रांत येते. ह्या दिवसापासून उत्तरायण सुरू होतें. पौर्णिमेपासून माघस्नानास आरंभ करावा. अमावास्येस व्यतिपादादि योग असल्यास अर्धोदय किंवा महोदय पर्व ह्मणतात.

माघांत कुंभ संक्रांत येते. तीर्थयात्रेच्या वेळीं नदी उतरल्यावर स्नान करावें. आणि सरस्वती नदींत, अगोदर निराळें स्नान करून मग उतरावें. व सरस्वती स्नान करून झाल्यावर पुनः निराळें स्नान करावें. यावेळीं क्षौर व उपवास हीं करावीं. परंतु कुरुक्षेत्र, बदारिकाश्रम, उज्जयनी, लोणार आणि गया इतक्या ठिकाणीं क्षौर व उपोषण हीं करूं नये. शुद्ध अष्टमीस भीष्माष्टमी व वद्य अष्टमीस अनघाष्टमी असें ह्मणतात. वद्य चतुर्दशीस महा शिवरात्र येते.

फाल्गून मासांत मीन संक्रांत येते. पौर्णिमेस होळिका पौर्णिमा ह्मणतात. वद्य पंचमीस रंगपंचमी ह्मणतात.

## व्रताचरणाचे सर्व साधारण नियम.

हे स्त्रिये! व्रतांचे सर्व साधारण नियम सांगतों ते ऐक. सुवासिनीनें व शूद्रानें दोहोंपेक्षां अधिक उपवास हारोहार करूं नयेत. स्त्रियांनी पतीची आज्ञा घेऊन उपवास करावे. काष्ठानें दांत घांसू नयेत. स्नान करून व्रतसंकल्प करावा. ब्रह्मचर्यादि नियमांनीं वागून फलाहार करावा. कांहीं कारण घडल्यास आचमन करावें.

## दत्तक विधानाची माहिती.

हे प्रिये! तुला दत्तक विधान संबंधी सर्व साधारण नियम सांगतों ते तूं ऐक. ज्याला पुत्रसंतान नसेल त्यानें आपल्या सहोदर बंधूचा मुलगा दत्तक घ्यावा. तो नसेल तर आपल्या कुटुंबापैकीं कोणाही वारसाचा मुल-

गा दत्तक घ्यावा. तोही नसेल तर आतेचा किंवा मातुल कुलांतला पुत्र दत्तक घ्यावा. परंतु बहिणीच्या मुलास किंवा दौहित्रास अथवा बंधु, मामा, काका ह्यां पैकीं कोणासही दत्तक घेऊं नये. ब्राह्मणानीं ज्याचे प्रवर आपल्या प्रवरासमान असतील अशा मुलास दत्तक घ्यावें. शूद्रांनीं आपल्या भाच्यास किंवा दौहित्रास दत्तक घेण्यास हरकत नाहीं. विधवेस दत्तक घेण्यास अधिकार आहे. ब्राह्मणांनीं शूद्राजवळून द्रव्य घेऊन वेदोक्त मंत्रांनीं होम हवनादि केलें तर शूद्रास पुण्यप्राप्ती होते परंतु ते कर्म करणारे ब्राह्मण मात्र नरकवासाचे अधिकारी होतात. दत्तकाचें गोत्र वेगळें असेल तर लग्न समयीं दोन्ही गोत्रांस जुळणारी अशी वधू पसंत करावी.

## स्पर्शदोष व त्याचें निवारण.

हे प्रिये! चांडाळाचा विटाळ झाल्यास स्नान करावें. स्नान करण्यापूर्वी सकाळीं कांहीं खाऊं नये. कदाचित खाण्यांत आल्यास एक उपवास करावा. शूद्रास स्पर्श करून स्नान केल्याशिवाय जेवण केलें तर एक उपवास करावा. कुत्रा, कावळा इत्यादि प्राण्यांचा स्पर्श झाला असतां स्नान केल्याशिवाय जेवण केलें तर तीन दिवस उपोषणें करावीं. परीटास शिवलें तर याच्या अर्घ्यानें प्रायश्चित्त करावें. दररोज शक्य तेवढा दानधर्म करावा. प्रत्येक मनुष्यानें आपले उत्पन्नांतून एक दशांश धर्म करावा. हा नियम न पाळणाऱ्यावर एकाएकीं आपत्ती येते.

हे प्रिये! स्त्रियांनीं मातीचें लिंग करून त्याची शिवनाममंत्रांनीं पूजा करावी. मध्यमा व अनामिका या अंगुलीनीं पत्र, पुष्पादीक वाहावीं. आंगठा व तर्जनी ह्यांचे साह्यानें निर्माल्य विसर्जन करावें. कलियुगांत स्त्रिया, शूद्र, बाटलेला किंवा आचारभ्रष्टब्राह्मण, यज्ञोपवीत रहीत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि विधवा यानीं शालिग्रामास व महादेवाच्या बाणास स्पर्श करूं नये. प्रतिमेस, तसबिरीस व यंत्रास पर्वणीचे दिवशीं स्नान घालावें त्याचप्रमाणें त्यांस मलिनपणा प्राप्त झाल्याचें आढळून आल्यास त्या त्या वे-

ळीं स्नान घालावें. प्रणव उच्चार केल्यानें, शालिग्राम व बाण यांची पूजा केल्यानें, कपिलागाईचें दूध प्राशन केल्यानें आणि ब्राह्मणस्त्रीगमन केल्यानें शूद्रादि लोक तत्काळ चांडाळ होतात. त्याचप्रमाणें श्रेष्ठ वर्णाच्या स्त्रीनें हलक्या वर्णाच्या पुरुषाशीं गमन केल्यानें उभयतां स्त्रीपुरुष चांडाळ होतात. देवाचें तीर्थ हातांतून घेऊं नये. व थेंब जमिनीवरही पडूं देऊं नये. मागितल्याशिवाय शूद्रानें फळफळावळ दिली तर ती घेतल्यास दोष लागत नाहीं. शूद्रास दहा संस्कार आहेत. शूद्रानीं तीन वर्णांची सेवा करावी. आणि नाममंत्राचा जप करावा. कोणतीही दीक्षा घेऊं नये. कारणः—

श्लोक.

**जपस्तपस्तीर्थयात्रा प्रव्रज्या मंत्रसाधनम् ॥**
**देवताराधनं चैव स्त्रीशूद्रपतनानि षट् ॥ १ ॥**

असें वचन आहे.

ज्या स्त्रिया रजस्वलेचे धर्म पाळीत नाहींत त्यांस चांडाळ ह्मणावें. हरएक स्त्री पुरुषानें हिंसा, चोरी, खोटें भाषण, अपवित्र वर्तन हीं सोडावीं. दान, शम, दम, क्षमा इत्यादि नियम सर्वांस सारखेच आहेत.

# किरकोळ माहिती.

हे प्रिये! मृदु, क्षिप्र, चर, या नक्षत्रीं आणि शुभ दिवशीं नवें अन्न भक्षण करावें. नवीन वस्त्र धारण करणें असेल अथवा नवे अलंकार घालणें असेल तर, ध्रुवसंज्ञक नक्षत्रें, अश्विनी, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा. अनुराधा, पुनर्वसु, पुष्य, रेवती आणि धनिष्ठा हीं नक्षत्रें, शुभ तिथी आणि शनि, मंगळ व सोम हे वार वर्ज करून इतर वारीं [illegible] करावें. ध्रुव संज्ञक, पुष्य, पुनर्वसु या नक्षत्रीं जी स्त्री नवीं वस्त्रें [illegible] वे अलंकार धारण करिते, किंवा शततारका नक्षत्रीं नवें वस्त्र व अलंकार धारण करून स्नान करिते, तिजवर पतीचें प्रेम राहात नाहीं. चर, क्षिप्र,

मुदु आणि क्षुद्र नक्षत्रांत व शुभ दिवशीं नवे अलंकार करावे. ज्येष्ठा, मूळ, श्रवण, स्वाती, मुदु संज्ञक, पुनर्वसु, हीं नक्षत्रें व गुरु, शुक्र, सोम, हे वार औषध भक्षण करण्यास शुभ आहेत. रिक्तातिथी, चरलग्नें, मिश्र आणि क्षिप्र नक्षत्रें, ज्येष्ठा, मूळ, तीन्ही उत्तरा, चित्रा, भरणी, श्रवण, धनिष्ठा शततारका, इतकीं नक्षत्रें, रवि, मंगळ, बुध आणि शनि हे वार आजारी मनुष्यास स्नान घालण्यास योग्य आहेत. बुधवारीं, शतभिषा आणि मघा नक्षत्रावर जी स्त्री तेल आंगास लाऊन आंघोळ करिते. ती आपल्या पतीचा नाश करिते, असें समजावें.

हे प्रिये! अग्नि, देव, ब्राह्मण व आप्तजन यांचा प्रसन्न चित्तानें निरोप घेऊन व स्वतःचें मन सुप्रसन्न करून शुभ कार्यासाठीं बाहेर पडावें. बाहेर निघतांच प्रथम दर्शनी गाय भेटल्यास अत्यंत शुभ शकून समजावा. अशुभ शकून झाल्यास कार्यासाठीं पुढें न जातां मागें परतावें.

## स्वप्न आणि पाल यांचेबद्दल विचार.

स्वप्नांत इष्टदेव, आपले गुरु, साधुपुरुष आणि देवादिकांच्या मूर्ती इत्यादिकांचें दर्शन झाल्यास शुभ फलदायक समजावें, आणि शोककारक स्वप्न पडलें तर भविष्य काळांत दुष्ट फळें प्राप्त होतील असें समजावें.

शरीरावर पाल पडेल तर तावडतोब स्नान करून, शिवालयांत जाऊन महादेवास तुपाचा दिवा ओंवाळून, शिवनामाचा जप करावा,

## कलियुगांतील धर्म.

कलियुगांत शिव आणि विष्णू यांमध्यें अभेद मानून त्यांची सेवा केली तर सर्वच फळ मिळतें. या युगांत श्रीसद्गुरुचें भजन व स्त्रीयांना पतिसेवा श्रेष्ठ आहे. फळाची इच्छा न धरतां मनुष्यानें श्रीगुरुमंत्राचा अनेक वेळां जप करावा. या युगांत पापकर्म शरीरानें घडलें तरच पातक लागतें.

पाराशर स्मृतीचें प्रमाण मानून वागावें. आपल्याजवळ एखादी विद्या असेल आणि ती संपादन करण्याच्या उद्देशानें आपल्याहून श्रेष्ठ वर्णाचा अथवा आश्रमाचा मनुष्य आला असेल तर त्याची अर्घ्यपाद्यादि पूजा करून त्याला ती विद्या दान करावी. विद्या दान केल्यावरही त्याला आपला शिष्य असें कधींही समजूं नये. पूर्वीं ह्याप्रमाणेंच क्षत्रिय लोक ब्राह्मणांस विद्या अर्पण करीत असत. ब्राह्मणवर्णाशिवाय इतर वर्णांकडून मंत्रोपदेश घेऊं नये. कलियुगांत आपल्या जाती शिवाय अन्य जातींच्या वधूबरोबर विवाह करूं नयें. या युगांत औरस व दत्तक असे दोनच प्रकारचे पुत्र धनकर्माधिकारी आहेत. या युगांत फार काल पावेतों ब्रह्मचर्यव्रतानें राहूं नये. त्याचप्रमाणें गुरूजवळही बहुत काल न राहतां विद्यार्जन करावें. मद्यपानादि व्यसनें जडूं नये. वाममार्ग आणि पाखंडमतसांप्रदाय हे स्वीकारूं नयेत. या युगांत जो पापें करतो त्यालाच त्यांचीं फळें भोगावीं लागतात. तीं पातकें इतरांस देतां घेतां यावयाचीं नाहींत व त्याचप्रमाणें पुण्यही; ज्याचें त्यानेंच मिळविलें पाहिजे. गुरुपत्नीजवळ शिष्यांनीं चिरकाल राहूं नये. ब्राह्मणांनीं इतरांच्या हातचे दूध तूप यांत शिजविलेलेही पदार्थ खाऊं नये.

# आशौच विधी.

हे प्रिये! आतां आशौच विधी ऐक. जननाशौच व मृताशौच असे आशौचांचे दोन प्रकार आहेत. ह्या पैकीं जननाशौचांत कर्म करावयास अधिकार नाहीं, परंतु स्पर्शास्पर्श दोष मानावयास नको. मृताशौचांत दोहोंचाही प्रतिबंध धरावा लागतो. स्त्रियेनें गर्भस्राव झाला असल्यास गर्भास जितके महिने झाले असतील तितके दिवस आशौच पाळावें. पित्यानें व सापिंड लोकांनीं स्नान करून शुद्ध व्हावें. गर्भास साहा महिने पूर्ण झालेले असल्यास, पित्यानें जननाशौचाप्रमाणें तीन रात्र आशौच पाळावें. जनन मरण ह्या दोन्हीं आशौचांत ब्राह्मणांनीं दहारात्री, क्षत्रियांनीं बारारात्री, वैश्यानीं पंधरारात्री आणि शूद्रांनीं एकमास याप्रमाणें आशौच पाळावें. सात पिढ्यांपर्यंतचे संबंधी लोकांस सपिंड; चौदा पिढ्यांपर्यंतचे संबंधी लो-

कांस समानोदक; आणि एकवीस पिढ्यांपर्यंतच्या संबंधी लोकांस सगोत्री असें ह्मणतात. यापैकीं सपिंडांस दहारात्री, समानोदकांस तीन रात्री व सगोत्री यांस एक रात्र आशौच असतें. यापुढील संबंधीं लोकांची स्नानानेंच शुद्धि होते. यांतही नियमाप्रमाणें पिढी तुटली असली तरच हा निर्णय लागू आहे. नाहींतर सर्वांनीं दहारात्री आशौच पाळावें. मातापित्यांचे घरीं कन्या प्रसूत झाल्यास तिच्या मातापित्यांनीं तीन दिवस जाताशौच पाळावें. व त्या घरांत राहणारानीं एक दिवस तें पाळावें. पूर्णमास झाल्यावर जर मेलेलें मूल होईल तर सर्वांनीं पूर्ण जननाशौच पाळावें. नालछेदनापूर्वीं मूल मृत झाल्यास तीन दिवस व नालछेदन झाल्यावर दहादिवसांत मरण पावेल तर सर्वांनीं दहा दिवस जननाशौच पाळावें. मूल जन्मल्यापासून बारा दिवसांचे आंत मृत होईल तर त्याचे आईबापांनीं, मुलगा असल्यास तीन दिवस व मुलगी असल्यास एक रात्र ह्या प्रमाणें मृताशौच पाळावें. इतरांस आशौच नाहीं. सावत्रआईनें पित्याबरहुकूम आशौच पाळावें. अकरावेदिवसापासून मुलाची मुंज होईपर्यंत आणि कन्येचा विवाह होईपर्यंत मातापित्यानें तीन दिवस, तीन वर्षांच्या आंतील मुलाबद्दल सपिंड लोकांनीं एक रात्र व पुढें मुंज होईपर्यंत तीन रात्री याप्रमाणें आशौच पाळावें. सात पिढ्यांनंतर त्यांनीं स्नान मात्र करावें. कन्या तीन वर्षांची होईपर्यंत मृत झाली तर सापिंड लोकांनीं स्नान करावें. व वाग्दानापर्यंत एक रात्र सुतक पाळावें. त्या पुढच्या लोकांची स्नानमात्रें करून शुद्धी होते. पुत्राचें चौलकर्म एकावर्षांत केलें असेल तर त्याचा दहनविधी करावा. या शिवाय पुत्र व कन्या हीं दोन वर्षांचीं असतील तों पर्यंत दाहवावींत. वाग्दानानंतर कन्या मृत झाली तर उभयपक्षांनीं तीन दिवस पर्यंत सूतक पाळावें. जननाशौच आणि दहादिवसांचे सुतक याशिवाय दुसरे आशौचाचे दिवस होऊन गेले तर, आशौच लागत नाहीं. मृताशौचाचे दिवस होऊन गेले तर स्नानानेंच शुद्धि होते. लग्न न झालेली कन्या व मुंज न झालेला मुलगा यांनीं मातापित्याचें सुतक दहादिवसपर्यंत पाळावें. इतरांचें सुतक पाळण्याची अवश्यकता नाहीं. विवाह झालेली कन्या आपल्या बापाचे घरीं मरण पावेल

तर तिच्या आईबापांनीं व भावांनीं तीन रात्रीं सुतक धरावें, व त्या घरांत राहणारांनीं एक रात्र सुतक धरावें. व इतरांनीं स्नान मात्र करावें. कन्या विवाहीत असून परगांवीं मरण पावेल तर आईबापांनीं पक्षिणी (एक अहो रात्र व दुसऱ्या दिवशीं संध्याकाळ पावेतों ) अशौच पाळावें. पतीच्या घरीं मरण पावेल तर आईबापांनीं तीन रात्री व भावांनीं पक्षिणी अशौच धरावें. व चुलत्यांनीं एक दिवस रहावें. विवाहीत कन्येनें आपल्या मातापित्याचें अशौच तीन रात्री पाळावें; परंतु दहा दिवस होऊन गेल्यावर समजलें असेल तर पक्षिणी. मुंज झालेला भाऊ व विवाह झालेली बहीण हीं आपापले घरीं मरण पावलीं तर यांच्या भावंडांनीं तीन रात्री, परक्याचे घरीं मरण पावल्यास पक्षिणी व परगांवीं मरण पावल्यास एक रात्र ह्याप्रमाणें मृताशौच धरावें. याशिवाय इतरांचें अशौच पाळण्याचें मुळीस कारण नाहीं. तिनें स्नान मात्र करावें. भाच्यानें व भाचीनें आपले मामामामीचें पक्षिणी अशौच पाळावें; परंतु त्यांच्या घरांत मामा परलोकवासी होईल तर उभयतांनीं तीन रात्री सूतक धरावें. ज्या मामाची मुंज झाली नसेल त्याचें एक रात्र व मामीचें पक्षिणी अशौच धरावें. मुंज झालेला भाचा परलोकगत झाला तर मामा, मावशीनें तीन रात्री व मुंज न झालेल्या भाच्याबद्दल पक्षिणी आशौच धरावें. आईचा बाप (आजा) मृत झाल्यास त्याचें नातवांनीं तीन रात्री आशौच पाळावें. परंतु तो परगांवीं वारल्यास पक्षिणी आशौच पाळावें. त्याचप्रमाणें मातामहानें व मातामहीनें आपल्या दौहित्राचें व दौहित्रीचें सुतक धरावें. तीन वर्षांहून अधीक वयाचा दौहित्र उपनयनापूर्वी मृत झाल्यास त्याचें पक्षिणी आशौच व दौहित्रीच्या मरणा-बद्दल मात्र फक्त स्नानानें शुद्धि होते. जांवयानें सासू सासऱ्याचें पक्षिणी आशौच पाळावें व नजीक असेल तर तीन रात्री पाळावें. विधुर जांवयानें सासुसासऱ्याच्या नांवें एकरात्र आशौच पाळावें. सासुसासऱ्यानें जांवयाबद्द-ल फक्त स्नान करावें परंतु आपले घरीं जांवई मृत झाला असेल तर आशौच पाळावें. उपनयन विधी झालेला मेहुणा ( बायकोचा भाऊ ) मृत झाल्यास एकरात्र व उपनयन न झालेला असल्यास फक्त स्नान करून आशौ-

च पूर्ण होते. अंतुष्णाची बायको किंवा बायकोची बहीण ह्यांबद्दल एकरात्र व ह्यांशिवाय इतरांचे नांवें फक्त स्नान करावें. ह्याचप्रमाणें त्यांनींहि याचेबद्दल आशौच धरावें. मावशी व आते मरेल तर पक्षिणी आशौच पाळावें. त्याप्रमाणें आपल्या आईबापांची मावशी व आतेचे मुलगे ह्यांचबद्दल पक्षिणी आशौच पाळावें. आतेचे मुलगे उपनयन संस्कार विरहीत असतील तर एकरात्र, व आपल्या घरीं परलोकवासी झाल्यास तीन रात्री आशौच धरावें. या प्रमाणें आशौच निर्णय परस्परांनीं जाणावा. वरील संबंधाची विवाहीत कन्या मृत झाल्यास एकरात्र सुतक पाळावें. यांशिवाय बाकीच्याचे नांवें स्नान मात्र करावें. मुंज न झालेला दत्तक मरण पावेल तर, पालक मातापित्यानें तीन रात्री आणि उभय सपिंडांनीं एकरात्र सुतक पाळावें. उपनयन संस्कार झालेल्या दत्तक पुत्राचें जनक पित्यानें व त्याच्या सपिंडांनीं. त्याचप्रमाणें पालक पित्यानें व त्याच्या सपिंडी संबंधींनीं दहारात्री आशौच पाळावें. दत्तकांनीं जनक व पालक पित्याचें तीन रात्र सुतक पाळावें आणि उभय सपिंडांचें एकरात्र आशौच धरावें. दोन्हीकडील आईबापांची उत्तरक्रिया केली असेल तर, दहारात्री आशौच पाळावें. दत्तकाच्या पुत्रपौत्रांचें जनन व मरण याबद्दल उभय सपिंड यांनीं एक दिवस आशौच पाळावें. दत्तक सगोत्र व सपिंड असेल तर, सर्वांनीं दत्तकाचें व दत्तकानें त्या सर्वांचें परस्पर दहादिवस आशौच पाळावें.

उपनयन संस्कार करून वेद विद्या पठविणारा व मंत्रोपदेश देणारा जो आचार्य व गुरू त्याचें शिष्यांनीं तीन रात्री अशौच धरावें परंतु तो दूर ठिकाणीं म[illegible] ल्यास पक्षिणी अशौच समजावें. त्याच्या स्त्रीपुत्रांचें एकरात्र, त्याच[illegible] [illegible]ादि पाठी मागून शिकविणाऱ्या गुरूचें ही एक रात्र, मुंज करू[illegible] शे[illegible] [illegible]्या शिष्यांचें आचार्यानें तीन रात्री, व पाठीमागून शिकविलेल[illegible] [illegible]ांचें एकरात्र ह्याप्रमाणें आशौच धरावें. वरील पैकीं ज्यांचे [illegible] [illegible]जशी आपली पूज्यबुद्धी असेल तसतसें तीनरात्री, पक्षिणी किंवा एकदिवस अशौच धरावें. सहाध्यायी मृत झाल्यास पक्षिणी.

ऋत्विजा बद्दल तीनरात्री, कर्म समाप्त झालेल्याचें एकरात्र, प्रीतिपात्र श्रोत्रीय असल्यास त्याचें तीनरात्री. स्वजातीच्या मित्राचें एकरात्र ह्या प्रमाणें अशौच पाळावें. संन्याशाचें सपिंडांनीं स्नान मात्र करावें. मुलानें दहा दिवस अशौच पाळावें, परंतु कर्मांचा लोप मात्र करूंनये. आपण कोणत्याही संबंधी जनांचें अंत्यकर्म केलें असल्यास त्याचें दहारात्री अशौच धरावें. गांवांत जोंपर्यंत शव असेल तोंपर्यंत गांवांतील रहिवाश्यांस अशौच आहे. याच प्रमाणें गाय इत्यादिकांचें समजावें. ब्राह्मणाचे घरीं कुत्रें मरेल तर तें दहादिवस, शूद्राचे घरीं मेल्यास तें एकमास, बाळ्या मेल्यास दोनमास व म्लेच्छाचें चार मास पर्यंत आशौच समजावें. नोकरांनीं आपल्या धन्याचें सुतक आपल्या जातीप्रमाणें पाळावें. ग्रामाधिकारी याचें दिवसा देहावसान झालें तर अस्तमानापर्यंत व रात्रीं झालें तर सूर्योदयापर्यंत आशौच असतें. जननाशौच संपल्यावर सुतक नाहीं. दहा दिवस संपल्यावरही मुलानें आपल्या आईबापांचें आशौच कळल्यापासून दहा दिवस पाळावें. याचप्रमाणें पति पत्नीनें समजावें. आईबापांनीं पुत्राचें दहा दिवसांनंतर समजलें तर तीन दिवस सुतक पाळावें. सुतकाचे दहा दिवस संपल्यानंतर तीन महिने पर्यंत तें सपिंडांस समजण्यांत येईल तर त्यांनीं तीन दिवस, सहा महिने च्या पर्यंतच्या मुदतींत दोन दिवस आणि एक वर्ष पर्यंत कळल्यास एक रात्र ह्याप्रमाणें सुतक पाळावें. पुढें समजल्यास फक्त स्नानानेंच शुद्धी होते. आईबापांवांचून इतर आप्तांचे लहान मुलांस आशौच नाहीं. ज्यांच्याशीं अल्पस्वल्पही संबंध पोंचत असेल असा कोणीही आप्त मृत झाल्यास सचैल स्नान करावें. मृत मनुष्याचें वर्तमान कानीं पडेल त्यावेळीं आंगावर जीं वस्त्रें असतील त्यांसह स्नान करणें, त्याचें नांव सचैल स्नान होय. संन्याशी व सोडमुंज न झालेले ब्रह्मचारी ह्यांस सुवेर किंवा सुतक धरावें लागत नाहीं. आई बाप मृत असतांहीं त्यांनीं स्नानच करावें. ब्रह्मचर्यावस्थेंत जे पित्रादि सपिंड मृत होतील त्यांचें ब्रह्मचाऱ्यानें सोडमुंज झाल्यावर तीन दिवस आशौच धरावें. नांदीश्राद्ध झाल्यानंतर सुवेर किंवा सुतक समजेल तर विवाहादि पुढील कार्य पूर्ण करण्यास हरकत नाहीं. असें विष्णुस्मृतींत

लिहिलेलें आहे. मातापित्यांच्या ऋणांतून मुक्त होणें असेल तर, वृद्धापकाळीं त्यांची सेवा करून यथाविधि मरणोत्तर क्रिया करून, श्राद्ध करावें. त्यांच्या सुतकांत दुसऱ्याचें सुतक आल्यास तें जमेंत धरण्याचें कारण नाहीं. ह्मणून कोणीही एकादशदिनक्रियादि कर्में मुदतींबाहेर ठेवूं नयेत. याचप्रमाणें मोठ्या आशौचांत लहान आशौचाची निवृत्ती होते. असगोत्री स्मशान यात्रेस गेले असतील तर, त्यांनीं तारे दिसे पर्यंत आशौच धरावें. मरणाराचे पश्चात कोणीही रडूं नये, कारण त्यामुळें मरणारास अधोगती प्राप्त होते. सुतकी यांचें अन्न भक्षण करूं नये. सुतकी यांच्या घरच्या इतर पदार्थांस दुसऱ्यानें शिवल्यास हरकत नाहीं. सुतकामध्यें सुवेर आल्यास सुतकाचे समाप्ती बरोबर सुवेराची समाप्ती होते. परंतु सुवेरांत सुतक आल्यास सुवेराच्या समाप्तीं बरोबर त्यांची समाप्ती होत नाहीं. त्याचप्रमाणें कमी दिवसांच्या आशौचांत अधीक दिवसांचें आशौच पूर्ण करितां येत नाहीं. याविषयीं अधीक खुलासा पाहिजे असेल तर स्मृतिग्रंथ पहावे.

हे प्रिये! पतिहत्या करणारी, आपल्याहून कमी दर्जाच्या पुरुषाशीं व्यभिचार करणारी, गर्भहत्या करणारी, कुंटिणपणाचा धंदा करणारी आणि आत्महत्या करणारी स्त्री मरणपावल्यावर तिचे शवास स्पर्श करूं नये. त्याच प्रमाणें पतिताचे शवासही स्पर्श करूं नये. अशा पापाचरणी लोकांचें त्यांच्या पातकांबद्दल योग्य प्रायश्चित्त करून मग तें शव उचलावें. ह्याबद्दल धर्मसिंधूंतील आधार घ्यावे.

हे प्रिये! अन्य देशीं मरण पावलेला व ज्याचें शव दहन विधीस मिळत नाहीं त्याचें प्रायश्चित्त करून पुत्तलविधियुक्त दहनादि अन्त्यकर्म करावें.

हे प्रिये! मरणसमय निकट आल्याचें जाणून अनेक दान धर्म करावे. व अंतकालसमयीं ईश्वर स्मरण करून प्राण सोडावा. अंतकालसमयीं दान धर्म न झाल्यास त्याच्या आप्तांनीं अकराव्या दिवशी अंत्यविधी कर्म

करून यथायोग्य दान धर्म करावा. प्राणोत्क्रमणसमयीं मरणाराचें मस्तक उत्तर दिशेकडे करावें. बसल्याबसल्या मरण येईल तर उत्तर दिशेकडे तोंड होईल अशारितीने बसावें. या विधीबद्दल विशेष खुलासा जरूर लागल्यास धर्मसिंधू पहावा.

## दहनविधी व अंत्यकर्म आणि नियम.

हे प्रिये! देह आणि प्राण यांचा वियोग झाल्यावर, पुत्रादिकांनीं क्षौरपूर्वक प्रायश्चित्त घेऊन नंतर प्रेत दहन करावें. दहनविधीप्रसंगीं प्रेताचें मस्तक दक्षिणेकडे असूं द्यावें. सुतकांत गवताची सादडी करून त्यावर किंवा कांबळी आंथरून त्यावर प्रत्येकानें वेगळें वेगळें शयन करावें. ज्या ज्या वस्त्रांस आपण स्पर्श केला असेल तीं तीं सर्व अकरावे दिवशीं धुवावीं. सुतक असल्या वेळीं वापरण्यांत आलेलीं सर्वप्रकारचीं मातीची भांडीं, अकरावे दिवशीं फेकून द्यावी. रात्रीचें जेऊं नये. प्रत्येकानें धातूच्या पात्रांत भोजन न करितां रोज पत्रावळीवर अन्न घेऊन जेवावें. कल्हईचीं भांडीं वापरण्यांत घेऊं नये. या पेक्षां अधीक खुलासा जरूर वाटल्यास धर्मसिंधूंत पहावा.

हे प्रिये! मरणाराच्या अस्थि पवित्र नदींत सोडावयाच्या असतील तर त्या, अपवित्र वस्तूंचा स्पर्श होणार नाहीं अशा बेतानें सांभाळून ठेवाव्या, व पर्वणी साधून, पवित्रपणें नेऊन योग्य संस्कारांनीं जलाशयांत सोडाव्या.

हे प्रिये! शक्य असल्यास मरणाराचे नांवें प्रथम दिवसपासूनच दररोज पिंडदान करावें. तसें न साधल्यास दहावे दिवशीं एकतंत्रानें करावें. अकरावे दिवशींचें कर्म मुख्य पुत्रानें करावें. बारावे दिवशी सपिंडीकरण करावें. तेरावे दिवशीं यथाशक्ती ब्राह्मणभोजन घालावें. मासिकश्राद्धें व वर्षश्राद्ध वेळच्या वेळीं करून ब्राह्मणभोजन व भूरि भोजन घालावें.

हे प्रिये ! पंचकांत ज्याला मरण येईल त्याला प्रायश्चित्त देऊन नंतर दहन विधी करावा. मरणारा स्मशानांत नेल्यावर जर जीवंत होईल तर त्यास प्रायश्चित्त देऊन नंतर घरांत आणावें. समावर्तनाचे पूर्वी ब्रह्मचारी मरण पावेल तर त्याचा अर्कविवाह करून नंतर दहन विधी करावा. रजस्वला किंवा बाळंतीण मरण पावेल तर, त्यांच्या मल धुवून, त्यांनां स्नान घालून, मंत्ररहित दहन विधी करावा. ( भडाग्नि द्यावा. ) व तिच्या अस्थींस प्रायश्चित्त देऊन फिरून समंत्र दहन करावें. गरोदर स्त्री मरण पावेल तर तिला पहिल्यानें प्रायश्चित्त द्यावें. व गर्भास वेंगळें करून नंतर तिला दहन करावें. व गर्भांतील बालक मृत असेल तर जाळावें. विशेष खुलाशासाठीं धर्मसिंधु पहावा.

## सहगमनाचे नियम.

हे प्रिये ! स्त्रियांनीं पतीबरोबर सहगमन करणें फार उत्तम आहे. गर्भिणीनें, जिच्चीं मुलें लहान आहेत तिनें, बाळंतिणीनें, जीस रजोदर्शन आलें आहे तिनें, बाटलेल्या स्त्रीनें, व्यभिचारिणीनें, आणि दुष्टभावना असलेल्या स्त्रीनें सहगमन करूं नये.

## संन्याशाच्या देहाचा संस्कार.

हे प्रिये ! ब्राह्मणानें संन्यास घेतला तर त्याच्या मातेस व पत्नीस सद्गति मिळते. आतुर संन्याशी व दंडी स्वधामीं जातील ( ब्रह्मीभूत होतील ) तर त्यांचे कलेवरांस जलसमाधी द्यावी व नारायणबली करून समाराधना करावी. संस्कार केल्याशिवाय जर एकाद्या यतीचें शरीर कुजत राहील तर त्या देशीं धर्माचा लोप होऊन दुष्काळ पडेल.

## उपसंहार.

हे प्रिये ! यतीस दिलेली भिक्षा आणि पाणि हीं मेरूपर्वत व समुद्र

यासमान पुण्यदायक होतात. कोणताही दोष घडल्यास दोषीमनुष्यानें पंचगव्य प्राशन करावें. ह्या प्रकारानें पतितांस प्रयासावांचून सर्व सुखें प्राप्त होतात.

हे प्रिये ! घरांत स्त्री प्रधानाप्रमाणें आहे, ह्मणून तिनें यथाविधी सर्व धर्म पाळून पतिसेवा करावी, व यालोकीं यशस्वी होऊन परलोक सुखाचा लाभ प्राप्त करून घ्यावा. हे सर्व धर्म मीं तुला थोडक्यांत सांगितले. या प्रमाणें पतीच्या तोंडून स्त्रियांचे सर्व धर्म ऐकून अन्नपूर्णाबाई फारच प्रसन्न झाल्या.

## पुनः श्रीदत्तमहाराजांचें दर्शन झालें.

शास्त्रीबुवा चोवीस वर्षांचे असतां ते श्री नरसोबाच्या वाडीस गेले होते. तेथें त्यांस श्रीदत्तमहाराजांनीं प्रत्यक्ष दर्शन दिलें. त्यावेळीं श्रीदत्त महाराजांनीं सर्वांगास भस्म लेपन केलें होतें. पायांत पादुका घातल्या होत्या. भगवीं वस्त्रें परिधान केलीं होतीं. हातांत दंडकमंडलु धारण केला होता. अशा प्रकारचें तें भक्ताभिमानी परमात्म्याचें भव्य व सुंदर स्वरूप पाहून शास्त्रीबुवांनीं त्यांच्या चरणारविंदी मस्तक नम्र करून, उभय हस्तें जोडून त्यांस साष्टांग नमस्कार केला. व दोन्ही हात जोडून सन्निध उभे राहिले. आणि त्यांनीं त्यांची प्रार्थना करण्यास पुढें लिहिल्याप्रमाणें सुरवात केली —

## दत्तमहाराजांचें प्रार्थनापंचक.

### श्लोक.

भावें नमूं श्रीगुरुच्या पदासी ॥ जो आपदांसी हरि दे प-
दांसी ॥ दासीपरी श्रीनमि ज्या पदांसी ॥ यांसीं भजे तो
मिळवी पदासी ॥ १ ॥ सततात्रिगतगम्य श्रेष्ठ

दुष्टां अलभ्य ॥ सहृय हृदय लभ्य प्रार्थिती ज्यासि सभ्य ॥ समदाविमदसारे यत्प्रसादें च होती ॥ सुगति भजकलोकां द्या प्रभो हे विनंति ॥ २ ॥ गुरुपदा विपदापहरा सदा । अभयदा म दयामय आपदा ॥ हर वदान्य मदा तव दास्य दे । [1]अमदद्‌दा गद[2]हा न कुदास्य दे ॥ ३ ॥ नमस्ते भवारे नमस्ते शतारे । नमस्तेऽघवैरे प्रशस्तेष्टकर्त्रे ॥ नमस्ते खलारे विहस्तेष्टदात्रे । नमस्तेऽरिवैरे समस्तेष्टसत्रे ॥ ४ ॥ गुरुपद मदवारी सर्वभेदां निवारी ॥ गुरुपद गदहारी सर्वखेदां निवारी ॥ सततविनतहोतां वारितें आपदांसी ॥ सतत विनत व्हावें सर्वही त्या पदांसी ॥ ५ ॥ भावें पठति जे लोक हें गुरुस्तोत्रपंचक ॥ तयां होय ज्ञान बरें वासुदेव म्हणे त्वरें ॥ ६ ॥

(जे जन भक्तिपुरःसर हें स्तोत्रपंचक पठण करितील त्यांस उत्तम प्रकारें ज्ञान प्राप्ती होईल असें श्रीवासुदेवानंदसरस्वतींनीं सांगितलेलें आहे.) असो.

याप्रमाणें केलेली स्तुती प्रसन्न चित्तानें श्रवण करून श्रीगुरुदत्तमहाराज प्रसन्न झाले व आज्ञा केली कीं, माणगांव ग्रामीं तुमचे घरीं सात वर्षे वस्ती करावी अशी आमची इच्छा आहे करितां तुम्ही गांवीं जाऊन देवालय बांधावे. जातेवेळीं रस्त्यांत तुम्हांस माझी मूर्ती मिळेल ती घेऊन, स्वसंतोषानें जो कोणी कांहीं द्रव्य अर्पण करील तें त्या मूर्तीदेणारास द्यावें. असें सांगून श्रीदत्तमहाराज अंतर्धान पावले.

## दत्तमूर्तीची प्राप्ती व तिची माणगांवांत प्रतिष्ठा.

गोविंद स्वामींची व मौनी स्वामींची आज्ञा घेऊन शास्त्रीबुवा माण-

टीपः—१ शांति. २ रोग[redacted]

गांवीं यात्रयास निघाले असतां रस्त्यांत कागलगांवांमध्यें त्यांस एका ओतारी मनुष्यानें हाक मारिली व सांगितलें कीं, आपणाकरितां श्रीदत्तात्रयाची मूर्ती तयार केली आहे ती आपण घेऊन जावें. शास्त्रीबुवा ह्मणाले, हल्लीं मजजवळ पैसा नाहीं. मूर्तीवाला ह्मणाला, आपण मूर्ती घेऊन जावी व आपल्या मर्जीस येईल तेंव्हां पैसा द्यावा. याप्रमाणें मूर्तीवाल्यांचें भाषण ऐकून शास्त्रीबुवा मूर्ती घेऊन निघाले. कांहींसे पुढें गेले न गेले तोंच दुसरा एक मनुष्य पुढें येऊन बोलला कीं, तुह्मीं मूर्ती आणिली आहे तरी ती देणारास हा पैसा अर्पण करावा. असें ह्मणून त्यानें पंचवीस रुपये शास्त्रीबुवांच्या पुढ्यांत ठेविले. ते घेऊन शास्त्रीबुवांनीं मूर्तीवाल्यास नेऊन दिले व आपण माणगांवीं निघून आले.

माणगांवीं आल्यावर शास्त्रीबुवांनीं तेथें स्वहस्तानें लहानसें देवालय बांधुन त्यांत शके १८०५ घ्या वैशाखकृष्णपंचमीचे शुभ मुहूर्तावर **श्रीगुरुदत्तात्रयमूर्तीची स्थापना** केली. व त्रिकाळ यथासांग त्या मूर्तीचें पूजन करूं लागले. ज्या प्रमाणें पिता आपल्या पुत्रांचें रक्षण करितो त्याप्रमाणें श्रीदत्त महाराज शास्त्रीबुवांचें रक्षण करूं लागले. पुढें एके दिवशीं श्रीदत्तमहाराज प्रकट होऊन त्यानीं शास्त्रीबुवांस पुढें लिहिल्याप्रमाणें वचन देऊन आपण अंतर्धान पावले.

“ आजपासून तुह्मी, तुह्मांस शरण येणाऱ्या आपल्या भक्तांला, तुमच्या मर्जीस येईल त्याप्रमाणें वरदान द्यावें. तुमचें संरक्षण करण्यासाठीं मी माझे गण येथें ठेवितों, ह्मणजे तुह्मांस कोणापासून उपद्रव पोंचणार नाहीं. ”

या प्रमाणें श्रीदत्तमहाराजांचें भाषण ऐकून शास्त्रीबुवांनी त्यांस साष्टांग नमस्कार केला व ते त्यांची स्तुती करूं लागले. ती अशीः—

## भजन.

कृष्णातीरीं वसणाऱ्या ॥ [illegible]रीं वसणाऱ्या ॥

काषायांबर धरणाऱ्या ॥ पायीं [illegible] असणाऱ्या ॥
भस्मोद्धूलन करणाऱ्या ॥ दंड[illegible] धरणाऱ्या ॥
स्वभक्तसंगें असणाऱ्या ॥ भक्ता[illegible] करणाऱ्या ॥
स्मरतां दर्शन देणाऱ्या ॥ वासुदेवा [illegible] ॥ १ ॥

या दिवसापासून पुढें शास्त्रीबुवा को[illegible] काम देवाच्या आज्ञेवांचून करीत नसत. माणगांव हा गांव तर [illegible]सारखा शोभायमान दिसूं लागला. हजारों मनुष्यें यात्रेकरितां [illegible] लागलीं. दर शनिवारीं तर वीस पंचवीस हजार पर्यंत यात्रा जमूं लागली. यावेळीं शास्त्रीबुवांचे पितामह व तीर्थरूप कैलासवासी झाले होते त्यामुळें यात्रेकरितां जमणाऱ्या सर्व लोकांची हरएक प्रकारची व्यवस्था, शास्त्रीबुवांच्या आज्ञेनुरूप त्यांचे बंधू हरभट्टजी व सितारामभट्टजी हे ठेवीत असत. शास्त्रीबुवा तेथें येणाऱ्या प्रत्येक मनुष्यास त्याचे त्याचे वर्णाश्रमधर्माप्रमाणें [illegible] दाखवीत असत व त्यामुळें त्यांची त्यावरून क[illegible] पिशाच्च बाधा असलेल्या मनुष्यास, त्याचे पूर्वार्जितव [illegible] पिशाच्चबाधा होण्याचीं कारणें समजाऊन देत व त्याच्या [illegible] स्तव पिशाच्चाच्या मागणीप्रमाणें विचार करून, तिजबद्दल प्रायश्चित्त व [illegible] न त्यास त्या दोषापासून मुक्त करवीत असत. कदाचित कोणी पिशा[illegible] निघण्याचा प्रयत्न करूं लागलें तर त्यास कैद्याप्रमाणें बंधन करीत. [illegible] त्यास योग्य काम नेमून देऊन तें त्याचे कडून करवून घेत असत.

## नाहींसे झालेले दागिने पुनः मिळाले.

एके वेळीं शनिवारीं यात्रेची मोठी गर्दी [illegible] असतां श्रीदत्तमंदिराचे नजीकअसलेल्या विहिरीवर एक बाई आप[illegible]ल सोन्याचे दागिने काढून ते विहिरीच्या कांठीं चांगल्या जागेवर [illegible]लीं झांकून ठेवून, स्नान करण्यासगेली. ती स्नानकर्मांत गुंतली अस

पाळत राखून, त्या [illegible] नजर चुकवुन, ते दागिने उचलून घेतलं व आपल्या घरीं निघून [illegible]. पहिली बाई स्नान आटपून आपली ठेवलेली वस्तु पहावयास गेली, [illegible] तेथें ती तिला सांपडली नाहीं. त्यामुळें ती घाबरून गेली. तिनें व [illegible] आप्त माणसांनीं मिळून ही गोष्ट शास्त्रीबुवांच्या कानांवर घातली. शास्त्रीबुवांनीं त्यांस सांगितलें, तुह्मीं बिलकूल घाबरूं नका. आज संध्याकाळपर्यंत तुमची वस्तु तुह्मांला परत मिळेल. इकडे त्या विहिरीच्या बंदोबस्तासाठीं शास्त्रीबुवांनीं एका पिशाचास नेमिलें होतें. त्यानें त्या चोरी करणा[illegible]स पकडून शास्त्रीबुवांजवळ आणिलें. पिशाच्यानें आपलें उग्र स्वरूप त्या बाईस दाखविल्यामुळें ती अतिशय भिऊन रडूं लागली. तिला शास्त्री[illegible]नीं रडण्याचें कारण विचारिलें. बाई ह्मणाली मी विहिरीवरील जिन्नस चोरले ह्मणून मला कोणीं भयंकर स्वरूप दाखवून मार मारीत आहे. बुवा ह्मणाले, जिन्नस कोठें आहेत ? बाई ह्मणाली घरांत अ[illegible] ठिकाणीं पुरून ठेविले आहेत. हें ऐकून शास्त्रीबुवांनीं तिच्या घरच्या [illegible] बोलावून आणून त्यांचेकडून ते जिन्नस आणविले. व त्या बाईला [illegible] करून उपदेश केला कीं तूं चांगले घरची असून आपणाला [illegible] लोभामुळें वाईट काम केलेंस तरी या पुढें असें वाईट कृत्य कधींही करूं नको असें सांगून तिला घरीं लावून दिली व ते दागिने मूळ मालकिणीस दिले.

एके वेळीं एका बाईनें देवाच्या मंदिरांतून चार आणे चोरिले. तेव्हां तिची दशा वरील [illegible] झाली. तिनें आपला अपराध कबूल करून क्षमा मागतांच तिला [illegible] प्रमाणें पिशाच्यभयापासून मुक्त केली.

अशाप्रकारचा [illegible] पाहून सर्व लुच्चेलोक आपली लबाडी सोडून देऊन सचोटीनें [illegible] लागले. देवालयाचे आजूबाजूस कोणाची कांहीं जरी वस्तु प[illegible] तरी तिला कोणीही हात लावीत नसत. या प्रमाणें शास्त्रीबुवांमुळें [illegible]णगांव हा गांव श्रीरामराज्यांतील गांवां-

कृष्णातीरीं वसणा[illegible]

माणगांवचा पोलीस पाटील शास्त्रीबुवांची मनोभावें सेवा करीत असे. त्याला सुमारें बारा वर्षें वयाची एक मुलगी होती. पूर्वजन्मसंस्कारामुळें तिला पिशाच्च बाधा होती. त्यापासून तिला अतिशय पीडा सोसावी लागत असे. अशाप्रकारची तिची स्थिती पाहून तिचा नवरा दुसरें लग्न करण्यास तयार झाला. तेव्हां ही गोष्ट त्या पोलीसपाटलानें शास्त्रीबुवांस कळविली. तेव्हां बुवानीं त्या मुलीस जवळ बोलावून “ **श्रीदत्ता तुजविण मजला कोणतारी ॥**” ह्या मंत्राचा जप करून देवास प्रदक्षिणा करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें पूर्ण श्रद्धेनें ती प्रदक्षिणा करूंलागली. तेव्हां तिची श्रद्धा पाहून व श्रीदेवाचे आज्ञेवरून शास्त्रीबुवांनीं तिला पिशाच्चबाधेच्या दुःखापासून मुक्त केली.

विसोबा पाडगांवकर यांचे चाकरास पोटशूळ उपन्न. झाला. ह्मणून तो शास्त्रीबुवांजवळ येऊन त्यांस शरण गेला. तेव्हां शास्त्रीबुवा ह्मणाले, तुझ्या पूर्वकर्माप्रमाणें तुझा प्राण घेण्यासाठीं पिशाच्यानें हा रोग उत्पन्न केला आहे. यांतून मुक्त होण्याची जर तुझी इच्छा असेल, तर देवाची श्रद्धायुक्त सेवा केली पाहिजे. नंतर शास्त्रीबुवांच्या आज्ञेप्रमाणें देवाची सेवा करून तो रोगापासून मुक्त झाला.

शास्त्रीबुवांनीं सर्वांस असें बजावून ठेविलें होतें कीं, कोणीही कधींही मंदिरांत ( देवालयांत ) निजूं नये. निजलें असतां मोठ्या विपत्तींत यावें लागेल. व त्या दिवसापासून मंदिरांत कोणीही निजत नसे. एक दिवस विसोबाचा चाकर विसरून मंदिरांत निजला असतां त्यास स्वप्न पडलें कीं, “ तुझा धनी मरण पावला. कारितां तूं तावडतोब गांवांस जा ” असें भयंकर स्वप्न पडल्यामुळें तो चाकर गांवीं जाण्यासाठीं शास्त्रीबुवांची परवानगी घेण्यास गेला. शास्त्रीबुवांनीं त्यास सांगितलें, हा दृष्टांत तुला देवानें दिला नाहीं, तूं मंदिरांत निजल्यामुळें पिशाच्चानें तो दिला. तरी देवाची आज्ञा व प्रसाद मिळाल्यावांचून तूं जाऊं नकोस. ह्याप्रमाणें शास्त्रीबुवांनीं सांगितलें

असतांही त्यांची आज्ञा उल्लंघन करून तो चाकर गावांस निघून गेला. व पहातो तों आपला धनी सुखरूप असल्याचें त्यास दिसून आलें. तेव्हां चाकरानें, स्वप्नापासून सर्व हकिगत शास्त्रीबुवानीं सांगितलेल्या माहितीसह, आपल्या धन्यास सांगितली. ती ऐकून शास्त्रीबुवांची आज्ञा उल्लंघून आपला चाकर निघून आल्याचें समजून विसोबा त्यास रागें भरले व त्यांनीं त्यास तावडतोब माणगांवीं निघून जाण्यास बजाविलें. धन्याचे आज्ञेप्रमाणें तो माणगांवीं यावयास निघाला. रस्त्यांत पिशाच्चानें त्यास गांठून, त्याचे शरिरांत प्रवेश करून भयंकर पोटशूळ उत्पन्न केला व तावडतोब त्याचा प्राण घेतला.

त्याचप्रमाणें सावंतवाडीनजीकच्या एका कुणब्यास गलत्कुष्ठाची व्यथा झाली होती. तो शास्त्रीबुवांचे आज्ञेप्रमाणें देवाचे मंदिरांत दूर राहून प्रदक्षिणा व श्रीदत्तनाममंत्राचा जप करून रोग मुक्त झाला. पुढें गुरुद्वादशीचा उत्सव आला तेव्हां श्री नरसोबाचे वाडीस जाण्याकरितां तो शास्त्रीबुवांची आज्ञा मागूं लागला . शास्त्री बुवा ह्मणाले देवाची परवानगी नाहीं कारितां तूं जाऊं नकोस. तें ऐकून तो शूद्र ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगून, ह्मणूं लागला कीं, येथील व श्री नरसोबाचे वाडींतील देव एकच आहेत कारितां तिकडे जाण्यास कोणती हरकत आहे ? त्यांत आज्ञेचें काय काम आहे ? असें ह्मणून तो नरसोबाचे वाडीस जाण्यास निघाला. वाटेंत त्याच्या शरीरांत पुनः पूर्वी प्रमाणें रोगाचा प्रादुर्भाव झाला. तो नरसोबाच्यावाडीस गेल्यावर देवाच्या पूजाऱ्यानीं त्याचा तो कुष्ठमय देह पाहून त्यास देवाजवळ जाण्यास मनाई केली. त्यामुळें त्यास श्रीदत्ताचें दर्शन झालें नाहीं. व यात्राही पूर्ण पहावयास सांपडली नाहीं. आणि तो शेवटीं खिन्न वदनानें पुनः माणगावीं आला. तो येऊन पोंचण्याचे पूर्वी इकडे शास्त्रीबुवांस दृष्टांत झाला कीं, माझा अपराधी पुनः तुमच्याकडे येत आहे तरी त्यास तुह्मीं देवळाजवळ येऊं देऊं नये. आज्ञेप्रमाणें शास्त्रीबुवांनीं त्यास परत लाविलें व त्यामुळें पुढें तो त्याच रोगानें लवकरच मरण पावला. याकरितां जे कोणी

सत्पुरुषाचे आज्ञेवरून एकठिकाणीं देवाची सेवा करीत असतील त्यांनीं तें ठिकाण देवाच्या व त्या सत्पुरुषाच्या आज्ञेवांचून सोडून अन्य ठिकाणी जाऊं नये. त्याचप्रमाणें स्वतःचें इच्छित साध्य झालें असलें तरी त्यांच्या आज्ञेवांचून निघून जाऊं नयें.

माणगांवाजवळील एका ब्राह्मणास पुत्रसंतती नसल्यामुळें, त्यानें आपली स्थावर जंगम आदीकरून सर्व मालमिळकत मरणसमयीं आपल्या पुतण्यास अर्पण केली व आपण देह ठेवला. पुढें कांहीं दिवसांनी त्या पुतण्याची बायको आजारी पडली. तें पाहून गांवांतील लोक त्यास ह्मणूं लागले कीं, तुझा चुलता पिशाच्च होऊन तुझ्या बायकोस पीडा करितो. यासाठीं तूं हें घर सोडून दुसऱ्या घरांत जाऊन रहा ह्मणजे सुखी होशील. हें लोकांचें ह्मणणें खरें वाटून त्यानें तें घर सोडिलें व तो दुसऱ्या घरांत जाऊन राहिला. पण पुढें पहातो तों कुटुंब जास्त जास्तच आजारी होत जाऊं लागलें. तेह्वां तो त्या स्त्रीस घेऊन माणगांवी शास्त्रीबुवांकडे आला. त्या बाईस पाहून शास्त्रीबुवा ह्मणाले, " अरे तुझ्या कुटुंबाला पिशाच्च बाधा आहे. " नंतर त्यांनी त्या बाईस जवळ बोलाविलें, व तिच्या अंगावर असणाऱ्या पिशाचास हाक मारून बोलाविलें, आणि विचारिलें " अरे तूं या बाईस कां दुःख देत आहेस ? " हें ऐकून तो पिशाच्च त्या बाईच्या शरीरांत संचारून बोलूं लागला " हे भगवन् ! हा माझा पुतण्या आहे, व ह्यास मीं माझी सर्व माल मिळकत दिली आहे. असें असतांही हा माझें श्राद्ध वगैरे कांहीं करीत नाहीं ह्मणून मीं यास पीडा करीत आहें. हे प्रभो ! माझें पोषण श्राद्धांतील विकिरपिंडांनीं होत असतें, हें आपण जाणतच आहां. " हें ऐकून पुतण्या ह्मणाला हें आमच्या काकाचें भाषण अगदीं खोटें आहे. मीं सांवत्सरीक श्राद्ध व महालय करून, माझ्या वडिलांच्या श्राद्धापेक्षां यांच्या श्राद्धांत जास्त पैसा खर्च करीत असतों. हें ऐकून पिशाचरूपी काका ह्मणाला " महाराज ! आपण प्रत्यक्ष श्रीदत्तभगवान आहां. तेव्हां माझें सांगणें पूर्णपणें ऐकून घेऊन जर तें खोटें असें ठरेल तर आपल्या इच्छेप्रमाणें मला यो-

ग्य ती शिक्षा करा. हे प्रभो! मीं माझे सर्व मिळकतीसह घर याचे स्वाधीन केलें असतां हा माझे घरांत राहत् नाहीं, दुसऱ्याचे घरांत राहतो. शिवाय तिथें भाडें वगैरे कांहीं दिल्यावांचून राहतो व त्या घरीं श्राद्धादीक कारितो. त्यामुळें त्याचें फळ त्या घरचे मालकांचे पितर घेऊन जातात. या कारि-तां यानें केलेलें श्राद्धादिक माझ्या काय उपयोगाचें आहे? " हें ऐकून पुतण्या ह्मणाला महाराज! मला संशय आल्यामुळें मीं तें घर सोडिलें. हें ऐकून पिशाच्च काका ह्मणाला हे भगवन्! "आपण यास विचारा कीं प्रथम मीं यास उपद्रव केला होता कीं काय? हा मजवर विनाकारण खोटा आ-रोप ठेवून माझी अपकीर्ती करीत आहे. जोंपर्यंत हा माझ्या घरांत राहून माझें श्राद्धादिक करणार नाहीं, तों पर्यंत मीं यास असाच दु:ख देत राही-न. " हें ऐकून पुतण्या काकाच्या घरांत रहावयास गेला व त्या दिवसापा-सून त्याची बायको पिशाच्च दु:खापासून मुक्त झाली.

सावंतवाडींतील एका शास्त्र्यानें आपल्या पत्नीच्या श्राद्धसमयीं ब्रा-ह्मणास यज्ञोपवीत अर्पण केलें नाहीं, त्यामुळें रात्रीं त्यास दृष्टांत झाला कीं, तुह्मीं माझे श्राद्धांत यज्ञोपवीत कां दान केलें नाहीं ? देवयोनींत स्त्री-पुरुष उभयतांही यज्ञोपवीत धारण करतात. याकरितां स्त्रियांच्या श्राद्धांत सुद्धां यज्ञोपवीत द्यावें. यासंबंधांत आपणांस संशय असेल तर धर्मसिंधु आदिकरून ग्रंथ अवलोकन करा. हें ऐकून शास्त्रीबुवांनीं ग्रंथ काढून पाहिला; तों त्यात स्त्रियांच्या श्राद्धांत जानवें द्यावें, असें प्रमाण निघालें. त्यामुळें पुढें जानवें देऊं लागले व ही गोष्ट माणगांवीं येऊन त्यानीं शा-स्त्रीबुवांस सांगितली. तें ऐकून शास्त्रीबुवा ह्मणाले ! वाः शास्त्रीबुवा ! शास्त्र शिकण्याची व ऐकण्याची किती जरूर आहे पहा ! शास्त्रद्वारें पूर्ण नियम समजल्याशिवाय कोणतेंही कार्य यथासांग होत नाहीं व त्यामुळें कर्म करणारास सांगितल्याप्रमाणें कृतकर्माचें फळ प्राप्त होत नाहीं. यावरून स्पष्ट होतें कीं, शास्त्रकारांनीं जे जे नियम ठरविले आहेत ते ते सर्व उप-योगी आहेत. ह्मणून श्राद्धांत लोखंडाचीं पात्रें वापरूं नयेत. श्राद्धान्न आ-

पल्या जातीशिवाय इतरांस देऊं नये. दुसऱ्याचे घरांत त्या जागेचें भाडें दिल्याशिवाय श्राद्ध करूं नये. श्राद्धांत जानवें द्यावें. व जेवतांना ब्राह्मणांनीं बोलूं नये इत्यादि श्राद्धसंबंधीं नियम पाळावे. याबद्दल भगवद्गीतेंत सांगितलें आहे कीं:---

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य । वर्तते कामकारतः ॥**
**न स सिद्धिमवाप्नोति । न सुखं न परांगतिम् ॥१॥**
**तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते । कार्याकार्यव्यवस्थितौ ॥**

कोणतेंही कर्म करितांना तें करण्याविषयींचे शास्त्रांत जे नियम सांगितले असतील त्या नियमाप्रमाणें श्रद्धायुक्त तें कर्म करावें; ह्मणजे त्या कर्माचें फल मिळतें. त्याशिवाय केलेलें कर्म निरुपयोगी होय. हें खालील उदाहरणावरून स्पष्टपणें लक्षांत येईल.

सावंतवाडी येथील एका ब्राह्मणाचे पत्नीस तीन तीन महिन्यांनीं वारंवार गर्भस्राव होत असे. त्यानें एका अनुभविक मनुष्यास त्यासंबंधाचें कारण विचारलें तेव्हां तो त्यास ह्मणाला. अरे बाबा "तुझ्या पत्नीचा गर्भ पिशाच्च नाश करित असतो. त्या पिशाच्चाच्या मुक्तीस्तव तूं नागबली, नारायणबली कर." हें ऐकून तो ब्राह्मण त्याप्रमाणें करण्यास तयार झाला व तें कर्म करतेवेळीं उपाध्यास ह्मणाला, त्या नागबलीचे चौदा कृच्छ्र चौदा ब्राह्मणांस वांटून द्या. तें ह्मणणें उपाध्यास पसंत न पडून त्यानें नागबलींत आठ व नारायणबलींत साहा याप्रमाणें ब्राह्मणांना ते कृच्छ्र देण्यांत येतात, अशी मसलत सांगून, त्यावेळीं त्या जागीं स्वतःच्या घरचीं मनुष्यें आणून त्यांचीं पूजा करवून ते कृच्छ्र दिले आणि तें कर्म संपूर्ण करविलें. नंतर त्या ब्राह्मणाचे पत्नीस दशमास पूर्ण होऊन ती प्रसूत होतांच तिला पुत्र होऊन त्या जागीं एक काळा नाग दृष्टीस पडला. त्यास दुसऱ्या मनुष्यांनीं तावडतोब मारिलें. आणि पाहतात तों तो साप मरण्याबरोबर तो पुत्रही मरण पावला. तेव्हां तो ब्राह्मण पऱ्हा

नागवली, नारायणवली करावयास सांगणाऱ्या जाणत्या मनुष्याकडे गेला व त्यानें ती सर्व हकीगत त्यास सांगितली. तेव्हां तो ह्मणाला "हे ब्राह्मणा ? पहिला दोष तर अजून दूर झाला नाहींच, परंतु तुह्मीं नाग मारून आणखी एका नवीन दोषाची त्याला जोड करून दिलीत ! आतां माझ्याकडून त्या दोषाच्या परिहार होईल असें मला वाटत नाहीं.

झालें, शेवटीं तो ब्राह्मण शास्त्रीबुवांपाशीं आला. व त्यानें आपली इत्थंभूत हकिगत त्यांनां निवेदन केली. नंतर शास्त्रीबुवांनीं त्याजकडून यथासांग नागवली करवून, त्याला सर्पाच्या दोषांतून मुक्त केलें. त्याजप्रमाणें नंतर यथाविधी नारायणवली करविला व त्याला पिशाच दोषापासुनही मुक्त केलें. त्यानंतर कितिएक दिवसांनीं त्या ब्राह्मणास पुनः मुलगा झाला व तो आज मिती पर्यंत हयात आहे. या करितां शास्त्र शिकण्याची व ऐकण्याची प्रत्येक मनुष्यास जरूरी आहे. जो मनुष्य प्रमादयुक्त होऊन शास्त्रनियमाबाहेर यथेच्छ आचरण करितो, त्याच्या दुःखास पारावार राहात नाहीं.

सावंतवाडी येथें एका वेंगुर्लेकर ब्राह्मणावर एकदां विनाकारण चोरीचा आरोप येऊन, राजसेवकांनीं त्यास पकडून नेलें व एका कोठडींत कोंडून ठेविलें. त्यावेळीं त्यानें श्री दत्तात्रयाची एकनिष्ठेनें प्रार्थना केली. "हे देवा या संकटांतून मला मुक्त करण्यास आपल्यावांचून कोणी समर्थ नाहीं. तरी आपण मला या संकटांतून सोडवावें. मी संकटापासून मुक्त झाल्यावर श्री नरसिंहवाडीस येऊन आपली महापूजा करीन." याप्रमाणें देवाची प्रार्थना केल्याबरोबर त्या दीनवत्सल प्रभूला करुणा आली. ज्या कोठडींत शिपायांसह तो ब्राह्मण होता तींत एक मोठा भयंकर नाग एकाएकीं फूस्कार करीत शिरला. त्या बरोबर शिपाई व तो ब्राह्मण हे वाट मिळेल त्या त्या दिशेकडे पळत सुटले. त्या गडबडींत तो ब्राह्मण व ते शिपाई ह्यांची चुकामूक झाली इतक्यांत नजीकच्या एका गांवीं खून झाल्याची बातमी समजल्यामुळें, ते शिपाई वरिष्ठांच्या हुकुमा बरोबर त्या खून झालेल्या

गांवीं जाण्यास तावडतोब निघाले. अर्थात चोरीचा तपास व ब्राह्मणाचा मार हा तहकूब राहिला. इकडे ते शिपाई जलद पोंचण्याच्या हेतूनें मुख्य मार्ग सोडून आडवाटेनें जाऊं लागले. बरेच लांब गेल्यावर त्यांस एक ओढा दिसला. त्या ठिकाणीं कांहीं चोर आपआपसांत चोरीच्या जिनसांची वांटणी करण्याकरितां एकांत स्थळ पाहून जमले होते व त्यांचा तो उद्योग सुरू होता; त्यामुळें सहजीं ते सरकारी शिपा-यांकडून पकडले गेले. वर वर्णिलेल्या ब्राह्मणावर ज्या चोरीचा आरोप आ-ला होता त्या चोरींतील बहुतेक माल ह्या चोरांपाशीं सांपडला. ह्यामुळें त्या ब्राह्मणावरील चोरीचा आरोप जाऊन तो सहजीं दोषमुक्त झाला. नंतर तो ब्राह्मण आपण केलेला नवस फेडण्यासाठीं नर्सोबाचे वाडीस जाण्यास निघाला. रस्त्यांत त्यास आपल्या सासऱ्याचें घर लागलें. तेव्हां तो तेथें गेला, व त्यानें ही आपली सर्व हकीगत त्या मंडळीस कळविली. ती ऐकून सासू सासऱ्यानें त्यास सांगितलें कीं; "आह्मींही श्रीनरसोबाचे वाडीस जाणार आहोंत. करितां उन्हाळा संपल्यावर बरोबरच जाऊं." हें त्यांचें ह्मणणें ऐकून त्यानें आपलें जाणें मुदतीवर ठेविलें. त्यामुळें देवाची अवकृपा झाली व त्याचें घर जळून गेलें. हें वर्तमान ऐकून तो तेथून आपल्या घरीं गेला, व आपलीं मुलें माणसें मरण पावल्याचें पाहून फार दुःखी झाला. पुढें कांहीं दिवसांनी त्यास अन्नवस्त्राचीही प्राप्ती होणें कठीण झालें. परंतु श्रीनरसिंह वाडीस जाण्याबद्दल आपण केलेल्या नवसाची त्यास आठवण मुळींच झाली नाही. या प्रमाणें दुःखातिशयानें त्रस्त झालेला तो ब्राह्मण रुदन करीत शास्त्री-बुवांकडे आला. त्यानें आपल्यावर कोसळलेल्या सर्व आपत्तींची हकिगत त्यांस निवेदन केली. ती ऐकल्यावर बुवांनी त्यास 'उद्यां या ह्मणजे ह्याच्या निवारणाबद्दल तुह्मास उपाय सांगेन' असें सांगून परत पाठविलें. व आप-ण श्रीदत्तभगवान् यांजकडे तो प्रश्न केला. तेव्हां त्यांनी 'हा आपला अप-राधी आहे करितां त्यास तुह्मीं आपले सन्निध येऊं देऊं नये.' असें कळ-विलें. दुसरे दिवशीं तो ब्राह्मण शास्त्रीबुवांजवळ आला. बुवांनीं त्यास आद-

ले दिवसा प्रमाणें जवळ येऊं न देतां दूरच राहावयास सांगितलें आणि ह्मणाले, " तुह्मीं देवाचा अपराध केला आहे " हें त्याचें भाषण ऐकून तो ब्राह्मण अतिशय घाबरून विचार करूं लागला, महाराज मीं देवाचा असा कोणता अपराध केला कीं, आपणही मजवर बहिष्कार घातला ? तें कृपा-करून मजला कळूं द्या. कृतापराधाची मी आपलेपाशीं व आपले मार्फत ईश्वरापाशीं पदर पसरून क्षमा मागतों. हें ऐकून बुवा ह्मणाले, तुह्मीं उद्यां या ह्मणजे तुमचा अपराध काय आहे हें तुह्मांस सांगेन. या प्रमाणें सांगून त्यांनीं त्यास परत लाविलें. रात्रीं आपण देवाची प्रार्थना करून विचारिलें कीं, मी त्या ब्राह्मणास दुःखाचे परिहाराबद्दल उपाय सांगेन असें बोललों आहें तरीं पुढें काय करावें त्याबद्दल आज्ञा झाली पाहिजे ? श्रीदत्तभगवान ह्मणाले " याचेवर पूर्वी चोरीचा खोटा आरोप आला होता. त्यावेळीं यानें त्यांतून मुक्त झाल्यावर श्रीनरसोबाच्यावाडीस येऊन पूजा करीन असा नवस केला होता. तो नवस हा विसरून गेला. बोलल्याप्रमाणें यानें पूजा केली नाहीं. त्यामुळें तो आपत्तीं भोगीत आहे. करितां तुह्मांस वाटेल त्याप्रमाणें याला दुःखांतून मुक्त करावें. कारण हा माझा भक्त आहे. परंतु याजकडून या नंतर अशी चूक घडूं नये एवढ्याच करितां यास दुःखांत टांकिला आहे." या प्रमाणें देवाची आज्ञा झाली. दुसरे दिवशीं तो ब्राह्मण शास्त्रीबुवांजवळ आल्यावर त्यांनीं त्याला विचारिलें, "तुमच्यावर चोरीचा आरोप होता त्यावेळीं तुह्मी देवाची प्रार्थना केल्यावरून त्यानें तुह्मांस त्यांतून सोडविलें. त्यावेळीं देवाची पूजा करण्याबद्दलचा तुह्मीं केलेला नवस पुरा केलात काय ?" हें ऐकून त्यानें आपला अपराध कबूल करून झालेली सर्व हकिगत त्यांस कळविली. ती ऐकून ते ह्मणाले, तुह्मांस आपत्तीच्या प्रसंगीं सासूसासऱ्यानें सोडविलें, किंवा देवानें सोडविलें ? ह्याचा विचार करा. सासूसासऱ्याचें ऐकून तुह्मीं श्री नरसोबाचे वाडीस जाण्याचें बंद ठेवलेंत, ह्या कसुरीबद्दल देवानें तुह्मांस ही शिक्षा दिली आहे. ह्याकरितां आतां प्रथमतः श्री नरसोबाचेवाडीस जाऊन ह्या कसुरीबद्दल प्रथम देवास एक लघुरुद्रा

महापूजा करा व देवाचा प्रसाद घेऊन मजकडे या. मग पुढील उपाय सांगेन. हें ऐकून तो ब्राह्मण नर्सोबाचेवाडीस निघून गेला, व देवाची पूजा करून प्रसाद घेऊन पुन: शास्त्रीबुवांकडे आला. नंतर त्यांनीं त्याला कांहीं जपाचें विधान सांगितलें व त्याप्रमाणें तें त्यानें केल्यानंतर सर्व क्लेशांतून मुक्त होऊन पुढें देवाचा नि:सीम भक्त बनला. या कारितां प्रत्येक मनुष्यानें देवकार्य करण्याचा केलेला संकल्प दिनावधीवर न पडूं देतां तावडतोब उरकून घ्यावा. तसें न केल्यास वरील ब्राह्मणाप्रमाणें दु:खांत पडावें लागेल. अशीच एक गोष्ट श्री सत्यनारायणाच्या कथेंत आहे. तिच्या खरेखोटेपणाबद्दल विचार करून, ईश्वरानें आपणास दिलेल्या सदसद्बुद्धीचा उपयोग करून अशा कार्यांत कदांही चूक होऊं देऊं नये.

# खुनाची कथा.

एके समयीं सावंतवाडीसंस्थानामध्यें श्रीक्षेत्र वालावली येथें एक खून झाला. त्यांत एका ब्राह्मणास अम्मलदारानें आरोपाच्या संशयावरून कैद केलें. ही बातमी शास्त्रीबुवांस समजली. तेव्हां त्यांनीं संस्थानच्या वरिष्ठांस बोलावून सांगितलें कीं, ह्या ब्राह्मणानें खून केला नाहीं. खुनी इसम निराळा आहे. खुनाचा पत्ता आपणास परवां मिळेल. ह्या निरपराध्यास तुह्मीं सोडून द्यावें. शास्त्रीबुवांचें सांगणें ऐकून वरिष्ठांनीं त्या ब्राह्मणास जामिनावर खुलें केलें.

तिसरे दिवशीं त्या खुनाचा पत्ता लागला, त्यांत सात असामी गुन्हेगार होते. ते शास्त्रीबुवांनीं सांकेतीक चिन्हांनीं दाखविले. त्यांस धरून आणल्यावर त्यांचेवर आरोप शाबित होतांच त्या पूर्वीच्या ब्राह्मणावरील आरोप काढून घेऊन त्यास दोषमुक्त ह्मणून सरकारनें सोडून दिलें.

सावंतवाडी येथें रामभाऊ सबनीस ह्या नांवाचे एक गृहस्थ सरका-

री नोकर ( कमाविसदार ) होते. त्यांस कारणावांचून एकदां नोकरींतून कमी करण्यांत आले तेव्हां ते शास्त्रीबुवांजवळ आले. बुवांनीं त्यांस योगिनी मंत्राचा जप करण्यास सांगितलें व तो त्यानीं करतांच त्यांस पुनः पूर्ववत सरकारी नोकरींत दाखल केलें.

वेंगुर्लें येथें वासुदेव साठे ह्या नावांचे एक गृहस्थ राहात असत. त्यांस एक मुलगा होता व तो जन्मापासून मुका होता. त्यास एके दिवशीं ते शास्त्रीबुवांपाशीं घेऊन आले आणि ह्मणाले, आपण साक्षात देवाचा अंश असल्यानें मी आपणास शरण आलों आहें. तरी आपण कृपाळू होऊन मुलाचें मला जीवदान द्या. हा मुलगा उपजल्यापासून बोलत नाहीं. याचा संस्कार कशा प्रकारें करावा. ? याला आपण बोलतें करावें. शास्त्रीबुवा ह्मणाले मी कांहीं परमेश्वर नाहीं. या दोषाकारितां शास्त्रांत मंत्रांचें अनुष्ठान सांगितलें आहे, तें मीं आपणास सांगतों. ते श्रद्धा व भाक्तिपुरःसर कराल तर देव त्याचें फल देईल. याप्रमाणें सांगून त्यांस एकवीस दिवसाचें अनुष्ठान सांगितलें व त्याप्रमाणें त्यांनीं केलें. तेव्हांपासून तो मुलगा बोलूं लागला.

एके शनिवारीं पुष्कळ यात्रेकरू जमले होते. त्यांस शास्त्रीबुवांनीं सांगितलें, या औदुंबरास श्री दत्तस्वरूप समजावें व कोणीही स्पर्श करू नये. ब्राह्मणाशिवाय इतरांनीं दूर राहूनच याची पूजा करावी. या प्रमाणें वागण्यांत कोणाकडूनही हयगई होईल तर त्यास मोठ्या अडचणींत यावें लागेल. त्या दिवसा पासून सर्व लोक तेथें फार जपून वागू लागले. परंतु दैवयोगानें त्यागांवांतील एका शूद्राच्या मुलास, त्या औदुंबर स्पर्श केल्याचा दोष घडला. तत्काळ त्यास सर्पदंश होऊन, आतां मरतो, अर्ध-घटकेनें मरतो, अशी त्याची स्थिती झाली. ही गोष्ट शास्त्रीबुवांस समजतांच त्यांनीं त्या मुलास दुःखांतून मुक्त करून इतर सर्व लोकांस पुन्हां ताकीद दिली

मालवणानजीक मसुरें येथें विठ्ठल ह्या नावांचा एक शूद्र होता. तो गलित कुष्ठानें अतिशय पीडल्यामुळें शास्त्रीबुवांस शरण आला. त्यास शास्त्रीबुवांनीं निर्मला नदींत स्नान करून दूर राहून देवास प्रदक्षिणा करण्यास सांगितलें. तो त्याप्रमाणें आचरण करूं लागतांच हळू हळू त्याचा रोग समूळ नाश पावला. नंतर तो शास्त्रीबुवांची आज्ञा घेऊन आपले घरीं परत गेला.

एके दिवशीं आबा शास्त्री श्रीनरसोबाचे वाडीहून माणगांवास आले व शास्त्रीबुवास ह्मणाले, श्रुतीनें अष्टांगयोग प्रतिपादन केला नाहीं, ह्मणजे योगाभ्यास हें कांहीं ब्रह्मज्ञानाचें साधन नव्हे. असें ह्मणून शास्त्रीबुवांबरोबर वाद विवाद करूं लागले. शास्त्रीबुवा कोणाबरोबर कधींही वितंडवाद करित नसत. श्रीनरसिंहवाडी ही श्रीदत्तात्रयाची राजधानी असल्यामुळें तेथील सर्व लोकांस श्रीदत्तस्वरूप जाणून त्यांनीं आबाशास्त्र्यांबरोबर वादविवाद केला नाहीं. ते ह्मणाले, मी कांहीं शास्त्रांचें अध्ययन केलें नाहीं. त्यामुळें मला आपणाशीं वाद करितां येत नाहीं. असें ह्मणून शास्त्रीबुवा स्नानसंध्येस निघून गेले.

शास्त्रीबुवांचें हें भाषण ऐकून आबाशास्त्र्यांस फार अभिमान झाला. दुसरे दिवशीं ते तेथून निघून वेंगुर्ल्यास आले. त्यांचा अभिमान नाहींसा करण्याकरितां श्रीदत्तमहाराजांनीं ब्रह्मचाऱ्याचें स्वरूप धारण केलें, व आबाशास्त्री एका धर्मशाळेंत उतरले होते, त्या ठिकाणी स्वारी प्राप्त झाली.

**आबाशास्त्र्यांस** पाहून ब्रह्मचाऱ्यानें विचारिलें, आपण काल माणगांवीं गेलां होतां व शास्त्रीबुवांबरोबर अष्टांगयोग वगैरे बद्दल वादविवाद करण्याचा आपला मनोदय होता नाहीं काय? अष्टांगयोग श्रुतीनें प्रतिपादन केला नाहीं काय? तुह्मीं शास्त्रीबुवांला हरवून आलेत. ठीक झालें!

आतां मजबरोबर वादविवाद करावा. तुह्मीं कोणकोणतीं शास्त्रें पाहिलीं आहेत? तुह्मी पाहिलेल्या कोणत्याही शास्त्रांत तुह्मांस अष्टांगयोगाबद्दल आधार मिळाला नाहीं काय? असे ह्मणून ब्रह्मचारी बुवांनीं श्रुति, स्मृति, शास्त्र, पुराण आणि तमाम आचार्यांचीं वचनें प्रमाण दाखवून, आबाशास्त्री यांस सिद्ध करून दिलें कीं, योगाभ्यास केल्याशिवाय कधींहीं ब्रह्मज्ञान प्राप्त होणार नाहीं. ज्यांनीं पूर्व जन्मांत योगाभ्यास केला असेल, त्यांला या जन्मांत तो अभ्यास न करितां ध्यान करितां येतें. त्यांवाचून इतरांस योगाभ्यास केल्याशिवाय ध्यान करितां येत नाहीं, आणि जोंपर्यंत ध्यान करितां येणार नाहीं तोंपर्यंत ब्रह्मज्ञान प्राप्त होणार नाहीं. या करितां प्रत्येकानें योगाभ्यास अवश्य केला पाहिजे.

ह्याप्रमाणें ब्रह्मचाऱ्याचें भाषण श्रवण करून आबाशास्त्र्यांचा अभिमान जेथल्या तेथें जिरून गेला. ते अगदीं निरुत्तर झाले. असें पाहून ब्रह्मचारीबुवा तेथून निघून चालते झाले. मागाहून आबाशास्त्री विचार करूं लागले कीं, माझे मनांतील सर्व गोष्टी जाणणारा हा ब्रह्मचारी कोण असावा? त्याला ही हकीगत कशी समजली असावी! हा कोणी तरी समर्थ असावा. करितां याचे पाय धरून क्षमा मागितली पाहिजे. असें ह्मणून जों पाहतात तों ते दिसेनासे झाले. शेवटीं आबाशास्त्री फिरून माणगांवांस आले आणि झालेली सर्व हकीगत त्यांनीं शास्त्रीबुवांस सांगितली व स्वतःच्या अपराधाबद्दल त्यांची क्षमा मागितली. ती हकीगत ऐकल्यावर शास्त्रीबुवा ह्मणाले. "अहो आबाशास्त्री! खरोखर आपण मोठी चूक केलीत. ते ब्रह्मचारीबुवा दुसरे कोणी नसून स्वतः श्रीदत्तमहाराजच होते. तुह्मीं त्यांचे चरण कां धरिले नाहींत?" शास्त्रीबुवांचें भाषण ऐकून आबाशास्त्री खिन्न झाले व विचार करूं लागले कीं, शास्त्रीबुवाच स्वतः श्रीदत्तअवतार आहेत. करितां आजपासून यांचेबरोबर वादविवाद करितां कामा नये. यांची कृपा संपादन करून या मनुष्यदेहाची सार्थकता केली पाहिजे. असें समजून ते शास्त्रीबुवांचे आज्ञेंत वागूं लागले.

एकदां सावंतवाडी संस्थानचे कारभारी सखारामपंत बाक-डेकर हे माणगांवीं आले होते. ते स्वतः पिशाच्च योनीस खरें मानीत नसत. ते एक दिवस देवाचे धुपारतीच्या वेळीं सहज फिरत फिरत तेथें आले. त्या दिवशीं शनिवार होता. ह्मणून वीस पंचवीस हजार मंडळी दर्शनाकरितां तेथें आली होती. त्यांत कांहीं मनुष्यें पिशाच्च व्यथेनें पीडलेलींही तेथें आलीं होतीं. शास्त्रीबुवांनीं देवाची पूजा करून देवास धूप अर्पण करण्यास सुरवात केल्यापासून तों देवाच्या पालखीची प्रदक्षिणा पुरी होऊन मंत्रपुष्पांजली होईपर्यंत पिशाचपीडितलोकांच्या अंगांत पिशाचसंचार होऊन ते ऊर बडवून घेणें, डोकें आपटणें, मोठमोठ्यानें आरोळ्या मारणें, इत्यादि विचित्र क्रिया करीत; त्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें यावेळींही पिशाच पीडित लोकांचा क्रम सुरू झाला. कारभारी साहेबांनीं तो प्रकार अवलोकन केला, आणि ह्मणाले हें सर्व ढोंग आहे. एक वेळ मनुष्य मरण पावला ह्मणजे, त्याला पुन्हा जन्म होत नाहीं. नंतर त्यांनीं आपल्या शिपायांकडून वरील प्रकारचे पिशाचचाळे करणाऱ्या लोकांपैकीं कांहीं जणांस त्यांनीं आश्रय केलेल्या स्तंभापासून दूर ओढून नेण्याचा प्रयत्न करून पाहिला. त्यांत ते लोक त्या त्या जागेवरून सुटले नाहींत. हें पाहून कारभारीसाहेब तेथून निघाले व सावंतवाडीस परत आले.

पुढें कांहीं दिवसांनीं सदर कारभारी साहेबांच्या मुलाचा विवाह ठरला. वधू एका बडोदेकर गृहस्थाची मुलगी नेमस्त झाली. मुलीचे आई बाप लग्नाकरितां मुलीस घेऊन सावंतवाडी मुक्कामीं आले. लग्नमुहूर्त धरून ऐन माळ पडण्याचे वेळीं वधू एकाएकीं बेशुद्ध झाली. हातापायाच्या आंकड्या वळल्या, डोळे ताठ झाले, दांतखीळी बसली. अल्प श्वासोच्छ्वास मात्र नासिकाद्वारें सुरू होता. हें पाहून यजमान, पुरोहित, पाहुणे, वऱ्हाडी इत्यादि सर्व मंडळी भीतीनें गांगरून चित्राप्रमाणें तटस्थ झाली. इतक्यांत एका अनुभवीक वृद्ध मनुष्याच्या सांगण्या वरून रा० विष्णुपंत अणावकर

यास तेथें बोलाऊन आणिलें. त्यांनीं येण्याबरोबर तो प्रकार पाहिला. ते ह्मणाले, हिला मीं काहीं काल पर्यंत बरी करीन. परंतु पुढें तिला माणगावीं शास्त्रीबुवांकडे घेऊन जावी ह्मणजे ती पूर्णपणें चांगली होईल. असें सांगून त्यांनीं तिला शुद्धीवर आणिली. व लग्नसोहळा यथासांग सिद्धीस नेला. पुढें बरेच दिवस झाले तरी त्या मुलीस त्यांनीं शास्त्रीबुवांकडे नेलें नाहीं. काहीं दिवसांनंतर ती पुन्हा पूर्वीप्रमाणें बेशुद्ध झाली. आणि पिशाच्चपीडीतलोकांप्रमाणें बडबड करूं लागली. त्यावेळीं कारभारी साहेबांस सर्व लोकांनीं सांगितलें कीं, आपण पिशाच्याची गोष्ट खोटी मानीत होतां ! तर आतां पिशाच्य कशा प्रकारें बोलत आहे तें पहा ! शास्त्रीबुवांस शरण जाऊन ते सांगतील त्या प्रमाणें वागाल तर ह्या दुःखा पासून ती मुलगी मोकळी होईल.

नंतर ते कारभारीसाहेब आपल्या सुनेस घेऊन माणगांवीं शास्त्रीबुवांकडे आले. त्यांस साष्टांग नमस्कार करून सर्व हकीगत कळवून त्यांनीं कृताप-राधाबद्दल त्यांची क्षमा मागितली, तेव्हां शास्त्रीबुवा ह्मणाले, मला यांत कांहीं समजत नाहीं. तुह्माला जर या दुःखांतून मुक्त होणें असेल तर देवाची सेवा करा. हें ऐकून कारभारीसाहेब ह्मणाले, शास्त्रीबुवा ! तूर्त सुनेस बडोद्यामध्यें माहेरीं जावयाचें आहे. हें ऐकून शास्त्रीबुवा ह्मणाले, 'मी तीला देवाचा आंगारा देतों. तो ती सांभाळून ठेवील तर येत्या दत्त-जयंती पर्यंत तिला हा उपद्रव होणार नाहीं.' ह्या प्रमाणें सांगून व देवाचा आंगारा देऊन तिला पाठवून दिली. पुढें दत्तजयंतीपर्यंत ती चांगली होती. दत्तजयंतीला तिला येतां न आल्यामुळें ती बडोद्यास होती तेथेंच तिची पूर्ववत स्थिती झाली. तेव्हां पुन्हा मुदत मागण्यासाठीं कारभारीसाहेब शास्त्रीबुवांजवळ आले. परंतु त्यांस मुदत वाढवून मिळाली नाहीं. तेव्हां त्यांनीं तावडतोब सुनेस आणविली व माणगांवीं घेऊन आले. आणि सेवा करविल्यावर ती चांगली बरी झाली.

नानेली गांवचा कुळकर्णी सखाराम खांडाळेकर हा नास्तिक होता.

तो नेहमीं पिशाच्चबाधित लोकांची चेष्टा, मस्करी करीत असे. दैववशात् त्या पिशाच्चबाधा झाल्यामुळें तो शास्त्रीबुवांस शरण येऊन देवाची सेवा करूं लागला होता. एके दिवशीं त्याचा मेहुणा त्याला भेटण्याकरितां तेथें आला. तो आधुनीक सुधारकांपैकीं होता. बी. ए. एल्. एल्. बी. पास झालेला होता. त्यामुळें गर्विष्ठ होता. त्याला स्वर्ग कायतो दोन बोटें उरल्यासारखा दिसत होता. पाश्चात्य शिक्षणानें सुसंस्कृत झालेली कांहीं मंडळी जुन्या हिंदुधर्माचा उपहास करणारी असते तशाच वर्गापैकीं तो होता. अशी मंडळी स्त्रियांचे दास होऊन त्यांनां खूष ठेवण्याकरितां, खरें खोटें बोलून द्रव्यार्जन करणारी व कर्म-धर्म आणि कुलाचार सोडून भ्रष्टाचारानें वागण्याकरितां तत्पर असावयाची. त्यांस आपणच सर्वज्ञ आहों असें वाटत असतें. परंतु अरण्यांत ज्याप्रमाणें कांहीं अशिक्षित लोक, दुसऱ्या लोकांस आपण जज्ज अथवा बॅरिस्टर आहों, असा आविर्भाव दाखवितात, त्याप्रमाणेंच हें या लोकांचें करणें होय! असो. तो मेहुणा सखारामास ह्मणाला ? अरे तुह्मीं चांगले शिकले सवरलेले लोक असून इतर मूर्खांप्रमाणें हें काय ढोंग माजविलें आहे ? सखाराम ह्मणाला मी प्रथम तुमच्याप्रमाणेंच बोलत असें. पण स्वतः वर प्रसंग गुदरतांच माझी खात्री झाली व माझीं मतें बदललीं. तुमच्यावर प्रसंग आला नाहीं तोंपर्यंत तुह्मांसही ह्या चेष्टाच वाटणार. याप्रमाणें उभयतांचा संवाद सुरू असतांनांच एकाएकीं पिशाच्चानें सखारामाच्या शरिरांत प्रवेश करून बोलण्यास सुरुवात केली. " आपण इंग्रजी शिकून नास्तीक बनलां व माझी मस्करी चालविली आहे ? " हें ऐकून मेहुणा ह्मणाला, तूं जर सखारामाप्रमाणें मला उपद्रव करूं शकशील तर मी तुला खरें समजेन. पिशाच्च ह्मणाला, आह्मीं सर्व ईश्वराच्या आज्ञेप्रमाणें वागतों व ज्याचेजवळ आमचें ऋण असेल, त्यालाच आह्मीं उपद्रव देतों.

मेहुणा ह्मणाला मी तुझी गोष्ट खरी मानीत नाहीं व पुढें तो देवाची, शास्त्रीबुवांची व त्या पिशाच्चाची अधिकाधिकच चेष्टा करूं लागला.

यांस तें पिशाच्च ह्मणाला, ठीक. तुझी जर तशीच इच्छा आहे तर तसेंच ह्मणेल. नंतर सखारामास सोडून पिशाच्च विचार करूं लागला कीं, याचे कुटुंबांत कोणाचें कोणास कोणतें देणें आहे ? तपास करतां करतां त्यास समजलें कीं, याचे वंशांत पिशाच्च आहे. हा त्याचा ऋणी आहे व तो याचेजवळ मागतंही आहे; परंतु त्यास वेताळमंत्रानें बंधन केलेलें असल्यामुळें त्याचा कांहीं उपाय चालत नसे. लगेच त्यानें निश्चय केला कीं, वेताळबंधनांतून त्या पिशाच्यास सोडवून ह्या गृहस्थास त्याच्या पीडेचा अनुभव घ्यावयास लावावयाचें. ताबडतोब निघून तो पिशाच्च वेताळाजवळ गेला. त्यास भेटून सर्व हकीगत सांगून त्या पिशाच्चास मोकळीक देण्याविषयीं त्यानें वेताळाची प्रार्थना केली. वेताळानें त्याची हकीगत ऐकून मोठ्या खुषीनें त्या दुसऱ्या पिशाच्चास मोकळीक दिली. एवढ्या तयारीस सरासरी चारपांच दिवस लागले. पिशाच्च वेताळबंधनापासून मुक्त झाला. त्यानें आपली एकाएकीं मोकळीक होण्याचें कारण समजून घेतलें व ताबडतोब सखारामाच्या मेहुण्याच्या अंगांत शिरून त्यास अतिशय चोप देण्यास व त्याचप्रमाणें आपलें भयंकर रूप दाखवून भीति दाखविण्यास सुरूवात केली. त्याच्या दुःखानें अतिशय गांजल्यामुळें तो गृहस्थ शेवटीं माणगांवीं शास्त्रीबुवांजवळ येऊन त्यांस शरण गेला. तेव्हां त्यास सखारामाचा पिशाच्च ह्मणाला, 'अरे! आतां तूं कां हें ढोंग करीत आहेस. आह्मीं तर जाणून बुजून ढोंगी. आतां तूं आपल्या हुशारीचा व शहाणपणाचा उपयोग कर व यांतून आपला मार्ग काढ.' असें ह्मणून नंतर त्या पिशाच्चानें पूर्वींची सर्व हकिगत शास्त्रीबुवांस सांगितली व ह्मणाला अशा दुष्टांचा पक्षपात धरून याजला यांतून सोडवूं नये.

याप्रमाणें पिशाच्चानें सांगितलेली हकिगत ऐकून शास्त्रीबुवा आश्चर्यचकित झाले. सखारामाचा मेहुणा ह्या दुःखा पासून मुक्त व्हावा ह्मणून त्याच्या घरचीं सर्व मनुष्यें शास्त्रीबुवांची प्रार्थना करूं लागलीं. शास्त्रीबुवा ह्मणाले, अशा प्रकारच्या गुन्हेगारास सोडविनां येणें मला शक्य नाहीं.

तुमची यांतून मुक्त होण्याची इच्छा असेल तर तुह्मीं देवाची सेवा करा व त्याजवळ आपल्या अपराधाची क्षमा मागा. ह्मणजे देव तुमचें कल्याण करील. शास्त्रीबुवांची आज्ञा प्रमाण मानून तो मेहुणा माणगांवीं जाऊन देवाची सेवा करूं लागला. त्याला पिशाच्यानें बहुत दिवस रोज रोज पीडा दिल्यामुळें तो अगदीं आसन्नमरणस्थितींत होता. त्याची ती दशा पाहून शास्त्रीबुवांस दया आली. शास्त्रीबुवांनी त्यास व सखारामास पिशाचपीडाविरहीत केलें. त्या दिवसापासून उभयतांचाही **नास्तिकपणा पार नाहींसा झाला.** ते जुन्या धर्ममतांचे पक्के कैवारी बनून शास्त्रीबुवांचेही पक्के शिष्य झाले.

सावंतवाडीकरांचे आग्रहावरून शास्त्रीबुवांनीं सावंतवाडीयेथें श्रीदत्त महाराजांच्या पादुकांची स्थापना करविली. पूजेचा वगैरे एकंदर विधि त्या लोकांस समजावुन दिला. ही गोष्ट साबळे उपनावांचा एक ब्राह्मण तेथें होता. त्याला नापसंत वाटल्यामुळें तो तेथें बसलेल्या लोकांत शास्त्रीबुवांबद्दल तिरस्कार दर्शविता झाला. शास्त्रीबुवांनीं आपल्यासंनिध बसलेल्या सर्व लोकांस कळविलें कीं, 'तुह्मीं यांत कांहींही बोलूं नये व या ब्राह्मणाचा तिरस्कारही पण करूं नये. कारण ब्राह्मणानें दिलेला आशिर्वाद जितका हितकारक असतो त्याचप्रमाणें विनाकारण केलेला त्याचा तिरस्कार अकल्याणकारक होतो. याप्रमाणें सर्वांस सांगितल्यामुळें कोणी कांहीं बोलले नाहींत. तो साबळे मात्र शास्त्रीबुवांवर यथेच्छ तोंडसुख घेऊन मनांत यथेच्छ आनंद अनुभवित घरीं निघून गेला. ( साधुपुरुषांत असा एक सर्वसाधारण नियम आढळतो की, आपला तिरस्कार करणाऱ्या मनुष्याचें अनिष्ट टाळावयाचें असल्यास ते त्याच्याशीं उत्तर प्रत्युत्तर करितात; परंतु त्यांनीं मुकाट्यानें तो तिरस्कार सहन केल्यास तिरस्कार करणारा आपल्या कृत्यांचें योग्य प्रायश्चित्त भोगल्यावांचून कधींही सुटावयाचा नाहीं. याकरितां प्रत्येकानें ईश्वरभक्तसाधुपुरुषांबरोबर मर्यादेनें अवश्य वागावें. ) शास्त्रीबुवांनीं त्यास कांहीं उत्तर दिलें नाहीं. पुढें त्या-

चेवर फारच आपत्ती आली. पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळण्याचीही मारामार पडली. शेवटीं तो कंटाळून सावंतवाडी सोडून उद्योगधंदा पाहण्याकरितां ह्मणून बार्शीस जाण्यास निघाला. वाटेंत अन्नापाण्यावांचून हाल हाल होऊन अकालीं मरण पावला. आपल्या भक्ताचा अपमान करणाऱ्याला देव अशा प्रकारें शासन करीत असतो.

श्रीदत्तमहाराजांचे उत्सवांत माणगांवीं लाखो मनुष्यें जमत असत, त्यावेळीं शास्त्रीबुवा वीसपंचवीस हजार मनुष्यांचा स्वयंपाक ब्राह्मणाकडून करवीत असत. त्याप्रमाणें एका वेळीं उत्साहाची पूर्व - तयारी चालली होती. इकडे शास्त्रीबुवांची काकी दुसऱ्या गांवीं आजारी असल्यामुळें तिच्या समाचारास सीतारामबुवा गेले. त्या आजारांत काकीस देवाज्ञा झाली. अशौच समजल्यास उत्सवाचें काम बंद पडेल ह्मणून सितारामबुवा माणगांवीं आले नाहींत व कोणासंही ही बातमी कळविली नाहीं. सुतकाची बातमी समजण्यापूर्वीं त्याचा दोप नाहीं असें शास्त्रवचन आहे.

**श्रीदत्तमहाराज**:—शास्त्रीबुवा ! तुह्मीं आह्मांस शिवूं नये. तें ऐकून शास्त्रीबुवा स्नान करून देवाजवळ गेले. पुन्हां आज्ञा झाली 'तुह्मीं अशुद्ध आहात शिवूं नये.' त्यामुळें शास्त्रीबुवा घाबरले व देवाची प्रार्थना करून न शिवण्याचें कारण विचारूं लागले.

**श्रीदत्तमहाराज**:-तुमची काकी परलोकवासी झाल्यामुळें तुह्मास आशौच आहे करितां तुह्मीं शिवूं नये. शेवटीं काकी मृत झाल्यानें उत्साह बंद झाला.

सावंतवाडीचे विष्णूपंत अणावकर वकील हे समंधाच्या साह्यानें कित्येकांना भूतबाधादिकांपासून मुक्त करीत असत. एकेवेळीं अणावकराचा मुलगा आजारी पडला--त्यानें शास्त्रीबुवांस विचारलें. या मुलाला काय उपाय करूं ? शास्त्रीबुवा ह्मणाले तुमच्या समंधास विचारा व तो सांगेल

तोंपणास ज्ञानावकर ह्मणाले, शास्त्रीबुवा, तो जेव्हां करितो तेव्हां मी शुद्धींत नसतों. तर मी कसा विचा[illegible] अणावकर [illegible] तुमचे शरीरांत त्याचा संचार होई[illegible]. पुढें एके दिवशीं [illegible]णावकराचे शरीरांत संचार झाला[illegible] आले. त्यां[illegible] तो समंध ह्मणाला, "शास्त्रीबुवा[illegible] सर्वांबरोबर [illegible] आसनावर बसणें उचित न[illegible] तपोबलाचा [illegible] होतो. हें शास्त्रीबुवांसही माहीत [illegible] योनींत [illegible] दरएक ब्राह्मण निरनिराळ्या स[illegible] त्यामुळें [illegible] त्यावेळीं ब्रह्मतेज असे. अलीकडे [illegible] यादशील [illegible] स्वैर वागूं लागल्यामुळें, [illegible] जहीन व [illegible] बनले आहेत." हें [illegible] शास्त्रीबुवांना सन्मानपूर्वक योग्य आसनावर बसवि[illegible] उभयतांचा पुढील प्रमाणें संवाद झाला.

**शास्त्रीबु[illegible]**—तुमच्या या दासाचा मुल[illegible] त्याला कोणता उ[illegible] करावा ह्मणजे तो बरा हो[illegible]

**समंधः**—ह्याला ग्रहहीं निष्ट असून त्यांची पीडा [illegible] पीडेचा प[illegible] सांगून रोग मुक्त करा[illegible]

**शास्त्रीबुवाः**—ह्या[illegible]वा जन्म कोणत्या लग्नीं [illegible]

**समंधः**—वाहवा! वनीव! शास्त्रीबुवा, आपण [illegible] करितांच [illegible]सें वाटतें. [illegible] असल्या[illegible] मी परिक्षा [illegible] हा मुलगा [illegible] अमक्या [illegible] [illegible] ग्रहदशा पहावी [illegible]

[illegible]

शरीरांत प्रवेश [illegible]बुवा ह्मणाले, [illegible] मी विचारीन! [illegible] शास्त्रीबुवा तेथें [illegible] आसन द्या. ते [illegible] कारण त्यायोगें [illegible]व्हां मी मनुष्य [illegible] आसनावर बसे. [illegible]सिष्ट वर्षे झालीं. [illegible]वर जितके उप[illegible]दिवस घालवीत [illegible] त्याला फसवून [illegible] होऊन [illegible] पुन: [illegible] यातून [illegible] श्राद्धादि कर्म [illegible]च्यांचा उद्धार हो[illegible] ह्याप्रमाणें आमचा [illegible]सी त्या पिशाचास [illegible]. तेव्हां पिशाचानें न[illegible] जमीन आपल्या देहे[illegible]स जाणार, त्याचे सा[illegible] त्या दिवसा पासून नैवेद्य अर्पण करू

**समंध**:—हें पंचां[illegible]च्या अंशांशाचें आहे. व ह्यामुलाचा जन्म येथें झाला [illegible] ह्या दोन ठिकाणांत पूर्वापर एक अंशाचें व दक्षिणोत्तर [illegible]चें अंतर आहे. करितां ह्या प[illegible]न अंश बरोबर [illegible]वे नाहींत. ह्यासाठीं मी सांग[illegible] त्याप्रमाणें अंश काढ[illegible].

ह्या प्रमाणें [illegible]लित ग्रहांचें न्यूनाधिकत्व काढवि[illegible]न बरोबर लग्न सिद्धकरून [illegible]दशा काढून त्या वरून ह्याला [illegible]परिहारक [illegible]मागण्या विष[illegible]च सांगितलें. हीं त्या समं[illegible] अतर्क्य

करवीत असत. [illegible] शास्त्रीबुवा आश्चर्यच[illegible] आणि होती. इकडे शा[illegible] आपल्या अंगीं अनेक उत्त[illegible] विद्या समाचारास सीतार[illegible]चा स्वीकार कां करावा लगला हें आपण अशौच समजल्यास[illegible]जे.

गांवीं आले नाहींत [illegible] न

बातमी समजण्यापू[illegible] पूर्वजांपैकीं एक मनुष्य [illegible]- मीं माझ्या [illegible] तयार केला होता. [illegible] दिवस त्यांत

**श्रीदत्तमहा**[illegible] काढून लावण्यासाठीं मी [illegible]जीं एक धोंडा शास्त्रीबुवा स्नान क[illegible] तो अचानक त्या गोवत्स[illegible] मर्मस्थानाला अशुद्ध आहांत [illegible] त्याचा प्राण घेतला. [illegible] मीं ही गोष्ट प्रार्थना करून न शि[illegible] कळविली नाहीं. शिव[illegible] पातकाबद्दल [illegible]त्तर यमकिंकरांनीं म[illegible]मलोकीं नेऊन

**श्रीदत्तमहारा**[illegible]. तेथें यमधर्मानें [illegible] "तूं मनुष्य आहे करितां तुह्मीं शि[illegible] केलें [illegible] त्यानें [illegible] त्याठिकाणीं [illegible] आहे. त्या हत्ये[illegible]ला भोगिलें

सावंतवाडीचे [illegible] किंवा पिशाच [illegible]जन्म घेणें हें कित्येकांना भूतबाधा[illegible]मान्य आहे [illegible] यम मुलगा आजारी पड[illegible]

[illegible]गा करूं ? शास्त्री[illegible]त्यास

आपणास ज्ञान राहणार नाहीं व त्या योनींत आप
त्यारूपी पातकांचा संचय वाढत जाईल. करितां
पिशाच्च योनी स्वीकारणें उत्कृष्ट आहे. कारण तींत
नवीन चांगलीं कर्मे करून पुण्य संपादण्याचें ज्ञान
णापर्यंत जाऊन मिळतां येतें. करितां ही दुसरी
आपण स्वीकारावी. असा विचार ठरवून मी यमध
त्ली. व त्याप्रमाणें यमधर्मानें तीच मला दिली.
ी हा पिशाच्च बनलों. ह्या योनींत प्राणी अधि
र्षें पर्यंत जगतात. मला ही योनी प्राप्त होऊन
व्हां पासून माझ्या दुष्कृत्या बद्दल पश्चात्ताप करी
ार करितां येतील तितके करण्याविषयीं झटत र
ाहें. पुढें माझ्या वंशांत एका पुरुषानें एका शूद्र
तली. त्यामुळें त्या जमिनीचा मालक मरण पा
ाझ्या वंशाचा नाश करूं लागला. मरतां मरतां हे दो
पिशाच्च त्या दोघांतून एकाला धरून त्याचा प्राण
व्हां मला वाटलें कीं, आतां माझ्या वंशाचा नाश
र मी वांचविलें नाहीं तर वंश खुंटेल. मृतपितरां
में बंद पडतील. व मला जास्त दु:खांत त
गितलीं आहेत तीं आमच्यासारख्या क्षुद्रयोनींच्या
ाकरितां. ह्मणून ह्या कृत्यांपासून प्रत्येकाची तृप्ति
ा आधार मनुष्य योनीवर अवलंबून आहे. अ
डविलें. व तूं ह्याचा प्राण कां घेतोस ह्मणून
ार्डानें घेतलेल्या जमिनीचें कारण सांगितलें
ाजांच्या स्वाधीन केल्यास आपण तुमच्या वंश
ं त्यानें माझ्याजवळ कबूल केलें. त्याचें मागण
ावरून मी ह्या शरीरांत प्रवेश केला व पि

योन नवीन ह-
स्वीकारण्यापेक्षां
...चें ज्ञान राहते,
... व त्यामुळें रुद्र
... पिशाच्च योनीच
... ही योनी मागि-
पिशाच्च हा ह्मणतांच
... दहा हजार
...ामष्ट वर्षें झालीं.
...वर जितके उप-
मी दिवस घालवीत
... त्याला फसवून
पिशाच्च होऊन
... पुन:
...ातून
...गेल. श्राद्धादि कर्मे
...ण्यांचा उद्धार हो-
ह्याप्रमाणें आमचा
...र मी त्या पिशाच्चास
... तेव्हां पिशाच्चानें न-
... जमीन आपल्या देहे
...देस जाणार नाहीं सा-
त्या दिवसा पासून
नैवेद्य अर्पण कर

ती जर्मन ज्याची ... ठविलें व त्याबद्दल ह्याचेकडून प्रायश्चित्त करविलें, तेव्हां हा भाऊ ... मुक्त झाला. व तेव्हांपासून मी ह्याचेजवळ राहून माझा वर काळविले ... सिद्धीस नेण्याची शक्य ती मेहनत करीत आहें. दैवयोगानें आपल्या ... तत्पुरुषाचें आज दर्शन झालें. आतां मी लवकर- सुखी होईन. याप्र... संबंधाची सर्व हकिगत ऐकून शास्त्रीबुवांस अत्यंत संतोष वाटे ... संबंधाची शास्त्रीबुवांवर प्रेमभावना बसून, ते केवळ श्रीदत्तात्रयावतार ... असें समजून तो त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागूं लागला. पुढें ... यांचा व शास्त्रीबुवांचा शास्त्रीय विषयांवर केवळ करमणुकीखातर सं... त असे. सदर्हू अणावकर अद्याप सावंतवाडी येथें आहेत.

एके वेळीं ... डीचे न्यायाधीश कोर्टातील अव्वल कारकून नारायणराव उ... कांहीं चांगलीं फळें घेऊन दर्शनास आले व तीं त्यांनीं शास्त्री... . शास्त्रीबुवा त्या फळांचा देवास नैवेद्य दाखवीत होते, इतक्या ... आंबट फळें खाऊं घालतोस ' असें देव बोलले. त्यावेळीं ... तीं फळें नैवेद्य न दाखवितां तशींच बाजूस ठेविलीं. शास्त्रीबुवांस ... त वाईट वाटलें. ते नारायणरावांस ह्मणाले, ... लेलीं फळें ... आहेत. ते ह्मणाले, मी हीं मुद्दाम मुंबईहून आणविलीं आहेत. ... आंबट असूं नयेत असें मला वाटतें. शास्त्रीबुवा ह्मणाले तुह्मीं ... नंतर नारायणरावांनीं तीं फळें चाखून पाहिलीं तेव्हां तीं खरोखर ... ट निघालीं त्यामुळें ते फार खजील झाले.

३. एकदां आ... गमेला देवाकरितां पुष्कळ पोहे आले होते, मध्यें घरांतूनही ... नुसते प्रोक्षण करून तयार केलेले पोहे ... शास्त्रीबु... देवास नैवेद्य दाखवूं लागले, त्यावेळीं " तूं कित्येकांना भूतबा... माझा गळा सोडूं पाहतोस काय ? " मुलगा आजारी ... न शास्त्रीबुवा ह्मणाले ! ' आज माझ्या ... फार ! ...

मातोश्रीनें नैवेद्य तयार करून दिला नाहीं. कारिलां हा प्रमाद मजकडून घडला. " हें ऐकताच देवानें मातोश्रीचा गळा सुजविला. त्यामुळें ती मोठ्यानें किंकाळी मारून बेशुद्ध होऊन पडली. हा प्रकार पाहून शास्त्रीबुवा घाबरले व देवास साष्टांगनमस्कार घालून मातोश्रीच्या अपराधाची क्षमा मागूं लागले.

## अपराधक्षमापनस्तोत्र.

रसज्ञावशा तारकं स्वादुलभ्यं ॥ गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ॥
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं ॥ क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥ १ ॥
वियोन्यंतरे दैवदाढ्याद्विभो प्राक् ॥ गृहीतं० ॥ क्षमस्वा० ॥ २ ॥
मया मातृगर्भस्थितीप्राप्तकष्टात् ॥ गृहीतं० ॥ क्षमस्वा० ॥ ३ ॥
मया जातमात्रेण संमोहितेन ॥ गृहीतं० ॥ क्षमस्वा० ॥ ४ ॥
मया क्रीडनासक्तचित्तेन बाल्ये ॥ गृहीतं० ॥ क्षमस्वा० ॥ ५ ॥
मया यौवनेऽज्ञानतो भोगतोषात् ॥ गृहीतं० ॥ क्षमस्वा० ॥ ६ ॥
मया स्थाविरे निघ्नसर्वेन्द्रियेण ॥ गृहीतं० ॥ क्षमस्वा० ॥ ७ ॥
हृषीकेश मे वाङ्मनःकायजातं ॥ हरे ज्ञानतोऽज्ञानतो विश्वसाक्षिन् ॥
क्षमस्वा० ॥ ८ ॥ स्मृतो ध्यात आवाहितोऽभ्यर्चितो वा ॥
न गीतः स्तुतो वंदितो वा न जप्तः ॥ क्षमस्वा० ॥ ९ ॥
दयाब्धिर्भवाद्दृङ्न सागाश्च माद्दृग्भवत्याप्तमन्तोर्भवान्मे शरण्यः ॥
यथाऽऽलम्बनं भूर्हि भूनिःसृताङ्घ्रेरिति प्रार्थितं दत्तशिष्येण सारम् १०

या प्रमाणें अपराधाची क्षमा होण्याबद्दल प्रार्थना करून साष्टांग नमस्कार घातला तेव्हां श्री दत्तमहाराज प्रसन्न होऊन ह्मणाले, " यथा देहे तथा देवे । ज्या योगानें आपल्या देहाला आनंद होतो, त्या त्याच साधनांनीं ईश्वरास [illegible] तरच तो प्रसन्न होतो. " त्या दिवसा पासून शास्त्रीबुवा स्वत[illegible]च्या पदार्थांचाच देवास नैवेद्य अर्पण करू

लागले. ह्यासाठीं प्रत्येक मनुष्यानें इश्वर आपला आत्मा आहे असें समजून पूजा नैवेद्यादि अर्पण करीत जावें.

ज्या प्रमाणें प्रत्येक मनुष्य स्त्रीपुत्रधनादिकांवर अनन्य प्रेम ठेवितो व त्यामुळें सर्वजणें एकमेकांविषयीं आनंद व प्रेम बाळगितात; त्याचप्रमाणें देवाशीं अनन्य भक्तिचें वर्तन ठेविल्यास तो प्रसन्न होऊन आपले मनोरथ पूर्ण करितो. या करितां प्रत्येकानें एकांत स्थळीं बसून, तनु व मन देवाच्या ठिकाणीं निश्चित करून ध्यान, पूजादि कृत्यें करावीं; त्या योगें देवाला व भक्ताला ही परमानंद प्राप्ती होते. ह्या करितां प्रत्येकानें अशा प्रकारें देवाची पूजा करण्याचा अभ्यास करावा.

एकेवेळीं शास्त्रीबुवा आपल्या मातोश्रीच्या अत्याग्रहावरून देवाची आज्ञा नसतां महाशिवरात्रीनिमित्त श्रीगोकर्णमहाबळेश्वराच्या दर्शनास जावयास निघाले. समागमें गावांतील पुष्कळ मंडळी होती. गांवाच्या सीमेबाहेर येतांच त्या गर्दीत एक साप घुसला. तो इतर कोणाच्या दृष्टीसही न पडतां थेट शास्त्रीबुवांच्या जवळ येऊन त्यांच्या पायास दंश करून निघून गेला. हें पाहतांच शास्त्रीबुवा पुढें जाण्याचा बेत रहित करून तत्काल मागें फिरले. व सत्वर वरीं मुक्कामाला आले. लगेच आत्मा ब्रह्मांडीं नेऊन ध्यानस्थ बसले. समाधी उतरतांच सर्पाचें वीष वाढून त्यांचा पाय सुजला. तें पाहून जमलेली मंडळी घाबरून विचारूं लागली, महाराज! आपणाला एकाएकीं असें काय झालें?

**शास्त्रीबुवाः—** मघाशीं आह्मी जात असतां गर्दीत एक [illegible]प घुसून त्यानें माझ्या पायाला दंश केला, ह्मणून मी गोकर्णास [illegible]केचें सोडुन गांवसीमेवरून तुह्मां सर्वांबरोबर परत आलो. तो सर्प [illegible] त्या सर्वांच्या नजरेस पडला नाहीं असें वाटतें.

हें ऐकून सर्व लोक घाबरले व ह्मणाले [illegible]ही त्या वेळीं

तेथें सर्प पाहिला नाहीं, पण आतां आपली आज्ञा होईल तर आम्ही सर्पाचें विष उतरणाऱ्या कोणा मांत्रीकास बोलावून आणितों.

**शास्त्रीबुवा**:—हे बाबानों! तुह्मी मला औषधोपचार करूं लागाल तर मात्र माझ्या वेदना वाढतील. या उप्पर तुमची सर्वांची इच्छा.

त्या लोकांनी शास्त्रीबुवांचें सांगणें मनावर न घेतां औषधोपचार सुरू केले. जसजसे उपाय अमलांत येऊं लागले तसतसा पाय जास्त जास्तच सुजूं लागला. शेवटीं तो इतका सुजला कीं, तो त्यांस मुळींच हालवितां येईना. शिवरात्रीचा उत्सव पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या दिवसावापासून त्या पायाची सूज हळू हळू कमी होत जाऊन पाय आपोआप पूर्ववत चांगला झाला. त्या दिवसापासून शास्त्रीबुवांच्या मातोश्रीनें त्यांच्या मर्जीविरुद्ध वागण्याचें अजिबात सोडून दिलें.

एके दिवशीं शास्त्रीबुवा अत्यंत श्रमी झाल्यामुळें आपला नित्यक्रम पूर्ण केल्या शिवाय विश्रांती घेण्यासाठीं झोंप घेण्यास गेले. श्रीगुरुदत्तात्रयमहाराजांस हें त्यांचें करणें न आवडून त्यांनी त्यांस निजलेल्या जागीं विंचवाकडून दंश करविला. दंश होतांच शास्त्रीबुवा आपल्या मनास ह्मणाले, हे मना! जा आतां नीज जा. श्रीदत्तमहाराजांनीं तुझे संरक्षण केलें आहे कारितां तूं त्यांचें नित्यकर्म करण्यास चुकूं नकोस. गीतेमध्यें भगवान् श्रीकृष्णानीं अर्जुनाला सांगितलें आहे कीं:—

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ॥**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ १ ॥**

असें ह्मणून ती संबंध रात्र भजनांत घालविली. नित्यने[illegible] मुळें मनास प्रमाद होतो, आणि ह्या जगांत प्रमाद हाच मृत्यु [illegible]

सावंतवाडी येथें बुधाजीपंत या नांवाचे सा[illegible]
एक गृहस्थ राहात होते, ते आजारी होऊन मृत झाले
देवीजवळ जाऊन तिच्या पायावर डोकें आपटिलें

होऊन पडली. अशा स्थितींत तिला देवीनें येऊन सांगितलें कीं, तू उगीच दुःख कां करितेस, तुझा मुलगा चांगला झाला आहे, हें देवीचें भाषण ऐकून ती आपल्या घरीं परत येण्यास निघाली. इकडे बुधाजी मरतांच त्याच्या घरची मंडळी आक्रोश करूं लागली. ती ओरडा ओरड ऐकून शेजारी दचकून जागे झाले. त्यांत बुधाजी नावांचाच एक शूद्र शेजारीं होता. तोही ती गडबड ऐकून जागा झाला व बायकोस विचारूं लागला, काय गडबड आहे? बुधाजी मेलाकींकाय? कोण रडतें? दिवा लाव पाहुं! असें बोलून तो गडबडीनें बाहेर जाण्यासाठीं दार उघडावयास जाऊं लागला. वाटेंत एक दगडी खांब होता. तो त्याच्या लक्षांत न राहून तो त्यावर आपटला व मोठ्यानें आरोळी मारून बेशुद्ध पडला आणि तेथेंच त्याचा प्राण निघून गेला. इतक्यांत त्याची बायको दिवा पेटवून घेऊन तेथें आली व पाहाते तों आपला नवरा मरण पावला. तेव्हां तिनें भयंकर आक्रोश करून तें घर दणाणून सोडिलें. इकडे तो मृत झालेला सारस्वत बुधाजी झोपेंतून मनुष्य जागा होतो त्याप्रमाणें महानिद्रेंतून आंग मुरडीत मुरडीत उठला व बोलूं लागला "माझें हृदय जवळच्या ह्या भयंकर देहधारी काळपुरुषांला पाहून फार कांपत आहे."

कांहीं वेळ गेल्यावर तो चांगला शुद्धींत आला व ह्मणाला आतांच मला भयंकर पुरूष मारझाण करीत एका अति भयंकर जागेंत घेऊन गेले. तेथें एक अक्राळविक्राळस्वरूपी पुरूष बसला होता, त्याच्या पुढें नेऊन एकाएकीं उभा केला. त्यावेळीं कपाळावर शेंदुराचा मळवट भरलेली, अलौकीक्षी अशी एक स्त्री तेथें आली व त्या बसलेल्या मनुष्यास ह्मणाली,

शास्त्राप्रमाणें— मृत्यु [illegible] संपलें नाहीं असें असतां, तुह्मीं याला येथें कां [illegible]

सून त्यानें माझ्या पांया [illegible] भाषण ऐकून तो वि[illegible] ळुहून त्या चौघांस झि-

डुन गांवसीमेवरून तु[illegible] तुह्मीं या बुधाजीला आणिला ही मोठी चूक केली.

नजरेस पडला नाहीं अ[illegible]ला त्याच्या मुळच्या जागीं पोहोंचवा, व याच्या शे-

हें ऐकून सर्व लोक [illegible]ला मजकडे घेऊन या. ह्याप्रमाणें त्या विक्राळ

पुरुषानें सांगण्याबरोबर त्या चौघानीं तावडतोब मला येथें आणून सोडिलें. त्या भयंकर पुरुषाचें भय अद्यापी माझ्या मनातून नाहींसें झालें नाहीं.

ही हकिगत संपल्यावर बुधाजीच्या आईनें, देवीनें सांगितलेली सर्व हकिगत जमलेल्या मंडळीस कळविली. ती ऐकून सर्वांस फारच आश्चर्य वाटलें. नंतर शूद्रबुधाजीच्या घरांत चाललेला आक्रोश ऐकून ती सर्व मंडळी तिकडे निघून गेली. ही घडून आलेली आश्चर्यकारक हकिगत ते सर्व लोक शास्त्रीबुवांस सांगून असें कसें झालें ह्या बद्दल त्यांस विचारूं लागले.

**शास्त्रीबुवा**:— असल्या चुका यमराजाकडूनही होत असतात. ह्याबद्दल शास्त्रांचीं अनेक प्रमाणें आहेत. यमानें मांडव्यऋषीला शूळावर दिलें होतें त्या वेळीं मांडव्यऋषींनीं यमाला शाप दिला कीं, तूं प्रमाद केलास, याबद्दल मृत्युलोकीं दासीपुत्र होशील. पुढें तोच यम दासीपुत्र विदूर झाला.

शरीर आहे तोंपावेतों अज्ञानत्वही आहे असें सिद्ध होतें व ह्मणूनच सर्वव्यापी सर्वज्ञ असा एक इश्वर आहे असें मानिलें जातें.

वर वर्णिलेल्या बुधाजीनें यमलोकीं जाऊन आल्यावर तेथें आपणावर आलेल्या संकटांची हकिगत सांगितली. तेव्हां त्यावरून नचिकेताऋषींनीं यमलोकीं जाऊन, यमाजवळ राहून, अग्निविद्या व ब्रह्मविद्या शिकून आल्यावर, तेथें जाणाऱ्या लोकांवर कोणकोणतीं दुःखें कसकशीं कोसळतात व त्यांतून आपल्या माणसांला कसें सोडवितां येईल, ह्याबद्दलचें वर्णन केलें आहे तें किती संभवनीय आहे, ह्याबद्दल वाचकानींच कल्पना करावी; आणि पूर्वजांच्या उद्धाराचे श्राद्धादि विधि करणें किती जरूरीचें आहे हें ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें अवश्य आचरण करावें.

## प्रत्यक्ष दत्तमूर्तीची प्राप्ती.

एकदां सावंतवाडीहून एक सोनार शास्त्रीबुवांचें दर्शन घेण्याकारितां

माणगावीं आला. तो वेदोक्त कर्म करीत असे. त्याला श्रद्धाळू पाहून शास्त्रीबुवांनीं सांगितलें, " कलियुगांत ब्राह्मणाशिवाय इतरांनीं वेदोक्त कर्म करूं नये असें आहे. ह्याकरितां तूं तसें करूं नकोस. केलेंस तर तुला पाप लागेल, आणि तूं माझें सांगणें ऐकलें नाहींस तर मागाहून पश्चात्ताप करावा लागेल. "

त्या सोनारानें शास्त्रीबुवांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करून आपला वेदोक्त कर्म करण्याचा क्रम तसाच पुढें चालु ठेविला. दोनतीन दिवस लोटल्यावर एक दिवशीं त्या सोनारावर दुसऱ्याचा चोरीचा माल घरांत ठेवल्याचा आरोप येऊन, शिपाई त्यास पकडून कोतवालाकडे घेऊन जाऊं लागले. त्यावेळीं त्या सोनारास शास्त्रीबुवांच्या वचनाची आठवण झाली. व तो शिपायांस कांहीं द्रव्य देण्याचें ठरवून, " आपणास श्रीदत्तमंदिरांत नेऊन शास्त्रीबुवांचें दर्शन करवा व मग मला वाटेल तिकडे न्या " अशी विणवणी करूं लागला. त्यावरून शिपायांस दया येऊन त्यांनीं त्यास श्रीदत्त मंदिराजवळ शास्त्रीबुवांसमोर नेलें, तेव्हां तो डोळ्यांत आसवें आणून दीन वाणीनें त्यांच्या जवळ आपल्या अपराधाची क्षमा मागूं लागला.

**शास्त्रीबुवा**:— तुला आपल्या अयोग्य वर्तनाबद्दल पश्चात्ताप झाला आहे याकरितां तुझ्यावर देवाची कृपाच होईल.

ह्याप्रमाणें महाराजांचें वचन ऐकतांच तो आनंदानें शिपायांबरोबर गेला. पुढें कचेरींत गेल्यावर त्यास जामिनावर मोकळें केलें. तो सुटल्यावर कोल्हापुरास जाऊन राहिला. तेथें त्यानें श्रीदत्ताची, आणि राम, कृष्ण इत्यादि अवतारांच्या मूर्ति तयार केल्या व एकदिवस त्या घेऊन शास्त्रीबुवांकडे आला.

**सोनार**:— मीं आपल्यासाठीं मूर्ति तयार करून आणिल्या आहेत. ह्यापैकीं ज्या आपणांस पसत असतील त्या ठेवाव्या.

शास्त्रीबुवांनीं सोनारास मूर्ति ठेवण्याबद्दल नकारात्मक उत्तर दिलें.

**श्रीदत्तभगवान**:— तूं त्या मूर्तीतून माझी मूर्ति ठेवून घे व ती प्रवासांत बरोबर बाळग.

**शास्त्रीबुवा**:—आपण मला प्रवास करावयास सांगतां तर प्रवासांत मजकडून यथायोग्य पूजा कशी घडेल?

**श्रीदत्तमहाराज**:— तूं स्नान करून भस्म लावतोस तसेंच मला स्नान घालून भस्म लावीत जा म्हणजे झालें. उपचारांची जरूर नाहीं.

ह्याप्रमाणें श्रीदत्तमहाराजांची आज्ञा होतांच शास्त्रीबुवांनीं श्रीदत्ताची मूर्ति ठेवून घेतली. शास्त्रीबुवांच्या कृपेनें तो सोनार त्या संकटांतून मोकळा झाला व पुढें पुराणोक्त कर्म करूं लागला.

हल्लीं नरसोबाचे वाडींत मिराबाईप्रमाणें ईश्वरभक्तिपरायण अशा दुर्गाबाई ह्या नांवाच्या एक प्रख्यात बाई आहेत. त्यांचे भाऊ विनायक भट्ट कोनकर या नांवाचे इसम माणगावीं राहात असून ते शास्त्रीबुवांचे चुलत-मामा लागत असत. त्यांना एक मुलगा झाला. तो दीड वर्षाचा होतांच एकाएकीं आजारी पडून अत्यावस्थ झाला. तेव्हां त्या मुलाचे वडील त्याची जन्मपत्रिका घेऊन शास्त्रीबुवांपाशीं आले. त्यांला पाहतांच शास्त्रीबुवा म्हणाले, ' त्याला कांहींच होणार नाहीं. ' तेव्हां त्या मुलाचे वडील निघून गेले. पुढें दैववशात तो मुलगा मरण पावला. त्याला अग्निसंस्कार करण्या-साठीं गांवांतील सर्व लोक जमा झाले व उत्तरविधी करितां त्या मुलाचें प्रेत आणावयास गेले. तेव्हां तें त्याची आई व आजी देईनात. लोकांनीं ' प्रेत कां नेऊं देत नाहींत ' असें त्यांस विचारिलें. तेव्हां त्या दोघी म्हणाल्या शास्त्रीबुवा हे श्रीदत्तावतारी असून त्यांनीं मुलगा मरावयाचा नाहीं म्हणून सांगितलें आहे. तेव्हां त्यांला विचारिल्याशिवाय आम्हांला हें प्रेत देतां यावयाचें नाहीं. हें ऐकून लोकांनीं शास्त्रीबुवांस त्याठिकाणीं बो-लावून आणिलें.

**शास्त्रीबुवा**:—ह्या बालकाचा अंत होऊन फार वेळ झाला. तर

आतां तुह्मी याला ह्या लोकांच्या स्वाधीन करा. तुह्मी त्या प्रेतास घेऊन बारा दिवस पर्यंत जरी बसलां व अतिशय शोक केला तरी तें जीवंत होणें शक्य नाहीं. तें बालक तुह्मांला पाहून रडत नाहीं तर तुह्मी तरी त्याच्या करितां कां व्यर्थ शोक करितां? सर्व जगाची रहाटी दैवाधीन आहे. त्या दैवामुळेंच पूर्व ऋणानुबंधाप्रमाणें प्राणी कोणाच्या तरी घरीं जन्माला येतो व ऋणानुबंध संपला कीं त्या सर्वांला सोडून जातो. हें सर्व मनुष्यें प्रत्यक्ष डोळ्यांनीं अवलोकन करीत असूनही एक दुसऱ्याच्या प्रेमाला वश होऊन शेवटीं दुःखांत निमग्न होत आहेच. आणखी ह्यांत आश्चर्य करण्याजोगें हें आहे कीं, प्रत्येकजण दुसऱ्याला मरतांना पाहत असूनही हा जीवंत राहण्याची इच्छा करीत असतो. ह्यासारखें आणखी दुसरें अज्ञान तें कोणतें असणार! जी वस्तु उत्पन्न झाली तिचा केव्हांना केव्हां तरी नाश खचीत होणारच. तरी ही जगाची रहाटी लक्षांत आणून तुह्मी शोक करण्याचें सोडून द्या व प्रेत पुढील संस्कारासाठीं लोकांचे स्वाधीन करा.

**आजीबाई**:—श्रीबुवा! आपण केवळ श्रीदत्ताचे अवतार आहांत, तेव्हां आपण सांगितलेलें वचन केव्हां ही मिथ्य होणार नाहीं. ज्याप्रमाणें आपण पूर्वावतारीं ब्राह्मणाला, ब्राह्मणाच्या मुलाला व ब्राह्मणपत्नीला तीं मृत झालीं असतां जीवंत करून आपलें ह्मणणें खरें करून दाखविलें. त्याचप्रमाणें ह्या प्रसंगीं ह्या मुलाला जीवदान देऊन आपलें वाक्य सत्य करून दाखवावें. अशी माझी दीन दासीची आपणाला नम्र विनंती आहे.

**शास्त्रीबुवा**:—मामी! हें बालक मरणार नाहीं असें मीं सांगितलें होतें खरें परंतु तें ज्योतीषशास्त्राच्या आधारानें सांगितलें होतें, तथापि तें मृतच झालें आहे तर तें नेऊं द्या. असा अनेक प्रकारांनीं शास्त्रीबुवांनीं त्या बायांस बोध केला, पण त्यांनीं आपला निश्चय सोडिला नाहीं. शेवटीं शास्त्रीबुवांनीं श्रीदत्तमहाराजांस हस्त जोडून त्यांची प्रार्थना केली व त्या बालकास अमृतदृष्टीनें अवलोकन केलें. त्याबरोबर त्या बालकाचा श्वा-

सोच्छ्वास सुरू झाला. कांहीं वेळानें तें चांगलें सावध होऊन आपल्या मातेचें स्तनपान करूं लागलें.

हा अद्‌भूत चमत्कार पाहून तेथें जमलेले एकंदर लोक आश्चर्यचकीत झाले व शास्त्रीबुवांस नमस्कार करून, शास्त्रीबुवांचे सर्वचमत्कार श्रीपादश्रीवल्लभश्रीनरसिंहसरस्वती ह्यांच्या अद्‌भूत चमत्कारांसारखे आहेत आणि ते प्रत्यक्ष श्रीदत्तात्रयाचे अवतार आहेत असें आपआपसांत बोलत निघून गेले. वरील मुलगा आजतागायत जीवंत आहे; याला शांतारामभट्ट कोनकर असें ह्मणतात.

शके १८० ६मध्यें चैत्र शुद्ध पौर्णिमेदिवशीं ग्रस्तमुक्तोदित ( ग्रहण लागून सुटल्यावर बिंब उदय पावणारें ) चंद्रग्रहण व्हावयाचें आहे असें सर्व ज्योतिषांनीं पंचांगांत भविष्य वर्तविलें होतें. अर्थात तें ग्रहण दिसावयाचें नाहीं अशी सर्व ज्योतिषांची समजूत होती. शास्त्रीबुवा नित्य कर्म आटोपून भिक्षेसाठीं निघण्याच्या तयारींत होते, हें सर्व ईश्वराच्या लक्षांत येऊन त्यांनीं शास्त्रीबुवांच्या कानांत मोठ्यानें आवाज केला कीं, " आजचें ग्रहण दिसणार असून वेधही ह्यापूर्वींच सुरू झाला. करितां आज भिक्षा आणूं नको व नैवेद्यही दाखवावयाचा नाहीं. "

नंतर शास्त्रीबुवांनीं आज ग्रहण दिसणार आहे करितां सर्वांनीं उपास करावा असें सांगितलें. हें ऐकून ज्योतिर्विदांला बरें वाटलें नाहीं. संध्याकाळीं ग्रहण सर्वांला दिसलें. त्यामुळें ज्योतिर्विदांचीं वदनें म्लान झालीं.

शास्त्रीबुवा ह्मणाले सद्‌गृहस्थहो ! तुह्मीं वर्तविलेलें ग्रहणासंबंधाचें ज्योतीष बरोबर होतें, परंतु ग्रहांच्या गतींत आज फेरफार झाल्यानें असें झालें; त्यांत तुमचा कांहीं दोष नाहीं. हें ऐकून जोशी मंडळीचें समाधान झालें.

एकेवेळी निवडक विद्वान् विद्वान् मंडळी शास्त्रीबुवांकडे जमा झाली व त्यांनीं प्रश्न केला कीं, कित्येक लोक अत्यंत श्रद्धापूर्वक सत्पुरुषांस शरण जातात; त्यांची मनोभावें सेवा करितात; त्यांच्या उपदेशाप्रमाणें व शास्त्राधाराप्रमाणें वागतात; यथाविधि नित्य नैमित्तीक कर्माचरण व उपासना

कारितात; असें म्हणूनही शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें फलश्रुति त्यांला प्राप्त होत नाहीं असा अनुभव येतो, तरी ह्याचें कारण काय असावें? तें आपण कृपाकरून आह्मांला सांगावें.

शास्त्रीबुवा ह्मणाले, सद्गुरूच्या आज्ञेप्रमाणें यथाविधी कर्म केल्यानें शास्त्रोक्त फळ मिळालेंच पाहिजे. कदाचित् कोणाला पूर्वजन्मांचें प्रारब्ध आड आलें व त्यामुळें ह्या जन्मीं केलेल्या कर्मांचें फळ मिळालें नाहीं, तरी पुढील जन्मीं आयासावांचून त्याला त्याचें फळ मिळतें. परंतु केलेलें कर्म केव्हांही व्यर्थ जात नाहीं. ह्याचें एक ताजें घडून आलेलें उदाहरण मी तुह्मास सांगतो.

## सोहिरोबा आंब्ये यांची कथा.

कांहीं दिवसांपूर्वीं सोहिरोबा आंब्ये ह्या नावांचे एक सारस्वत ज्ञातीचे गृहस्थ सावंतवाडीनजीक बांदें येथें राहात होते; ते संस्थानांत वसुलातीचें काम करीत असत. पूर्वजन्मकृत संस्कारामुळें त्यांच्या आगीं कित्येक उत्तम गुण वसत होते. एकदां वसूल जमा करून तिजोरींत भरणा करण्याकारितां तो पैसा चाकरी करणाऱ्या महाराजवळ देऊन त्यानीं सावंतवाडी येथें पाठविला. वाटेंत कांहीं भामट्यालोकानीं भामटेगिरीं करून त्या महाराला फसवून तो पैसा उपटून घेतला व नुसते कागद मात्र कचेरींत रवाना केले. ते कागद तिजोरीच्या कारकुनाचे हातीं जातांच त्यानें विचारिलें 'ह्या कागदांबरोबर तुमच्याकडे पैसा पाठविला होता तो कोठें आहे?

**महार**:—अहो मायबाप! अधिकाऱ्यानीं आमचेजवळ पैसा दिला नाहीं, त्यानीं जें आमच्याकडे दिलें तें आणून मी आपल्या स्वाधीन केलें. ह्याशिवाय त्यांनीं मला कांहीं सांगितलेंही नाहीं व माहितही नाहीं.

हें त्याचें भाषण ऐकून घेऊन कारकुनानें ती सर्व हकिगत तावड-

तीव्र कारभाऱ्यांस कळविली. कारभाऱ्यांनीं सोहिरोबास पकडून आणविलें. व हा प्रकार काय आहे ? असें त्यांस विचारिलें. त्यावेळीं सोहिरोबा ह्मणाले मी ह्या लोकांला पैसे मोजून दिले होते, पुढें रस्त्यांत त्या पैशांचें काय झालें हें मला माहीत नाहीं. हें ऐकून सोहिरोबा बरोबर दाद लागूं देत नाहींत असें कारभाऱ्यांस वाटलें. त्यांनीं त्यांस तावडतोब पोलीसच्या स्वाधीन केलें. पोलीसांनीं सोहिरोबास एकांत खोलींत नेलें आणि अनेक प्रकारें समजुती देऊन तो कबूल झाल्यास पहावें असा विचार ते करिताहेत, तोंच सोहिरोबानें विचार केला कीं, अशा हलकट लोकांकडून छळ करून घेण्यापेक्षां आपलें घरदार विकून सरकारी पैसा जमा करावा हें सर्वांत चांगलें. कारण अधिकाऱ्यांच्या आंगीं कांहीं बुद्धी ह्मणून असती तर त्यांनीं मजवर मुळीं अशी शंकाच घेतली नसती! असो, ईश्वराची मर्जी व आपलें नशीब असें ह्मणून पैसे भरावे व नोकरी सोडून मोकळें व्हावें.

सोहिरोबाः— तुह्मी मला त्रास देण्याचे भरीस विनाकारण कशाला पडतां. मीच चोर आहें असें तुह्मांस वाटत असेल तर मी ते सर्व पैसे देऊन टांकितों.

हें सोहिरोबाचें सांगणें ऐकून शिपायांनीं त्यांस आपल्या वरिष्ठांकडे नेलें. तेथें पैसा जमा करण्याबद्दल त्यांचे कडून लिहून घेऊन वरिष्ठांनीं त्यांस जामिनावर मोकळें केलें.

ही सर्व हकिगत सोहिरोबांच्या मित्रमंडळींस समजली. त्यांनीं त्याला मसलत दिली कीं, अशा खोट्या रितीनें पैसा भरणें चांगलें नाहीं. ह्यासाठीं तुह्मीं खुद्द श्रीमंतसरकारमहाराजांला जाऊन भेटा व ही सर्व हकिगत त्यांना कळवा. आह्मी तुह्मांला एका सद्गृहस्थाची चिठ्ठी देववितों, ह्मणजे तुह्मांला भेट होण्यास हरकत पडणार नाहीं. नंतर सोहिरोबा व त्यांचे एकदोन जिवलग स्नेही, त्या चिठ्ठी देणाऱ्या सद्गृहस्थाजवळ गेले व त्यांजकडून चिठ्ठी घेऊन महाराजांस भेटण्याकरितां परत फिरले. महाराजांच्या भेटीस रिकाम्या हातांनीं जाण्यापेक्षां कांहीं तरी योग्य वस्तु घेऊन जावें असा सोहिरोबांनीं

विचार करून, कांहीं चांगलीं फळें शोधून खरेदी केलीं व ते सावंतवाडीकडे यावयास निघाले. वाटेंत अतिशय उन्हानें थकल्यामुळें विश्रांतीसाठीं एका ओढ्यावर झाडाच्या छायेला कांहीं वेळ ते बसले; त्या एकांत स्थळांत मनाला स्वस्थता असल्यामुळें ते आपल्या प्रारब्धाचा विचार करीत व ओढवलेल्या संकटाबद्दल पश्चात्ताप करीत आहेत, इतक्यांत तेथें एक दिगंबर मूर्ति साधुपुरुष येऊन उभे राहिले.

**दिगंबर**:—बच्चा! हमकू भूक तो बहोत लगी है. तुमारे पास खाना है तो हमकूं दिलाव. सोहिरोबांनीं हें त्या सत्पुरुषाचें भाषण ऐकून, महाराजांच्या भेटीकरितां म्हणून बरोबर आणिलेलीं सर्व फळें त्यांच्या पुढें ठेविलीं. त्यांनीं तीं सर्व फळें भक्षण करून ते तृप्त झाले व म्हणाले 'बच्चा! पानी पिलाव' हें ऐकून सोहिरोबा तावडतोब उठले व त्यांनीं पाणी आणून त्यांच्या पुढयांत ठेविलें. तें प्राशन करून दिगंबरबुवा परम संतुष्ट झाले व म्हणाले, "क्यूं बच्चा! तुमतो बहोत उपाधीमें रहनेका मान दिखता हूं. उसकारण बुलाव." असें म्हणून त्यांनीं सोहिरोबाचें मस्तक आपल्या दोन्ही हातांनीं धरून तें नारळासारखें पांच पन्नास वेळां हालविलें व आपण तत्काळ तेथून निघून गेले. इकडे सोहिरोबांची समाधी लागून गेली.

रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या मनुष्यांनीं गावांत जाऊन, सोहिरोबा अमूक ठिकाणीं काष्ठवत बसले आहेत, ते मुळींच हालचाल करीत नाहींत अशी बातमी लोकांला दिली. त्यावरून गांवांतील सर्वलोक तेथें त्यांला पाहण्याकरितां जमा झाले. हळूहळू ही बातमी सावंतवाडीचे अधिपति सरकार महाराज यांच्या कानावर गेली. तेव्हां ते कारभाऱ्यांस समागमें घेऊन सोहिरोबा होते त्या ठिकाणी येऊन दाखल झाले आणि सोहिरोबांची समाधी लागलेली पाहून म्हणाले, कारभारी! 'आपल्या संस्थानांत असे योगीपुरुष असतांनां त्याबद्दल तुम्हीं कळविलें नाहीं.' हें ऐकून कारभारी म्हणाले, महाराज! आम्हांला ह्याबाबतींत कांहींच माहिती नाहीं. ह्या सोहिरोबांवर चोरीचा आरोप आलेला आहे एवढें मात्र मला माहीत आहे. महाराज म्हणाले, अशा प्रकारचे साधुपुरुष चोरी करतील, असें तुम्हांला वाटतें काय? आम्हां-

ला तर ह्यांच्याबद्दल संशय सुद्धां येणार नाहीं.

हें महाराजांचें भाषण ऐकून सर्वलोक लजील झाले. महाराजांनी तंबू वगैरे आणवून त्यांची व्यवस्था लावून दिली व आपल्या लोकांस तेथें ठेवून "सोहिरोबा समाधींतून उठतांच मला जरूर येऊन कळवा." असें सांगून आपण सावंतवाडी मुक्कामीं आले.

तिसऱ्या दिवशीं सोहिरोबा समाधींतून उठले व 'हे श्रीगुरुमहाराज! गेबीनाथ! आपण मला सोडून कोठें निघून गेलां? गेबीनाथमहाराज हे माझे पूर्वजन्मींचे गुरु होत. त्यांनीं आज मला ह्या आनंद समुद्रांत बुडविलें व आपण निघून गेले.' असें ह्मणून रडूं लागले.

इकडे राजाच्या आज्ञेप्रमाणें कारभारीसाहेबानीं महाराजांस सोहिरोबा समाधींतून उठल्याचें सांगून पाठविलें, तेह्मां महाराज तावडतोब तेथें आले व सोहिरोबांस साष्टांग नमस्कार करून त्यांला सावंतवाडीस येण्याविषयीं विनंती करूं लागले. त्यांनीं आपली गांवांत येण्याची इच्छा नाहीं असें कळविलें. शेवटीं गांवांतील सर्वलोकांचा अत्याग्रह दिसल्यावरून सोहिरोबा सावंतवाडीला गेले.

कांहीं दिवस लोटल्यावर सोहिरोबांनीं आपल्या विधवा असलेल्या सुनेस सांगितलें कीं, मला आतां येथें रहावयाचें नाहीं, तेह्मां तुला काय पाहिजे आहे तें सांग? सूनबाई ह्मणाल्या 'मामंजी'! आपला नातू अंध आहे त्याला दृष्टी द्यावी. नंतर सोहिरोबांनीं नातवाकडे अमृतदृष्टीनें पाहतांच त्याचें अंधत्व जाऊन त्याला चांगलें दिसूं लागलें.

कांहीं दिवस गेल्यानंतर सोहिरोबा कोणास न विचारतां, एकदम घरांतून निघून उत्तरदिशेस चालते झाले. ते कांहींसे पुढें गेले इतक्यांत त्यांस त्यांच्या एका विधवा बहिणीनें पाहिलें व तीही त्यांच्यामागून जाण्यास निघाली, ती उभयतां हरिद्वारपर्यंत गेलीं. तेथून सोहिरोबा हिमालयाकडे निघाले व त्यांच्या आज्ञेवरून बहीण मागें फिरून सावंतवाडीला आली. ही हकिगत नुकतीच घडून आली आहे व ती बहुश्रुतही आहे.

सो. हिरोबांनी अनेक उत्तम अभंग केले आहेत व ते लोकांच्या ह्मणण्यांतही येत असतात. ह्याप्रमाणें केलेल्या कर्माचें फळ वेळ आली ह्मणजे प्राप्त होतें; तें कोणालाही मिळाल्यावांनच राहत नाहीं. गीतेमध्यें असेंच सांगितलें आहे.:—

**मनुष्याणां सहस्रेषु । कश्चिद्यतति सिद्धये ॥**
**यततामपि सिद्धानां । कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ १ ॥**

हे बाबानों! मनुष्यानें ईश्वरप्राप्तीसाठीं केलेले परिश्रम केव्हांही व्यर्थ होत नाहींत. ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्य आपला फायदा व्हावा ह्या इच्छेनें सोडतीमध्यें पैसा घालितो, त्याचप्रमाणें ईश्वरप्राप्तीसाठीं सायास करून ती प्राप्ती करून घ्यावी. पुष्कळ वेळां सोडतीमध्यें फायदा न होतां घालेला पैसा मात्र जातो तसें ईश्वरप्राप्तीचे परिश्रम मात्र फुकट जात नाहींत. केव्हांना केव्हांतरी त्यांचें फळ अचानक प्राप्त होतें. ह्यासाठीं प्रत्येकानें आपआपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें कर्म करून ईश्वरप्राप्ती करितां झटत असावें.

ह्याप्रमाणें लीलेंत सात वर्षे पुरीं होतांच श्रीदत्तमहाराजांनीं शास्त्रीबुवांस आज्ञा केली कीं, हे भक्तराजा! आतां तुह्मी तीर्थयात्रानिमित्तानें शरणागतलोकांस सदुपदेश करावा, त्यांला वर्णाश्रमाच्या मार्गाला लावावें व भवबंधांतून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावा. ह्याप्रमाणें तुह्मी परोपकार करूं लागल्यावर तुमचा अहंभाव नाहींसा होऊन माझ्या अद्वैत स्वरूपाचा तुह्मांला अनुभव येईल, आणि जीवन्मुक्ति सुखाचा लाभ होऊन शेवटीं विदेह मुक्तीची प्राप्ती होईल. हें सुख बाह्यप्रपंचाचा त्याग केल्याशिवाय प्राप्त होणार नाहीं; ह्याकरितां संसारउपाधी टाकून येथील संस्थानासाठीं दररोजच्या पूजा नैवेद्याचा बंदोबस्त करून माझी मूर्ति समागमें घेऊन प्रथम तुह्मी नरसोबाचेवाडीस जावें.

ह्याप्रमाणें श्रीगुरुमहाराजांचें वचन ऐकून, शास्त्रीबुवा देवाच्या पूजा, नैवेद्याबद्दल बंदोबस्त ठेवण्याविषयीं भक्तमंडळीला सांगण्याचा विचार

करीत आहेत, इतक्यांत सावंतवाडीकर नारायण डाकिडवे ह्मणाले महाराज! आपण आजपर्यंत कोणत्याही कामाबद्दल कोणालाही काहीं सांगितलें नाहीं व ह्यावेळीं सांगाल तर नास्तीक लोकांला कुचेष्टा करण्याला संधी सांपडेल. हें ऐकून शास्त्रीबुवा ह्मणाले बरें. तुह्मी जाणा अगर तुमचे देव जाणो. असें झाल्यामुळें त्या संस्थानची अव्यवस्था तूर्त चालू आहे. तरी ती दूर करण्याचें सर्व भक्तमंडळीनें मनावर घेतलें पाहिजे.

शास्त्रीबुवा तेथून निघून गेल्यावर ईश्वरानें नारायणराव डाकिडवे व शंकरभट्ट सते ह्यांस स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, तुह्मीं ह्या संस्थानची व्यवस्था ठेवावी. परंतु तेथील व्यवस्था नीट चालू आहे असें दिसत नाहीं.

शास्त्रीबुवा तीर्थयात्रा करण्याला आज्ञा मागण्यासाठीं आपल्या मातोश्रीकडे गेले व तिला साष्टांगनमस्कार करून ह्मणाले, मला तीर्थयात्रेला जावयाचें आहे तरी आपली आज्ञा व्हावी. हें ऐकतांच मातोश्री शोकाकुल झाल्या व एकाएकीं मूर्च्छित होऊन जमिनीवर पडल्या. हें पाहून शास्त्रीबुवानी त्यांला सावध करून उठविलें व ह्मणाले आई! आपण विनाकारण कां शोक करितां? हा सर्व संसार दैवाधीन आहे. हें आपण जाणत अहां; तेव्हां दुःख करण्याचें सोडून देऊन आपली इच्छा काय आहे ती सांगा.

रमाबाई ह्मणाल्या, बाळा! माझ्या मनाची शांती कर. माझ्या घरीं श्रीदत्तभगवानानीं जन्म घेऊन आजपर्यंत मला जो आनंद दिला तोच पुढें कायम असूंद्या. हे कुलदीपका! तुजवरचें पुत्रप्रेम कसें बरें तुला दूर घालवू शकेल? हें ऐकून शास्त्रीबुवांनी विचार केला कीं, ह्यांनां मायापाशांतून सोडविण्यासाठीं ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला पाहिजे. दुसरा उपाय नाहीं असा निश्चय करून ते ह्मणाले, हे मातोश्री! ह्या संसारांत राहून मनुष्यास ईश्वरपद कसें प्राप्त करून घेतां येईल ह्याविषयीं श्रीदत्तमहाराजांनीं यदुराजाला जो उपदेश केला आहे तो मी आपल्याला सांगतों. आपण लक्षपूर्वक श्रवण करावा.

# यदुराजाची कथा.

एकेवेळीं देव व दैत्य यांचें युद्ध सुरू झालें. दैत्यांचे गुरु शुक्राचार्य त्यांच्याजवळ मृतसंजिवनीविद्या असल्यामुळे दैत्यांचा विजय झाला. हें पाहून बृहस्पतीनामक देवगुरुनें आपला पुत्र कच यास आज्ञा केली कीं, तूं शुक्राचार्याकडे जा आणि मृतसंजीवनीविद्या शिकून ये. तरच तूं माझा पुत्र होय?

**कचः**— बाबा! आपला आशिर्वाद असेल तर शुक्राचार्यांना प्रसन्न करून घेऊन मी विद्या शिकून येतों.

याप्रमाणें बोलून तो शुक्राचार्यांजवळ जाऊन, समिधाफलादि देऊन, त्यांच्या उजव्या चरणावर उजवा हस्त व डाव्या चरणावर डावा हस्त ठेवून त्यानें त्यांस साष्टांग नमस्कार केला, आणि हात जोडून समीपभागीं उभा राहिला.

**शुक्राचार्यः**— तूं कोण? व तूं कोणत्या उद्देशानें येथें आला आहेस?

**कचः**— मी बृहस्पतीचा पुत्र कच आहें व आपल्याजवळ शास्त्र शिकण्याच्या हेतूनें आलों आहें.

कचाचें भाषण ऐकून शुक्राचार्य समजले कीं, हा कच मृतसंजीवनीविद्या संपादन करण्याकरितां आला आहे परंतु याचा अधिकार पाहिल्या शिवाय याला विद्या देणें योग्य नाहीं; असा विचार करून ते कचास ह्मणाले, हे शिष्या! तूं दररोज गाई सोडून रानांत चरावयास नेत जा. येते वेळीं समिधा, फुलें, फळें इत्यादि पूजा साहित्य घेऊन ये. पुढें गुर्वाज्ञेप्रमाणें कचानें नित्यक्रम चालविला. रोज प्रातःकाळीं गुरूंच्या पूर्वीं उठून त्यांची शौच, मुखमार्जन, स्नान संध्या, देवपूजा इत्यादि कृत्यांची नीट व्यवस्था लावून आपण गाईंना चरण्यासाठीं वनांत घेऊन जाई. तेथेंच आपण स्नानादि नित्यकर्में आटपून समिधा, फुलें, फळें इत्यादि साहित्य गुरूला आणून देई. त्याचप्रमाणें भिक्षा मागून ती सर्व गुरूंजवळ आणून देत असे. गुरू आपणाला देतील तें भक्षण करून तो आनंदानें तेथें कालक्रमण करूं लागला.

कांहीं दिवसांनीं ही बातमी दैत्यांला समजली, त्यांनीं तर्क केला कीं हा मृतसंजीवनी विद्या संपादन करण्यास आला असावा. ह्यानें गुरूला प्रसन्न करून ही विद्या त्यांचेकडून नेली म्हणजे आपलें आयुष्य संपलें म्हणून समजावें. असें मनांत आणून दैत्यांनीं कचाला अरण्यांत गांठून ठार मारिलें. नित्यनियम प्रमाणें संध्याकाळीं कच घरीं आला नाहीं, तेव्हां कन्या देवयानी बापास म्हणाली, बाबा! आज कच अद्यापि कां आला नाहीं?

**शुक्राचार्यः**—हे मुली! त्याला दैत्यांनीं मारिला असावा असें वाटतें.

**देवयानीः**—बाबा! तुम्ही त्याला जीवंत करणार नाहीं तर मी माझा प्राण देईन.

हें ऐकून शुक्राचार्यांनीं त्याला जीवंत केलें व घरीं आणिलें; त्याला पाहून देवयानीला परम संतोष वाटला.

शुक्राचार्यांनीं कचाला जीवंत केलें ही बातमी दैत्यांला समजली, तेव्हां ते मोठ्या काळजींत पडले. कच हयात असेपर्यंत आपणाला भय आहे, करितां तो पुनः जीवंत होणार नाहीं असा कांहीं उपाय केला पाहिजे व तो कसा करावा ह्याविषयीं ते आपसांत विचार करूं लागले. शेवटीं असें ठरलें कीं, कचाचा वध करून त्याच्या देहाचें भस्म करावें व तें मद्यांत घालून ती मदिरा शुक्राचार्यांला पिण्यास द्यावी म्हणजे पुनः कच जीवंत होणार नाहीं असें ठरलें! ही युक्ती त्यांनीं ताबडतोब अमलांत आणिली.

संध्याकाळीं कच आला नाहीं असें पाहून देवयानी बापास म्हणाली, बाबा! कच आला नाहीं; तो कोठें गेला हें पहा बरें?

शुक्राचार्यांनीं ज्ञान दृष्टीनें पाहिलें तों दैत्यांचें कृत्य त्यांच्या लक्षांत आलें व कच आपल्या पोटांत असल्याचें समजलें आणि तें त्यांनीं आपल्या मुलीस सांगितलें.

**देवयानीः**—कचाला जिवंत करा.

**शुक्राचार्यः**—कच जीवंत झाला तर मला मरण येईल, तेव्हां तुला कच पाहिजे कीं मी पाहिजे?

देवयानीः—मला दोघेही पाहिजेत व ते वांचविण्याचें आपल्या आंगीं सामर्थ्य आहे, करितां कचाला जीवंत केलाच पाहिजे व आपणही मरतां नये.?

आपल्या लाडक्या कन्येनें हट्ट घेतल्यामुळें शेवटीं शुक्राचार्यांनीं कन्येला संजीवनी मंत्र शिकवून कचाला जिवंत केलें व उदरांत असतांनाच त्यास संजीवनी विद्या शिकविली व आपलें उदर विदारण करून बाहेर ये व या विद्येच्या सामर्थ्यानें मला संजिवित कर असें सांगितलें. त्याप्रमाणें कच बाहेर येऊन त्यानें गुर्वाज्ञेप्रमाणें त्यांला जीवंत केलें.

शुक्राचार्य जीवंत होतांच आपली विद्या दुसऱ्याच्या हातीं गेल्यामुळें त्यांनीं संतापून दैत्यांला शाप दिला. आज पासून दैत्यांला कधींही जय मिळणार नाहीं; इतकेंच नव्हे तर ते आयुष्य संपल्यावांचून अपमृत्यूला बळी पडतील आणि आजपासून जे ब्राह्मण मद्य प्राशन करितील ते सर्व सुखांला मुकतील व दैत्यांप्रमाणेंच अपमृत्यूला बळी पडतील. त्या दिवसा पासून मद्य व मांस ह्या वस्तू अत्यंत निंद्य समजल्या जात आहेत व शहाणे लोक त्यांचा स्वीकार करीत नाहींत.

असो नंतर शुक्राचार्यांनीं कचाला आपल्या घरीं माता पित्यांजवळ जाण्यास आज्ञा दिली, ह्मणून कच गुरुदक्षिणा देऊन घरीं जाण्यास निघाला. त्यावेळीं देवयानी पुढें होऊन कचाला ह्मणाली, आपण मजशीं विवाह करावा व मला आपल्या समागमें न्यावें. कच ह्मणाला, हे देवयानी! तूं गुरु कन्या आहेस, तेव्हां तुझ्याशीं लग्न करणें मला योग्य नाहीं.

देवयानी ह्मणाली, मीं तुह्मांला दोन वेळां जीवदान देवविलें आहे, तें केवळ तुमच्यावर प्रेम असल्यामुळेंच. जर तुह्मीं माझें न ऐकाल तर मी तुह्मांला शाप देईन! कच ह्मणाला, तुला वाटत असल्यास तूं खुशाल मला शाप दे, पण मी शास्त्र मर्यादा उल्लंघन करणार नाहीं.

देवयानी ह्मणाली, हे कच! मी तुह्मांला जीवदान देवविलें व माझ्या मुळें तुह्मांला मृतसंजीवनी विद्या मिळाली, असें असूनही तुह्माला माझें

ऐकावेंसें नव्हतें नसेल, तर तुझांला लाभलेली मृतसंजीवनी विद्या विफळ होईल.

कचः—खुशालें माझी विद्या विफल होवो. आतां तूं विनाकारण मला शाप दिलास ह्मणून मीही तुला शाप देतों कीं, कोणीही ब्राह्मणपुत्र तुला वरणार नाहीं.

ह्याप्रमाणें शाप देऊन कच आपल्या घरीं आला. पुढें कितीएक दिवस लोटल्यावर कात्यायनीव्रत आलें. त्यादिवशीं देवयानी, दैत्यांचा राजा वृषपर्वा ह्याची कन्या शर्मिष्ठा हिला बरोबर घेऊन, नदीवर स्नान करण्याकरितां गेली. दोघीही नग्न होऊन नदींत स्नान करीत होत्या; इतक्यांत कोणी तेजस्वी पुरूष तेथें आला. त्याला पाहून शर्मिष्ठा लज्जा निवारणार्थ घाईमुळें चुकून देवयानीचें वस्त्र नेसली. तें पाहून देवयानीला राग येऊन तिनें शर्मिष्ठेला शिव्या दिल्या. तेव्हां तिला राग येऊन तिनें देवयानीला विहिरींत ढकलून देऊन ती निघून गेली. इतक्यांत उन्हानें तृषित झालेला ययातिराजा उदक शोधीत त्या विहिरीजवळ आला. त्याला आंत पाण्याच्या ऐवजीं देवयानी दिसली. त्यानें ताबडतोब तिला बाहेर काढिलें व ती वस्त्रहीन असल्यामुळें आपलें आंगवस्त्र तिला नेसावयास दिलें.

देवयानीः—आपण माझा हात धरिला आहे व मला नग्न अवलोकन केलें, करितां मी आपल्याला वरिलें आहे. आज त्या दुष्ट राक्षसाचे कन्येच्या संगतीमुळें हा प्रसंग ओढवला. मी शुक्राचार्यांची कन्या देवयानी आहें. मला बृहस्पतीचा मुलगा कच ह्याचा शाप झाला आहे. आपण कोण आहां तें कृपा करून मला सांगावें.

राजाः— माझें नांव ययाति. मी जातीचा क्षत्रिय आहें. तूं ब्राह्मणकन्या आहेस. मी तुला कशी वरूं. ? तुझ्याशीं विवाह केल्यास मला चांडाळत्व प्राप्त होईल. तथापि तुझे वडील सर्वज्ञ आहेत, तर तूं त्यांला सर्व हकिगत सांग.

नंतर देवयानी ययातीला बरोबर घेऊन आपल्या पित्याजवळ गेली

व तिनें झालेली सर्व हकिगत त्याला कळविली. मुलीचें भाषण ऐकून कचाच्याशापामुळेंच हा सर्व प्रकार झाला हें जाणून, ब्राह्मणाच्या शापापुढें कोणाचें कांहीं चालावयाचें नाहीं, असा विचारकरून, शुक्राचार्यांनीं देवयानीचें ययातीराजाशीं लग्न लावून दिलें, आणि दैत्यराजाची कन्या शर्मिष्ठा इला देवयानीची दासी ठरवून तिच्या बरोबर पाठविलें. शुक्राचार्यांनीं ययातीला सांगितलें कीं तुह्मी शर्मिष्ठेशीं संबंध ठेवितां कामानये.

शुक्राचार्यांची आज्ञा मान्य करून ययातिराजा शर्मिष्ठेसह देवयानीला बरोबर घेऊन आपल्या नगरांत आला. कांहीं दिवस लोटल्यावर देवयानीला यदु व तुर्वसु असे दोन पुत्र झाले. शर्मिष्ठेचें स्वरूप, सौंदर्य व सेवा पाहून राजा प्रसन्न झाला आणि ह्मणाला, हे दासी ! तुझी इच्छा काय आहे ? दासी ह्मणाली, मला रतिसुख पाहिजे. तें ऐकून राजा तिला रतिसुख देता झाला व राजापासून तिला तीन पुत्र झाले. हें पाहून देवयानी आपल्या पित्याकडे गेली व सर्व हकिगत तिनें पित्यास सांगितली. ती ऐकून शुक्राचार्यानें राजास शाप दिला कीं, ' तूं माझी आज्ञा उल्लंघन केलीस कारितां तुला वृद्धावस्था प्राप्त होवो. ' याप्रमाणें शुक्राचार्यांचा शाप होतांच राजा तावडतोब वृद्ध दशेला पावला. शरीर कांपूं लागलें, केश पिकून पांढरे झाले, दांत पडले, शरीर धनुराकार वांकडें झालें. अशी आपली अवस्था झालेली पाहून राजाला फार वाईट वाटलें. आपला पति वृद्ध झाल्यामुळें आपणालाही रतिसुखाचा लाभ मिळत नाहीं हें पाहून देवयानी फार दुःख करूं लागली. शुक्राचार्य आपल्या मुलीच्या समाधानार्थ आल्यावेळीं देवयानी पित्याला ह्मणाली, बाबा माझी वासना पूर्ण झाली नाहीं कारितां तुह्मी माझ्या पतीस पुनः तारुण्य द्या. त्याचप्रमाणें राजा त्यांच्यापाशीं जाऊन कृतापराधाची क्षमा मागूं लागला. तेव्हां त्यांला दया येऊन त्यांनीं राजाला उःशाप दिला. " तूं आपलें वृद्धत्व ज्याला देशील त्याला जाऊन त्याचें तारुण्य तुला येईल. " नंतर राजानें आपल्या सर्व मुलांस बोलावून, आपलें वृद्धत्व घेऊन तारुण्य देण्यास कोण तयार आहे ह्याचा तपास केला. त्यांत वडील चार मुलांनीं ( त्यांत देवयानीचे दोन्ही

मुलगे आले होते ) वृद्धत्व घेऊन तारुण्य देण्याचें नाकारिलें. शेवटीं शर्मिष्ठेचा धाकटा मुलगा पूरूरवा यानें आपलें तारुण्य पित्याला देऊन त्यांचें वृद्धत्व आपण स्वीकारिलें. राजानें आपल्या चौघांमुलांस, त्यांनीं आपली आज्ञा मान्य न केल्यामुळें शाप दिला कीं, तुह्मांपैकीं कोणालाही कधींही छत्रसिंहासनादि राजवैभव प्राप्त होणार नाहीं.

पुढें राजा ययातीनें देवयानीबरोबर शंभर वर्षे पर्यंत विषयसुख सेवन केलें; परंतु त्याची तृप्ती झाली नाहीं. ज्याला आत्मानात्म विचार नाहीं तो विषयसुखांत आनंद मानून अंतीं दुःखसमुद्रांत गटकळ्या खात पडतो, असें जाणून राजा देवयानीला ह्मणाला, हे प्रिये! विषयसुख भोगून तृप्ती होत नसते, तर उलट विषयेच्छा भोगानें अधिकाधीक वाढत जाते. ती शहाण्यामनुष्यांला अज्ञानी बनविते व शेवटीं नरकांत ढकलिते. ह्याकारितां शहाण्यांनीं परस्त्रीशीं एकांतांत भाषण करूं नये. मग ती स्त्री वृद्ध कां असेना? जोंपर्यंत ती विषयसेवनांच्या उपयोगी पडणारी आहे तोंपर्यंत तिच्यापासून दूर राहावें. हें मन वासनामय आहे, तेव्हां त्यांची तृप्ती विषयभोगून कशी होईल? स्त्रीविषय हा असा आहे कीं, तूप अग्नींत पडल्यानें ज्याप्रमाणें अग्नी भडकतो त्याप्रमाणें स्त्रीसान्निध्यानें कामविषय वाढतो. ह्याकारितां विषयाचे दोष लक्षांत आणून, इंद्रियांना त्यांचा मोह पडूं नये ह्मणून त्यांपासून दूर ठेवावें ह्मणजे मनाला व इंद्रियांलाही शांती मिळेल. हे प्रिये! आजपर्यंत मी तुझ्याबरोबर बहुत प्रकारें विषय भोगिला. आतां शरीराचें सार्थक करण्याकारितां अरण्यांत जाऊन तपश्चर्या करावी, देहदंडण करून शांतीचा लाभ करून घ्यावा, असें मीं ठरविलें आहे. याप्रमाणें देवयानीला सांगून पूरूरव्याचें तारुण्य त्याला परत देऊन आपलें वृद्धत्व पुनः घेतलें व आपलें सर्व राज्य पूरूरव्याच्या स्वाधीन करून राजा आपण तपश्चर्या करण्याकारितां अरण्यांत निघून गेला.

हा सर्व प्रकार पाहून यदुनामक ययातीपुत्राला वाईट वाटलें. त्यानें आपल्या पूर्वकर्माचा विचार करून वैराग्य स्वीकारून तो अरण्यांत चालता झाला. तो श्रीदत्तभक्त होता. त्यामुळें तो आपल्या मनाशींच बोलूं लागला.

हे मना! श्रीदत्तमहाराज हे पूर्ण परब्रह्म आहेत. ते आपल्या भक्तांकडून सेवा घेऊन त्याला मोक्षपदाची प्राप्ति करून देतात. ह्या भगवंताचें आनंदस्थान भक्तांचें अंतःकरण होय. भक्त हेंच देवाचें दुकान होय. त्या दुकानांत बसून तो व्यापार करीत असतो. दुकानावर जसजशा प्रकारची इच्छा करून मनुष्य जातो तसतशा प्रकारचे जिन्नस हा दुकानदार त्याला देतो. योग्यता पाहून उधार मालही देतो व त्याला व्यापार करावयाला लावितो. त्या दुकानदाराला आळस नाहीं. त्यांना कधीं नुकसान पोंचत नाहीं. उधारीला बूड येत नाहीं. त्यामुळें इतर दुकानदारांप्रमाणें दुकान बंद करण्याची पाळी येत नाहीं. त्याचेजवळ कोणताही भेद मात्र असत नाहीं. हे मना! तो व्यापारी सर्वांचीं मनें ओळखून वागतो. अशा सद्गुरूंच्या गादीला अज्ञानी मनुष्य जाणत नाहींत. कारण ते संसार सुखांत निमग्न असतात. ज्यावेळीं ते संसार सुखाला लाथ मारून सत्पुरुषांला शरण जातात, त्यांची सेवा करून त्यांला प्रसन्न करून घेतात, तेव्हांच त्यांना वरील व्यापार करण्याची योग्यता येते व ते जगांत धन्य होतात. हे मना! तूं जर तें दुकान शोधून काढशील व त्या दुकानदाराला शरण जाशील तर कृतकृत्य होशील.

## यदुराजा व दत्तमहाराज यांचा संवाद.

ह्या प्रमाणें यदुला विवेक उत्पन्न होतांच श्रीदत्तमहाराज त्याला ज्ञानामृत प्राशन करवून त्याचें दुःख विमोचन करण्याकरितां दिगंबर स्वरूप धारण करून कावेरीतटाकीं प्रगट झाले.

एकाएकीं त्या दत्तदिगंबर मूर्तीला तेथें निजलेलें पाहून यदुराजा त्यांचेजवळ जाऊन त्यांस साष्टांगनमस्कार करून ह्मणूं लागला, आपण कोण आहांत व ह्या घोर अरण्यांत आपलें संरक्षण कसें होतें, आपली वृत्ती समाधान कशी राहते; तसेंच आपण षड्रिपुंपासून अलिप्त आहांत असें दिसतें, आपण ह्या जगाविषयीं उदासीन दिसतां, देहावर आपला लोभ दिसत नाहीं, आपल्या आंगीं कर्तृत्व शक्ती दिसत असूनही आपलें मन स्थी-

र दिसतें. मला धन, कुल, दारा ह्यांचें व असूनही मी दुःखी असतों; आणि आपण ह्या सर्व गोष्टींपासून अलिप्त असूनही सुखी आहां. ही आपली एकंदर वृत्ती पाहून माझी मति अगदीं गुंग झाली आहे, तरी कृपा करून माझ्या प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे.

हें ऐकून अवधूत हास्य करून म्हणाले, हे राजा ! मला चोवीस गुरूंकडून तत्वज्ञान प्राप्त झालें आहे, त्यामुळें मी अशा वृत्तीनें राहतों त्याचें मनन केलें असतां ब्रह्मस्वरूप ओळखितां येतें आणि निदिध्यास लागला असतां त्या ब्रह्माचा साक्षात्कार होतो. हे राजा ! हा मनुष्यदेह तत्वज्ञानाच्या गोष्टींचा विचार करण्याकरितांच परमेश्वरानें निर्माण केला आहे. मानव देह सोडून इतर सर्व देह केवळ आहार विहार वगैरे करण्याकरितांच निर्माण केले आहेत. या मनुष्य देहाच्या योगानें परमात्म्याचें स्वरूप स्पष्ट रीतीनें समजलें जातें आणि इतरयोनींत त्याबद्दल फार त्रास पडतो. किंबहुना कित्येक योनींत तें ज्ञान मुळींच होत नाहीं, ह्मणून नरदेह प्राप्त झाला असतां प्रत्येकानें शास्त्राचा व सद्गुरूचा आश्रय करून ईश्वर प्राप्ती करितां कायां, वाचा, मनें करून अवश्य प्रयत्न केला पाहिजे. हे राजा ! ज्यानें अंतःकरण प्रकाशीत केलें तेंच ब्रह्म शास्त्र व गुरू ह्यांच्या साह्यानें प्रत्यक्ष अवलोकन करितां येतें. हे राजा ! प्रत्येक वस्तूंच्या आंगीं गुण व अवगुणही असतातच. त्यांत मनुष्यांच्या आंगीं इंद्रियविषयवासनातृप्तीचे जे गुण आढळतात ते अवगुण समजावे व ते सोडून द्यावे, आणि वैराग्याची वृद्धि करणारे जे गुण असतात ते सद्गुण समजून त्यांची जोपासना व वृद्धि करावी. जे अज्ञानीलोक विषयवासना वाढविणारे गुण ग्रहण करितात, ते मनुष्ययोनींत जन्म धारण करणारे पशूच समजावे. अशांस परमेश्वरानें घाराखाण्यास लाविलें नाहीं हें या पशूंचें महद्भाग्य समजावें. पशुजात आपल्या पोटाला लागेल तितका चारा खातें, पुढील प्रसंगाकरितां ह्मणून त्याचा संग्रह करीत नाहीं; पण अज्ञानी मनुष्य कालाधीन देह असतांही त्या— आपल्या देहास अमर समजून, आपण न खातां व दुसऱ्यांस ही पोटभर खाऊं न देतां, भविष्यकाळासाठीं प्रत्येक उपयोगी वस्तूंचा संग्रह करिता-

१. जर कदाचित् चारा भक्षक बनले असते तर बिचारे पशु चारा मि-ळाला नाहीं म्हणून उपासानें तळमळून मरण पावले असते. पशु ऋतु कालीं मात्र मैथुनास प्रवृत्त होतात, परंतु अज्ञानी जन सदासर्वकाळ विषय सेवन करितात. पशू अल्प निद्रा घेतात, परंतु अज्ञानीजन गाढ निद्रेच्या स्वाधीन होऊन देहभान विसरून जातात. पशू आपल्या पालनकर्त्यांच्या आज्ञेत वागतात व त्यांचे उपकार जाणतात; पण अज्ञानीजन माता, पिता यांचें सुद्धां ऐकत नाहींत व त्यांचे उपकार जाणत नाहींत. ह्याप्रमाणें प्रत्येक कृत्याविषयीं अज्ञानीजन व पशू ह्यांची तुलना केली असतां, अज्ञानीजन पशुपेक्षां देखील कमी योग्यतेचे ठरतात. म्हणून श्रुती अशा लोकांस पशूंतलेपशु असें समजते. हे तेल, तूप इत्यादि अल्प किंमतीची वस्तू गमावल्यास, मोठें नुकसान झालें असें मानून खेद करितात; पण कितीही किंमत दिली तरी परत न मिळणारें, असें हें आयुष्य व्यर्थ घालवीत असून त्याबद्दलच्या नुक-सानीची कल्पनाही त्यांच्या ध्यानींमनीं येत नाहीं. याकरितां मनुष्यदेह प्राप्त झाला असतां विषयसुखाचा त्याग करून, महत्प्रयासानें ईश्वरप्राप्ति करून घ्यावी. याप्रमाणें श्रुती आपणांस सांगत आहे. इतकें असूनही जो विषयसुखास लोलुप होतो त्याच्यासारखा अधम दुसरा कोण आहे ?.

## श्रीदत्तमहाराजांचे चोवीस गुरु.

१ पृथ्वी, २ वायु, ३ आकाश, ४ पाणी, ५ अग्नि, ६ चंद्र, ७ सूर्य, ८ कपोत, ९ अजगर, १० समुद्र, ११ पतंग, १२ भ्रमर व मध-माशी, १३ हत्ती, १४ मधुहा, १५ मृग, १६ मासा, १७ पिंगलानामक वेश्या, १८ टिटवी, १९ बालक, २० कुमारिकंकण, २१ सर्प, २२ श-रकार, २३ भ्रमरकीट, २४ कांतीण, आणि पंचवीसावा गुरु स्वतःचें श-रीर. या सर्वांपासून थोडथोडें ज्ञान घेऊन मीं त्याचा समुद्र बनविला व त्यांत स्वतः स्नान करून सर्व पापांचे क्षालन केलें. म्हणून अशा प्रकारचा हा आनंद अनुभवीत आहें. ह्या गुरूंच्या कृपेनें नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त

राहून, निश्चयाच्या बळानें सर्वसंग परित्याग करून, आशापाशांतून मुक्त झाल्यामुळें याप्रमाणें परिभ्रमण करीत आहें.

हे राजा ! तूं ह्मणशील कीं आत्मज्ञानप्राप्तीसाठीं एकाच गुरूचे पाय धरून राहिलें तर पुरे आहे, असें असतां इतर अनेक गुरु करण्याचें कारण काय ? ह्यामुळें व्यभिचारिणीस्त्रीप्रमाणें तो मनुष्य निंदेस पात्र होईल ! याचें उत्तर असें आहे कीं, ह्या जगतांत परमार्थासाठीं एकच गुरु बस्स आहे. त्यांच्या उपदेशांत संशय उत्पन्न झाल्यास ते दूर करावे. वेदांताच्या आधारें तर्कशास्त्र घेणें जरूर आहे. त्या आधारें चोवीस गुरु करून व सर्व संशयांचें निरसन करून, स्वस्वरूपाचा मी निश्चय केला आहे. हे राजा ! अद्वैत ह्मणजे विशुद्धज्ञान तें बुद्धीनें एकदम ग्रहण करवत नाहीं. ही सूक्ष्म वस्तु प्राप्त करण्यासाठीं चोवीस पदार्थांचे गुणगुरू केले आहेत. त्यामुळें मजवर व्यभिचार दोष येत नाहीं.

हें ऐकून राजा ह्मणाला, हे भगवन् ! या चोवीस गुरूंपासून मिळविलेलें ज्ञान मला सांगावें.

## पृथ्वीपासून शिक्षण.

अवधूत ह्मणाले, हे राजा ! ज्याप्रमाणें उंच जागीं जाण्याकारितां प्रथम शिडीचा उपयोग करावा लागतो त्याप्रमाणें मुमुक्षुजनांला सहनशीलता असणें अवश्य आहे. हा गुण मीं पृथ्वीपासून घेतला आहे. ज्याप्रमाणें पृथ्वी आपल्या प्रारब्धाचा विचार करून, प्राणीमात्रांनीं टाकिलेलें मलमूत्र, थुंकी इत्यादि धारण कारिते, किंवा त्यानीं तिला खणून, भाजून तींत अन्नादि पिकविलें, अगर चालतांनां लाथांनीं तुडविलें, तरी ती त्यांच्या सर्व अपराधांची क्षमा करून ह्मणते कीं, माझे पूर्वप्रारब्धानुरूप सर्वजण माझे शरीरावर संस्कार कारितात, तर विनाकारण त्यांला दोष काय ह्मणून द्यावा ! कारण स्वयंभू परमेश्वरानें प्राणीमात्रांचा सर्वस्वी आधार मजवर ठेविला आहे, तेव्हां त्यांनां कसें काढून टाकावें ? ते तर सर्वजण मला माते ह्मणून हाक मारतात. ह्या कारितां त्यांनीं दिलेलें सर्व दुःख सहन केलेंच पाहिजे. त्या प्रमाणें मुमुक्षु

जनांनीं मोक्षाच्या स्वार्थासाठीं संसार संबंधी व शरीर संबंधीं सर्व दुःखें सहन करावीं. कदाचित् कोणीं पीडा देतील तर त्यांजवर न रागावतां धैर्य धरून धर्ममर्यादेचें रक्षण करावें. वेदशास्त्रांचें व अनुभवीजनांचें असें ह्मणणें आहे कीं, शब्दानें व कटाक्षानें कदाचित् कोणीं अपमान केला, प्रसंग विशेषीं कोणीं लाथ मारिली, किंवा सोव्यानें बडविलें, अथवा शरीरावर थुंकलें तरी विषाद मानूं नये. हा देह पूर्वकर्मानुसार उत्पन्न झाला आहे. अर्थात तो प्रारब्धाधीन आहे. हें प्रारब्ध तीनप्रकारचें आहे. स्वेच्छा प्रारब्ध, परेच्छा प्रारब्ध, आणि अनिच्छा प्रारब्ध; वैद्यानें औषध देऊन पथ्य पाळण्यास सांगितलें असतांही तें न पाळतां दुःखी होणें यास स्वेच्छा प्रारब्ध ह्मणतात. आपल्या प्रकृतीस न मानवणाऱ्या पण उत्तम वस्तु लोकांच्या आग्रहास्तव भक्षण करून दुःखी होणें हें परेच्छा प्रारब्ध व विचार पूर्वक चांगला परिणाम होईल अशा समजुतीनें आरंभिलेल्या कर्माचा उलट परिणाम होऊन जें दुःख होतें तें अनिच्छा प्रारब्ध होय! यांतील पहिल्या दोन प्रारब्धांचा त्याग करून, मुमुक्षूंनीं देह नाशवंत समजून त्यास प्रारब्धाधीन करावें, व स्वतः साक्षीभूत बनून राहावें ह्मणजे कोणत्याही प्रकारचें दुःख लागणार नाहीं. यदाकदाचित् या देहास कांट्यानें टोंचलें तरी कोपायमान होऊं नये, व पूजा केली तरी आनंदीत होऊं नये. मनुष्यास जी वस्तु अनेक उपायांनीं साध्यकरणें कठीण जातें ती वस्तु क्षमा धारण केल्यानें अनायासें मिळेल. क्षमा व सहनशीलतायुक्त मनुष्यास ब्रह्मांडांत वैरी नाहीं. क्रोध हा अंधाऱ्या रात्रीप्रमाणें असल्यानें त्याचा स्वीकार करणाऱ्याला तो अधोगतीला नेऊन सोडितो. क्षमा हा गुण सूर्याप्रमाणें असल्यामुळें त्याचा स्वीकार करणारा देवलोकास जातो. जो मुमुक्षु याप्रमाणें आपलें वर्तन ठेवितो, तो हा भवसागर तरून जातो.

## उपगुरू वृक्ष यांचेपासून शिक्षण.

हे राजा! जोंपर्यंत हें मानवशरीर आहे तोंपर्यंत परमार्थ करून मोक्षरूपी स्वार्थ साधावा. याबद्दल वृक्षास गुरू करून मीं बोध घेतला आहे.

जो मनुष्य तमोगुणाच्या आधीन होऊन असत्य कर्मे आचरितो तो वृक्ष होतो, आणि त्या अभिमानामुळें, त्यास आजन्म उभें राहावें लागतें. हे वृक्ष पराधीन असून, प्रसन्न चित्तानें मरणकालपर्यंत परोपकार करून पूर्वजन्मीं केलेल्या पापांचें क्षालन कारितात. त्यामुळेंच ते पक्ष्यादिकांला आपल्या आश्रयाला राहण्यास आनंदानें जागा देतात; इतकेंच नव्हे तर थंडी, वारा, ऊन, इत्यादि आपल्या आंगावर घेऊन आश्रीतजनांचें संरक्षण कारितात व आपलीं पानें, फुलें, हीं त्याला उपजीविकेसाठीं अर्पण कारितात. मनुष्यजाती त्यांला तोडितात, फोडितात, कापितात, सोलून काढितात, मुळापासून उपटितात, फळें, फुलें, पानें, चीक हीं काढून घेतात; सोलून चिरून तासून घराला घालितात, जाळतात, स्वेच्छेप्रमाणें त्याला दुःख देऊन, त्याच्याकडून वाटेल तीं तीं कामें करून घेतात, याप्रमाणें ही वृक्षजात लोकांनीं दिलेलीं सर्व दुःखें सहन करून, नांवरूप असेपर्यंत परोपकार कारितात, त्याप्रमाणें मुमुक्षुजनांनीं सर्व दुःखें सहन करून देह असेपर्यंत परोपकार करीत असावें. वृक्षजात ज्याप्रमाणें वाटसरूंस विश्रांती देतात, त्याप्रमाणें गृहस्थाश्रमी यांनीं दारावर येणाऱ्या अतिथीस भोजन घालून विसावा द्यावा. दैवयोगानें कदाचित् लक्ष्मी प्राप्त झाली तर उन्मत्त होऊं नये. ज्याप्रमाणें वृक्ष फलपुष्पांनीं युक्त झाले असतां अधिक नम्र होतात, व जास्त परोपकार करितात, त्या प्रमाणें संपत्ति प्राप्त झाली असतां मनुष्यानें लीन होऊन परोपकार करावा. मनुष्याला संपत्ति प्राप्त होतांच गर्व अधिक होतअसतो, तरी त्याचा त्याग करून त्यानें वृक्षाचा कित्ता घ्यावा.

## उपगुरू पर्वत यापासून शिक्षण.

हे राजा! ह्या शिवाय पर्वत आणि पृथ्वी हीं आपल्या उदरांत रत्नादिकांच्या खाणींचा संचय करून ठेवितात व त्यांच्या योगानें लोकांवर अनंत उपकार कारितात, त्या प्रमाणें प्रत्येक मनुष्यानें विद्या संपादन करून तिचा संचय करावा व परोपकारार्थ उपयोग करावा. ज्याप्रमाणें पर्वत उन्हाळ्यांत शीतोदकाचे निर्झर उत्पन्न करून तप्तलोकांस शांत करितात, त्याप्रमाणें मधुर भाषण करण्याची संवय लावून सर्व जनांला मुदित करावें.

पर्वत ज्याप्रमाणें आपल्या आंगीं गुहा उत्पन्न करून सत्पुरुषांला निवास स्थानें बनवून देतात व त्यांचा आश्रयलाभ करून घेतात, त्या प्रमाणें प्रत्येक मनुष्यानें उत्तम गुण संपादन करून, संतसज्जन आपणाला हुडकीत येऊन आपल्या आश्रमीं वस्ती करितील असें वागावें. हे राजा! हा संसार व्यर्थ आहे खरा, परंतु यांत संतसंगती हें सार आहे. ही संगती मरणफेरे अवश्य चुकविते. याप्रमाणें त्यांचेकडून गुण घेऊन मी शांत राहतों.

## वायूपासून शिक्षण.

हे राजा! दुसरा गुरू जो वायु, त्याजकडून मीं विरक्त कसें राहावें हें शिकलों आहें. जो मनुष्य विरक्त असतो तो भवपाशांतून सहजीं मुक्त होतो. विरक्तीशिवाय तितिक्षा व क्षमा ह्या उपयोगांत येत नाहींत. जोंपर्यंत मनुष्य इंद्रियवश होऊन त्यांच्या द्वारें बाह्यविषय भोगीत असतो, तोंपर्यंत वैराग्य प्राप्त होण्याची आशाच नको; व जोंपर्यंत वैराग्याची प्राप्ती झाली नाहीं तोंपर्यंत योगी होणें दुरापास्तच आहे. जो मुमुक्षु ब्रम्हानंदाच्या स्वादाशिवाय इतर स्वादाची आवड बाळगीत नाहीं त्यानें शरीररक्षणापुरताच आहार करावा. त्यायोगें प्राणी तृप्तहोऊन मन शांत राहातें व ईश्वरप्राप्ती करून घेण्याची योग्यता त्याच्या मनाला प्राप्त होते. हे राजा! या देहांतील प्राणवायूला अन्नाचा पुरवठा न होईल तर, शरीरांतील तत्वें शिथिल होतील. योग्य आहार मिळाल्यास मात्र शरीराचे सर्व भाग आपआपले व्यापार सुरु ठेवितील. हा प्राणवायु रसास्वादाची जरूर बाळगीत नाहीं. त्यामुळें त्याला स्वादिष्ट अन्नाचीच गरज आहे असें नाहीं. तो अन्नाच्या रुचीची लालसा धरीत नाहीं. जें मिळेल तें खाऊन तृप्त होतो. या करितां मुमुक्षु लोकांनीं प्रसंगवशात् जें अन्न मिळेल तें भक्षण करून संतुष्ट राहावें. जो अज्ञानी, खाण्यापिण्याची ही निरर्थक खटपट कशाला करावी! असें ह्मणून आहाराचा त्याग करितो, त्याच्या शरिरास ग्लानी येऊन मन स्थीर न झाल्यामुळें वाणींत विकार उद्भवून त्याच्या ज्ञानाचा नाश होतो. अशा मनुष्याला ईश्वर प्राप्ती होणें शक्य आहे काय? मुळींच नाहीं.

हे राजा ? मुक्ति कांहीं स्वस्थ झोंपत राहिल्यानें मिळत नसते, तर ती प्राप्त करून घेण्यास महात्प्रयास करणें जरूर आहे ! ती मिळण्याची इच्छा करणारानें मिताहारी राहावें. जो मनुष्य स्वादिष्ट अन्नें यथेच्छ भक्षण करितो, त्याचे चित्तांत विक्षेप उत्पन्न होऊन, ईश्वरप्राप्तीचें काम त्याला साध्य होणें फार कठीण जातें.

हे राजा ! जिव्हेस अन्नादिखाद्यांचे भिन्नभिन्न स्वाद माहीत याकारितां तिच्या नादीं लागल्यास वारंवार जन्म घेणें भाग पडेल, ज्यांनीं जिव्हेला जिंकलें तेच सत्पुरूष होत. यदाकदाचित् इंद्रियविषयांचा एकदम त्याग करणें कठीण पडेल, तरी पण हळूहळू त्यांचा त्याग करीत गेल्यानें शेवटीं उत्तम वैराग्याची प्राप्ती होते. दैवयोगानें जरी कदाचीत् विषयभोग प्राप्त झाले तरी त्यांत आपण बद्ध होऊं नये. हा उपदेश वायुपासून मीं घेतला आहे.

ज्याप्रमाणें वायु शीतोष्णांत संचार करीत असूनही त्यांच्या गुणदोषांत बंधन पावत नाहीं, त्याप्रमाणें मुमुक्षूंनीं कोणाचेही गुणदोष न पाहतां श्रुतिप्रतिपादित रस्त्यानें यथेच्छ शीतोष्णयुक्त प्रदेशांत गमन करावें. ज्याप्रमाणें वायु गंधादिकांचा आश्रय करूनही त्यांपासून अलिप्त राहतो, त्याप्रमाणें मुमुक्षूंनें हा जड देह असे पर्यंत त्याचा आश्रय करूनही मी वेगळा आहें असें समजून देहाभिमानास जवळ येऊं न देण्याचा निश्चय करावा व तो अमलांत आणावा. हे राजा ! कारणाशिवाय कोणतेंही कार्य होणें शक्य नाहीं. ह्या नियमान्वयें, विकल्पाचें कारण प्रमाद होय असें समजून त्याचा त्याग करावा. इंद्रियें शांत करून स्वस्वरूपाचें अनुसंधान लावावें. त्या योगें हा संसार दुःखमय भासणार नाहीं. तरी प्राणास योग्य आहार पुरवून रसास्वादाचा त्याग करावा म्हणजे वैराग्य प्राप्त होईल. हा बोध मीं वायुंपासून घेतला.

## आकाशापासून घेतलेला बोध.

हे राजा ! आत्मा हा चराचर सर्व वस्तूंला व्यापून राहिला आहे.

तरी निर्विकार, एक आणि अचल आहे. हें ज्ञान तिसरा गुरू जो आकाश त्या पासून मी घेतलें आहे. या त्रिभुवनांत जे देह पाहण्यांत येतात त्या प्रत्येकांत आत्मा आहे. ज्याप्रमाणें लहान मोठ्या सर्व घरांत एक आकाश राहिलें आहे, त्याप्रमाणें सर्व देहांत एक आत्मा व्यापून राहिला आहे. आत्मा हा साक्षीभूत आहे तरी उपाधियुक्त झाल्यामुळें गुणात्मा दिसूं लागला खरा, पण तो आत्मा जड नव्हे; तर सच्चिदानंद एक असा आहे. ही गोष्ट अज्ञान रूपी आवरणामुळें स्पष्टपणें लवकर ध्यानांत येत नाहीं. ह्या विविधप्रकारच्या देहांचे काल, कर्म आणि गुण असे तीन हेतु आहेत. जोंपर्यंत याचा एक संबंध असतो तोंपर्यंत हा भेद पाहाण्यांत येतो. ज्याप्रमाणें नदीच्या प्रवाहांत एक सारखें पाणी वाहात असतें, परंतु तिच्या उत्पत्ती विषयीं ज्याच्या मनाला कल्पनाही नाहीं त्याला त्या बद्दल मोठें आश्चर्य वाटत असतें. त्याप्रमाणें या संसाररूप प्रवाहाचा ज्यला विचार करितां येत नाही, त्याला जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडून आश्चर्य करीत राहावें लागतें. जो गुणाचा क्षोभ करवितो त्याला काळ म्हणतात. आणि जें जन्माचें निमित्त असतें त्यास कर्म असें ह्मणतात. ह्याच्या त्रिविध भेदांस सत्व, रज व तम असें ह्मणतात. तेंच जगताचें उपादान होय. ज्याप्रमाणें घटाचें उपादान मार्ती आहे, त्याप्रमाणें जगताचें उपादान हे गुण समजावे. हा जो देह दिसत आहे, तो पूर्वीं आणि अंतीं नसून मध्यभागींच मात्र दिसतो. हीच मायाहोय. ईश्वरीसत्तेनें जेव्हां काळ, कर्म व गुण ह्यांचे विभाग होतात तेव्हां हा देह नाश पावतो, परंतु आत्मा मरत नाहीं व त्याला कोणीं मारूं शकत नाहीं. ज्याला हें ज्ञान प्रप्त झालें, त्याचा त्या जगांत द्वेष्टा किंवा प्रीती करणारा कोणी उरत नाहीं. ज्याप्रमाणें आकाशाला मलीन पणा नसतांना त्याच्या ठिकाणीं मलीन पणाचा भास होतो त्याप्रमाणें आत्म्याच्या ठिकाणीं प्रपंच भासमान होतो. हीं सर्व शरीरें अन्न, जल, तेज यानीं उत्पन्न झालीं आहेत. ज्याप्रमाणें वाऱ्याच्यायोगानें आकाशांत मेघ इतस्ततः भ्रमण करितात परंतु त्यांचा आकाशाला मुळींच संसर्ग लागत नाहीं, त्याप्रमाणें आत्म्यास शरीर संबंधी गोष्टींचा संसर्ग पोंचत नाहीं. हे राजा! ह्या सर्वांचा नियंता आत्मा

एक असूनही आकाशाप्रमाणें सर्व देहांचे ठिकाणीं व्यापून आहे. तो या शरीराबरोबर हालतांना चालतांना दिसतो; परंतु त्यास वास्तविक चलन नाहीं. ज्याप्रमाणें घटांतलें आकाश घटाबरोबर हाललेलें दिसतें, परंतु तो निव्वळ भ्रम आहे, त्याप्रमाणें आत्म्याचा व देहाचा संबंध आहे. ज्या आत्म्यानें आकाशाला सुद्धां अवकाश दिला आहे तो कसा हालूं शकेल बरें? हा आत्मा निराभास असल्यामुळें त्याचा नाश करण्यास कोणीही समर्थ नाहीं. ज्याप्रमाणें घटाचा नाश झाला तरी घटांतील आकाशाची हानी होत नाहीं, त्याप्रमाणें शरीराचा नाश झाला तथापि त्यांतील आत्म्याचा नाश होत नाहीं. आत्मा अखंड, एकरस आणि अज आहे, असें जाणून त्याचें चिंतन केल्यानें मृत्यू ताब्यांत ठेवितां येतो. याप्रमाणें आकाशास गुरू करून मीं माझ्या मरणभ्रमाचा नाश केला आहे.

## उदकापासून शिक्षण.

हे राजा! आतां चौथा गुरू पाणी यापासून घेतलेला गुण सांगतों तें ऐक. मनुष्यानें पाण्याप्रमाणें सर्वांबरोबर स्नेहभावानें वागावें. कोणाचाही पक्षपात करूं नये. परिमित भाषण करावें. सर्वांशीं लीन होऊन एकरूप व्हावें. ज्याठिकाणीं स्वच्छ, मधुर, थंड व विपुल पाणी आढळून येतें, त्या ठिकाणीं सर्व प्राणी धावून जातात. त्याच्या अंगीं प्रवाहीपणाचा गुण असल्यामुळें तें सर्व ठिकाणीं पसरतें, व त्याच्यावर सर्वांची प्रीति असते; त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें वाणींत मधुरता सांठवून सर्व लोकांस अतिप्रिय व्हावें. शरीर प्रोक्षण केल्यानें, आचमन केल्यानें, प्याल्यानें, स्नान केल्यानें व नुसतें दर्शन घेतल्यानें, पाणी लोकांस पवित्र करितें; लोक पाण्याच्या साहाय्यानें अनेक धंदे करूं शकतात; पाणी हें दुसऱ्या भ्रष्टजनांस पुनीत करितें परंतु आपण त्यांच्या भ्रष्टाकारानें भ्रष्ट होत नाहीं. त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें आचार व अंतःकरण स्वच्छ ठेवून वागावें. ह्मणजे त्याच्या दर्शनानें पाणीही पावन होऊं शकेल, व त्याची सेवा केल्यानें अनेक लोक भवसागर तरून जातील. ज्याप्रमाणें पाणी

आपल्या मळ तळाशीं ठेवून दुसऱ्याच्या मलाचें क्षालन करितें, त्याप्रमाणें मनुष्यानें मळ, मूत्र, कफ, स्वेद यांसह देहाभिमानरूपी मलाचा त्याग करून ज्ञान वैभवाची प्राप्ती करून घ्यावी व मलीन लोकांच्या पातकांचें क्षालन करावें. अशा ज्ञानी जनांच्या संचिताची होळी करून, स्वीय प्राणाचा त्याग करावा व शरीरास प्रारब्धाधीन ठेवून लोकांस पावन करण्या करितां आपण जगावें. स्वच्छंदानें राहून लोकांस दर्शन, उपदेश, सेवा सांगून पावन करावें. ज्याप्रमाणें जल वाहात जतांना उच्च स्थानाचा त्याग करून, उन्मत्त वृक्षांचा उच्छेद करून, नम्र वनस्पतींचें पोषण करीत नीच स्थानाप्रत जातें त्याप्रमाणें मुक्तपुरुषांनीं धन-मदाचा उच्छेद करून, पाखंडी दुष्टांस शिक्षा करून, शरणागत लोकांस पाप मुक्त करावें. ज्याप्रमाणें एकाच ठिकाणीं सांचून राहिलेलें पाणी दुर्गंधी युक्त होतें आणि वाहत राहिल्यानें स्वच्छ होतें त्याचप्रमाणें पुरुषाचें आहे. करितां विचारी पुरुषांनीं एकाच ठिकाणीं न राहातां अनेक निरनिराळीं तीर्थें आचरण करावीं ह्या बोध मीं उदका पासून घेतला आहे.

## अग्नीपासून घेतलेलें शिक्षण.

हे राजा! आतां पांचवा गुरु जो अग्नी त्याचे गुण सांगतों, ते ऐक. मनुष्यानें अग्नीप्रमाणें तप करून प्रकाशीत व्हावें. आणि जें मिळेल तें भक्षण करून कोणत्याही दोषांचें आचरण न करितां आपले गुण कार्य-कारण प्रसंगींच प्रकट करावे. जो जो ज्या ज्या भावनेनें येईल त्याची त्याची ती ती भावना पूर्ण करावी. तीर्थादिकांचें ठिकाणीं भ्रमण करीत असतां जें कांहीं अन्नादीक प्राप्त होईल त्याचा संग्रह न करितां भक्षण करून टाकावें ही शिक्षा मीं अग्नीपासून घेतली आहे. अग्नी स्वयंप्रकाश असल्यामुळें सेवा करणारास प्रकाशीत करितो, आपल्या तेजानें अंधकार आणि शीत यांचा नाश करितो, सर्वत्र संचार करीत असूनही नेहमीं पवित्र राहतो, सर्वांबरोबर समान वर्तन ठेवितो, त्याप्रमाणें मुमुक्षूंनीं धैर्य धारण करून स्वच्छंद संचार करीत असतांही शुद्धाचरणानें राहावें. भ्रष्ट होऊं नये. सर्वांशीं सज्जन

वर्णन ठेवावें. अग्नीहोत्राच्या मर्यादेनें अग्नीचें हवन पूजन केल्यानें तो यजमानांच्या आधीन होऊन त्यास पुनीत करितो; ते ज्या ज्या देवाचें नांव घेऊन त्या अग्नीमध्यें आहुती अर्पण करितात, त्या त्या देवाला ती तो पोहोंचवितो व आपल्या भक्ताची इच्छा तृप्त करितो. स्वतःला तृण काष्ठ इत्यादि जें कांहीं मिळेल त्याचा संग्रह न करितां तें खाऊन त्याचें भस्म करितो, त्याप्रमाणें तपस्यानें जनांकडून भावना युक्त सेवा घेऊन त्यांस तृप्त करावें, आणि कोणत्याही वस्तूंचा संग्रह न करितां त्यांचा उपभोग घ्यावा. जो प्रभु परमात्मा मानिला जातो त्याला आकार नसूनही तो साकार दिसत आहे, तो अग्नीप्रमाणें समजावा. ज्याप्रमाणें अग्नी काष्ठांत प्रवेश करीत असून काष्ठाप्रमाणें लांब रुंद दिसतो तसा हा आत्मा नाना प्रकारच्या शरीरांत प्रविष्ट झाल्यानें त्या त्या शरीराच्या आकाराप्रमाणें भासमान होतो. याला जो जाणूं शकतो तो नश्वर उपाधींचा त्याग करून ब्रह्मस्वरूपाप्रत पोंचतो. हा देह उत्पन्न होण्याचें कारण वासना होय. ती ज्ञानाग्नीनें भस्म झाल्यावर पुनः देहधारी व्हावें लागत नसून ब्रह्मस्वरूप होतां येतें. ज्याप्रमाणें अग्नी हा काष्ठाचें स्वरूप धारण करितो व काष्ठाचें भस्म झाल्यावर त्या आकाराचा त्याग करितो त्याप्रमाणें आत्मस्वरूप अग्नी वैराग्याच्या साहाय्यानें सर्व वासना जाळून आपले स्वरूपी जातो. हे राजा! हा देह क्षणभंगूर आहे हें जाणण्याकरितां अग्नीच्या ज्वाळेस गुरू केला आहे. ज्याप्रमाणें तिला उत्पन्न होण्यास व नाश पावण्यास यत्किंचितही वेळ लागत नाहीं, त्याप्रमाणें पंच भूतांपासून देह उत्पन्न होण्यास व लयास जाण्यास विलंब लागत नाहीं. ज्यांस हा सूक्ष्म विचार प्राप्त झाला, ते वैराग्याची प्राप्ती करून घेऊन हा भवसमुद्र उतरून परतीराला जातात. याप्रमाणें पांचवा गुरू अग्नी ह्याजकडून मीं बोध घेतला आहे.

## चंद्रापासून घेतलेलें शिक्षण.

हे राजा! सहावा गुरू जो चंद्र त्याचे गुण ऐक. आत्म्याचे ठायीं कोणताही विकार उत्पन्न होऊं शकत नाहीं. तरी पण जो विकार अनु-

भवास येतो तो शरीराचे ठायीं असतो. हा बोध मीं चंद्रापासून घेतला आहे. हें सर्व चंद्रासहीत नक्षत्रमंडल, जलमंडल, सूर्यमंडल व अग्नीमंडल हीं तेजोमय आहेत. ज्यावेळीं सूर्यचंद्राचा योग एका नक्षत्रीं होतो त्या दिवशीं चंद्रकलेचा नाश होत असतो. त्यामुळें सर्व लोक त्या दिवसाला अमावास्या ह्मणत असतात. चंद्र हा एक दिवसांत व सूर्य तेरा दिवसांत एक नक्षत्र भोगीत असतो; या विषम गतीच्या योगानें चंद्राच्या तेजांत प्रति दिवशीं न्यूनाधिकत्व आढळून येतें. त्यामुळें चंद्राच्या कलेंत क्षय व वृद्धी हीं अनुक्रमानें घडत असतात. चंद्र तेरा नक्षत्रें भोगून सूर्यासमोर आल्यावर भूछायारहीत वाटोळा तेजःपुंज दिसतो, त्या दिवसाला लोक पौर्णिमा असें ह्मणतात. व तेथपर्यंतचे सर्व दिवस चंद्रकला प्रतिदिनीं वाढत असते ह्मणून त्या पंधरावड्यास शुक्लपक्ष असें ह्मणतात. अमावा-स्येची सूक्ष्म कला व वरील पंधरावड्याच्या पंधरा कला मिळून चंद्राच्या सोळा कला मोजण्यांत येतात. ह्या कला मानल्या जाण्याचें कारण चंद्र-सूर्याची गति होय ही गोष्ट ध्यानांत न आणून केवळ कार्य अवलोकन करून लोक कुतर्क करितात. ज्याप्रमाणें चंद्राच्या कलेंत कमी अधीकपणा असून त्याचा विकार चंद्रास बाधक होत नाहीं तद्वत् आत्म्यास देहसंबंधी विकार बाधक होत नाहींत. हें ओळखून देहात्मबुद्धीचा त्याग करावा. हे राजा! तूं ह्मणशील कीं जर ह्याप्रमाणें सर्वजन वागूं लागले तर देहाचे व्यवहार कसे चालू राहातील? तर याचें कारण ऐक. सूर्यापासून चंद्रमंडळ निराळें असूनही तें सूर्याच्या सत्तेनें तें अंधकाराचें निवारण करितें, चंद्र जलरूप असल्यानें त्यांत शीतलता भासते. त्यांत सूर्याचें प्रति बिंब पडल्यानें प्रकाश दिसत असतो. त्याप्रमाणें आत्म्याच्या सत्तेनें सर्व देह चैतन्ययुक्त दिसतात. यांत अंतःकरणांत आत्म्याचें प्रतिबिंब उमटल्यामुळें सर्व इंद्रियें चैतयन्युक्त होऊन आपआपल्या विषयाकडे धाव घेतात. याप्रमा-णें आत्मस्वरूप असल्यामुळें त्याला नाश पावण्याची भीती नाहीं. ह्याप्रमाणें बोध मीं चंद्रापासून घेतला.

## सूर्यापासून घेतलेला बोध.

हे राजा ! आतां सातवा गुरु सूर्य ह्यापासून घेतलेले गुण मी तुला सांगतों. हा देह भ्रमणशील असल्यामुळें त्याच्या बरोबर आत्माही भ्रमण करीत आहे असें वाटतें, तरी त्याला अचल कसें ह्मणतां येईल ?

आत्मा शरीरांत राहून आकाशाप्रमाणें त्या पासून अलिप्त आहे, हें वरती आपणास समजाविलें, परंतु त्याचा मनास बरोबर बोध होण्याकरितां सूर्याच्या शुद्ध प्रतिबिंबाचा आधार घेऊन जास्त विचार करावा. सूर्यमंडलाखालीं जलपूर्ण पात्र ठेवावें. त्यांत आपणास सूर्याचें प्रतिबिंब बरोबर दिसेल अशा ठिकाणीं उभें राहावें. नंतर तें जलपात्र हालवून आंतील जलास गति द्यावी ह्मणजे आंत सूर्यबिंब हेलकावे खात असल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल. वास्तविक सूर्यबिंब स्थिर आहे हालत नाहीं, असें असूनही तें हालत असल्याचें दिसतें. पात्रांतील पाण्यास जे जे विकार होतात, ते ते त्या बिंबाला झाल्याप्रमाणें दिसतात. तें पाहून अज्ञानी मुलें सूर्य हालत आहे असेंच समजतात. परंतु त्यांनला एकही विकार सूर्य बिंबाला किंवा प्रति बिंबाला होत नाहीं. तद्वत् ह्या देहाच्या अनेक विकारांतून एकही विकार साक्षीभूत आत्म्याला लागू पडत नाहीं.

हे राजा ! सूर्य भविष्यत्कालाचा विचार करून जलाचा संचय करितो व योग्य कालीं परोपकारार्थ त्याचा जमिनीवर वर्षाव करितो. त्याप्रमाणें मनुष्यानें उपयुक्त वस्तूंचा संचय करून, देश, काल, वर्तमान स्थिती लक्षांत आणून निःपक्षपातीपणानें सर्व प्राण्यांस त्यांचा फायदा द्यावा. प्रसंगविशेषीं त्यांचा कल्पनेप्रमाणें उपयोग झाला नाहीं तरी त्याबद्दल विषाद वाटूं देऊं नये. ह्याप्रमाणें राग द्वेष सोडून वर्तावें. अनायासें अर्थप्राप्ती करून घेऊनही स्वतः त्यापासून अलिप्त राहावें. हें ज्ञान मी सूर्याकडून प्राप्त करून घेतलें.

## कपोतापासून घेतलेलें शिक्षण.

हे राजा ! आतां तूं आठवा गुरू कपोत ह्याचे गुण ऐक.

जो पुरुष स्त्रीपुत्रादिकांवर आसक्ती ठेवितो, व त्यांचें लालन पालन कर-ण्यांतच आपल्या आयुष्याची इति कर्तव्यता समजतो तो कपोताप्रमाणें मृत्युमुखीं सांपडला जातो.

एका अरण्यांत एक कपोता मांळा ( गृह ) तयार करून कपोतीशीं सहवर्तमान त्याठिकाणी आनंदानें कालक्रमण करित होता. त्या उभयतांचें एकमेकांवर अत्यंत प्रेम असल्यामुळें तीं वारंवार एकमेकांचें चुंबन घेत. मंजुळ शब्द करीत. पिसारा उडवीत. आलिंगन देत. अशा आनंदातिशयांत निमग्न असत. याप्रमाणें कित्येक दिवस लोटल्यावर तो गेलेला मोठा काल्हा त्यांस अल्पसा वाटला. काळ हा पळ, घटिका, दिवस, मास, वर्ष या प्रमाणें आयुष्याचें हरण करीतच असतो. हें विसरून तो कपोता स्त्रीसुखांत आसक्त राहून, तहान, भूक विसरून स्त्रीचें मन प्रसन्न करण्याच्या उद्योगास लागला. कपोतीनें विशेष सुख देऊन त्याच्या चित्तास बंधन केलें. कांहीं दिवसांनीं तिनें अंडीं घातलीं. त्यामुळें त्याचें तिजवर फारच प्रेम जडलें. पुढें तो फारच श्रम करून तिला चांरा, पाणी आणून देऊं लागला. कालांतरानें त्या अंड्यांतून पिलें बाहेर पडलीं. त्यायोगें उभयतांलाही अत्यानंद झाला व कपोता पिलांस आलिंगन देऊन आपणास कृतकृत्य मानिता झाला. पुढें पिलें हळूहळू मोठीं होऊन उडूंबागडूं लागली. एक दिवशीं उभयतां कपोत कपोती स्वतः कारितां व पिलांकारितां चारा आणण्याच्या निमित्तानें बाहेर गेलीं असतां, अकस्मात् एका पारध्यानें येऊन त्या पिलांस जाळ्यांत पकाडिलें. तों कपोती चारा घेऊन घरीं येत असतां तिनें तें पाहिलें व अपत्यस्नेहानें आपणही त्या जाळ्यांत जाऊन पारध्याच्या हातीं सांपडली. मागाहून कपोता आला आणि पाहातो तों घरट्यांत स्त्रीपुत्रादि कोणी नाहीं. त्याला तें नेहमीं आनंद देणारें घर स्मशानवत् भासूं लागलें. त्यानें बाहेर येऊन इकडे तिकडे शोध केला तों जाळ्यांत सांपडलेलीं स्त्रीपुत्रादिक त्याला दिसलीं. त्यानें विचार केला कीं, ह्यांच्यावांचून जगून आपणास काय करावयाचें आहे. तरी आपणही

त्यांच्याबरोबरच मरून जावें. नंतर तो स्त्रीपुत्रस्नेहानें त्यांचे जवळ गेला. त्या-बरोबर पारध्यानें त्यालाही बंधन केलें. याप्रमाणें एकमेकांच्या प्रीत्यर्थ त्या एक-मेकांनीं आपले प्राण वेंचिले. जो मनुष्य स्त्रीपुत्रादिकांचे ठायीं आसक्त राहून संसार सुखमय मानून वागतो त्याला काळ परिवारासहीत भक्षण करितो. तो घोरतर अशादुःखांत जाऊन पडतो. असें समजून मी स्त्रीपु-त्रादिकांवर आसक्ती न ठेवितां हा आनंद भोगीत आहें. हा उपदेश मी कपोताजवळून घेतला आहे.

## अजगरापासून मिळालेला उपदेश.

हे राजा ! आतां तूं नववा गुरू अजगर ह्याच्याकडून मिळविलेला उपदेश ऐक. प्रत्येक प्राणी सुख संपादन करण्याविषयीं महत्प्रयास करीत असतो तरी त्याला तें प्राप्त होणें कठीण पडतें. पण दुःख, इच्छा न करि-तांही एकाएकीं प्राप्त होतें. हा अनुभव बहुतेकांस आहे. जसें प्रया-सावांचून दुःख प्राप्त होतें तसेंच सुखही प्राप्त झालेंच पाहिजे. हें रहस्य जाणून, सुखदुःख प्राप्तीचें कारण पूर्वकर्म आहे. करितां त्याला सत्य मा-नून, संसार प्रपंच टाकून, अजगराप्रमाणें प्रारब्धावर भरंवसा ठेऊन राहावें. हे राजा ! स्वर्ग, मृत्यु, पाताळ या तिन्ही लोकीं इंद्रियसुख प्रारब्धाप्रमाणें सर्वांस सारखेंच मिळतें. जसें कुत्र्याचा जन्म होतांच त्यास विषय-सुखाप्रीत्यर्थ कुत्री मिळते, त्याचप्रमामाणें स्वकर्माच्या तपःसामर्थ्यानें स्वर्ग-लोकींचें राज्य प्राप्त झाल्यास उपभोगार्थ इंद्राणी प्राप्त होते. इंद्र इंद्राणीशीं संयोग पावून स्वर्गांत जो आनंद अनुभवितो तोच आनंद कुत्रा कुत्रीशीं संयोग पावून इहलोकीं मिळवितो. हें सुख उच्च नीच सर्व प्राण्यांस समान मिळतें. ह्या सुखाला खरें सुख मिळणें, समजूं नये.

जसा अजगर मनांत भय न बाळगितां प्रारब्धावर विश्वास ठेवून एका जागीं पडून राहतो, व ज्या ज्यावेळीं जें जें मिळेल तें तें भक्षण करून संतोष पावतो, त्यांत कमीजास्त किंवा कडू, गोड इत्यादिकांचा विचार करीत नाहीं, कांहीं काळ खावयास मुळींच मिळालें नाहीं, तरी घाबरत नाहीं

आणि आंगांत शक्ति असतांही तिचा उपयोग करावयास जात नाहीं, तद्वत् मुमुक्षुनीं प्रारब्धावर विश्वास ठेवून, अल्पस्वल्प जें कांहीं वेळीं मिळेल, तें भक्षण करून, प्रसंगीं कांहीं मिळालेंनाहीं तरी स्वस्वरूपीं लय लावून बसावें. ह्याप्रमाणें वागल्यानें दर्शनादि व्यापारांचा लोप होतो. अशी वृत्ति धारण केल्यानें प्रारब्धाचा नाश होत नाहीं. हें ज्ञान अजगराजवळून संपादन करून मी आनंद भोगीत आहें.

## समुद्रापासून घेतलेला बोध.

हे राजा ! आतां तुला दहावा गुरु जो समुद्र त्याचे गुण सांगतो. प्रारब्धावर भरंवसा ठेवून सुख किंवा दुःख प्राप्त झालें असतां त्याबद्दल हर्ष किंवा विषाद प्राप्त होऊं देऊं नये. जसा समुद्र वर्षाकालांत अनेक नद्या अपरिमित जल आणून त्यास अर्पण करीत असतां हर्षभरीत होत नाहीं किंवा उन्हाळ्यांत त्यांनीं जल न आणल्यामुळें दुःखी होत नाहीं व त्यामुळें वर्धमान किंवा क्षीण तनु होत नाहीं, त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें स्वधर्माधीन राहून सुखोपभोगांचा लाभ झाल्यानें आनंदीत होऊं नये, किंवा दुःखपरंपरा कोसळल्यानें दुःखी होऊं नये. सदैव आनंदभरीत असावें. समुद्राची लांबी, रुंदी, खोलपणा, त्याचप्रमाणें उदरांतील रत्नादिकांचा ज्याप्रमाणें कोणास पत्ता लागत नाहीं, त्याप्रमाणें आपल्या आंगच्या गुणांचा कोणास थांग लागूं देऊं नये. मात्र त्यांचा परोपकारार्थ नेहमीं उपयोग होऊं द्यावा. हा बोध मीं समुद्रापासून घेतला.

## पतंगापासून घेतलेला बोध.

हे राजा ! आतां तूं अकरावा गुरु पतंग त्याजकडून घेतलेला बोध ऐक. जो मनुष्य पांचही इंद्रियें पांचही विषयांस अर्पण करून विषयांध होऊन वागतो तो जीवंत असूनही मृतप्राय समजावा. ह्याविषयीं याच गुरूपासून उपदेश घेऊन मीं ह्या विषयांचा त्याग केला आहे. जो मनुष्य स्त्री विलासा करितां, स्त्रीची लावण्यता व युवावस्था पाहून मोहित होतो, तो पतंगाप्रमाणें त्यांतच आपला नाश करून घेतो. पतंग पेटविलेल्या दिव्याचें बि-

स्तारलेलें मोहक तेज पाहून मोहित होतो व त्यावर झडप घालून जळून मरतो त्याचप्रमाणें मनुष्याचें समजावें. स्त्रीरूप केवळ अस्थिमांसाचाच चर्मपटानें बद्ध केलेला गोळा होय. त्यांत मल, मूत्रादि परिपूर्ण भरलेली आहेत. योनी ह्मणजे केवळ दुर्गंधीचें उत्पत्तिस्थान,! हे चक्षूंनो! तिला पाहून तुह्मांला कसा बरें कंटाळा उत्पन्न होत नाहीं! हे हरिहरा! परमेश्वरा!! ह्या प्रमाणें विषयसुखाचे स्वरूपाची आठवण होतांच माझें शरीर कसें थरथर कांपत आहे! हे देवा! असा भोग मला कल्पांतीही देऊं नकोस! ह्याप्रमाणें विचार करून मी ह्या संसारांत उदासीन राहत आहें. हें ज्ञान मी पतंगापासुन घेतलेलें आहे.

# भ्रमर व मधमाशी यांच्यापासून मिळालेलें ज्ञान.

हे राजा! आतां बारावा गुरू भ्रमर ह्यापासून घेतलेलें ज्ञान ऐक. भ्रमराला कमळाच्या सुवासाची फार आवड असल्यामुळें तो तें सुख प्राप्त करून घेण्यासाठीं त्याच्यावर जाऊन बसतो. सूर्यविकासीकमळें सूर्यमावळल्याबरोबर मिटत असतात. अशावेळीं तो भ्रमर त्यावर आरूढ असला ह्मणजे त्या कमळाच्या पोटांत बंधन पावतो ह्यावरून विषयासक्तीनें बंधन प्राप्त होतें, हें जाणून मी त्या विषयांत आसक्ति बाळगीत नाहीं. ज्याप्रमाणें भ्रमर एकाच कमलांतील सुगंध सेवीत न राहतां पुष्कळ कमलसुवासांचा आमोद ग्रहण करीत असतो, त्याप्राणें मुमुक्षूंनीं प्रत्येक शास्त्र आपणास करतलामलकवत् होणार नाहीं. हें जाणून, त्यांतील रहस्य तात्पर्य रूपानें ग्रहण करावें, व एकाजागीं मिळणाऱ्या रसास्वादांत बद्ध होऊन न राहतां ईश्वर ध्यान करावें, ह्याप्रमाणें वागलें असतां तो मनुष्य भवपाशांत सांपडून जन्ममरण फेऱ्यांत पडत नाहीं. हा उपदेश मीं भ्रमरापासून घेतला आहे.

हे राजा! आतां त्याच्या पुढचा गुरु दुसरा भ्रमर मधमाशी याचे गुण ऐक. मधमाशी अनेक दुःखें सहन करून अडचणीच्या जागेंत उंच वृक्षावर पोळें बनवून त्यांत मध तयार करिते. तो ती स्वतः खात नाहीं

व दुसऱ्या कोणास खाऊं देत नाहीं. शेवटीं अचानक मध जमा करणारे येऊन, तिचा प्राण घेऊन पोळ्यासुद्धां मध घेऊन जातात. त्याप्रमाणें जो कृपण महत्प्रयत्न करून द्रव्यार्जन करून त्याचा संग्रह करितो तो तें द्रव्य अग्नी, चोर, राजा यांनीं एकाएकीं हरण करून नेल्यामुळें शेवटीं दुःख पावतो, किंवा अनीतिमान् संतती त्यास प्राप्त होऊन ती त्या द्रव्याचा अपव्यय करिते, अगर तो निपुत्रीक मरण पावतो. याप्रमाणें तो कालवश झाल्यावर तें द्रव्य जेथल्या तेथें राहतें अगर भलत्याला प्राप्त होतें. मरते वेळीं त्याची त्या द्रव्यावर इच्छा राहिल्यास तो पिशाच्च किंवा सर्प, होऊन तें द्रव्य वापरणाऱ्यास उपद्रव देतो. ह्याप्रमाणें धनसंचय केल्यामुळें अचानक मरणाची प्राप्ती होते. हा उपदेश मधमाशीपासून घेऊन मीं द्रव्यसंचय करण्याचें सोडुन दिलें.

## गजेंद्रापासून झालेलें ज्ञान.

हे राजा! आतां तुला तेरावा गुरू गजेंद्र ह्यापासून घेतलेला उपदेश सांगतों ऐक. जो मनुष्य स्त्रीवश होतो त्यास बंधन प्राप्त होतें. ह्याकरितां मुमुक्षुपुरुषानें स्त्रीस्वरूप अगर तिची प्रतिमा, चित्र ह्यांचें सुद्धां वारंवार दर्शन घेऊं नये. हा बोध मीं हत्तीपासून घेतला. हत्ती महाबलवान् असणाऱ्या सिंहाशिवाय इतर कोणास भीत नाहीं व कोणालाही वश होत नाहीं. असा बलवान् असतो तरी मनुष्यें त्यास वश करण्यास जमिनींत खड्डा करून त्यावर गवत पसरून एक काष्ठाची हत्तीण करून तिला गजचर्म पांघरून त्या खड्ड्यावर उभी करितात. तिला पाहून हत्ती विषयसुख लालसेनें लुब्ध होऊन त्वरित गतीनें त्या काष्ठाच्या हत्तिणी संनिध येतो व त्या खड्ड्यांत पडतो. त्यामुळें सहजीं मनुष्याच्या हस्तगत होतो. त्याचप्रमाणें जो पुरुष स्त्री सुखास भुलतो, तो तावडतोब बंधनांत येऊन पडतो. स्त्री आपल्या सुखाकरितां पुरुषाला मोह उत्पन्न करिते. जो तिच्या प्रेमांत सांपडतो तो शेवटीं नरकयातना भोगितो. ज्याप्रमाणें कामविकारवश झालेले हत्ती आपआपसांत भांडून मरण पावतात, त्याप्रमाणेंच व्यभिचा-

रिणी स्त्रीच्या मुखास भुलणाऱ्या पुरुषांची गति होते. जो पुरुष यौवनावस्थेंत स्त्रीच्या प्रेमपाशांत बंधन पावत नाहीं त्यास महायोद्धा ह्मणावें. स्त्रीविषय हा अधोगती प्राप्त करून देणारा असल्यामुळें त्याज्य आहे. हा बोध मीं हत्तीपासून घेऊन स्त्रीसुखाव्यतिरिक्त राहून ब्रह्मचर्य पाळून आनंदीत मनानें यथेच्छ कालक्रमण करितों.

## मध हरणकरणाऱ्यापासून घेतलेला उपदेश.

हे राजा ! आतां चौदावा गुरू ' मधुहा ' ( मध जमा करणारा ) याकडून घेतलेला उपदेश तुला सांगतों. जो मुमुक्षु ध्यान, तपादि विद्यांचा अभ्यास करित असेल त्यानें गृहस्थाश्रमी यांचे घरीं जाऊन माधुकरी भिक्षा मागून चरितार्थ करावा व आपलें तप सिद्धीस न्यावें. मधमाशी अनेक श्रम सोसून मधाचा संग्रह करिते, परंतु मधुहा तेथें येऊन, तो मध, मधमाशीला व तिच्या पोरांला भक्षण करावयास न देतां हरण करून नेतो ,व उद्योग केल्यावांचून मधाची प्राप्ती करून घेतो. त्याप्रमाणें साधक पुरुषानें चूलचौका, हांडींभांडीं, अग्नि, लांकूड इत्यादि जमवाजमव करण्याची खटपट न करितां गृहस्थाश्रम्याचे घरचें तयार अन्न मिळवून भक्षण करावें व ईश्वर प्राप्तीच्या उद्योगाकडे त्या वेळाचा उपयोग करावा. आळस, निद्रादिकांत जो हा आपला वेळ गमावितो तो नरकवासाचा मालक होतो. ही वृत्ती कांहीं ख्याली खुशाली करितां नाहीं. ध्यान, निष्ठादि योगांकरितां आहे. असे मुमुक्षु, गृहस्थाश्रमी जनाचें अन्न खाऊन त्यांचें कल्याण करितात. हा बोध मीं ' मधुहा ' पासून घेतला.

## मृगापासून घेतलेला उपदेश.

हे राजा ! आतां तुला पंधरावा गुरू मृग ह्यापासून घेतलेलें शिक्षण सांगतों ते तूं ऐक. ज्याला पवनाप्रमाणें गति असल्यामुळें जो कोणाच्याही हातीं लागत नाहीं तो कस्तूरीमृग मधुरगायनाला लुब्ध होऊन आपला प्राण परस्वाधीन करितो. त्याला पकडण्याकरितां गवयी वीणादि मधुरवाद्यांसह आलापपूर्वक गायन करितात. त्या गाण्याला मोहीत होऊन देहभान

विसरून तो कस्तूरीमृग मनुष्यांच्या हातीं सांपडतो व ते त्याचा वध करून त्याच्या नाभींत सांपडणारी कस्तूरी काढून घेतात. त्याप्रमाणें जो पुरूष स्त्रीच्या गायनाला भुलून आपलें धन यौवन परस्वाधीन करून मूर्ख बनतो, तो जन्म मरण दुःखें वारंवार भोगींत राहातो. हा गायनविषय इतका मोहक आहे कीं, ऋष्यशृंगमुनींसारखे त्याच्या योगानें बंधनांत पडले; यास्तव अशा स्त्रीगायनाच्या नादीं न लागतां भगवत् गुणानुवाद वर्णन करावे. हा गुण मी मृगापासून घेतला आहे.

## मत्स्यापासून झालेलें ज्ञान.

हे राजा! आतां तुला सोळावा गुरु मत्स्य ह्यापासून घेतलेला उपदेश सांगतों. ऐक. ज्यांची पाण्यांत स्वैरगति असल्यामुळें जे कोणाच्या बंधनांत सहसा सांपडावयाचे नाहींत, ते मत्स्य लोखंडाच्या गळाला मांस बांधून तो गळ पाण्यांत सोडल्यानें तें मांस खाण्यास भुलून तो गळ गिळितात, व पकडले जाऊन प्राणास मुकतात. त्याप्रमाणें मनुष्य जिह्वेच्या स्वादांत बद्ध झाल्यानें जननमरणरूपी भोंवऱ्यांत गोते खात राहतो. ह्या स्वादाची मनाला आठवण होतांच जिह्वेला पाणी सुटतें, त्याचा सुवास नासिकाद्वारें मनाला कळतांच तें निर्लज्जपणें त्याची मागणी करण्यास तयार होतें. ह्या जिह्वेस तृप्त करण्यासाठीं घरेंदारें, शेतभात, पुत्रकांचन इत्यादिकांचा विक्रय केला जातो, तरी त्याची तृप्ती ही होत नाहींच, मोठमोठ्या शत्रूंला जिंकणारे पराक्रमी पुरूषही ह्या अल्प इंद्रियांचे गुलाम होऊन राहातात, ही मोठी आश्चर्यकारक गोष्ट नाहींकाय? ज्याला जीभ आवरतां येत नाहीं, त्याला गुह्येंद्रियें कशीं वश कारितां येतील? ह्या दोन इंद्रियांच्या आधीन झाल्यानें कलियुगांतील एकंदर आपत्ती प्राप्त होतात. अनेक जन्म घ्यावे लागतात. याकारितां प्रत्येक मनुष्यानें रोज थोडथोड्या प्रमाणानें जिव्हेला आवरीत आवरीत शेवटीं पूर्णपणें आपल्या ताब्यांत आणण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे अखेर ती जिंकली जाइल. जो साधक जिभेला जिंकतो तो हळूहळू सर्व इंद्रियांला त्याच प्रमाणें वश करूं शकतो व सर्वत्र विजय

१३१ ... ९.५.२

संपादन करितो. हा उपदेश मी मत्स्याजवळून घेतला.

## वेश्येपासून घेतलल शिक्षण.

हे राजा ! आतां तुला पिंगलानामक वेश्येपासून ह्मणजे सतराव्या गुरूपासून घेतलेला उपदेश कथन करितों. जी स्त्री एका पुरुषाबरोबर लग्न न करितां रोज नवे नवे पुरूष उपभोगिते तिला वेश्या ह्मणतात. ती वाघाप्रमाणें उलट्या काळजाची असते. त्याचप्रमाणें अपवित्र व निर्लज्जही असते. जो मूर्ख पुरूष असेल तोच अशा स्त्रीचा समागम करितो व आपलें धनयौवन घालवून अंतीं अधोगतीला जातो.

पूर्वीं विदेहनामक नगरांत पिंगला या नांवाची एक वेश्या रहात होती, तिचें तेज व चंद्रकांतितुल्य नयन मनोहर होते. त्याचप्रमाणें रूप गोंडस तरूण जनांच्या मनाला चटका लावून टाकणरें असें होतें. तिला पाहून बरेच तरूण पुरूष मतिभ्रष्ट झाले होते व प्रतिदिनीं नवीन नवीन तिला वश होत असत. ती परिहासपूर्वक गायन करून धनवंतांला भुलवून त्यांचेकडून धन हिरावून घेत होती, तरी तिची आशा तृप्त झाली नव्हती.

एक दिवस तिला कोणी योग्य पुरूष न मिळाल्यामुळें ती उत्तम वस्त्रालंकार धारण करून, रम्य वेष करून, नेत्र कटाक्ष फेंकीत दरवाजांत विषयांधपुरूषप्राप्तीच्या इच्छेनें फिरत होती. कर्मधर्मसंयोगानें त्यादिवशीं कोणी पुरूष तिला भेटला नाहीं. त्यामुळें तिला निद्रा आली नाहीं. ती निराश होऊन ईश्वरी इच्छेचा विचार करूं लागली. विचार करितां करितां तिला वैराग्य उत्पन्न झालें व ती ह्मणाली, हाय ! हाय !! माझ्यासारखी मतिहीन, दुराचारी, हतभागी दुसरी कोणती स्त्री असेल !!! अरे ! मी द्रव्यविषय लोभानें अंध बनून माझें शरीर अनेक पुरुषांस अर्पण केलें ! धिक्कार असो, ह्या माझ्या मनुष्यजन्माला !! सुंदरतर याप्रकारचा हा मनुष्यदेह लाभला असतांही मीं आजपर्यंत एकही सत्कृत्य केलें नाहीं. अर्थात् माझ्यासारखी अभागी स्त्री कोण असेल !!! हे मना ! आजपर्यंत त्वां जें अनन्वीत आचरण

केलें त्याबद्दल पश्चात्ताप करून तूं त्या सर्व दुर्गुणांला ह्यावेळापासून सोडून दे. विश्वाधार, अंतर्यामस्थित ईश्वर पति करून त्याचे समागमें रतिसुख भोगशील तर असा शोक करण्याचा प्रसंग तुजवर येणार नाहीं. हे प्रभो ! आजपर्यंत मी केलेल्या माझ्या अपराधांची तुह्मी मला क्षमा करा. मी असा संकल्प कारितें कीं, आजपासून विश्वनियंत्या परमेश्वराशिवाय अन्य पतीशीं रमणार नाहीं. असा निश्चय कारितां कारितां तिला निद्रा आली. जोंपर्यंत मनुष्याच्या आंगीं आशा प्रबल असते तोंपर्यंत त्याला सुखनिद्रा लागत नाहीं. ज्या पुरुषानें आशेचा त्याग केला त्याला या संसारांत एकही दुःख बाधत नाहीं, हा बोध मीं पिंगला वेश्येकडून घेतला.

## टिटवीपासून झालेलें ज्ञान.

हे राजा ! आतां तुला अठरावा गुरू टिटवी हिच्यापासून घेतलेला बोध सांगतो. एका जंगलांत टिटव्यांचा मोठा समुदाय होता. त्यांनी एकदां बरेंच मांस गोळा केलें व तें समसमान वांटून घेऊन भक्षण केलें. त्यापैकीं एका टिटवीनें आपला भाग न खातां संग्रहीं ठेविला. तें पाहून इतर सर्व टिटव्या तिला ह्मणाल्या, ' तूं हें मांस चोरून ठेविलेंस असें दिसतें ' असें ह्मणून सर्वजणी तिला मारूं लागल्या. तेव्हां पुष्कळांपुढें आपलें चालावयाचें नाहीं, उगाच मार खाऊन प्राण मात्र जाईल, कारितां यांचें ह्मणणें खोटें होतें तरी तें खरेंच असें समजून तिनें तें मांस त्यांच्या स्वाधीन केलें. तें पाहून मी निश्चय केला कीं, संग्रह करणें हें दुःखाचें साधन आहे. जो विद्वान् मनुष्य धनादिकांचा संग्रह सोडून दूर राहतो तो सदैव सुख भोगितो. संग्रह करणारांचें चित्त सदैव संग्रहीत वस्तूंकडे वेधल्यानें त्याला ताब्यांत ठेवितां येत नाहीं. ह्याकरितां कोणीही क्षुद्र आशेला न फसतां ईश्वरप्राप्ती करून घ्यावी. हा बोध मी टिटवीपासून घेतला आहे.

## बालकापासून घेतलेला बोध.

हे राजा ! आतां तूं एकोणीसावा गुरू बालक त्यापासून घेतलेला बोध

ऐक. बालक धुळींत खेळत असतां सुगंध परिमळ मिळाला किंवा सत्कार अगर तिरस्कार केला तरी त्याबद्दल आपला आनंद सोडीत नाहीं. दोरी किंवा सर्प पाहून त्यांमध्यें भेद भाव मानीत नाहीं. पुण्य, पापाची कल्पनाही मनांत आणीत नाहीं. सुकाळ किंवा दुष्काळ याची चिंता करीत नाहीं, माझ्या घरांत अमूक वस्तू नाहीं करितां ती संपादन केली पाहिजे, त्याची किंवा परिवाराच्या पाळनाची मुळींच चिंता करीत नाहीं. भूक लागली ह्मणजे जें मिळेल तें खाऊन आपल्याशींच क्रीडा करीत असतें; त्याप्रमाणें जो मनुष्य घरांत राहात असतां ह्याप्रमाणें वर्ततो त्याला अंतर्निष्ठ पण येतें. ह्या माईक संसारांत कोण कोणाचा परिवार आणि कोठें कोणाचें घरदार ! हा सर्व चिंतेचा बाजार असल्यानें अन्न कशानें मिळेल ? लोकांबरोबर प्रीती कोणत्याप्रकारानें होईल ? सुकाळ कसा होईल ? दुःखाचा अंत कसा होईल ? लोकांत मी कसा प्रसिद्ध होईन ? अशा विचारांत जो राहतो त्यानें हजारों वर्षें जरी शास्त्र श्रवण पठण केलें तरी त्याची अंतरशुद्धि व्हावयाची नाहीं. हें जाणून मी मानअपमान सोडून जगतास प्रारब्धाधीन समजून सर्व चिंतेचा परिहार करून बालकवत् होऊन राहतों, त्यामुळें ह्या आनंद भोगीत आहें.

## कुमारिकेच्या कंकणासून बोध.

हे राजा ! अतां तूं विसावा गुरु कुमारीकंकण याजकडून घेतलेला बोध सांगतों तो ऐक. ज्या मुमुक्षूस आपली वृत्ती शांत करून आनंदाची प्राप्ती करून घेणें असेल त्यानें एकटें राहून अभ्यास करावा. कुणीएकप्रसंगीं मी एका गांवांत गेलों होतों, तेथें एका ब्राह्मणकन्येचे घरीं एक ब्राह्मण पाहुणा आला होता. तो येण्यापूर्वी ह्या ब्राह्मण कन्येचे आईबाप बाहेरगांवीं गेले होते. तिनें आलेल्या ब्राह्मणास भोजन घालण्याचा विचार केला. परंतु घरांत पाहते तों तांदूळ नाहींत, त्यामुळें ती साळी सडीत बसली. तिच्या हातांत बांगड्या होत्या त्या सडतांनां वाजूं लागल्या. त्यामुळें त्या कन्येनें हातांत दोन दोन बांगड्या ठेवून बाकीच्या वाजूंनये ह्मणून उतरून ठेविल्या

तरी त्या वाजण्याचें बंद झालें नाहीं. शेवटीं आणखी एकेक बांगडी काढून ठेविली तेव्हां त्या वाजण्याच्या बंद झाल्या. तेणेंकरून ती कन्या आनंदीत झाली. तिनें भात सडून जेवण तयार करून त्या ब्राह्मणास भोजन दिलें. ह्यावरून मला ज्ञान मिळालें कीं, ज्या ठिकाणीं पुष्कळ मनुष्यें एकत्र वास करीत असतील तेथें कलह होतात व दोन प्रीतीचीं मनुष्यें एकत्र राहिल्यास वार्तालाप होतो. त्यामुळें मनोवृत्ती शांत होत नाहीं. या कारितां ध्यान, योगादि करणाऱ्यानें निर्जन प्रदेश शोधून काढून त्या ठिकाणीं एकटें राहावें. दुसऱ्याच्या संगतीनें शांतवृत्तीचा भंग होतो, हा बोध मीं कुमारिकंकणापासून घेतला.

## सर्पापासून घेतलेला बोध.

हे राजा ! आतां तूं एकवीसावा गुरू सर्प याजकडून घेतलेला बोध ऐक. दोन सर्प कधींहीं एकत्र राहात नाहींत, किंवा समागमें फिरत नाहींत. शब्द न कारितां सावधपणें फिरतात. आपल्याकारितां राहाण्यास घर न कारितां वाटेलत्याच्या घरांत जाऊन राहातात. उघड रीतीनें फिरत नाहींत प्रमाद नसतां निंदाही करीत नाहींत व अपकार केल्यावांचून कोणावर कोप करीत नाहींत. त्याप्रमाणें बुद्धिमंतांनीं दोघांनीं बरोबर फिरूं नये. पारीमित भाषण करावें. कोणाशीं तंटाभांडण करूं नये. बिचारानें वागावें. स्वतःच्या राहाण्याकारितां मठ न बांधितां वाटेल तेथें राहून आयुष्य घालवावें. आपले गुण दुसऱ्यास कळूं देऊं नये. राहण्यास घर बांधिल्यास अभिमान उत्पन्न होतो व त्यामुळें लोभ जडतो. सभा करून भाषण करूं नये. मरणाची धास्ती बाळगूं नये. गाढ निद्रेचा त्याग करून सावध असावें. कोणावर कोप करूं नये. अशा प्रकारें दिवस निर्गमन करून, मनुष्य देहाचें सार्थक करून घ्यावें. हा बोध मीं सर्पाजवळून घेतला.

## शरकारापासून मिळालेलें शिक्षण.

हे राजा ! आतां तूं बावीसावा गुरू शरकार याजकडन घतलेलें गुण ऐक. ऐकेदिवशीं एक कारागीर एकाग्रचित्तानें बाणाचें पातें तयार क-

रीत बसला होता. त्याच्याजवळून राजाची स्वारी वाजतगाजत सरंजामांसह गेली. मागाहून एक मनुष्य आला त्यानें त्याला विचारिलें, तुझी ह्या वाटेनें राजाची स्वारी गेली ती अवलोकन केली काय?

**कारागीरः**—अरे बाबा! मी आपल्या कामांत गर्क झालों असल्यामुळें मला तें कांहीं कळलें नाहीं. हें ऐकून तो मनुष्य आश्चर्य चकित झाला. त्याप्रमाणें मुमुक्षूनें सर्व इंद्रियें ईश्वराचे ठिकाणीं लीन करून ध्यान धरावें. द्वैतभाव विसरून जावा व स्वस्वरूपाची प्राप्ती करून घ्यावी. त्या योगें अशा योग्यास शोक मोह बाधा करूं शकत नाहींत. हें ज्ञान मी शरकाराकडून घेतलें.

## पेशकारापासुन मिळालेला बोध.

हे राजा! आतां तूं तेविसावा गुरु पेशकार ( भ्रमरकीट ) याचे गुण ऐक. जो प्राणी सदैव ज्याचें ध्यान कारितो, तो त्या ध्यानामुळें परिणामीं तदाकार होऊन जातो. भ्रमर मातीचें घर करून त्यांत एक कीडा आणून ठेवितो व त्यास वरचेवर येऊन सुंक मारित राहातो. त्यामुळें त्या किड्याला भ्रमराचें ध्यान लागून राहतें व तो शेवटीं भ्रमर बनतो. त्याप्रमाणें मुमुक्षूनें गुरूपदिष्ट मार्गानें ईश्वराचें ध्यान धरावें, ह्मणजे तो ईश्वर स्वरूप होईल. ह्यांत आश्चर्य तें काय? ज्याअर्थीं अन्य जातीचा किडा भ्रमरध्यानानें भ्रमरस्वरूप होतो त्या अर्थीं एकस्वरूपी असणारा आत्मा हा परमात्मा ( ईश्वर ) होईलच होईल. कारितां स्नेहानें किंवा भयानें तरी ईश्वराचें ध्यान धरावें हा गुण मीं भ्रमरकीटकाकडून घेतला.

## कोळ्यापासून घेतलेला गुण.

हे राजा! आतां तुला चौविसावा गुरु कोळी ह्याचे गुण सांगतों ते तूं ऐक. कोळी आपल्या नाभींतून तंतू काढून त्यांचे घर बनवितो आणि त्यांत अहोरात्र क्रीडा कारितो व मनास वाटेल तेव्हां पुन्हा त्या घरास गिळून स्वतंत्र होतो; तसाच ईश्वर इच्छामात्रें करून जग उत्पन्न करून त्याच्याशीं नाना खेळ कारितो आणि मनास येईल तेव्हां त्याचा इच्छा मात्रेंच नाश

करून आपणच एकटा राहतो. जसा कोळी पुन्हा पुन्हा तंतू काढून घर करूं शकतो, त्याप्रमाणें ईश्वर इच्छामात्रें चराचर जग उत्पन्न करून त्याचा आपल्याच आंगीं लय करून, पुन्हा मनास येईल तेव्हां पूर्ववत् तें निर्माण करितो. सत्व, रज, तम, शक्ति सहीत ईश्वराधीन असल्यामुळें त्याला भजल्यानें सर्व उपाधि नाश पावतात. मनुष्याच्या प्रसन्नतेनें वासनेचा क्षय होत नाहीं व जन्ममरण फिटत नाहीं. ज्यावेळीं सृष्टीरचनेचा विचार ईश्वर करितो त्यावेळीं गुणात्मकमायेस प्रकट करून हा आत्मा एक असतां उपाधिगुणभेदेंकरून तिच्या साह्यानें अनेक स्वरूपी बनवितो. ह्मणून हें नामरूपात्मक जग मायीक असल्यामुळें मिथ्या मानलें जातें. जसा कोळी इच्छामात्रें घराची सामुग्री तयार करितो तसा आत्मा स्वतः निमित्तोपादान कारण होऊन जगस्वरूप धारण करितो. ईश्वर सर्व व्यापक आहे व तोच मीही आहें हें ज्ञान मी कोळ्या पासून घेतलें आहे.

हे राजा! निर्विकल्पब्रह्मज्ञान पूर्णवैराग्यावांचून हृदयांत टिकत नाहीं. यास्तव मीं माझ्या देहास गुरू करून जो बोध घेतला तो तूं ऐक. हा देह माझा माझा ह्मणून सर्व प्राणी त्याचें पालन करितात. परंतु अंतीं त्यास कोल्हे कुत्रे खाऊन टाकितात. यासाठीं याला भाडोत्री गाडीप्रमाणें समजून, रक्षणापुरता आहार ठेवून ईश्वरप्राप्तीच्या कामीं खर्चीं घालावा. ह्यांत जो प्रमाद करितो तो शरीरांतून निघून गेल्यावर पश्चात्ताप करितो. हा देह आईबापांच्या अशुद्धतनूपासून उत्पन्न झाला आहे. त्यामुळें ह्याला धारण करणें मला लाजिरवाणें वाटत आहे. मनुष्य त्रिविध कर्मांच्या वासनेनें बांधलगेल्यामुळें, त्याच्या बीजांपासून जो देह उत्पन्न होतो, तो त्रिविधतापाचें मूळ आहे असें समजून मी देहाभिमान सोडून वागत आहें व वासनेचा क्षय करून आनंद प्राप्ती करून घेत आहें. हें ज्ञान मी माझ्या देहास गुरू करून प्राप्त करून घेतलें. ह्याप्रमाणें पंचवीस गुरूंचे गुण घेतल्याशिवाय मोक्षलाभ व्हावयचा नाहीं.

ह्याप्रमाणें पंचवीस गुरूपासून मिळविलेला बोध त्या दिगंबरस्वरूपी श्रीदत्तमहाराजांनीं आपला भक्त ययातीपुत्र यदुराजा ह्यास कथन

केला. तो ऐकून यदूचें चित्त प्रसन्न झालें ! तो सावध झाला, आणि हे माझें इष्ट दैवत श्रीदत्त भगवानच आहेत असें समजून उभयहस्त जोडून, सर्व जगताला ईश्वरस्वरूप समजून ध्यान करून, द्वैतपणा टांकून प्रार्थनापूर्वक साष्टांगनमस्कार करिता झाला. दंभ, दर्प व अभिमान सोडून ईश्वर स्वरूप प्राप्त करून घेतलें. याप्रमाणें सांगून शास्त्रीबुवा मातोश्रीस ह्मणाले, हे माते ! तुह्मींही पण या उपदेशाचा वारंवार विचार करून, त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करावा; ह्मणजे तुह्मांला ईश्वरस्वरूपाची प्राप्ती होईल.

**रमाबाई**:—हे भगवन् ! मला वेद ऐकण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं ?

**शास्त्रीबुवा**:— हे माते ! कलियुगापूर्वी अन्य युगांत ब्राह्मणास्त्रियांला उपवीताचा अधिकार होता व त्यावेळीं त्यांनां वेदश्रवणाचाही अधिकार होता; परंतु कलियुगांमध्यें त्यांनां उपवीताचा अधिकार नसल्यामुळें वेदश्रवणाचाही अधिकार नाहीं. कलियुगांत फक्त ब्राह्मणांला वेद शिकण्याचा व श्रवण करण्याचा अधिकार आहे. त्यावांचुन इतरांस नाहीं. परंतु पुराण ऐकण्याचा मात्र सर्वांस अधिकार आहे.

**रमाबाई**:— हे भगवान् ! कदाचित् आपण केलेल्या उपदेशाप्रमाणें कोणी आचरण करावयास लागलें असतां, विषयवासनांमुळें त्याचें मन विकारवश झालें तर त्या साधकानी काय करावें ?

**शास्त्रीबुवा**:– हे माते ! अशा जनानीं सर्वस्वाचा त्याग करून, सात्वीक बेताबाताचा शुष्क आहार करून अभ्यास करावा, ह्मणजे त्यास ध्यान धरितां येईल.

शास्त्रीबुवा स्वत: श्रीदत्तभगवानाचे अवतारस्वरूपी असल्यामुळें त्यानीं आपल्या आईकडे कृपादृष्टीनें अवलोकन करितांच, त्यांच्या मातेची अज्ञानस्वरूपी हृदयग्रंथी तुटुन नाश पावली. त्यांनी आपल्या मुलास श्रीदत्तभगवान्स्वरूपी पाहून त्याची प्रार्थना केली व आपल्या सर्व अपराधांची क्षमा मागितली.

**शास्त्रीबुवा**:–हे माते! तुह्मी मला यात्रेस जावयास परवानगी द्या. हे माझे दोघे बंधु तुमचें पालन संगोपन कारितील.

ह्याप्रमाणें आईची आज्ञा प्रथम मिळवून नंतर शास्त्रीबुवा. आपल्या पत्नीस ह्मणाले, हे प्रिये! मी तीर्थयात्रेस निघालों आहें. तर तूं घरीं राहून माझ्या मातोश्रीची सेवा करीत जा.

**अन्नपूर्णाबाई**:– ह्या दासीनें हाकालपर्यंत आपलें वचन कधीं उल्लंघन केल्याचें आपल्यास आढळून आलें आहे काय? असें असतां आपण मला सोडून एकट्यानेंच तीर्थयात्रेस जाण्याचा विचार काय ह्मणून कारितां? स्त्रियानीं पति समागमें तीर्थयात्रा करावी असें शास्त्रवचन आहे. ह्याकरितां कृपा करून ह्या दासीला समागमें घेऊन जावें. कदाचित् आपण अपराधरहित अशा ह्या आपल्या दासीला ( मला ) सोडून जाल तर मी प्राणत्याग करीन.

ह्याप्रमाणें अन्नपूर्णाबाईचें भाषण ऐकून शास्त्रीबुवा प्रसन्न झाले व पत्नीला समागमें घेऊन, बंधूनां आईची सेवा करण्याविषयीं आज्ञा करून, स्थापन केलेल्या श्रीदत्तभगवानाच्या मूर्तीला बरोबर घेऊन जाण्याच्या उद्देशानें देवालयांत जाऊन देवाला साष्टांग नमस्कार करून, त्याची प्रार्थना करूं लागले:—

**प्रार्थना.** [ चाल–मला शांत मुनि० ताल—झंपा. ]

**नरा दत्तगुरु हें परब्रह्म आहे । होई जागृत उगा फससि मोहें ॥ नरा० ॥ दत्तगुरु मन्मनी दत्तगुरु लोचनी ॥ दत्तगुरु यद्वचानि भरुनि कानीं ॥ दत्तगुरु बाहेरी दत्तगुरु अंतरीं ॥ दत्त सर्वांतरीं भरुनि राहे ॥ नरा० ॥१॥ ब्रह्म हा दत्तगुरु विष्णु हा दत्तगुरु ॥ रुद्र हा दत्तगुरु सत्य आहे ॥ दत्तगुरु तारक दत्तगुरु कारक ॥ शशक्तिधर लोक साक्षीच आहे ॥ नरा० ॥ २ ॥ दत्तगुरुवांचुनि किमपि नाहीं जनीं ॥ दत्तगुरुवांचुनि सुरही नोहे ॥ दत्तगुरुवांचुनी काय फळ वांचुनी ॥ जाय फळ सोडुनी भोगितां हे ॥**

नरा० ॥३॥ माय फळ पाजिते काय फल होय तें ॥ जाय फलें पुण्यतें भोग नासे ॥ मोहफळ दे त्यजुनि नाहीं फल याहुनी म्हणवुनि दत्तगुरुपाद पाहें ॥ नरा० ॥४॥ भोग खोटा नको याग ताठा नको ॥ यागताठा नकोधरूं विमोहें ॥ दत्तगुरुवांचुनी चित्त न धरी जनीं ॥ दत्तगुरु घे मनी भरुनि स्नेहें ॥ नरा० ॥५॥ या युगीं साधनें वावुगीं गुरुविणें ॥ नाउगीं तूं शिणें शास्त्रमोहें ॥ वासुदेवोक्त हें तत्व मनिं जाणुनी ॥ दत्तपदिं सक्त त्यां सौख्य लाहे ॥ ६ ॥ ॥ ॥ ॥

ह्याप्रमाणें प्रार्थनापूर्वक नमस्कार करून श्रीदत्तमहाराजांची मोठी मूर्ती व दुसरी अंगुष्ठप्रमाण मूर्ती आणि पादुका बरोबर घेऊन मातोश्रीस नमस्कार करून शास्त्रीबुवा पत्नि अन्नपूर्णाबाई इच्यासह श्रीनरसोबाचेवाडीस जाण्याकरितां निघाले.

श्रीकृष्णपरमात्म्यानें ज्यावेळीं गोकूळ सोडूनें मथुरेचा मार्ग धरिला त्यावेळीं ज्याप्रमाणें एकंदर व्रजवासीजन दुःखभरित होऊन शोक करूं लागले, त्याचप्रमाणें शास्त्रीबुवा जावयास निघतांच माणगांवी वास करणारे सर्व लोक दुःखाकुल होऊन हाहाकार करूं लागले. त्यावेळीं वृक्ष, पशुपक्ष्यादिक सर्व प्राणीच शोक करितात कीं काय असा भास झाला. जें माणगांव शास्त्रीबुवा राहत असतानां नंदनवनाप्रमाणें शोभायमान दिसत होतें, तेंच आतां स्मशानवत् दिसूं लागलें आहे. गांवांतील सर्व मंडळी शास्त्रीबुवांस पोहोंचविण्यासाठीं माणगांवच्या सीमेबाहेर पर्यंत आली होती. ंतर शास्त्रीबुवांनी सर्व मंडळींस सांगितलें कीं, हे मायाळू मनुष्यानों ! तुम्हीं आतां परत चला. तुह्मीं श्रद्धापूर्वक ईश्वरभजन कराल तर मी नेहमीं तुमच्याजवळच आहें कारितां तुह्मास विरह वाटण्याचें कारण नाहीं. ह्याप्रमाणें त्यांचें सांत्वन करून त्यांनां मागें परतविले. त्याचप्रमाणें त्यांनीं आपल्या मातेचें व भावांचें सांत्वन केलें. ते ह्मणाले, हे माते ! प्राणीमात्रांचा संबंध पूर्वकर्मानुसार घडत असतो व त्यामुळेंच तो सतत सारखा राहात

नाहीं. हे सर्व देह बरोबर उत्पन्न झालेले नाहींत व त्याचप्रमाणें बरोबर मरणारही नाहींत. ज्याप्रमाणें उत्पन्न झाले, त्याचप्रमाणें नाश पावणार. देहाचा कोणीही भरंवसा मानूं नये. ज्याप्रमाणें वृक्षाला नवीन पानें फुटतं असतात व जुनीं गळून जात असतात, त्याप्रमाणेंच या मनुष्यदेहाची गोष्ट आहे. करितां तुह्मीं या माझ्या भावांसह घरीं चला. अशी आज्ञा केकेली. त्यावेळीं सर्व लोकांस वाईट वाटलें. ते शास्त्रीबुवांस नमस्कार करून हात जोडून उभे राहिले. रमाबाई पुत्रस्नेहानें गहिंवरून रडावयास लागल्या.

**शास्त्रीबुवा:—** हे माते ! तुह्मी आतां कां रडतां ? श्रीदत्तभगवानांचें ध्यान धरून राहाल तर मी तुमच्याजवळच आहें. असें ह्मणून त्यांनीं मातोश्रीचें सांत्वन केलें. हें ऐकून त्या सर्व लोकांनी शास्त्रबुवांची खालीं लिहिल्याप्रमाणें प्रार्थना केली;—

**ज्या ज्या स्थळीं हें मन जाय माझें ॥**
**त्या त्या स्थळीं हें निजरूप तूझें ॥**
**मी ठेवितों मस्तक ज्या ठिकाणीं ॥**
**तेथें तुझे सद्गुरु पाय दोन्ही ॥ १ ॥**

शास्त्रीबुवा माणगांवाहून पत्नीसहीत निघाले ते सावंतवाडी येथें आले. तेथें त्यांनीं डाकिडवे यांच्या श्रीदत्तमंदिरांत मुक्काम केला. ही बातमी हां हां ह्मणतां सर्व शहरभर पसरली, व शहरांतील लोक त्या ठिकाणी दर्शनाकारितां येऊं लागले. हळूहळू लोकांची फारच दाटी झाली. त्या गर्दींत धक्काबुक्की होऊन एक मनुष्य खालीं पडला व जखमी झाला. हें पाहून शास्त्रीबुवांनीं निश्चय केला कीं, या उपर केव्हांही कोणत्याही शहरांत एकदम जावयाचें नाहीं. कदाचित् जावयाचें झाल्यास गुप्त रूपानें जाऊन तसेंच परत यावयाचें.

सावंतवाडीहून पायरस्त्यानें शास्त्रीबुवा श्रीनरसोबाच्यावाडीस जावयास निघाले, त्या वेळीं त्यांच्याबरोबर श्रीदत्तमाहाराजांचे अनेक पिशाच

गण होते. त्यांनीं रस्त्यानें जातांनां आपणास अनेक गाडे भेटत, तें पाहून त्यांच्या मालकांस हाक मारून सांगितलें कीं, आमचे महाराज येत आहेत, करितां गाडी एकाबाजूस काढून नेऊन उभी करा. गाडीवाल्यानें तें त्याचे ह्मणणें न ऐकल्यामुळें त्या पिशाचगणांनीं ती गाडी उचलून दूर झुगारून दिली. त्यामुळें ती मोडून खिळखिळी झाली व गाडीवान फार दुःख करूं लागला. हें पाहून शास्त्रीबुवांनीं विचार केला कीं, तीर्थयात्रेंत ही उपाधी कामाची नाहीं. तरी आतां श्रीनरसोबाच्यावाडीस गेल्यावर श्रीदत्तमाहाराजांची प्रार्थना करून त्यांचे गण त्यांच्यापाशीं राहाण्याची तजवीज; अगोदर करावयाची. पुढें शास्त्रीबुवा श्रीनरसोबाच्यावाडीस पोहोंचल्यावर त्यांनीं देवास साष्टांगनमस्कार करून त्यांची प्रार्थना केली ती अशीः—

**नर्सोबाचीवाडि जे लोकमान्या । कृष्णातीरा शोभवी जी सुधन्या ॥ अन्या तैसी देखिली म्यां न साची । श्रीदत्ताची राजधानी सुखाची ॥ १ ॥ कृष्णा वाहे पूर्वभागीं जियेच्या । प्रत्यक्षीरीं वास आहे तियेच्या ॥ श्रीदत्ताचा कल्पवृक्षातळीं तो । त्राता ज्यांच्याचिंतनें मोक्ष होतो ॥ २ ॥ जो चिंतितां तत्क्षणि वारि मोहा । त्याच्या पदीं संतत ठेवि देहा ॥ मोहांतका तारिं मला परेशा । नाहीं तुझ्यावीण शरण्य धीशा ॥३॥**

ह्याप्रमाणे प्रार्थना झाल्यावर शास्त्रीबुवांनीं त्याजप्रमाणें अन्नपूर्णाबाईनीं देवास साष्टांगनमस्कार केला. पूर्वीं नारायणस्वामी ज्या खोलींत राहात त्या ठिकाणीं त्यांनीं आपला मुक्काम केला. ह्यावेळीं मावशी दुर्गाबाई तेथें राहात होत्या. शास्त्रीबुवांनीं अन्नपूर्णाबाईस त्यांच्या स्वाधीन केलें व आपण गोविंदस्वामी आणि मौनीस्वामी यांजपाशीं येऊन त्यांस साष्टांगनमस्कार करून आपली सर्व हाकिगत निवेदन केली. ती ऐकून व भगवल्लीला समजून ते दोघेस्वामी हर्षभरीत झाले.

ह्या ठिकाणीं शास्त्रीबुवा एक वर्षपर्यंत राहिले. त्या ठिकाणीं अन्नपूर्णाबाईस पुत्रलाभ झाला. परंतु तो मुलगा थोड्यादिवसांनीं कालवश झाला.

त्यामुळें अन्नपूर्णाबाईंस फार दुःख होऊन त्या शोक करूं लागल्या.

**शास्त्रीबुवाः**—तूं मेलेल्या पुत्राचा शोक सोडून देऊन आपलाच विचार कर आणि ह्या शोकसागरांतून मुक्त हो.

**अन्नपूर्णाबाईः**—हे प्राणनाथ! पुत्रशोक शांत होण्यासाठीं मी काय उपाय करूं तें कृपाकरून मला सांगावें.

**शास्त्रीबुवाः**—हे प्रिये! गंगानांवांच्या एका मुलीचा पति मरण पावल्यामुळें ती दुःखी होऊन श्रीगुरूंस शरण येऊन ह्मणूं लागली,

हे गुरुराया! मी आपणास शरण आलें आहें, माझे पति मरण पावल्यामुळें मी परार्धीन होऊन घरधंद्यांत पडलें आहें. मला स्वप्नांतही सुख कसें तें मिळालें नाहीं. सासुरवासाचें दुःख पतीवर दृष्टी ठेवून सहन करीत आयुष्याचे दिवस कंठीत असतां पतीचा घात झाला. पुढें मागें परमानंदाची प्राप्ती होईल अशी आशा होती ती नाश पावली. आज आपल्याचरणांच्या दर्शनानें तापत्रयाच्या तळतळाटांत मला आनंद प्राप्ती झाली व माझ्या जन्माचें सार्थक झालें. आपलेचरण माझें सर्व दुःख हरण करण्यास समर्थ आहेत असें ह्मणून ती मुलगी गुरुचरणीं लीन झाली.

**गुरुः**—हे वत्से! तूं कोण? व परमानंदाची प्राप्ती करून देणारा विरहित झालेला तुझा प्रिय कोण? तें प्रथम तूं मला सांग.

**कन्याः**—मी काश्यप गोत्रांत उत्पन्न झालेल्या देवदत्त नांवाच्या ब्राह्मणाची मुलगी आहें. विष्णुदत्त ह्या नांवाचे माझे प्रिय पति मला या दुःख समुद्रांत टांकून आपण निघून गेले. हाय! हाय! हे गुरुराज! मला माझ्या पतीच्या निधनाचें स्मरण होतांच माझें अंतःकरण कसें तिळ तिळ तुटत आहे. अरेरे! अतां मीं काय बरें करावें!

**गुरुः**—वत्से! तूं विनाकारण कां दुःख करितेस? तूं माझें ऐक, माझ्या वचनाकडे तूं आपलें लक्ष लाव.

**कन्याः**—दीन दयाळ गुरुराज! ह्या दीन दासीवर आपण कृपा करावी. ही आपली चरण सेवा करून राहील! हिला आनंद प्राप्ती करून द्यावी.

**गुरुः**—हे मुली ! तूं आपल्या हृदयावर हात ठेवून दुःखानें शब्द काढून रडतेस तेंच हृदय आनंदप्राप्तीचें स्थान व आत्मप्राप्तीची जागा आहे आणि तेंच स्वरूप आहे. ह्या विषयीं तुला माहिती नसल्यामुळें तूं विनाकारण दुःख करीतेस !

**कन्याः**—हे दीनानाथ ! आपण ह्मणतां तें कसें ? हें मला कृपा करून समजावून सांगावें ?

**गुरुः**—हे ब्राह्मणाच्या मुली ! ही 'मी' हा शब्द बोलतांना मस्तकावर, डोळ्यां वर अथवा शरीराच्या इतर कोणत्याही भागावर हात ठेविला जात नाहीं. तो तर हृदयावरच ठेविला जातो. त्याप्रमाणें तूंही तो हृदयावरच ठेविला होतास. यावरून तूंच विचार कर कीं, परमेश्वरास राहण्यास सर्व प्राणी मात्रांचें हृदय हेंच स्थानें आहे असें शास्त्र व अनुभवीक लोक सांगतात. ज्याला जीवात्मा ह्मणतात तोच ईश्वर आहे. ह्याप्रमाणें तुला शास्त्र, गुरु किंवा स्वतःचा अनुभव ह्यांवरून समजलें असतें तर आज असें दुःखकरण्याचें कारण उरलें नसतें. ह्यावरून सहज असें दिसून येतें कीं, तुजला जड चैतन्याचा विवेक नाहीं. तूं ह्याजडावर नांव, रूप, कुळ, गोत्र, जाति इत्यादिकांची कल्पना करून त्या देहास मी आणि माझें ह्मणत आहेस, परंतु आत्म्याला वरील पैकीं एकाचाही संबंध नाहीं. तो निर्विकार, निर्विकल्प असा आहे, त्याला नाश नाहीं, वाढ नाहीं, क्षीणता नाहीं, तो अनादि कालापासून आहे तसाच आहे.

**कन्याः**—हे भगवान् ! जड आणि चैतन्य ह्यांचें स्वरूप कसा प्रकारचें आहे हें मला कृपा करून समजावून सांगा ?

**गुरुः**—हे कन्ये ! जो स्वतःला व दुसऱ्याला ओळखीत नाहीं तो जड आहे व स्वतःस व दुसऱ्यास जाणतो तो स्वयंप्रकाश चैतन्य होय ! हेंच निर्विकार, कूटस्थ, साक्षी, चैतन्य; प्रत्यगात्म्याचें स्वरूप अजरामर आहे.

**कन्याः**—हे गुरुराज ! तर मग मीं खोटें काय सांगितलें

उद्वेजयति सूक्ष्मोऽपि चरणं कंटकांकुरः ॥

अर्थः—पायाला कांटा लागला असतां त्याची तिडीक मस्तकापर्यंत जाऊन पोंचते व ज्यास नाकावर माशी बसलेलीही सहन होत नाहीं, त्या देहास जड कसा ह्मणतां येईल?

गुरुः—हेंच तुझें विपरीत ज्ञान आहे. हा देहच जर चैतन्यस्वरूप असता तर वाटेलत्याठिकाणीं राहून पाहूं शकला असता व ऐकूं शकला असता. चैतन्यस्वरूपाला पाहावयास डोळे, ऐकावयास कान, वास घ्यावयास नाक, इत्यादि इंद्रियांची गरज लागत नाहीं. ह्यांची, शरीरासच आवश्यकता असते. ह्यावरून शरीर चैतन्यस्वरूप नव्हे. कारण त्याला इंद्रियांच्या साह्यावांचून कोणतेंही ज्ञान होत नाहीं. ह्यावरून सहज समजतें कीं, अहंकार आणि आत्मा याच्या तादात्म्यामुळें मनुष्यशरीरांत अहंकार आपादतलमस्तकापर्यंत व्यापून राहिलेला आहे. त्यामुळें त्याला निरनिराळ्या अवस्था प्राप्त होतात व तो देह जड असतांही चैतन्यस्वरूपच आहे असा भास होतो. ज्यावेळीं अहंकार अर्धवट विकासीत स्थितींत असतो, त्यावेळीं स्वप्नदशा प्राप्त होते व ज्यावेळीं अहंकार अविकाशी होतो त्यावेळीं निद्रावस्था प्राप्त होते. अशा वेळीं लोकांचे सर्व व्यवहार बहुतेक बंद असतात.

**यात्यस्तं तत्र लोकव्यवहृतिरखिला पुण्यपापानुबंधाः ॥**
**शोको मोहो भयं वा समविषममिदं न स्मरत्येव किंचित् ॥ १ ॥**

असें असल्यामुळें देहास चैतन्य कसें ह्मणावें? दुसरें चैतन्याला जन्म मरण नाहीं, पण देहाचे षड्विकार स्पष्ट दिसून येतात. हा पिंड अन्नमय कोश आहे. याचेकडून शुभाशुभ कर्म होतें. जीवात्म्याला पूर्व देह असल्यामुळें व त्याच्याकडून चांगलें वाईट कर्म घडल्यामुळें त्यास हा देह धारण करावा लागला आहे. आतां ह्या देहामध्यें जर मुक्तिसुखाचा लाभ करून घेतला नाहीं तर पुनः जन्ममरणरूपसंसारचक्राच्या फेऱ्यांत सांपडून वारंवार देह धारण करावा लागतो. हा देह आईबापांनी भक्षण केलेल्या अन्नाचें रस,

रक्त, रेत बनून त्यापासून उत्पन्न झालेला आहे व अन्नापासूनच त्याची वाढ होते. याप्रमाणें हा जड विकारी व दृश्यस्वरूप देह असल्यामुळें त्याला चैन्यतस्वरूप कसें ह्मणतां येईल? आतां तूं विचार कर कीं, पाहाणारा व पाहाण्याचा पदार्थ हे दोन्ही एकच असतील काय? अर्थात् पाहाणारा व पाहाण्याचा पदार्थ हे निरनिराळे असले पाहिजेत व त्याच न्यायानें हा आपल्या पाहाण्यांत येणारा देह निराळा असून देहास पाहाणारा दुसरा देहाव्यतिरिक्त कोणीतरी असलाच पाहिजे. तो देह नव्हे. जें जें दृश्य तें तें सर्व नाश पावणारें आहे, हें वेदांनीं सिद्ध करून दिलें आहे. त्याचन्यायानें देहही नश्वर होय व दृश्य तितकें जड आहे हा वेदांताचा सिद्धांत आहे.

**कन्याः**—हे महाराज! केवळ वेदांताचे सिद्धांत ऐकून बसून राहावें कीं काय?

**गुरूः**—हे मुली! तूंच विचार कर कीं, तुझा व त्याचप्रमाणें इतर सर्वांचें देह हे मातापित्यांचे रक्तरेतापासून उत्पन्न झाले आहेत. त्यांत हाडें, स्नायु, मज्जा, हीं पित्याच्या रेतापासून व मांस, चर्म, रक्त हीं मातेच्या रुधिरापासून बनलेलीं आहेत. याप्रमाणें कफ, वात, पित्त यानीं घटित असा हा देह नऊ महिने रजस्वलेच्या विटाळापासून वाढत असतो. सहामहिन्यांत गर्भपात झाला तर तो गर्भ केवळ मांसाच्या गोळ्याप्रमाणें जड असा दिसून येतो. सातव्या महिन्यांत तालुस्थानाचा भेद करून ईश्वरीचैतन्यानें त्यांत प्रवेश केल्यानंतर तो चलन वलनादि क्रिया करूं लागतो. त्या वेळीं त्याला आपलीं पूर्व जन्मातील पाप पुण्यें आठवूं लागतात. तो मातेच्या गर्भातील कष्टदशेनें अतिशय दुःखी होऊन सोहं शब्दें प्रार्थना करीत असतो. तो वारंवार ह्मणतो कीं, या दुःखांतून मुक्त झाल्यावर मी सोहं शब्दानें आमरण अभेद भावानें श्रीदत्त महाराजांचें भजन करीत राहीन. असा नियम केल्यावर शेवटीं दहाव्रे मासीं जननीला मरणप्राय कष्ट देऊन गर्भाशयांतून योनिद्वारें मलमूत्रादि अशुद्ध पदार्थांसह कीटकवत् बाहेर पडतो. कदाचित् आडवा आला तर जननीच्या प्राणाला धोक्यांत घालतो, अशा

वेळीं त्यास कापून काढून जननीचा प्राण वांचवावा लागतो. अशा दुःख मूलकजन्माचा उत्सव करण्याचें प्रयोजन काय? बरें पुढें पाहावें तों जन्म होतांच आजन्म ईश्वर भजन करण्याचा केलेला निश्चय विसरून जाऊन, बालपणं अनेक प्रकारचे खेळ खेळण्यांत, तारुण्य नानाविषयोपभोगांत व वृद्धावस्था पुत्रपौत्रादिकांचें संगोपन करण्यांत घालवितो. शेवटीं हजारों वृश्चिक एकाच कालीं डसल्यानें ज्याप्रकारच्या वेदना होतात त्याप्रकरच्या वेदना भोगून या शरिराचा त्याग करितो. पुढें कृतकर्मानुरूप श्वान, सूकर, वृक्ष, पाषाण अथवा मनुष्य पश्वादिकांच्या योनींमध्यें जन्म घेतो. मरण्यापूर्वी न्यायान्यायाचा विचार बाजूस ठेवून वाटेल त्याप्रकारें प्राप्त करून घेतलेल्या द्रव्यादि पदार्थांपैकीं एकही वस्तू मरणोत्तर त्या प्राण्याबरोबर येत नाहींच मात्र केलेलें कर्म त्याच्याबरोबर येतें. तें कर्म कोणासही सोडीत नाहीं. याप्रमाणें जीव देहाहून भिन्न आहे. तो देहाचा आश्रय करून राहिल्यामुळें देहाला चलन वलनादि व्यवसाय करितां येतात. तो देहापासून वेगळा झाला ह्मणजे देह अचेतन होतो. त्यासच मृत्यु ह्मणतात. जीव मरत नाहीं. तो अजन्मा, अजरामर आहे. जो देह जीवानें व्याप्त असल्यामुळें प्रीति पात्र झाला होता, तोच जीवव्यतिरिक्त होतांच भयंकर दिसूं लागतो. त्याच्या वरील सर्वांची प्रीति एकदम नष्ट होते. फार काय सांगावें, त्याला कोणीही मग स्पर्श करावयाला तयार होत नाहीं. ज्याला कोणी यत्किंचित् अपमान केलेला ही सहन करवत नव्हता किंवा थोडेंसें दुःख झालें तरी असह्य होत होतें, तोच यावेळीं प्रत्यक्ष दहन करीत असतां ही त्या दुःखाबद्दल सुख दुःख पावत नाहीं व बोलतही नाहीं. यावरून विचार करून पाहा कीं, वेदान्ताचा सिद्धांत खोटा आहे काय?

**कन्याः**—हे भगवान्! हें आपलें ह्मणणें बरोबर आहे. परंतु ब्रह्मदेवानें आमच्या नशिबांत स्त्रीजन्म घातल्यामुळें, आह्मांला वारंवार तोच जन्म घेऊन चुलीजवळच रावावयाचेंना? व पुरुषांनीं मात्र पुरुषार्थ साधावयाचे असेंच कीं नाहीं?

गुरुः—अरेरे ! [illegible] अभिप्रायानें बोललों नाहीं. जीवाला स्त्री, पुरूष, नपुंसक हा भेदभा[illegible] नाहीं. ज्याप्रमाणें पूर्वकर्म असेल त्या प्रमाणें देह प्राप्त होतो. [illegible] त्याला स्त्री पुरुषत्व प्राप्त होतें. अधिष्ठानभूतचैतन्य, पांच ज्ञानें[illegible]ंच कर्मेंद्रियें, पंचप्राण, त्याचप्रमाणें मन, बुद्धि, चित्त व अहंकार [illegible]करणचतुष्टय असे एकोणीस अवयव मिळून हा लिंगदेह बनला आहे[illegible]त प्रविष्ट झालेली चैतन्याची ज्योती तिला जीव ह्मणतात. तिला स्त्री पु[illegible]द नाहीं. पहा ! पुरुषमरो किंवा स्त्री मरो, त्यांचा जीव गेला असेंच [illegible]तो. स्त्रीच्या जीवाला स्त्रीलिंग दर्शक किंवा पुरुषाच्या जीवाला [illegible] अशा भिन्न भावनांनीं को- णी संबोधीत नाहीं. स्त्री[illegible] झाला ह्मणून तोच वारंवार प्राप्त होतो असें मुळींच न[illegible] पुण्याच्या संचयांत जसजसा कमीजास्त पणा होतो तसातसा देहप्र[illegible]होत जातो. त्याचप्रमाणें प्रारब्धवशात् कित्येक संन्यासी, ब्रह्मचारी, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अंध, पांगळे, मुके, बहिरे, शहाणे, मूर्ख, इत्यादि भिन्न भिन्न देहधारी बनतात. जर ब्राह्मणास संन्यासदीक्षा प्राप्त झाली तर "**पुंजन्म लभते माता पत्नी च प्रैषमात्रतः**" प्रैषोच्चारश्रवणानें माता व पत्नी यांस पुढील जन्म पुरुषाचा प्राप्त होतो. जो पुरूष असून स्त्रीवेष धारण करितो किंवा पापाचा संचय जास्त करितो तो पुढीलजन्मीं स्त्रीदेहधारी होतो. याप्रमाणें देह पालट होण्यास पापपुण्याचा थोडा अथवा जास्त संचय हीं कारणें आहेत. स्त्रि- यांला स्त्रीजन्मच जास्त प्रिय असतो. अशा प्रकारचें स्त्रियांचें मूढत्व पुष्कळ ठिकाणीं वर्णिलेलें आहे:—

**अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता ॥**
**अशुचित्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥१॥**
**आवर्तः संशयानामविनयभवनं पत्तनं साहसानां ।**
**दोषाणां सन्निधानं कपटशतमयं क्षेत्रमप्रत्ययानाम् ॥**
**स्वर्गद्वारस्य विघ्नं नरकपुरमुखं सर्वमायाकरण्डं ।**
**स्त्रीयन्त्रं केन सृष्टं विषममृतमयं प्राणिनां मोहपाशः ॥ २ ॥**

इत्यादि अनेक दोष भर्तृहरीनें वर्णिले आहेत. त्याचप्रमाणें वेदांमध्यें उर्वशी नामक देवांगनेचें वचन आहे " स्त्री ही वाघाचें काळीज खाणारी लांडग्याप्रमाणें होय " सहजासहजीं खोटें बोलावयास चुकत नाहीं. सासू वगैरे वडील पूज्य मनुष्यांपैकीं कोणी जरी कदाचित् कांहीं विरुद्ध बोलली तरीं लागलीच जीव देण्यास तयार होते. याप्रमाणें तुह्मां स्त्रियांचें साहस किती ह्मणून सांगूं! थोडा विचार करून पाहिल्यावर दिसून येईल कीं, स्त्रीच्या सहाय्यानेंच पुरुषांला संसार सुखावह होतो. त्यांच्यामुळेंच त्याला धर्म, अर्थ, काम, मोक्ष, यांची प्राप्ति करून घेतां येते.

स्त्रियांच्या सहाय्यानेंच गृहस्थांला पंचमहायज्ञ साधितां येतात. पुरुषानें संपादन केलेल्या पुण्यप्राप्तीचा अर्धा भाग स्त्रियांला मिळतो. एकादा पुरुष शास्त्री, मामलेदार, किंवा मोठा अधिकारी झाला कीं, त्याच्या स्त्रीला शास्त्रीण, मामलेदारीण, अधिकारीण इ[illegible]ा, कोणत्याही अल्पस्वल्प प्रयत्नांवांचून सहजीं लाभतो. त्याप्रमाणें पुष्कळलोक ' तुह्मी आमच्या आई बहिणी आहांत, तुमच्या कृपेनेंच आमचें पोट भरत आहे " इत्यादि आर्जवें करूं लागतात.

**यथा मातरमासाद्य सर्वे जीवंति जंतवः ॥**

मूल भुकेनें व्याकूळ झालें ह्मणजे आईजवळ जातें व कांहीं खाण्याकरितां मिळेल या आशेनें हात पसरितें. ब्रह्मचारी, संन्यासी, ब्राह्मण, राजे इत्यादिकांच्या आई बहिणी स्त्रियाच असतात. त्याच त्यांस अन्न देणाऱ्या होत. कारितां स्त्रियांची मी निंदा केली नाहीं; तर तुह्मांमध्ये असणारे दोष तुह्मांला दिसण्यासाठीं कांहीं बोललों. त्यामुळें तुह्मांला ते समजून टाकून देतां यावे व त्यांमुळें होणारें पातक टाळितां यावें हेंच त्याचें कारण होय. तरी त्याचा विषाद वाटूं देऊं नको. स्त्रियांला आपला जन्मच उत्तम वाटतो ह्याचें कारण मी तुला सांगतों. " **मम इह जन्मनि जन्मांतरे चाखंडसौभाग्यपुत्रपौत्रादिकल्पोक्तफलावाप्तये.** " असा व्रत दानादि सत्कृत्यें करिते वेळीं करण्यांत येणारा संकल्प तुह्मांस गोड लागतो. ह्या संकल्पांत कदाचित् कमीपणा दिसून आल्यास उपाध्येबुवांच्या हातावर पडणाऱ्या

दक्षिणेंत न्यूनत्व येण्याचा बराच संभव असतो. या संकल्पांतील ' **इह जन्मनि जन्मांतरे च ।** ' याचा अर्थ या जन्मांत पति, पुत्र, गृह, धनादि सुखांची जशी प्राप्ती झाली आहे त्याचप्रमाणें ती पुढील जन्मींही व्हावी असा आहे. अर्थात् तुमच्या मनांत असेंच असतें ना ?

**कन्याः**—तर मग आह्मी व्रतें, दानें इत्यादि करावीं कीं, नको ?

**गुरुः**—वः ! वः ! ! बरीच चांगली बुद्धि आपणांस प्राप्त झालेली दिसते ! मी तुह्मांला व्रतें, दानादी करूं नका ह्मणत नाहीं. तुह्मीं हीं कारितां हा पुरुषांवर मोठा उपकारच कारितां. पुरुषांस ज्याप्रमाणें यज्ञ, दान, तप, हीं पावन कारितात, त्याचप्रमाणें बायकांला व्रतें, दानादीक पावन कारितात. कारितां त्यांनीं पतीची आज्ञा घेऊन तीं करावीं. स्वमतानेंच करूं नये. त्याचप्रमाणें वरील सारखे लांब लचक संकल्पही करूं नये. अहंपणा व फलाची इच्छा सोडून, चित्तशुद्धि होण्या कारितां व्रतादिक केल्यानें ईश्वरी कृपाप्रसादाचा लाभ होऊन त्यायोगें स्त्रियांला मोक्षपदाची प्राप्ती होते. स्त्रियांचा जन्म झाल्यापासून दोन वर्षें पर्यंत चंद्र उपभोग घेतो. पुढील दोन वर्षें गंधर्व उपभोग घेतो. नंतर लग्न होईपर्यंत अग्नि उपभोग घेतो. हें शास्त्रप्रमाणानें व दैवीदृष्टीनें कळून येतें. ह्याप्रमाणें देवांनीं उपभोगिल्यामुळें लागलेल्या दोषांच्या निवारणासाठीं, वधुवस्त्रदान ' **सोमाद्युपभुक्तदोषपरिहारार्थं** ' याप्रमाणें संकलपयुक्त करावें लागतें व त्यामुळें त्याबद्दलचा दोष लागत नाहीं.

स्त्रियांस उपनयनाबद्दल विवाह हाच विधि आहे. लग्न झाल्यानंतर पतिसमवेत बसून वेदोक्तमंत्रयुक्त वैदिककर्मकरण्याचा आणि यज्ञांत स्वकीय मंत्र म्हणण्यांचा याप्रमाणें अधिकार ब्राम्हण स्त्रियांस पोंचतात. याशिवाय बाकीचे वेदमंत्र श्रवण करण्याचा त्यांला अधिकार नाहीं. पुरुष मंत्र म्हणत असतां स्त्रिया ते श्रवण करून आपण म्हणतील, तर त्यांना आर्ष द्रव्य चोरल्याचा दोष लागतो. पतीशिवाय एकटी स्त्रीच बसून व्रत पूजादि कृत्यें करील त्यावेळीं तिनें पुराणोक्त मंत्र म्हणावे. ब्राम्हणानीं स्त्रियांकडून वेदोक्त मंत्रांनीं व्रत पूजादि कृत्यें करवूं नयेत. घरचे घरीं माता-

पितरांपासून लिहिणें, वाचणें शिकावें. शाळेंत जाऊन कोणत्याही मुलीनीं शिक्षण घेऊं नये. त्यापेक्षां न शिकणें फार उत्तम. कुलीन स्त्रियांनीं अशा प्रकारें वर्तन करूं नये. विवाह झाल्या नंतर सासू सासऱ्यांच्या हुकुमांत वागून रजोदर्शन होईपर्यंत ब्रह्मचर्य पाळावें. सासु सासरा, नणंद, वडील, दीर इत्यादि माणसांशीं मर्यादशील व प्रेमळ वर्तणूक ठेवावी. यांच्याशी अतिप्रसंग करून अमर्यादपणें वागूं नये. वाचाळपणें भलतें सलतें बोलूं नये. विवाहामध्यें वेद मंत्रांनीं लज्जाहोम होत असतो. ह्मणून त्यांतील प्रतिज्ञेप्रमाणें वागावें. बरें पति बरोबर तरी अमर्याद वर्तन करावें कीं काय? तर "**प्रतिवादाच्छुनी भर्तुः**" ह्मणजे पतिबरोबर वाटेल तसें अमर्याद बोलणारी स्त्री मरण पावल्यानंतर पुढील जन्मीं कुत्री किंवा भालू यांचा जन्म पावून भुंकत राहाते. याप्रमाणें अनिष्ट फळ प्राप्त होतें. आपणास सुमार्गास लावण्यासाठीं सासू, सासरा कदाचित् तिरस्काराचे शब्द बोलल्यास ते सहन करून ब्रह्मचर्यानें राहावें. रजोदर्शनानंतर पतिच्या आज्ञेंत राहून, त्यांच्या सांगण्याप्रमाणें नेहमीं वर्तन ठेवावें. **प्रथमेऽहनि चांडाळी द्वितीये ब्रह्मघातिनी ॥ तृतीये रजकीप्रोक्ता चतुर्थेऽहनि शुध्यति ॥ १ ॥**

या प्रकारेंकरून रजोदर्शनाचे दोष सांगितले आहेत, ह्मणून मागें सांगितल्या प्रमाणें वर्तन ठेवावें. जी स्त्री रजोदर्शन लपविते व दोष पाळीत नाहीं तिला कुत्रीचा जन्म प्राप्त होतो. आणि तिच्याशीं संसर्ग ठेवणाऱ्या इतर संबंधी जनांस पशुयोनि प्राप्त होते. ह्या कारितां कोणीही रजोदोष लपवूं नये. वर वर्णिल्याप्रमाणें पतिव्रताधर्म पाळून, पतिच्या आज्ञेप्रमाणें वागून नेहमीं पतिला आनंदीत ठेवण्या विषयीं तत्पर राहावें. कुबुद्धियुक्त परपुरुषावर दृष्टी ठेवूं नये. कदाचित् दुष्टबुद्धिनें व्यभिचार दोष घडला असतां "**पुंसो या परदारेषु स्त्रीणामपि तदेव हि**" त्याबद्दल पुरुषाला जें प्रायश्चित्त सांगितलेलें आहे, तेंच स्त्रियांलाही सांगितलेलें आहे. तें अवश्य करावें. न केलें तर यमलोकीं अनेक यातना भोगून, कुत्रीं, डुकरी इत्यादि गलिच्छ जातींच्या पशुयोनींत अनेक जन्म घ्यावे लागतात. अशा स्त्रियांस कधींही मोक्ष मिळत नाहीं. ह्या कारितां शुद्धांतःकरणानें व पवित्र आचरणानें वाग-

घ्याची खबरदारी घ्यावी व मोक्ष प्राप्तीचा मार्ग सुलभ करून ठेवावा. विवाहानंतर शुद्ध व पवित्र वस्त्र नेसून जेवण करावें. कासोटा घातल्याखेरीज एकही पाऊल चालूं नये. विवाह समयीं जे कच्छरहीत संस्कार करितात, ते अशास्त्र होत. पतिव्रतांचे इतर धर्म मागें सांगितले आहेत तें पहावे. गर्भवंती झाल्यावर पूर्वी सांगितलेल्या नियमांप्रमाणें भक्षणादि प्रकार सुरू करून योग्य प्रकारें गर्भाचें संरक्षण करावें. प्रसूतीनंतरही बालकास व्याधि वगैरे होऊं नये ह्या कारितां खाणें पिणें बेतशीर ठेवावें. स्त्रीला पती हाच देव आहे. ज्याप्रमाणें शालिग्रामावर विष्णुची दृष्टी असते त्याप्रमाणें स्त्रीनें पति समजून, पति सोपाधिक ब्रह्म अ गी भावना ठेवून वागावें. कदाचित् पूर्वकर्मसंचितानुसार वैधव्य दश **पते ॥** झाली तर **पत्यौ मृते तु नारीणां विधिद्वयमुदाहृतम् ॥ वैधव्यं यया थत्सम्यक्सहाग्निं प्रविशे त्तु वा ॥ १ ॥** त्यांना या प्रकारचे दोन धर्म सां गितले आहेत. यांत वैधव्य पाळण्यापेक्षां सहगमन करणें जास्त उत्तम हें

**वर्तन्ते याश्च सततं भर्तृणां प्रतिकूलताः ॥**
**कामात्क्रोधाद्भयान्मोहात्सर्वाः पूता भवंति ताः ॥ १ ॥**

सहगमन केल्यानें वरील श्लोकांत सांगितलेलीं सर्व पातकें जळून भस्म होतात. देशकालवर्तमानानुसार सहगमन करणें साध्य झालें नाहीं तर ब्रम्हचर्यानें वागून वैधव्य पाळावें. त्या योगें पुत्रहीन असतांही स्वर्गादी सर्व सुखांची प्राप्ती करून घेतां येते. पती मरण पावल्या नंतर पुनर्विवाह करून त्यापासून पुत्रलाभ झाला तर त्यास गोलक कुंड म्हणतात. तो धर्म बाह्य असल्यामुळें अपवित्र होतो. त्याला व त्याचे जननीला आकल्पपर्यंत नरकवास भोगावा लागतो; याकरितां ह्या सर्व गोष्टी पूर्णपणें लक्षांत ठेवून स्वप्नांतही आडमार्गाकडे पाऊल पडूं न देण्याविषयीं स्त्रियांनीं खबरदारी घ्यावी. त्यांनीं पवित्रबुद्धीनें आचार पाळून, मागें सांगितल्याप्रमाणें मलमूत्रोत्सर्ग समयीं मृत्तिका शौच करावें, व आचमन करावें. पाहा कीं ! तुमच्या साहाय्यानें पंचमहायज्ञ आणि अतिथिसत्कार घडत असतात आणि तुह्मीच जर अपवित्रपणें वागूं लागाल, तर त्यामुळें तुह्माला व दुसऱ्यालाही अ-

ज्ञानरूपी बंधन प्राप्त होईल. सदाचारसंपन्न अशा विष्णुदत्तब्राह्मणाच्या पत्नीच्या हातचा स्वयंपाक जेविल्यानें एका ब्रह्मराक्षसाच्या अंत:करणांतील भय निघून जाऊन त्यास पूर्व स्थिति प्राप्त झाली, अशी दत्तमहात्म्यांत कथा आहे. गार्गी, वाचक्नवी, सुलभा, मैत्रेयी या स्त्रीयांनीं पातिव्रत्य व सदाचार यांच्या जोरावर याच जन्मांमध्यें मुक्तीची प्राप्ती करून घेतली! याच् तप:सामर्थ्याच्या जोरावर अत्रिऋषीची पत्नी अनुसूया हिनें ब्रह्मा, विष्णु, महेश्वर यांस बालकें बनविलीं, अनुभवीनें सूर्याची गति कुंठित केली. याप्रमाणें तुमचें सामर्थ्य अतुल आहे. ध्रुव, प्रल्हाद, शुक इत्यादि जगन्मान्य पुरुषांला जन्म देणाऱ्या तुह्मी आहांत! मात्र तुह्मी शास्त्रांत सांगितलेल्या नियमाप्रमाणें वागलें पाहिजे परच हें अलौकिक सामर्थ्य तुमच्या आंगीं प्रगट होईल. रा

आजकाल स्त्रियांनीं पतीची सेवा करणें एकाबाजूस ठेवून, उलट वाघाप्रमाणें पतीला फाडून खाणारच कीं काय! अशा प्रकारचें पतीशीं वर्तन ठेवितात. कदाचित् वैधव्यदशा प्राप्त झाली तर डोक्याचा केशभार निघून गेला व त्यांत उवा पडून होणारा त्रास बंद झाला, असा आनंदच मानून, पालकांच्या आज्ञेनुरूप वर्तन न करितां स्वच्छंदपणानें वागूं लागतात. कोणी गुरूपदेश घेतात. व घरच्या वडील माणसांची भीड, मर्यादा सोडून गुरूच्या दर्शनाचें निमित्त करून गांवोगांव भटकत फिरतात. अमर्यादपणें वागून आई, बाप, सासुसासरा, पती, गुरु, पालक इत्यादि पूज्य मनुष्यांच्या उज्वल कीर्तीला कलंक लावितात. नवरा मेला फार बरें झालें, तो जीवंत असता तर आह्मांस साधु संतांची सेवा करण्यास व त्याचप्रमाणें तीर्थ यात्रादि प्रवास करण्यास कोठून मिळाला असता? असें ह्मणणाऱ्या मूर्ख स्त्रिया सुद्धां जगांत कांहीं थोड्या सांपडावयाच्या नाहींत? परंतु ह्या चांडाळिणींला असें समजत नाहीं कीं, आमच्या पूर्वजन्मकृत अनेक महापातकांमुळेंच आह्मांला ही कष्टतर दशा प्राप्त झाली आहे? गुरुहूनहीं अति पूज्य असा पति जीवंत असतांना एक दिवस सुद्धां त्याची मनोभावें पूजा केली नाहीं व आतां गुरुसेवा करण्याच्या निमित्तानें मात्र गांवोगांव,

देशोदेश फिरत आहे. असें मनांत आणून त्याबद्दल यत्किंचित्‌ही खंती न बाळगितां तुह्मीं वागतां, ह्मणूनच स्त्रीजातीसारखी मूर्ख दुसरी कोणतीही जात नाहीं. यासाठीं पतिव्रता स्त्रियांचीं चारित्रें वारंवार वाचावीं, ऐकावीं, व त्याप्रमाणें आपला वर्तनक्रम सुधारण्याचा प्रयत्न करावा. स्वैर न फिरतां स्वगृहांत राहूनच गुरुकडून घेतलेल्या मंत्राचा जप करावा.

**विधवा पालयेच्छीलं शीलभंगात्पतंत्यधः ॥**
**तद्वैगुण्यादपिस्वर्गात्पतिः पतति सर्वथा ॥**
**तस्मात्पिता च माता च भर्तृवर्गस्तथैव च ॥**
**विधवाकबरीबंधो भर्तृबंधाय कल्पते ॥ १ ॥**
**शिरसो वपनं तस्मात्कार्यं विधवायया स्त्रिया ॥**

या प्रमाणें वैधव्यधर्म पाळिला नाहीं तर पुढें मोठा अनर्थ प्राप्त होतो. ह्मणून हें व्रत धारण करून पुराण श्रवण करावें. '**न स्त्री स्वातंत्र्यमर्हति**' स्त्रियांला स्वतंत्रपणें वागण्यास शास्त्राचें अनुमोदन नाहीं. ह्मणून त्यांनीं अन्नवस्त्र पुरवून विधवाधर्म पालनास मदत करणाऱ्या पालकाच्या आज्ञेंत वागावें.

[ पातीति पतिः ह्मणजे पालक समजावा. )

**नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ॥**
**पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ १ ॥**

सप्तपदी झाल्यानंतर पती जीवंत असून त्याचा पत्ता लागत नसेल, तो मृत झाला असेल, त्यानें संन्यास घेतला असेल, तो नपुंसक असल्यामुळें स्त्रियेला बाळगीत नसेल, जातिभ्रष्ट झाला असेल, अथवा कारागृहाची दीर्घ शिक्षा भोगीत असेल तर स्त्रियांनीं अन्य पति [ पालक ] करावा. सप्तपदी झाल्यानंतर पुनर्विवाह करावा अशाबद्दल कोणत्याही शास्त्रांत, कोणत्याही ठिकाणीं, एकादा विधि किंवा एकादी क्रिया सांगितलेली नाहीं. ब्राह्मण भ्रष्ट झाला तर पुनः त्याचा उपनयन विधी करावा असें शास्त्र आहे व त्याचा विधि सूत्रकारांनीं व शास्त्रकारांनीं सांगितलेला आहे. त्याप्रमाणें

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादिकांनीं पुनर्विवाह करावा असें सांगितलें नसल्यामुळें त्याचा विधि दाखविला नाहीं.

**प्रजाप्रवृत्तौ नारीणां वृत्तिरेषा प्रजायते ॥**

इत्यादि वचनें दीरापासून पुत्रोत्पत्ति करून घेण्याविषयीं युगांतर धर्मामध्यें सांगितलीं आहेत. पण तीं त्यावेळींही गौणच मानिलीं जात होतीं ह्मणजे क्षत्रियपतिव्रताविधवेनें, राज्यास कोणी मालक नसेल तर महाआपत्तीच्या वेळीं सर्व वडिलांची आज्ञा घेऊन तसें वर्तावें. परंतु या युगांत तशी गोष्ट प्रमाण मानूं नये.

**मृते भर्तारि या नारी ब्रह्मचर्येव्यवस्थिता ॥**
**स्वर्गं गच्छत्यपुत्राऽपि यथा ते ब्रह्मचारिणः ॥ १ ॥**

पतीच्या मरणानंतर स्त्रियांनीं आठ प्रकारचें ब्रह्मचर्य पाळून राहावें. ते ब्रह्मचर्याचे प्रकारः—

**स्मरणं कीर्तनं केलिः प्रेक्षणं गुह्यभाषणम् ॥**
**उत्साहोऽध्यवसायश्च क्रियानिष्पत्तिरेव च ॥ १ ॥**
**एतदष्टांगमैथुनं प्रवदंति मनीषिणः ॥**
**विपरीतं ब्रह्मचर्यमेतदेवाष्टलक्षणम् ॥ २ ॥**

त्याचप्रमाणें कामक्रोधादि दुष्ट शत्रूंस जिंकून, शांतवृत्तीनें राहावें व इतर स्त्रियांलाही सन्मार्गास लावण्याचा प्रयत्न करावा. परंतु निर्लज्ज होऊन गुरूंचे मागें भटकत फिरूं नये. मागें विधवास्त्रियांचे धर्म सांगितले आहेत ते वाचून त्याप्रमाणें वर्तन ठेवून आपले माता, पिता, पति, गुरू, यांची कीर्ति उज्वळ राखावी. शास्त्र, गुरु व अनुभवीक सदाचारी लोक यांच्या वचनांशीं मेळ राहील असें वर्तन ठेवावें. शास्त्रवचनांत व गुरुवचनांत विरोध आला तर गुरुवचन मानूं नये. जी स्त्री शास्त्र विरुद्ध वर्तन करिते ती अंतीं यमसदनाला जाऊन अनेक भयंकर यमयातना भोगिते.

**कन्याः**— गुरुमहाराज! आपण मूर्तिमंत श्रीदत्तस्वरूप आहांत.

तरी माझ्या नेत्रांत ज्ञानांजन घालून, माझ्या हृदयांत वास करणारा अज्ञानस्वरूपीभ्रम दूर करावा. माझ्या चिंतेचा समूळ उच्छेद करावा. नश्वर वस्तूंपासून माझी दृष्टी परावृत्त करून, माझ्या चित्ताची शुद्धि करावी. यासाठींच मी आपल्यास शरण आलें आहें. स्त्रि-यांनीं कशा रितीनें वागावें, हें मला थोडक्यांत खुलासेवार सांगण्याची कृपा व्हावी.

**गुरु**:— मुली! कामाधीन होऊन कधींही आपले शील बुडवूं नये. कधींही कोणाची निंदा करूं नये. कोणाशीं वैर धरूं नये. लाभ होत असला तरी प्राणांतींही खोटें बोलूं नये. सरळपणानें व शांतवृत्तीनें वागावें. श्रीदत्तभगवानाचें चिंतन करण्यास विसरूं नये. स्वधर्म सोडूं नये. सन्मार्ग सोडूं नये. विनाकारण दुसऱ्याची स्तुती अगर निंदा करण्यांत कालाचा अपव्यय करूं नये. कुत्सित बुद्धीनें कोणाच्या वरीं तंटे भांडणें लावूं नयेत. अभिमान धरूं नये. कोणाचा अपमान करूं नये. आपण केलेलीं सत्कर्में आपल्याच तोंडानें दुसऱ्यास सांगूं नये त्याचप्रमाणें दुसऱ्याचीं दुष्ट कर्मेंही लोकांला कळवूं नये. कोणावर रागावूं नये. समुदायामध्यें खदखदां हांसूं नये. सर्व माणसांबरोबर सरळपणानें वागावें. आपल्या आंगीं नसणारे दुर्गुण आपल्यावर लादून कोणी कांहीं बोलला तर तें मनांत बाळगूं नये. परके ठिकाणीं जाऊन मन मानेल तसें बोलूं नये. धनलोभाकरितांही दुर्जनाची संगति करूं नये. स्वजनांला सोडून स्वतंत्र-पणें राहाण्याची इच्छा धरूं नये. स्वतःचा थाटमाट दुसऱ्याच्या दृष्टीस पडूं देऊं नये. कुबुद्धीनें कोणाचा विश्वास घात करूं नये. पुष्कळ व मोठमोठ्या किंमतीचे दागिने आणि उंची लुगडीं पाहिजेत ह्मणून पती बरोबर तोंड वाजवूं नये. संपत्ती ही दोन दिवस राहाणारी आहे हें लक्षांत ठेवून ती प्राप्त झाली असतां मत्त होऊं नये. आपत्ती आली असतां धैर्य सोडूं नये. अशावेळीं कोणी न्यूनाधीक बोलेल तर न चरफडतां विचारपूर्वक बोलावें. लोकांत अपकीर्ति पसरूं नये. सदाचरणाला कंटाळूं नये. सुख किंवा दुःख प्राप्त झालें तर तें आनंदानें भोगावें, त्याबद्दल कोणावर दोषारोप करूं नये.

व्याही जांवई इत्यादि पाहुणे मंडळीस संतुष्ट करण्यासाठीं कर्ज काढूं नये. आपल्या वाडवडील माणसांच्या नांवास कलंक लावूं नये. धर्ममर्यादा पाळण्यास चुकूं नये. पतीच्या आज्ञेवांचून आपल्या बुद्धीनें व्रतें, उद्यापनें करूं नयें व दुसरें कोणी व्रतदानादि कारित असेल त्याच्या आड येऊं नये. मुली हा उपदेश विसरूं नको. श्रीदत्तमहाराजांचे आज्ञेनुसार हा मीं तुला सांगितला आहे त्याचें उल्लंघन करूं नकोस.

**कन्या:**—गुरुमहाराज! आपण माझे आईबाप आहांत. आपण केलेला उपदेश मला शिरसा वंद्य आहे. परंतु माझ्या मनांत एक संशय आला आहे. देह जड आहे. जीव असंग आहे. तर सुखदु:खाचे परिणाम प्राणाला झाले पाहिजेत. कारण प्राण देहाहून भिन्न आहे व तोच देहामध्यें वास करून शक्ति देतो आणि इंद्रियांकडून आपआपलीं कार्यें करवितो. देहाची हालचाल प्राणाच्या साहाय्यानेंच होते. भूक व तहान प्राणालाच लागते. प्राणच देण्याघेण्याच्या क्रिया कारितो. झोंप लागल्यावर देहाला कोल्हाकुत्र्याने खाऊं नये ह्मणून प्राण श्वासोच्छ्वास रूपानें रक्षण कारितो. ज्याचा श्वासोच्छ्वास बंद झाला तो मृत सबब अमंगल झाला असें समजून त्याला जाळून टाकितात. जोंपर्यंत प्राण आहे तोंपर्यंत पति, माता, पिता इत्यादिकांस विरूद्ध बोलल्यास त्याचा अशस्त्र वध केला असें लोक ह्मणतात. परंतु प्राण निघून गेल्यावर प्रत्यक्ष त्याला जाळतांनां पाहूनही जाळणाराला "तुह्मीं हत्या केली" असें कोणी ह्मणत नाहींत. यावरून असें सिद्ध होतें कीं, पती, पुत्र, माता, पिता, ब्रह्मचारी आदि सर्व प्राणच आहे. प्राण चेतनायुक्त आहे ह्मणून, अकस्मात् मूर्छा आली किंवा सन्निपात झाला व भानरहितस्थिती प्राप्त झाली असतां त्यावेळीं पुत्रादिक रडले अथवा त्यांनीं मोठा कल्लोळ केला तरी त्याला तें समजत नाहीं. परंतु आंगावरील वस्त्र वाऱ्यानें सरकलें तरी तें त्याला समजतें, व तो तें सांवरून घेतो. हें सर्वांस माहीत आहे ह्मणून प्राण आत्मा आहे असें मीं समजतें.

**गुरु:**—वा:! तुझा विचार फारच उत्तम आहे. हें पाहून मला

मोठा आनंद वाटतो. परंतु आत्मा कोण हें तुला अद्यापि समजलें नाहीं. देह आत्मा नव्हे एवढें मात्र तुला समजलें. पतिपुत्रादि प्राण आहेत, याप्रमाणें उपासना केल्यास, हिरण्यगर्भोपासकांप्रमाणें प्राणलोकीं गती मिळते. परंतु पुनरावृत्ती चुकत नाहीं. कारण प्राण आत्मा नव्हे. तो वायुरूप असल्यामुळें इतर वायुंप्रमाणें जड आहे. मूर्छनादि समयी वस्त्रादि सांवरून घेणें हें नित्याभ्यासानें होत असतें. प्राण चैतन्य असता तर निद्रा काळीं कोणीं कोणाची वस्तू चोरूं शकला नसता. भूक, तहान लागली असें ह्मणणारा प्राणावांचून दूसरा कोणी असला पाहिजे व तो प्राणाचाप्राण आहे. शरीरास बळ देऊन निभावणें एकट्या प्राणाचें काम नाहीं, परंतु प्राणाचे आंत अंतर्यामीं जो असतो तोच बळ देतो. हृदयामध्यें प्राणाला चलन वलन देऊन खाणें पिणें देतो आणि खाल्लेलें अन्न पचविण्यासाठीं सर्व कांहीं क्रिया प्राणादिद्वारें आत्माच करवितो. ह्याप्रामणें आत्मा कारिता करविता असतांही स्वतः निर्लेप असतो, प्राणाप्रमाणें आत्मा हा अचेतन नसतो. आपल्या सान्निध सर्व गोष्टी करीत असूनही आत्मा अकर्ताच असतो. पण तुह्मीतर सर्वस्वीं पराधीन आहां. डोळ्यांची पापणी झांकीन व उघडीन असें मनांत आल्यास तेंही करण्यास असमर्थ आहां; इतकेंही असून पदोपदीं अहंपणा मिरवितां ! ह्याकारितां वारंवार विचार करून कर्त्याकरवित्याचा अहंकार सोडून देऊन अलिप्त राहावें. जो कर्तेपणाच्या अहंभावास सोडून वेगळा राहतो त्याजकडून कोणतेंही बरें वाईट कृत्य घडलें तरीं त्याच्या बंधनांत तो सांपडत नाहीं. बिडी लोखंडाची असो वा सोन्याची असो. दोहोंपासून सारखेंच बंधन प्राप्त व्हावयाचें. त्याचप्रमाणें पाप असो किंवा पुण्य असो मोक्षप्राप्तीच्या कामीं प्रतिबंध करण्यास दोन्हीं सारखींच आहेत. ज्याप्रमाणें पापापासून नरकाची प्राप्ती होते त्याचप्रमाणें पुण्यापासून स्वर्गसुख लाभतें परंतु दोन्हींही जन्ममरणरूप दुःख तोडून मोक्ष प्राप्ती करून देण्यास असमर्थ आहेत. पुण्यसंचय असेपर्यंत स्वर्गांत राहतां येतें व तो संपून पापसंचयाचा जमाव वाढला कीं, पुनः नरकवास आहेच. व अशाप्रकारचा अधःपात अति दुःसह होय.

**यः प्रेत्यात्मानभिज्ञः श्रुतिविदपि तथा कर्मकृत्कर्मणोऽस्य**
**नाशः स्यादल्पभोगात्पुनरवतरणे दुःख भोगो महीयान् ॥**

याप्रमाणें वचन आहे. तें जर पुण्यात्मक कर्म ईश्वरप्रीत्यर्थ केलें असतें, तर ईश्वरप्रसादें बुद्धि शुद्ध होऊन, तद्वारें ज्ञान प्राप्त होतें व त्यायोगें ह्याच जन्मीं मोक्ष प्राप्त होतो. पूर्व जन्मीं सत्कर्माचरण केलें असल्यामुळे या जन्मीं सदसद्विचार करण्यास योग्य अशी बुद्धि प्राप्त होते. ईश्वरप्रसादानें सद्गुरुसमागम होऊन सदुपदेश मनी ठसतो. तूं जो प्राणाबद्दल विचार सांगितलास, तो या लिंगदेहापैकीं प्राणमयकोश होय. ह्याहून आत्मा भिन्न आहे.

**कन्याः**—गुरुमहाराज! आपली गोष्ट माझ्या मनांत ठसली, परंतु मी बोलतें चालतें इत्यादि व्यवहारांवरून इंद्रियेंच आत्मा आहे किंवा इंद्रियांचा चालक जें मन तेंच 'आत्मा' असलें पाहिजे कारण **मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ॥** यावरून मनास आत्मा ह्मणावा हें बरें. मन देहाहंभाव आणि गृहदारादिक यांवर ममता करितें. ज्यावेळीं हें मन एकाद्या गोष्टींत तन्मय होऊन जातें, त्यावेळीं अगदीं कानाजवळून जरी कोणी वाजत गाजत गेलें तरी तें त्याला समजत नाहीं. इत्यादि व्यवहारांवरून मनासच आत्मा ह्मणण्यास काय हरकत ?

**गुरुः**—तुझी बुद्धी बरी चालत आहे. ज्याप्रमाणें एकाच राज्यांत अनेक राजे आहेत ह्मणणें असंभवनीय दिसतें त्याचप्रमाणें इंद्रियांस आत्मा ह्मणणें हें विरुद्ध दिसत आहे. हीं इंद्रियें भौतिक जड करणें आहेत. ज्या माणें प्राण रजोगुणभूतविकार आहे त्याचप्रमाणें मन सत्वगुणविशिष्ट विकार आहे. हें मन अन्नाच्या वाफेपासून झालेलें आहे आणि संकल्प विकल्पात्मक असल्यानें चंचल आहे. याला त्रैलोक्याचें वैभव प्राप्त झालें तरी ह्याची तृप्ती व्हावयाची नाहीं. हें दुष्टवासनायुक्त होऊन प्राण्याला भूत प्रेतादि योनींत घेऊन जातें. आत्मा नित्यतृप्त असून सर्व व्यापी आहे आणि मन विकारी व परिछिन्न असें आहे.

**अगमन्मे मनोऽन्यत्र सांप्रतं च स्थिरीकृतम् ॥**

माझें मन दुसरीकडे गेलें होतें तें आतां फिरून परत आलें आहे- आतां मी तें स्थिर केलें आहे ? जर तें परिछिन्न नसतें तर त्याला जातां व येतां कसें आलें असतें ? तें अंतकालीं ज्या विषयावर जातें त्या प्रकारच्या योनींत जन्म घ्यावा लागतो. जो ज्याला जाणतो तो त्या पासून भिन्न असला पाहिजे ह्मणजे जाणणारा निराळा असून जाणण्याची वस्तु निराळी असली पाहिजे. त्या न्यायानें मनाचें जाणें व येणें जाणणारा मनाहून दुसरा कोणीतरी असला पाहिजे. अर्थात् मन हा आत्मा नव्हे. हें स्वप्नांत व जागृतावस्थेंत स्पष्ट कळून येतें. स्वप्नावस्थेंत इंद्रियें हालचाल करीत नाहींत, पण मन इंद्रियरूपानें व आत्म्याच्या सान्निध्यानें सर्व व्यवहार करीत असतें. यावरून आत्मा स्वयंप्रकाश आहे हें सिद्ध होतें. कारण स्वप्नामध्यें " कार्यज्योति " सूर्य, चंद्र अग्नि वगैरे कांहीं असत नाहीं व ' करणज्योति ' डोळे, कान, नाक इत्यादि असत नाहीं; असें असतां स्वचैतन्याच्या योगें सर्वपदार्थांस प्रकाशीत करितो तो आत्मा. तो मन आणि मनोव्यापार यांहून भिन्न असून साक्षीभूत निर्विकार असा आहे. ज्यावेळीं मन व्यापारशून्य होऊन निश्चळ राहील, तेव्हां तो समजून येईल. **मनो जृंभणराहित्ये यथा साक्षी निराकुलः ॥** इत्यादि वचनांवरून लिंगदेहापैकीं हा मनोमय कोश आत्म्याला उपाधिभूत आहे. ह्मणून मनोव्यापारांत बंधन पावूं नये. कदाचित् मनोनिग्रह करीत असतां मन अंतर्मुख न होईल तर परमेश्वराची सगुणमूर्ती करून, स्वाधिकाराप्रमाणें तिची पूजा करावी. निवृत्तीसमयीं पायांपासून मस्तकापर्यंत मूर्ति नखशिखांत ध्यानीं आणून, स्थिरासनावर बसून हृदयकमलांत त्या मूर्तीला स्थिर करावी. ध्यान सुटेल तर पुनःपुनः प्रयत्न करून त्याचा अभ्यास करावा. महिना, सहा महिने, वर्षपर्यंत याप्रमाणें करीत असतांही जरी मनाची स्थिरता झाली नाहीं तरी उमेद खचूं न देतां प्रयत्नक्रम सुरू ठेवावा, ह्मणजे तें स्थिर झाल्यावांचून कदापि राहाणार नाहीं. कारण अशा योगानें पूर्वजन्मकृत पापसंचयाचा नाश होत जातो व आपोआप मन स्वाधीन होतें आणि ध्यान पूर्ण करितां येतें.

**कन्या:**— आपण यथार्थ सांगितलें, परंतु मन हें बुद्धीच्या धोरणानें वर्तत असतें. कारितां बुद्धीला आत्मा ह्मणण्यास काय हरकत आहे ? कारण बुद्धि स्वतंत्र आहे. बुद्धी नसेल तर प्रत्यक्ष, अनुमान, उपमान इत्यादि प्रमाण कारितां येत नाहीं. बुद्धीखेरीज ज्ञान होत नाहीं. बुद्धीचेंच कर्तृत्व पाहण्यांत येतें. ह्मणून बुद्धीच आत्मा असली पाहिजे ?

**गुरु:**— बुद्धि पंचभूतांच्या सत्वांशापासून उत्पन्न झालेली आहे आणि ती अन्तःकरणाचा एक भेद आहे. ती बुद्धी त्रिगुणात्मक गणिली जाते.

**बुद्धेस्त्रिधा वृत्तिरपीह दृश्यते स्वप्नादिभेदेन गुणत्रयात्मनः ॥**

बुद्धि स्वतंत्र आहे असें म्हणावें तर तिला पाहाणारी दुसरी बुद्धि पाहिजे, परंतु तसें पाहाण्यांत येत नाहीं. ज्या प्रमाणें अग्नीच्या सान्निध्यानें लोखंडाला दाहकत्व प्राप्त होतें त्याचप्रमाणें आत्म्याच्या सान्निध्यामें बुद्धीमध्यें चैतन्य आहे असा भास होतो. निद्रेमध्यें बुद्धी लीन होऊन जाते. बुद्धीला आत्मा ह्मणणें ह्मणजे आत्मस्वरूपाला काजव्याची उपमा देण्यासारखें दिसतें. बुद्धीच पापपुण्य करील तर बुद्धीलाच स्वर्ग नरकादि भोग भोगावे लागतील. मग जीवाशीं काय संबंध राहिला ? एकानें करावें व त्याचें फळ दुसऱ्यानें भोगावें असें होईल. ह्मणून जोंपर्यंत बद्धदशा आहे तोंपर्यंत जीवाला अध्यासिक कर्तृत्व आहे असें शास्त्रानें मानिलेलें आहे. लिंगशरीरापैकीं बुद्धी हा विज्ञानमय कोश आहे. बौद्धमतवाद्यांनीं बुद्धीलाच आत्मा ह्मटला आहे. ही त्यांची चुकीची समजूत आहे. बुद्धीचा साक्षी बुद्धीहून वेगळा आहे व तोच आत्मा असून निर्विकारी आहे.

**कन्या:**—गुरुमहाराज ! प्रथम आपण सांगितलेंत कीं, अहंकार लीन झाला असतां त्या स्थितीला निद्रितावस्था ह्मणतात व आतां बुद्धी लीन झाली ह्मणजे तिला निद्रितावस्था ह्मणावें असें सांगतां हें कसें !

**गुरु:**—कितीएक अन्तःकरणाचे चार भेद मानितात आणि कितीएक दोन भेद मानितात. त्यामुळें मनामध्यें चित्ताचा व अहंकारामध्यें बु-

द्धीचा अंतर्भाव होतो; त्यामुळें दोष लागत नाहीं. चार्वाकादि देहालाच अहंपणा मानितात, हें मात्र खोटें आहे. मीमांसक जीवाला अहंपणा मानितात, तेंही गौण आहे. वेदांती अकर्ता, अभोक्ता, गमनागमनादि रहीत प्रत्यगात्मा आणि अहंब्रह्म या प्रकारें मुख्यत्वें लक्षणावृत्तीचा अहंकार, लक्ष्यार्थ कूटस्थ, चैतन्याचें नित्य, शुद्ध बुद्ध ब्रह्माचे ठायीं समानाधिकरण करितात. अहंकारलक्ष्यार्थ मात्र आत्मा ह्मटला जातो. वाच्यार्थरूपी जड अहंकार हा बुद्धी प्रमाणें दृश्य आहे. हा अहंकार जों पर्यंत नष्ट होत नाहीं तों पर्यंत प्रत्यक्ष ब्रह्मदेवाच्या सान्निध चिरकालवास घडला असतांही पुनरावृत्तो चुकत नाहीं.

**कन्याः—** गुरुमहाराज! देहापासून अहंकारापर्यंत कोणालाही आत्मा ह्मणतां येत नाहीं आणि त्या नंतर कांहींच नाहीं ह्मणजे बाकी शून्य राहिलें तर तोच आत्मा कीं काय?

**गुरुः—**आत्मा परमानंदस्वरूप आहे, तो शून्य कसा होईल?

**कन्याः—**गुरुमहाराज! जागृतादिअवस्थेंतील व्यवहार निद्राप्रसंगी लीन होतात. त्यावेळीं परमानंद होतो तेव्हां आनंदस्वरूपी शून्याला कां आत्मा समजूं नये?

**गुरुः—**बुद्धीमध्यें चैतन्याचें प्रतिबिंब पडलेलें आहे तोच जीव होय. या जीवाला बुद्धीच्या योगानें स्थूल देहाशीं तादात्म्यता प्राप्त झाली असतां जागृतावस्थेच्या स्थूल भोगांला विश्व नामक जीव अनुभवितो आणि त्याच जीवाचें लिंगदेहाशीं तादात्म्य झालें ह्मणचे प्रविविक्त भोगांस तैजसनामक होऊन अनुभवितो, तिला स्वप्नावस्था ह्मणतात. आणि तोच जीव हृदयामध्यें पूरित नामक मोकळी जागा असते त्यांत येऊन राहिला ह्मणजे प्रज्ञानामक परमानंद भोगितो; परंतु त्यावेळी ज्याप्रमाणें उदकामध्यें उदकाचा विंदु पडला असतां, तो सर्वस्वी त्यांत मिळून जाऊन एकरूप होतो, तसा ब्रह्मस्वरूपामध्यें मिळून जात नाहीं. ज्याप्रमाणें पाण्यानें भरलेल्या भांड्याचें तोंड बांधून तें पाण्यांत बुडविलें तरी पाण्याशीं एकरूप होत नाहीं त्याप्रमाणें अनिर्वचनीय अज्ञानानें आवृत् झालेला जीव, निद्रा

वस्थेंत ब्रह्मस्वरूपांत मिळाला असतांही आपलें प्रारब्ध भोगण्यासाठीं कांहीं तरी निमित्तानें ( ईश्वरेच्छेनें ) मूळच्याच रूपानें पुनः जागृत होऊन, पूर्वी केलेल्या व पुढें करण्याच्या कृत्यांनां आठवितो. जोंपर्यंत ब्रह्मज्ञानाच्या योगानें उपाधीभूत अज्ञान नष्ट होणार नाहीं तोंपर्यंत तो ब्रह्मस्वरूपांत मिळून जाऊं शकत नाहीं. याप्रमाणें सर्वांहून निराळें शून्य आहे त्याला जाणणारा जो आत्मा त्याला शून्य कसें ह्मणतां येईल ? ह्मणून आत्मा सर्वांस जाणणारा शून्याहून ही निराळाच आहे. नाहीं तर कांहींच नाहीं, हें कोणीं पाहिलें. ह्मणून आत्मा आहे, आणि तो चैतन्य आहे.

**कन्या**:–गुरुजी! गाढ निद्रेंत साक्षी कोण ? तो कोणत्या प्रकारें राहातो? आणि जागृतींत त्याला कशा प्रकारें ओळखावा ?

**गुरु**:-जसें ग्रहण लागलें असतां राहूनें किंवा केतूनें ग्रासलेलें सूर्यमंडळ व चंद्रमंडळ स्पष्ट दिसत नाहीं ह्मणून तें मंडळ नाहीं असें ह्मणतां यावयाचें नाहीं, तसें निद्रावस्थेंत, शून्य साक्षीपणानें राहून जीवाला निजून उठतांच आठवण देतें, ह्मणून ह्मणतो कीं, ‘ हा वेळ पावेतों मी स्वस्थ निजलों होतों ह्मणून मला कांहीं समजलें नाहीं ’ हें स्मरण अनुभवावांचून कसें राहील ? ब्रह्मस्वरूपाहून हा जीव निराळा आहे असें नाहीं. **ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥** असें प्रमाण आहे. जोंपर्यंत अहंपणाचा अभिमान धरून व्यवहार कारितो तोंपर्यंत त्यास जीव असें ह्मणतात. हा जीव सच्चिदानंद असून देहाभिमानी होतो तेव्हां मायेनें मोहीत होऊन विषयसुखासाठीं तळमळ करीत असतो. **यावन्तः कुरुते जन्तुः संबंधान्मनसः प्रियान् ॥ तावंतोऽस्य निखन्यंते हृदये शोकशंकवः ॥** परंतु त्यापासून सूख कसें मिळणार ? कारण “ **सुखमस्यात्मनो रूपं** ” स्वतः सुखरूप असून माहिती नसल्यामुळें देह, बुद्धि, मन इत्यादिकांला अथवा निदान शून्याला आत्मा ह्मणून भ्रांतिमूलक वाद कारितात. परंतु शून्याचा साक्षी, धर्माधर्मरहीत, कार्यकारणभाववर्जीत असून भूत, भविष्य आणि वर्तमानकाळापासून परिच्छिन्न होत नाहीं. अतएव षड्भावविकाररहीत नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, परमानंद, अद्वितीय अशा आत्म्याला ओ–

ळखणें फार कठीण आहे. जागृतीमध्यें त्याची ओळख करून घेणें कठीण नाहीं. सर्व संकल्प दूर करून आत्मस्वरूपानें तोच आहे अशारीतीनें त्याला ओळखावा. वाऱ्याच्यायोगानें पाण्यावर आलेले तरंग पाण्याहून भिन्न दिसतात, परंतु थोडासा विचार करून पाहिलें तर तें पाणीच आहे. वारा नाहींसा झालाकीं तरंग निराळे राहात नाहींत. त्याप्रमाणें भूत भौतिक विविधरूप, नाम, गुण अशा भेदानें जें जें भासमान होतें तें तें सर्व एक सच्चिदानंदात्मक स्वरूप आहे. ह्मणून सर्वांतून नामरूप सोडून देऊन सच्चिदानंदरूपानें सर्वांस पाहावें. ह्मणजे कोणाचें कोणी प्रिय, अप्रिय, मित्र, शत्रु, साधु, असाधु, योगी वियोगी इत्यादिभेद पाहाण्यांत येणार नाहींत.

**कन्या**:—गुरुराज! आपण ह्मणतां खरें पण हें जग अनेक प्रकारांनीं नटलेलें दृष्टीला दिसतें तर तें एकच आहे असें कसें ह्मणतां येईल?

**गुरु**:— **वर्षोपला यथाऽभिन्ना अपि भिन्ना इहांभसि ॥**
**ब्रह्मणदिं तथा विश्वं ब्रह्माभिन्नं विनिश्चितुः ॥१॥**

जलरूपी गारा दगडा प्रमाणें कठीण असून पाण्यांत पडल्यातरी पाण्याहून भिन्न दिसतात. तथापि त्या जलस्वरूपीच जाहेत असें बुद्धिमान् समजतात व त्याही थोड्या अवकाशानंतर पाणी होऊन जातात. या न्यायानें सर्व जगांतून नामरूपादि सोडून देऊन, निरंतर सच्चिदानंदीं दृष्टी ठेवावी. याचेंच नांव विवेक. यावरून असें समजूनये कीं, नाम रूपात्मक मृत्तिकेच्या घटाला दगड मारून त्याचा नाश करावा ह्मणजे जसें घडा हें नांव राहाणार नाहीं. त्याप्रमाणें याचा नाश करावा. ब्रह्मकार समदृष्टि झाल्यावर हें जग शेष राहिलें तर खुशाल राहो.

**करें निर्मियेलें तें मनें मोडवेना ॥ मनें निर्मियेलें तें करें तोडवेना ॥**

**कन्या**:—गुरुजी! आपण ह्मणतां पण या गोष्टीचा निश्चय होत नाहीं.

**गुरु**:—तुला संशय वाटत अलेल तर विचार कर ह्मणजे संशय फेडून टाकितां येईल?

**कन्या**:—गुरुजी! विचार करीत असतांही चित्ताची एकाग्रता होत नाहीं त्याला काय करावें?

**गुरु**:—रात्रंदिवस ध्यान धरून सावध असावें.

**कन्याः**—गुरुजी ! विनाकारण गांवकुटाळक्या करीत बसण्यास वेळ मिळतो. परंतु अद्वैत वृत्ती राखण्याचा प्रयत्न करण्यास फारच कष्ट पडतात.

**गुरुः**— यावरून तुझ्यावर अद्यापि ईश्वराचा अनुग्रह झालेला नाही असें सिद्ध होतें. ईश्वराच्या अनुग्रहावांचून केलेलें श्रवणः—' **नळी फुंकितां सोनारें । इकडूनि तिकडे गेलें वारें ॥** या न्यायाप्रमाणें समजावें. यदाकदाचित् अल्पस्वल्प समजूत पडली तर कावळ्याप्रमाणें जगांत ' काव काव ' करीत फिरण्यास सवड मिळते परंतु त्याचा उपयोग काय ?

**लोकां सांगे ब्रह्मज्ञान । आपण कोरडे पाषाण ॥**

**कन्याः**—गुरुजी ! तर मग अशा प्रकारचें श्रवण करावयाचें कीं नाहीं ?

**गुरुः**—तुह्मी श्रवण करून पुराणिकाला बिदागी दिली ह्मणजे त्याबद्दल अभिमान बाळगून मोठेपणा मिरवितां !

**कन्याः**—गुरुजी ! आपण तर आमची सर्व प्रकारें थट्टा कारितां असें दिसतें.

**गुरुः**—मी स्वतःच मस्करी ( संन्याशी ) झालों आहें. कारितां इतरांची मस्करी मला केलीच पाहिजे. एका मनाने दोन कामें होत नाहींत. प्रथम श्रवण करण्यास वेळ मिळत नाहीं. आणि मिळाला तरफुकट न दवडावा, एवढ्यासाठींच माझें सांगणें आहे. नुसतें श्रवण करून कसें भागणार ! श्रवण तर केलें पाहिजेच व त्याप्रमाणें वर्तनही ठेविलें पाहिजे. श्रवण थोडें कां होईना, त्यापासून काय नुकसान आहे ? कारण अशा रितीनें केलेलें श्रवण व्यर्थ जाणार नाहीं.

**कन्याः**–गुरुजी ! ज्यायोगें श्रवण केलेल्याचें मनन होऊन ध्यान धारितां येईल अशी ईश्वराची कृपा कशानें मिळेल तें सांगा ?

**गुरुः**—प्रत्येक प्राणीमात्राला स्वतःचा देह प्रिय आहे. ह्मणून आपल्याला जसें सुखदुःख होतें तसेंच दुसऱ्यांलाही तें होतें, असें समजून

देहाला देवालय कल्पून त्यामध्यें राहाणारा जीव सदाशिव आहे असा निश्चय ठरवून अहिंसारूपी पुष्प त्या देवाला निरंत वाहून 'सोहं' भावानें त्याची पूजा करावी. हिंसा ह्याचा अर्थ केवळ प्राण घेणें असाच नाहीं. दुसऱ्याचें मन विनाकारण दुःखीत करणें यालाही हिंसाच ह्मणतात. ह्मणून कोणाचें मन दुखवूं नये. कायावाचा मनें करून केलेलें कर्म ईश्वरार्पण करावें. आपली बुद्धी निर्मल ठेवावी. सर्वांबरोबर सरळ पणानें वागावें. खोटें बोलूं नये. क्रोधरूपी चांडाळाला स्पर्श करूं नये. कदाचित् चुकून राग आला तर ताबडतोब सचैल स्नान करावें. दुसऱ्याचें बरें वाईट बोलणें ऐकून शांत असावें. दुष्ट आचरण करूं नये. सर्व इंद्रियें स्वाधीन ठेवावीं. सर्वांबरोबर मधुर शब्दांनीं भाषण करावें. दुष्ट कामें करण्यास सरसावूं नये. तोटा होत असला तरी सत्य सोडूं नये. आप्तजनांचा वियोग झाला तरी दुःखीत होऊं नये. अभिमान रूपी अहंपणा सोडून द्यावा. बाह्याभ्यंतर शौच करावें. सज्जनाची संगती धरावी. जें मिळेल त्यांत संतुष्ट राहावें. होतां होईल तितकें पुराण श्रवण करावें. याप्रकारें वर्तन ठेवणारावर ईश्वराचा अनुग्रह अवश्य होतो.

**कन्या**:–गुरुजी! सोहंभावानें पूजा कशी करावी?

**गुरु**:–सः ह्मणजे तो दूर असणारा परोक्ष आणि अहं ह्मणजे मी अपरोक्ष स्वयंप्रकाश याप्रमाणें दोन आहेत. यांस अनुक्रमें शिव व जीव ह्मणतात. याप्रमाणें सोहं शब्दाचीं सः आणि अहं अशीं दोन पदें आहेत. वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ असे दोन प्रकारचे प्रत्येक पदाचे दोन दोन अर्थ आहेत. त्यांत पंच भौतिकस्थूल देह पहिला. इंद्रियें मन व बुद्धी मिळून हा लिंग देह दुसरा. अज्ञान कारण देह तिसरा. हे तिन्हीं मिळून देहत्रय वेष्टीत जें चैतन्यप्रतिबिंब तो जीव; हा अहं पदाचा वाच्यार्थ होय. आणि साक्षी कूटस्थ हा अहंपदांचा लक्ष्यार्थ होय. विराट=स्थूलदेह, हिरण्यगर्भ=लिंगदेह आणि माया=अव्याकृत कारण देह या देहत्रयानें वेष्टीत जें ब्रह्म=चैतन्य [ मायाधिष्ठान, ब्रह्मचैतन्य. आणि माया प्रतिबिंब ईश्वर ] हीं सर्व 'सः' शब्दाचा वाच्यार्थ होय. आणि सत्यज्ञानांजन परलक्ष्यार्थ होय. यांत वाच्यार्थाचा विरोध आहे. ह्मणून वाच्यार्थ सोडून देह,

मन, बुद्धि, अहंकार, प्राणेंद्रिय यांहून वेगळा विश्व, तैजस आणि प्राज्ञ ह्या तिन्ही देहांचा अभिमानी, अधिकारी, तीनही अवस्थांचा साक्षी, पंचकोशातीत जो मी कूटस्थ, साक्षी, प्रत्यगात्मा तोच हा विराट सूत्रात्मा, अव्याकृत, माया या तीनही देहांहून निराळा आणि त्यांचा अभिमानी वैश्वानर, हिरण्यगर्भ ईश्वर त्यांहून वेगळा सृष्टी, स्थिती, प्रलय हे त्याचे व्यवहार. साक्षी सत्य ज्ञान, अनंत नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्तस्वभाव परमात्मा होय. ह्याप्रमाणें लक्ष्यार्थाचें अखंड तैलधारेप्रमाणें निरंतर चिंतन करीत असावें. हेंच निदिध्यासन [ ध्यान ] होय. जीव व शिव एकच आहे असा निश्चय करणें तें श्रवण. विचार पूर्वक जीव व शिव एकच आहेत असा निश्चय करणें याचें नांव मनन व त्याचा निरंतर अभ्यास करणें ह्याचें नांव ध्यान. ज्याप्रमाणें देहाला मी असें ह्मणतात. त्याचप्रमाणें शिव परमात्मा मी आहें अशा निश्चयात्मक भावनेनें निद्रेप्रमाणें इतर सर्व विसरून जावें. त्याचें नांव उपरति [ निर्विकल्प समाधि ] होय. या योगें मनुष्य कृतकृत्य होतो व फिरून जन्माला येत नाहीं. ज्ञान निश्चित होतांच मुक्ति मिळते. परंतु व्यवहार दृष्टीनें प्रारब्धवशात् देह राहिला तरी स्वतःला कांहीं नुकसान नाहीं. एक वेळ आवरण भंग झाल्यावर पुनः देहादिकांचें तादात्म्य राहात नाहीं. हेंच बोधाचें वैभव होय. ज्यानें अभ्यासानें बोध दृढ करून, मनोभंग व वासना क्षय केला त्याला ही जीवन्मुक्ती मिळते. विशेष काय सांगावें? एक वेळ आत्म साक्षात्कार झाला कीं मोह शोकादि नष्ट होतात. संशय दूर होतात व हृदयग्रंथिभेद होऊन जातो. त्यायोगें जन्ममरण देणाऱ्या कर्मांचा नाश होऊन सर्व प्रकारचे पाश तुटतात. अशा ठिकाणीं कर्तृत्व, भोक्तृत्व, पाप, पुण्य कोठून येणार! अशा ज्ञान्याचा देह झाडाच्या पिकलेल्या पानाप्रमाणें वाटेल तेथें पडो. पण त्याचा प्राण उत्क्रमण होत नाहीं. तापलेल्या दगडांत जसें पाणी जळून जातें त्याप्रमाणें ज्ञान्याच्या सर्व कला स्वस्वरूपांत लीन होतात. तेह्वां तो ब्रह्मच होतो. हे मुली! हें तुला सारभूत वेदांत तत्त्व सांगितलें. आतां तुला ऐकण्याचें कांहीं बाकी राहिलें नाहीं. असें सांगून गुरु स्तब्ध राहिले.

इतकें ऐकून ती मुलगी श्रवण त्याचें मनन व निदिध्यासन करून, पर-

मानंद प्राप्ती झाल्याच्या योगानें ब्रह्मस्वरूपीं लीन झाली.

**शास्त्रीबुवाः**—हे प्रिये ! याप्रमाणें तूं पण पुत्र शोक व देहाभिमान सोडून ह्या उपदेशाचा विचार करून वागशील तर तुला सुद्धां परमानंद प्राप्ती होईल.

**अन्नपूर्णाबाईः**—हे प्राणनाथ ! आपल्या आशिर्वादाशिवाय हें ज्ञान माझ्या हृदयांत स्थिर राहणें शक्य नाहीं. ह्मणून ही दासी आपल्या पति रूपी प्रभूच्या प्रसादाची इच्छा करीत आहे.

**शास्त्रीबुवाः**—हे प्राणप्रिये ! तूं आजपर्यंत पातिव्रत्यानें राहून माझी बहुत सेवा केलीस, इतकेंच नव्हे तर अभेद बुद्धीनें श्रीदत्तगुरुमहाजाचीही यथासांग सेवा केलीस त्यायोगें तुजवर श्रीदत्तकृपा झाली आहे. ह्मणून मी तुला आशीर्वाद देतों. आजपासून तुला तुझें अज्ञान बंधन कारक होणार नाहीं. त्याचप्रमाणें कलिकालाचें भयही राहणार नाहीं. इतकेंच नव्हे तर माझ्या आशीर्वादानें आतांच तुझ्याहृयांत ब्रह्मस्वरूप प्रकाश पडेल व तुला परमानंद प्राप्ती होऊन तूं याच डोळ्यांनीं मुक्ति सुखाचे सोहळे [ आनंद ] पाहूं लागशील. असें ह्मणून अन्नपूर्णाबाईकडे अमृत दृष्टीनें अवलोकन केलें त्या योगें त्यांचें मायावरण एकदम नष्ट होऊन त्या पती समवेत अखिल चराचर जगत् श्रीदत्तभगवान् स्वरूप अवलोकित्या झाल्या व स्वानुभवानें खालील गीत ह्मणूं लागल्या.

## अंजनगीत.

**मी गेलें चमकुन होतां ज्ञान ॥ धृ० ॥ नरनारी नगर विचित्र । स्थावर जंगम जें सर्वत्र । पाहत होते ते हे नेत्र ॥ गेले भुलोन ॥ १ ॥ अहो मी झालें सैरावैरा ॥ आतां कैंची येर झारा ॥ अंजुली दिधली म्यां संसारा । सारघेऊन ॥ २ ॥ देहीं असतां विदेहस्थितीनें । जितपणीं; मी मरून गुरूनें ॥ कथितज्ञानाग्निज्वालेनें । मोह जाळून ॥ ३ ॥ पूर्व घराला टाळा खोंविला ॥ स्वानंदानें खोंपा भरिला ॥ अंजुळी दिधळी कुलशीलाला ॥ आजिचा सुदीन ॥ ४ ॥**

आतां निःसंशचि होऊन ॥ जनलज्जेलाही दवडून ॥ परपुरुपाला आलिंगुन ॥ धिंगाडा घालीन ॥ ५ ॥ कोणी ह्मणोत मजला वेडी ॥ पारि मी आवृति साडी फेडीं ॥ भरलोकांमधिं नागडी उघडी ॥ फुगडी घालीन ॥ ६ ॥ पूर्णानंदाची घागर ॥ हातीं घेउनी हुंकार ॥ करिं काढुनी उंचस्वर ॥ फुगडी घालून ॥ ७ ॥ मीच जगाची उत्पादक ॥ मी सर्वांच्या पूर्वील एक ॥ मी अन्नचि मी अन्न भक्षक ॥ एक होऊन ॥ ८ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ * ॥

**टीकाः**—मला स्वरूपज्ञान झाल्यावरोवर मी चकित होऊन, पृथ्वीतलावर जे स्थावरजंगम पदार्थ, शहरें, पुरें, नरनारी, चलनवलन होणारे चित्रविचित्र पदार्थ डोळ्यानीं पाहात होतें तें सर्व विसरून जाऊन, घावरल्याप्रमाणें ( देहाभिमान रहीत ) स्थिती होऊन, मला कोणत्याही ठिकाणीं जाणें येणें राहिलें नाहीं. आणि संसाराच्या खऱ्या तत्त्वांला घेऊन व बाकीच्यांला तिळांजळी देऊन गुरु ( पतीचें ) कृपा झाल्यामुळें, त्यांनी केले त्या बोधानें ज्ञानाग्नि प्रज्वलीत होऊन, त्याच्या ज्वाळेस मोहवळी पडल्यामुळें, मी देही असून विदेह स्थितींत प्राप्त झालें. याप्रमाणें अज्ञनरूपीदेहघर नाहींसें करून आत्मानंदरूपी घर प्राप्त करून घेऊन, देहाभिमानरूपी एकंदर नश्वर स्वभावाला तिळांजली देऊन आजच्या दिवशीं मी आपल्याला धन्य मानीत आहें. आतां देह, बुद्धि, मन, इंद्रियें इत्यादि नश्वर वस्तु आणि लौकीक व्यवहार सोडून, देहत्रयापासून निःसंग होऊन, अव्यक्ता [ माया ] हूनपर राहाणाऱ्या पुरुषाला [ आत्म्याला ] आलिंगन देऊन, मदोन्मत्ताप्रमाणें नाचेन. यामुळें मला कोणी वेडी ह्मणोत, पण माया विक्षेप व जन्ममरणरूप आवरणवस्त्र हीच कोणी साडी ती फेडून, स्वर्गलोकीं स्पष्टरीतीनें मी फुगडी घालीन. आणि आनंदरूपी पाण्यानें भरलेली घागर हातांत घेऊन हुंकार [ सोहं ] रूप मोठी गर्जना करीत फिरेन. सर्व जगताचें उत्पत्तिस्थान मीच आहें. त्यांपूर्वीं मीच होतें. सर्व खाद्यपदार्थ मीच आहें व तें खाणारीही मीच आहें. याप्रमाणें वोलून अन्नपूर्णाबाई पतीचरणीं लीन होऊन गेल्या.

**शास्त्रीबुवाः**—हे प्राणप्रिये ! आतां तुझ्या आणि माझ्या स्वरूपांत कांही भेद राहिला नाहीं. या संसारांत कसें वागावें, हें मी तुला सांगतों. तूं श्रवण कर. जसा समुद्र समर्थ असतांही आपली जागा सोडीत नाहीं, त्याप्रमाणें आपली मर्यादा सुटूं न देतां, स्त्रीजातीच्या धर्ममर्यादांप्रमाणें वागून मदालसा, अनसूयासतीप्रमाणें जगांत आपलें नांव अमर करून ठेवण्यासाठीं सद्धर्म मर्यादा पाळून, इतर स्त्रियांना धर्ममर्यादेप्रमाणें वागावयास लावून स्वतः कृतकृत्य व्हावें. आतां तूं देहभावानें मी पतीची दासी आहेस. जीवभावानें मी पतीचा अंश आहेस. आणि आत्मभावानें मी पतीच आहेस. याप्रमाणें एकरूप होऊन जलतरंगवत् राहून सर्व व्यवहार शरीरधर्माप्रमाणें करावे.

याप्रमाणें हितोपदेश करीत नरोबाच्यावाडीमध्यें असतां कितिएक दिवस लोटल्यावर गोविंदस्वामीचा विचार शरीर सोडून देण्याचा झाल्यामुळें पूर्वींचीं पापरूपकर्में भोगण्यासाठीं ते आजारी झाले. ते एके दिवशीं शास्त्री बुवांस ह्मणाले, माझा विचार मनन ऐकण्याचा आहे. तें तुह्मीं ऐकवाल काय ? हें गोविंदस्वामींचें वचन ऐकून शास्त्रीबुवा मननकरण्याचें पुस्तक घेऊन त्यांस ऐकवूं लागले.

**गोविंदस्वामीः**—मी येथील प्रत्येक शारुयाला सांगितलें कीं, तुह्मी मला मनन ग्रंथ ऐकवा. परंतु त्यावर प्रत्येकानें नाहीं ह्मटल्यामुळें आज तुह्माला सांगत आहें. तुह्मी ऐकाविण्याचें कबूल केलें, त्या योगें माझ्या मनाला मोठा आनंद झाला. शास्त्रीबुवा माझी मनन ऐकण्याची इच्छा नाहीं परंतु मननांतील गुप्त रहस्य समजाविण्यास मी प्रत्येकाला सांगितलें होतें. पण त्याचें प्रारब्ध आड आल्यामुळें त्यांनीं तें कबूल केलें नाहीं. परंतु तुह्मी होय ह्मणालां तेव्हां आतां तुह्माला त्यांतील गुप्त रहस्य सांगतों असें ह्मणून शास्त्रीबुवांना मननांतील खरें रहस्य समजावून, आशीर्वाद देऊन, सांगितलें कीं, तुह्मी थोड्याच अवकाशांत या जगांत मननरूप होऊन जाल. गोविंदस्वामीनीं दिलेला आशीर्वाद ऐकून शास्त्रीबुवांनीं स्तवन करण्यास आरंभ केला.

## प्रार्थनाष्टक.

जो सत्य आहे परिपूर्ण आत्मा। जो नित्य राहे उदितप्रभात्मा ॥ ज्ञानें जयाच्या नर हो कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥ १ ॥ अखंड आत्मा अविनाशिदत्त। तया पदीं लाविति जे स्वचित्त ॥ चित्तप्रभा सोडिति ते कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥ २ ॥ जो जागृतीस्वप्नसुषुप्ति साक्षी। जो निर्विकारी सकलां निरीक्षी ॥ त्रिक्षी परी ज्यास नसे निजार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥ ३ ॥ जलीं स्थलीं सर्वहि वस्तु माजी। व्यापूनी राहेचि तयासि राजी ॥ जो ठेवि भावें नर हो कृतार्थ। तो पूर्ण आनंद गूरू समर्थ ॥ ४ ॥ जें दृश्य तें रूप नसे जयाचें। दृश्यांत राहे अविकारि ज्याचें ॥ स्वरूप तोची अविनाशि अर्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥ ५ ॥ दृश्यासि घेतां नच घेववे जें। स्वरूप तस्य प्रभुचें स्वतेजें ॥ स्वयें प्रकाशें जगिं जो परार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥ ६ ॥ असोनि सर्वत्र गुरुप्रसादा। विना न लाभा करितांहि खेदा ॥ भेदाचि वार्ता करि जो यथार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥ ७ ॥ अनन्य भावें भजतां अनन्य। लभ्य प्रभू जो नच होई अन्य ॥ सन्यस्त सर्वेषण तारणार्थ। तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥८॥

याप्रमाणें प्रार्थना करून साष्टांग नमस्कार घातला. त्यानंतर शरीर त्यागकरण्याच्या पूर्व दिवशीं शास्त्रीबुवांच्या स्वप्नांत येऊन गोविंदस्वामींनीं सांगितलेंकीं, मी उदयीक देह सोडून जाणार आहें. असें ह्मणून अंतर्धान पावले.

शास्त्रीबुवा जागे झाले व शोक करूं लागले हें जाणून गोविंदस्वामींनीं शास्त्रीबुवांस बोलावून सांगितलें तुह्मी शोक करूं नका. कारण सर्वांला केह्मांनाकेह्मांतरी जावयाचेंच आहे. असें समजून ब्रह्मस्वरूपाची

प्राप्तीकरून घ्यावी. ह्मणजे शोकमोहाचें कारण राहणार नाहीं. तुह्मी याप्रमाणें प्राप्ती करून घेतलेली आहेच.

**शास्त्रीबुवाः**—हे भगवन् ! आपण श्रींनीं आजपर्यंत मला सांभाळून या दासाचें संरक्षण केलें आहे. आतां मी कोणाचा समागम करावा ! इतकेंच नव्हे तर आपण ह्या वाडीचे केवळ भूषणभूत आहांत, त्यामुळें आपल्यावियोगाचें कोणाला बरें दुःख झाल्यावांचून राहील ? यामुळेंच माझ्या मनाला खेद उत्पन्न झाला आहे.

थोड्या वेळानें गोविंदस्वामी बेशुद्ध झाले. इतक्यांत शास्त्रीबुवांच्या कानीं शब्द झाला कीं, बड्याकडे वैद्य आला आहे. त्याचे जवळ सूतशेखराची मात्रा आहे, ती आणवून स्वामीला दे. त्यावरून शास्त्रीबुवा बड्याचे घरीं गेले. आणि तपास केला, तों तेथें वैद्य आले होते. त्यांचेकडून सूतशेखर मात्रा घेऊन शास्त्रीबुवा मठांत गोविंदस्वामीपाशीं आले व ती मात्रा दुधांत उगाळून त्यांनीं स्वामीस दिली त्यायोगें ते शुद्धीवर आले. नंतर कांहीं वेळानें गोविंदस्वामी शरीर सोडून श्रीदत्तस्वरूपांत लीन होऊन गेले. त्यावेळीं मौनिस्वामी ब्रह्मनिष्ठ असतांही त्यांला फार वाईट वाटलें. शास्त्रीबुवांनीं मंडळीला एकत्र करून त्यांच्या साह्यानें गोविंद स्वामींच्या कलेवरास कृष्णानदीच्या संचयांत जलसमाधि दिली, आणि मौनी स्वामीच्या आज्ञेवरून विधियुक्त समाराधना केली.

## उत्तरखंडांत प्रयाण.

कांहीं दिवस लोटल्यावर शास्त्रीबुवांना उत्तर खंडांत संचार करण्याविषयीं भगवान् श्रीदत्तमहाराजांची आज्ञा झाली.

श्रीदत्तमहाराजांचे आज्ञेप्रमाणें शास्त्रीबुवा निघण्याची तयारी करूं लागले. ही गोष्ट वाडींतील जनसमुदायास समजतांच त्यांनीं मौनी स्वामीपाशीं जाऊन त्यांना सांगितली व शास्त्रीबुवांनीं येथून जाऊं नये अशी विनंति केली. तेव्हां ते ह्मणाले मी शास्त्रीबुवांस जाऊं देत नाहीं. त्यांना इकडे बोलवा. हें ऐकून शास्त्रीबुवांनीं विचार केला कीं, मौनीस्वामी व दत्तमहाराज हे भिन्न भिन्न आहेत असें नाहीं व ते जाण्याच्या आड येत

आहेत तर मी जाऊं शकणार कसा ? अर्थात् मला जातां यावयाचें नाहीं.

याप्रमाणें विचार करून शास्त्रीबुवांनीं मौनी स्वामीपाशीं जाऊन त्यांस साष्टांग नमस्कार केला.

**मौनीस्वामी:**—शास्त्रीबुवा ! तुह्मीं कोल्हापुरास जातां ?

**शास्त्रीबुवा:**—होय. देवीच्या दर्शनासाठीं उद्यां कोल्हापुरास जाण्याचा विचार आहे.

**मौनीस्वामी**:—तुह्मीं कोल्हापुरास दोन दिवसांपेक्षां जास्त दिवस राहूं नका. मौनीस्वामींचें वाक्य ऐकून शास्त्रीबुवांनीं विचार केला कीं, देव आणि मौनीस्वामी एकच आहेत व त्याकारितांच त्यांचीही पण आज्ञा झाली आहे. असें समजून त्यांनीं निघण्याची तयारी केली.

# मौनीस्वामींचें चरित्र.

मौनीस्वामींची वृत्ति पांच वर्षांच्या बालकाप्रमाणें होती, त्यांना स्वाद किंवा सुगंध मुळींच समजत नसत. लहान मुलांबरोबर खेळणें, त्यांना प्रसाद देणें, त्यांच्याबरोबर लडिवाळपणा करणें, इत्यादि गोष्टी त्यांस आवडत असत. यामुळें वाडींतील बहुतेक मुलें मौनीस्वामीकडे खेळण्यास येत असत. एखादे दिवशीं सर्व मुलें जमून मौनीस्वामीला कृष्णातीरीं वाळूंत खड्डा करून पुरीत असत. त्यांच्या जवळची एखादी वस्तु कोणी नेली तर तें त्यांला समजत नसे. हे ब्रह्मानंदांत इतके निमग्न असत कीं, पंचवीसपर्यंत अंक मोजण्यासही विसरून जात असत. यांचें वचन देवाच्यानेंही फिरवत नसे. याप्रकारें त्यांला वचन सिद्धि असून ते बाल चेष्टाही करीत असत. कोणीही कांहीं सांगो तें ते लहान मुलांप्रमाणें खरें मानीत असत. मान व अपमान ह्मणजे काय हें त्यांस मुळींच माहित नव्हतें.

एकसालीं पाऊस न पडल्या मुळें शास्त्रीबुवा वगैरे मंडळींनीं श्रीदत्तपादुकांवर संतत धारेचें अनुष्ठान सुरू केलें. सप्ताह समारंभ सुरू असल्यामुळें मौनीस्वामी तेथें बसलेले होते. तेव्हां कितिएक मुलें मौनी स्वामी जवळ येऊन ह्मणालीं कीं, महाराज श्रीदत्तभगवान् सप्ताहांत प्रत्यक्ष येऊन बसले असतां त्यांच्या पादुकांवर संतत धार सुरू केलीआहे तेव्हां दोन ठि-

काणीं देव कसे वसूं शकतील ? मौनीस्वामी ह्मणाले बाबांनीं तुमचें ह्मणणें बरोबर आहे ह्मणून संततधार बंद ठेवण्यास सांगा.

मौनीस्वामींच्या आज्ञेवरून मुलांनीं शास्त्रीबुवा वगैरे मंडळींस संतत धार बंद ठेवण्यास सांगितलें. पण संकल्पपूर्वक सुरू केलेली संततधार कशी बंद ठेवावी ? असें कारितां येत नाहीं. असें ह्मणून त्यांनीं ती तशीच चालू ठेविली. मौनीस्वामी ह्मणाले, देव सप्ताहांत बसले असतांही लोक देवांना उपाधि देत आहेत ह्मणून पाऊस येणार नाहीं.

संततधारेचे नियमितकेलेले दिवस पूर्ण होईपर्यंत आकाशांत एकही ढग दिसला नाहीं व एकही पावसाचा थेंब पडला नाहीं. त्यावरून शास्त्रीबुवांनीं विचार केला कीं, जोंपर्यंत मौनीस्वामी प्रार्थना करणार नाहींत तोंपर्यंत कांहीं पाऊस पडण्याची आशा करावयास नको; असें मला वाटतें. याकरितां कांहीं युक्ती केली पाहिजे. असा विचार करून लोकांस सांगितलें कीं, तुह्मीं गांवांतील सर्व मुलें एकत्र करून मौनीस्वामी जवळ घेऊन चला व त्यांस सांगाकीं, पाऊस पडत नाहीं व त्यामुळें ह्या मुलांचें आमच्याकडून पालन होणार नाहीं कारितां आपण यांचा सांभाळ करावा. मींही त्यावेळीं तेथें येऊन स्वामींला सांगेन. तेणेंकरून स्वामींला दया आल्यावांचून राहणार नाहीं व त्यांला दया येतांच आपलें कार्य सिद्धीस जाईल.

शास्त्रीबुवांनीं सांगितल्याप्रमाणें सर्व जणानीं आपापलीं मुलें जमवून मौनीस्वामीपाशीं आणिलीं, व त्यांनीं सांगितल्याप्रमाणें तीं त्यांच्या स्वाधीन करून ते ह्मणाले, हीं बालकें आपण सांभाळा. आमच्याकडून ह्यांचा सांभाळ होत नाहीं. कारण पाऊस पडत नाहीं व त्यामुळें अन्न पिकत नाहीं.

**मौनीस्वामीः**—शास्त्रीबुवा ! देव सप्ताहामध्यें बसले असतां संततधार कां चालविली ?

**शास्त्रीबुवाः**—हे भगवन् ! आपली आज्ञा होण्यापूर्वीं संकल्पपूर्वक संततधार सुरू झाली होती. मग ती मध्येंच कशी बंद कारितां येईल ? या संततधारेच्या कामीं मीपण बसलों आहें. तरी आतां पाऊस पडेल अशी कृपा झाली पाहिजे.

शास्त्री बुवांची ही अशा प्रकारची विनंती ऐकून, मौनी स्वामी श्रीदत्तपादुकांजवळ जाऊन त्यांनीं प्रार्थना केली कीं, हे भगवान् " या आपल्या मुलां बाळां करितां पाऊस पाहिजे तरी कृपाकरून पाऊस पाठवून द्यावा " याप्रमाणें प्रार्थना करून मौनी स्वामी मठांत गेले.

थोड्यावेळानें आकाशांत एकदम अभ्रें चढून मोठा पाऊस पडला त्या योगें सर्वलोकांस मोठा आनंद झाला. अशा प्रकारचे अनेक चमत्कार मौनी स्वामीनीं केले. ते सिद्ध पुरूष होते. ते हल्लीं समाधिस्त झाले आहेत.

शास्त्रीबुवांनीं अन्नपूर्णाबाईसह मौनीस्वामीस नमस्कार करून त्यांची आज्ञा घेऊन श्रीदत्तपादुकांजवळ येऊन त्यांला साष्टांगनमस्कार करून ते श्रीसद्गुरुमहाराजांची प्रार्थना करूं लागले.

कोट्यर्कभं कोटिसुचंद्रशांतं विश्वाश्रयं देवगणार्चितांघ्रिम् ॥
भक्तप्रियं त्वत्रिसुतं वरेण्यं वंदे नृसिंहेश्वर पाहि मां त्वम् ॥१॥
मायातमोऽर्कं विगुणं गुणाढ्यं श्रीवल्लभं स्वीकृतभिक्षुवेषम् ॥
सद्भक्तसेव्यं वरदं वरिष्ठं वंदे नृसिंहेश्वर पाहि मां त्वम् ॥२॥
कामादिषण्मत्तगजांकुशं त्वां आनंदकंदं परतत्त्वरूपम् ॥
सद्धर्मगुप्त्यै विधृतावतारं वंदे नृसिंहेश्वर पाहि मां त्वम् ॥३॥
सूर्येंदुगुं सज्जनकामधेनुं मृषाप्रपंचात्मकविश्वमस्मात् ॥
उदेति यस्मिन्रमतेऽस्तमेति वंदे नृसिंहेश्वर पाहि मां त्वम् ॥४॥
रक्ताब्जपत्रायतकांतनेत्रं सदंडकुण्डापरिहापिताघम् ॥
श्रितस्मितज्योत्स्नमुखेंदुशोभं वंदे नृसिंहेश्वर पाहि मां त्वम् ॥५॥
नित्यं त्रयीमृग्यपदाब्जधुलिं निनादसद्बिंदुकलास्वरूपम् ॥
त्रितापतप्ताश्रितकल्पवृक्षं वंदे नृसिंहेश्वर पाहि मां त्वम् ॥६॥
दैन्यादिभीकष्टदवाग्निमीड्यं योगाष्टकज्ञानसमर्पणोत्कम् ॥
कृष्णानदीपंचसरिद्युतिस्थं वंदे नृसिंहेश्वर पाहि मां त्वम् ॥७॥
अनादिमध्यांतमनंतशक्तिमतर्क्यभावं परमात्मसंज्ञम् ॥
ह्यतीतवाङ्मनपथमद्वितीयं वंदे नृसिंहेश्वर पाहि मां त्वम् ॥८॥
स्तोत्रे क्व ते मे उरुगाय शक्तिश्चतुर्मुखो वै विमुखोऽत्र जातः ॥

**स्तुवन्द्विजिव्होऽभवदीश्वर त्वां सहस्रवक्त्रश्चकितोऽपि वेदः ॥९॥**

याप्रकारें प्रार्थनापूर्वक नमस्कार करून, सर्व पिशाच्चादिगणांस देवाच्या हवालीं करून नरसोबाचीवाडी सोडून शास्त्रीबुवा पत्नी सहीत कोल्हापुरास गेले. त्यावेळीं त्यांचें वय छत्तीस वर्षांचें होतें.

कोल्हापुरास जाऊन जगदंबेचें दर्शनकरून पंढरपुरास गेले.

पंढरपुरास श्रीविठ्ठलाचें दर्शन करून देवालयांतून बाहेर येतात तों श्रीविठोबा ब्राह्मणाचा वेष धारण करून फुटाण्याचा प्रसाद देण्या साठीं आले. तो प्रसाद शास्त्रीबुवांनीं हातांत घेऊन पाहिला तों बाजारांतील भाजलेले फुटाणे होते. तो त्यांनीं त्यावेळीं तसाच पदरास बांधून ठेविला. पंढरीनाथानें रात्रौ स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलेंकीं मी तुला प्रसाद दिला असून तूं कां खाल्ला नाहींस ?

**शास्त्रीबुवाः**–मी कोणतीही बाजारची भाजलेली वस्तु खात नाहीं.

**पंढरीनाथः**–तुला हा प्रसाद खावयाचा आहे किंवा नाहीं ? असें ह्मणून शास्त्रीबुवांनीं पदरांत बांधून ठेविलेले प्रसादाचे फुटाणे घेऊन पंढरीनाथ अंतर्धान पावले.

शास्त्रीबुवा जागृत होऊन पाहातात, तों पदरांत बांधलेले फुटाणे तेथें नाहींत. तेव्हां देवाची प्रार्थना करून ह्मणाले–हे भक्तवत्सला ! आपण माझ्या निग्रहाची परीक्षा पाहाण्यासाठीं आलां असें वाटतें. हा निग्रह आपणच करविला आहे. तो शेवटपर्यंत तडीस नेणें हें ही आपल्याच स्वाधीन आहे असें ह्मणून नमस्कार केला. तेथून निघाले ते शके १८१३ मध्यें बार्शी वरून गोदावरीच्या तीरीं गंगाखेड गांवीं येऊन दाखल झाले व तेथें त्यांनीं मुक्काम केला.

**अन्नपूर्णाबाईः**–हे प्राणनाथ ! स्त्रियांनीं कोणत्यारितीनें नियम पाळल्यानें उत्तम गुणसंपन्न संतति त्यांला प्राप्त होईल ?

**शास्त्रीबुवाः**–हे प्रिये ! प्रथमतः मुलीचे जातकादि गर्भादानापर्यंत सर्व संस्कार यथा विधी झालेले असावे. याप्रमाणें सर्व संस्कार झालेल्या, आई होऊं इच्छिणाऱ्या मुलीचे ऋतुशांतीपर्यंत सर्व संस्कार यथा विधी झाल्या-

वर, जी स्त्री चार दिवसपर्यंत रजस्वला दोष योग्य प्रकारें पाळून, पतिव्रता स्त्रीच्या नियमांनीं पतीची सेवा करिते, तसेंच जीचा पतीही आचार संपन्न असतो, अशा दंपती पासून यथाकाळीं नियमानुसार गर्भ धारण होईल व त्या गर्भाचे यथाकाली यथाशास्त्र संस्कार होऊन त्यापासून जो पुत्र उत्पन्न होईल व जन्मानंतरचे त्याचे सर्व संस्कार योग्य प्रकारें केले जाऊन त्याचें पालन, संगोपन शास्त्रसंमतनियमानुसार केलें जाईल, तर ती संतती अवश्यमेव सद्गुण संपन्न अशीच होईल. मग ती कन्या असो किंवा तो पुत्र असो, आपल्या कुळाला पावन करील. अशा नियमाखेरीज सुखदायक प्रजा उत्पन्न होणार नाहीं.

**अन्नपूर्णाबाई**:—एखादे उच्चवर्णांतील मुलीचा विवाह चुकून नीच वर्णांतील पुरुषाशीं किंवा सगोत्रांत झाला किंवा पती पतीत झाला असेल अशा समयीं पातिव्रत्याचा भंग होऊं नये ह्मणून तिनें पतीशीं कशा रीतीनें वागावें ?

**शास्त्रीबुवा**:—प्रिये ! गतद्वापारयुगामध्यें एका महारानें आपली जात लपवून कांचीमध्यें एका ब्राह्मणकन्येशीं लग्न लाविलें होतें. पुढें त्या दंपत्यास मुलगा झाला. तो घरांत अस्थि जमवूं लागला हें पाहून स्त्रियेनें पतीस विचारिलें कीं, मी पतिव्रताधर्मानें वागत असतां आपणापासून उत्पन्न झालेला हा मुलगा असें नीच कर्म कां करितो ? त्याचें उत्तर त्या महारानें तिला त्यावेळीं मुळींच दिलें नाहीं.

पुढें एकेदिवशीं तो महार आपल्यागावीं जावयास निघाला तें पाहून त्याची स्त्री ब्राह्मणकन्याही त्याचे बरोबर जावयास निघाली. चालतां चालतां महारानें आपलें कपट उघडकीस येऊं नये ह्मणून स्त्रीला एका विहिरींत ढकलून दिलें व आपण पुढें चालता झाला. इतक्यांत त्या रस्त्यानें एक वाटसूर आला त्यानें तिला विहिरींतून जीवंत बाहेर काढिली व सावध केली. पुढें ती आपल्या आई बापांच्या घरीं जाऊन राहिली पण तिनें ही गोष्ट आपल्या आईबापांस कळविली नाहीं. कांही दिवसांनीं तो महार कांची येथें परत आला. त्याला पाहून ती पतिव्रता स्त्री त्याच्यापाशीं जाऊन

त्याला आपल्या घरीं घेऊन आली व पतीची सेवा पूर्ववत पतिव्रता धर्मानें व एकनिष्ठपणानें सन्निध राहून करूं लागली. ती तिची सेवा पाहून महारानें निश्चय केला कीं, ही माझी पत्नी माझी लांच्छनास्पद गोष्ट बाहेर घालविणार नाहीं असा विचार करून तो तिला ह्मणाला हे प्रिये! मी जातीचा महार आहें, ह्मणून हा मुलगा असें नीच काम करितो. हें पतीचें भाषण ऐकून ती पतीव्रता अतिशय दुःखित झाली. हरहर परमेश्वरा! या अनाथ दासीवर केवढा बरें कोप हा! असे उद्गार काढून पतिशय्येचा त्याग करून अत्यंत दुःखीत होऊन परमेश्वराची प्रार्थना करूं लागली. हे देवाधिदेवा! माझ्या विषयीं तुमच्या मनांत कांहीच दया उद्भवली नाहीं काय? हाय हाय! हें समुद्रांत वडवानळ लागल्यासारखें झालें. ह्या गरीब ब्राह्मणकन्येला विनाकारण कशाला भ्रष्ट करविलेंत. हाय हाय! आतां आपल्याशिवाय मला ह्या बिकट प्रसंगांतून कोण पार पाडूं शकेल? हे दयानिधे! ह्या अनाथ बालिकेवर असा हा कोप कां केलास? हाय हाय! आतां मी काय करूं, कोठें जाऊं, हें तोंड जगांत कसें दाखवूं; याप्रमाणें दुःख करीत बापाजवळ जाऊन बापास ह्मणाली भांडें अशुद्ध झालें तर तें शुद्ध कशानें होतें?

बाप ह्मणाला—हेमुली! पात्राची शुद्धता अग्निसंस्कारानें होत असते.

बापाचें वचन ऐकून त्या पतिव्रतेनें पवित्रक्षेत्रांत जाऊन अग्निप्रवेश करण्याचा विचार केला व आपल्या मनांत निश्चय केला कीं, जर या महाराला जीवंत सोडून दिलें तर हा दुष्ट पुनः दुसऱ्या एकाद्या गरीबब्राह्मणकन्येस फसवील. करितां ह्यास जाळून टाकलेला उत्तम. असा विचार करून मुलालाही बरोबर घेतला व यमुनातीरीं मधुवनामध्ये जाऊन तेथें आपण जाळून घ्यावयाचें ठरवून जावयास निघाली. निघतांना आपला पति निद्रित आहे अशी संधी पाहून कोणालाही यत्किंचित् सुगावा लागूं न देतां तिनें स्वतःच्या घरास आग लावून घरासकट पतीच्या देहाचें भस्म करून टांकिलें व आपण ठरल्याठिकाणीं जाऊन चिता तयार करून त्यांत तिनें मुलासह आपला देह दग्ध करून टाकिला.

ज्या ठिकाणीं तीं मातापुत्र जळून भस्म झालीं त्या ठिकाणी कांहीं

दिवसांनी वेणू [ कळकांचें वेट ] उगवले. त्या पतिव्रतेला पुत्रासह मुक्ति देण्याच्या हेतूनें श्रीकृष्णपरमात्म्यानें त्या वेटांतील एक वेळू काढून त्याची मुरली केली व तिला सतत सन्निध बाळगून त्या माता पुत्रांला मुगति दिली.

ह्याप्रमाणें नीच कुलांत लग्न झालें तर त्या पतिव्रतेप्रमाणें पतिपुत्रां-चा त्याग करावा. त्याचप्रमाणें एका गोत्रांत लग्न होईल तर त्याला बंधु समजून त्याच्याशीं वागावें. पति बाटला असेल तर तो प्रायश्चित घेऊन शुद्ध होईपर्यंत त्याचा त्याग करावा व ईश्वरभजन करून राहावें. याप्रमाणें वर्तन केल्यानें तिला वर सांगितलेल्या पतिव्रतेप्रमाणें ईश्वर स-द्गति देतो.

याप्रमाणें पतीच्या मुखांतून गोष्ट ऐकून अन्नपूर्णाबाईस फार आनंद झाला.

पुढें कांहीं दिवस लोटल्यावर शास्त्रीबुवा व अन्नपूर्णाबाई ह्यांस दे-वानी दृष्टांत दिला कीं, तुह्मां दोघांला नेण्यासाठीं आह्मी आजपासून चौथ्या-दिवशीं येऊं. त्याकारितां तयार असावें.

**शास्त्रीबुवाः—** देवा ! मी संन्यास ग्रहण केल्याशिवाय येणार नाही. तुह्माला घेऊन जावयाचेंच असेल तर माझ्या पत्नीला घेऊन जावें.

शास्त्रीबुवांच्या प्रार्थनेप्रमाणें चवथ्यादिवशीं देव विमान घेऊन आले. त्यांचा बेत फक्त अन्नपूर्णाबाईसच घेऊन जावयाचा होता. त्यारात्रीं अन्नपूर्णाबा-ईस थोडासा ज्वर आला.

**अन्नपूर्णाबाईः—** प्राणनाथ ! आज माझें शरीर पडणार आहे. हे देव मला नेण्यासाठी आले आहेत. त्यांना मी पाहात आहें व ते आपणालाही दिसत असतील.

शास्त्रीबुवांनीं अन्नपूर्णा बाईला स्नान घालण्यासाठीं गंगा आणि गोमय मागविलें.

अन्नपूर्णाबाईनीं गंगोदकानें स्नान करून स्वतःसाठीं गोमयानें जमीन सारविली. व त्यावर दर्भ आंथरून पुन्हा स्नान केलें. धूत वस्त्र नेसून हळद कुंकूं लाविलें. ब्राह्मणस्त्रियांना बोलावून आपले अलंकार दान केले.

घ सविध पणानें परलोकीं जाण्याविषयीं परवानगी असावी ह्मणून, पुढें लिहिल्या प्रमाणें त्या आपल्या पतीची प्रार्थना करूं लागल्या.

**अन्नपूर्णाबाई**—हे प्राणनाथ ! आपण माझे पति, गुरू आणि इष्टदेव आहांत. आजपर्यंत माझे हातून झालेलीं सर्व शुभ व अशुभ कर्में मीं अपल्या चरणीं अर्पण करीत आहें. हे पतीत पावन ! माझ्या सर्व पातकांचा नाश करून मला देवयानांत जाण्याचा मार्ग दाखवा. आतां मी जन्ममरणापासून कंटाळून गेलें आहें. हे अग्निरूप परमात्मा ! या माझ्या पंचभूतात्मक शरीरास भस्म करा. माझे प्राण सूत्रात्मवायुप्रमाणें मिळवा आणि मला ब्रह्मस्वरूपाचें चिंतन करवा.

हे प्रभो ! पुनः जन्म न यावा याकरितां आपणास ही दासी वारंवार नमस्कार करिते. हे प्राणनाथ ! यावेळीं आपण आपलें सत्यस्वरूप मला दाखवावें.

अन्नपूर्णाबाईची प्रार्थना ऐकून शास्त्रीबुवा प्रसन्न झाले व ह्मणाले, तुझ्या इच्छेप्रमाणें तुला फल प्राप्त होईल. हें ऐकून अन्नपूर्णाबाईनीं आपलें मस्तक पतिचरणावर ठेवून ' हर हर श्रीगुरूदेव दत्त ' असें ह्मणून प्राण सोडिला व देव—विमानांत बसून त्या ब्रह्मलोकीं गेल्या. याप्रमाणें अन्नपूर्णाबाईनीं पति सेवेच्या योगानें योग्यांलाही दुर्लभ अशा ब्रह्मलोकाची प्राप्ती करून घेतली. त्या दिवशीं शके १८१२ वैशाख शुद्ध चतुर्दशी होती. हे भगवंता ! अन्नपूर्णाबाईप्रमाणें इतर सर्व स्त्रियांला आपण सन्मति द्यावी.

शास्त्रीबुवांनीं अन्नपूर्णाबाईचें और्ध्वदेहिक कृत्य यथाविधी पार पाडिलें. नंतर श्रीदत्तभगवानाच्या आज्ञेनुसार पत्नीच्या १४ व्या दिवशीं संन्यास गृहण केला.

शास्त्रीबुवांना श्रीगोविंद स्वामीच्या स्वरूपानें येऊन श्रीदत्तमहाराजानीं रात्रीं प्रेषोच्यार दिला व सांगितलें कीं, ' आज पासून तुमचें नांव वासुदेवानंदसरस्वति ठेविलें आहे. आजपासून तुह्मीं नित्य माधुकरी मागत जावें. ' ह्याप्रमाणें सांगून तें भगवंतांचें स्वरूप अंतर्धान पावलें. दुसऱ्या दिवशीं शास्त्रीबुवांनीं ब्राह्मणाला बोलावून यथाविधी प्रायश्चित घेऊन

संन्यास गृहण केला. त्या दिवशीं ग्रामस्थांच्या अत्याग्रहामुळें माधुकरी आणिली नाहीं. मठांत भिक्षा केली त्यामुळें त्यानां तावडतोब अतिसाराचा उपद्रव सुरू झाला. हें जाणून शास्त्रीबुवा देवाची प्रार्थना करूं लागले.

**मजवरी कां परी दृष्टि नसे । जरि मीं दूषी असें ॥ मज० ॥ धृ० ॥**
**माझ्या दोषां नाही गणती । अगणित भू कणसें ॥ १ ॥**
**नाहीं दयाळू लोकीं तुजसम । मजसम दोषी नसे ॥ २ ॥**
**रोगिच नसतां मग कोण पुसे । असतां वैद्य जसे ॥ ३ ॥**
**गुरुमायवाप तूं हरीं ताप । तव चित्तीं कोप नसे ॥ ४ ॥ मज० ॥**

या प्रकारची स्तुती ऐकून श्रीदत्तभगवान प्रसन्न झाले व त्यांनीं त्यांला दर्शन दिलें. आणि आज्ञा केलीकीं, उज्जनी ऐथें श्रीदत्तमंदिरांत नारायण स्वामी आहेत त्यांजकडे जाऊन त्यांजपासून दंड घ्यावा.

शास्त्रीबुवांच्या प्रकृतीस आराम वाटल्याबरोबर ते गंगाखेड सोडून निघाले व उमरखेड येथें येऊन दाखल झाले.

ज्यावेळीं शास्त्रीबुवा गंगाखेड येथें राहात होते, त्यावेळीं उमरखेड येथें गोचरस्वामी या नावाचे सत्पुरूष राहात होते. ते पूर्वाश्रमांत ब्रह्मचारी होते. एकवेळीं ते आजारी पडले व आतां शरीर सोडून त्यांचे प्राण जातील असें लोकांनां वाटल्यावरून लोकांनीं त्यावेळीं त्यांस आतुर संन्यास दिला. त्यानंतर गोचरस्वामी साधारण बरे झाले त्यावेळीं ह्मणाले, ‘ माझें यज्ञोपवीत व शेंडी कोठें गेली, माझ्या आंगावर हें भगवें वस्त्र कोणी पांघरावयास घातलें, ’ तेव्हां ब्राह्मण ह्मणाले, तुह्माला आतुर संन्यास दिला आहे.

**गोचरस्वामी:—**मीं सहस्त्रब्राह्मणभोजन घालण्याचा संकल्प केला होता, त्याचें आतां काय करावें? हें ऐकून सर्व ब्राह्मण ह्मणाले, आजपासून आपणाला भिक्षेचे आमंत्रण सांगण्यास जो कोणी येईल, त्याला आपण असें सांगत जावें कीं, ‘ माझ्याबरोबर अकरा ब्राह्मण जेवावयास येतील. त्यांची व्यवस्था तुमच्याकडून होत असेल तर मीं भिक्षेला तुमच्याकडे येईन. ’ ह्याप्रमाणें लोकांनीं त्यांस सांगून ठेविलें.

गोचरस्वामींस ही युक्ती पसंत पडली. त्यांनीं त्याच दिवसापासून नियम धरिला कीं, अकरा ब्राह्मणाच्या भोजनाचें आमंत्रण आल्याशिवाय भि-

क्षेला जावयाचेंच नाहीं. गेल्यावर भिक्षेचें आमंत्रण देणाराकडून भूमीवर गोमयानें सारवून त्या जागेवर भिक्षा वाढवावयाची. मग ती हातानें उचलून मुखांत न घालितां गाईप्रमाणें मुखानेंच भक्षण करावयाची. असा क्रम त्यांनीं सुरु ठेविल्यामुळें सर्व लोक त्यांला गोचरस्वामी असें ह्मणूं लागले.

याप्रमाणें नियमबद्ध वागून श्रद्धापूर्वक ईश्वरभक्ति सुरु केल्यामुळें त्यांजवर ईश्वराचा अनुग्रह होऊन त्यांना वचनसिद्धि प्राप्त झाली. त्यामुळें लोक आपआपल्या कामना पूर्ण होण्यासाठीं त्यांला नवस करूं लागले, व त्यांच्या कामनाही पूर्ण होऊं लागल्या.

एका बाईनें असा नवस केला होता कीं, मला मुलगा झाला ह्मणजे मी माझे सर्व दागिने काढून गोचरस्वामींच्या आंगावर घालीन. ईश्वरकृपेनें पुढें तिला मुलगा झाला. त्यावेळीं ती बाई मुलाला घेऊन आपल्या सर्व दागिन्यांसह गोचरस्वामींपाशीं आली. आणि तिनें नवसाची सर्व हकिगत त्यानां सांगितली. ती ऐकून गोचरस्वामी ह्मणाले, बाई तुह्मीं ज्याप्रमाणें नवस केला असेल त्याप्रमाणें तो फेडावा. त्याला माझी मान्यता आहे. ह्याप्रमाणें स्वामींची परवानगी मिळतांच त्या पतिपत्नीला मोठा आनंद झाला. त्यांनीं नवस बोलल्या प्रमाणें सर्व दागिने स्वामींच्या आंगावर घातले. स्वामींला केवळ स्त्रीवेषधारी बनवून सोडिलें. शेवटीं हातांत बांगड्याही पण घातल्या. नंतर त्यांची षोडशोपचारें पूजा केली, आरती ओवाळली व आपल्या मुलास स्वामींच्या चरणावर घातला. आणि त्या दिवशीं गांवांतील सर्व ब्राह्मणास आमंत्रण देऊन भोजनास बोलावून मठभिक्षा केली. त्या दिवसापासून स्वामीमहाराजांच्या आंगावर नवसांचे अनेक प्रकारचे अलंकार पुष्कळ लोक घालूं लागले. स्वामींच्या हातांत बांगड्या इतक्या झाल्या कीं, नवसाच्या नवीन नवीन आलेल्या बांगड्या घालण्यास त्यांच्या हातांत मोकळी जागाच उरली नाहीं. त्यांच्या निमित्तानें रोज हजारों ब्राह्मण जेवीत होते. त्यासमयीं गोचर स्वामींचे गुरुबंधु तुकाराममहाराजही वेळासहून येत असत.

तुकाराममहाराजांवर पूर्ण गुरुकृपा आणि ईश्वरीप्रसाद झाला होता. ते पिशाचवृत्तीनें राहून विदेहस्थितीचें पूर्ण सुख अनुभवीत असत.

दररोज रात्र झाली कीं, शूद्राचे घरीं जाऊन झोंपावें असा त्यांचा नियम होता. सकाळीं उठून जातेवेळीं त्या घरातील जें एकादें वस्त्र सहजीं हातीं लागण्यासारखें असेल तें घेऊन आपण पांघरून घरीं जात असत.

एके रात्रीं तुकाराममहाराज एका भंग्याचे घरीं निजावयास गेले. सकाळीं निजून उठले व रोजच्या नियमाप्रमाणें वस्त्र पाहूं लागले तों त्या भंग्याची गोधडी त्यांच्या सहजीं हातीं लागली. ती घेऊन ते गोचरस्वामींकडे आले. त्यावेळीं इकडे गोचरस्वामी व त्यांच्या बरोबरचे सर्व ब्राह्मण जेवावयास बसण्याच्या तयारींत होते. ह्मणून त्यांनीं तुकाराममहाराजांस भिक्षा करण्यास सांगितलें. तें ऐकून ते जेवावयाला बसलेले ब्राह्मण ह्मणाले, महाराज ! हा मनुष्य भ्रष्ट आहे. गेल्यारात्रीं हा भंग्याच्या घरीं गेला होता. याच्याजवळ ही जी गोधडी आहे ती भंग्याच्या घरची आहे. याकरितां तुह्मी याला आपल्याबरोबर जेवावयास घ्याल तर आह्मी जेवावयास बसणार नाहीं. हें ऐकून गोचरस्वामी हंसून तुकाराममहाराजांस ह्मणाले, महाराज ! हे सर्व ब्राह्मण आपणास भ्रष्ट ह्मणतात. तर तुह्मी ती गोधडी टाकून द्या.

तुकाराममहाराजांनीं हें गोचरस्वामींचें भाषण ऐकून आंगावरील गोधडी दूर फेंकून दिली. परंतु पाहतात तों तसलीच दुसरी गोधडी त्यांच्या आंगावर दिसूं लागली. पुन: तीही टाकून देण्यास सांगितलें व तीही त्यांनीं टाकिली. तरी तिसरी पुनः तशीच आहे. अशाप्रकारें काढून टाकलेल्या गोधड्यांचा तेथें ढीग झाला तरी तुकाराममहाराजांच्या आंगावरची गोधडी तशीच त्यांच्या आंगावर आहे असें पाहून सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. तेव्हां गोचरस्वामी तेथें सर्व जमलेल्या ब्राह्मणांस ह्मणाले, हे तुकाराममहाराज भ्रष्ट झाले आहेत कीं काय ? बोला. त्यावेळीं सर्व ब्राह्मण लज्जायमान होऊन अधोमुख झाले व आमच्याकडून आमच्या गैरसमजुतीनें आपल्यासारख्या पूज्य पुरुषांचा अपमान झाला तरी आपण कृपाळूपणें आह्मांस क्षमा करावी. अशी उभय स्वामीपाशीं हात जोडून याचना करूं लागले.

**गोचरस्वामी:**—हे तुकाराममहाराज कोणत्या योग्यतेचे आहेत हें आम्हांस माहित आहे. म्हणूनच आम्हीं दररोज यांची भिक्षेसाठीं मार्ग

प्रतिक्षा करित असतो. साधुपुरुषांचीं छिद्रें कोणीही कधींही पाहूं नयें. त्यांच्या आंगीं जे जे सद्गुण आढळून येतील ते ते ग्रहणकरण्याच्या प्रयत्नास लागावें. दुर्गुण घेऊंनये. बाबांनो! ज्ञानी पुरुष अग्निप्रमाणें असतात. ह्मणून त्यांला कोणत्याही प्रकारचे दोष लागत नसतात. कारण ते देहाभिमान सोडून देहाला वस्त्रपटाप्रमाणें मानून देहाव्यतिरिक्त होऊन वर्तत असतात. त्यामुळें शरीरानें केलेल्या कोणत्याही दोषांनीं ते दूषीत होत नाहींत. हे ब्राह्मण हो! आपल्याला देहाचा अभिमान असल्या मुळें आपण अज्ञानी आहों करितां देहाचे जे वर्णाश्रमादि धर्म आहेत ते अवश्य पाळून प्राणीमात्रांविषयीं अंतःकरणांत सहानुभूति बाळगून, काया, वाचा, मनें करून त्यांवर नेहमी उपकार करीत जावें. बाबांनो! ज्यांच्यावर गुरूची व ईश्वराची कृपा होईल त्यांला तुकाराममहाराजांप्रमाणें उत्तम गति प्राप्त होईल. ह्यारितां प्रत्येकानें सद्गुरूची व साधुसत्पुरुषांची सेवाकरण्यांस तत्पर असावें. ह्याप्रमाणें गोचरस्वामींचें भाषण ऐकून सर्व ब्राह्मणांनीं तुकाराममहाराजांची क्षमामागून त्यांला साष्टांग नमस्कार घातला.

या कलियुगांत साधुपुरूष जर असेच चमत्कार करून दाखवितात तर मग द्वापारांत कौरवांच्या सभेंत द्रौपदीच्या एका वस्त्राचीं अनेक वस्त्रें झालीं त्यांत आश्चर्य तें काय? त्यानंतर तुकाराममहाराजांसह सर्व ब्राह्मणांनीं अन्न भक्षण केलें.

गोचरस्वामी समाधिस्त झाल्यावर थोड्याच दिवसांनीं शास्त्रीबुवा त्या गांवीं आले होते व त्यांच्याच मठांत उतरले होते. तेथून माहूरीगडास येऊन मातृतीर्थ आदि सर्व तीर्थांत स्नान करून, अत्रि, अनुसूया आणि श्रीदत्तमहाराज यांस नमस्कार करून त्यांची प्रार्थना करूं लागले.

## प्रभात-पद.

**पहाटेसी उठोनी भक्त हर्षोनी चित्तीं। गुरुप्रति भेटों येती सह्याद्री वरती ॥ धृ० ॥ कृतवीर्यात्मज सहस्त्रबाहू अर्जुन तो पुढती ॥ कयादुसुत जो भागवतोत्तम प्ऱ्हाद सुमती ॥ १ ॥ ययातिसुतयदु ज्याच्या वंशा देवहि वंदीती ॥ मदालसेचा**

नंदन चवथा अलर्क ज्या ह्मणती ॥ २ ॥ सुतपा नामक भूसुर मुनिवर विष्णुदत्त सुमती ॥ अन्यहि येती सुरमौनितती करिती ते प्रणती ॥ ३ ॥ अनुग्रहयेच्या वाळा दत्ता करितों तुज विनंती ॥ उठीं उठिं विमला अरुणउदेला सरली हे राती ॥ ४ ॥ मंगलधामा घनःश्यामा उठिं उठिं निगुती ॥ अरुणउदेला प्रकाश पडला पक्षी गलबलती ॥ ५ ॥ कुंकुम माखुनि प्राचि कामिनी हर्षुनि आत्मपती ॥ येतो ह्मणुनी ये लगबगुनी लोटी तम पुढती ॥ ६ ॥ द्विजाति उठती वेदा पढती वासुदेव प्रार्थी ॥ उठिं उठिं दत्ता श्रीगुरुनाथा दावीं सुख दीसी ॥ ७ ॥ पहांटेसि उठुनी० ॥

याप्रमाणें प्रार्थना करून साष्टांग नमस्कार केला आणि शास्त्रीबुवा तेथून रेणुका मातेचें दर्शन करण्यासाठीं आले. आणि रेणुका मातेला साष्टांग नमस्कार करून प्रार्थना करिते झाले.

## रेणुकाष्टक.

ऐंद्रादिवंदितपदे वरदेऽभिष्टकामदे ॥ कामदेवार्चितेऽनंते रेणुकेंऽब नमोऽस्तु ते ॥ १ ॥ एकवीरे निजाधारे रुचिरे सज्जनादरे ॥ उदरे रेणुसंजाते रेणुकेंऽब नमोऽस्तु ते ॥ २ ॥ करुणारससंपूर्णे नयने सुस्मितानने ॥ शोभने पाहि नो भीते रेणुकेंऽब नमोऽस्तु ते ॥ ३ ॥ वीरमातर्महादेवी त्वदन्या काऽपरा भुवी ॥ तारिणी दुर्गतोऽनंते रेणुकेंऽब नमोस्तु ते ॥ ४ ॥ राममातर्महामाये जगदभिप्रियेऽभये ॥ विजये वेदविनुते रेणुकेंऽब नमोऽस्तु ते ॥ ५ ॥ यैरर्चिते तव पदे ते धन्याः परमे पदे ॥ निहितास्ते सुरनुते रेणुकेंऽब नमोऽस्तु ते ॥ ६ ॥ न त्वदन्या गतिर्देवी परमा खलु शांभवी ॥ भुक्ति-मुक्तिप्रदे शांते रेणुकेंऽब नमोऽस्तु ते ॥ ७ ॥ मः केशवः शिवश्चापि सृष्टिस्थित्यंतकारिणः ॥ प्रसादादेव तेऽनंते रेणुकेंऽब नमोऽस्तु ते ॥ ८ ॥ जगदंब नमोऽस्तु रेणुके

**परिपाहिश्वरि नः सुभावुके ॥ जयलाभयशःप्रमुदे मुदे स्तुतिरेषाऽस्तु तवाखिलार्थदे ॥ ९ ॥ नाऽहंत्राहजं नार्चनपद्धतिं ते जानासि भक्तिस्त्वयि मे भवान्ते ॥ अथापि मां त्वं कुलदेवि भक्तकुलोद्भवं प्रार्थ्य विचार्यसक्त॥ १० ॥ मातापुरनिवासिन्याः श्रीदेव्याः स्तोत्रमुत्तमम् ॥ यः पठेन्नियतो भक्त्या सर्वान्कामान्स आप्नुयात् ॥ ११ ॥**

याप्रमाणें प्रार्थनापूर्वक नमस्कार करून उज्जनीस जाण्यासाठीं नर्मदा तटाकीं मंडळेश्वर ग्रामीं आले. त्या ठिकाणीं कैवल्याश्रम नांवाचे फारच योग्यतेचे स्वामी त्यांला भेटले. त्यांनीं ' मी तुह्माला दंड देतों ' असें सांगितल्यावरून शास्त्रीबुवांनीं उज्जनीस जाण्याचें तहकूब केलें. त्याच रात्रीं श्रीदत्तभगवान शास्त्रीबुवांच्या स्वप्नांत येऊन ह्मणाले, ' कां? तुह्मीं माझी आज्ञा उल्लंघन करितां कीं काय ?

दुसऱ्या दिवशीं ही हकिगत शास्त्रीबुवांनीं कैवल्याश्रमस्वामींना सांगितली. ती ऐकून त्यांनीं दंड देण्यास रुकार दिला नाहीं. पुढें शास्त्रीबुवा उज्जनीस जावयास निघाले त्यांनीं वाटेंत बलवाडा गांवीं मुक्काम केला तेथें मधुकरी मागून, तेथील ठाणेदाराचे आग्रहावरून त्याचे घरीं भिक्षेस असले. त्यावेळीं नर्मदातीरीं फिरणारा एक ब्राह्मण सहजीं तेथें आला व तोही जेवावयास बसला होता; हातांत आपोशन घेऊन तो ह्मणाला मला दोनशें पात्रांचा शिरापुरीचा सिधा द्याल तर मी जेवण करीन. नाहीं तर हा पहा उठून चाललों.

हें त्या ब्राह्मणाचें भाषण ऐकून व त्याचें तें पात्र सोडून उठण्याचें कृत्य पाहून ठाणेदार व त्याची पत्नी अतीशय घाबरून गेलीं व ह्मणूं लागलीं कीं, " महाराज मी अत्यंत गरीब मनुष्य आहें. ह्मणून इतक्या मनुष्यांचा सिधा देण्याचें माझे आंगीं सामर्थ्य नाहीं; पण दहा मनुष्यां पुरती शिरापुरीची सर्व सामुग्री मला देण्याचें सामर्थ्य आहे व तेवढी देण्यास मी तयार आहें. "

**ब्राह्मणः**–तुह्मी जेव्हां दोनशें मनुष्यांचा सिधा देण्याचें कबूल कराल तेव्हांच मी जेवीन असें ह्मणून ब्राह्मण जाऊं लागला. हें पाहून ठा-

णेदार व त्याची पत्नी आमंत्रण करून आणिलेल्या संन्यास दीक्षाधारी शास्त्रीबुवांस ह्मणाली, स्वामीमहाराज आतां आह्मीं काय करावें? हा ब्राह्मण विनाकारण हट्ट धरून बसला आहे.

**शास्त्रीबुवा:**—हे ब्राह्मणा! तुह्मी पात्रावर बसून आतां असा हट्ट का करितां? तुह्मांस दोनशें पानांचा सिधा पाहिजे होता तर तसें तुह्मी अगोदरच सांगावयास पाहिजे होतें? आतां तुह्मांला एका पानाचाही सिधा मिळावयाचा नाहीं. तुमच्यासारखे जे लबाड लोक असतात त्यांना दान देण्याविषयीं शास्त्राची आज्ञा नाहीं. जेवावयाचें असेल तर जेवा, नसेल तर खुशाल उठून जा. तुह्मी उठून गेल्याबद्दलचा दोष ह्या गृहस्थास लागावयाचा नाहीं. असें शास्त्रीबुवांचें बोलणें ऐकून तो ब्राह्मण आपला हट्ट सोडून देऊन जेवूं लागला. तें पाहून ठाणेदार ह्मणाला; स्वामी महाराज! आज आपण मला या धर्मसंकटांतून मुक्त केलेंत. आपण नसतां तर आज आमची फजिती झाली असती.

**शास्त्रीबुवा:**—अशा प्रकारचे प्रपंची लोक पानावरून उठून गेले तरी त्याबद्दल मालकाला कोणत्याही प्रकारचा दोष लागत नाहीं.

बलवाड्याहून निघून शास्त्रीबुवा उज्जनीस गेले. तेथें दत्तमंदिरांत जाऊन, नारायणस्वामींला नमस्कार करून त्यांला आपली सर्व हकिगत निवेदन केली. नारायणस्वामी ह्मणाले, माझे सद्गुरुमहाराज अनिरुद्धस्वामी आहेत. त्यांचे आज्ञे वरून तुह्मांस दंड देतां येईल एरवीं देतां येणार नाहीं. हें ऐकून शास्त्रीबुवा अनिरुद्ध स्वामी जवळ जाऊन त्यांलां नमस्कार करून त्यांनीं आपली सर्व हकिगत त्यांला सांगितली.

**अनिरुद्धस्वामी:**—फार उत्तम आहे. नंतर त्यांनीं आपला शिष्य नारायणस्वमी यास बोलावून आणून शास्त्रीबुवांस दंड देण्याविषयीं त्यांस आज्ञा केली. त्यावरून श्रीनारायणस्वामींनीं जेष्ठ वद्य द्वितिये दिवशीं शास्त्रीबुवांस दंड देऊन त्यांचे नांव वासूदेवानंदसरस्वती असें ठेविलें. त्या दिवसा पासून शास्त्रीबुवांला वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज असें सर्व लोक ह्मणू लागले. सर्व सन्याशांस मठभिक्षा करविली. आणि आपण आपल्या नित्यक्रमाप्रमाणें माधुकरी मागून आणण्याची आज्ञा घेण्यासाठीं श्रीगुरु जवळ गेले.

**नारायणस्वामी:**–आजचा दिवस तुह्मी आह्मा सर्वांबरोबर भिक्षा करण्यास बसा. असें ऐकून माधुकरीस न जातां त्यांनीं इतर सर्व स्वामी बरोबर भिक्षा केली. हें श्रीदत्तमहाराजांस पसंत पडलें नाहीं. त्यामुळें त्यांना ( शास्त्रीबुवांना ) ओकाऱ्या सुरू झाल्या. त्या कांहीं केल्या बंद होईनात. तें पाहून नारायणस्वामी घाबरले व श्रीदत्तमहाराजांची आज्ञा उल्लंघन केल्यामुळें ह्या उलट्या सुरू झाल्या असें समजतांच श्रीनारायणस्वामींनीं श्रीदत्तमहा-राजांला वंदन करून प्रार्थना केली कीं, महाराज ! हा आपला शिष्य आहे, व मीही आपलाच शिष्य आहें. माझ्या अपराधाबद्दल मला क्षमा करून ह्या आपल्या शिष्याला बरें करावें. या नंतर मी आपल्या आज्ञेविरुद्ध कोणतेंही कार्य यांला सांगणार नाहीं. अशी प्रार्थना करितांच श्रीगुरुमूर्तीच्या उलट्या बंद झाल्या. [ यापुढें शास्त्रीबुवांला ‘ श्रीगुरुमूर्ति ’ या नांवानें संबोधिलेलें आहे. ]

संन्यास ग्रहण केल्यानंतर श्रीगुरुमूर्तीस श्रीदत्तमहाराजांची अशी आज्ञा झाली कीं, ‘ आजकाल बहुतेक लोक शास्त्रविरुद्ध मार्गानें वागून धर्म-भ्रष्ट झाले आहेत व नास्तीक होत चालले आहेत. यास्तव तुह्मीं तीर्थाच्या ठिकाणीं संचार करून श्रद्धाळू भाविकलोकांस सदुपदेश करून सन्मार्गी लावावें. ’ श्रीदत्तमहाराजांच्या आज्ञेनुसार गुरुमूर्ती प्रत्येक तीर्थाच्या ठिकाणीं संचार करून ज्याला जें शिकणें असेल तें शिकवूं लागले. ते सर्वांला असें सांगत असत कीं, ह्या कलियुगांत ब्राह्मणेतर जातीच्या मनुष्याला वेदाचा अधिकार नाहीं. ह्मणून इतर जातींनीं वेदोक्त कर्म करूं नये. या उप्पर ज्याला पुण्याचे जागीं पापाचा संचय करून नरक प्राप्ती करून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं वाटेल तर वेदोक्त कर्म करावें. अथवा वेद भाष्यें वा-चावीं, त्यांत आमचेंही कांहीं जात नाहीं. त्याचप्रमाणें पुराणिकांलाही असेंच सांगत असत कीं, पुराणामध्यें श्रुतिभाग आला तर तो वाचून न दाखवितां फक्त त्याचा अर्थ मात्र सांगावा. पुराण ऐकावयास स्त्रियादि सर्व जातींचे लोक बसतात. त्यांला श्रुती ऐकविल्या तर वेदपुरुषांचा शाप होऊन ऐकविणाराला नरकप्राप्ती होते. याकरितां श्रीगुरुमूर्ती स्वत:

श्रुती ह्मणत नसत व इतरांसही त्या ह्मणण्याची मनाई करीत. श्रीगुरुमूर्ती उज्जनी येथें आपणांस शरण येणाऱ्या ब्राह्मणलोकांस आपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणे कर्माचा उपदेश करून श्रीगुरुसेवा सांगत असत.

## काळूमियाची कथा.

महत्पूर येथें काळू मियां या नावाचा सत्यभूमिकेपर्यंत पोंचलेला एक ब्रह्मनिष्ट ब्राह्मण पिशाचवृत्तीनें राहात होता. त्याला वेडा असें समजून तेथील लोक त्याची वाटेल त्याप्रमाणें चेष्टा करीत असत. पुढें कितीएक लोक उज्जनीस येऊन श्रीगुरुमूर्तीस विचारूं लागले कीं, महाराज ! हल्लीं महत्पुरास काळू मिया नावांचा एक ब्राह्मण आहे त्याचे बाबतींत आह्मांस कांहींच समज पडत नाहीं; तरी आपण कृपा करून त्यांच्याविषयीं आह्मांस खुलासा सांगावा.

**श्रीगुरुमूर्तीः**—हल्लीं त्यांची वर्तणूक कशी काय आहे ?

**गृहस्थः**— महाराज ! हल्लीं ते वेडेचाळे करून, जवळ आलेल्या लोकांस शिव्या देऊन दगड मारितात. वाटेल त्याचेकडील अन्न खातात. परंतू जर ब्राह्मण भिक्षा देण्यास गेले तर त्यांच्या कांहींनाकाहीं चुका काढून ते त्यांच्याकडील अन्न खात नाहींत. त्यांनीं झोंपेस सुद्धां स्वाधीन ठेविली आहे असें वाटतें. कारण कधींच निजत नाहींत व नग्नपणें सर्वत्र विचरत असतात.

**श्रीगुरुमूर्तीः**— पूर्वी ते कशारीतीनें वागत होते ?

**गृहस्थः**—पूर्वी ते फारच कर्मठ ब्राह्मण होते. दररोज रुद्राभिषेक व सप्तशतीचा पाठ करून वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागत असत, परंतु शिंदे सरकारानीं जेव्हां श्रावणमासांत लक्ष लक्ष ब्राह्मणाचीं भोजनें घातलीं, त्यावेळीं ते ब्राह्मणाच्या उच्छिष्ट पत्रावळींतील अन्न खाऊं लागले व अशा रीतीनें वागूं लागले.

**श्रीगुरुमूर्तीः**—तुह्मी अज्ञानी आहांत त्यामुळें तुह्मांला समजत नाहीं. शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं जेथें लक्ष भोजन होतें त्या ठिकाणीं कोणीतरी ब्रह्मनिष्ठ येऊन यजमानास पावन करण्यासाठीं ब्राह्मणाचा उच्छिष्ट प्रसाद

ग्रहण करितो. शुक्राचार्यनामक प्रसिद्ध योग्यांनीं याप्रमाणें युधिष्ठिर राजाच्या राजसूययज्ञांत प्रसाद ग्रहण केला होता. त्याप्रमाणें काळूमियांनीं उच्छिष्ट प्रसाद भक्षण करून ईश्वराच्या आज्ञेनें ही वृत्ती धारण केली आहे. ते स्वतः अग्निवत् शुद्ध आहेत. त्यामुळे त्यांनां कोणताही दोष लागत नाहीं. कारण तुमच्या सांगण्यावरूनच समजतें कीं, त्यांनां शरीराचें मुळींच भान नाहीं. जे तिन्ही देहांचा अभिमान बाळगीत नाहीत, त्यांना वर्णाश्रम राहात नाही. अशा पुरुषाची ज्या भावनेनें जो सेवा करितो त्याला तशा प्रकारचें फळ प्राप्त होतें. अशा ज्ञानी लोकांनां जो कोणी जेऊं घालितो, त्याचें अन्न ते खातात. ब्राह्मणाच्या भिक्षेंत दोष काढण्याचें कारण इतकेंच कीं, हे ब्राह्मणांनों ! तुह्मी सर्व वर्णांमध्यें श्रेष्ठ आहांत व सर्व वर्णांचे गुरू आहांत ह्मणून तुह्मीं आचारसंपन्न राहून, श्रद्धाभक्तिपूर्वक अतिथींचा सत्कार करून त्यांला शुद्धांतःकरणानें शुद्ध अन्नाची भिक्षा दिली पाहिजे. या प्रकारचा तुह्माला उपदेश करितात. ते स्वतः तुह्माला सांगतात कीं, कलियुगामध्यें ब्राह्मणाशिवाय इतर सर्व शूद्रवत् आहेत, ह्मणून ते आचार पाळोत किंवा न पाळोत; मला त्यांच्या आचाराची जरूर नाहीं. यासाठीं ब्राह्मणाचा तिरस्कार करितात. ही गोष्ट तुह्मांला न समजल्यामुळें तुह्मी त्यांची निंदा करितां. असे ब्रह्मनिष्ठ देवलोक ब्राह्मणाच्या घरीं ब्राह्मण स्वरूपानें, क्षत्रियांकडे क्षत्रिय रूपानें, वैश्यांकडे व शूद्रांकडे त्या त्या स्वरूपानें जाऊन भिक्षा घेत असतात. पूर्वीं वसिष्ठादि ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण राक्षसांकडे जाऊन त्यांच्याकडचें मद्य मांस सेवन करीत असत. याचें कारण हेंच. त्याचप्रमाणें काळूमियाचें वर्तन आहे.

या काळूमियाची रामजी नावांचा एक ब्राह्मण सेवा करीत होता. त्यानें काळूमियास एक काठीही दिली होती.

एके दिवशीं त्या रामजीचे सांप्रदायी गुरू आले होते. ते दांभिक होते. त्यावेळीं काळूमिया रामजीनें दिलेली काठी घेऊन गेले. आणि त्या काठीनें रामजीस त्यांनीं इतका मार दिला कीं, दुसरा एखादा मनुष्य त्या रामजीच्या ऐवजीं असता तर ठारच झाला असता. असा तो भयंकर प्रकार पाहून रामजीचे सांप्रदायी गुरू पळून गेले. काठीचे तुकडे तुकडे करून

" ले तेरी लकडी " असें ह्मणून काळूमिया निघून गेले. त्या मारा पासून रामजीला कांहीं एक इजा झाली नाहीं. रामजी इतर मंडळीस ह्मणाला बाबांनो! पाहिलातका काठीचा सपाटा. हा माझ्या पाठीवर बसत होता तेव्हां माझ्यावर कोणी पुष्पवर्षाव करीत आहे असाच मला भास होत होता व त्यानंतर मला कांहीं ठाऊक नाही. हें रामजीचें भाषण ऐकून सर्व लोक विस्मीत झाले. त्या दिवसापासून रामजी काळूमियांच्या अनुग्रहानें रजतम वृत्ती पासून मुक्त होऊन शांत झाले. ते अद्याप महत्पुरास आहेत. ही गोष्ट श्रीगुरुमूर्तीस ठाऊक होती. त्यावरून ते ह्मणाले कीं, ही एक प्रकारची त्यांची लीला होय.

काळूमियांनीं आपलें शरीर पडण्याच्या पूर्वी चाळीसदिवस उन्मत्त वृत्ती सोडून अन्नपाण्याचा त्याग करून स्वस्वरूपाचें ध्यानधरून, प्राण वायूस आंत समावून शके १८२२ मध्यें परमपदाचा लाभ करून घेतला. हे महाकालीचे उपासक होते ह्मणून यांला कालीमैया ह्मणत; त्यावरून त्याचा अपभ्रंश होऊन काळूमिया असें त्यांला नांवपडलें होतें.

## सारंगपुरांत वास.

श्रीगुरुमूर्ती उज्जनीहून निघून कांहीं दिवसांनीं सारंगपुरास येऊन पोहोंचले. तेथील ब्राम्हणाचा आग्रह पडल्यावरून त्यांनी त्याठिकाणीं कांहीं दिवस मुकाम केला व लोकांला कर्ममार्गास लाविलें. तेथें केशवराव ह्या नावांचा एक देवी डाक्टर राहात होता. तो नास्तीक असून मिथ्याभिमानी होता. एके दिवशी तो श्रीगुरुमूर्तीस माधुकरी कारितां आमंत्रण देण्यास आला. त्याच्याठायीं ब्राह्मणाचीं लक्षणें दिसून न आल्यामुळें श्रीगुरुमूर्तींनीं त्यास विचारिलें कीं, तूं ब्राह्मण आहेस असा दिसत नाहींस. तूं संध्यादि षट्कर्में कारितोस काय? जे ब्राह्मण संध्या वैश्वदेवादि नित्यकर्में करीत असतात त्यांचेकडे मी भिक्षेला जातों, इतरांकडे जात नाहीं.

**केशवरावः**—मी पुण्याचा राहणारा असून जातीचा कऱ्हाडा ब्राह्मण आहें. मी वैश्वदेव करीत नाहीं. आपलें म्हणणें असेल तर आज दुसऱ्याकडून वैश्वदेव करवीन.

अनुक्रम ......... दि: ५/८
१०७

**श्रीगुरुमूर्ती:**—तुझ्यासारख्या धर्मभ्रष्टाचें तोंडमुद्रा पाहणें नको मग अन्न ग्रहणाचें काय विचारतोस. तुजपेक्षां चांडाळाच्या घरचें अन्न खाणें पुष्कळ बरें.

याप्रमाणें श्रीगुरुमूर्तीचें तिरस्कारयुक्त भाषण ऐकून केशवराव रागानें निघून गेला. मागाहून गांवचे ब्राह्मण श्रीगुरुमूर्तीस म्हणाले, स्वामीमहाराज! हा मोठा अभिमानी व फार दुष्ट ब्राम्हण आहे. आतां तो फिरून आपल्याकडे यावयाचा नाहीं.

**श्रीगुरुमूर्ती:**—आतां थोड्याच वेळानें तुह्मांला तो फिरून येतो कीं नाहीं, हें पहावयास मिळेल.

केशवरावानें आपले घरीं जाऊन घडलेली सर्व हकिगत आपल्या वृद्ध मातोश्रीस सांगितली. ती ऐकून ती ह्मणाली महाराज आमचे घरीं भिक्षेला येणार नाहींत, तर आम्ही ब्राम्हण कसचे? त्यांनीं तुला जें सांगितलें त्यांत खोटें काय आहे?

आईचें भाषण ऐकून केशवरावांला मनांत फार वाईट वाटलें. आणि त्यानें असा विचार केला कीं, वाटेल तें करून स्वामीमहाराजांस आपले घरीं भिक्षेला आणावयाचेंच. असा निश्चय करून पुन: श्रीगुरुमूर्तीकडे आला व त्यांला साष्टांगनमस्कार करून, अपराधांची क्षमा मागून म्हणाला कीं हे श्रीसद्गुरुनाथा! खरोखर मी भयंकर पातकी आहें. मला कांहीं येत नाहीं. परंतु आपण कृपाळू होऊन या गरीब बालकावर दया करून आमच्या घरीं भिक्षेस यावें. यापुढें मी आपल्या सांगण्याप्रमाणें वागावयास तयार आहें.

हें केशवरावाचें बोलणें ऐकून सर्व लोक आश्चर्यचकीत झाले.

**श्रीगुरुमूर्ती:**—हे ब्राम्हणहो! तुम्ही तर म्हणत होतां कीं, केशवराव आतां येणार नाहीं. कां, केशवराव! आपणाला राग आला होता नाहीका! हे लोक तर म्हणत होते कीं, तुम्ही फिरून इकडे यावयाचेत नाहीं, पण पाहावें तों तुम्ही आलांत, तेव्हा हें काय तुम्ही बरें केलें नाहींत, कारण ह्यामुळें ह्या लोकांत तुमची अब्रु गेली. हें ऐकून केशवराव लज्जीत झाला. इतक्यांत त्याचे मागोमाग त्याची आई आली व श्रीगुरुमूर्तीस म्हणाली,

हा माझ्या मुलाला आपण ब्रह्मकर्म शिकवावें व केशवराव स्वतः वैश्वदेव करूं लागल्यावर आपण आमच्या घरीं भिक्षेला यावें.

श्रीगुरुमूर्तीः—तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें तुमचा मुलगा शिकून तयार झाला व शास्त्रसंमत स्वकर्माचरण करूं लागला म्हणजे मी तुमच्या येथें भिक्षेला येईन.

स्वामीमहाराजांचें याप्रकारचें भाषण ऐकून केशवरावाला अत्यानंद झाला. तो थोड्याच दिवसांत षट्कर्म शिकून वैश्वदेव करूं लागला. त्यानंतर श्रीगुरुमूर्ती त्याच्या घरीं मधुकरीस गेले होते. हा इसम आज इतका आस्तीक झाला आहे कीं, षट्कर्म केल्याशिवाय पाणी सुद्धां घेत नाहीं. हे केशवराव विवाह बद्ध होऊन पुणें सोडून सारंगपुरास आल्यावर त्यांनी आपल्या नातेवाईकांस आपण इकडे असल्याबद्दलची मुळींच माहिती दिली नव्हती. याचप्रमाणें जेव्हां कोणी बायकोबद्दल विचारीत तेव्हां तो म्हणत असे कीं, माझें लग्न झालें नाही.

कांही दिवस लोटल्यावर त्यांची पत्नी उपवर झाली. तिनें तपास केला तेव्हां तिला अशी बातमी लागली कीं, आपला पती सारंगपुरास आहे. तिनें ती बातमी आपल्या आईबापांस सांगितली व हट्ट धरिला कीं मला सोबत देऊन सारंगपुरास पतीजवळ पाठवून द्यावें. माझें वय मोठें झाल्यामुळें मला आतां माहेरीं राहाणें शोभत नाहीं व बरें वाटत नाहीं. माझे पती मला बोलावीत नाहींत तरी पण माझ्या स्त्रीधर्माप्रमाणें मला त्यांच्याजवळ गेलें पाहिजे.

कन्येचें वचन ऐकून तिच्या आईबापांनी एक वृद्ध सालसबाई मुलीला सोबतीला देऊन तिला सारंगपुरास रवाना केली. सारंगपूर येथें कमाविसदार यांचे घरीं केशवराव राहात होता. त्या ठिकाणीं येऊन चौकशी केली. कमाविसदारांच्या पत्नीनें त्यांला विचारिलें, आपण कोण व कोठून आलांत? त्या बायांपैकीं सोबतीसाठी आलेल्या बाईनें उत्तर दिलें आम्ही पुण्याला राहातों. ही केशवरावांची बायको आहे. हिला हिच्या नवऱ्याकडे पोंचती करण्यासाठी हिच्या आई बापांनी मला पाठविलें आहे. हें ऐकून कमावीसदारांच्या पत्नीनें त्या दोघींलाही आंत बोलाविलें व आपल्या

पतीला सांगितलें कीं केशवराव लग्न झालें नाहीं म्हणून सांगतात तर त्यांची बायको आज येथें आली आहे हें कसें ?

कांहीं वेळानें केशवराव आले तेव्हां त्यांला मामलेदारांनी विचारिलें कायहो, केशवराव ! तुम्हीं आपलें लग्न झालें नाहीं म्हणून सांगतां तर मग हें कोण आलें आहे तें पाहा व आम्हाला सांगा ?

आपली बायको कमाविसदार यांच्या घरीं आलेली पाहून केशवराव लज्जीत होऊन खाली पाहूं लागले व म्हणाले मी बोलाविल्यावांचून ही येथें कशाला आली आहे. ह्याकरितां मी हिला आपल्याबरोबर बाळगिणार नाहीं.

**कमाविसदार:**—तुम्ही नाहीं बाळगिलेंत तर मी हिला आपली बहीण समजून बाळगीन.

वरील नवऱ्याचें भाषण ऐकून केशवरावांची बायको नम्रतेनें हळूच पुढें येऊन नवऱ्यास ह्मणाली, हे प्राणनाथ ! आपण मला बोलाविलेंत नाहीं तरी आपल्या चरणाची सेवा करण्यासाठीं ह्या दासीला आपण असाल तेथें आलेंच पाहिजे. असें शास्त्रवचन आहे. त्याप्रमाणें मी न बोलावितां आलें तरी त्यांत माझा कांहीं अपराध नाहीं. हें शरीर आपलेंच आहे. याचें आपणास काय वाटेल तें करा. मी आपणाला सोडून कोठें जाऊं ! असें ह्मणून तिनें पतीला साष्टांग नमस्कार केला.

याप्रकारचें तिचें भाषण ऐकून व तिची विनयशील वर्तणूक पाहून केशवरावांनीं तिला आपल्याबरोबर ठेवून घेतलें. पुढें तिच्या पातिव्रत्यामुळें उभयतांचें एकमेकांवरील प्रेम वाढत गेलें. कांहीं दिवसांनीं तिला एक मुलगा झाला. तो अजानुबाहू होता. त्या मुलावर गावांतील बहुतेक लोकांचें प्रेम जडलें होतें. तो तीन वर्षांच्या वयाचा झाला तेव्हांपासूनच आईबापांची सेवा करूं लागला. आणि रामदासस्वामीकृत मनाचे श्लोक शिकूं लागला. त्या मुलाची अतीथ अभ्यागतांवर फार प्रीती असे. दारावर कोणी भिक्षेला आला ह्मणजे तो मुलगा त्याला आपण भिक्षा आणून घालीत असे. असें होतां होतां तो मुलगा पांच वर्षांचा झाला. एके दिवशीं त्याचे घरीं एक जटाधारी दिव्य तेजस्वी पुरूष सायंकाळीं भिक्षा मागावयास आला. त्याला पाहून

तो मुलगा भिक्षा आणावयास घरांत गेला. त्यावेळीं केशवराव तेथें बसले होते. मुलानें भिक्षा आणून जटाधारी भिक्षेकऱ्याला दिली.

**जटाधारी:**—क्यूं बच्चा ! कहांतक प्रपंचमे रहेनाका विचार है ?

**मुलगा:**— मैं कल आऊंगा.

पुढें जटाधारी भिक्षा घेऊन निघून गेला. हें पाहून केशवराव विचार करूं लागले कीं, हा कोण बरें असावा ? यानें मुलाला कधीं येणार ह्मणून विचारिलें त्याचा अर्थ काय ? यांत आपल्याला तर कांहीं समजत नाहीं. ते स्वत: नास्तीक असल्यामुळें त्यांनीं त्याबद्दल कांहीं विशेष विचार पूस केली नाहीं. दुसऱ्यादिवशीं प्रात:काळीं उठून मुलानें शौचमुखमार्जनादि आटोपून स्नान केलें. आणि आईबापांला सांगितलें कीं, आज आपल्या घरीं गावांतील सर्व लोकांला बोलवा. त्यांनां मी कांहीं सांगणार आहें.

मुलाचें बोलणें ऐकून केशवरावांनी गावांतील सर्व लोकांस बोलावून आणिलें. सर्व मंडळी जमल्यावर तो मुलगा ह्मणाला, हें शरीर नाशिवंत आहे. याचा कोणी भरवंसा न ठेवितां सदा सर्वकाळ श्रीरामचंद्राचें भजन करावें. असें सांगून त्यानें खालील प्रमाणें प्रार्थना केली.

**सदा सर्वदा योग तूझा घडावा । तुझेकारणें देह माझा पडावा ॥**
**उपेक्षूं नको गूणवंता अनंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥१॥**

आणि साष्टांग नमस्कार करून सर्व मंडळींच्या समक्ष शरीर तेथेंच ठेवून चालता झाला.

मुलाचा प्राण निघून गेलेला पाहून केशवरावासह सर्व मंडळी रडूं लागली. केशवरावानीं जटाधारी पुरुषाचें व मुलाचें झालेलें भाषण त्या सर्व मंडळींस सांगितलें. तें ऐकून सर्वजण विस्मित झाले व ह्मणाले, हा मुलगा कोणीतरी योगी असावा. ऋणानुबंधामुळें येथें येऊन चालता झाला. असें ह्मणून सर्व शोक करूं लागले. परंतु त्याची आई मुळींच रडली नाहीं. तें पाहून सर्व लोक आश्चर्यानें थक्क झाले व ह्मणूं लागले कीं, असा उत्तम गुणवान मुलगा मृत झाला असतां या बाईला कसें रडूं येत नाहीं ? हिचें हृदय विधात्यानें पाषाणाचें बनविलें असावें असें दिसतें. मुलाच्या शवास दहन करून आल्यावर लोकांनीं तिला विचारिलें, असा चांगला मुलगा

गेला तरीं तुह्मी उदास कशा दिसत नाहींत.

ती पतिव्रता स्त्री ह्मणाली हें जग मायीक असल्यामुळें नाशिवंत आहे असें मी चांगलें समजतें. मायीक वस्तू जशा उत्पन्न होतात तशाच नाशही पावतात. या जगांत कोणी कोणाचें नाहीं. पूर्वऋणानुबंधाप्रमाणें प्रत्येक जण आपापलीं कर्में करून सुख दुःख भोगितात. आज जसा हा मुलगा गेला तसाच हा माझा देहही सहा महिन्यानंतर पंढरपुरास पडणार आहे. ह्मणूनच मी मुलासाठीं शोक करीत नाहीं. या प्रकारचें तिचें भाषण ऐकून केशवराव फारच दुःख करूं लागले.

सहा महिने होतांच आपला मरणसमय निकट आला असें जाणून ती पतिव्रता आपल्या पतीस ह्मणाली, हे प्राणनाथ! आपण मला पंढरपुरास पोंचवावें कारण हें माझें शरीर पुढील एकादशी दिवशीं त्या ठिकाणीं पडणार आहे. त्या वेळीं आपण कृपा करून मला दर्शन द्यावें. माझे इष्टदेव आपणच आहांत. हें तिचें भाषण ऐकून केशवरावांनीं तिला पंढरपुरास रवाना केली व पाठीमागून केशवराव, कमाविसदार वगैरे मंडळी पंढरपुरास गेली.

एकादशीच्या दिवशीं पतिव्रतेनें चंद्रभागेचें स्नान करून पंढरीनाथाचें दर्शन घेतलें. मृत्युसमय नजीक येतांच त्या पतिव्रतेला नेण्यासाठीं विमान आलें. तें पाहून ती आपल्या पतीला साष्टांग नमस्कार करून ह्मणाली, हे प्राणनाथ! देवलोक विमान घेऊन मला नेण्यासाठीं आले आहेत. मी आतां जातें आपण माझ्यासाठीं शोक करूं नये. हें सर्व जग मिथ्या आहे. ह्याचप्रमाणें सर्व लोकांला जावयाचें आहे. मजपासून आपल्या वंशाची वृद्धी झाली नाहीं. तरी त्याबद्दल आपण काळजी करूं नये. येथून आपण पुण्यांत गेल्यावर आपलें लग्न मोरोपंताच्या कुटुंबांतील मुलीबरोबर होईल. त्यायोगें आपल्या वंशाची वृद्धी होईल. असें सांगून पतीला नमस्कार करून सर्वांचा निरोप घेऊन ईश्वरध्यान करीत तिनें आपला देह ठेविला. हें पाहून सर्व लोक विस्मित झाले. तिच्या शवाचे अंत्य विधि करून केशवराव कमाविसदारांसह पुण्यास आले.

केशराव पुण्यास आल्याची वातमी समजतांच मोरोपंताच्या कुटुंबां-

तील माणसें मुलीचा विवाह त्यांच्याशीं जुळविण्याकारितां त्यांच्या घरीं आलीं. केशरावानें आपण पुन्हा लग्न करणार नाहीं असें त्या लोकांस सां-गितलें. परंतु कमाविसदारांचा लग्न करण्याविषयीं आग्रह पडल्यामुळें त्यांनी विचार केला कीं, मुलीच्या घरच्या आई वगैरे मंडळीची उलटी समजूत करून त्यांच्याकडूनच हें लग्न मोडण्याची तजवीज करावयाची ह्मणजे लग्न करण्याची पाळी येणार नाहीं व त्याप्रमाणें तजवीज करण्यासाठीं तो रात्री-चा निघून मुलीच्या घरीं गेला व त्यानें मुलीच्या आईस सांगितलें कीं, सारंगपूरकर केशवरावास मुलगी देण्याच्या भरीस तुह्मीं कां पडतां ? तो पुरुषत्वहीन आहे व त्यामुळें त्याच्या पहिल्या बायकोनें जीव दिला. याप्रकारें कामगिरी करून आपण कोण हें त्यांस समजूं न देतां तो परत घरीं निघून आला.

मुलीचा बाप घरीं आल्यावर तिच्या आईनें त्याला ‘ केशवराव पुरुष-त्वहीन आहेत. त्यांला मुलगी देऊं नका ’ वगैरे हकिगत कोणी एक मनुष्य येऊन सांगून गेला. त्याकारितां त्याला मुलगी द्यावयाची नाहीं. असें सांगितलें.

मुलीचा बाप ह्मणाला, तिच्या प्रारब्धांत असेल तसें होईल परंतु एक वेळ जुळविलेलें लग्न मी कांहीं मोडणार नाहीं.

केशवराव आपल्याशीं विचार करूं लागला कीं, आतां दुसरें लग्न करून काय सूख मिळणार आहे ? त्यापेक्षां मरण येईल तर फार बरें. अ-सा विचार करून त्यानें जवळ एक गोसावी राहात होता, त्याला पंचवीस रुपये द्यावयाचे करून त्याचेकडून विष आणवून तें लाडवांत मिश्र करून खाण्याचा विचार करीत आहे इतक्यांत कमाविसदार तेथें येऊन पोंचले. त्यामुळें त्यावेळीं तो तसाच थांबला. कांहीं वेळानें कमाविसदार निघून गेल्यावर तो गोसावी व आपण असे दोघे लाडू खावयास बसले. दैवयोगामुळें विष-मिश्रीत लाडू फक्त गोसाव्याच्याच खाण्यांत आले व केशवराव चांगले लाडू खाऊन गेला. आतां आपण खास मरणार असा निश्चय करून एका खो-लींत जाऊन तिचें दार आंतून बंद करून स्वस्थ पडून राहिला. परंतु विषाचें कांहींच चिन्ह दिसून न आल्यामुळें तो मोठ्या विचारांत पडला.

सकाळीं उठून पाहातो तों तो गोसावी मेल्याची खबर लागली. ती ऐकून त्याची खात्री झाली कीं, आपल्या पत्नीनें मरतांना आपणास सांगितलेली सर्व गोष्ट खरी होणार. तरी पण शेवटचा उपाय करून पाहावा. असा विचार करून त्यानें वेड्याचें सोंग पांघरिलें, व नग्न होऊन सर्व लोकांस शिव्या देत अवाच्य व विसंगत भाषणें करीत फिरूं लागला. लोकांवर दगड फेकूं लागला. हें कमाविसदारांस समजलें. विशेष पूसतपास केल्याव-रून त्यांला समजून आलें कीं, हें सर्व ढोंग आहे. नंतर त्यांनीं केशवरावास धरून आणून सांगितलें कीं, तूं वाटेल ते प्रयत्न केलेस तरी तुझ्या बाय-कोनें सांगितलेलें भविष्य खोटें होणार नाहीं. कारण ती योग भ्रष्ट होती.

यांप्रमाणें कमावीसदारानें त्याची समजूत घातली व नंतर त्यानें त्या मुलीबरोबर आपलें लग्न केलें व तिला घेऊन सर्व माणसांबरोबर सारंगपुरास गेला. इतका अनुभव आला तरी केशवरावाचा नास्तीकपणा तसाच कायम राहिला होता. परंतु साधु पुरुषाच्या संगतीचें फळ मिळाल्या वांचून राहावयाचें नाहीं. हें ह्मणणें सत्य असल्याचा त्याला अनुभव आला. त्याची पत्नी व मुलगा साधु असल्यामुळें व त्यांची त्याला संगती घडल्यामुळें त्याचा ऊर्जी-तकाळ येण्याबरोबर त्याला श्रीगुरुमूर्तींची भेट झाली व तो आस्तीक बनला. हा साधुसंगतीचा परिणाम होय. परंतु साधुपुरुषाच्या आंगीं साधुपणा अ-सल्या शिवाय त्याजकडून दुसऱ्यास फायदा व्हावयाचा नाहीं. केशवरावासा-रखीं बायका मुलेंही पुष्कळ आढळतील.

श्रीगुरुमूर्तीजवळ दोन श्रीदत्तमूर्ती व पादुका होत्या. त्या पाहून सारंग-पूरचे रहिवासी शंकरराव यांनीं मोठी मूर्ती पूजा करण्यासाठीं त्यांच्या जवळ मागितली. त्यावेळीं श्रीगुरुमूर्तीं ह्मणाले कीं, या मूर्तींपैकीं एकही मूर्ती तुम-च्या उपयोगीं पडावयाची नाहीं. कारण त्यांची स्थापना करण्याविषयीं पूर्वीं मी पुष्कळ प्रयत्न केले. परंतु श्रीदत्ताची आज्ञा अशी आहे कीं, ज्या गांवीं तुह्मीं माझी स्थापना कराल त्या गांवचा नाश होईल. किंवा ज्या गृहस्थास द्याल त्याचा निर्वंश होईल. करितां माझा नाइलाज आहे. ही मूर्ती व पादुका मीं पुष्कळ ठिकाणीं ठेवून पाहिल्या पण कोणीही त्या घेऊन जात नस-ल्यामुळें त्यांला मीं बरोबर बाळगीत आहें. शंकरराव ह्मणाले, वाटेल तें होवो

परंतु ही मोठी मूर्ती तर मी घेऊन जाणारच. असें ह्मणून श्रीगुरुमूर्तीची आज्ञा नसतांही त्यानें ती मूर्ती घेऊन देवघरांत पूजेसाठीं नेऊन ठेविली. देवाची मर्जी नसल्यामुळें त्याचा एकुलता एक मुलगा लवकरच मरण पावला व पुढें त्याला मुलबाळ कांहीं नसल्यामुळें वंशवृद्धी झाली नाहीं.

श्रीगुरुमुर्ती सारंगपुराहून उठून बजरंग गडास जावयास निघाले. वाटेनें पाऊस फार पडूं लागल्यामुळें ते आश्रयाकारितां एका गांवांत शिरले व एका अग्निहोत्र्याच्या घरीं उतरले. त्या अग्निहोत्र्याला सारंगपुराहून पत्र पाठविलें होतें कीं, श्रीगुरुमूर्ती तुमचे घरीं येणार ह्मणून तो वाट पहात होता.

श्रीगुरुमूर्ती घरीं आले त्यावेळीं तो अग्निहोत्री घरीं नव्हता. बाहेर गेला होता व त्याचा मुलगा घरीं होता. त्याला गुरुमूर्ती ह्मणाले, आज पाऊस फार पडत आहे तर आजची रात्र आह्मांस आपल्या घरीं उतरण्यास जागा द्यावी. हें ऐकून मुलगा रागाऊन ह्मणाला "तूं जर येथें मुक्काम केलास तर तुझा दंडकमंडलू मी बाहेर फेकून देईन.' आणखीही कांहीं फाजील पणाचीं उत्तरें त्यानें त्यांस दिलीं.

**श्रीगुरुमूर्तीः**—बाबारे ! असा रागावूं नको. शांत हो. मी कांहीं तुझ्या परवानगीवांचून येथें राहात नाहीं. असें ह्मणून निघून गेले व रात्रभर एका झाडाखालीं मुक्काम करून पहांटेस पुढें निघून गेले.

कांहीं वेळानें अग्निहोत्री घरीं आले. आणि पाहतात तों आपला मुलगा भ्रमिष्ट होऊन वेड्यासारखा बडबड करीत आहे. तें पाहून बायकोस विचारूं लागले कीं, हा असें काय कारितो. याला काय झालें ?

पत्नी ह्मणाली, संध्याकाळीं पाऊस पडत होता त्यावेळीं कोणीएक दंडधारी स्वामी आपल्या घरीं आले होते. त्यांनीं रात्रभर आमच्या ओट्यावर वस्ती करण्याची ह्या मुलाजवळ परवानगी मागितली. परंतु मुलानें त्यांला परवानगी न देतां उलट शिक्षा देऊन त्यांला घालवून दिलें. ते गेल्यापासून याची अशी स्थिती झाली आहे. हें ऐकून अग्निहोत्रीबुवांनां फार वाईट वाटलें. व ते श्रीगुरुमूर्तीचा शोध करण्यास निघाले. दीडवर्षपर्यंत त्यांला त्यांचा पत्ता लागला नाहीं. त्यानंतर शोधांतीं त्यांला श्रीगुरुमूर्तीची गांठ पडली. त्यावेळीं त्यांनीं आपल्या अपराधाबद्दल त्यांची क्षमा मागितली व प्रार्थना केली.

महाराज ! आपण येणार असल्याबद्दल सारंगपुराहून मला पत्र आलें होतें व त्याप्रमाणें मी आपली वाट पहात होतों. माझ्या मुलानें आपणास ओळखिलें नाहीं व त्यामुळें आपला अपमान केला. तरी त्याबद्दल आपण न रागावतां त्यावर कृपा दृष्टी ठेवावी.

**श्रीगुरुमूर्तीः**—अहो ! तुमच्यासारख्या लोकांना काय ह्मणावें ? गृहस्थाच्या घरीं जर एखादा संन्याशी आला तर त्याचें यथायोग्य आदरातिथ्य करावें. हा नियम तुमच्या येथें दृष्टीस पडला नाहीं. माझ्या निमित्तानें आपलीं कार्यें होतांत ह्मणून माझी मात्र सेवा करावी आणि इतरांस शिव्या द्याव्या काय ? तुमच्यासारख्या दुष्ट लोकांचें तोंडही पाहूं इच्छित नाहीं. मी कांहीं तुमच्या मुलास वेड लाविलें नाहीं. याप्रमाणें बोलून श्रीगुरुमूर्ती तेथून पुढें जावयास निघाले.

श्रीगुरुमूर्ती तेथून निघाले ते पिछोरा गांवीं आले. त्या गांवीं कमाविसदारांच्या भावाचा मुक्काम होता. त्यांचें नांव भास्करराव असें होतें. त्यांला बरेच दिवस अपस्माराची व्याधी जडली होती. त्यांनीं पुष्कळ वैद्यां कडून औषधोपचार करवून पाहिले. परंतु गुण आला नाहीं. एके दिवशीं श्रीगुरुमूर्ती पुराण सांगत बसले असतां, ते भास्करराव त्या ठिकाणीं येऊन औषध पाण्याची विचार पूस करूं लागले. तेव्हां पिशाचानें त्यांच्या शरीरांत प्रवेश केला व तें बोलूं लागलें. तें पाहून श्रीगुरुमूर्ती ह्मणाले कीं, ह्यावेळीं पुराण चाललें आहे तर तुह्मी उद्यां या. हें ऐकून तें पिशाच्च निघून गेलें. श्रीगुरुमूर्तींच्या आज्ञेप्रमाणें दुसऱ्यादिवशीं त्या पिशाच्चानें भास्कररावांच्या शरीरांत प्रवेश करून तें बोलूं लागलें. या ब्राह्मणानें पिंपळाखालीं माझ्या राहाण्याच्या जागेवर लघुशंका करून ती जागा अस्वच्छ केली यामुळें मी याला पीडा देत आहें. त्यावर श्रीगुरुमूर्ती त्यास ह्मणाले, या अगदीं अल्पशा अपराधाबद्दल एवढी मोठी शिक्षा देणें योग्य आहेकाय ? तूं मोठा लबाड दिसतोस ! यांला सोडून आतां तूं जातोस कीं नाहीं. ? नाहींतर तुला शिक्षा करीन. हें ऐकून तें पिशाच्च घाबरून ह्मणालें, कीं, महाराज ! मी ब्राह्मण आहें. माझ्या वंशांत पुढें संतती नसल्यामुळें माझी उत्तर क्रिया, श्राद्धादिविधि करण्यास कोणी नाहीं. ह्मणून

मला प्रेतत्व आलें आहे. हा ब्राह्मण धनीक आहे. तेव्हां ह्याजकडून श्राद्धादीक झाल्यास मला सद्गती मिळेल. या आशेनें मी या शरीरांत प्रवेश केला आहे. तरी आपण कृपा करून, मला सद्गती मिळण्यासाठीं या ब्राह्मणाकडून नारायण बली करवा. त्याच्या योगानें मला मुक्ती मिळेल व याची व्याधी दूर होईल.

हें त्याचें भाषण ऐकून श्रीगुरुमूर्तीस त्याची दया आली. त्यांनीं भास्कररावांकडून नारायणबळी करविला. त्यायोगानें पिशाचास मुक्ती मिळाली व भास्करराव अपस्माराच्या क्लेशांतून सुटले. यासाठीं पिंपळ, औदुंबर इत्यादि झाडांखालीं कोणीही मलमूत्रोच्छिष्टादि विसर्जन करून गलिच्छपणा उत्पन्न करूं नये.

तेथून श्रीगुरुमूर्ती निघाले व खरेरा गावीं आले. त्या गांवच्या चिटणीसांची बायको श्रीगुरुमूर्तीजवळ असलेल्या श्रीदत्ताच्यामूर्तीला पाहून, तिची पूजा करण्याच्या उद्देशानें पूजेचें एकंदर साहित्य बरोबर घेऊन त्यांच्या मुक्कामी आली. तिनें त्या मूर्तीची आपल्या समजुतीप्रमाणें यथाविधि पूजा केली व उदबत्ती पेटवून धूप दाखवूं लागली. इतक्यांत एकाएकीं ती बाई मोठ्यानें ओरडूं लागली. ती गडबड ऐकून पुष्कळ लोक तेथें जमा झाले.

**श्रीगुरुमूर्ती**:–तूं कोण आहेस ?

हें ऐकून त्या बाईच्या शरीरांतलें पिशाच्च ह्मणालें, मी जिंद आहें. ह्या बाईनें माझ्या मशिदीजवळ लघुशंका केल्यामुळें मी हिला धरिली आहे.

**श्रीगुरुमूर्ती**:–तूं ह्या बाईला सोडून निघून जातोस किंवा नाहीं. ?

**पिशाच्च**:—ह्याबाईचा पती मोठा हुद्देदार व श्रीमान् आहे. त्यानें माझ्या मशीदीची मरामत करावी. ह्मणजे मी ह्या बाईला सोडून निघून जाईन.

**श्रीगुरुमूर्ती**:—हे जिंद ! तूं ह्या बाईचे तीन गर्भांचा नाश केला आहेस. त्याचप्रमाणें तूं फार दुष्ट आहेस ह्मणून तुझी मशीद दुरुस्त करण्याबद्दल मी यांस सांगणार नाहीं.

हें ऐकून तो जिंद अगदीं काकुळतीस येऊन श्रीगुरुमूर्तीची विनवणी करूं लागला. त्यामुळें त्यांनीं चिटणीसांस ती मशीद दुरुस्त करण्यास सांगितलें.

याप्रमाणें त्या मशिदीचा जीर्णोद्धार झाला व तें पिशाच्च निघून गेलें. पुढें त्या बाईस संतति झाली.

श्रीगुरुमूर्ती ब्रह्मावर्त इत्यादि ठिकाणीं फिरून पुन्हा याच ठिकाण आले व माधुकरी मागण्यासाठीं त्या चिटणीसांचे घरीं गेले. त्यावेळीं चि सांची मेहुणी विटाळशी असल्यामुळें बाजुला सरून शेजारच्या मशिदीज उभी राहिली. तेवढ्यावरून तिचें शरीर जड झालें व ती आजारी प ही हकिगत श्रीगुरुमूर्तीस समजतांच त्यांनीं त्या बाईस पांचवे दिवशीं झाल्यावर आपल्याजवळ आणावयास सांगितली. त्याप्रमाणें चिटणीस बाईस घेऊन तेथें गेले. जातांच तिनें मोठ्यानें किंकाळी फोडिली.

**श्रीगुरुमूर्ती**:—तूं कोण आहेस ?

**पिशाच्च**:—मी या जवळच्या मशिदीचा मालक जिंद आहें. हे लोक मशिदीच्या जवळ राहून मशीद दुरुस्त करीत नाहींत ह्मणून या बाईस मी धरिली आहे. माझी मशीद दुरुस्त करण्याबद्दल तुह्मी यांस आज्ञा करा ह्मणजे मी निघून जाईन.

**श्रीगुरुमूर्ती**:—ही बाई माझ्यामुळेंच घरांतून बाहेर येऊन रस्त्यावर उभी होती, तूं हिला विनाकारण त्रास दिलास यासाठीं मी यांला तुझी मशीद नीट करावयास सांगणार नाहीं.

हें ऐकून त्या पिशाच्चानें त्यांचें फारच आर्जव केलें. त्यावरून त्यांनीं चिटणीसांस ती मशीद दुरुस्त करण्यास आज्ञा दिली. त्यावेळीं चिटणीस ह्मणाले, दरखेपेस हेंच काम मला करावें लागतें. असो; त्यांची इच्छाच आहे तर मी ही मशीद दुरुस्त करून देतों. हें ऐकून जिंद निघून गेला. मागाहून चिटणीसांनीं त्याच्या मशिदीची मरामत करविली.

या करितां स्त्रियांनीं ऋतुमति किंवा बाळंतीण असतांना फारच जपून वागलें पाहिजे. देवस्थान, पिंपळ, रस्ते आणि झाड सोडून लघु शंका वगैरे करीत जावें.

तेथून पुढें जातांना श्रीगुरुमुर्तीस वाटेंत जंगल लागलें. सर्व लोक ह्मणाले कीं, आगगाडी झाल्यापासून या पायवाटेनें कोणीही काशीला जात नाहींत. त्यामुळें रस्त्याला रहदारी नाहीं व रस्ता फार बिकट झाला

आहे. रस्त्यांत दोन दोन दिवस पर्यंत मुक्काम करावयाला गांव लागत नाहींत. तर अशा वेळीं आपण कसें कराल ?

**श्रीगुरुमूर्तीः**—श्रीदत्तभगवान करील तें खरें असें त्या लोकांस सांगून आपण जावयास निघाले, कांहीं मार्ग चालून गेल्यावर श्रीदत्तभगवानीं जंगली लोकांचें स्वरूप धारण केलें व रस्त्यांत श्रीगुरुमूर्तीला गांठिलें आणि ह्मणाले, आपण काशीला जात असाल तर मी तुह्मांला चांगल्या रस्त्यानें घेऊन जातों. तुह्मी माझ्या मागून या. असें ह्मणून आपण पुढें चालूं लागले. कांहींसे पुढें गेल्यावर एक लहानसा डोंगर उतरले व श्रीगुरुमूर्तीस ह्मणाले, समोर जो गांव दिसत आहे तेथून पुढें रस्ता सरळ आहे, करितां तुह्मी चला. असें ह्मणून आपण तेथेंच गुप्त झाले.

गांवांत पोंचतांच श्रीगुरुमूर्तीला समजून आलें कीं, ज्या गांवीं जाऊन पोंचण्यास दोन दिवस लागतात त्या गावीं आपण अवघ्या एका तासांत आलों. हें वर्तमान ऐकून सर्व मंडळीस आश्चर्य वाटलें व श्रीगुरुमूर्तीला भगवंताची लीला पाहून हसूं आलें.

श्रीगुरुमूर्ती फिरत फिरत कांहीं दिवसांनीं जालवणपुरास आले. तेथील ब्राह्मणांनीं अत्याग्रह केल्यामुळें त्यांनीं नित्यकर्म आटोपल्यावर संहितेचे ऋषि, छंद इत्यादि त्यांस शिकविण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें उपनिषद् भाष्य श्रवण करवूं लागले व रात्रीं पुराण ऐकवूं लागले. कांहीं दिवस असा क्रम चालला असतां त्यांत रामदासनवमीचा मंगल दिवस आला. त्या दिवशीं " आज दासबोध वाचला पाहिजे " असें श्रीगुरुमूर्ती ह्मणाले. त्या गावांत एक शास्त्री राहात असत. त्यानां हें ह्मणणें आवडलें नाहीं. ते ह्मणाले दासबोधांत काय ऐकावयाचें आहे ? ज्यांला संस्कृत येत नाहीं त्यांनीं प्राकृत ग्रंथ लिहावे आणि वाचावे.

हें शास्त्रीबुवांचें बोलणें श्रीगुरुमूर्तीस समजलें. रात्रीं दासबोध वाचीत असतां श्रीगुरुमूर्तीनीं श्रुति ह्मणून तिचें भाष्य सांगितलें. आणि त्याचप्रमाणें दासबोधाची ओंवी वाचून दाखविली.

पुराण समाप्ती नंतर श्रीगुरुमुर्ती शास्त्रीबुवांस विचारूं लागले कीं, हा ग्रंथ प्राकृत आहे कीं, संस्कृत आहे ? तें ऐकून शास्त्रीबुवा खजील

झाले व ।।आपल्या अपराधाची नम्रतेनें क्षमा मागितली.

श्रीगुरुमूर्तीः—शास्त्रीबुवा ? तुह्मी असें समजूं नका कीं, रामदास स्वामीला ।। येत नव्हतें ! ज्यांच्याजवळ सर्व सिद्धी राबत होत्या आणि जे ।।प्रत्यक्ष मारुतीचे अवतार होते, त्यांला संस्कृत येत नव्हतें असें होईल कसें ? या कलियुगांत संस्कृत ग्रंथ लिहिला तर सर्वत्रांच्या उपयोगी ।। नाहीं. असा विचार करून श्रीरामचंद्रजींच्या आज्ञेवरुन त्यांनीं प्रा। । वेदांत कथन करून आशीर्वाद दिला कीं, हा ग्रंथ जो श्रद्धाभक्तियुक्त वाचील व श्रवण करील त्यावर श्रीरामचंद्र प्रसन्न होऊन त्याचे सर्व मनोरथ पूर्ण करितील. याचकारणासाठीं अशा साधु पुरुषांनीं केलेले प्राकृत ग्रंथ पठण करावे. ह्याप्रमाणें वागून हजारों मनुष्यांनीं आपली कार्यसिद्धी करून घेतली आहे.

या कलियुगांत आचार व वर्णाश्रमधर्माचे नियम पाळिल्या शिवाय वेद जरी ह्मटले तरी ते उपयोगाला येत नाहींत. पण असे प्राकृत ग्रंथ उपयोगी पडतात. याचा अनुभव पाहावयाचा असल्यास मी सांगतों त्याप्रमाणें तुह्मी करा. शास्त्रीबुवा ! तुह्मी दररोज वेदपारायणें करीत असतां, तरी तुमच्या घरांतील ब्रह्मराक्षस अद्याप निघून जात नाहीं ! या ब्रह्मराक्षसाला गती देणें असेल तर तुह्मी प्राकृत गुरुचरित्राचा सप्ताह करा. आणि मग पाहा. तो निघून जातो, कीं राहातो ह्याचा तुह्मांस अनुभव येईल.

श्रीगुरुमूर्तीच्या आज्ञेप्रमाणें शास्त्रीबुवांनीं प्राकृत गुरुचरित्राचा सप्ताह केला. त्यामुळें त्यांच्या घरांतील ब्रह्मसंमंध निघून गेला हें पाहून शास्त्रीबुवा आश्चर्य चकित झाले. त्यांनीं त्या दिवसापासून पुढें प्राकृत गुरुचरित्र वाचण्याचा नित्य क्रम सुरू केला व इतर प्राकृत ग्रंथ ही मधून मधून वाचूं लागले.

याच गांवांतील एका ब्राह्मणानें श्रीगुरुमूर्तीचें सांगणें न ऐकून श्रीदत्तपादुका व दुसऱ्या प्रकानें पंचायतन घेऊन ते त्यांची पूजा करूं लागले. त्यायोगें पुढें त्यांस संतती झाली नाहीं व वंश वाढला नाहीं.

श्रीगुरुमूर्ती जालवणहून निघून मथुरा, कुरुक्षेत्र, हरिद्वार इत्यादि क्षेत्रें फिरत फिरत चालले असतां, हरिद्वार येथील श्रीशारदा पीठाधीश श्रीराज

राजेश्वर महाराज यांच्या आग्रहावरून तेथें चातुर्मास संपवून मग पुढें श्रीबदरीनारायणास जाण्यास निघाले. वाटेंत त्यांस नर्मदातीरावरील भालोद गांवीं राहाणारी बळवंतराव वगैरे मंडळी भेटली. वाटेंत बळवंतरावांला एकाएकीं अतिशय थंडी वाजूं लागली. तेव्हां त्यांनीं एका डाक्टरकडे जाऊन आपली प्रकृति दाखविली व औषध मागितलें. डाक्टरनें सोमलाच्या गोळ्या दिल्या व सांगितलें कीं, हें औषध तुह्मी घ्या ह्मणजे तुह्मांस थंडीपासून बाधा होणार नाहीं. डाक्टरच्या सांगण्याप्रमाणें त्यांनीं ती सोमलाची गोळी खाल्ली व चालण्याची शक्ती नसल्यामुळें डोळींत बसून पुढें जाऊं लागले. कांहीं वेळानें बळवंतरावांस त्या गोळ्यांपासून जुलाब झाले व उष्णता भडकून त्यांच्या सर्व आंगाचा भडका होऊं लागला तो त्यांस सहन करवेना. शेवटीं पाण्याचा एक झोत वहात होता तेथें त्यांनीं आपणास नेण्यास सांगितलें व आपण त्या झोताखालीं जाऊन बसले. त्यांची ती अत्यवस्थ स्थिती पाहून डोळीवाले त्यांला तेथेंच टाकून आपण निघून गेले. श्रीगुरुमूर्ती जवळच त्यांच्या मागें पुढें चालत होते त्यांला ही हकिगत समजली. त्यांनीं ताबडतोब पोलिसांस वर्दी दिली व डोळीवाल्यांस पकडून आणवून त्यांच्याशींसह बळवंतराव बसले होते तेथें आपण आले.

**श्रीगुरुमूर्ती**:—बळवंतराव ! असें एकाएकीं तुह्मांला काय झालें ? कांहीं औषध तर खाल्लें नसेलना ?

त्यावेळीं उष्णतेनें गळा फुलून गेल्यामुळें बळवंतरावांच्यानें बोलवेना, त्यांनीं आपल्या पदरास डाक्टरकडून आणिलेलें औषध ठेविलें होतें तें त्यांस खुणेनें दाखविलें, तें उघडून पाहातांच प्रत्यक्ष सोमल ! गुरुमूर्तींची ताबडतोब खात्री झाली कीं, ह्यांचा गळा सोमलानें फुलल्यामुळें यांच्यानें बोलवत नाहीं. यांला आतां तुपाशिवाय इतर कांहीं गिळणार नाहीं व दुसरा कांहीं उपायही ह्यावर उतार होण्यासारखा नाहीं. ताबडतोब तुपाचा तपास केला परंतु दैववशात् त्याठिकाणीं जवळपास तूप मुळींच मिळालें नाहीं. त्यामुळें कांहींच इलाज चालेना. शेवटीं बळवंतरावांस करंड्यांत बसवून त्यांनीं मुक्कामावर तशाच स्थितींत आणविलें. इतक्या मुदतींत ते फारच बेशुद्ध झाले. रात्रीची वेळ, थंडी फार, जवळपास कोणाची जाग

नाहीं. अशी स्थिती असल्यामुळें श्रीगुरुमूर्ती रात्रभर त्यांच्याजवळ बसून राहिले. सोमलानें वारंवार जुलाब होऊन बळवंतरावांची सर्व चिरगुटें खराब झालीं होतीं. तीं कोणी धुण्यासारखा नसल्यामुळें श्रीगुरुमूर्तींनीं स्वतः धुवून आणिलीं. आणि बळवंतरावांस एका बाजूस निजविलें. रात्रीं एकाच्या सुमारास बळवंतराव जरा शुद्धीवर आले. आणि खावयास मागूं लागले. जवळ कांहीं नसल्यामुळें श्रीगुरुमूर्ती एका हलवायाच्या दुकानीं गेले व त्याला हाक मारून उठवून ह्मणाले, बाबारे ! एक अनाथ ब्राह्मण फारच आजारी आहे व त्याला यावेळीं भूक लागली आहे आणि तो खावयास मागत आहे थोडी मिठाई दे. उद्यां तुझे पैसे देईन. दुकानदारानें विचारलें, आपण कोण आहांत ? तो तुमचा कोण आहे ?

**श्रीगुरुमूर्ती**:—त्याचा व माझा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं. यावेळीं त्याचे कोणीही आप्त त्याच्याजवळ नसल्यामुळें, त्याचें दुखः पाहून मी तुजजवळ कांहीं मागावयास आलों आहें.

हें ऐकून त्या दुकानदारानें त्यांच्याजवळ कांहीं मिठाई दिली व ह्मटलें आपण संन्याशी आहांत व विपद्ग्रस्त ब्राह्मणाची सेवा करण्यासाठीं आलां आहांत तर मी या मिठाईचे पैसे आपणाकडून घेणार नाहीं.

[illegible] ती मिठाई घेऊन श्रीगुरुमूर्ती तेथून मुक्कामावर आले व आणिलेल्या मिठापासून थोडथोडी मिठाई बळवंतरावांच्या तोंडांत घालूं लागले व तो ती खाऊं लागले पहांटेला तो बराच शुद्धीवर आला. उजाडतांच श्रीगुरुमूर्तींनीं त्याच्या मुलास तार करून बोलाविलें. तो येतांच त्यांनीं सर्व सामान त्याचे हवालीं करून दिलें. बळवंतरावानें त्याच दिवशी आपला देह सोडिला. त्या दिवास[illegible] श्रीगुरुमूर्तींनीं निश्चय केला कीं, प्रवासांत कोणाचीही सोबत धरावया[illegible] [illegible]

उत्तर[illegible] [illegible]रून श्रीगुरुमूर्ती पुनः ब्रह्मावर्ती आले. तेथें गणपतीबुवानावांचे [illegible] [illegible]साधुपुरुष सत्तावन सालच्या बंडाच्यावेळीं होते. त्यांचा पुत[illegible] [illegible] [illegible]सलमीन झाला होता व आपल्या बायकोला नेण्यासाठीं आ[illegible] [illegible]. [illegible]वेळीं त्याच्या वायकोनें श्रीगुरुमूर्तीजवळ येऊन त्यांस विचारिलें[illegible] [illegible]बरोबर जावें कीं काय ?

**श्रीगुरुमूर्तीः**—ज्या स्त्रियांचा पती बाटला असेल त्यांनीं आपला पती प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होईपर्यंत त्याचा त्याग करावा असें शास्त्रवचन आहे. हें ऐकून त्याची पत्नी नवऱ्याबरोबर न जातां ईश्वरभजन करीत राहिली. या बाईला पांच वर्षांचा एक मुलगा होता. त्याला प्रारब्धवशात् पिशाचाची पीडा जडली होती. त्यामुळें तो कधीं कधीं बेशुद्ध होऊन पडत असे. ही हकिगत श्रीगुरुमूर्तींस समजतांच त्यांनीं भूर्जपत्रावर मंत्र लिहून तें पत्र मुमुलाचे हातीं बांधावयास सांगितलें. त्यावेळेपासून त्याची पीडा कमी झाली.

पुढें काहीं दिवसांनीं दैवयोगानें त्या मुलाची आई रजस्वला असतानां त्या मुलानें तिच्याजवळ जाण्याचा हट्ट धरिला. त्यामुळें हातांत बांधिलेला मंत्र साईताचा दोरा तिनें काढून ठेवावयास सांगितलें. ही संधि साधून पिशाचानें येऊन तें मंत्रपत्र नेलें. इकडे होळीचे दिवस असल्यामुळें, त्या मुलाला त्याच्या मामानें खेळ पाहाण्या कारितां नेलें. रस्त्यांत मुसलमान लोकांच्या कबरखान्यांजवळ येतांच त्या पिशाचानें त्या मुलास पकडून त्याची मान मुरगळून टाकिली. तशा स्थितींत त्याचा मामा त्यास घरीं घेऊन आला. त्याजी ती भयंकर प्राणांतीक अवस्था पाहून त्याची आई गणपतीची प्रार्थना करूं लागली. त्यावेळीं त्या पिशाचानें त्या मुलाच्या शरीरांत प्रवेश करून तें बोलूं लागलें, " आतां प्रार्थना करून काय उपयोग होणार [illegible] तो मी तुझ्या वंशाचा उच्छेद करणार आहें. " नंतर दुसऱ्या [illegible] मुलगा वारला.

हें पिशाच मुसलमानाचें रूप घेऊन त्या [illegible]च्या घरांत वारंवार फिरत असे. त्यानें त्या बाईच्या नवऱ्यास भ्रष्ट केलें [illegible] मुसलमान [illegible]नविलें. [illegible], हा [illegible] तिच्या गर्भाचा नाश करून शेवटीं मोठ्या मुलास [illegible]च्या स्वमांत [illegible] मुलगा मेला त्याच्या आदल्या दिवशीं रात्रीं त्या पिशाचानें [illegible]न तो [illegible] ये-ऊन तिला सांगितलें कीं, ' माझा दीडरुपाया तूं [illegible] पिशाच [illegible]लास नाहीं ह्या कारितां मी तुझ्या वंशाचा नाश करण्या[illegible] पुढें भोग[illegible]लों [illegible]ावें आहे.' तात्पर्य ह्याप्रमाणें कृतकर्माचें सुख दुःख प्र[illegible] लागतेंच.

[illegible]ानें [illegible]या जव[illegible]

श्रीगुरुमूर्ती ब्रह्मावर्तांत असतांनां कोणी एका [illegible]क

कांहीं पैसे आणून दिले व एक पुस्तक मागाव्यास सांगितले. [illegible] श्रीगुरुमूर्तींजवळून तात्याटोपी यांच्या पुतण्यानें चोरून नेले. त्या[illegible]चा सर्व ठिकाणीं तपास करून पाहिला परंतु कोठेंच पत्ता लागेना व कोणी कबूल होईना. जो तो ' मला माहीत नाहीं ' असेंच उत्तर देऊं लागला. त्यावेळीं श्रीगुरुमूर्तींनीं श्रीदत्तमहराजांच्या गणास चोरीचा पत्ता लावण्याविषयीं आज्ञा केली. त्या गणानें चोरी करणाराच्या शरीरांत प्रवेश केला तेव्हां तो मोठ्यानें बोलूं लागला. ' मी पैसे घेतले आहेत ' नंतर त्यानें ते पैसे श्रीगुरुमूर्तींजवळ आणून दिले. त्यावेळीं त्या मुलास श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, तूं चांगल्या कुळांत जन्म घेतलास आणि अशा प्रकारचें नीच काम करितोस हें चांगलें नाहीं. तात्या टोपे ह्यांच्या पुतण्यानें त्यांची क्षमा मागून अतःपर असें नीच कर्म करणार नाहीं, असें ह्मणून त्यांस साष्टांग नमस्कार घातला. आणि त्या दिवसापासून तो चांगल्या मार्गानें वागूं लागला.

८ कानपूर येथें सरवारिया जातीचा एक ब्राह्मण रहात असे. त्याची श्रीगुरुमूर्तींवर फारच भक्ति होती. त्याला दहा वर्षे वयाची एक मुलगी होती. कोणी तरी चांगला घरंदाज नवरा पाहून त्याच्या बरोबर तिचें लग्न करून द्यावें, असें त्यानें ठरविलें. हें त्या मुलीला समजतांच, ती आपल्या बापास ह्मणाली, ज्या मनुष्याबरोबर तुह्मी माझा विवाह करावयाचा ठरविला आहे तो मनुष्य काय धंदा करीत असतो ? पित्यानें उत्तर दिलें कीं तो सरकारी नोकरी करीत असतो. त्यावर ती मुलगी बोलली, तो क्षत्रीय ब्राह्मण आहे ह्मणून मी त्याच्याशीं लग्न करणार नाहीं. याचप्रमाणें शेती व व्यापार करण्याऱ्या मनुष्याबरोबर सुद्धां मी लग्न करणार नाहीं. आपण माझ्या कारितां आचार संपन्न तपस्वी व भिक्षाहारी असा वर पसंत कराल तरच मी लग्न करीन. हें कन्येचें भाषण ऐकून तिचा बाप मोठ्या विचारांत पडला व श्रीगुरुमूर्तींजवळ येऊन त्यानें त्यांला झालेली सर्व हकिगत कळविली.

**श्रीगुरुमूर्तीः**—ही कन्या पूर्व जन्मांची योग भ्रष्ट आहे. ह्मणून तिच्या ह्मणण्याप्रमाणें वर मिळाल्यास तिचें लग्न करावें. तिची श्रद्धाच आहे

तिला तिच्या ह्मणण्याप्रमाणें परमेश्वर आपोआप वर मिळवून देईल. कांहीं काळ लोटल्यावर त्याच्याच जातीचा एक तपस्वी ब्रह्मचारी त्यांच्या घरीं येऊन उतरला, त्याचें आचरण पाहून त्या कन्येनें बापाला सांगितलें कीं, माझें लग्न या ब्राह्मणाबरोबर लावावें. कन्येचें हें वचन ऐकून तिच्या पित्यानें त्या ब्रह्मचाऱ्याजवळ लग्नाची गोष्ट काढिली. त्यानें त्या गोष्टीस रुकार दिला नाहीं. ह्मणून त्यानें ती गोष्ट श्रीगुरुमूर्तींला कळविली. श्रीगुरुमूर्तींनीं त्या ब्रह्मचाऱ्यास आपल्याजवळ बोलावून आणविलें व त्याला त्या मुलीबरोबर लग्न करावयास सांगितलें त्यावेळीं ब्रह्मचाऱ्यानें उत्तर दिलें कीं, मी योगाभ्यास करित आहें. करितां मला लग्न कर्तव्य नाहीं. श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, ह्या कन्येनें तुह्मांला मनानें वरिलें आहे ह्मणून आतां तुह्मी हिच्या बरोबर विवाह केला नाहीं तर तुह्मांला स्त्रीहत्या केल्याचें पातक लागेल. यासाठीं इच्याशीं लग्न करावेंच. प्रारब्ध योगच तसा आहे असें समजून नंतर त्या ब्रह्मचाऱ्यानें त्या कन्येबरोबर लग्न केलें. त्या दिवसापासून ती कन्या आपल्या आईबापांची आज्ञा घेऊन पतीबरोबर तीर्थ यात्रा करण्यास निघून गेली.

पूर्वी अशा प्रकारचे स्वयंवर होत असत. हल्लींचे अज्ञानी लोक सांगतात त्याप्रमाणें मोठ्या वयांत स्वयंवर होत नव्हते.

श्रीगुरुमूर्ती ब्रह्मावर्ती फिरत असतां, नर्मदा नदीच्या मनांत त्यांनीं आपल्या तटप्रदेशीं संचार करावा असें आलें व त्याप्रमाणें त्यांस दृष्टांत झाला. परंतु ती गोष्ट श्रीगुरुमूर्तींच्या मनास आली नाहीं. त्यामुळें असा चमत्कार झाला कीं, एक ब्राह्मण विस्फोटकाच्या दुःखानें अतिशय गांजलेला होता. त्याला कोणी सांगितलें कीं, तूं श्रीगुरुमुर्तीच्या चरणांचें तीर्थ घेशील तर तुझा रोग दूर होईल.

एकेदिवशीं तो ब्राह्मण श्रीगुरुमुर्ती जवळ आला आणि त्यांची नजर चुकवून त्यांच्या पायांवर पाणी घालून तें तीर्थोदक त्यानें प्राशन केलें. असें करण्याचें कारण त्याला विचारतांच तो ह्मणाला, यानें माझा रोग बरा होईल, असें मला समजल्यामुळें मीं हें तीर्थ घेतलें आहे.

हें ऐकून श्रीगुरुमूर्ती गंगेवर जाऊन स्नान करून आले. परंतु

त्यांला मनांत असा भास झालाकीं, लवकरच यासरीरावर कांहीं तरी विघ्न येणार आहे. त्याच रात्रीं दृष्टांत झाला कीं, एक चांडाळीण येऊन आपणास शिवली. त्यावरून श्रीगुरुमूर्ती लागलेच उठून श्रीदत्तात्रयाचें स्मरण करून विचार करूं लागले. या शरिराला लवकरच कांहींतरी मोठी पीडा प्राप्त होणार. असें त्यांस वाटलें व ते पुनः जाऊन निजले. सकाळीं उठून पाहातात तों सर्व शरीरावर विस्फोटक झालेला त्यांच्या दृष्टीस पडला. ज्या ब्राह्मणानें तीर्थ घेतलें होतें त्याचा विस्फोटक जाऊन तो सडसडीत बरा झाला. हा चमत्कार पाहून ते श्रीगंगेची पुढीलप्रमाणें प्रार्थना करूं लागले.

## पद–

अयिभूषित भर्गवरांगे ॥ मयि करुणा करि वरि गंगे ॥ धृ० ॥
तूं पाहतां करुणापांगे ॥ जें न मिळे योगें यागें ॥
तें मिळे तव पदसंगें ॥ यास्तव मी सांगें गंगे ॥ चाल ॥
एक वेळ करुणापांगे ॥ अवलोकीं मज भयभुजंगें ॥
दंशिलें आतां सुभगे ॥ अनुरागें स्पर्शि मदंगें ॥ अयि० ॥ १ ॥
प्रार्थितां कवि मातंगे ॥ त्या तूं गे स्वीय तरंगें ॥
तारिला स्पर्शुनि वेगें ॥ ती तूं आजि गंगे येगे ॥ चाल ॥
दर्शन दे कलिमलभंगे ॥ दुःखसंगें फसलों रागें ॥
त्रासलों या भवरोगें ॥ स्वजलौषध पाजि निजांगें ॥ अयि० ॥२॥
इच्छितां चित्ततुरंगे ॥ वाह्यार्थी आजि अनंगें ॥
व्यापिलें अयि उपरागें ॥ जेवि चंद्रा मग तद्योगें ॥ चाल
न सुचे मज कांहिं अपांगे ॥ पाहतां तूं एकदां गंगे ॥
योगयाग मज मग नलगे ॥ भवदवा शमविं विरागें ॥ अयि० ॥३॥
गवयावरि जेवि कुरंगें ॥ हस्तिनीवरि मातंगें ॥
दीपावरि जेंवि पतंगें ॥ कमलावरि जेवीं भृंगें ॥ चाल ॥
बडिशावरि मत्स्यें रागें ॥ त्या परि जन विषयीं निजांगे ॥
टाकिती त्यां वळविं विरागें ॥ तुज जड हे नोहे गंगे ॥ अयि. ॥४॥

जी भगिरथसुद्योगें ॥ ये भूमीपरि वरि वेगें ॥
सगरांतें तारि निजांगें ॥ ती तारक जगिं तुं गंगे ॥ बाल ॥
तुजपाशीं प्रार्थुनि मागें ॥ एवढें दे शंभु वरांगे ॥
सत्संगें वागवि गंगे ॥ निजरवें रंगवि गंगे ॥ अयि० ॥ ५ ॥

याप्रमाणें प्रार्थना करून श्रीगुरुमूर्तीनी श्रीगंगेला नमस्कार केला. दुसरे दिवशी दृष्टांत झाला कीं, तुह्मी तीन दिवस नर्मदेचें स्नान करा. ह्मणजे हा तुमचा विस्फोटक रोग निघून जाईल.

गंगेची आज्ञा घेऊन श्रीगुरुमूर्ती नर्मदातीरीं यावयास निघाले. मार्गांत नीमावर नजीक हरण गावीं येतात तों त्या गांवास आग लागून तो जळून गेलेला दिसला. तें पाहून त्यांनीं तेथील लोकांस विचारिलें हा गांव कशानें जळून गेला ? व मध्यभागीं हें एकच घर कसें राहिलें ?

**ग्रामस्थ**—आमच्या गावीं एक साधुपुरुष भिक्षेला आला होता. त्याला गांवांतील कोणी एकाही घरच्या मनुष्यांनीं भिक्षा घातली नाहीं. तो तसाच गांवांबाहेर निघून गेला. रस्त्यांत त्याला या मधल्याघरचा मालक भेटला. त्यानें त्यांस विचारिलें, महाराज ! आपण कोठून आलांत ?

**साधु**—या मागच्या गांवाला अग्नि लागलेला पाहून मी निघून आलों आहें.

**गृहस्थ**— महाराज ! आपण हें काय सांगतां ?

**साधुः**—अरे आज मी तीन दिवसांचा उपवासी असून पोटांत अग्नी लागल्यामुळें या गांवांत भिक्षेसाठीं गेलों. परंतु कोणीही ती आग विझविली नाहीं. त्यावरून मी असें बोललों.

**गृहस्थः**—महाराज ! आपण ह्या झाडाखाली थोडावेळ बसावें. मी भिक्षा घेऊन येतों. असें ह्मणून तो गृहस्थ गांवांत येऊं लागला. तों गांवाला आग लागून सर्वंध गांव जळून गेलाअसल्याचें त्याला दिसून आलें. पण त्या गृहस्थाचें घर मध्यभागीं असूनही जळलें नाहीं. त्या गृहस्थानें ईश्वराचें आभार मानिले व तो घरांत गेला आणि लवकर भीक्षा तयार करून त्यानें ती धावत धावत नेऊन त्या साधुपुरुषाला अर्पण केली. ती भक्षण करून तो साधु तृप्त झाला व पुढें निघून गेला.

श्रीगुरुमूर्तीः— तुह्मी लोक गृहस्थाश्रमी ह्मणवितां आणि दारांत कोणी अतीथि, अभ्यागत भिक्षेसाठीं आला तर त्याला भिक्षा देत नाहीं. मग तुमचा गृहस्थाश्रम तो कसला. कोणी उपासानें पीडीत आहें असें ह्मणून अन्न मागण्यसाठीं आपल्या दारावर आला तर त्यावेळीं त्याची जात, गोत न विचारितां त्याला अगोदर भिक्षा देऊन तृप्त केलें पाहिजे. तो ब्राह्मण असेल तर त्याचें घरांत नेऊन पूजन करावें व त्याला भिक्षा अर्पण करावी. ब्राह्मणावांचून इतर जातीचा तो असेल तर त्याला बाहेर नेऊन भिक्षा वाढावी. शूद्रादि अन्य जाती असेल तर त्याज कडून कांहीं तरी काम करून घेऊन त्याला खायाला द्यावें. याप्रमाणें क्षुधार्तीला शांत करावा. विन्मुख करून न दवडूनये. याप्रमाणें वर्तन ठेवाल तर तुमच्यावर अशा प्रकारचें विघ्न कधींहीं ओढवणार नाहीं.

श्रीगुरूमुर्तीचें हें भाषण ऐकून सर्व गांवकरी विरमले वे ह्मणाले, झाली ही शिक्षा चुकीच्या मानानें भयंकर आहे. आह्मी अतःपर असा कोणाचाही उपमर्द करणार नाहीं. असें सांगून त्याप्रमाणें त्यांनीं पुढें वर्तन सुरू केलें.

श्रीगुरुमुर्ती हरणगांवाहून निघाले व नर्मदातटाकीं येऊन पोंहोंचले. नर्मदेचें दर्शन होतांच स्तुती करून ह्मणाले, हे माते! माझ्या यःकश्चित अपराधाबद्दल मला एवढी भयंकर शिक्षा असावी काय? माझ्याशिवाय तुझें माहात्म्य वाढविणारा दुसरा कोणी तुला भेटला नाहीं काय; कीं मला एका एकीं एकदम येण्याचें भाग पाडिलें; अशाप्रकारें प्रार्थना करून तिला नमस्कार करून त्यांनीं तीन दिवस त्या ठिकाणीं मुक्काम केला व त्या नदीचें स्नान केलें त्या योगें त्यांचा विस्फोटक नाहींसा झाला. हें पाहून त्यांनीं नर्मदेची स्तुती केली.

नर्मदे हरसंभूते हरलिंगार्चनादृते । हरलिंगार्चिततटे जयाय नर्मदे हर ॥ ध्रु० ॥ नमः मातर्मातर्गिरिशदुहितर्नर्मद उत क्षयाया रेवे ते नम इतमते मेकलसुते ॥ नमो नित्यं सत्यं हि त उदकमत्यंतकमकं हरत्याधिं सा त्वमखिलत्रिपदे मेऽस्य सुखं ॥ १ ॥ महेशांगोद्भूना सुरनराणामधिगता युता सिद्धैर्याता ग्रसभामिव पाश्चा-

त्यजलधिं ॥ वृता भीमेनैषा हृतभजकदोषा वरवृषा सुभूषा सद्वेषा रुचिरवपुषा भात्यतिरुषा ॥ २ ॥ तटे यस्यास्तप्त्वा तप उपरिगा दुश्वरमरं वरं ह्यत्रेः पत्नी परमघनसूयागतभया ॥ स्वपुत्रत्वेनैव त्रिभुवनसमाराध्यमभवं समापास्मद्दैवं क इह सरितं तां तु न नमेत् ॥ ३ ॥ प्रयांती सिंधुं या प्रतिहतगतिर्विंध्यपदतो महावेगाऽभंगा सकलमलभंगा वरभगा ॥ नगान्भित्वाऽनेकानपि विविधलोकान्स्वबलतः पुनातीयं रेवा जगतिवरभावाऽद्दतभवा ॥ ४ ॥ प्रसिद्धाऽस्ते यस्या जनिरमरकंटेऽप्रवृते मता नाभिः सिद्धेश्वरपुर उतासौ भृगुपुरे ॥ परे सिंधौ लीना जगति मलिनानां सुगतिदा समुद्धर्त्री भर्त्री निजभजकलोकस्य गतिदा ॥ ५ ॥ सरस्वत्याः सत्या जलमिह पुनाति त्रिदिनतः स्म कालिंद्यानद्या अपि च सलिलं सप्तदिनतः ॥ महाभंगा गंगाऽखिलदुरितभंगा सपदि सा महाभावा रेवा कथमपि हि दृष्ट्यैव सहसा ॥ ६ ॥ स्वभावाद्दासिंधोरियमचलजा भाति सुलभा । त्रिषु स्थानेष्वेषा हतमलिनदोषा न सुलभा ॥ नगर्यामोंकाराभिधपशुपतेरुत्तमगतिर्युता वैराभिरूयेऽपि च भृगुमुनेः क्षेत्रउशति ।७। पुनंत्यन्या मान्या अपि जगति गंगादिसरितः प्रयागादिस्थाने महति नहि सर्वत्र दुरितात् ॥ इयं रेवा देवाधिपतिशिवसेव्योभयतटा तटे यत्र क्वापि स्वकमिह पुनात्याजलनिधेः ॥ ८ ॥ त्रिशूलांकान्यच्छान्यगणितविमानानि त उपर्युपर्यस्थाः कूल सुविमलमुपादाय सततं॥ स्थिताः शंभोर्दूता मृतमिह तु नेतुं शिवपुरं वरं तेषा मुच्चैरहमहमिकाशब्द उदितः ॥ ९ ॥ बहिः शब्दा तस्मात्प्रविगलितधैर्या यमभटाः मृतान्नेतुं प्राप्ता अपि सपदि ते वेपितहृदा ॥ अधीरा धीरा द्राक्कत इत परावृत्य सजवाः स्ववासं संजग्मुः खलु तत इतः को नरकभाक् ॥ १० ॥ प्रभावोऽस्या मृत्युंजयदुहितुरेवं हि सरितो यतोऽतोऽसौ रेवा नृमरणभदांतास्ति विदिता । न तां कः सेवेतानुपदमृतभीतिर्हितमतिः समानां तापानामपि च

दुरितानां प्रशमनीम् ॥ ११ ॥ यदीयांबुस्पृष्टः स्पृशति गतियोगेन पवनो मनोहृद्यं यंतं तमपि स पुनातीति महिमा ॥ प्रतीतो यस्याः सा जगति यतिदाऽसावभयदा सदासक्तान्युक्तान्किमुत भजतामुद्धरति नो ॥ १२ ॥ यदीयं पानीयं सदमृतमयं चित्सुखमयं सुपेयं चायुष्यं मतिदमुतत्र चैस्यमभयम् ॥ यशस्यं चक्षुष्यं विहितविजयं स्वर्ग्यमलयं सुभव्यं सद्देयं सकलजगदारोग्यविजयम् ।१३।

सुरप्रार्थ्यं पथ्यं स्वयमिह च पूज्यं विजयते ।
जगन्मान्यं धन्यं मलहृदिह लभ्यं तु नियतेः ॥
नियोगात्सा रेवा नृभवदवदावार्तिशमनी ।
मनीषीया पायादविरतमपायाद्दुरधुनी ॥ १४ ॥
नियम्यात्मानं ये विहितनियमाः संततपरि- ।
क्रमं कुर्वन्त्यस्या अमलजलसेवैकनियमाः ॥
सुपूतास्ते धन्या जगति वहुमान्याः परगतिं ।
व्रजंत्येवं रेवा जयति खलु शर्वांगजनिता ॥ १५ ॥
अये रेवे देवेडितगुणगणे मर्त्यतरणे ।
क्षणेनापि स्नानात्परमगतिदाऽभीष्टवरदा ॥
त्वमेवातो देवा अपि तव न चेच्छंतिहि तटं ।
परित्यक्तुं वक्तुं तव गुणगणान्कः प्रभुरिह ॥ १६ ॥
यदीये सत्तोये हिमनगसुता गर्भगगणा- ॥
धिपस्योत्कृत्यारं शिर इह सुरारिः स्वहितकृत् ॥
माहामायावी प्राक्षिपदपभयोऽतर्क्यमहिमे- ।
श्वरस्यास्माच्छीर्षागतरुधिरसंस्पर्शवशतः ॥ १७ ॥
ततोऽनंता आब्धे स्मरहरसुतायाऽस्तु सलिले ।
मलेऽनंता जाता इह रुधिरभासः खलु शिलाः ॥
अभूवन्गाणेशा अखिलमलसंक्षालनपरा ।
वरा पूज्या विघ्नक्षपणपटवस्तेऽपि वरदाः ॥ १८ ॥
यदीये पानीये भृशममृतसंस्पर्धिनि जनि-

क्षपायाश्चोंकारेश्वरवरपुरात्पूर्वत उत ॥
महोत्तुंगस्थानात्पतित उपलास्ते पशुपते—।
र्भवंत्याहो बाणाभिधपरमलिंगानि बहुशः ॥ १९ ॥
महांतस्ते बाणा अपि परमसूक्ष्माः कतिपयाः ।
शुभाः कर्पूराभाः शशिधरकलाढ्याः कतिपयाः ॥
परे केचिच्चित्रा अपि च निखिलास्तेऽत्र भजना ।
त्पुरारेः सायुज्यं ददत इति रेवांबुमहिमा ॥ २० ॥
एवं प्रभावे जयदेवि रेवे प्रसीद मे तेऽम्बु सदैव सेवे ॥
श्रीवर्मदे देवि नमोनमस्ते श्रीशर्मदे सोमसुते नमस्ते ॥२१॥
अवतु विगतरोषाऽस्मान्महासिंधुयोषा ।
परिहतनतदोषा या नमोमात्रतोषा ॥
जयतु भजकपोषा संस्रवंती विशेषा ।
निरुपमतमभूषा मालिनी दिव्यवेषा ॥ २२ ॥
सन्मानतस्वच्छसुदिव्यनीरा नीरागयोग्याश्रितरम्यतीरा ॥
धीरार्चिता नित्यमखंडपूरा सा रातु रेवेष्टमनंतसारा ॥ २३ ॥
स्वभक्तवरदे सुरद्विषदभेद्यसद्वर्मदे ।
सुदुर्गतिदकर्मदे हतगदेऽपि सद्धर्मदे ॥
अये नदि न दीनतां व्रजासि कर्हिचिच्छर्मदे ।
प्रसीद जनकामदे जय नमोऽस्तु ते नर्मदे ॥ २४ ॥
यन्मूलेऽस्त्यमरेश्वरो विजयते श्रीसिद्धनाथस्तथा ।
कावेरीपरिवेष्टितो गलितदोंकारो परे चामिता ॥
मध्येऽन्येऽपि च शूलपाणिसहिताः पाश्चात्यभागे स्थिताः ।
सर्वे ते भजतामभीष्टफलदा वर्वर्ति सा नर्मदा ॥ २५ ॥

( हारबंध )

हरपरमरये समस्तमघं मम कुरु गुरुकरुणासमस्त मतेमघी ॥
खलबलदलने समस्तमनोमल हरदरमरमण्यमर्त्यमतेऽमले २६
यस्य स्मृत्या च सद्यः कलिमलविलयो जायते भाविकानां ।

यस्स्मृत्या स्वर्गगामी भवभयहृदुपेत्यात्मदो भावुकानां ॥
दत्तात्रेयस्य तस्य प्रशमितमनसः सद्वरीर्वाति मातुः ।
स्थानं यस्यास्तटे सा विजयत उशती नर्मदा शर्मदा नः ॥ २७ ॥

( गोमूत्रिका )

कुष्ठाद्यार्तोऽप्यरोगो भवति सदनसूयाश्रमे यत्तटे य--।
न्मध्ये शुक्रादितीर्थान्यपि झटिति पुनंत्युद्धरत्याशु या च ॥
प्रेतश्राद्धेन नारायणबलित इतं दुर्गतिं मुक्तिदातां ।
रेवा गोमुत्रिकादां परमसुहितदां नर्मदां वासुदेवः ॥ १ ॥

भवान्तकेऽभयं देहि । तापं मे हर नर्मदे ॥
भवात्मके नयं देहि । पापं मे हर नर्मदे ॥ २ ॥

यांप्रमाणें नर्मदा मातेची स्तुती करून तिला त्यांनीं नमस्कार केला. आणि ब्रह्माणी घाटावर मुक्काम केला. नर्मदेच्या घाटावरून चालत असतां श्रीगुरुमूर्तींचा पाय निसटल्यामुळें त्यांच्या कमरेत लचक भरली. माधुकरीसाठीं चालत जाणें त्यांला कठीण वाटूं लागलें. त्यामुळें थोडावेळ ते निजून राहिले. त्यावेळीं नर्मदा मातेनें दहा वर्षांच्या कुमारिकेचें स्वरूप धारण करून त्यांला दर्शन दिलें, व सांगितलें, भिक्षेची वेळ झाली आहे. आपण भिक्षा घेण्यास जावें. मी आपल्या कमरेची लचक चांगली करितें. असें सांगून नर्मदा मातेनें भस्म मंत्रून त्यांच्या कंबरेस लाविलें आणि सांगितलें, आतां उभे राहून पाय ठोका म्हणजे लचक बरी होईल. त्याप्रमाणें पाय ठोकतांच त्यांची लचक बरी झाली. त्यावेळीं श्रीगुरुमूर्तींनीं नर्मदेला नमस्कार करून प्रार्थना केली.

**जय जय शशिकन्ये नर्मदे शर्मदे त्वं।जय जय जनमान्ये धर्म दे नर्मदे त्वं।**
**जय जय सुवदान्ये धर्मदे कर्मदे त्वं।जय जय भुवि धन्ये धर्मदे वर्मदे त्वं॥**

याप्रमाणें प्रार्थना करून साष्टांग नमस्कार केला. त्यावेळीं ती कन्यास्वरूपी नर्मदा अंतर्धान पावली. नर्मदेनें श्रीगुरुमूर्तींची लचक बरी करण्यासाठीं जो मंत्र उपयोगांत आणिला तो श्रीगुरुमूर्तींला येत होता, त्यामुळें ते

पुष्कळ हसून ह्मणाले, ही नर्मदा प्रत्येकाला त्याच्या त्याच्या भावाप्रमाणें फल देत असते. याकरितां प्रत्येक मनुष्यानें सद्भाव ठेवून श्रीनर्मदा मातेची सेवा करीत जावी. नंतर ते गांवांत गेले व भिक्षा घेऊन आले.

पुण्याच्या एका ब्राह्मणानें आपली लग्न झालेली मुलगी, लग्न झालें नाहीं असें सांगून द्रव्यलोभास्तव या गांवीं पुन्हा विवाह करून दिली होती. दैवयोगानें त्या मुलीचा दुसरा नवरा मरण पावला. त्यामुळें तिचें केशवपन करून तिला सोवळी केली ही सर्व हकिगत तिच्या प्रथम वरास समजली. तेव्हां तो तिला नेण्यासाठीं त्या गांवी आला. त्या ठिकाणीं गणूभय्या या नावाचा एक गृहस्थ राहात होता. त्याचा व ह्या मुलीच्या दुसऱ्या नवऱ्याच्या बापाचा वैरभाव होता. त्यामुळें त्यानें त्या मुलीस आपल्या ताब्यांत घेऊन तिचे केश पुन्हा ठेवून तिला पहिल्या नवऱ्याच्या स्वाधीन केली. ही हकिगत श्रीगुरुमूर्तीस समजली त्यामुळें ते त्या गांवीं भिक्षेस न जातां भर दुपारीं ब्रह्माणी सोडून एका झाडाखालीं येऊन बसले.

त्या समयीं नर्मदेनें बारा वर्षांच्या मुलीचें स्वरूप धारण करून श्रीगुरुमूर्ती जवळ येऊन त्यांला विचारिलें कीं, आपण ब्रह्माणीस भिक्षा कां केली नाहीं ?

**श्रीगुरुमूर्तीः**— बाई ! अशा भ्रष्ट ब्राह्मणाकडली भिक्षा घेण्यापेक्षां नर्मदेचें पाणी पिऊन शरीरत्याग करणें फार बरें.

**मुलगी** ( नर्मदा देवी )—स्वामीमहाराज ! आपण माझ्या बरोबर चलावें. माझें गांव येथून जवळच आहे. तेथें भिक्षा करावी.

**श्रीगुरुमूर्तीः**—बाई मी एकाच घरीं भिक्षा करीत नाहीं.

**नर्मदाः**—महाराज ! माझ्या गांवी एकच घर नसून त्या ठिकाणीं दक्षिणी ब्राह्मणांचीं सतरा घरें आहेत. असें सांगून नर्मदा माता तेथेंच अदृश्य झाली.

नंतर श्रीगुरुमुर्ती तेथून नीमावर गांवीं आले. त्याठिकाणीं चौकशी केली. तों ब्राह्मणाचीं सतराच घरें असल्याचें समजलें. त्याठिकाणीं थोडा काळ राहून तेथील ब्राह्मणास सन्मार्गाला लावून ते तेथून ओंकारेश्वर येथें

आले. त्या ठिकाणीं तेहतीस दिवस राहून त्यांनीं राजाचा कारभारी बळवंत राव यास ब्रह्मकर्म व पंचमहायज्ञ शिकविले. तेथून निघाले ते मंडलेश्वर, महेश्वर इत्यादि ठिकाणीं जाऊन तेथून चिखलदा गांवीं आले.

यागांवीं व्यंकटराव नावाचा एक ब्राह्मण राहात होता. त्याची बायको मरण पावल्या मुळें त्यानें आपली रेलवेंतील नोकरी सोडून दिली व तो कोटेश्वराच्या घाटावर राहून ईश्वर भजन करीत होता. तो श्रीगुरुमूर्तीस शरण आला. श्रीगुरुमूर्तीनीं त्याच्या विनंती वरून त्याला षट्क्रिया व प्राणायाम करावयास शिकविलें. यागांवीं नानासाहेब, गंगाधर, बाळावैद्य वगैरे चांगली श्रद्धावान मंडळी होती. त्यांला श्रीगुरुमूर्ती उपनिषद् व पुराण श्रवण करवीत असत.

शके १८१८ सालीं नरकचतुर्दशीच्या दिवशीं श्रीदत्तभगवानानीं श्रीगुरुमूर्तीस कळविलेंकीं, आज आह्मांस अभ्यंग स्नान घालावें.

**श्रीगुरुमूर्तीः**—मी ज्यादिवशीं आपली मूर्ती बाळगिली त्यादिवशीं आपण सांगितलें कीं, 'मी भस्मपूजेनें संतुष्ट राहीन' त्यावरून मी आज ही आपली भस्मपूजा करीन.

अभ्यंग स्नान घातलें नाहीं ह्मणून श्रीदत्तमूर्ती रागावून नर्मदेंत गडप झाली. हें श्रीगुरुमूर्तीस माहीत नाहीं त्यामुळें त्यांनीं माध्यान्हसमयीं माधुकरी मागून आणिली व हातपाय धुवुन आचमन करून नैवेद्य अर्पण करण्यासाठीं देवाजवळ गेले; तों तोफेच्या आवाजा सारखा मोठा आवाज करून श्रीदत्तभगवान ह्मणाले, अरे मला स्नान घातल्या शिवाय नैवेद्य दाखवितो आहेस. अभ्यंग स्नान घातलें नाहींस ह्मणून मी तुला सोडून नर्मदेंत जाऊन बसलों आहें. हें ऐकून श्रीगुरुमूर्ती घाबरून गेले आणि नर्मदेवर येऊन प्रार्थना करूं लागले.

## अभंग.

मित्र मित्र जरि भांडती। तरी पुन्हा एक होती॥ दंपतीचा हो कलह। लवमात्र न तुटे स्नेह॥ देवभक्ताचें भांडण परभक्तीचें तें ठाणें॥
वासु ह्मणे हा विनोद। देतो दत्ता परानंद॥४॥

याप्रमाणे प्रार्थना करून वंदन केलें आणि नर्मदेमध्यें बुडी मारून

श्रीदत्तमूर्ती घेऊन मुक्कामावर आले. नानासाहेब वगैरे मंडळी त्या ठिकाणीं हजर होतीच त्यांचे कडून अत्तर, गुलाब, उष्णोदक, पंचामृत वगैरे पूजेचें सर्व साहित्य मागवून, श्रीदत्तमूर्तीची अभ्यंगस्नानपूर्वक पंचामृत पूजा करून मंत्रपुष्प, उत्तर पूजन, गायन वगैरे झाल्यावर श्रीदत्ताची प्रार्थना केलीकीं,

आचिंत्यस्य कुतो ध्यानं कूटस्थावाहनं कुतः ॥ क्वासनं विश्वसंस्थस्य पाद्यं पूतात्मनः कुतः ॥ १ ॥ क्वानर्घोरुक्रमस्यार्घ्यं विष्णोराचमनं कुतः ॥ निर्मलस्य कुतः स्नानं क्व निरावणेऽम्बरम् ॥ २ ॥ स्वसूत्रस्य कुतः सूत्रं निर्मलस्य च लेपनम् ॥ निस्तृषः सुमनोभिः किं किमक्षय्यस्य धूपतः ॥ ३ ॥ स्वप्रकाशस्य दीपैः किं किं भक्ष्याद्यैर्जगद्भृतः ॥ किं देयं परितृप्तस्य विराजः क्व प्रदक्षिणाः ॥ ४ ॥ किमनंतस्य नतिभिः स्तौति को वागगोचरम् ॥ अन्तर्बहिः प्रपूर्णस्य कथमुद्वासनं भवेत् ॥ ५ ॥ सर्वतोपोऽप्यसंभाव्या भावयंते भक्तिभावनः ॥ सेव्यसेवकभावेन भक्तैर्लीलानृविग्रहः ॥ ६ ॥ तवेशातींद्रियस्यापि पारंपर्याश्रुतां तनुम् ॥ प्रकल्प्यास्मात्त्वावर्चनि प्रार्थयेर्चां मनोमयीम् ॥७॥ कलसुश्लोकगीतेन भगवन्दत्त जागृहि ॥ भक्तवत्सलसामीप्यं कुरु मे मानसार्चने ॥ ८ ॥

याप्रमाणें प्रार्थनापूर्वक नमस्कार करून श्रीगुरुमूर्तींनी भिक्षा केली. श्रीगुरुदत्तात्रयाची ही सगुण उपासनेची लीला पाहून चिखलदा गांवांतील सर्वलोक विस्मययुक्त झाले.

सगुण उपासनापूर्वक परमेश्वराचें ध्यान केल्यानें मनुष्याला ईश्वराचा साक्षात्कार लवकर होतो व तो आपलीं सर्व वचनें सिद्धीस नेऊं शकतो. सगुण उपासना सिद्ध झाल्याशिवाय कधींही कोणाला अनुभवजन्य ज्ञानाची प्राप्ति व्हावयाची नाहीं. आणि ज्ञानप्राप्ती झाली नाहीं तर मोक्षाचा लाभ होणार नाहीं. राजाला आपल्या शिक्का, मोर्तब वगैरेचा जसा अभिमान असतो, त्याच प्रमाणें ईश्वराला आपल्या सगुण मूर्तीचा अभिमान असतो. शिक्का मोर्तबांत प्रत्यक्ष राजा नसतां, हुद्दा वगैरे मात्र असतात, तरी त्यांत राजा नाहीं असें जसें म्हणतां येत नाहीं, कारण राजानसला तर

शिक्का चालावयाचा नाहीं. शिक्यावरून राजाचें महत्व दिसून येतें. त्यांत राजाचें जडत्व किंवा परिच्छिन्नता उघड होत नाहीं. त्याच प्रमाणें ईश्वराच्या मूर्तीच्या ठिकाणी समजावें. राजाला आपल्या कायद्याचा जसा अभिमान असतो, तसा ईश्वराला आपल्या आज्ञां ( वेदशास्त्र वचनां ) चा अभिमान असतो. ज्याप्रमाणें राजा व प्रजा परस्पर संलग्न असतात त्याप्रमाणें ईश्वर आहे पण तो बांधलेला नाहीं. ज्याप्रमाणें राजानें केलेले क़ायदे यथान्याय प्रजेनें पाळिले ह्मणजे राजा प्रजेवर सुप्रसन्न असतो, त्याच प्रमाणें ईश्वर-प्रणीत नियमानों वागून त्याची सेवा केल्यानें तोही सुप्रसन्न होतो. याकरितां मनुष्यमात्रांनीं सगुण उपासना केलीच पाहिजे.

शके १८१९ मध्यें श्रीगुरुमूर्ती चिखलद्याहून निघाले व वैशाख शुद्ध १० रोजीं गुजराथेंत तिलकवाडा येथें नर्मदातीरीं आले व चातुर्मास त्यांनीं त्या ठिकाणीं केला.

यागांवांतील कितीएक ब्राह्मण पुत्रकामना धरून प्रश्न विचारण्या करितां श्रीगुरुमुर्ती जवळ आले. त्यावेळीं कुंडली पाहून श्रीगूरुमूर्ती ह्मणाले, तुह्मां पैकीं या मणिशंकराला मात्र पुत्र होईल. पण त्यानें पूर्वजन्मीं सर्प मारिला आहे. त्या दोषापासून मुक्त झाल्याशिवाय मात्र यास पुत्र होणार नाहीं.

**मणिशंकरः**—महाराज ! या दोषाचा परिहार होण्यासाठीं काय उपाय केला पाहिजे तें कृपा करून मला सांगा.

**श्रीगूरुमूर्तीः**--तुह्मीं पंचमीव्रत करावें.

त्याप्रमाणें त्या गृहस्थानें पंचमीव्रत करण्याचें सुरू केलें. पुढें कांहीं दिवसांनीं त्याला मुलगा झाला. तो मुलगा आज मितीला दहा वर्षांचा आहे.

श्रीगुरुमूर्ती तिलकवाड्याहून निघून त्याच आश्रमीं आले व तेथून पुढें तीर्थें करीत करीत बरकाल जवळ श्री अनुसूया आणि अत्रिमहाराज-यांच्या आश्रमांत आले व अनुसूया मातेची प्रार्थना करूं लागले.

**पतिव्रताशिरोरत्नभुता सुंदरविग्रहा ॥ सुचरित्रा दिव्यतेजाः सर्वलोकनमस्कृता ॥ १ ॥ विष्णुप्रपौत्रीकपौत्री सती कर्द-**

मपुत्रिका ॥ देवहुतिसमुत्पन्ना सुमुखी कपिलस्वसा ॥ २ ॥ अत्रिपत्नी महाभागा दयाक्षांत्यादिभूषिता ॥ अनसूया देवगेया निजधर्मजिताखिला ॥ ३ ॥ श्रीदत्तात्रेयजननी चंद्रमाता मनस्विनी ॥ दुर्वासोजनयित्रीशा जगत्संकटवारिणी ॥ ४ ॥ चतुर्विंशतिनामानी मंगलानि पराणि च ॥ पावनान्यनसूयाया दत्तमातुः पठेन्नरः ॥५॥ त्रिकालमेककालं वा श्रद्धाभक्तिसमान्वितः ॥ तस्य धर्मे रुचि देत्तभक्तिर्मुक्तिः क्रमाद्भवेत् ॥ ६ ॥

पद.

अनसूयापायादपायानसूया पायात् ॥ धृ० ॥
अत्रिमुनिप्रिया या गतमाया। साध्वी या विभया। अपाया० १ अन०
अतपत्तुधवानुमता रेवा तीरे या विनया। अपाया० ॥ २ ॥ अनसू०
तपःप्रभावाद्विधिहरिशर्वा जाता यत्तनयाः ॥ अपाया ॥ ३ ॥
गुर्जरदेशे तत्राद्यापि पीपायाति गतिं ॥ अपाया० ॥ ४ ॥
उत्संकगतो भगवान् दत्तो यद्दुग्धं हि पपौ ॥ अपाया० ॥ ५ ॥
सैषाऽनसूया वासुदेवगेया ध्येया पातु भयात् ॥ अपाया० ॥६॥

याप्रमाणें प्रार्थना व नमस्कार करून तेथून निघाले ते मार्कंडेश्वर महादेवाच्या देवालयांत आले व तेथें त्यांनीं मुक्काम केला. तेथें संसार भयानें त्रासलेला गांडा नांवाचा ब्राह्मण श्रीगुरुमूर्तीस शरण येऊन साष्टांग नमस्कार करून ह्मणाला, हे गुरुनाथ ! ह्या अनाथ बालकास पदरांत घ्या.

**श्रीगुरुमूर्तीः**—तूं कोण आहेस व तुझी हकिगत काय आहे तें मला सांग ?

**गांडाः**—हे गुरुमहाराज! माझी जन्मभूमी सुरतेनजीक तेलंगपूर गांवीं आहे. माझा जन्म विक्रम संवत् १९२५च्या मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशीं झाला. मी लहानपणीं फार अल्लड असल्यामुळें मला लोक गांडा ( वेडा ) ह्मणून हाक मारीत, पण माझें खरें नांव कल्याण असें आहे. माझें लग्न वयाच्या आठव्या वर्षीच झालें आहे व स्त्री अद्यापपर्यंत आहे. मी शाळा-

खात्यांत आणि व्यापारी लाईनमध्यें नोकरी केली आहे. व्यापारी नोकरींत असतांना साधुपुरुषाची भेट व्हावी ह्या इच्छेनें मी पायीं चालत नाशीकहून थेट मद्रासेपर्यंत गेलों होतों. परंतु कोणाही सत्पुरुषाची भेट झाली नाहीं. शेवटीं मद्रास येथें राहून नोकरी पुन्हा पत्करिली. बाल्यावस्थेपासून माझी महादेवावर फार भक्ति आहे. मी ब्राह्मणावांचून इतरांस साधु समजत नाहीं. मी अनावला जातीचा ब्राह्मण आहें. पांदेचरीस असतांना एके रात्रीं मला स्वप्न झालें कीं, " सीतामातेला रावण घेऊन जात आहे. रस्त्यांत एक सुशोभीत तलाव लागला. मी त्या तलावांत स्नान केलें. बिल्वपत्रें आणून त्या ठिकाणीं असणाऱ्या महादेवाची पूजा केली व सीता मातेची रावणहस्तापासून मुक्तता करण्याविषयीं त्याची प्रार्थना करूं लागलों. " इतक्यांत जागा झालों. त्याच्या आठव्या दिवशीं माझें माझ्या शेटजी बरोबर कांहीं कारणानें वितुष्ट आलें. त्याच्याशीं माझी तक्रार झाल्यामुळें मी त्याची नोकरी सोडून दिली व घरीं निघून आलों. त्यानंतर थोडे दिवस गेल्यावर माझ्या वृत्तींत एकाएकीं मोठें अंतर पडलें. सर्वस्वाबर अप्रीती उत्पन्न झाली. माता पिता असल्यामुळें त्यांच्या आज्ञे शिवाय तपश्चर्या करावयास जातां येणें शक्यच नव्हतें. ह्मणून मी व्यापाराचें निमित्त करून नर्मदा तीरीं राहिलों व नर्मदेची आणि ब्राह्मणाची सेवा करूं लागलों. ही गोष्ट माझ्या पित्यास पसंत न पडल्यामुळें ते ह्मणाले, मला एक मुलगा होऊन मरण पावला. त्याप्रमाणें तुलाही मी मेल्यासारखाच समजतों हें ऐकून मला फार वाईट वाटलें. मी तावडतोब व्यापार बंद केला व संवत १९५२ च्या कार्तीक शुद्ध द्वादशीच्या दिवशीं पैसा वसूल करण्याचें निमित्त करून घरांतून बाहेर सरलों, तों थेट शूलपाणीश्वरानजीक आलों. वस्त्रादिकांचा त्याग करून बारकऱ्याच्या वेषानें प्रदक्षणावासीस ॐकारनाथाच्या झाडींत बंध बावाच्या धरमपुरी नजीक एका वडाच्या झाडाखालीं बसलों. व प्रारब्धाचा आणि सद्गुरुशोधाचा विचार करूं लागलों. त्यादिवसापासून सर्व लोक मला ब्रह्मचारी ह्मणूं लागले. त्यानंतर किटिघाटावर एक वर्ष पर्यंत राहिलों. त्याठिकाणींही कोणी साधुपुरुषाचें दर्शन झालें नाहीं. त्यामुळें तेथून निघून पांडुरंग महाराजांजवळ आलों.

हे स्वत: भिक्षा मागून हातांनीं दळून प्रदक्षणावासीस भिक्षा करीत असत. त्यांच्याकडून एकदां चोरांनीं अन्न चोरून नेलें व तें आपण खाल्लें त्याच्या योगानें त्या चोरांचीं पोटें फुगलीं व त्यांस प्राणांतीक अवस्था प्राप्त झाली तेव्हां ते पांडुरंगबुवांजवळ आले व त्यांची क्षमा मागितली. त्यावेळीं त्यांनीं चोरांस पुन्हा तेंच अन्न देऊन रजा दिली. त्यांना नर्मदा प्रसन्न होती, मी त्यांचेकडे येतांच ते रागावून ह्मणाले, कीं तूं अशा घोर अरण्यांत सिद्ध होण्यास बसला असशील? त्यांला मी माझी सर्व हकिगत कळविली. तेव्हां ते ह्मणाले हे मूर्खा! अशा जंगलांत साधुपुरुष असतात काय? हे जंगल ह्मणजे मनुष्यप्राण्याविरहीत जागा. मी माझ्या अपराधाची क्षमा मागितली. तेव्हां ते ह्मणाले, तूं निमावर येथें सिद्धनाथ महादेवाच्या देवळांत राहून जपानुष्ठान कर. तुला त्याठिकाणीं कोणी सत्पुरुष भेट देईल. त्याप्रमाणें मी निमावर येथें आलों. तेथें मला शामभट्ट, केशवभट्ट हे मिळाले. त्यांनीं आपण आल्याची बातमी मला दिली. तेव्हां मी आपला शोध करीत करीत येथें आलों. माझ्या पूर्व पुण्यामुळें भवहारक अशा आपल्या चरणाचें मला आज दर्शन मिळालें व मी कृत कृत्य झालों. यापुढें हें शरीर आपलेंच आहे.

हे गुरुमहाराज! ह्या अनाथ परदेश्याला पदरांत घेऊन, या जन्म मरणरूप भवप्रवाहांतून मुक्त करा. या शिवाय मला दुसरी कोणतीही इच्छा नाहीं.

**श्रीगुरुमूर्ती:**—मला तुझ्या येण्याची बातमी पूर्वींच कळली होती. काल तूं श्रीअनूसूया मातेस मुक्काम केला होतास ना?

**गांडा:**—होय गुरुमहराज.

हें ऐकून दीनबंधु श्रीगुरुमूर्तीस त्याची दया आली व त्यांनीं त्याला आपल्या जवळ राहण्याची आज्ञा केली. त्याची मर्यादशील वर्तणूक व श्रद्धा युक्त सेवा पाहून श्रीगुरुमूर्ती त्याजवर प्रसन्न झाले. ते निकोरागावीं येतांच गांडा यास ह्मणाले, ह्या पार्वतीपती शंकरासमोर मी तुला योगाभ्यास करण्यास आज्ञा देत आहें. ज्याप्रमाणें तुझी श्रद्धा असेल त्याप्रमाणें हा देव तुझी इच्छा पूर्ण करील. असें सांगून त्यास योगाभ्यास करण्यास त्यांनीं दाखविलें.

तेथून शुक्लतीर्थास येतांच करुणामूर्ती ह्मणाले, तुझ्या पिताजीच्या

वचनामुळें तुला हा लाभ मिळाला आहे. तर तूं मातापित्यांजवळ जाऊन त्यांला नमस्कार कर व त्यांच्याजवळ अपराधाची क्षमा माग. नंतर त्यांची आज्ञा घेऊन चातुर्मासांत माझ्यापाशीं ये. नंतर श्रीगुरुस्वामी गिरनार येथें गेले व श्रीदत्तपादुकांस त्यांनीं नमस्कार केला. तेथून सोरटी सोमनाथाच्या दर्शनाकरितां प्रभासास आले. त्या ठिकाणीं बाळंभट्टपुजाऱ्याच्या आग्रहावरून कांहीं दिवस राहिले. त्या प्रसंगीं बडोद्याचे कारभारी, देशपांडे इत्यादि मंडळी त्यांला येऊन भेटली व श्रीगुरुमूर्तीचें दर्शन झाल्यापासून त्यांचें नास्तीकपण नष्ट झालें व ते ब्राह्मणाच्या मर्यादेप्रमाणें यथायोग्य वागूं लागले.

तेथून प्राचीन सरस्वतीवर ह्मणजे जेथें श्रीकृष्णपरमात्म्यानें शरीरत्याग केला, त्या ठिकाणीं येऊन त्यांनीं श्रीकृष्णपरमात्म्याला नमस्कार केला. तेथून सुदामपुरी (पोरबंदर) पाहून द्वारकेंत येऊन श्रीकृष्णपरमात्म्याची प्रार्थना केली.

अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् ॥
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥१॥
अच्युतं केशवं सत्यभामाधवं माधवं श्रीधरं राधिकाराधितम् ॥
इंदिरामंदिरं चेतसा सुंदरं देवकीनंदनं नंदनं संदधे ॥ २ ॥
विष्णवे जिष्णवे शंखिने चक्रिणे रुक्मिणीरागिणे जानकीजानये ।
वल्लवीवल्लभायार्चितायात्मने कंसविध्वंसिने वंशिने ते नमः ॥ ३ ॥
कृष्ण गोविंद हे राम नारायण श्रीपते वासुदेवाजितश्रीनिधे ।
अच्युतानंत हे माधवाधोक्षज द्वारकानायक द्रौपदीरक्षक ॥ ४ ॥
राक्षसः क्षोभितः सीतया शोभितो दण्डकारण्यकं पुण्यताकारकम् ।
लक्ष्मणेनान्वितो वानरैः सेवितोऽगस्त्यसंपूजितो राघवः पातु माम् ।
धेनुकारिष्टकोऽनिष्टकृद्द्वेषिणां केशिहा कंसहृद्वंशिकावादकः ।
पूतनाकोपकः सूरजाखेलनो बालगोपालकः पातु मां सर्वदा ॥६॥
विद्युदुद्योतवान्प्रस्फुरद्वाससं प्रावृडंभोदवत्प्रोल्लसद्विग्रहम् ॥
वन्यया मालया शोभितोरस्थलं लोहितांघ्रिद्वयं वारिजाक्षं भजे ७
कुंचितैः कुंतलैर्भ्राजमानाननं रत्नमौलिं लसत्कुंडलं गंडयोः ।

हारकेयूरकं कंकणमोज्वलं किंकिणी मंजुळश्यामलं तं भजे ॥ ८ ॥
अच्युतः स्त्वाष्टकं यः पठेदिष्टदं प्रेमतः प्रत्यहं पूरुषः सस्पृहम् ।
वृत्ततः सुंदरं कर्तृविश्वंभरं तस्य वश्यो हरिर्जायते सत्वरम् ॥ ९ ॥

याप्रमाणें प्रार्थना करून नमस्कार करून नंतर आचार्यमठांत जाऊन त्याठिकाणीं त्यांनीं मुक्काम केला.

ह्या चातुर्मासांत पाऊस मुळींच पडला नाहीं त्यामुळें छप्पन्न सालाप्रमाणें दुष्काळ पडला होता. ह्या ठिकाणीं आज्ञेप्रमाणें गांडा आईबापांस भेटून नमस्कार करून त्यांची आज्ञा घेऊन आला व श्रीगुरुमूर्तीस भेटला. आणि प्रार्थना करूं लागला.

पद.

आह्मींदेखियलाहो पूर्णानंदकंदविबुधवंद्यगुरु ॥ देखियलाहो ।धृ०।
सदयहृदय अत्रितनय । कलिकृतबहु पाहुनि अनय ॥ सुजनअयनीं अवनींसदय । यतिरूपें प्रगटलाहो ॥ आह्मीं देखियला० ॥ १ ॥ कोटिमदनाविदितवदन । मंदहासित कुंदरदन ॥ अमलकमलदलसुनयन लसितमततमाळगळां हो ॥ आह्मीदेखियला० ॥ २ ॥ भस्मभूषित सकलअंग ॥ दूकुल अरुणसम सुरंग ॥ पदनतअघकरुनिभंग । अर्पि सुखदआत्मकला हो ॥ आह्मींदेखिला० ॥ ३ ॥ श्रीनृसिंहसरस्वति ( वासुदेवानंदयति ) स्तवनिं चकित वेदमती ॥ गंगाधरतनयप्रीतिं ॥ हृत्कमलीं पूजियलाहो० ॥ ४ ॥ आह्मीदेखियला० ॥

याप्रमाणें प्रार्थना करून शिरसाष्टांग नमस्कार घालून हात जोडून उभा राहिला.

**श्रीगुरुमूर्ती**:—कां मातापित्याची आज्ञा घेऊन आलास ?

**गांडा**:—होय गुरुजी. त्यांच्या मरणा नंतर त्यांचें और्ध्वदेहिक करणें, मरण समयीं त्यांच्या सन्निध हजर राहणें व या शरीरानिमित्त एक कन्या आहे त्या कन्येचा विवाह करणें इतकीं कामें माझ्या हातून व्हावीं अशी मातापित्याची मागणी आहे. एवढें साधून त्यांनीं मला परवानगी दिली आहे.

**श्रीगुरुमूर्ती**:-तुझी श्रद्धा असेल तशी कार्यसिद्धि होईल.

शके १८०६ मध्यें जें द्विसाहस्त्रि संस्कृत गुरुचरित्र लिहिलें होतें, त्यावर द्वारकेंत असल्या मुदतींत टीका केली. द्वारका सोडून जाण्याच्या आदल्या दिशीं गांडाची श्रद्धा किती आहे हें पाहाण्यासाठीं श्रीगुरुमूर्तींनीं त्याला आज्ञा केली कीं, बेटांत जाऊन दर्शन करून रविवारीं बोटींत बसून प्रभासास जावें. त्याठिकाणीं बाळंभटजींची मुलगी द्वारकी माझ्या दर्शनानिमित्त रडत आहे तिचें शांतवन करावें. तेथून राजकोटास येऊन आह्मांस भेटावें. तें ऐकून द्वारकेंतील मंडळी श्रीगुरुमूर्तीस ह्मणाली गांडाबुवाला रविवारीं प्रभासास जातां येणें अशक्य आहे. कारण आज शुक्रवार. आजचा दिवस तर येथेंच समाप्त झाला. उद्यां दुपारीं बारा वाजल्यानंतर दोन वाजतां गलबत सुटेल. त्यांत बसल्यास चार वाजतां बेटांत पोंचतां येईल व लगेच उलट गलबतांतून आल्यास रविवारीं दुपारीं दोनवाजतां परत येतां येईल. पुढें येथून राजकोट आठकोस लांब आहे तरी इतका मुक्काम पायीं जाण्यास बरीच रात्र पर्यंत चालावें लागेल. रविवारीं बोट बारावाजतां येथून निघून जाते ह्मणून ती त्याला साधितांयावयाची नाहीं. यंदां दुष्काळ असल्या मुळें रस्त्यांत लुटारूंची भीती फार आहे कारितां याला आतां रात्रीं न पाठवितां सकाळीं जाण्याची आज्ञा करावी. हें मंडळीचें बोलणें ऐकून श्रीगूरुमुर्ती हांसले.

श्रीगुरुमूर्तीच्या आज्ञे प्रमाणें गांडा बुवा त्याच वेळीं द्वारकेंतून निघाले ते मध्यरात्रीच्या सुमारास समूद्रकिनाऱ्यावर येऊन पोहोंचले. त्याठिकाणीं त्यांला सद्गुरुकृपेमुळें जास्तवेळ तिष्ठत बसावें लागलें नाहीं. लगेच एक बेटांत जाणारें गलबत मिळालें. त्यांत बसून ते रात्रीं दोन वाजतां बेटांत जाऊन उतरले. त्या ठिकाणीं तेथील महालकरी नारायणराव यांच्या घरीं त्यांनीं मुक्काम केला. प्रातःकाल होतांच उठून स्नान संध्या व देवदर्शन केलें व तेथील कामगिरी आटपून शनिवारींच दुपारच्या गलबतानें आले आणि रविवारीं सकाळींच द्वारकेंत येऊन दाखल झाले. नंतर बारांची बोट साधून प्रभासास निघून गेले. हें पाहून द्वारकेंतील मंडळी आश्चर्य-

चकीत होऊन गेली व ह्मणूलागली कीं, श्रीगूरुमुर्ती प्रत्यक्ष श्रीकृष्णपरमात्मा च आहेत.

दुसरेदिवशीं गांडाबुवा सोरटीसोमनाथ येथे जाऊन पोहोंचला. त्यानें श्रीसोरटीसोमनाथाचें दर्शन घेतलें. नंतर द्वारकीची समजूत करण्यास गेला. तेव्हां ती जास्त जास्तच रडूं लागली. तेथून प्राचीं, गिरिनार वगैरे ठिकाणीं जाऊन राजकोटास आला व श्रीगूरुमुर्तीला भेटून त्यानें सर्व हकिगत त्यांस निवेदन केली. द्वारकीची समजूत न झाल्यामुळें त्यांनीं तिला प्रभासाहून आपल्या जवळ बोलावून आणविली व सांगितलें कीं, अतःपर रडत जाऊंनकोस. तेव्हां पासून द्वारकीचें मन शांत झालें.

राजकोटाहून निघून वढवाण, विरमगांव इकडील रस्त्यानें श्रीगूरुमुर्ती गांडाबुवाला समागमें घेऊन सिद्धपुर येथें आले. तेथें असणाऱ्या श्रीसरस्वतीच्या मूर्तीला श्रीगूरुमूर्तीनीं नमस्कार करून प्रार्थना केली.

जुषस्व बालवाक्यवत्स्तवं ममाम्ब भारति ॥
असत्सदप्यदस्त्वयि भ्रमाद्विभाति केवले ॥ १ ॥
क्षराक्षरात्परं हि यत्त्वमेव तत्पदं ध्रुवं ॥
जले यथोर्मिबुद्बुदास्तथा त्वयीश जीवदृक् ॥ २ ॥
त्र्यधीश ओंकृतेऽखिलं त्वमेव चास्य मंगलं ॥
यदर्थमात्रसूर्जितं क्रियाविकारवार्जितं ॥ ३ ॥
त्रिसप्तयागसाधिके सुभुक्तिमुक्तिदायके ॥
स्वरार्णकारणे स्तवः स्वयं नु कैः कृतस्तव ॥ ४ ॥
प्रकाशकप्रकाशके श्रुतिश्रुतादिधारके ॥
त्वमेव सर्वकारणं त्वमेव सर्वतारणं ॥ ५ ॥
सुशक्तभक्तभावितं हि येन सर्वथा ततं ॥
तदेव धाम ते वरं यदीक्ष्यते बुधैः पदं ॥ ६ ॥
स्थिराश्चराश्च गोचराः परत्र चात्र वांऽत्र ये ॥
तदत्र तत्समागमः प्रमाणमत्र चागमः ॥ ७ ॥
नमोऽस्तु ते सरस्वति ध्यत्रित्रि वाजिनीवती ॥

प्रसीद बुद्धिचेतने स्वभक्तहृन्निकेतने ॥ ८ ॥
स्तुतैवं विष्णुजिव्हा सा प्रसन्ना सूनृतेरका ॥
प्राहाविष्कृत्य चाऽत्मानं तुष्टाऽस्मि वरयेप्सितं ॥ ९ ॥
सकंबलस्य कुरु मे सहायं शंभुगायने ॥
सुस्वरत्वादि यच्छेति ययाचे हि सरस्वतीं ॥ १० ॥
वागीशाहोभयोरस्तु दिव्यनादरहस्यभुत् ॥
स्तोत्रं चास्तु स्खलद्धीध्वधीजाड्यादिहरं त्विदम् ॥ ११ ॥

याप्रकारें श्रीगुरुमूर्तींनीं श्रीसरस्वतीची स्तुती केली व. हटकेश्वर महादेवाच्या देवालयांत मुक्काम केला. त्याठिकाणीं एक कर्नाटकी ब्राह्मण ब्रह्मचारी यात्रा करीत करित आलेला होता. तो आजारी असल्यामुळें श्रीगूरु मूर्ती ह्मणाले, त्याच्या खाण्यापिण्याची नीट व्यवस्था ठेवा. परंतू कोणाकडूनहीं त्याचा नीट बंदोबस्त झाला नाहीं. तेव्हां शेवटीं ते गांडाबुवास ह्मणाले, ह्या ब्रह्मचाऱ्याची पंधरा दिवस आह्मांला व्यवस्था ठेविली पाहिजे. तें ऐकून गांडाबुवानें त्याची योग्य बडदास्त ठेविली. पंधरावे दिवशीं त्या ब्रह्मचाऱ्याचा देहावसान समय जवळ आलेला पाहून श्रीगुरुमूर्ती त्याच्या जवळ गेले व त्यास ह्मणाले, आतां तुझा प्राण उत्क्रमण होत अहे करितां त ईश्वराचें ध्यान कर.

श्रीगूरुमूर्तींच्या आज्ञे प्रमाणें त्या ब्रह्मचाऱ्यानें सावध होऊन ईश्वर नामाचा उच्चार करून प्राणोत्क्रमण केलें. या प्रकारानें त्या ब्रह्मचाऱ्याला श्रीगुरुमूर्तीनीं मुक्तीचा लाभ करून दिला.

श्रीगुरुमूर्ती सिद्धपुराहून डाकूरयेथें गेले व तेथून शिनोरगांवीं आले. नंतर तेथून तिलकवाड्यास जाऊन त्याठिकाणीं गांडाबुवाबरोबर कांहीं दिवस राहिले. त्या सालीं जिकडे तिकडे दुष्काळ असून कॉलऱ्याचा उपद्रव सुरुहोता व त्या योगें पुष्कळ माणसें मृत्यु मुखीं पडत होतीं. त्यांत ज्यांनीं ज्यानीं श्रद्धापूर्वक श्रीगुरुमूर्तींचें दर्शन घेतलें होतें त्यांना त्यांना अनायासें अंतकाळी श्रीगूरुमूर्तीचें दर्शन होत होतें व त्यामुळें श्रीगूरुमूर्ती प्रत्यक्ष श्रीकाशीविश्वेश्वरच मूर्तिमंत होत असें वाटूं लागलें.

तिलकवाडा येथें कवार्डादादा यानांवाचा एक गृहस्थ होता. त्याचा मुलगा विनायक हा परिक्षेंत नापास झाला होता, त्यामुळें त्याला कोठेंच नोकरी मिळेना. ही हकिगत त्यानें श्रीगुरुमूर्तीस कळविली. त्यांनीं त्याला एक अनुष्ठान सांगितलें. तें त्यानें केल्यावर लगेच पंचमहालच्या कलेक्टर साहेबांनीं त्याला बोलावून नेलें व त्याच्या बापाची जागा त्यास दिली, हें पाहून सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें.

श्रीगुरुमूर्ति तिलकवाड्याहून निघाले ते चिखलदा गांवीं आले. त्यासालीं चातुर्मास त्यांनीं चिखलदा गांवीं केला. त्या मुदतींत कर्नाटकांतील आप्पा ह्या नांवाचा एक गृहस्थ त्या ठिकाणीं त्यांला शरण येऊन ह्मणाला, ' मला अनाथाला पदरांत घ्या. ' तो पूर्वी सर्वे खात्यांत नोकर होता. त्यावर सरकारी कामासंबंधानें कांहीं आरोप आल्यामुळें तो घर सोडून, वेषांतर करून व आपलें खरें नांव लपवून गुजराथेंत आला. प्रारब्ध वशात् ह्या ठिकाणीं त्याला श्रीगुरुमूर्तींची गांठ पडली.

चिखलद्याहून निघून श्रीगुरुमूर्ती मंडळेश्वरीं आले. तेथें त्यांस दृष्टांत झाला कीं, उज्जनीस आपले सद्गुरु श्रीनारायण स्वामी आजारी आहेत. त्यामुळें ते तेथून निघून इंदूर मार्गें उज्जनीस आले. आणि श्रीगुरूस औषधोपचार करून त्यांची प्रकृती सुधारिली. नंतर तेथून निघून महत्तपुरास आले व त्याठिकाणीं चातुर्मास केला. ह्या ठिकाणीं असतांना श्रीगुरुमूर्तींनीं श्रीदत्तमहाराजांच्या आज्ञेवरून प्राकृत भाषेमध्यें श्रीदत्तमहात्म्य व संस्कृत भाषेमध्यें श्रीदत्तपुराण हे ग्रंथ लिहिले. हे ग्रंथ फार उत्कृष्ट आहेत.

गुणाछावणींतील डाक्टर विश्वनाथ नारायण ताटके यांच्या पायास हाड्यावण होऊन पाय सडला होता. अनेक डाक्टरांचीं व वैद्यांचीं औषधें घेतलीं परंतु कांहीं तो बरा होईना. शेवटीं पाय कापून टाकण्या विषयीं डाक्टरांनीं आपला अभिप्राय दिला. पुढें आपला पाय श्रीगुरुमूर्तीस दाखवावा असा विचार करून तो महत्पुरास आला. श्रीगुरुमूर्तीस पाय दाखवून सर्व हकिगत सांगून तो बरा होण्याचा उपाय सांगण्याविषयीं प्रार्थना केली. त्यांनीं त्याला अनुष्ठान सांगून पोटीस बांधावयास सांगितलें. पुढें लवकरच ह्या उपायांनीं पाय साफ बरा झाला. तें

पाहून मोठमोठे डाक्टर आश्चर्य चकीत झाले.

महत्पूर सोडून पुढें निघून जाण्या विषयीं श्रीदत्तमहाराजांची आज्ञा झाली असतां श्रीगुरुमूर्ती तें सोडून गेले नाहींत म्हणून त्या रात्रीं त्यांला सर्प दंश झाला. ही लीला पाहून श्रीगुरुमूर्ती हसूंलागले. महत्पूर सोडी. पर्यंत त्या सर्पाचें वीष कांहीं उतरलें नाहीं. दहावे दिवशीं ते महत्पूर सोडून निघतांच तें वीष आपोआपउतरलें. तेथून ते अलोटास जाऊन सारंगपुरास आले.

महत्पुराहून गांडाबुवाला खेचरीमुद्रा शिकविण्याकरितां जिव्हा छेदन करविण्यासाठीं गुणाछावणीस वरील ताटके डाक्टरकडे पाठविलें. तें काम संपण्याचे सुमारास व्यंकटराव व आप्पा गुणाछावणींत आले. मागाहून गुरुमूर्ती तेथें आले व त्यांनीं त्या तिघांसही आतां तुम्ही हवामानेल तेथें राहून अभ्यास करा असें सांगितलें व गंगातीरीं आमच्या जवळ येऊं नये, असें बजाविलें.

अशी आज्ञा होतांच गांडाबुवा भडोच येथें आले. व्यंकटराव व आप्पा श्रीगुरुमूर्तीचें वचन उल्लंघन करून गंगातीरीं ब्रह्मावर्ती आले त्यामुळें आप्पा वाटेंत आजारी झाले. हा आतां वांचणार नाहीं असें जाणून श्रीगुरुमूर्तींनीं त्यास आतुरसंन्यास घेण्यास सांगितलें. त्यांच्या आज्ञेनुसार त्यानें संन्यास घेतला. नंतर त्याचा देहावसान समय जवळ येतांच पद्मासन घालून प्रणव करून प्राणोत्क्रमण करविलें. याप्रमाणें त्याला श्रीगुरुमूर्तींनीं क्रममुक्ति दिली. व्यंकटरावास रक्ताची हगवण सुरु झाल्यामुळें ताबडतोब निघून नर्मदा किनारीं जाण्यास आज्ञा केली.

ब्रह्मावर्तास आपा खाडीलकर या नांवाचा एक ब्राह्मण राहात असे. त्याला रक्तीहगवण सुरु झाली. त्यावेळीं त्याच्या आईला कोणीं उपाय सांगितला कीं, पंचपक्वान्नाचा स्वयंपाक करून, तो उतार तूं आपल्या मुलावरून उतरून कोणालातरी खाऊं घाल. म्हणजे तुझा मुलगा बरा होईल. आपाच्या आईनें याप्रमाणें स्वयंपाक करून मुलावरून उतरून तो उतारा व्यंकटरावाला भिक्षेला बोलावून खाऊं घातला. त्यायोगें तो मुलगा बरा झाला व त्या दिवसापासून व्यंकटरावाला रक्त पडूं लागलें व त्यामुळें तो दिवसेंदिवस अशक्त होत चालला.

**श्रीगुरुमूर्ती**:—व्यंकटराव ! तुला कोणी उतार खाऊं घातल्यामुळें तुझी ही स्थिती झाली आहे.

हा रोग बरा होण्यासाठीं व्यंकटरावानें अनेक उपाय केले. परंतु कांही उपयोग झाला नाहीं. उलट पुढें त्यास दम्याची व्यथा जडली व त्यांतच शेवटीं त्याचें देहावसान झालें.

अन्नामध्यें अशा प्रकारचे अनेक दोष असतात. ह्मणून फार संभाळून शुद्ध अन्न सेवन करीत असावें व सद्गुरुचें वचन उल्लंघन करूं नये.

ब्रह्मावर्तांत सुभेदारसाहेबांच्या येथें साधुसंतांस नित्य सदावर्त देण्यांत येत असे. एके दिवशीं पांच चार बैरागी त्या ठिकाणी सदावर्त घेण्यास आले. अन्न घेऊन जातांना त्यांनीं विचारल्यावांचून थोडीं जळाऊ लांकडें बरोबर नेलीं. त्या कारितां सुभेदारसाहेबांनीं त्यांला माजिस्ट्रेटकडे पाठवून कैदेची शिक्षा देवविली. त्यावेळीं त्यांतले कांहींजण बैरागी सुभेदाराजवळ येऊन चिमटे ठोकून त्यांस ह्मणाले, हे दुष्टा ! तूं ब्राह्मण असून आपल्या जातीची लाज बाळगिली नाहींस. याकारितां ईश्वर तुझे हाल हाल करील, याप्रमाणें बोलून ते लोक चालते झाले. त्या नंतर त्या सुभेदारावर अनेक संकटें येऊं लागलीं. थोड्याच दिवसांत त्यांचे वडील बंधु मरण पावले. त्यानंतर एके दिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास सुभेदाराच्या घरांतून एक स्त्री रडत रडत गंगाकिनारीं गेली. तें ऐकून श्रीगुरुमूर्तींनीं विचार केला कीं, ह्या सुभेदाराच्या घरांतून रुदन करीत अशा रात्रीं कोण बरें निघून गेलें असावें ? अंतर्ज्ञानानें पाहतां त्यांस समजलें कीं, ही प्रत्यक्ष लक्ष्मीच होय.

दुसऱ्या दिवशीं सुभेदाराचा पुतण्या माधराव श्रीगुरुमूर्तीजवळ आला त्यावेळीं ते त्यास ह्मणाले, माधवराव ! काल रात्रीं तुझ्या घरांतून लक्ष्मी रडत रडत निघून गेली. यासाठीं यापुढें तुह्मीं फार सावधगिरीनें वागावें.

इतक्यांत् गांवात प्लेग सुरु होईल असें श्रीगुरुमूर्तीला कळल्या वरून त्यामीं गांवांतील सर्व लोकांस बोलावून सांगितलें कीं, “ अरे बाबांनो; लवकरच तुमच्या गांवांत प्लेग सुरू होणार आहे, आणि तो प्रथम अमक्या-

च्या घरांत प्रवेश करणार आहे, याकरितां तुम्ही बाळगोपाळांस घेऊन गांव सोडून निघून जावें " हें ऐकून सर्वलोक गांव सोडून निघून गेले. माधवराव मात्र गांव सोडून न जातां नेहमीं प्रमाणें घरांत येऊन झोंपूं लाग ला त्यामुळें तो प्लेगाला बळी पडला. त्याची बायको व चुलती निपुत्रीक असतांही त्यांनीं आपला स्थावर जंगम मिळकतींतील भाग मिळावा ह्मणून दावा केला, त्यांत खर्चभरीत होऊन सुभेदारसाहेब फारच विपन्नावस्थेंत येऊन पडले. ईश्वरीनियमच असा आहे कीं, जोंपर्यंत कुटुंबांत एकोपा नांदत असतो तोंपर्यंतच त्याघराची ऊर्जितावस्था असते. आपसांत कलह सुरू होतांच एकदम अवनती त्या घरांत जोरानें शिरकाव करूं लागते. त्याप्रमाणेंच सुभेदारास साधुपुरुषाचा शाप झाल्या बरोबर त्याच्या घरांत कलह उत्पन्न होऊन लक्ष्मीचा नाश झाला. याकरितां साधुसंतांला कोणीही उपसर्ग देऊं नये. त्याच प्रमाणें गांवांत, घरांत, वारसांत तंटे बखेडे माजुं देऊं नयेत.

कोंकणांतील रत्नागिरी जिल्ह्यापैकीं पालघर या गांवचा विष्णुबुवा नावाचा एक ब्राह्मण, त्याची बायको मयत झाल्या मुळें संसारसुखास त्रासून स्मशान वैराग्य युक्त होऊन, घरदार टाकून भटकत या गांवीं आला होता; तेथें एक तरूण-सुस्वरूप स्त्री त्याच्या नजरेंत भरल्यामुळें तो कांम व्यास झाला व त्यानें डोळ्यांसच शिक्षा करण्याचें ठरविलें आणि रुईचा चीक दोन्ही डोळ्यांत घातला. ही हकीगत श्रीगुरुमूर्तीस समजली. त्यांनीं त्याला बोलावून डाक्टर कडून त्याचे डोळे स्वच्छ धुववून, योग्य औषधोपचार करवून ते बरे केले. त्यानें पंढरपूर येथें एका गृहस्थाशीं भांडण पासून व त्याकरितां आपली जिव्हा कापून टाकिली. इतकें करूनही त्या घालवावा द्मिनोविकार नष्ट करितां आले नाहींत, व त्यामुळें शांतीचा त्याटावर धर्म वितां आला नाहीं. तात्पर्य जोंपर्यंत मनुष्याला आपलें मन आलांसहवर्तमान त ठेवितां आलें नाहीं तों पर्यंत त्यानें आपल्या इंद्रियांस वान्दीक्षीत भिक्षा ची शिक्षा केली तरी त्यापासून कांहींच उपयोग होणार नाहूं लागले. ती

याच ठिकाणी व्यंकटेश या नांवाचा एक ब्रह्मचारप्रमाणें सहा महिने यात्रा करीत करीत आला होता. त्यानें श्रीगुरुमूर्तीजवळ परायणवृत्ती पाहून

असणारी श्रीदत्तमूर्ती त्यांच्या इच्छे विरुद्ध घेऊन तो तिची पूजा करूं लाग ला. त्यामुळें तो मरण पावला. श्रीगुरुमुर्तींचें असें ह्मणणें होतें कीं, ह्या सर्व मूर्ती ज्याघरीं जातील त्या घराचा सर्व प्रकारें नाश होईल, कारण देवाची इच्छा नसतां मंडळी त्याला नेऊं पाहाते. सारांश सिद्धपुरुषाचे इच्छे विरुद्ध जे लोक आचरण करितात त्यांला नेहमीं अनिष्ट फलाचीच प्राप्ती होते.

यावेळीं श्रीगुरुमूर्तींचे पूर्वाश्रमींचे बंधू सीतारामबुवा ब्रह्मावर्तीं आले, आणि त्यांनी त्या ठिकाणी राहून गायत्रीपुरश्चरण केलें.

पुढें श्रीदत्ताची आज्ञा झाल्या वरून श्रीगुरुमूर्ती ब्रह्मवर्ताहून निघून श्रीनरसोबाचे वाडीस आले व त्यांनीं श्रीदत्तमहाराजांची प्रार्थना केली.

## पद.

**नमो ब्रह्मदेवा नमो वासुदेवा॰॥ नमो वामदेवा। सुभावा ॥ धृ० ॥**
**शिष्टजनरंना दुष्टजनभंजना ॥ दुःखभयतर्जना। शोकशमना ॥ १ ॥**
**हीनजनमाधवा। दीनजनबांधवा ॥ तारिं मज केशवा। वारि भावा २**
**दैत्यजनतापना। पतितजनपावना ॥ अहितजनदाहना। कोपदहना ३**
**तापशमना भवा। पापदमना शिवा ॥ तव पदीं ह्या जिवा। दे वि-**
**सावा ॥ ४ ॥ नमो० ॥**

याप्रमाणें प्रार्थनापूर्वक श्रीदत्तपादुकांस साष्टांग नमस्कार करून श्रीगुरुमूर्तींनीं ब्रह्मानंदस्वामीचे मठांत येऊन मुक्काम केला. वाडींतील सर्व पुजारी
गेलेकांस आमंत्रण करून त्यांला त्यानीं सांगितलें कीं, तुम्ही हल्ली आपल्या
होय. गेलांप्रमाणें मनोभावें नम्रतापूर्वक श्रीदत्तमहाराजांची सेवा करित
दुसण्णून देव तुमच्यावर कोपायमान झाला असून त्या बद्दल तुम्हा·
आला त्यावेळ करणार आहे. आणि यासाठींच मला वाडींत यावयाची आज्ञा
क्ष्मी रडत रड

यागावें. ते:—स्वामीमहाराज! आपण आह्मांला ज्याप्रमाणें वागण्या
इतक्यांत रवून घाल त्याप्रमाणें आह्मी या पुढें वर्तन ठेवूं.
न त्यानीं गांवांतील चें ह्मणणें ऐकून श्रीगुरुमूर्तींनीं त्यांला नियम ठरवून
लवकरच तुमच्या गा हाराम वामन यांस पसंत पडले नाहींत. ते देवाच्या

पादुकांसमोरच श्रीगुरुमूर्तीची निंदा करूं लागले. त्यावेळीं त्यांस कोणी प्रतिबंध केला नाहीं. सर्वजण मुकाट्यानें निघून आपआपले घरीं गेले.

## श्री० प० नृसिंहानंदसरस्वतींचें वृत्त

श्रीनरसोबाच्यावाडींत वास्तव्य करून राहाणारे नारायण दीक्षीत यानावाचे एक गृहस्थ श्रीगुरुमूर्ती पूर्वाश्रमामध्यें वाडींत राहत, त्यावेळीं त्यांच्याजवळ ज्योतिषादि शास्त्रांचें अध्ययन करीत होते. त्यापूर्वी त्यांचें इंग्रजी शिक्षणही सरकारी शाळेंत झालें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचें लग्न झालें. त्यांला एक पुत्र व कन्या अशीं दोन अपत्यें झाल्यानंतर त्यांच्या मनांत आलें कीं, आपण आजपर्यंत केवळ यावनीवृत्तींतच आयुष्य घालविलें व त्यामुळें त्याचा व्यर्थ व्यय झाला. यापेक्षां ब्राह्मण धर्माच्या मुख्य भिक्षा वृत्तीचेंच अवलंब करून उदर निर्वाह करावा. आणि ईश्वरभजनांत काळ घालवून या जन्माचें सार्थक करावें हेंच उत्तम. हे विचार मनांत येतांच त्यांनीं श्रीगुरुमूर्तीला ब्रह्मवर्त मुक्कामीं आपला निश्चय पत्रद्वारें कळविला. त्यांस "आपला विचार फार उत्तम आहे. परंतु ही गोष्ट तुमच्या आप्तवर्गास पसंत पडणार नाहीं. ते ही भिक्षा वृत्ती पाहून निंदा करूं लागतील. करितां जर अशा लोकांची निंदा सहन करण्याचें सामर्थ्य तुमच्या आंगी असेल तर आपण ही वृत्ती आनंदानें पत्करावी. आरंभीं सहा महिने पर्यंत उपाधि सोसावी लागेल. पुढें ईश्वरी भजनाच्या प्रतापानें सर्व क्लेश क्रमाक्रमानें निवारण होतील. एकवर्षानंतर तेच आपले आप्तवर्ग आपली प्रशंसा करूं लागतील." अशा प्रकारचें श्रीगुरुमूर्तीचें उत्तर आलें. तें वाचून पाहिल्यावर दीक्षीत आपल्या पत्नीस ह्मणाले, हे प्रिये! आज पासून भिक्षा मागून उदर निर्वाह करावा व ईश्वर चिंतनांत काळ घालवावा असा मीं विचार ठरविला आहे व त्या कारितां घर सोडून घाटावर धर्मशाळेंत राहावयास जातों. हें ऐकून ती पतिव्रतासुद्धां मुलांसहवर्तमान संतोषानें त्यांच्या बरोबर धर्मशाळेंत येऊन राहिली. पुढें दीक्षीत भिक्षा मागूं लागले. तें पाहून सर्व लोक त्यांच्यासमक्ष निंदा करूं लागले. ती ऐकून दीक्षीतांस राग न येतां ते उलट हांसुं लागले. याप्रमाणें सहा महिने अनुभव घेतल्यावर कांहीं कांहीं लोक त्यांची ईश्वरभक्ति परायणवृत्ती पाहून

संतोष प्रदर्शित करूं लागले. एकावर्षानंतर आप्तवर्गासह सर्व लोकांस त्यांचें केवळ परमार्थपरावर्तन व सदा समाधान वृती पाहून आदर उत्पन्न झाला. कांहीं दिवसांनीं त्यांची पत्नी व पुत्र मरण पावलीं. त्यायोगें त्यांला दुःख न होतां उलट ईश्वरभजनाच्या मार्गांत असलेली उपाधि निवृत्त झाली ह्मणून कांहीं सें समाधानच वाटलें व ते सपाट्यानें भजन वाढवूं लागले. अशा वेळीं त्यांला अध्यात्म संबंधी प्राणांतीक व्याधि उत्पन्न झाली. त्यांतच त्यांचा अंत होऊन क्रम संन्यास घेण्याचा त्यांचा मनातील विचार जागच्या जागीं नष्ट होतो कीं काय असें पुष्कळांस वाटूं लागलें व ते त्यांला आतुर संन्यास द्याचा असें बोलूं लागले. त्यावरून सर्व ग्रामस्थ महाजनांनीं त्यांला आतुर संन्यास दिला. पुढें त्यांचीं प्रकृती सुधरत जाऊन ते पूर्णपणें बरे झाले. पुढें यथाविधिक्रम संन्यास पूर्ण करण्याच्या उद्देशानें ते श्रीगुरुमूर्तीचा शोध करीत निघाले, तेव्हां हुसंगाबाद येथें त्यांला येऊन भेटले. त्यांनीं आपली सर्व हाकिगत श्रीगुरुमूर्तीस निवेदन केली. श्रीनीं त्यांस वाडीस जाण्यास सांगितल्यावरून ते पुनः श्रीनरसोबाच्या वाडीस आले. पुढें थोड्या दिवसांनीं श्रीगुरुमूर्ती वाडीस आले त्यावेळीं दीक्षीत ह्यांनीं आपणास दंड देण्याविषयीं त्यांची पूर्ववत् प्रार्थना केली. परंतु त्यास दंड देत नाहीं असें श्रीगुरुमूर्तीनीं सांगितलें. त्यावरून तो रुदन करूं लागला. आणि प्रार्थना करून हात जोडून विनंती करूं लागला कीं, हे भगवंता! आपण मला बाल्यावस्थेंत विद्याभ्यास शिकवून सन्मार्गास लाविलें आहे तरी आतां शेवटपर्यंत माझी काळजी अपाणासच आहे. आपण मला दंड दिला नाहीं तर मी तसाच राहीन पण दुसऱ्यापासून दंड घेणार नाहीं. शेवटीं श्रीदत्त महाराजांच्या आज्ञेवरून श्रीगुरुमूर्तीनीं नारायण दीक्षीत यांस दंड दिला व त्यांचे नांव नृसिंहसरस्वती असें ठेविलें आहे व त्यांस आज्ञा केली कीं तुह्मीं वाडींतच राहून श्रीदत्ताचा उत्सव व मूर्तीची पूजा करीत जा. त्याप्रमाणें आज पावेतों ते वागत आहेत. ते अधिकारानें श्रीगुरुमूर्तीसारखेच गुण संपन्न आहेत. त्यांच्या आंगीं चंद्रासारखी शांती पूर्णपणें वसत आहे. त्यांला क्रोध कसा तो मुळींच माहित नाहीं. त्यांचे वदनसंपुट नेहमीं कमलाप्रमाणें प्रफुल्लीत असतें. ते भिक्षा मागून उदर निर्वाह करितात. श्रीदत्त

प्रसाद व सद्गुरु कृपा झाल्यामुळें ते हल्लीं कवि झाले आहेत. त्यांला वचन सिद्धि प्राप्त झाली असून आपले सर्व सद्गूण लपवून नेहमीं आनंद वृत्तीनें राहतात. हें दर्शनमात्रेंकरून पतितास पावन करणारे आहेत. ज्याला दर्शनाची इच्छा असेल त्यांनीं श्रीनरसोबाच्यावाडीस जाऊन त्यांचे दर्शन घेऊन आपली खात्री करून घ्यावी.

ते वाडींत राहून पुजाऱ्यांच्या मुलांस कर्मकांड शिकवितात. व आपला वेळ आनंदांत घालवितात. या जागीं श्रीदत्त भगवानाच्या आज्ञेवरून श्रीगुरुमूर्तींनीं आपला फोटो घेऊं दिला.

कोंठागुलद येथें राहणारा तात्यासाहेब या नांवाचा एक गृहस्थ आपल्या बायकोला बरोबर घेऊन श्रीगुरुमूर्तींच्या दर्शनासाठीं श्रीनरसोबाच्या वाडीस आला व त्यांला साष्टांग प्रणाम करून ह्मणाला, महाराज! आपल्या सांगण्यावरून मी या स्त्रीबरोबर लग्न केलें होतें. हिच्या वयाला आतां बेचाळीस वर्षें झालीं तरी हिच्या पोटीं संतति झाली नाहीं. असें ह्मणून त्यानें आपली जन्मपत्रिका श्रींस दाखविली. ती पाहून श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, ही स्त्री वंध्या असल्यामुळें हिला संतति होत नाहीं. तें ऐकून तात्यासाहेब ह्मणाले, आपणच अशा प्रकारची वंध्या स्त्री पाहून मला दिलीत. त्यावर श्रीगुरुमूर्ती हांसले. नंतर त्यांनीं तात्यासाहेबांस अनुष्ठान सांगितलें व नारळाचा प्रसाद दिला. तो घेऊन ते आपल्या घरीं जावयास निघाले. वाटेंत बाजार लागला व तेथें श्रीगुरुमूर्तींचा फोटो विकत मिळतो असें समजल्यावरून त्यांनीं उपाध्याला पाठवून फोटो आणविला. तो पाहून तात्यासाहेबांच्या मनांत कांहीं संशय आल्यावरून त्यांनीं तो फोटो बदलून दुसरा आणायास सांगितलें व तो घेऊन घरीं गेले. त्या रात्रीं त्या नवऱ्याबायकोला दृष्टांत झाला कीं, माझें स्वरूप तुह्मांला पसंत पडलें नाहीं. यासाठीं मीं दिलेला प्रसाद परत द्या. असें सांगून प्रसादाचे दिलेले दोन्ही नारळ स्वप्नांत परत घेतले. तें पाहून त्या उभय स्त्रीपुरुषांस फार खेद झाला.

सकाळीं उठल्याबरोबर तात्यासाहेबांनीं बदलण्यासाठीं दिलेला फोटो पुनः मागविला. आणि तो घेऊन तीं दोघें जणें श्रीगुरुमूर्तींजवळ आलीं व अपराधाची क्षमा मागून झालेला दृष्टांत व सर्व हकिगत त्यांनीं श्रींस सांगि-

तली व अपराधांची क्षमा होऊन पुनः प्रसाद मिळावा अशी हात जोडून प्रार्थना केली. त्या उभयतां पति–पत्नीची श्रद्धा पाहून श्रीगुरुमूर्तीस दया आली आणि त्यांनीं पुनः प्रसाद दिला. त्यांचे कृपेनें त्या बाईस वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी एक पुत्र व एक कन्या अशीं संतती झाली. हें पाहून सर्व मंडळींस आश्चर्य वाटलें.

पुढें श्रीदत्ताज्ञेवरून श्रीगुरुमूर्ती श्रीनरसोबाच्या वाडीहून निघून गाणगापुरास आले. गाणगापुरचे मठांत त्यांस श्रीदत्तदर्शन झालें नाहीं ह्मणून ते संगमावर गेले. आणि ध्यान धरून उभे राहिले. त्याठिकाणीं लगेच भगवंताचें दर्शन झालें. त्यावेळीं ते साष्टांग नमस्कार करून हात जोडून ह्मणाले, हे भगवान्! आपली प्रतिज्ञा अशी आहे कीं, गागणापूरचा मठ सोडून मी जाणार नाहीं. श्रद्धावान असेल त्यास मठामध्यें दर्शन होईल. पण तसें आज दिसून आलें नाहीं ?

**श्रीदत्तमहाराजः**—गाणगापुरांत हल्लीं अनाचार फार वाढला आहे एवढ्यामुळें मी कंटाळून गांव सोडून संगमावर येऊन राहिलों आहें. या कारणामुळें तुह्मांस मठांत माझें दर्शन झालें नाहीं व तुह्मीही गाणगापुरांत राहू नये.

असें सांगून श्रीदत्तभगवान अंतर्धान पावले. नंतर श्रीगुरुमूर्तींनीं गाणगापूर सोडून कयाधूनदीचे तीरीं नरसी गावीं चातुर्मास केला.

श्रीनरसोबाचीवाडी सोडून श्रीगुरुमूर्ती निघून गेल्यावर श्रीदत्ताची उत्साहमूर्ती प्रदक्षिणेस पालखी फिरतेवेळीं पालखीतून माणसांच्या गर्दीमध्यें एकाएकीं निसटून खालीं जमिनीवर पडली. हें पाहून पुजारीलोक फार घाबरले व गुरुमूर्तीचा तपास करीत नरसीगावामध्यें आले व त्यांनीं सर्व वर्तमान त्यांस सांगितलें. श्रीगुरुमूर्तींनीं श्रीदत्तभगवानाचें स्मरण करून, पालखींतून निघण्याचें कारण विचारूं लागले. त्यावेळची श्रीदत्तभगवानाची क्रोधयुक्त मुद्रा पाहून श्रीगुरुमूर्ती देवाची प्रार्थना करूं लागले.

**करुणात्रिपदी.** पद. १ लें.

**शांत हो श्रीगुरुदत्ता। मम चित्ता शमवीं आतां॥ शांत०॥धृ०॥**
**तूं केवळ माता जनिता। सर्वथा तूं हितकर्ता॥ तूं आप्त स्वजन**

भ्राता । सर्वथा तूंचि त्राता ॥ चाल ॥ भयकर्ता तूं भयहर्ता । दंड-धर्ता तूं परिपाता ॥ तुजवांचुनि न दुजी वार्ता । तूं आर्ता आश्रय दत्ता ॥ शांत० ॥ १ ॥ अपराधास्तव गुरुनाथा ॥ जरि दंडा धरिसि यथार्था ॥ तरि आह्मी गाउनि गाथा । तव चरणीं नमवूं माथा ॥ चाल ॥ तूं तथापि दंडिसि देवा । कोणाचा मग करूं धावा ॥ सोडविता दुसरा तेव्हां । कोण दत्ता आह्मां त्राता ॥ शांत० ॥ २ ॥ तूं नटसा होउनि कोपी । दंडितां हि आह्मी पापी ॥ पुनरपि हि चुकतां तथापी ॥ आह्मावरि न च संतापी ॥ चाल ॥ गच्छतः स्खलनं क्वापि । असें मानुनी नच हो कोपी ॥ निजकृपा लेशा-ओपी ॥ आह्मावरि तूं भगवंता ॥ शांत० ॥ ३ ॥ सहकुटुंबसहपरिवार । दास आह्मी हें घरदार ॥ तव पदीं अर्पूं असार । संसारा हित हा भार ॥ चाल ॥ परिहरिसी करुणासिंधो । तूं दीनानाथ सुबंधो ॥ आह्मां अघलेश न बाधो । वासुदेव प्रार्थित दत्ता ॥ शांत० ॥ ४ ॥

पद २ रें.

श्रीगुरुदत्ता जयभगवंता ॥ तें मन निष्ठुर न करी आतां ॥ धृ० ॥ चोरें द्विजासि मारितां मन जें । कळकळलें तें कळकळो आतां १ श्रीगुरु० ॥ पोटशुळानें द्विजतडफडतां । कळवळलें तें कळवळो आतां ॥ २ ॥ द्विजसुतमरतां वळलें तें मन । हो किं उदासिन न वळे आतां ॥ ३ ॥ सति पति मरतां काकुळती येतां । वळलें तें मन वळे कीं आतां ॥ ४ ॥ श्रीगुरुदत्ता त्यजिं निष्ठुरता ॥ कोमल चित्तावळवीं आतां ॥ ५ ॥ श्रीगुरु० ॥ ॥

पद ३ रें.

जय करुणाघन निजजन जीवन ॥ अनुसूया नंदन पाहि जनार्दन ॥ धृ० ॥ निजअपराधें उपराठि दृष्टी ॥ होउनि पोटीं भय धरुं पावन ॥ जय ॥ १ ॥ तूं करुणाकर कधिं आह्मांवर ॥ रुससि न किंकर वरद कृपाघन ॥ जय० ॥ २ ॥ वारीं अपराध तूं मायबाप ॥

**तव मनिं कोपलेश न वा मन ॥ जय० ॥ ३ ॥ वालक अपराधा गाणि जरि माता ॥ तरी कोण त्राता देइल जीवन ॥ जय० ॥ ४ ॥ प्रार्थि वासुदेव पदिं ठेवि भाव ॥ पदिं देवो ठाव देव अत्रिनंदन ॥ ॥ जय० ॥ ५ ॥**

याप्रमाणें प्रार्थना ऐकून क्रोधयुक्त मुद्रा शांत करून सौम्य स्वरूपानें श्रीदत्तभगवान् ह्मणाले," नरसोबाचे वाडींतील पुजारी तुह्मी ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणें वागत नाहींत इतकेंच नव्हे, तर माझ्या पादुकांवर अशुद्ध पदार्थ वाहून उलट तुमची निंदा करितात; यासाठीं त्यांला शासन झालें पाहिजे. " असें सांगून श्रीदत्तभगवान गुप्त झाले.

**श्रीगुरुमूर्ती:**– हे पुजाऱ्यांनो ! तुमच्यावर श्रीदत्तमहाराजांचा रोप झाला आहे. तुह्मी मी घालून दिलेल्यां नियमांचें उल्लंघन करून, वाटेल त्या प्रमाणें वर्तन- करूं लागल्यामुळेंच उत्सवमूर्ती पालखींतून खालीं उतरली. यासाठीं जर तुह्मी दुर्वर्तन सोडून योग्य प्रकारें श्रीदत्तसेवा कराल तर चांगलें. नाहींतर तुह्मीं जाणा कीं, तुमचा देव जाणो. श्रीदत्तात्रयाची झाल्या अपराधाबद्दल क्षमा मागून या करुणात्रिपदीनें दररोज प्रार्थना करीत जावी, व **दिगंबरा दिगंबरा । श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥** या नाममंत्रेंकरून दररोज एकसारखें भजन चालू ठेवावें ह्मणजे विघ्न येणार नाहीं.

श्रीगुरुमूर्तीची आज्ञा घेऊन पूजारी श्रीनरसोबाच्यावाडीस परत आले. आणि सद्भावानें त्यांच्या आज्ञेप्रमाणें भजन सुरू ठेविलें. मात्र दुर्गुणी लोकांनीं आपले दुर्गुण टाकिले नाहींत. वरील करुणात्रिपदीनें जे कोणीं नेहमी श्रीदत्ताची प्रार्थना करितील त्यांचेवर आलेलीं सर्व संकटें निरसन होतील व त्यांजवर श्रीदत्तमहाराजांची कृपा होईल.

चातुर्मास संपल्यावर श्रीगुरुमूर्ती नरसीहून निघून ब्रह्मावर्तास गेले. तेथें श्रीदत्तभगवानांनीं सांगितलें कीं, याठिकाणीं गंगातीरावर एक सत्पुरुष आले आहेत. श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, आपली आज्ञा होईल तर मी त्यांच्या दर्शनास जाईन. श्रीदत्तमहाराज ह्मणाले, उदयीक तेच तुह्मांस भेटण्यासाठीं येथें येतील. दुसऱ्या दिवशीं भाष्य चाललें असतां तो सत्पुरुष श्रीगुरुमूर्तींचा शोध करीत त्याठिकाणीं आला. त्यांनीं त्याला सन्मान पूर्वक

आसनावर बसविलें. ते दिगंवर वेषधारी असून त्यांला स्थूल शरीर व खाण्यापिण्याचे पदार्थ यांचें मुळींच भान नव्हतें. ते सदा सर्वकाळ समाधिस्थ असत. तसेंच ते कोणाबरोबर बोलतही नसत: हे श्रीगुरुमूर्तीजवळ थोडावेळ बसून गंगाकिनारीं चालते झाले. त्यांचें कोणत्याही प्रकारचें संभाषण झालें नाहीं.

अशाच प्रकारचे दुसरे एक साधु पुरुष मियाना येथील कमाविसदार यांचे घरीं आहेत. तेही कोणाबरोबर भाषण करीत नाहींत. ते प्रथम जंगलांत फिरत होते. त्याठिकाणीं त्यास कमाविसदारांची गांठ पडली. त्यांनीं अत्याग्रहानें त्यांस आपले घरीं राहावयास आणिलें व त्यावेळेपासून ते त्यांच्या घरीं आहेत.

ब्रह्मावर्ती कुशावा नांवाचा एक सत्पात्र ब्राह्मण राहात असे. पूर्व संचितानुसार त्याचा एक हात सडून गेला होता. त्यामुळें त्याला फार दु:ख होत होतें. एके दिवशीं त्याच्या घरीं श्रीगुरुमूर्ती भिक्षेसाठीं गेले. त्यांला पाहून तो ब्राह्मण रडूं लागला, त्याला शांत करून श्रीगुरुमूर्तींनीं सांगितलें, तुमचें शरीर लवकरच पडेल. याकारितां तुह्मीं श्रीदत्तात्रयाचें स्मरण करा.

त्याच रात्रीं कुशाबाला दृष्टांत झाला कीं, मागील जन्मीं तूं गोविंद भट यांचे कडून कर्ज काढिलें होतें. त्यापैकीं पस्तीस रुपये देणें बाकी राहिले आहेत ते तूं त्याला दिल्यानंतर तुझें शरीर सुटून जाईल व तूं ह्या दु:खातून मुक्त होशील.

दुसऱ्या दिवशीं कुशाबा ब्राह्मणानें गोविंदभटजीला बोलावून आणिलें व संकल्प पूर्वक पूर्वऋणाबद्दल ह्मणून त्यांला पस्तीस रुपये दिले. त्यानंतर लगेच त्यांचें देहवसान झालें.

कुशाबाचें उदाहरण लक्षांत आणून प्रत्येक मनुष्यानें कोणत्याही प्रकारच्या ऋणांत न राहण्याची खबरदारी घ्यावी. [illegible]कदाचित कोणाला देणें फेडण्याचे पूर्वीं मरण आल्यास त्याच्या वार[illegible]देणें अवश्य फेडावें. ऋण फेडल्यावांचून कोणालाही मुक्तता व्हाव[illegible]हीं.

या ठिकाणीं असतानां श्रीगुरु[illegible] ' श्रीगुरुसंहिता ' या नावाचा अत्युत्तम ग्रंथ संस्कृत भाषेमध्यें तया[illegible]ला.

श्रीदत्तमहाराजांची आज्ञा झाल्यावरून श्रीगुरुमूर्ती ब्रह्मावर्त सोडून निघाले तेव्हां तेथील लोकांनीं त्यांची प्रार्थना केली.

**पद.**

**गुरुराया दत्तात्रेया । आठवितों तुझिया पाया ॥ धृ० ॥**
**जरि नेणों भजनउपाया । तरि धरितों तुझिया पाया ॥**
**जरि हरिसी तूं न अपाया ॥ लाजही तुझिया पाया ॥ चाल ॥**
**गुरुराया सखया आतां ॥ सदया शिरिं धरि वरदहस्ता ॥**
**तुजवांचुनि ऐशापतितां ॥ उद्धरि कोण जगीं या ॥ १ ॥ गुरुराया०**
**आह्मीं झालों अतिशय कष्टी ॥ एकवेळ आह्मांवरि दृष्टी ॥**
**उघडुनियां करुणावृष्टी ॥ करिं जेणें होइल तुष्टी ॥ चाल ॥**
**व्यष्टिसमष्टिहि सकल ॥ सृष्टिस्थिती हे तव खेळ ॥**
**पुष्टी दे तूं केवळ विमळ ॥ चेष्टित तव नेणूं अपाया ॥२॥ गुरु०**
**पापतापदैन्यविनाशी ॥ तूं मनोरथपुरवीसी ॥**
**जडपडेल तुज हें ऐशी ॥ वार्ता तरि मानूं कैशी ॥ चाल ॥**
**म्हातारी साठवर्षांची ॥ होती ती गंगा साची ॥**
**कन्यासुतदेउनि तीची ॥ वांच्छा पुरविलीस दयाळा ॥ ३ ॥ गुरु०**
**तूं अघटितघटनाकरिसी ॥ कृष्णातटिं हे सर्वांसी ॥**
**हें प्रसिद्ध मग आह्मांसी ॥ तूं उपेक्षिसि कीं कैसी ॥ चाल ॥**
**कींव नये अमुची आतां ॥ निजविरुदा आणुनि चित्ता ॥**
**मम कामना पुरविसि दत्ता ॥ वासुदेवनमस्कारी गेया ॥ ४ ॥ गुरु०**

यांप्रमाणें प्रार्थना केली व तेथील सर्व मंडळीस शांत करून श्रीगुरुमूर्ती प्रयागास आले. त्याठिकाणीं त्रिवेणीचें स्नान करून पुढें श्रीकाशीक्षेत्रीं गेले. तिथें त्यांनीं तारकमठांत मुक्काम केला. त्यामुळें तेथील स्वयंप्रकाश स्वामीस फार आनंद झाला. सर्व मंडळीचा आग्रह पडल्यावरून श्रीगुरुमूर्ती पंचक्रोश यात्रा करण्यासाठीं निघाले. रामेश्वराला पोंचतांच त्यांला दृष्टांत झाला कीं, श्राद्धास जाण्यासाठीं तुह्मी या ठिकाणीं आलां आहां काय?

हें श्रीदत्तमहाराजांचें वचन समजून श्रीगुरुमूर्तींनीं तपास केला. तों समजलें कीं, यात्रेकरी श्राद्ध न करितां स्वामीमहाराजांस भिक्षा घालीत होते. ह्मणूनच वरप्रमाणें श्रीदत्तात्रेय बोलले. श्रीगुरुमूर्तींनीं या गोष्टीचा बंदोबस्त केला व माधुकरी आणून भिक्षा करण्यास बसले तों पुनः श्रीदत्ताची आज्ञा झाली कीं, आतां काशींत न जातां तुह्मीं नरसोबाच्यावाडीस जाण्याचा मार्ग धरा. श्रीदत्ताची आज्ञा वंद्य करून श्रीगुरुमूर्ती दंड घेऊन उठले व तेथून निघून मनोवेगानें प्रयागास आले आणि त्रिवेणीसंगमावर उभे राहिले. ही बातमी स्वयंप्रकाश स्वामीस व इतर मंडळीस समजली. तेव्हां ती सर्व मंडळी त्यांला भेटण्यासाठीं प्रयागास आली.

त्या मंडळीनें तपास केल्यावरून श्रीगुरुमूर्तींनीं परभारें निघून जाण्याचें कारण श्रीदत्ताची तशी आज्ञा झाली असें सांगितलें. त्यावरून सर्व लोक चकीत झाले. ही हकिगत शके १८२८ सालीं घडली.

श्रीनीं नंतर त्या ठिकाणाहून निघून नर्मदातीरीं बढवाई येथें येऊन मुक्काम केला व त्या ठिकाणीं चातुर्मास केला. त्यावेळीं बरेच लांबलांबचे लोक आले होते. त्यांत नानाशास्त्री ब्रह्मवर्तकरही होते. त्यांला भाद्रपद शुद्ध ११ चे दिवशीं महामारीचा उपद्रव सुरू झाला. हें वर्तमान श्रीगुमूर्तीस समजतांच त्यांनीं श्रीदत्ताची प्रार्थना केली कीं, हे भगवंता! ह्या आपल्या मुलाबाळांस त्यांच्या घरीं सुखरूप पणें नेऊन पोंचवा. मी पौर्णिमेला येथून निघेन. अशी प्रार्थना करितांच नानाशास्त्री बरे झाले.

चातुर्मास संपतांच श्रीगुरुमूर्ती तेथून निघून सनावद येथें गेले. तेथें सीताराम बुवानें आपल्या पित्याचें श्राद्ध केलें त्यावेळीं श्रीगुरुमूर्तींनीं सांगितलें कीं, गांडा! पाऊस येणार आहे. ह्या करितां गांवांत जाऊन स्वयंपाक करा. त्यावेळीं पावसाचें चिन्ह मुळींच नव्हतें. त्यावरून गांडाबुवा ह्मणाले, हल्लीं पाऊस पडत नाहीं व त्याचें मुळींच चिन्ह दिसत नाहीं; यावरून यावेळीं पाऊस येईलसें दिसत नाहीं. नंतर त्यांनीं घांटावरच स्वयंपाक केला. श्राद्धकर्म पुरें होतांच एकाएकीं इतका पाऊस पडला कीं, सगळे लोक घाबरून गेले. त्यावेळीं गांडाबुवानीं श्रीगुरुमूर्तीजवळ आपल्या

अपराधाची क्षमा मागितली त्यावेळीं तात्पुरता पाऊस बंद झाला.

दुसरे दिवशीं श्रीगुरुमूर्ती श्रीनरसोबाच्यावाडीस जाण्यास निघाले. इतर सर्व मंडळी आपआपल्या गावीं गेली. नानाशास्त्री फिरत फिरत दीड महिन्यानें ब्रह्मावर्ती जाऊन पोहोंचले. तेथें त्यांस पुनः महामारीचा उपद्रव सुरू होऊन ते दुसऱ्याच दिवशीं मरण पावले. श्रीगुरुमूर्तींनीं नानाशास्त्र्यांस इतकें आयुष्य दिलें. हें वर्तमान इतर गांवांतील मंडळीस समजतांच त्यांस आश्चर्य वाटलें.

सनावडाहून निघतेसमयीं वाडीकर नरुगोविंद नावाच्या मनुष्यास श्रीगुरुमूर्तींनीं सांगितलें कीं, तुम्ही येथून आतां दुसऱ्या कोठेंही न जातां गांडाबुवाबरोबर श्रीनरसोबाच्यावाडीस जावें. परंतु नरुगोविंद वडिलांच्या महालयासाठीं एक दिवस नाशिकांत जाऊन राहिला. त्यामुळें त्याला मार्गांत ज्वर येऊन तेथेंच संन्यास घेऊन तो घरीं आला व येतांच मरण पावला.

श्रीगुरुमूर्ती सीतारामबुवासह आश्विन वद्य षष्ठीरोजीं श्रीनरसोबाच्या वाडीस येऊन दाखल झाले, त्यांनीं श्रीदत्तपादुकांस वंदन करून ब्रह्मानंद-स्वामीच्या मठांत मुक्काम केला.

खरसाड गांवाचा रहिवाशी कल्याणजी याचा मुलगा फार दिवसां-पासून जीर्णज्वरानें आजारी होता व त्याचें देहावसान होईल असेंच सर्वांस वाटत होतें. ती स्थिती श्रीगुरुमूर्तीस त्यानें कळविली. त्यांनीं त्याला एक यंत्र करून दिलें. त्यायोगें तो मुलगा बरा झाला. प्रारब्धवशात् तें यंत्र पुढें कांहीं दिवसांनीं हरवलें व त्यामुळें त्या मुलाला पूर्ववत् ताप सुरु झाला. तेव्हां श्रीगुरुमूर्तींनीं पुनः यंत्र करून दिलें व त्यायोगें तो बरा झाला.

या यंत्रविद्येच्या योगानें कानपूर येथील आर्यसमाजाचा मूळ पुरुष दयानंदसरस्वती यांचें मूख स्तंभन करून एका ब्रह्मचाऱ्यानें त्यांस तीन दिवसपर्यंत बोलावयास यावयाचें बंद करून टाकिलें होतें.

या वर्षी गुरुद्वादशीच्या उत्सवामध्यें कोल्हापूर सरकाराकडून प्रतिबंध करण्यांत आला होता. परंतु सर्व पूजाऱ्यानीं दरसाल प्रमाणें उत्सव साजरा व्हावा व आलेलें विघ्न निरसन व्हावें अशी प्रार्थना केली त्यावरून श्रीगुरु-

मूर्ती ह्मणाले, श्रीदत्तकृपेनें उत्सव निर्विघ्नपणें पार पडला. पुढें त्याप्रमाणें गुरुद्वादशीचा उत्सव यथासांग दरसालप्रमाणें निर्विघ्नपणें पार पडला.

आश्वीन वद्य दशमी दिवशीं प्रातःकाळीं श्रीगुरुमूर्ती कृष्णानदीवर स्नानास गेले. त्याठिकाणीं त्यांस श्रीदत्तात्रयांनीं दर्शन दिलें. त्यावेळीं त्यांनीं त्यांस नमस्कार केला.

**श्रीदत्त०**—तुह्मी माझ्या उत्साहापूर्वी येथून निघून श्रीरामेश्वरास जावें.

ही बातमी इतर ब्राह्मण मंडळीस कळतांच त्यांनीं एकत्र होऊन श्रीदत्तपादुकांवर संततधार सुरू केली. याच दिवशीं श्रीगुरुमूर्तीनीं सकाळीं लाविलेली समाधि संध्याकाळीं पांच वाजे पर्यंत उतरली नव्हती. श्रीनीं मध्यान्हसमयीं दुसरें स्वरूप धारण करून गोखल्याच्या आळींत बेळगांवाहून आलेले धोंडोपंत कालकुंद्रीकर यांचे येथून माधुकरी भिक्षा घेऊन आले. त्यावेळीं तेथें पुष्कळ लोक बसले होते. ते त्यांच्या मागून जाऊं लागले. इतक्यांत तें स्वरूप अदृश्य झालें. त्यावेळीं ते रामचंद्रयोगी महाराजांच्या जीवंत समाधी जवळ आलेले होते. त्याप्रमाणें त्याचवेळीं श्रीगुरुमूर्तीनीं गांवच्या वेशीबाहेर तिकडून येणाऱ्या लोकांस दर्शन दिलें व त्यांस प्रसाद दिला; ते सर्व लोक तो दिलेला प्रसाद दाखवूं लागले.

ही हकीगत गांडाबुवास समजल्यावर त्यानें पंचगंगेच्या घाटावर सर्व मंडळीसमक्ष श्रीगुरुमूर्तीस त्या संबंधाची माहिती विचारली. तें ऐकून ते हसून ह्मणाले,मला यापैकीं कांहीं माहित नाहीं. मी मठामध्यें तुमच्या सर्वांच्या समक्ष ध्यानस्थ बसलों होतों. श्रीगुरुमूर्तीस साष्टांग नमस्कार घातले.

त्या रात्रीं श्रीगुरुमूर्तीला श्रीदत्तमहाराज ह्मणाले, पुजारी लोकांचा फार आग्रह आहे याकारितां मी पुन्हा आज्ञा करीपर्यंत तुह्मीं वाडींतच राहावें रामेश्वरास जाऊं नये. तें ऐकून श्रीनीं रामेश्वरास जाणें लांवणीवर टाकिलें.

गुरुद्वादशीच्या उत्सवाच्या वेळीं रामासोनभट या नांवाच्या पुजाऱ्यानें नैवेद्यासाठीं तयार केलेल्या अन्नांतून अन्नपूर्णेची पूजा होण्यापूर्वी अन्न घेऊन जात असणाऱ्या एका बाईला पकडली व बऱ्याच शिव्या देऊन तिला शिपायांच्या स्वाधीन केली. ही गोष्ट श्रीदत्तात्रयांला पसंत पडली नाहीं. त्यामुळें त्यांनीं त्याचवेळीं बटुवेष धारण करून रामापुजाऱ्यास दंडानें बराच

मार दिला. तो इतका कीं, त्या माराने तो पुजारी बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. त्यावेळीं तो पुष्कळ मंडळीच्या मध्यभागीं उभा होता परंतु तो बटु रामाशिवाय इतर कोणास दिसला नाहीं. रामाला पडल्याबरोबर जमलेल्या लोकांनीं उचलून त्याच्या घरीं पोचविलें. ही हकिगत कोणीही श्रीगुरुमूर्तीस कळविली नाहीं. तो पूजारी तीन दिवस झाले तरी शुद्धीवर आला नाहीं. तेह्मां सर्व पुजाऱ्यांनीं मिळून हकिगत श्रींच्या कानावर घातली. त्यावेळीं त्यांनीं सांगितलें कीं, ह्या अपराधाबद्दल तुह्मी सर्वजण श्रीदत्ताजवळ क्षमा मागून देवाचा तीर्थ आंगारा त्याला लावा ह्मणजे त्यास बरें वाटेल. श्रीगुरुमूर्तींच्या आज्ञेप्रमाणें कारितांच तो बरा झाला; परंतु त्याच्यावर बसलेल्या माराचे वळ एक महिनापर्यंत दिसत होते.

नरकचतुर्दशीच्या दिवशीं सर्वत्रांनीं मिळून स्वामीमहाराजांस अभ्यंग स्नान घातलें व श्रीनरसिंहसरस्वतीस्वामी करवीं सर्व मंडळीनें त्यांची षोडशोपचार पूजा करविली. आणि खालीं लिहिल्याप्रमाणें त्यांची आरती केली.

**जय जय श्रीमत्गुरुवरस्वामिन्परमात्मन्हंसा ॥**
**वासुदेवानंदसरस्वति आरति तव हंसा ॥ धृ० ॥**
**सोऽहं हंसः पक्षाभ्यां संचरसि ह्याकाशे ॥**
**वासस्ते खलु लोके सत्ये क्रीडा तव मानसे ॥ जय० ॥ १ ॥**
**मुक्ताहारो ब्रह्मवाहको वैराड्रूपधर ॥**
**भक्तराज हृद्ध्वांततमोहृत्स्वीकुरु मां च हर ॥ जय० ॥ २ ॥**
**पक्षस्थैके वातेनैके भीताः काकाद्याः ॥**
**पलायितास्ते द्रुतं प्रभावाद्भवंति चादृश्याः ॥ जय० ॥ ३ ॥**
**एवं सति खलु बालस्तेऽहं गमितः कामाद्यैः ॥**
**मातस्त्वरया चोद्धर कृपया प्रेषितशांत्याद्यैः ॥ जय. ॥ ४ ॥**
**दासस्ते नरसिंहसरस्वति याचे श्रीचरणं ॥**
**भक्तिश्रद्धे वासस्ते हृदि सततं मे शरणं ॥ जय० ॥ ५ ॥**

याप्रमाणें आरती करून श्रीगुरुमूर्तीस साष्टांग नमस्कार केला.

याच दिवशीं पुजाऱ्यांनीं श्रीदत्तपादुकांवर कढत पाण्याचें स्नान घातल्यामुळें श्रीदत्तात्रयांनीं श्रीगुरुमूर्तीस सांगितलें कीं, मला दररोज कढत

पाण्यानें हे पुजारी स्नान घालितात. ह्याचा तुह्मी कांहीं बंदोबस्त केला नाहीं, याकरितां तुह्मालाच उपाधींत टाकिलें पाहिजे. असें सांगून गुरुमूर्तीच्या पोटांत उष्णता उत्पन्न केली त्यामुळें त्यांच्या पोटांतून रक्त पडूं लागलें.

पुजाऱ्यांनीं रक्त पडण्याचें कारण श्रीगुरुमूर्तीस विचारिलें त्यावरून ते ह्मणाले, तुह्मी श्रीदत्तपादुकांवर फार कढत पाणी ओतून त्यांला स्नान घालितां ह्मणून देवानें ही उपाधी मला लावून दिली आहे. हें ऐकून पुजाऱ्यांनीं श्रीदत्ताची प्रार्थना करून अपराधाची क्षमा मागितली. त्यामुळें रक्त पडण्याचें बंद झालें. त्यादिवसापासून पादुकांवर कढत पाण्यानें स्नान घालण्याचें पुजाऱ्यांनीं बंद केलें व बेताच्या गरम पाण्यानें स्नान घालण्यास सुरुवात केली.

याठिकाणीं अक्कलकोटच्या महाराजांचा शिष्य वैजनाथ नांवाचा एक ब्राह्मण राहात होता. त्याचा नियम असा होता कीं, रोज सकाळीं उ-उठल्यावर हातांत तांब्या घेऊन दुपारीं अकरावाजेपर्यंत पंचगंगेच्या किनाऱ्यावर फिरावें. नंतर आंगाला पुष्कळ वेळां माती लावून स्नान करावें हीच त्याची संध्या व पूजा होय. दत्तपादुकांवर कधींही तांब्याभरसुद्धां पाणी घालीत नसे. असें करण्याचें कारण लोकांनीं त्यास विचारल्यावर तो सांगे कीं, " मी समंधी मनुष्य आहें. समंध मला कांहीं सुचूं देत नाहीं. " त्याला दत्ताचा साक्षात्कार होता. त्यामुळें बालचेष्टा करीत असे. तो एक लहान पंचा नेसे. व खांद्यावर एक लहान फडका घेई. ह्या शिवाय दुसरें कोणतेंही वस्त्र त्याच्याजवळ नसे. त्याला कोणी भिक्षेला बोलाविलें तर तो जाई व पैसा, दोन पैसे जी भोजनदक्षिणा मिळेल तेवढी मात्र घेत असे. त्या शिवाय दुसरें कोणी कांहीं दिलें तरी घेत नसे. भोजन दक्षिणेचे पैसे तो त्या गांवांतील शाळामास्तर नंदगांवकर याजकडे ठेवी व आपण त्यांचा हिशोब ठेवित असे. पंचा फाटला तर तो त्या पैशांतून घेत असे. दुसरा कांहीं खर्च तो करीत नसे. याप्रमाणें पैसा जमवितां जमवितां पंचवीस वर्षांत त्याच्या शिलकेंत आठ रुपये जमले.

एके दिवशीं गांडाबुवानें वैजनाथ महराजांस विचारलें कीं, तुह्मी पंचवीस वर्षें वाडींत राहून देवाला एकदिवस सुद्धां तांब्याभर पाणी घा

ल्वीत नाहींत, किंवा कधी महापूजाही करीत नाहींत याचें कारण काय ?

**वैजनाथः**—" माझा समंध मला कांहीं सुचूं देत नाहीं. "

**गांडाबुवाः**—कां वैजनाथ ! श्रीदत्तमहाराजांच्या खजिन्यांत आठ रुपये जमले आहेत ते आणा. आपण महापूजा करवूं.

**वैजनाथः**—मी माझ्या बंधूला भेटावयास जाणार आहें त्याकारितां ते रुपये ठेविले आहेत.

हें ऐकून जवळ बसलेले लोक ह्मणाले, ब्रह्मचारीबुवा ! हा आज किती तरी वर्षें बंधूला भेटावयास जाणार ह्मणून सांगत आहे, परंतु अझून जात नाहीं. त्याच्या बोलण्याचा विश्वास नाहीं. तुह्मी ते रुपये यांच्याजवळून घेऊन महापूजा करवा.

वैजनाथानें ती गोष्ट कबूल केली नाहीं. ह्मणून गांडाबुवा श्रीगुरुमूर्ती जवळ जाऊन ह्मणाले, गुरुमहाराज ! वैजनाथानें आज पंचवीस वर्षांत देवाला तांब्याभर पाणीसुद्धां वाहिलें नाहीं. त्याचे जवळ आठ रुपये असून ते देवाच्या महापूजेसाठीं मागितले तर ह्मणतात कीं, मला भावाला भेटायाला जावयाचें त्यासाठीं ते पाहिजेत.

**श्रीगुरुमूर्तीः**—वैजनाथाच्या बोलण्याचा अर्थ तुला समजला नाहीं असें वाटतें. त्याला " महाभूत ह्मणजे श्रीदत्तमहाराजांचा समंध आहे. आणि भावाला भेटावयास जाणें ह्मणजे शरीर त्यागकरून आत्मस्वरूपीं मिळणें होय. शरीराची व्यवस्था लावण्याचें कामी कोणाला उपाधी होऊं नये ह्मणून ते आठ रुपये त्यांनीं ठेविले आहेत.

**गांडाबुवाः**—गुरुजी ! वैजनाथाकडून आपण महापूजा तर करविली पाहिजेच. त्या पूजेंत जें कमी पडेल तें मी देईन.

**श्रीगुरुमूर्तीः**—वैजनाथ ! गांडा ह्मणतो तें खरें आहे. यास्तव महा पूजा करावयासच पाहिजे.

**वैजनाथः**—महाराजजी ! मी आठ रुपये देतों पण मी समंधी मनुष्य असल्यामुळें पूजेला माझ्यानें बसवणार नाहीं ह्मणून कृपाकरून माझ्या तर्फेनें आपण महापूजा करावी.

**श्रीगुरुमूर्तीः**—पूजासमयीं तुह्मांला आलेंच पाहिजे; तुह्मी एवढेंच

सांगा कीं, मी नऊ वाजतां येईन म्हणजे त्यावेळीं तुमचा समंध तुम्हांला येऊं देईल. शेवटीं होय नाहीं करितां करितां वैजनाथानें येण्याचें कबूल केलें. आणि मार्गशीर्ष शुद्ध द्वादशी दिवशीं महापूजा करण्याचें नक्की ठरलें. त्या द्वादशीच्या दिवशीं आठ रुपायांच्या सामानांत ब्राह्मणापासून चांडाळा-पर्यंत सुमारें तीन हजार लोक जेवले. अशाप्रकारें वैजनाथाकडून श्रीगुरुमूर्तीनीं बाडींत लीला करून दाखविली.

सावंतवाडीजवळील गोठोस गांवचा जनार्दन नांवाचा एक ब्राह्मण सीतारामबुवांचा भाचा पिशाचबाधेच्या त्रासानें कंटाळून श्रीगुरुमूर्तीजवळ आला व सांगूं लागला कीं, माझ्या घरीं एक अपरिचित ब्राह्मण आला. त्याला आजोबांनीं अतिथी समजून गृहस्थाश्रमधर्माप्रमाणें जेवावयास घातलें. तो जातेसमयीं आजोबांस बत्तीस रुपये देऊन म्हणाला. हे रुपये आपल्या-जवळ असूं द्या. मी परत येईन तेव्हां हे घेऊन जाईन. ते रुपये आजोबांनीं तसेच ठेविले. कांहीं दिवसांनीं तो ब्राह्मण परत आला. तेव्हां आ-जोबानीं त्याला ते रुपये न्यावयास सांगितले. त्यावेळीं तो म्हणाला, माझें लग्न इकडच्या बाजूस होण्याचें ठरलें आहे. त्या करितां दुसरे रुपये भरीस घराकडून आणावयाचे आहेत. ते घेऊन येतेवेळीं हे घेऊन जाईन. माझ्या आजोबानीं त्याला त्याचें नांव गांव काहीं विचारिलें नाहीं व ते रुपये तसे-च ठेविले. ह्या गोष्टीला कित्येक वर्षें लोटल्यावर माझे आजोबा माझ्या बा-पाजवळ म्हणूं लागले कीं, त्या ब्राह्मणाचे रुपये त्याचेकडे कशारीतीनें पों-चवावयाचे ? मला त्याचें नांव गांव सुद्धां माहीत नाहीं. शेवटीं अंतकाळ जवळ आला असें जाणून आजोबानीं वडिलांस सांगितलें कीं, तो ब्राह्मण किंवा त्याचा कोणी मनुष्य आला तर त्याचे बत्तीस रुपये देऊन टांक. वडिलांनीं ती ठेव तशीच राखून ठेविली होती. आजोबांचे देहावसान झा-ल्यावर तो ब्राह्मण पिशाच होऊन माझ्या पित्यास पीडा देऊं लागला. त्यास विचारितां तो म्हणाला, मी ब्राह्मण होतों त्यावेळीं बत्तीस रुपये तुमचे जवळ ठेविले होते. मध्यंतरीं मला मृत्यु आल्यामुळें ते रुपये मी तुमच्याक-डून नेऊं शकलों नाहीं. आतां माझे रुपये मला परत द्या.

त्याच्या सांगण्याप्रमाणें ते रुपये त्यांच्या हातांत ठेऊन नारायणबळी

केल्या. तरीही तो पिशाच्च माझ्या पित्यास पीडा देऊं लागला. तसेंच घ-रांतील कित्येक माणसें त्यानें मारिलीं. त्यानंतर त्याला विचारिलें, तूं आतां आह्माला कां पीडा देतोस? पिशाच्च ह्मणाला; माझ्यासाठीं नारायणबळी करण्यास तुह्माला कोणी केव्हां सांगितलें होतें? अझून माझी गती झाली नाहीं ह्मणून फिरून नारायणबळी कर. ह्मणजे मी तुला उपद्रव करणार नाहीं. त्याच्या सांगण्यावरून पन्नास रुपये खर्चून पुनः नारायणबळी केला. तरीही ह्यानें माझ्या पित्यास त्रास देऊन मारिलें. व अझून हा माझा पिच्छा सोडित नाहीं. आतां काय करावें? मी गरीब मनुष्य आहें.

जनार्दनाचें भाषण ऐकून श्रीगुरुमूर्तींनीं पिशाच्चास बोलावून विचा-रिलें कीं हा सांगतो तें खरें कीं खोटें?

**पिशाच्चः**—महाराज! यानें सांगितलेली हकिगत खरी आहे. परं-तु अझून माझी सद्गति झाली नाहीं. आपल्यासमक्ष यानें पुनः नारायणब-ळी करावा. ह्मणजे याला मी पीडा देणार नाहीं. माझे वंशांत मागें मला सद्गति देणारा कोणी नाहीं. ह्यास्तव हात जोडून एवढें मागणें मागतों; तें कृपाकरून मला द्या.

हें वचन ऐकून श्रीगुरुमूर्तीस दया आली आणि जनार्दनास सांगूं लागले कीं, तूं याठिकाणीं नारायणबळी कर. तुजजवळ पैसा नसल्यास सीतारामबुवा व इतर मंडळी तुला पैशाची थोडथोडी मदत करितील.

श्रीगुरुमूर्तींचे वचन ऐकून जनार्दन गोठोसकर नारायणबळी करण्या-स तयार झाला. व त्यानें आपल्याकडील रुपये आणि मदत मिळालेले रुपये मिळून हिशोब करून पाहूं लागला तों बत्तीस रुपये कमी भरले. त्यां विषयीं श्रीगुरुमूर्ती व सीतारामबुवा वाटाघाट करूं लागले. त्याच दिवशीं रात्रीचे दोन वाजण्याच्या सुमारास त्या पिशाच्चानें नरसोबाच्या वाडींतील शाळामास्तर नंदगांवकर या जवळ कोणा जन्मींचें येणें असल्या मुळें स्वप्नांत जाऊन त्याला सांगितले कीं, बत्तीस रुपये जनार्दनास द्यावे. त्यामुळें तो मास्तर श्रीगुरुमुर्तीजवळ आला व त्यानें बत्तीस रुपये देऊन स्वप्नांतली हकिगत त्यांस सांगितली. याप्रमाणें रुपये हातीं आल्यामुळें ज-नार्दनानें नारायणबळी व श्राद्ध करविलें, तेव्हां त्यादिवसापासून त्याची पिशाच्च संबंधी उपाधि दूर झाली.

यासाठीं कोणी कोणाचे राखून ठेवण्यासाठीं दिलेले पैसे घरांत ठेवूं नये कारण जनार्दनपंताप्रमाणें त्यास संकटांत पडावें लागेल.

एक सुवासीण बायको पिशाच्च उपद्रवांतून मुक्त होण्याच्या इच्छेनें आपल्या आईस स्वयंपाक करून जेवण घालण्यासाठीं बरोबर घेऊन श्रीनरसोबाच्या वाडींत येऊन राहिली होती. एके दिवशीं भर दुपारीं पुष्कळ गर्दीतून एकाएकीं त्या बाईस पिशाच्चानें उचलून नेली. त्यामुळें तिची आई घाबरून श्रीगुरुमूर्तीजवळ आली व झालेली हकिगत तिनें त्यांस निवेदन केली.

**श्रीगुरुमूर्तीः**—तिला ब्रह्मराक्षस घेऊन गेला आहे. संध्याकाळीं तिचा तुह्मांस पत्ता लागेल. घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं.

त्याप्रमाणें संध्याकाळीं त्या बाईचा नेमक्या ठिकाणीं पत्ता लागला.

श्रीनरसोबाच्या वाडींतील पुजारी सखाराम हा पंचवीस वर्षांचा असतांनां त्याला कोणी योगाभ्यास शिकविला. त्यामुळें त्यास वेड लागलें. तें पाहून श्रीगुरुमूर्तींनीं त्यास औषध व जप सांगितला. तो न ऐकल्यामुळें अद्याप तसाच राहिला आहे. ही गोष्ट शके १८२८ त झाली आहे. ह्याकरितां कोणीही श्रीसद्गुरूची कृपा संपादन करून अनुभवी ब्रह्मनिष्ठ गुरूजवळ योगाभ्यास शिकावा. नाहींतर सखारामासारखी आपत्ती भोगावी लागेल.

शिरोळगांवचा तात्यामहाबळ गणेशवाडीकर हा मूर्खलोकांच्या चिथावणीवरून श्रीगुरुमूर्तीची परीक्षा पाहण्यासाठीं त्यांच्याकडे आला व सन्निध जाऊन त्यांस ह्मणाला, माझा हात वायूमुळें कांपत आहे तरी याला उपाय सांगा. त्यावरून त्यांनीं औषध सांगितलें. तेव्हां तो ह्मणाला, स्वामीला कांहीं माहित नाहीं. तो ढोंगी आहे इत्यादि प्रकारें त्यांची निंदा करूं लागला. त्यावरून थोड्याच दिवसांनीं त्यानें जो हात श्रीस दाखविला होता त्याच हाताला गलितकुष्ठ झालें. व त्याचरोगांत त्याचा शेवट झाला. ह्याप्रमाणें साधुपुरुषाची परीक्षा पाहिल्यास न त्यांची निंदा केल्यास ईश्वर त्याचें फळ देत असतो. ह्यासाठीं साधुपुरुषाची कोणीही केव्हांही निंदा करूं नये.

श्रीगुरुमूर्ती मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी रोजीं श्रीनरसोबाचीवाडी सोडून श्रीरामेश्वरास जावयास निघाले त्यावेळी तेथील भक्तमंडळीनें प्रार्थना केली ती-

**नमो गुरू वासुदेवा। घडली नाहीं कांहीं सेवा॥ दुस्तर संसारीं-या। श्रम झाले माझ्या जीवा॥ १॥ दंभाहंकारयुक्त। विषयीं झालों मदोन्मत्त॥ देउनी दर्शनासी। करा यतिवरा मुक्त॥ २॥ पापगर्ती आर्यवर्ते। भक्तजन उद्धारार्थ॥ आज्ञाहोतां अत्रिजाची। सोडुनि दिधला ब्रह्मावर्त॥ ३॥ जन्मांतरींचीं पुण्यें फळलीं। ह्मणुनी पाउलें पाहिलीं॥ तारीं आतां गुरुराया। तूंच आमुची माउली।४। कृष्णातीरीं औदुंबरीं। वास ज्याचा नीरंतरीं॥ तेच तुह्मी कळुनी आले। तो हा गणपती अंतरीं॥ ५॥**

याप्रमाणें प्रार्थना व साष्टांगनमस्कार करून सर्व भक्तमंडळी शोक करूं लागली.

**श्रीगुरुमूर्तीः**—तुह्मी श्रीदत्तमहाराजांची श्रद्धाभक्तीपूर्वक सेवा करा ह्मणजे माझें परत लवकरच येणें होईल. आणि मला बोलावणें हेंपण तुमच्याच हातीं आहे. याप्रमाणें सांगून ते जावयास निघाले.

नरसोबाच्यावाडीहून निघून ते बेळगावीं गेले. तेथून गुर्लहोसूर गावीं गेले. त्या ठिकाणीं चिदंबरमहराज नांवाचे सिद्धपुरुष होऊन गेले. त्यांचे मंदिरांत कैवल्याश्रम स्वामी राहात होते. त्यांनीं आग्रह केल्यावरून त्या ठिकाणीं दहा दिवस त्यांनीं मुक्काम केला.

## चिदंबरमाहाराज यांचें चरित्र.

गुर्लहोसुरच्या चिदंबरमहाराजांचे वडील मल्हारदीक्षीत यानीं काशीस जाऊन विद्याभ्यास केला नंतर गुर्वाज्ञेप्रमाणें द्रविडदेशांत चिदंबरनाथ क्षेत्र आहे. त्या ठिकाणीं जाऊन गायत्रीपुरश्चरण करून महादेवास प्रसन्न करून घेतलें त्यावेळीं महादेव ह्मणाले, तुह्मी घरीं जाऊन गृहस्थाश्रम स्वीकारा. ह्मणजे माझ्या अंशानें तुह्माला मुलगा होईल.

**मल्हारदीक्षितः**--महाराज! तुमच्या अंशानें मुलगा झाला हें कसें ओळखावें?

**श्रीशंकर**—त्यामुलाच्या उजव्याकानावर बिल्वपत्र व अक्षता सर्व

लोकांस दिसतील.

ह्याप्रमाणें श्रीशंकरांचि आज्ञा होतांच मल्हारदीक्षीत मुरगोड गांवीं आले, व त्यांनीं विवाह करून गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर त्यांस पुत्र झाला. त्याच्या उजव्या कानावर श्रीशंकरांनीं सांगितल्याप्रमाणें बिल्वपत्र व अक्षता पाहून आईबापांस अत्यानंद झाला. चिदंबरनाथाच्या प्रसादानें मुलगा झाला ह्मणून त्याचें नांव त्यांनीं चिदंबर असें ठेविलें.

चिदंबर नऊ वर्षांचा होता तेह्मां मल्हारदीक्षीत यानीं त्याला भाद्रपद मासांत गौरीची पूजा करण्याकरितां पाठविलें होतें, तेथें दुसरे पुष्कळ ब्राह्मण पुजेसाठीं आले होते. ते चिदंबराला थट्टेनें ह्मणाले, तुह्मी तर या मातीच्या केलेल्या हत्तीला जीवंत करून चालवालबुवा ! तें भापण ऐकून चिदंबर कांहीं बोलले नाहींत. परंतु देवाला तो शब्द सहन न झाल्यामुळें त्या मृन्मय मूर्तीची प्राणप्रतिष्ठा पूर्ण होतांच तिच्या आंगीं चैतन्याचा संचार झाला व तो मातीचा हत्ती हळू हळू चालूं लागला. तें पाहून सर्व लोक आश्चर्य चकीत झाले. आणि त्या दिवसापासून सर्व लोक चिदंबराला चिदंबर महाराज ह्मणूं लागले.

कांहीं दिवसांनीं त्यांचें लग्न झालें. सर्व देशांत त्यांच्या सिद्धीची कीर्ती पसरली. ती ऐकून तैलंग देशांतील शिवशास्त्री या नांवाचे एक गृहस्थ चिदंबरमहाराजांची परीक्षा पाहण्यासाठीं त्यांचेकडे आले.

**शिवशास्त्री**:—आपण कायकाय शिकलां आहांत ?

**चिदंबरमहा०**:—मला कांहीं येत नाहीं.

**शिवशास्त्री**:—तुमची कीर्ती सर्वत्र गाइली जात आहे ती कां ? जर तुह्मी कांहीं शिकलां असाल तर मजबरोबर वाद करा. मला तीन शास्त्रें येत आहेत. ह्याच वेळीं एक बाई आपला लहान मुलगा कडेवर घेऊन चिदंबरमहाराजांच्या दर्शना कारितां तेथें आली होती. दर्शन करून नमस्कार केल्यावर चिदंबरमहाराजांनीं तिच्या मुलास केळ्याचा प्रसाद दिला. आणि सांगितलें, बाळा ! तूं ह्या पंडितांबरोबर वाद कर.

चिदंबरमहाराजांची आज्ञा होतांच तो मुलगा शिवशास्त्र्यांबरोबर

वाद करूं लागला. ह्या वादांत शेवटीं शिवशास्त्रियांवर हार आली. तेव्हां ते आश्चर्य चकीत झाले व त्यांनीं चिदंबरमहाराजांस साष्टांग नमस्कार केला. आणि आपल्या अपराधाची त्यांच्याजवळ क्षमा मागून आपण त्यांचे शिष्य होऊन राहिले.

चिदंबरमहाराजांस दोन बायका होत्या. त्यांनीं अग्निहोत्र ठेविलें होतें. ते रोज प्रात:काळीं व सायंकाळीं अग्निनारायणास होम देत असत व स्वत: याचक वृत्तीनें राहात असत; तरी पण त्यांच्या घरीं दररोज हजारों मनुष्यें जेवीत असत. ते नेहमीं यज्ञ यागादी करीत असत, ते जेव्हां जेव्हां आपणास पैशाची जरूर लागे तेव्हां तेव्हां आपल्या जवळच्या कल-शांतून वाटेल तितका पैसा काढीत असत.

एकदां चिदंबरमहाराज विजापूरजवळ हिपरगी गांवीं आपल्या कुलदेव-तेची पूजाकरण्यासाठीं गेले होते. पूजाकरून मंडळीसह भोजनास बसले असतां एकाएकीं मोठा झंझावात सुटला व एक मोठा दगड येऊन जेवाव-यास बसलेल्या ब्राह्मणांपैकीं एकाच्या डोक्यावर पडला व तो त्यामुळें तेथेंच ताबडतोब मरण पावला. तें पाहून चिदंबरमहाराज बोलले, हे ब्राह्मणहो ! कोणीही उपाशीं उठूं नये; कारण हा ब्राह्मण जीवंत आहे. नंतर लोकांनीं त्याच्या आंगावर पाणी ओतिलें. त्याबरोबर तो जीवंत झाला, व त्याच्या सह सर्व ब्राह्मण आनंदानें त्याठिकाणीं जेविले.

अशा प्रकारचे त्यांचे अनेक चमत्कार पाहून त्यावेळचे राजे चिदं-बरमहाराजांचे शिष्य होऊन राहिले होते

चिदंबरमहाजांनीं एका प्रसंगीं एक मोठा यज्ञ केला होता. त्यावेळीं पुण्याहून शेवटचे बाजीराव पेशवे सरकार त्यांच्या दर्शना कारितां त्याठि-काणीं गेले होते. यज्ञाची समाप्ति झाल्यावर बाजीरावांनीं त्यांच्याजवळ त्यांच्या हातच्या प्रसादाची मागणी केली.

**चिदंबरमहाराज:**—मी माझ्या हातचा दिलेला प्रसाद दुसऱ्या को-णाच्या हातीं न देतां तुह्मीं स्वत: आपल्या मुक्कामापर्यंत घेऊन जाल तर तुह्माला देतों.

**बाजीरावपेशवे:**—महाराज ! मी आपल्या आज्ञेप्रमाणें करीन.

चिदंबरमहाराजांनीं बाजीरावास आपल्या हातानें प्रसाद दिला. बाजीरावानें तो त्यांच्या समक्ष आपल्या माणसाच्या हातीं दिला. तें पाहून चिदंबरमहाराज ह्मणाले, हें तुह्मीं काय केलेंत? आतां तुमचें राज्य राहणार नाहीं. थोडक्याच दिवसांत तुमचें राज्य तुमच्या आश्रितांच्या हातीं जाईल. व ब्राह्मण वर्गावर मोठें संकट येऊन पडेल. अशा संकटावस्थेंत जे ब्राह्मण धैर्य धरून आपल्या आश्रमधर्माप्रमाणें नित्य नैमित्तीक कर्में करून शांत पणानें राहतील ते सुखी होतील.

कैवल्याश्रमस्वामी मोठे अधिकारी असल्यामुळें त्यांची आज्ञा घेऊन श्रीगुरुमूर्ती त्या गांवानजीक डोंगरावर एलंमा नांवाचें रेणुकामातेचें स्थान आहे (याठिकाणीं रेणुकामातेचा जन्म झाला होता.) तेथें गेले व रेणुका मातेचें दर्शन घेऊन, किष्किंधा नगरींत विद्यारण्य स्वामींच्या मठांत त्यांनीं मुक्काम केला. त्याचप्रमाणें पंपासरोवरांत स्नान केलें. तेथून शेषाचल पर्वतावर जाऊन कार्तीकस्वामींचें दर्शन घेतलें.

याठिकाणीं त्यांनीं तीन दिवस मुक्काम केला व अज्ञानी लोकांस सन्मार्गीं लावण्यासाठीं **कुमारशिक्षा** नांवाचा ग्रंथ लिहिला.

तेथून बालाजी, कालहस्ती, शिवकांची, पक्षतीर्थ इत्यादि स्थानें फिरत फिरत चिदंबरनाथास आले. त्याठिकाणीं सुंदरशास्त्रयांच्या आग्रहा-रून श्रींनी मुक्काम केला. ह्या संधीस कोणी मूर्खानें श्रीगुरुमूर्ती समाधिस्थ झाले असा खोटाच पुकारा केला. त्यावरून नृसिंहसरस्वतींची आज्ञा घेऊन कांहीं मंडळी नरसोबाच्या वाडीहून त्यांचा शोध करण्या साठीं ह्मणून निघाली. त्यांनीं रामेश्वर, तंजावर वगैरे ठिकांणीं तपास केला. परंतु त्यांस कांहीं त्यांची भेट झाली नाहीं. त्यामुळें मंडळीनें निश्चय केलाकीं ते समा-धिस्थच झाले. ही हाकिगत श्रीगुरुमूर्तीस अंतर्ज्ञानानें समजली. तेव्हां त्यांनीं सुंदर शास्त्रयांस सांगितलें, मला भेटण्यासाठीं श्रीनरसोबाच्या वाडीहून कांहीं मंडळी यावयास निघाली आहे. याकरितां मला राहातां येत नाहीं. मी त्यांला सामोरा जातों. असें ह्मणून जे निघाले ते थेट मायवरमच्या बाजारां-त येऊन वाडीकर मंडळीस भेटले. व अंतेवास हाकमारून त्यांनीं विचा रिलें "केव्हां आलास;" तेव्हां सर्व मंडळीस अत्यानंद झाला. नंतर त्य

मंडळीस श्रीगुरुमूर्तींनीं विचारिलें, तुह्मी कां आलांत ? तें ऐकून वाडीकर मंडळीनें सर्व हकिगत त्यांस कळविली. ती ऐकून गुरुमूर्ती ह्मणाले, अतःपर तुह्मी अशा बातमीवर विश्वास ठेऊंनका. हें शरीर पडते वेळीं तुह्मा सर्वांस तात्बडतोब माहिती होईल, अशाजागेवरच हें पडणार आहे. पुढें त्या सर्व मंडळीला बरोबर घेऊन त्यांनीं कावेरी तटाकीं मुक्काम केला. वाडीकरांचें शांतवन करून त्यांला परत वाडीस जाण्याची आज्ञा केली.

श्रीगुरुमूर्ती तेथून निघाले: ते श्वेतारण्य, अस्ताचल, उदयाचल, कुंभकोणं, श्रीरंगपट्टण, मदुरा, मिनाक्षीवन व पाषाण इतक्या ठिकाणीं फिरून नंतर श्रीरामेश्वरीं आले. त्याठिकाणीं सेतूचें दर्शन करून दक्षिणसमुद्राचें स्नान केलें व कावेरीकिनारीं संध्यामंडप गांवीं येऊन चातुर्मास केला. त्याठिकाणी श्रीदत्ताज्ञेवरून श्रीगुरुसंहितेची चूर्णिका तयार केली हा ग्रंथ संस्कृत असून फार सोपा व उत्तम आहे.

तंजावर येथें एका देशस्थ ब्राह्मणाची एक विधवा स्त्री दम्याच्या विकारानें एकवीस वर्षे पीडिलेली असे. ती रोग निवारणार्थ पुष्कळ दिवस पर्यंत देवाची सेवा करीत होती, ती बाई आषाढी पौर्णिमेचे दिवशीं श्रीगुरुमूर्तीच्या दर्शनास आली होती. त्याठिकाणी गांडाबुवांनीं तिला श्रीगुरुमूर्तीचें चरणतीर्थ दिलें. तें तिनें श्रद्धेनें प्राशन केलें. पुढें घरीं गेल्यावर तिला उलटी होऊन सर्व कफ निघून गेला व ती दम्याच्या विकारांतून साफ बरी झाली. हें केवळ तिच्या श्रद्धेचें फळ होय.

तंजावर येथें राहाणारा ब्राह्मण देवशंकर त्रिवेदी याचा बंधु सुब्रु हा फारच वाईट रीतीनें वागत असे. त्याला श्रीगुरुमूर्तींनीं यंत्र करून दिल्यापासून त्यानें आपली दुष्ट संवय सोडिली व तो श्रीजवळ येऊन राहिला.

यावेळीं श्रीनसोबाच्यावाडींत प्लेग सुरु झाल्यावरून पुजारी लोकांनीं श्रीगुरुमूर्तीस पत्र लिहिलें. तें वाचतांच त्यांनीं त्या रोगाची शांती होण्याकरितां देवाची प्रार्थना केली. परंतु श्रीदत्तभगवान ह्मणाले, तुह्मी ह्या लोकांकरीतां गंगाकिनाऱ्यावरून दोनदां वाडीस परतून आलेत तरी यांनीं आपला दुष्ट स्वभाव अद्याप सोडिला नाहीं. आतां आपण त्यांच्यासाठीं मध्यस्थी करूं नये. मी त्यांना चांगलीच शिक्षा करणार आहें. हें ऐकून याप्रमाणें श्रीनीं पुजा-

त्यांस पत्र पाठवून कळविलें कीं, या प्लेगांत नरसोबाच्यावाडींत पुष्कळ माणसें मृत्युमुखीं पडतील. पुढें श्रीदत्तभगवानाची अवकृपा झाल्यामुळे पुजारी व तेथील टांगेवाले यांच्यामध्यें बेबनाव झाला. टांगेवाल्यांचा सरदार परसा जोगळेकर यांनीं तुकाराम, गुंडू, पंडीत वगैरे मंडळीस पुष्कळ मार देवविला. आणि तो गांवांत आग लावूं लागला. यामुळें सर्व लोक महासंकटांत पडले. कोणत्यावेळीं काय होईल याचा नियम नाहीं अशी स्थिती प्राप्त झाली. श्रीगुरुमूर्तींची निंदा करणारा तुकाराम गांव सोडून पळून गेला. इतकीं संकटें भोगूनही पुजाऱ्यांनी आपले दुर्गुण सोडिले नाहींत. त्यामुळें दररोज नवी नवी उपाधी त्यांच्यामागें येऊं लागली व ते अतिशय कष्टी झाले.

संध्यामंडपाहून अवधूतराव ह्यांच्या अग्रहारांत श्रीगुरुमूर्ती तंजावरास आले. त्याठिकाणीं वासुदेव मराठे नांवाच्या एका ब्राह्मणास महामारी सुरु झाली होती. त्याला या दुःखांतून मुक्त करून श्रींनीं त्याची त्याचे घरीं रवानगी करून दिली.

श्रीगुरुमूर्ती तेथून जंबुकेश्वरीं जाऊन तेथून कावेरी तीरानें ईराळे नजीक शृंगेरी मठाधीश श्रीशंकराचार्य श्री० प० प० सच्चिदानंद शिवाभिनवश्रीनृसिंहभारतीहाराज यांचा मुकाम होता त्याठिकाणी त्यांच्या दर्शनास गेले. त्यांची प्रार्थना करून त्यांस नमस्कार केला.

**प्रार्थना. राग आरती.**

**देव शिवाभिनव श्रीसच्चित्स्वानंद ॥ नृसिंहभारति यतिवर जय भूमानंद ॥ धृ० ॥ भवतो नवमे वर्षे हर्षणविरक्तः ॥ पारिव्राज्यं वृत्वाऽऽचार्याङ्घ्र्यनुरक्तः ॥ प्राक्संस्कारवशात्योऽभूच्छिवगुरुभक्तः ॥ त्यक्तासुरयोऽभूच्छ्रवणाद्यासक्तः ॥ १ ॥ नृणां जीवानां संबंधं हित्वा ॥ भावं स्वानुभवं भूम्निरतो गतमायः ॥ ख्यातो नृसिंहभारत्यभिधोऽपि नृकायः ॥ यतिसार्वभौमपीठारूढोऽस्मृतकायः ॥ २ ॥ यो लोकसंग्रहार्थं स्वाश्रमकर्मजपम, वचनशौचेंद्रियनिग्रहशमसत्यतपः ॥ आश्रित आस्ते शस्ते माधशंकरपीठः ॥ यतिवासुदेवनामितो जयति स मस्करिपः ॥ ३ ॥**

ही प्रार्थना ऐकून श्रीशंकराचार्य भगवान् फार हसूं लागले आणि हे स्वामी श्रीदत्तावतार आहेत असें समजून सन्मान पूर्वक त्यांला आसनावर बसवून त्यांच्या माधुकरी भिक्षेचा बंदोबस्त करविला. भिक्षा झाल्यानंतर तेथें जमलेल्या सर्व लोकांस श्रीशंकराचार्यभगवानानीं द्रवीड भाषेंत श्रीगुरुमूर्तींची ओळख करून दिली. नंतर मराठी बोलावयास आरंभ केला.

भक्तजनहो ! तुह्मी या वासुदेवानंदसरस्वती स्वामीस ओळखीत नाहीं ह्मणून त्यांचे स्वरूप कळणें शक्य नाहीं. यास्तव मला आज बोलणें जरूर आहे. आपण एक चित्तानें श्रवण करावें. यांच्या माता–पित्याचें अनंत कोटि जन्माचें सुकृत असल्यामुळें श्रीदत्तभगवानानें त्यांचे घरीं अवतार घेतला आहे. यांच्या माता–पित्यांचे आपणावर खरोखरींच महत् उपकार झाले आहेत. हे स्वामीमहाराज आपले आदि शंकराचार्य आहेत. त्यांनीं प्रकट रीतीनें धर्म स्थापना केली होती. आणि हे गुप्त रीतीनें धर्म स्थापना करीत आहेत. स्वत: संन्यस्तधर्म विधियुक्त पाळून शरण आलेल्यांस उपदेश करून सन्मार्गी लावितात. आज यांच्यामुळेंच आचार्य प्रणालिकेचा उदय झाला आहे. कसाही नास्तीक असला तरी यांच्या दर्शनानें तो सुधारतो. यांनीं अनेक नास्तीकांस सन्मार्गी लाविले आहेत. हे आद्य श्रीशंकराचार्यांप्रमाणेंच सर्व गुण संपन्न आहेत. हे दयाळू असल्यामुळें शरण आलेल्या दु:खी जनांस त्या त्या दु:खाचा परिहार होण्याकरितां, शास्त्राधारें नियम सांगून त्यांस त्या दु:खांतून मुक्त करितात. इतकेंच नाहीं पण मृत्यु पावलेल्या मनुष्यांस यांनीं जीवंत केले आहेत. यांच्या दर्शनमात्रें करून पतीत लोक पावन होतात. याच कारणामुळें हे स्वत: पायांनीं तीर्थ यात्रा करीत असतात. यांच्या योगानें आर्यावर्तांतील हजारो लोक सन्मार्गाला लागून ईश्वरभजन करीत आहेत. या आपत्कालीं यांनीं आपल्या आचार्यांच्या नांवाचा पुन: उदय केला आहे. त्यामुळें मी यानां आचार्य च समजतों. व ईश्वराजवळ एवढीच प्रार्थना करितोंकीं, यावचंद्रदिवाकरौ. यांच्या आयुष्याची वृद्धी व्हावी.

याप्रमाणें श्रीशंकराचार्यांचें भाषण श्रवण करून सर्व मंडळीस आनंद झाला. आणि त्या मंडळींनी श्रीगुरुमूर्तींस साष्टांग नमस्कार केला.

**श्रीशंकराचार्यः**—महाराज ! आपण अशा या आपत्तींच्या काळांत लोकांस सन्मार्गास लावण्यासाठीं धर्मावर लक्ष ठेविलें पाहिजे. मीही पण श्रीआद्यशंकराचार्य महाराजांची मूर्ती घेऊन कालटीस जातों. तो गांव त्यांची जन्मभूमि आहे. तेथें ही मूर्ती स्थापन करून एवढेंच मागावयाचें आहे कीं, आपण आपल्या आर्यावर्त देशावर कृपा दृष्टी ठेवून धर्ममर्यादेचें रक्षण करावें. व त्याचप्रमाणें आपणासही सांगतों.

**श्रीगुरुमूर्तीः**—हे भगवान् ! आपण सर्व गुण संपन्न असल्यामुळें आज आचार्यांच्या गादीला शोभवित आहां आपल्या मनांत जो सत्य संकल्प उभा राहिला आहे त्याची सिद्धि ईश्वराला करणें भाग आहे. आपण मज विषयीं जे गोडवे गायिले, तितकी योग्यता माझ्यामध्यें नाहीं. तरी मी आपल्या आज्ञेबाहेर नाहीं.

याप्रमाणें त्यांचीं परस्पर झालेलीं भाषणें ऐकून सर्व लोकांनीं हात जोडून जय जयकार केला आणि ह्मणाले, आपली गति आपणांसच माहित. आपलीं शरीरें मात्र भिन्न दिसतात परंतु अंतःकरणें भिन्न नाहींत. जगाच्या कल्याणासाठीं आपले अवतार आहेत. आपली शक्ति वर्णन करण्याची आम्हांस मति नाहीं. नंतर सर्वांनीं उभयतां स्वामीस साष्टांग नमस्कार केले.

श्रीगुरुमूर्ती श्रीशंकराचार्यमहाराजांची आज्ञा घेऊन निघाले ते इरोल नजीक करूरस्टेशन पासून तीन कोसांवर कावेरी नदीतीरानें रार गांवीं श्रीसदाशिवेंद्रस्वामीच्या समाधीचें दर्शन करण्यासाठीं गेले.

## सदाशिवेंद्रस्वामीचें चरित्र.

हे सदाशिवेंद्रमहाराज म्हैसूरच्या टिपूसुलतानाच्या वेळीं शृंगेरी मठाच्या गादीवर आचार्य होते. त्यांनीं ब्रह्मसूत्रवृत्ति इत्यादि ग्रंथ लिहिलेले आहेत. हे शरीरी असून विदेहमुक्ति उपभोगीत होते व त्यायोगें स्वेच्छेनें नग्न फिरत असत. एकदां सदाशिवेंद्रमहाराज कावेरीतीरीं संचार करीत होते. प्रारब्धवशात् त्यावेळीं त्या ठिकाणीं टिपूसुलतान तळ देऊन राहिला होता. त्याच्या एका सरदाराच्या बायकोनें सदाशिवेंद्रस्वामींला नग्न येतांना पाहून आपल्या नवऱ्यास सांगितलें कीं, हा कोणी नग्न पुरुष

आमच्या तंबू नजीक फिरत आहे

तें ऐकून व त्यांस पाहून तो सरदार हातांत तरवार घेऊन बाहेर आला. आणि हा कोणी काफर असावा असें मनांत आणून ताबडतोब तरवारीनें त्यानें त्यांचे दोन्ही हात छाटून टाकिले. तेह्मां हातांतून रक्त वाहूं लागलें तरी शिवेंद्रस्वामीस शरीराचें भान नसल्यामुळें त्याचा कांहींच खेद झाला नाहीं, ते तसेच आनंद वृत्तीनें फिरूं लागले. तें पाहून सरदार आश्चर्य पावला. पायांत यःकश्चित् एकादा कांटा रुतला तर आपणांस दुःख होतें ? व याचे दोन्ही हात गेले तरी त्याबद्दल याला यत्किंचितही दुःख झाल्याचें दिसत नाहीं तेव्हां हा खचीत कोणी तरी खुदाचा अवलिया असला पाहिजे. असें त्याच्या मनांत येऊन त्यानें आपल्या पदरीं असणाऱ्या ब्राह्मण नोकरांस बोलावून विचारिलें हा कोण आहे पाहा बरें ?

**ब्राह्मणः**—याला सदाशिवेंद्रस्वामी ह्मणतात. आमच्यांत जे लोक अशा स्थितींत वागत असतात त्यांस आह्मी ईश्वरी अवतार समजतों. या स्वामींचें वचन ईश्वर सुद्धां फिरवूं शकणार नाहीं. यांचे तपःसामर्थ्य एवढें आहे कीं शाप देऊन हे आपणास सपरिवार याच ठिकाणीं भस्म करून टाकूं शकतील. परंतु अशा प्रकारचे पुरूष कोणाला शाप देत नसतात. ते स्वतःच्या प्रारब्धावर भार टाकून वागतात. त्यामुळें सुखदुःख प्राप्तीचा कोणावर दोष ठेवित नाहींत.

ही त्याची हकिगत त्या ब्राह्मणांकडून ऐकतांच त्या सरदाराला फार वाईट वाटलें व तो ह्मणाला, अरेरे ! माझ्या सारखा दुष्ट अधम दुनियेंत कोणीही सांपडावयाचा नाहीं. ब्राह्मण सांगतात ही गोष्ट सत्य असेल तर माझ्या हातून फारच अघोर कृत्य घडलें. असें ह्मणून तो क्षमा मागत सदाशिवेंद्रस्वामीच्या मागोमाग फिरूं लागला.

म्लेंछसरदाराला पश्चाताप झाला आहे असें पाहून सदाशिवेंद्रस्वामी विचार करूं लागले कीं, याच्या मनास उगीच कां दुखवावें ? ह्मणून तुटून पडलेल्या आपल्या हातांस उद्देशून ह्मणाले, तुह्मीं येथें पडून राहून या सरदाराला विनाकारण कां पश्चात्ताप करावयाला लावीत आहां ! तुह्मी आपल्या जागच्या जागीं जाऊन राहा कसे ?

या प्रकारचे शब्द सदाशिवेंद्रस्वामीच्या मुखांतून बाहेर पडतांच

ते हात पूर्ववत् आपल्या मुळच्या जागीं जाऊन चिकटले व स्वामींचे दोन्ही हात होते तसे झाले. हा चमत्कार पाहून तो सरदार आश्चर्य पावला आणि या अल्ला! या अल्ला! परवर दिगार! तो बाह! तो बाह! असे उद्गार काढून मनगटें चावून ह्मणूं लागला, हिंदु फकीर वैसा आज तक मेरे देखनेमें नहि आया!! ये खुद अल्ला है. उसके लिये कुच जादा विचार करनेका काम नहीं. असें ह्मणून तो सरदार फार कष्टी होऊन श्रीसदाशिवेंद्रस्वामींच्या पायां पडून आपल्या अपराधाची क्षमा मागून रडूं लागला. व ह्मणाला, हे परवर दिगार! तुह्मी मोठे दिलदार आहां. मी अधम जाती म्लेंच्छ असल्यामुळें माझे हातून फार वाईट कृत्य झालें! आतां मीं काय करूं! ला-इल्ला—इल्लिल्ला-हु—महंमद रसुल्ला. आतां माझ्या अपराधाची क्षमा असावी.

**सरदारः**—मी खरोखर दुष्ट महा पातकी म्लेंच्छ असल्यामुळें आपल्या स्वरूपाचें मला ज्ञान झालें नाहीं. आपणच अल्ला ताला आहांत. मी आपलें लेंकरूं आहें. मला माझ्या अपराधाची क्षमा केली पाहिजे.

**श्रीसदाशिवेंद्रस्वामीः**—माझा तुझा पूर्वींच्या कोणत्यातरी जन्मांचा असा संबंध असेल. त्यायोगानें तुझ्याकडून विनाकारण अशी गोष्ट तुझ्या-हातून झाली त्याचें मनांत तूं दुःख बाळगूं नकोस.

**सरदारः**—हे खुदाताला! परवर दिगार!! माझे अपराध पोटांत घालून मजवर अनुग्रह करावा.

ह्याप्रमाणें म्लेंच्छ सरदाराची प्रार्थना ऐकून श्रीसदाशिवेंद्रस्वामी विचार करूं लागले कीं, हा म्लेंच्छ असल्यामुळें याला कोणता उपदेश करावा? नंतर त्यांनीं त्याला सांगितलें कीं, मन मानेल तसें करूं नये; असें ह्मणून त्याचा शक्तिपात केला. त्यामुळें हा सरदार गुरूच्या आज्ञेप्रमाणें वागूं लागला व त्यांच्या कृपेनें त्यानें मनास जिंकून वासनांचा क्षय केला. त्यामुळें त्याला वैराग्य प्राप्त झालें. पुढें तो सर्व उपाधी सोडून ईश्वरस्तवन करूं लागला व त्यानें सद्गति प्राप्त करून घेतली. याप्रमाणें साधुपुरुष अपकार करणाऱ्यावरही उपकारच करितात. ह्मणून जे लोक अशा सत्पुरुषांची श्रद्धेनें सेवा करितात त्यांस उत्तम फळ कां मिळणार नाहीं?

अवश्य मिळालेंच पाहिजे.

श्रीसदाशिवेंद्रस्वामींनीं आपणास आतां समाधि घ्यावयाची असा विचार करून प्रथमतः समाधि तयार करविली. आपण त्या समाधींत जाऊन आसन घालून बसले. आणि वरून समाधि बंद करविली. ह्याप्रमाणें त्यांनीं जीवंत समाधी घेतली. या समाधीला लोक नवस करितात व त्यामुळें त्यांची कार्य सिद्धि होते. अशी अद्याप प्रचीती येत आहे.

या समाधीला श्रीगुरुमूर्तींनीं प्रार्थना पूर्वक नमस्कार करून ते तेथून फिरत फिरत तंजावरास गेले. त्याठिकाणीं अवधूतराव नागराजपंत यांच्याकडे दत्तजयंती केली. तेथून कालहस्तीस जाऊन श्रीशैल्यपर्वताच्या पायथ्याशीं कृष्णातीरीं येऊन समुद्रतीराचे भागानें संचार करूं लागले. वसंत ऋतुप्रीत्यर्थ क्षौरकरविण्यासाठीं शुक्लचतुर्दशी दिवशीं सायंकाळीं कृष्णातीरीं चामरती गांवीं गेले. त्या गांवांत उतरण्यासारखी जागा न मिळाल्यामुळें कृष्णानदीच्या तीरीं जाऊन मुक्काम ठेविला. त्याठिकाणीं क्षौर संबंधी विधीची तजवी झाली नाहीं, ह्मणून ते श्रीकृष्णेला सांगूं लागले:—

हे माते ! आपल्या विषयींचा मी अभिमान बाळगीत असतांही आपण मज विषयीं अभिमान बाळगीत नाहीं असें दिसतें, तर याकरितां मी आजपासून क्षौर करविणार नाहीं. आणि दंडत्याग करून स्वेच्छानुसार वाटेल तिकडे फिरेन. आजपासून आपल्या आज्ञेंत वागण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. या प्रकारची प्रार्थना करून श्रीगुरुमूर्ती तेथें निद्रिस्थ झाले. त्यावेळीं श्रीकृष्णाबाईनें त्यांला दर्शन देऊन सांगितलें, मला तुमच्याबद्दल अभिमान आहे. तें ऐकून श्रीगुरुमूर्तींनीं तिला वंदन केलें व प्रार्थना केली कीं,

कृष्णा नः पातु तृष्णाहरमधुरसा चिद्रसा सारसाक्षी ॥
साक्षीभूता नतानां निखिलमलहरा या हराऽनंतमूर्तिः ॥
ऊर्मिर्ध्या भीतिनिघ्नी सकलहितरता तारतम्यव्यतीताऽ ॥
तीतानाकविमतर्गा जगति गतियदकप्रातिरेषा त्रिशेषा ॥१॥
कृष्णावेणी सततलरुणी वीक्षिता मध्यनीवृ- ॥
द्भापा वेषा सुपुष्पवपुषा भासमाना समाना ॥
मानातीताऽपि खलु भजतां दृश्यतां याति माना ॥

मामा पार्श्वेरिव उपरि परिक्रांतिवार्ता मयीह ॥ २ ॥
तव गुणगणं वारंवारं सुधारुचिरं चिरं ॥
भगवति सति स्मारं स्मारं परं त्ववरं वरं ॥
नलषति मतिः सारंसारं विचार्य परावरं ॥
लपति महसो दूरं दूरं प्रदर्शयतं परं ॥ ३ ॥
कृष्णे कृष्णतनो मनोहरकथे नाथेश्वरि प्रार्थये ॥
दत्तं दत्तपरं प्रदर्शय परं नातो वरं त्वर्थये ॥
अन्यं योऽस्ति ते तटेनट इवानेकांगधारीहरिः ॥
संसारारिररिंदमः शमपरः साक्षाद्य आत्मा परः ॥ ४ ॥
प्रत्यक्षगयाहितस्व-हृत्सुमहत्सुदेव ॥
उद्यन्स्वयं हरति हार्दतमः स एव ॥
तीरे भ्रमत्यनुदिनं तव भावगम्यं ॥
तं दर्शयाद्य कृपयाऽप्यनुपाधिगम्यं ॥ ५ ॥

याप्रमाणें प्रार्थना करून श्रीगुरुमूर्तींनीं वंदन केल्यावर तें रूप अंतर्धान पावलें.

रात्रीं कृष्णाबाईनें एकसमयावच्छेदेंकरून सर्व लोकांस आपलें भयंकर स्वरूप दाखवून स्वप्नांत सांगितलें कीं, हे दुष्टांनो! तुमच्या गांवांत संन्यासी आले असून तुम्ही त्यांना उतरण्यास जागा सुद्धां दिलीनाहींत त्यामुळे तुमच्यावर त्यांची अवकृपा होऊन थोड्याच दिवसांत महत्संकट येऊन पडेल. आणि त्या संकटांत सांपडून विनाकारण मृत्यु मुखांत पडाल. या विपत्तींतून सुटण्याची तुमची इच्छा असेल तर त्यांना शरण जाऊन आपल्या अपराधांची त्यांच्याजवळ क्षमा मागा व त्यांला संतुष्ट राखून त्यांचा आशिर्वाद मिळवा.

असें स्वप्न पाहून गांवांतील सर्व लोक जागे झाले आणि एकमेकांला स्वप्नातील हकिगत सांगूं लागले. एकच प्रकारचें स्वप्न सर्वांस एकदम पडल्याचें समजतांच ते सर्वजण अतिशय गर्भगळीत झाले. सकाळ होतांच ते सर्व एकत्र जमून संन्याशाचा ( श्रीगुरुमूर्तींचा ) शोध करीत करीत कृष्णानदीवर आले. त्याठिकाणीं स्वामीमहाराज दृष्टीस पडतांच त्या

सर्वांनीं त्यांस साष्टांग नमस्कार घातला.

**ग्रामस्थः**– ( सद्गदित कंठानें ह्मणाले, ) आह्मी सर्व अज्ञानी असून पातकी आहोंत ह्मणून काल रोजीं आमचे कडून आपला आदर सत्कार झाला नाहीं. तसेंच आपलें स्वरूप आह्मांला ओळखितां आलेंनाहीं. आह्मीं अज्ञान लेंकरें आहोंत. आमच्या वर कृपाकरून गांवांत यावें व आह्मांला आपली कायआज्ञा असेल ती सांगावी व सेवा करून घ्यावी.

ग्रामस्थांच्या आग्रहा वरून श्रीगुरुमूर्ती गांवांत गेले. त्याठिकाणी यथा विधी क्षौर करविलें. व पंधरा दिवस मुक्काम केला. तेथून कृष्णा तीरींच असणाऱ्या मुक्तीश्वर क्षेत्राला ह्मणजे ज्याला हल्लीं मुक्तयाला ह्मणतात तेथें जाऊन चातुर्मास केला. याठिकाणीं श्रीगुरुमूर्तींनीं युवा शिक्षा, वृद्ध शिक्षा आणि स्त्री शिक्षा हे तीन ग्रंथ लिहून तयार केले.

चातुर्मास संपल्यावर श्रीगुरुमूर्ती हंसला देवीस ( ज्या ठिकाणीं कृष्णा नदी समुद्राला मिळते त्या ठिकाणीं ) आले. तेथून काकीनाळा नजीक पीठापूर येथें आले. त्याठिकाणीं श्रीपाद श्रीवल्लभ महाराजांच्या जन्मभूमीचें दर्शन घेऊन तेथून राजमहेंद्री येथें गेले. ब्रह्मानंद स्वामींच्या आग्रहा वरून त्या ठिकाणीं कांहीं दिवस राहिले. त्यावेळीं श्रीगुरुमूर्तींची आज्ञा घेऊन ब्रह्मानंद स्वामींनीं त्या ठिकाणीं श्रीदत्तपादुकांची स्थापना केली.

राजमहेंद्रीजवळ कोडार गांवीं श्रीपाद आप्पाशास्त्री यांच्या बहिणीला पिशाच्च बाधा होती. त्यामुळें ती पुष्कळ वेळ बेशुद्ध पडत असे. शास्त्रीबुवा तिला घेऊन श्रीगुरुमूर्तींकडे आले व ह्मणाले महाराज ! या माझ्या बहिणीला वात विकार जडल्यामुळें ही वारंवार बेशुद्ध होऊन पडते तरी हिला कांहीं उपाय सांगण्याची कृपा व्हावी.

**श्रीगुरुमूर्तीः**–शास्त्रीबुवा ! तुह्मी पिशाच्चयोनी सत्य मानितां काय ?

**श्रीपादशास्त्रीः**–पिशाच्च ही एक योनी आहे. परंतु त्या योनीचा मनुष्य योनीसी कांहीं संबंध आहे असें मी कांहीं प्रत्यक्ष कधींही पाहिलेलें नाहीं.

**श्रीगुरुमूर्तीः**—शास्त्रीबुवा ! तर मग मी तो आतां तुह्मांस प्रत्यक्ष दाखवितो पहा. ह्या तुमच्या बहिणीस पिशाच्च बाधा आहे. असें सांगून

एक मातीची वीट आणवून तिच्यावर एक यंत्र लिहून त्याला दिलें. आणि त्याचे विधान दाखवून सांगितलें कीं, दररोज संध्याकाळीं या विटेवर गुग्गुळाचा धूप देऊन दिलेल्या मंत्राचा एकवीस वेळा जप करावा. या प्रमाणें एकवीस दिवस करीत जावें ह्मणजे तो पिशाच्च आपली हकिगत सांगून निघून जाईल. त्याप्रमाणें त्यांनीं करितांच पांच सहा दिवसांत तें पिशाच्च बोलूं लागलें. त्यानें आपणास पिशाच्यत्व प्राप्त होण्याचें कारण सांगून बाईशीं असलेला आपला संबंधही सांगितला.

**पिशाच्च:**—मी या बाईस सोडून जाणार नव्हतों परंतु स्वामीमहाराजांचा ताप सोसवत नाहीं. या करितां आतां माझ्यासाठीं अमुक कार्य करा ह्मणजे मी निघून जातों व पुन्हा येणार नाहीं. असें ह्मणून तें पिशाच्च निघून गेलें. तें पाहून श्रीपादशास्त्री आश्चर्य चकीत झाले. त्यांनीं आपल्या बहिणीस बरें वाटल्यावर श्रीगुरुमूर्तीस झालेली सर्व हकिगत कळविली. त्यावर त्यांनीं विचारिलें. कां ? शास्त्री ! पिशाच्च पीडा देतें कीं नाहीं ?

**शास्त्री:**—महाराज ! गोष्ट खरी आहे. पूर्वजन्मऋणानुबंधानें त्याचा संबंध पोहोंचतो. हें माझ्या बहिणीच्या उदाहरणावरून स्पष्ट होतें. असें ह्मणून त्यांनीं श्रीगुरुमूर्तीस साष्टांग नमस्कार घातला व त्यांचे आभार मानिले.

याप्रमाणें दरएकाची पीडा होत दूर गेल्यानें प्रत्येक ठिकाणीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी दर्शनार्थ येऊं लागल्या. तैलंगण द्रवीड वगैरे देशांत श्रीगुरुमूर्तीस प्रत्यक्ष ईश्वरी अवतार आहेत असें सर्व लोक मानूं लागले. व मोठमोठे पंडीत लोक सुद्धां दर्शनास येऊं लागले. याठिकाणीं सीतारामबुवा श्रीगुरुमूर्तीस भेटले. व स्वतःस हरीहर क्षेत्रीं संन्यास घेण्याबद्दल झालेला दृष्टांत त्यांनीं ब्रह्मानंद स्वामीच्या मार्फत त्याला कळविला. तेव्हां श्रीगुरुमूर्ती ह्मणाले कीं,

**उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानमवसादयेत् ॥**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ १ ॥**

याप्रमाणें सीतारामबुवास सांगा. ही हकिगत ब्रह्मानंद स्वामींनी सीतारामबुवांस कळविली. त्यावरून ते समजले कीं, श्रीगुरुमूर्ती आपणास

संन्यास देणार नाहींत. त्याठिकाणी गर्दी फार झाल्यामुळें श्रीगुरुमूर्ती अरण्यांत शिरले आणि उत्तरेस जाऊं लागले.

श्रीनरसोबाच्या वाडीचे राहणारे दत्तु दीक्षीत यांची कन्या सीताबाई हिचें लग्न मिळवडीस झालें होतें. ही कन्या आपल्या पतीची सेवा करीत असूनही स्वरूपानें काळी असल्यामुळें तिच्या नवऱ्यानें दुसरें लग्न केलें. ही बाई फारच श्रद्धाळू असून स्वामीमहाराजांचें दर्शन झाल्यापासून ती त्यांला ईश्वराप्रमाणे समजत असे. एकदां महाराज धूळवाटेनें जात असतां त्यांची पावलें उमटलीं होतीं तेथील थोडी धूळ घेऊन त्या बाईनें एका डबींत ठेविली व त्या डबीची ती नित्य पूजा करूं लागली.

तिला तिच्या नवऱ्यानें अन्नवस्त्राकरितां थोडी जमीन दिली होती तींत जोंधळे पेरून ती आपला उदर निर्वाह करीत असे. एकदां तयार झालेलें पीक खळ्यांत आणून साफ करीत असतां एकदम पाऊस पडूं लागला. त्यामुळें ती घाबरून रडूं लागली. इतक्यांत तिच्या मनांत आलें कीं, यावेळीं मला सहाय्य करणारा स्वामी महाराजांशिवाय दुसरा कोणीच नांहीं. असें ह्मणून तिनें घरांतून डबी आणिली व त्यांतून श्रीगुरुमूर्तींच्या पायांची धूळ काढून खळ्याच्या सभोंवतीं टाकिली व नवस केला कीं, हे महाराज! आपण या संकटांतून जर मला सोडवाल तर मी वाडीस येऊन ब्राह्मण भोजन करवीन. असें ह्मणून ती नामस्मरण करीत राहिली. चमत्कार असा झाला कीं, गांवांत पुष्कळ पाऊस पडला असतांही तिच्या खळ्यांत एक पावसाचा थेंबही पडला नाहीं, हें पाहून त्या बाईस अत्यानंद झाला. नंतर तिनें वाडीस येऊन ब्राह्मण भोजन घातलें. याप्रमाणें श्रीदत्तभगवानानीं तिचें संरक्षण केलें हें केवळ तिच्या श्रद्धेचें फळ होय.

सिद्धपूर येथें श्रीरणछोडजीचे पुजारी कृष्णभट्ट गोपाळभट्ट हे होते. त्यांची श्रीगुरुमूर्तींवर फार श्रद्धा होती. ज्यावर्षी त्यांस ( संवत १९५६ ) श्रीगुरुमूर्तींचें दर्शन झालें त्यावर्षापासून दरसाल श्रीगुरुमूर्तींचें दर्शन करण्याचा त्यांचा नेम होता. गेल्या सिंहस्थांत त्यांनीं गोदावरीचें स्नान करून मुक्तीश्वर तीर्थावर जाऊन श्रीगुरुमूर्तींचें दर्शन घेतलें. तेथून भडोच येथें जा-

ऊन नर्मदेचें स्नान केलें व गांडाबुवासाठीं श्रीगुरुमूर्तींनीं दिलेला प्रसाद त्यांला देऊन तेथून सिद्धपुरास गेले. त्यानंतर फाल्गून मासांत आजारी झाल्यामुळें कृष्णभटजींनीं आतुर संन्यास घेतला व आपल्या मुलाला आणि इतर आप्त स्वकीय वर्गांतील सर्व मंडळीला सांगितलें कीं. माझी प्रकृति बरी आहे; तुह्मी सर्वजण जेवण करून या. असें ह्मणून आपण श्रीरणछोडजीच्या मूर्तीजवळ समोर जाऊन बसले. आणि श्रीगुरुमूर्तीचें ध्यान धरून मोठ्यानें प्रणवोच्चार करून शरीर त्याग केला. अशा प्रकारें कृष्णभटजींनीं क्रममुक्ति साध्य करून घेतली. हें त्यांच्या केवळ श्रीगुरुमूर्तीवर असणाऱ्या अचल श्रद्धेचें फळ होय.

बेळगांव येथें धोंडोपंत काळकुंदरीकर या नावांचे मोठे सावकार होते. त्यांच्या बापावर कोणी जारण मारण प्रयोग केलाहोता. त्यांतून प्रारब्ध योगानें कांहीं उपायप्रयोग केल्यानें ते त्यांतून वांचले. परंतु त्यांची वाचाबंद होऊन त्यांना सर्वप्रकारें विस्मृति प्राप्त झाली. ती इतकी कीं, नेहमी ह्मणण्यांत येणारी संध्येंतील केशव, नारायण, माधव वगैरे नांवेंही त्यांस एकामागून एक सांगण्या साठीं दुसऱ्या मनुष्याची गरज लागूं लागली.

श्रीगुरुमूर्ती वाडीस आल्याचें समजतांच धोंडोपंत आपल्या बापास घेऊन वाडीस आले. श्रीगुरुमूर्तींनी त्याला पाहण्या बरोबर सांगितलें, कीं याचेवर कोणी मारण प्रयोग केला आहे व तो प्रयोग करविणारालाही वाईट दशा प्राप्त झाली आहे.

**धोंडोपंतः**—हे भगवान! माझ्या पित्यावर आपली कृपा झाली पाहिजे.

**श्रीगुरुमूर्तीः**—तुझा पिता हल्लीं ज्या स्थितींत आहे त्याच स्थितींत राहण्यापासून त्याचा फायदा आहे, ह्याकरितां मी त्या कामां हात घालीत नाहीं.

श्रीगुरुमूर्तींचें वचन ऐकून धोंडोपंतानें आग्रह सोडून दिला. पुढें त्याच्या पित्याचा मरण समय जवळ आला तेव्हां श्रीगुरुच्या कृपेनें तीन दिवस अगोदर ते बोलूं लागले. त्यांनीं सांगितलें की, धोंडोपंत बाहेर गेला आहे त्याला बोलावून आणा; मी परवां परलोकीं जाणार आहें.

दुसऱ्या दिवशीं एकादशी असल्या कारणानें त्यानें त्या दिवशीं उपवासकेला. दुसऱ्या दिवशीं द्वादशीला कालकुंदरी गांवीं लक्ष्मीनारायणाचें देवालय होतें तेथें दर्शनासाठीं गेले. त्या ठिकाणीं बरोबरच्या मनुष्याला सांगितलें, मला दुसऱ्या देवाच्या दर्शना साठीं जावयाचे आहे. तें ऐकून ब्राह्मण ह्मणाले ह्या वेळीं पाऊस फार पडत आहे करितां संध्याकाळीं आपणास दर्शनास घेउन जाऊं. तें ऐकून ह्मातारा ह्मणाला, मला आणखी एकवेळ देवाचें दर्शन करूंद्या. असें सांगून लक्ष्मीनारायणाजवळ जाऊन त्यामूर्तीचें ध्यान करून तिला साष्टांग नमस्कार घातला व ईश्वर नामाचा उच्चार करून देहसोडिला. ह्मातारा नमस्कार घातलेल्या जाग्या वरून बराच वेळ उठतनाहीं असें पाहून सोबतच्या ब्राणह्मानें त्याला उठविण्याचा प्रयत्न केला, तेव्हां त्याचें शव त्याच्या हातास लागलें. इतक्यांत अनायासें त्याचा पुत्र धोंडेपंत तेथें आला. त्यानें आपल्या पित्याची और्ध्वदेहीक क्रिया केली. याप्रमाणें श्रीगुरुमूर्तीच्या वचनावर विश्वास ठेविल्यानें प्रत्येकास फळ प्राप्ति होत गेली. श्रीगुरुमूर्ती अरण्यांतून वैनगंगा व गोदावरी याचा संगम होता तेथें मंथनकाळेंश्वरगांव आहे तेथें येऊन राहिले. ती जागा उपाधी रहित एकांताची आहे असें जाणून श्रींनीं त्याठिकाणीं चातुर्मास करण्याचा विचार ठरविला. तेव्हां श्रीदत्तात्रयांनीं सांगितलें कीं, चातुर्मा साला अझून वेळ आहे करीतां तुह्मी हळू हळू पुढें चला. येथें मुक्काम करूं नका.

**श्रीगुरुमूर्ती**:—हे भगवान्! पुढें गेल्यावर उपाधी नडेल ह्मणून येथें जंगलांतच मी चातुर्मास करीन.

**श्रीदत्तभगवान**:—अशा अवघड अरण्यांत चातुर्मास करण्याचें कारण नाहीं. या ठिकाणाहून पुढें जाणेंच चांगलें.

श्रीगुरुमूर्तीनें तें न ऐकल्यामुळें श्रीदत्तभगवंतानीं यवनरूप धारण करून हातांत काठी घेऊन श्रीगुरुर्ती जवळ येऊन त्यांचा तिरस्कार केला आणि ह्मणाले येथून उठतोस कीं नाहीं? जर तूं उठत नसलास तर या वेताच्या काठीनें तुला यथेच्छ चोपून काढीन. याप्रकारचें भाषण ऐकून व तें क्रोधयुक्त स्वरूप पाहून श्रीगुरुमूर्तीनीं प्रार्थना केली.

**तव कोपा वंदूं रुद्रा । तव चापा वंदूं भद्रा ॥ १ ॥**
**तव बाणा वंदूं भीमा । तव बाहू वंदूं सोमा ॥ २ ॥**
**शिव होवो बाण तुझा ॥ शिव होवो चाप तुझा ॥ ३ ॥**
**शरव्या शिव होवो ते । नित्य रक्षिं याहीं मातें ॥ ४ ॥**
**पापघ्नी शिवतनु तूझी । गिरिशा ती त्राती माझी ॥ ५ ॥**
**परिवारासह आम्हातें । रुद्र रक्षो शस्त्रहस्तें ॥ ६ ॥**
**तव महिमा वासुदेवा । न वर्णवे सदाशिवा ॥ ७ ॥**

याप्रमाणें प्रार्थना करून नमस्कार केल्याबरोबर तें श्रीदत्तात्रयाचें क्रोधयुक्त उग्र स्वरूप शांत झालें. आणि आनंदमय मनोहर दिसूं लागलें.

**श्रीगुरुमूर्तीः**—हे श्रीगुरुदत्तात्रया ! येथून पुढें जावें अशी आपली इच्छाच आहे तर आतां मी जातों. हें त्यांचे भाषण ऐकून श्रीदत्त महाराज त्याच ठिकाणीं अंतर्धान पावले.

श्रीगुरुमूर्ती काळेश्वर सोडून हळू हळू वैनगंगातीरीं पवनीं गांवीं आले, तेथें विठोबाच्या मंदिरांत शके १८३१ सालचा चातुर्मास केला.

याठिकाणीं श्रीगुरुमूर्तीच्या दर्शना करितां दूरदूरचे हजारों लोक येत असत. तेथें रोज ब्राह्मण भोजन होत असे व त्याची व्यवस्था सीताराम बुवा ठेवीत असत. समारंभास आलेल्या लोकांपैकीं हिंदुधर्मास असंगत असा चेहरा ठेविलेले, पुनर्विवाहास संमति देणारे, ब्राह्मणाशिवाय इतर जातीचा गुरु ज्यानीं केला आहे, अशा प्रकारच्या लोकांस श्रीगुरुमूर्ती दर्शन देत नसत इतकेंच नव्हे तर त्याना पंक्तीतून उठवून लावीत असत.

पवनीच्या आजूबाजूच्या गांवीं प्लेग फार जोरांत असल्यामुळें तेथील लोक घाबरले. त्यावेळीं श्रावण वद्यांत श्रीगुरुमूर्तीच्या दर्शनास येणाऱ्या लोकांची अतिशयच गर्दी होऊं लागली. गांडाबुवाचा मुक्काम मुरलीधराच्या देवळांत होता तेथें एकाएकीं उंदीर मरून पडला, ही हकिगत लोकांनीं श्रीगुरुमूर्तीस कळविली. त्यावरून त्यानीं श्रीदत्तात्रयाची प्रार्थना केली कीं आपल्या आज्ञेप्रमाणें मी याठिकाणीं चातुर्मासाचा आरंभ केला आहे. व त्यामुळें आपले बाळगोपाळ आपल्या दर्शना करितां येथें जमा झाले आहेत त्यांला विघ्न येईल असें दिसत आहे तर मी चातुर्मास संपण्या-

पूर्वी येथून निघतों.

**श्रीदत्तमूर्ती:**— हे भक्तजन हो ! तुह्मी याठिकाणीं सुखानें चातुर्मास करा. येथें तुह्मी आहांत तोंपर्यंत कोणतेंही विघ्न याव-याचें नाहीं. हें ऐकून नंतर श्रीगुरुमूर्तींनीं सर्व लोकांस सांगितलें कीं, चा-तुर्मास संपेपर्यंत वाटेल त्यानें वाटेल त्याठिकाणीं राहावें, कांहीं चिंता करूं नये. तेथें आल्यागेल्यांचा बंदोबस्त नानादशपुत्रे व विठ्ठलराव काळीकर आणि त्यांचे कारभारी बळवंतराव हे ठेवीत असत.

या ठिकाणीं नर्मदानदीचे कांठावरील मंडला महाराजपूर येथील भैरवप्रसाद बाजे पै यानावांचे कान्यकुब्ज जातीचे ब्राह्मण श्री-गुरुमूर्तीस शरण आले. त्याला मुलें होऊन लगेच मरत असत. अशीं चार मुलें मेलीं, पांचवा मुलगा झाला व तोही जन्मतांच मरण पावला. तें मूल मरण पावतांच एक जटाधारीबुवा सूतिकागृहांत शिरला व त्या ठिकाणीं असलेल्या मंडळींत घुसून त्या मुलाच्या प्रेतास घेऊन तेथेंच गुप्त झाला. हे पाहून तो ब्राह्मण आणि त्याची बायको व इतर जमलेली मंडळी घाबरून गेली आणि विचार करूं लागली कीं, ह्या प्रेतास घेऊन जाणारा जटा-धारी कोण ? त्यानें तें शव कोठें नेलें ? या बाबतींत पुष्कळ तपास केला, परंतु शोध लागेना. शेवटीं नर्मदातीरवासी ब्राह्मणाकडे विचारपूस करितां त्यांनीं सांगितलें, अशा गोष्टी आह्मांस कांहीं कळत नसतात. ह्मणून तुह्मी श्रीगुरुवासुदेवानंदसरस्वतीस्वामी यांचा शोध करा आणि त्यांला विचारा ह्मणजे तुह्मांस ह्या गोष्टीचा खुलासा मिळेल. ते स्वतः श्रीदत्तअवतार आ-हेत. ह्मणून योग्य सल्ला देऊन तुह्मांला या दुःखांतून मुक्त करितील.

तो ब्राह्मण नंतर श्रीगुरुमूर्तींचा तपास करित करित पवनीस आला त्याठिकाणीं त्यास श्रीगुरुमूर्ती भेटले व त्यांनीं आपली सर्व हकिगत त्यांस निवेदन केली. त्यावेळीं श्रीगुरुमूर्ती ह्मणाले. तुझ्या वंशांत एकास पिशाचत्व कांहीं कारणामुळें प्राप्त झालें आहे. तोच तुझ्या संततीचा नाश करून वरच्या माणसांस पीडा करितो. यानेंच जटाधारी पुरुषाचें रूप घेऊन बा-ळंतिणीच्या खोलींतून तुझ्या मुलाचें प्रेत नेलें आहे. जोंपर्यंत या पिशा-च्याची इच्छा तूं पूर्ण करणार नाहींस तोंपर्यंत तुझे वंशाची वृद्धि होणार

नाहीं. त्यावर भैरवप्रसाद ह्मणाले, हे भगवंत ! आपण सांगाल त्याप्रमाण करण्यास मी तयार आहें.

श्रीगुरुमूर्तीनीं त्याला पिशाच्चबाधा निवारणार्थ नारायणबळी, विष्णु सहस्त्रनामाचे एक हजार पाठ आणि कृछ्रादीक प्रायश्चित्त करावयास सांगितलें व एक यंत्र दिलें आणि सांगितलें कीं, मी दाखवीन त्याप्रमाणें यथाविधी कार्यें करावीं ह्मणजे या पुढें तुझ्या संततीस धोका येणार नाहीं. त्या ब्राह्मणानें श्रीगुरुमूर्तींच्या सांगण्याप्रमाणें एका विष्णुसहस्त्रनामाच्या पाठास एक रुपायाप्रमाणें ब्राह्मणास दक्षिणा देऊन त्यांच्याकडून एक हजार पाठ करविले. तरी त्याच्या घरांतील पिशाचबाधा कमी झाली नाहीं. त्यावेळीं भैरवप्रसाद पुनः श्रीगुरुमूर्तीजवळ गरुडेश्वरीं आला व ह्मणाला, हे भगवान् आह्मी आपल्या आज्ञेप्रमाणें केलें तरी अद्याप आमची पीडा कमी झाली नाहीं.

**श्रीगुरुमूर्तीः**—भैरवप्रसाद ! ब्राह्मणांनीं पाठ बरोबर केले नाहींत.

**भैरवप्रसादः**–हे भगवान् ! यांत माझी कांहीं कसूर आहे काय ? मीं तर ब्राह्मणास हजार पाठांचे हजार रुपये दिले. मला माझी घरची मंडळी सांगत होती कीं, हे ब्राह्मण बरोबर पाठ करीत नाहींत. त्यावेळीं मीं ब्राह्मणांला सांगितलें कीं, पाठ बरोबर न कराल तर माझ्यावरचे सर्व दोष तुमच्यावर येणार आहेत. तरी ब्राह्मणांनीं पाठ बरोबर केले नाहींत.

**श्रीगुरुमूर्तीः**—बाबा ! संकल्प पूर्वक केलेल्या सकाम अनुष्ठानांत वैगुण्य आलें तर त्याचें फळ मिळत नाहीं. त्यासाठीं सकामी अनुष्ठान स्वतः केलें पाहिजे अथवा सुपात्र ब्राह्मणाजवळून करविलें पाहिजे, ह्याप्रमाणें शास्त्र व अनुभव सांगतात. ह्या कारणामुळें तूं खर्च केलेल्या रुपयांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आतां तुह्मी सुपात्र ब्राह्मणाकरवीं यथाविधी त्रिपिंडी श्राद्धकरवा ह्मणजे तुमची उपाधी दूर होईल.

नंतर त्या ब्राह्मणानें श्रीगुरुमूर्तींच्या आज्ञेनुसार श्राद्ध करविलें तेव्हां त्या पिशाच्चाच्या दुःखांतून मुक्त झाला.

भाद्रपद शुद्ध पौर्णिमेस चातुर्मास समाप्त झाल्यामुळें श्रीगुरुमूर्ती सीमोल्लंघनास निघाले. त्यावेळीं पुष्कळ यात्रा जमली होती. वैनगंगेचा

किनारा स्वर्गभुवनाप्रमाणें शोभायमान दिसत होता. संध्याकाळीं लोकांनीं तुपाचे अगणीत दिवे नदींत सोडिले होते. गांवांतही घरोघरीं दीपोत्सव सुरू होता. गांवांतील सर्व सुवासिनीबायका उत्तम उत्तम वस्त्रालंकार धारण करून हातांत आरत्या घेऊन श्रीगुरुमूर्तीस ओंवाळीत होत्या. नानाप्रकारचीं वाद्यें वाजत होतीं. वैदिकलोक एकत्र जमून वेदघोष करीत होते. हरिदास कथा करीत होते. शास्त्रीपुराणीक शास्त्रपुराणांची एकत्र होड्यांत बसून चर्चा करीत होते. वैनगंगेत जिकडे तिकडे मनुष्यांनीं गजबजलेल्या होड्या विस्तारल्या होत्या. श्रीगुरुमूर्ती नावेंत बसून सर्वलोकांस दर्शन देत देत समोरच्या कांठीं जात होते; त्या वेळीं लोकांनीं त्यांच्यावर पुष्पवृष्टि केली. संध्याकाळीं सातांच्या सुमारास स्वारी दुसऱ्या तीरीं येऊन पोहोंचली. त्यावेळीं गांडाबुवांनीं वाडीच्या पुजाऱ्यांकरवीं श्रीगुरुमूर्तींची अर्घ्यपाद्य पूजाकराविली. व मंत्र पुष्पांजली केली. त्यानंतर श्रींनीं श्रीमद्भगवद्गीतेच्या अकराव्या विश्वरूपदर्शन अध्यायाच्या पाठानें ईशस्तुती करून नंतर सर्वांस प्रसाद वांटिला. या समारंभाचे दिवशीं श्रीगुरुमूर्ती प्रत्यक्ष श्रीदत्तात्रय अवतार आहेत असें सर्वांस समजून आलें. नंतर नावेंत बसून रात्रीचे अकरा वाजतां पुनः मुरलीधराचे देवळांत आले. त्या ठिकाणी श्रींच्या परवानगीने विठ्ठलराव काळीकरानीं सर्वांस मानाप्रमाणें बसवून प्रसाद वांटला. त्या समयीं प्रत्येक जण आपलें देहभान विसरून तन्मय होऊन वैकुंठ भुवनांतील आनंद अनुभवित होते. त्याठिकाणीं विठ्ठलराव काळीकर मुन्सफसाहेब यांनीं गायनाचा बेत करविला. त्यामुळें तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें होऊन गेलें. हें गायन ताल, मान, राग, रागिणी ह्यांनीं युक्त असल्यामुळें जणूं गंधर्व, किन्नर, अप्सरादिकांचेंच गायन चाललें आहे असें भासूं लागलें. याप्रमाणें आनंदानुभव घेऊन सर्व मंडळी आपआपल्या घरीं गेली.

दुसऱ्या दिवशीं मुरलीधर मंदिराचे मालक विठ्ठलराव काळीकर मुन्सफ यांनीं श्रीगुरुमूर्तीस भिक्षेसाठीं राहून घेतलें. आणि ब्राह्मण भोजन पूर्वक श्रीगुरुमूर्तीस माधुकरी भिक्षा घातली.

श्रीनरसोबाच्यावाडींतील पुजाऱ्यांवर श्रीदत्तभगवानांची अवकृपा

झाल्यामुळें त्यांजवर अगणित संकटें येऊन कोसळूं लागलीं. तेव्हां त्यांतून सुटका होण्यासाठी श्रीगुरुमूर्तींस घेऊन यावें असा विचार ठरवून त्याप्रमाणें श्रीस नेण्यासाठीं अग्निहोत्रिबुवा, दत्तो वामन, अंतोबा वगैरे मंडळी पवनीस आली. त्यांनीं आपल्या दुःखाची हकिगत श्रीगुरुमूर्तीस निवेदन करून ते रडूं लागले व ह्मणाले कीं, महाराज! आपण श्रीदत्तभगवान् आहात. आह्मी आपलीं अज्ञान बालकें आहोंत. तरी आमचे अपराधांची क्षमा करून ह्या आपल्या लेंकरांस दुःखांतून मुक्त केलें पाहिजे. वाडींतील नीच लोकांचा त्रास आतां आमच्यानें सहन करवत नाहीं. यावेळीं आपण वाडीस येत नसल्यास आह्मीही तिकडे न जातां वाटेल तिकडे जाऊन आत्मघात करून देह ठेवूं असें ह्मणून प्रार्थना केली.

**माझी कोण गती गुरुनाथा ॥ कधिं तारिसी दिनानाथा ॥**
**मनापासुनियां सांगावें ॥ दासासीं धन्य करावें ॥ १ ॥**
**कोणा सांकडें हें घालूं ॥ कोणत्या देवा शरणचि जाऊं ॥ २ ॥**
**कां रे धरिलासी अबोला ॥ जीव माझा व्याकुळ झाला ॥ ३ ॥**
**बालकासी जैशी माता ॥ गजानना तुझे पाय ॥ ४ ॥**

अशी प्रार्थना करून साष्टांग नमस्कार केला. त्यावेळीं श्रीगुरुमूर्तीस श्रीदत्तात्रेयांची आज्ञा झाली कीं, सध्यां उत्तरेकडे जाणें बंद ठेवावें. आलेल्या रस्त्यानें परत जावें. तेव्हां श्रीगुरुमूर्तींनीं पूजाऱ्यांस सांगितलें कीं, तुह्मी वाडीस जा. मी दत्त आज्ञेप्रमाणें त्या बाजूस येतों.

अशा प्रकारचें श्रीगुरुमूर्तींचें वचन ऐकून सर्व मंडळीस फार आनंद झाला व त्यांनीं सुखानें भोजन केलें.

सावंतवाडी येथें राहाणारे नारायणराव उफिडवे या नांवाचे गृहस्थ श्रीगुरुमूर्ती पवनीस असतां त्याठिकाणीं आले होते. ते पूर्वी फार नास्तीक होते. ते पूर्वजन्म, पुनर्जन्म नाहीं असें ह्मणत असत. ते सावंतवाडी येथें अव्वल कारकून होते. त्याठिकाणीं प्रारब्ध वशात् त्यांला विष्णुपंत अणावकर यांचा परिचय झाला. ते त्यांस ह्मणाले तुह्मी सवडीप्रमाणें दररोज आमचे घरीं येत जा. ह्मणजे पुनर्जन्माबद्दल मी तुमची खात्री करून देईन. त्यावरून नारायणराव दररोज त्यांच्या घरीं जाऊं लागले. ह्या अणावकरा

बद्दलची माहिती पूर्वी येऊन गेली असल्यामुळें तिचा पुनरुच्चार करून स्थल अडविणें बरोबर नाहीं. हे आंगावर असणाऱ्या संबंधाच्या साह्यानें पुष्कळांला पिशाच दुःखातून मुक्त करीत असत.

ही हकिगत वारंवार नारायणरावांच्या दृष्टीस पडूं लागली. तेव्हां हें ढोंग तर नाहींच अशीं त्यांची खात्री झाली. पिशाच्चें आपल्या पूर्वजन्माची हकिगत सांगून पिशाच्चत्व प्राप्त होण्याचें कारण व पीडा देण्याचें ही कारण सांगतात, इतकेंच नव्हे तर त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या ह्मणजे तीं पीडा देण्याचें बंद करितात. यावरून पुनर्जन्म आहे असें सिद्ध होतें. जर पुनर्जन्म आहे तर कर्म असलेंच पाहिजे व जर कर्म आहे तर त्याचे शुभ आणि अशुभ असे दोन भेदही असलेच पाहिजेत. ह्या करितां शास्त्रामध्यें सांगितलेलें कर्म प्रत्येकानें अवश्य केलेंच पाहिजे. याप्रमाणें खात्री होऊन नारायणराव श्रीगुरुमूर्तीस शरण आले व तेव्हां पासून ते रोज ब्रह्मकर्म करून श्रीदत्तात्रेयाची सेवा करूं लागले.

श्रीगुरुमूर्तींनीं लिहिलेलें संस्कृत गुरुचरित्र नारायणरावांनीं छापवून तें ते भाविकांस फुकट देत आहेत. पुढें ते इतके श्रद्धाळु झाले कीं ईश्वरी कृत्यांस पुरता वेळ मिळत नाहीं ह्मणून त्यांनीं नोकरी सोडण्याचा विचार केला व त्याला श्रीगुरुमूर्तींची संमति मिळवून त्यांनीं नोकरी सोडून दिली. पेन्शन मिळत असतांही ती न घेऊन पति–पत्नि गांवांतून भिक्षान्न मागून आणून श्रीदत्त सेवा करूं लागलीं. श्रीगुरुमूर्तींच्या आज्ञेनें नारायणरावांनीं गायत्री पुरश्चरणही केलें.

श्रीगुरुमूर्ती पवनी येथें असतांना श्रीदत्तमहाराजांनीं नारायणरावांस स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, तूं संस्कृत गुरुचरित्राचा स्वाहाकार कर. हें ऐकून नारायणरावानें दुसरें दिवशीं श्रीदत्तमहाराजांस विनंती केली कीं, मजजवळ पैसा नाहीं. त्यावरून पुन्हां दृष्टांत झाला कीं, येथील जज्ज श्रद्धाळू ब्राह्मण आहेत. त्यांच्याजवळ गेल्यानें तुला पैसे मिळतील. दुसरे दिवशीं नारायणरावानें जज्ज साहेबांकडे जाऊन रात्रीं आपणास झालेला दृष्टांत त्यांस सांगितला. त्यावरून त्यांनीं लगेच पैसे देण्याविषयीं रुकार दिला. इतक्यांत सावंतवाडी येथें प्लेग सुरू झाला. त्यावरून नारायण-

रावांनी श्रीदत्तमहाराजांची प्रार्थना केली. त्यावेळीं त्यास उत्तर मिळालें कीं, प्लेग बंद होईल. तूं गुरुचरित्राचा स्वाहा कार कर. ह्याप्रमाणें त्यांस दृष्टांत होतांच दुसरे दिवशीं प्लेग बंद झाला.

त्यांनीं ही हकिगत पत्रद्वारें श्रीगुरुमुर्तीस कळवून स्वाहाकार करण्याची आज्ञा मागितली. श्रीगुरुमूर्तींनीं उत्तर दिलें कीं पुराणाच स्वाहाकार होत नसतो. यासाठीं गुरुचरित्राचा स्वाहाकार करूं नये.

श्रीदत्तभगवान् नारायणरावांस ह्मणाले, ज्या प्रमाणें कोल्हापुरास ज्योतिपंतबुवांनी भागवताचा स्वाहाकार केला, त्याप्रमाणें तूं गुरुचरित्राचा स्वाहाकार कर. तरी सुद्धां नारायणरावांनीं स्वाहाकार करण्याचें तहकूब करून श्रीगुरुमुर्तीस पत्रनीमध्यें पत्र लिहिलें. त्यांनी पुनः करूं नये असेंच पत्रोत्तर पाठविलें.

ही हाकिगत गांडाबुवास कळतांच त्यानें श्रीगुरुमुर्तीस विचारिलें कीं आपण स्वाहाकार करण्यास नारायणरावांस नको कां ह्मटलेंत ?

**श्रीगुरुमूर्तीः**— गांडा ! आजकाल माझ्यासारख्या अज्ञानी माणसानें लिहिलेल्या पुस्तकाचा स्वाहाकार होऊं शकत नाहीं. माझ्यासारख्यांनी लिहिलेलीं पुस्तकेंही पण वाचण्याच्या योग्यतेचीं नाहींत.

**गांडाबुवाः**— गुरुजी ! आपण लिहिलेलीं संस्कृत व प्राकृत पुस्तकें मी वेदाक्षर समजतों. असें नसतें तर स्वतः श्रीदत्तभगवानानें नारायणरावास आपल्या संस्कृत गुरुचरित्राचा स्वाहाकार करण्यास आग्रहपूर्वक आज्ञा केली नसती.

तुह्मी एका बाजूनें स्वाहाकार करण्याची आज्ञा कारितां व दुसऱ्या बाजूनें नाहीं ह्मणतां हें गारूड माझ्यासारख्या अज्ञानी मनुष्यास समजत नाहीं.

**श्रीगुरुमूर्तीः**—गांडा ! देवानें भलतीच गोष्ट करण्यास सांगितली तर ती करावी काय ?

**गांडाबुवाः**—गुरुजी ! अवश्य केलीच पाहिजे. आमच्यासारख्या पामरानें देवाची आज्ञा उल्लंघन कशी करावी ?

**श्रीगुरुमूर्तीः**— गांडा ! तर मग देव सांगतात तें खरें कीं मी

सांगतों तें खरें ?

**गांडाबुवा:**—मी आपलें व देवाचें सांगणें खरें मानितों. कारण आपण व देव वेगळे नाहींत.

**श्रीगुरुमूर्ती:**—गांडा ! जर तूं दोघांमध्यें भेद पाहात नाहींस, तर मी सांगतों तेंच केलें पाहिजे.

**गांडबुवा:**—गुरुजी ! या विषयीं नाराणरावास आपली आज्ञा सांगण्याचें कारण नव्हतें. मला जर दत्तभगवानांनीं अशी आज्ञा केली असती तर मी प्रथम स्वाहाकार करून मग आपणास कळविलें असतें. कारण स्वतः लिहिलेल्या ग्रंथाबद्दल स्वतः आज्ञा होणार नाहींच. आणि तसें न केलें तर शास्त्रमर्यादा उल्लंघन होते. हें ऐकून श्रीगुरुमूर्ती हंसले. आणि नारायणरावास स्वाहाकाराची आज्ञा न मिळाल्यामुळें त्यांनी गुरुचरित्राचीं दहा पारायणें करून ब्राह्मण भोजन घातलें. यावरून श्रीगुरुमूर्तीनी लिहिलेल्या ग्रंथाची किंमत सर्वांस कळून येईलच.

नारायणराव तेथून सावंतवाडीस आल्यावर त्याच्या बंधूस अर्धांग वायू होऊन अर्धे शरीर बधिर झालें. पुष्कळ उपाय केले परंतु मुळींच गुण आला नाहीं. अशावेळीं श्रीगुरुमूर्ती नरसोबाच्या वाडीस आले त्यामुळें दर्शन करण्यास विक्षेप येईल ह्मणून नारायणरावास चिंता उत्पन्न झाली. एके दिवशीं श्रीसद्गुरूचें ध्यान करून नारायणराव निजले असतां त्यांना दृष्टांत झाला कीं, काळजी करूं नको. धोंडोपंतास देवाचे तीर्थ व आंगारा दे. ह्मणजे त्यास बरें वाटेल.

हें ऐकून दुसरे दिवशीं देवाची पूजा करून तीर्थ आंगारा त्यांस दिल्यामुळें त्यांचा अर्धांग वायू बरा झाला. त्यानंतर नारायणराव श्रीगुरुमूर्तीच्या दर्शनास वाडीस आले होते. अशा प्रकारें ईश्वर श्रद्धाळू भक्तांचें प्रत्येक संकटापासून संरक्षण करितो.

भाद्रपद वद्य प्रतिपदेचे दिवशीं श्रीगुरुमूर्ती पवनीहून निघून गांडाबुवासह माहूर गांवीं जाण्यासाठीं बोरी गांवीं आले व तेथें त्यांनीं मुक्काम केला.

त्याठिकाणीं पटवारी याच्या बायकोस एक विलक्षण मूल झालेलें होतें.

त्या मुलास कोणतेही अवयव नसून फक्त लहानसें तोंड मात्र होतें. अशा प्रकारचें तें विचित्र मूल जन्मलेलें पाहून ती बाई अतिशय घाबरून गेली व भीतिनें आजारी पडली. ती श्रीगुरुमूर्तीजवळ येऊन त्यास ह्मणाली, माझ्या पोटीं भूत जन्माला आलें होतें आणि त्या वेळेपासून माझी अशी दशा झाली आहे.

**श्रीगुरुमूर्ती**:—तुझ्या वंशांत एका पूर्वजास पिशाच्चत्व प्राप्त झालें आहे त्यामुळें असें मूल जन्मास आलें आहे असें सांगून तिला पिशाच्चबाधा परिहारासाठीं एक यंत्र करून दिलें.

श्रीगुरुमूर्ती बोरीहून निघून उनकदेवेस आले. या जागीं पूर्वी शरभंग ऋषीचा आश्रम होता. श्रीरामचंद्र वनवासांत असतांनां सीता, लक्ष्मण यांच्याशींसहवर्तमान त्यांच्या दर्शनाकरितां येथें आले होते. त्यावेळीं शरभंग ऋषींनीं त्यांस सांगितलें कीं, मी वृद्ध झालें आहें. पूर्वसंचितानुसार माझ्या शरिरास व्याधि उत्पन्न झाल्यामुळें मला शीतस्नान सोसत नाहीं. यास्तव आपण अग्न्यस्त्र सोडून मला स्नान करण्यासाठीं सर्व उष्णोदक बनवून द्या. त्यावरून रामचंद्रांनीं अग्निबाण सोडून उष्णोदकाचें तीर्थ तयार केलें. त्याला हल्लीं उनकदेव असें ह्मणतात. हें तीर्थ माहुरगडाच्या खालीं आठ कोसांवर आहे. ह्या ठिकाणीं उष्णोदकाचीं व शीतोदकाचीं अशीं दोन्हीप्रकारचीं कुंडें हल्लीं आहेत त्यांतून अक्षय उदक वाहात असतें व तें स्नान करण्यास योग्य इतकेंच उष्ण व अतिशय स्वच्छ असतें. याला कोणत्याही प्रकारचा वास येत नसतो. या उष्णोदकांत थोडावेळ बसून राहिल्यानें आंग हलकें होऊन भूक चांगली लागते. आजारी मनुष्यास ह्या पाण्यांत थोडावेळ बसवून नंतर बाहेर आणून पांघरूण घालून थोडावेळ निजविलें ह्मणजे पुष्कळ घाम येऊन शरीर हलकें होतें. याठिकाणीं श्रीगुरुमूर्तीनीं आणि बरोबरच्या सर्व मंडळीनीं स्नानें करून ते तिसरे दिवशीं माहूरगडास आले.

माहूरगडास मातृतीर्थांत स्नान करून सह्यपर्वतावर जाऊन रेणुका देवी, अनुसूया आणि अत्रीमहाराज यांचें दर्शन केलें. त्याठिकाणीं श्रीदत्तात्रयाची

प्रार्थना करून त्याला वंदन केलें. नंतर तेथून माहूरगडाचे खालीं फुलसानीं गांवीं येऊन त्याठिकाणीं त्यांनीं द्वादशी केली. तेथून पुढें जातांना श्रीगुरु-मूर्तीस श्रीदत्तभगवान ह्मणाले, नरसोबाच्या वाडीस जाण्याचें कांहीं कारण नाहीं. तुह्मी येथूनच मागें फिरा.

अशी आज्ञा झाली असतां तिचा स्वीकार न करितां श्रीगुरुमूर्ती पुढें चालले. श्रीदत्तमहाराजांस ही गोष्ट पसंत पडली नाहीं. त्यामुळें श्रीगुरुमूर्तीस एकाएकीं संधिवात उत्पन्न झाला व त्यायोगें त्यांला उठतां व बसतां येईना. अशी स्थीति झाली.

**श्रीगुरुमूर्तीः**—हे भगवंता ! मी वाडीस येण्याबद्दल वाडीच्या पूजाऱ्यांस वचन दिलेलें आहे. यासाठीं यावेळीं वाटेल तितकी अडचण आली तरी मी गेल्या खेरीज राहारणार नाहीं. गुदस्तसालींही ह्याचप्रपाणें आपण मला उपाधी उत्पन्न केली होती. त्यावेळीं मी वाडीस जाण्याचें सोडून उत्तरदिशेकडे गेलों होतों. अशा प्रकारें वारंवार वचनभंग करणें बरोबर नाहीं. याकारितां आतां मी वाडीसच जाईन. इतकें असूनही जाऊं देणें नसेल तर हें शरीर आपलेंच आहे तें आपण आपल्या स्वाधीन करून घ्या असें ह्मणून देवाची स्तुती केली.

## पद.

**अनुसूयानंदन मम ताप वारि ॥ मम ताप वारि, अन-ताप० ॥ धृ० ॥ जननीजठरीं रक्षी नानापरी । संकट वारी हरी ॥ १ ॥ बाहेर सरतां दांतही नसतां ॥ पयनिर्माण करी ॥२॥ प्रौढची होतां मग तो आतां ॥ मरे कीं नीजे दरीं ॥ ३ ॥ वासुदेवा आहे त्याचा भरंवसा ॥ मग कसा सोडी हरी ॥ ४ ॥**

याप्रमाणें स्तुती करून, अगदीं उठवत नसे तरी जाण्याचा निश्चय करून तशा स्थीतिंतच दररोज सात आठ कोस मजल मारीत. शारीरीक उपाधींस न जुमानितां जीवन्मुक्त स्थीति अनुभवीत ते चालूं लागले. अशा स्थितींत दुसरा एखादा मनुष्य असता तर तो लघ्वीसाठीं उठून बाहेर जा-

टीपः—१गुहेंत

ण्यासही शकला नसता. ही उपाधी पंचवीस दिवस पर्यंत राहिली होती. अशा स्थितींत गुरुमूर्ती चालत असलेले पाहून श्रीदत्तात्रेयमहाराजांनीं त्यांला भयंकर ज्वर उत्पन्न केला. तरी त्यांनीं जाण्याचें बंद केलें नाहीं. त्यावेळीं देव ह्मणाले, " माझी आज्ञा पाळीत नाहींस त्या अर्थी गोदावरी नदी उतरत असतां तुमचेवर वारंट विघेल. " अशा स्थीतिंत गांडाबुवा, सीतारामबुवा, व श्रीगुरुमूर्ती वऱ्हाड प्रांतीं हिंगोली गांवीं गेले. त्या ठिकाणच्या मंडळीनीं त्यांची प्रार्थना केली.

**येई लवकरि बा गुरुवर्या ॥ वासुदेवयतिराया ॥ येई लवकरि बा०॥ धृ०॥ भवजलनिधीमाजी बुडतों मीं ॥ पैलतडी ने स्वामी ॥ कामक्रोधाधीटपले हे ग्रासाया मज पाहे । शक्ति न तत्संगें झगडाया शिणली माझी काया ॥ येई लवकरि बा गुरुवर्या । वासुदेवयतिराया ॥ १ ॥ येउनी नरदेहीं । म्यां कांहीं । निजहित केलेंनाहीं ॥ बाल्यावस्था ती क्रीडतां घालविली गुरुनाथा ॥ यौवनमदभारें । बहुमत्ता ॥ नकळे युक्तायुक्त । रात्रंदिन झटलों ॥ गुरुराया ॥ विषयसुखसेवाया ॥ येई लवकरि बा ॥ २ ॥ छळिलें बहु संतां ॥ भगवंता ॥ अंतरिं भरलि अहंता ॥ पडतां कांनी ती ईशकथा ॥ शूळ उठे मम माथां ॥ अज्ञानांध असा ॥ प्रभु झालों ॥ इहपरसौख्या मुकलों ॥ आली घोर जरा ॥ मज खाया ॥ जन्मुनि गेलों वायां ॥ येई ल० ॥ ३ ॥ अधमाधम मोठा ॥ मी पापी ॥ मजवरि करुणा ओपीं ॥ तुजविण कोणाचा ॥ करूं धांवा ॥ न करीं माझा हेवा ॥ पतितोद्धारक या नांवातें । वागविसी गुरुमूर्ती ॥ दत्तात्मजलागे तव पायां ॥ प्रेपदरीं दासा या ॥ येई लवकरि बा गुरुवर्या ॥ ४ ॥**

ह्या रीतीची प्रार्थना करून साष्टांग नमस्कार केला. श्रीगुरुमूर्तींच्या दर्शनासाठीं पुष्कळ मनुष्यें जमलीं होतीं. त्यांची व्यवस्था जयवंतराव वकील व दाजी साहेब वगैरे ठेवीत होते.

तेथून नरसिंह, आंजेगांव वगैरे फिरून रणापुरास दत्तजयंती केली. रस्त्यांत सुद्धां दररोज पांचशें ते सातशें पानांचा स्वयंपाक होत होता व

दर गांवांत ब्राह्मणसुवासिनीस्त्रियांला खण व हळद कुंकूं देत असत. यावेळीं नरसोबाच्या वाडीतील लोकांस शूद्रादिकांपासून अतिशय त्रास सोसावा लागल्यामुळें गुंडू, पंडीत वगैरे मंडळीनीं श्रीगुरुमूर्तीजवळ येऊन त्यांची प्रार्थना केली. त्यावरून त्यांच्या दुःखाच्या परिहारार्थ मंत्र देऊन श्रीगुरुमूर्ती ह्मणाले कीं, या मंत्राचा जप तुह्मी श्रद्धेनें कराल तर थोड्याच काळांत तुमच्या दुःखाचा परिहार होईल.

श्रीगुरुमूर्तीनें सांगित्याल्याप्रमाणें केल्यावर शूद्रादि लोकांमध्यें आपआपसांत तंटे सुरु झाले व त्यांनीं आपल्यापैकींच तीन माणसें ठार केलीं. त्याची चौकशी कोल्हापूरसरकाराकडून होतांच पुजाऱ्यांस उपाधि करणाऱ्यां पैकीं किती एकांस काळेपाणी, किती एकांस जन्मटेप, व किती एकांस आठ आठ वर्षांची कैद या प्रमाणें शिक्षा झाली. याप्रकारें पुजारी लोक उपाधी पासून मुक्त झाले.

श्रीगुरुमूर्ती गोदावरी उतरून मासला गांवीं दाखल झाले. तेव्हां देवानें अगोदर कळविल्या प्रमाणें त्यांच्यावर वारंट निघालें. त्यामुळें त्यांला गुदद्वारानें रक्त पडण्यास सुरवात झाली. तशा स्थितींत ते हळू हळू बारशीस आले. ह्या गांवीं पूर्वीं अंबरीषराजाची राजधानीं होती. येथें एकादशीच्या पारण्यानिमित्त दुर्वासऋषींनीं अंबरीषास शाप दिल्यामुळें त्या ठिकाणीं श्रीविष्णु भगवान् प्रगट झाले व स्वभक्ताच्या संरक्षणार्थ सगुण रूप धारण करून दुर्वासास ह्मणाले, हे ऋषे! अंबरीष माझा भक्त आहे. त्याच्या अपराधाबद्दल त्याला आपण एवढी भयंकर शिक्षा दिलीत, हें मला बरें वाटत नाहीं. तर मजवर कृपा करून त्याला शापमुक्त करा. नंतर भगवंतानीं राजास शापमुक्त करवून तो शाप आपणाला मागून घेतला. दुर्वासानें विचार केला कीं, राजास शाप भोगावा लागल्यानें जगताचें कांहीं कल्याण होणार नाहीं; परंतु तो श्रीभगवंतांना भोगणें प्राप्त झाल्यास पुष्कळ जनाचें कल्याण होणार आहे; करितां तो शाप श्रीभगवंतास देणेंच उत्तम असा विचार करून ते दुर्वास ह्मणाले, हे भगवंता! आपली इच्छाच असेल तर आपण मृत्युलोकीं जाऊन अनेक जन्म घ्यावे. त्यावरून विष्णु प्रसन्न होऊन त्यानीं मनुष्यलोकीं राजाच्या

ऐवजीं आपण दहा अवतार घेण्याला तयार झाले व अंतर्धान पावले. या प्रमाणें दुर्वासऋषींनीं जगतावर फार उपकार केले आहेत.

बार्शी येथें ज्या जागीं पूर्वीं अंबरीषराजाचा महाल होता, त्या ठिकाणीं हल्लीं श्री विष्णूचें देवालय आहे व त्याचे जवळ दुर्वासऋषीचा आश्रम आहे. जे कोणी श्रद्धाभक्तियुक्त श्री विष्णूची व दुर्वासाची पूजा करितात आणि ब्राह्मणसंतर्पण करितात, ते जन्ममरणांतून मुक्त होतात. बार्शीहून श्रीगुरुमूर्ती व गांडाबुवा मकरसंक्रांतीच्या दिवशीं पंढरपुरास आले व चंद्रभागेंत स्नान करून पंढरीनाथाच्या दर्शनास गेले.

## पंढरपूर वसण्याचें कारण.

ह्या पंढरपुरांत पुंडलीक नावांचा ब्राह्मण आपल्या आइबापांस ईश्वर मानून त्यांची एकनिष्ठेनें सेवाकरीत असे. त्या योगें श्रीभगवान प्रसन्न होऊन त्यांनीं सगुण स्वरूपानें पुंडलीकास दर्शन दिलें आणि वर मागण्यांस सांगितलें. भगावन प्रसन्न झालेले पाहून पुंडलीक ह्मणाला, देवा ! मी आजपर्यंत आपली कधींच सेवा केली नाहीं, असें असतां आ-आपण मला वर देण्यास तयार कां झालां ?

**श्रीभगवान्**:—अरे ! तूं आपल्या आईबापांस साक्षात् ईश्वर समजून त्यांची सेवा केलीस त्यामुळें मीं प्रसन्न झालों आहें. कारण जो कोणी आई, बाप व गुरु यांला ईश्वर समजून त्यांची सेवा करितो, तो ती माझीच सेवा करीतो असें मी समजतों. त्याच प्रमाणें जी स्त्री आपल्या पतीस देव समजून त्याची सेवा करिते ती ही मला पावते. तूं आईबापांची सेवा केलीस ती वरील नियमांप्रमाणें माझी सेवा झाली ह्मणून मीं प्रसन्न झालों आहें.

**पुंडलीक**:—आपण प्रसन्न झालां व वर मागावयास सांगतां; तेव्हां मी आपल्या पाशीं इतकेंच मागतों कीं, आपण या चंद्रभागेच्या कांठीं नेहमी वास करुन राहावें आणि माझ्या प्रमाणें इतरांस फळ मिळावें व मजकडून मात्या पित्यांच्या सेवेंत अंतर पडूंनये येवढीच आपल्या चरणाजवळ विनंती आहे.

**श्रीभगवान्**:—पुंडलीका ! तुझ्या मागण्या प्रमाणें मी या चंद्रभागे-

त्या कांठीं तुझ्या संनिध नेहमीं वास करून राहीन. आणि प्रत्येकास त्यांच्या सेवेचें इच्छेनुरूप फल देईन असें सांगून श्रीभगवान अंतर्धान पावले. त्यादिवसापासून पंढरपूर प्रख्यात क्षेत्र होऊन राहिलें आहे. श्रीगुरुमूर्ती तेथून पौषशुद्ध १२ दिवशीं नरसोबाच्या वाडीस आले व श्रीदत्तपादुकांस वंदन करून त्यांनीं ब्रह्मानंद स्वामींच्या मठामध्यें मुक्काम केला. त्यावेळीं सर्व भक्तजनांनीं श्रीगुरुमुर्तीस नमस्कार करुन आरती केली.

**जय जय श्रीसद्गुरुवर देवादिदेवा ॥ पंचारति हे चरणीं घडवीं मज सेवा ॥ धृ० ॥ वास तुझा ब्रह्मांडीं चालक तूं देवा ॥ असती तूं सर्वांचा आनंद ठेवा ॥ वदती वेद सरस्वति न होय ठावा ॥ का मति माझी नमितों पदिं देई ठावा ॥ १ ॥ सदां तो तव महिमा वर्णितसे वेद ॥ मोक्षाचीं सत्रें ही ठेविलिं बहु सुखद ॥ अतिदुःखें शक्ति नसे हरिं माझा खेद ॥ ज्ञानामृतपाजूनि दे अखंड तव पद ॥ २ ॥ लीला अनंत तुझ्या वदतां अनंत ॥ चारी[1] साही[2] अठरा[3] म्हणतां नच अंत ॥ नारदव्यासमुनींद्रध्यातां नच येत ॥ तो तूं देहाधरुनी देशी करिं स्वार्थ ॥ ३ ॥ पदिं गंगा कटिं शोभे छाटीकौपीन ॥ हृदयीं शोभे कौस्तुभ भृगुपदलांछन ॥ दंडकमंडलुहातीं रवींदुसमवदन ॥ राहो माझे हृदयीं हेंचि सदां ध्यान ॥ ४ ॥ आलिंगो त्वद्मूर्ती दिसोच हें नयना ॥ ऐको कर्ण गुणांतें नामामृत रसना[5] ॥ त्वत्पदसुमगंध[6] सदा लागो ह्या घ्राणा[7] ॥ दे परभक्तिश्रद्धा सतत करिं नमना ॥ ५ ॥**

या प्रमाणें आरती करून झाल्यावर श्रीगुरुमूर्तींची प्रार्थना केली:—

**नमः श्रीगुरो मेशधीशे दयाब्धे ॥ भयार्तिघ्न ते स्वात्मदो वासुदेव ॥ यतींद्रसेवितानंदपादाब्जयुग्मम् ॥ सदा मे हृदि स्यास्तुतां याति देव ॥ १ ॥ भक्तिश्रद्धे देहि मे ते दयालो ॥ दासो दीनो भावतापेन तप्तः ॥ सर्वैस्त्यक्तो द्वारि तेऽत्र प्रसंस्थोऽहं मां मातः**

---

टीपः—१चारवेद. २ सहाशास्त्रें. ३ अठरा पुराणें. ४ हातांत. ५ जिव्हा ६ पुष्पगंध. ७ नासिकेला.

पालयात्र स्वबालम् ॥ २ ॥ आलोक्य मामच्युत ईश्वरोऽपि ॥ भीतोऽगमत्सागरशरशैलान् ॥ सत्यं तथाच तव हृत्कमले स्थितो यः ॥ श्रांतः स्वदर्शय ते गुरुवासुदेव ॥ ३ ॥ श्रीसद्गुरुं च यति-रूपधरं ह्यनंतम् ॥ सच्चित्सुखं विधिहरीशमयं दयाब्धिं ॥ भक्ति-प्रियं भजकदु.खहरं ऽयधीशम् ॥ श्रीवासुदेवगुरुदत्तमहं नमामि ४ श्रीदत्तदेवं मनसा स्मरामि ॥ श्रीवासुदेवं वचसा गृणामि ॥ नृसिंहराजं शिरसा नमामि ॥ दामोदरोऽहं हृदि भावयामि ।५। भक्तिं च मे वर्धय भोस्त्वदीये ॥ रूपे तथा नाशय हृत्तमश्च ॥ दु-र्वासनाश्च गुरुवर्य दयानिधे ते ॥ यच्चेष्टमेव कुरु तन्मयि सार्व-धीश ॥ ६ ॥ माभीश्च भोस्तेऽस्त्वभयं सदैव ॥ याचेऽहमेतद्वचनं गुरो ते ॥ अज्ञोऽहमीश करुणाघन वासुदेव ॥ रक्षस्व मां सर्वत एव सर्वदा ॥ ७ ॥ प्रसीद मे साहस आर्तबंधो ॥ कारुण्यसिंधोऽनुपमास्त बंधो ॥ बंधो मृषाऽपि व्यथयत्ययं मां ॥ स्वप्नोपमं छिंधि हि सर्वतो मां ॥ ८ ॥

याप्रमाणें सर्व मंडळींनी प्रार्थना करून साष्टांग नमस्कार केले. श्रीगुरुमूर्ती वाडीस आल्यामुळें सर्व लोकांस आनंद झाला. सौभाग्यवतिं स्त्रियांनीं उत्तम वस्त्रालंकार धारण करून श्रीगुरुमूर्तीस आरत्या ओंवाळिल्या व आपलें सौभाग्यसुख अखंड चिंतिलें. सीतारामबुवांनीं तीर्थश्राद्ध केलें. व मोठें प्रयोजन करून सुवासिनीबायकांस खण वांटले.

श्रीगुरुमूर्तीच्या आगमनानिमित्त आनंद प्रदर्शन म्हणून दामले वगैरे वैदिक ब्राह्मणांनीं श्रीची आज्ञा घेऊन ऋग्वेदसंहितेचा स्वाहाकार केला. हा समारंभ फार मोठा झाला होता. दररोज गांवप्रयोजन होत असे. स्वाहाकारासाठीं मोठमोठे उत्तम वैदिक ब्राह्मण आले होते व यथासांग शास्त्रमर्यादायुक्त हा स्वाहाकार झाला.

नरसोबाच्यावाडीस बडोदें येथील नोंदणी कामदार आनंदराव खंडेराव शिंदे यांस देवाचा दृष्टांत झाल्यामुळें ते श्रीगुरुमूर्तीच्या दर्शनास आले व त्यांनीं दंडवत करून दोन्ही हात जोडून प्रार्थना केली. भगवान् ! मी आज सहा महिने आजारी आहें. माझ्या हातून अपराध घडल्यामुळें दे-

याची मजवर अवकृपा झाली किंवा माझें प्राक्तन ह्मणून सध्या संग्रहणीनें फारच पीडिलों आहें ! छाती पिकून रोज दोन तीन शेर कफ पडतो. त्या मुळें कफक्षय पूर्ण दशेंत आला आहे. आजपर्यंत अनेक वैद्य व डाक्टर यांचीं पुष्कळ औषधें घेतली परंतु कांहींच गुण आला नाहीं. शेवटीं डाक्टरनीं कामिटी करून सांगितलें कीं, तुमचा रोग बरा होणार नाहीं. तुह्मीं आपल्या देशीं जा. आतां दोन चार दिवस काढाल तर भाग्य ! हें ऐकल्या वरून मी घाबरलों. आणि आतां श्रीदत्तभगवान काय करील तें खरें. मनुष्ययत्न राहिला नाहीं. असें समजून देवावर भरंवसा ठेवून रात्रीं श्री दत्त स्मरण करून व ध्यान करून नंतर निजलों. स्वप्नांत दृष्टांत झाला कीं, गांडाबुवासह स्वामीमहाराज नरसोबाचीवाडी येथें आहेत. त्यांस जाऊन भेट ह्मणजे तुझा रोग दूर होईल. मी सकाळीं उठून आपल्या पुतण्याला बरोबर घेऊन पुण्याहून नरसोबाच्यावाडीस परवां आलों व आपण काल आलां. काल आपल्याकडे फार दाटी झाली होती ह्मणून भेट झाली नाहीं. या करितां आपल्यापाशीं आलों आहें.

**श्रीगुरुमूर्तीः**—देवाची तुह्मी अशी काय अवज्ञा केली कीं, ज्यामुळें देव तुमच्यावर रागावला ?

**शिंदेः**—श्रीसद्‌गुरुनाथ ! मी नित्य नियमाप्रमाणें ध्यान करीत बसलों होतों त्यावेळीं आज्ञा झाली कीं, "तूं ब्रह्मचाऱ्यास घेऊन नाशिकाची यात्रा कर. नंतर औदुंबरास जा आणि तेथून वाडीस ये." तें ऐकून मी विचारांत पडलों कीं, देव कोणत्या ब्रह्मचाऱ्याविषयीं सांगत आहेत. त्यावेळीं गांडा बुवा माझ्या लक्षांत आले नाहींत कारण एकदा थोडाच वेळ त्यांची माझी भेट झाली होती. ह्मणून विस्मरण झालें. त्यामुळें मीं श्रीदत्तास विचारिलें कीं, आपण कोणत्या ब्रह्मचाऱ्याबद्दल सांगितलें तें मला समजलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं श्रीदत्ताची आज्ञा झाली कीं:—

स्वामी महाराजांचा शिष्य गांडा महाराज यांस घेऊन तूं नरसोबाचेवाडीस जा. तिसऱ्या दिवशीं याचप्रमाणें सांगितलें. त्यावरून मी घाबरून गेलों व गांडामहाराजांस पत्र पाठविलें. त्याचें उत्तर आलें कीं, मला देवानें कांहींच सांगितलें नाहीं. तरी पण जावयाचेंच असेल तर अक्ष-

यतृतीये नंतर मी निघेन त्यावेळीं अगोदर तुम्हांस पत्र पाठवून कळवीन.

अक्षय्यतृतीये नंतर गांडाबुवांचा जाण्याचा विचार झाला व त्याप्रमाणें मला लिहून आलें. तेव्हां मी रजा घेऊन निघालों. परंतु गांडामहाराजांनीं लिहिल्याप्रमाणें रजा मंजूर न झाल्यामुळें त्या दिवशीं जातां आलें नाहीं; एक दिवस उशीर झाला. त्यामुळें गांडाबुवा एकटेच नाशिकास जाऊन नरसोबाच्यावाडीस आले. त्यांचा शोध करीत मी पुण्यापर्यंत आलों. तेथें माझी बायको आजारी झाल्यामुळें मला वाईस जावें लागलें. त्याठिकाणीं ती मरण पावली. नंतर दीड महिन्यानें मी वाडीस येऊन झालेली हकिगत गांडाबुवास सांगितली.

**गांडाबुवाः**—श्रीदत्ताची इच्छा, आतां चार पांच दिवसांनंतर आपण औदुंबरास बरोबर जाऊं. तोंपर्यंत तुह्मी वाडीस राहून श्रीदत्तमहाराजाची सेवा करा.

दुसरे दिवशीं मला बडोद्याहून पत्र आलें कीं, तुमची जागा कमी करण्यांत येणार आहे तुह्मी तावडतोब यावें. ही हकिगत मी गांडामहाराजांस कळविली. त्यावरून ते ह्मणाले, तुमची मर्जी. हें ऐकून मी बडोद्यास आलों. तें देवाला आवडलें नाहीं. ह्मणून मला माझ्या वरिष्ठांनीं पन्नास रुपये दंड केला व नालायक ठरविलें. त्यावेळीं माझी मित्र मंडळीही माझ्या विरुद्ध झाली व उलट बोलूं लागली. त्यावरून माझी खात्री झाली कीं, मजवर श्रीदत्तमहाराजांची अवकृपा झाली आहे यांत संशय नाहीं. नंतर श्रीदत्तमहाराजांच्या संतोषार्थ मी ब्राह्मणाकडून श्रीगुरुचरित्राचा सप्ताह सुरु केला. एक सप्ताह पुरा होऊन दुसरा सुरू होतांच त्या ब्राह्मणाचा गळा धरला व सुजून आला. त्यायोगें सप्ताह बंद पडला. इतक्यांत गांडामहाराज बडोद्यास आले. त्यांला मी ही हकिगत सांगितली. ते ह्मणाले, तुह्मी श्रीसद्गुरुमहाराजांस पवनी येथें जाऊन भेटा. त्यावरून मी पवनीस येण्याचा विचार केला. पण मला एकाएकीं आमांश सुरु होऊन संग्रहणीचा रोग जडला. अशी माझी स्थिति आहे. आतां मी आपणास शरण आलों आहें. शरणागताचें रक्षण करणें हें श्रीसद्गुरूचें ब्रीद आहे. आतां ज्याप्रमाणें आज्ञा होईल त्याप्रमाणें मी वागेन.

**श्रीगुरुमूर्ती**:-गांडा ! शिंद्यास तुह्मी काय सांगितलें होतें ?

**गांडाबुवा**:-श्रीसद्गुरुनाथा ! शिंद्यांनीं मला पत्र लिहिलें होतें, तेव्हां माझ्या मनांत आलें कीं श्रीसद्गुरुमहाराजांनीं कृष्णंभट्ट सिद्धपूरकर यांबरोबर मुक्त्याला हून प्रसाद पाठवून सांगून पाठविलें होतें कीं, " सध्या याबाजूस येऊं नको मी त्याबाजूस येण्यास निघाल्यों आहें. थोड्याच दिवसांत वाडी नजीक येईन तेव्हां तूं मला येऊन भेट." आपण चैत्रमास पावेतों त्याबाजूस आलां नाहीं ह्मणून शिंद्यास पुनः लिहिण्याचा विचार करीत होतों. इतक्यांत माझ्या शरीराला ज्वररूपी उपाधीनें गांठिलें- त्यायोगें मला हासूं आलें. मी विचार केला कीं, सध्या श्रीसद्गुरुमहाराज इकडे येत नाहींत. त्यावरून सिंहस्थांत गोदावरीचें स्नान करण्या विषयीं देवाची मर्जी दिसते व वाडीस माझ्या सारखे कांहीं काम असेल ह्मणून मी शिंद्यास नाहीं ह्मणून लिहिणार होतों यासाठीं ही उपाधी परमेश्वरानें पाठविली असली पाहिजे. त्यावरूनमी श्रीसद्गुरु महाराजांची प्रार्थना करून विनंती केली कीं मी वाडीस जावें अशी आपली इच्छा असेल तर मी वाडीस जातों. अशी प्रार्थना करितांच माझा ज्वर मला सोडून निघून गेला. दुसऱ्या दिवशीं शिंद्यास पत्र पाठविलें कीं अक्षय्यतृतीया करून मीं निघतों व त्या प्रमाणें मी निघालों. आणि नाशिकास जाऊन येथें आलों. येथें आल्यावर नृसिंह सरस्वति स्वामीची खोली नीट करण्या साठीं पैसा पाठविला असतां कांहीं अडचणीं मुळें तिची दुरुस्ती झालेली नव्हती ह्मणून तें काम करविलें. आणि स्त्रीधर्मनिरूपण नावाचें लिहिलेलें पुस्तक श्रीसद्गुरु पादुकांस श्रवण करविलें व निघण्याचा विचार करितों इतक्यांत शिंदे आले. यांला आपण तीन चार दिवस येथें राहून नंतर औदुंबरास जाऊं व तेथुन भडोच ( भृगुक्षेत्र ) येथें जाऊं असें सांगितलें होतें. ह्या समयीं कांहीं हरकत आल्यावरून शिंद्यांनीं माझी आज्ञा मागितली व मला पंचवीस रुपये देऊन आपण बडोद्यास गेले.

**श्रीगुरुमूर्ती**:-शिंद्यानें देवाचा दृष्टांत झाला असतांही तुझें वचन उल्लंघन केलें. यामुळें त्याजवर देवाचा कोप होऊन त्याला ही दशा प्राप्त

झाली आहे. ह्याकरितां तुह्मी त्याला सांगा कीं, तुह्मी देवाच्या पादुकांजवळ जाऊन आपल्या अपराधाची क्षमा मागा व देवाच्या पादुकांवर जलधारा युक्त महारुद्र करविण्याचा नवस करा. इतकें सांगून नंतर पुनः श्रीगुरु मूर्तीनीं गांडाबुवास सांगितलें कीं, तूं कांहीं तरी ह्याला औषध सांग ह्मणजे त्याच्या योगानें ह्यांची व्याधि दूर होईल. याप्रमाणें श्रीसद्गुरूची आज्ञा झाल्यावर गांडाबुवानीं ती हकिगत शिपायास सांगून ताकांत चित्रकाचें मूळ ३ । ४ मासे उगाळून त्या ताकाबरोबर भात जेवीत जा ह्मणजे तुमचा रोग बरा होईल असें सांगितलें. त्याप्रमाणें शिपायानें सुरु करितांच थोड्याच दिवसांत त्याचा रोग नाहींसा झाला व तो पूर्ववत आपल्या नोकरी वर जाऊन हजर झाला. गांडाबुवांनीं सांगितल्याप्रमाणें करण्यास त्यानें सुरुवात केली तेह्मां पहिल्याच दिवशीं रात्रीं त्याचा कफ पडण्याचें बंद झालें होतें.

सावंतवाडीजवळ आरोस ह्मणून गांव आहे त्या गांवचा राहणारा गणपती तुळपुळे या नांवाचा ब्राह्मण पिशाच्य पीडेला त्रासून त्यांतून मुक्त होण्याकरितां नरसोबाची वाडी येथें सेवा करण्यासाठीं येऊन राहिला होता. त्याचा आजा गणेश भट्ट तुळपुळे यानें आपला भाऊबंध सखंभट्ट तुळपुळे याचा बगीचा कोर्टांत खोटा पुरावा हजर करून आपल्या नांवावर करून घेतला होता. त्यामुळें सखंभट्टास फार वाईट वाटलें पण त्याचा कांहीं इलाज चालेना. शेवटीं सखंभट्टानें मरतेवेळीं आपल्या बागें-तील एक नारळ गणेभट्टाजवळ मागितला. परंतु तोही त्याचेकडून मिळाला नाहीं. अखेरीस सखंभट्टानें दुःखीत अंतःकरणानें सईच्छ देह सोडिला. त्या मुळें तो पिशाच्च होऊन त्यानें गणेशभट्टाच्या नरसिंह नांवाच्या मुलास छळून त्याचा प्राण घेतला. इतकेंच नव्हे तर गणेशभट्टाच्या कुटुंबांतील सर्व मंडळीचा नाश केला. त्यांच्यापैकीं नरसिंहभट्टाचा मुलगा गणपती नांवाचा मात्र जीवंत राहिला होता. त्यालाही दुःख देऊं लागल्यामुळें तो वाडीस येऊन देवाची सेवा करूं लागला. श्रीगुरुमूर्ती पवनीस आहेत असें त्यास समजतांच तो त्याठिकाणीं गेला व आपली एकंदर हकिगत त्यानें त्यांस कळविली. त्यास श्रीगुरुमूर्तीनीं श्रीगुरुचरित्राचे एकुणपन्नास स-

साह नरसोबाच्यावाडीस राहून करण्याविषयीं सांगितलें.

या गणपतीबरोबर आठले ह्या नांवांचा एक ब्राह्मण पवनीस आला होता. त्याच्या वडिलांनीं एका शूद्राचें शेत घेतल्यामुळें तो शूद्र पिशाच्च होऊन त्या आठल्यास दुःख देत होता. पवनीस गेल्याबरोबर तो पिशाच्च त्याच्या आंगांत संचार करून बोलूं लागला. तें पाहून गणपती हंसला. त्या वरून श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, तुह्मा पिशाच्च हल्लीं बोलत नाहीं आहे, परंतु थोड्या दिवसांनंतर आठल्याप्रमाणेंच तुला उपाधी देणार आहे. त्या नंतर जेह्मां गणपती वाडीस आला तेह्मां तो पिशाच्च त्याला फार दुःख देऊन बोलूं लागला व सप्ताह करण्यास देईना. इतक्यांत श्रीगुरुमूर्ती गांडाबुवा-सह नरसोबाच्यावाडीस आले. त्यावेळीं गणपतीच्या आंगाला पिशाच्यानें सूज आणिली होती. ती पाहून गांडाबुवानें औषध सांगितलें. त्याप्रमाणें करण्याबरोबर सूज उतरली. परंतु दुसऱ्या दिवशीं दुप्पट सूज आलेली पा-हून गांडाबुवा ह्मणाले कीं, ह्यावेळीं औषधाचा कांहीं उपयोग होणार नाहीं कारण हें पिशाच्चाचें कर्म आहे.

रात्रीं पिशाच्च गणपतीच्या शरीरांत प्रवेश करून श्रीगुरुमूर्तींच्या समोर बोलूं लागलें कीं, आपल्यास सर्व हकिगत ठाऊक आहेच. यासाठीं अशा मनुष्याचा कैवार आपण घेऊं नये. मी याचा प्राण घेणार आहें.

**श्रीगुरुमूर्तीः**—याचा प्राण घेतल्यापासून तुला काय फायदा होणार आहे? त्यापेक्षां तुला चांगली गति मिळण्यासाठीं तो सप्ताह करणार आहे तो तूं त्यास करावयास दे ह्मणजे दोघांचेंही कल्याण होईल.

**पिशाच्चः**—आपण श्रीदत्तभगवान आहांत तेव्हां आपल्या आज्ञेचा भंग माझ्याकडून कसा होईल? परंतु आपण पवनीस याला सवालक्ष गा-यत्रीजपाचें पुरश्चरण सांगितलें होतें तें यानें करावें व हे एकूण पन्नास सप्ताह निराळे करावे ह्मणजे मी याला दुःख देणार नाहीं.

**श्रीगुरुमूर्तीः**—अरे! तूं आपल्या जागेच्या किंमती पेक्षां जास्त मोब-दला याजकडून घेण्याची इच्छा करितोस हें योग्य नाहीं या करितां याला कांहीं सूट दिली पाहिजे.

**पिशाच्चः**—हे भगवन्! आपली आज्ञाच असेल तर पन्नास ह-

जार जपाची सूट देतों. पाउणलक्ष जप व एकुण पन्नास सप्ताह झालेच पाहिजेत. यासाठींच मीं त्याला आपल्या जवळ पत्रनीस पाठविलें होतें.

श्रीगुरुमूर्ती:—मी त्याला सांगेन पण तू आज पासून या कामांत विघ्नआणू नयेस. त्याच्यानें एवढें होणार नाहीं ह्मणून पांच ब्राह्मण मदतीला घेऊन सप्ताहा करवितों.

पिशाच्य:—या पिशाच्ययोनीचा स्वभाव मांजराच्या स्वभावासारखा आहे. जसें एकादें मांजर अगदीं तृप्त झालें असलें तरीमुद्धां उंदीर दृष्टीस पडतांच त्यावर झडप घातल्या शिवाय राहात नाहीं; त्या प्रमाणें पिशाच्य दुःख दिल्याशिवाय राहावयाचें नाहीं ह्मणून कार्य करितांना थोडी थोडी उपाधी करीन. सप्ताहा अन्य ब्राह्मणा कडून करवूं नका कारण परकी ब्राह्मण सप्ताहाच्या वेळीं गुरुचरित्राचीं पानें मधून मधून सोडून देतात यासाठीं याने स्वतःहाच सप्ताह केले पाहिजेत असें मागणें मागून त्या पिशाच्यानें श्रीगुरुमूर्ती जवळ तीर्थ मागितलें.

श्रीगुरुमूर्ती:—मी तुझ्या सारख्या दुष्ट बुद्धीला तीर्थ देत नसतों.

पिशाच्य:—हे भगवन्! यावेळीं मी आपलें दर्शन आणि तीर्थ घेण्यासाठींच आलों आहें. ह्मणून कृपा करून मला तीर्थ द्या. जों पावेतों तीर्थ मिळणार नाहीं तों पावेतों मीं या कुडीला सोडून जाणार नाहीं.

त्याचा भाव पाहून त्याला शेवटीं श्रीगुरुमूर्तीनीं तीर्थ दिलें; मग गणपती सावध झाला. त्याला श्रींनीं सांगितलें कीं, तुला यादुःखांतून मुक्त व्हावयाचें असल्यास पाउण लक्ष जप व एकुण पन्नास सप्ताहा कर.

गणपती:—याचें ऋण देण्यास मी कबूल आहें.

पिशाच्य:—"कलौ चतुर्गुणं प्रोक्तं" कामनीक जप करणें तो कलीयुगांत चौपट केल्याशिवाय फळ मिळत नाहीं ह्मणून तीनलक्ष गायत्रीजप करून यथाशक्ति ब्राह्मणभोजन कर ह्मणजे तुला उपद्रव करणार नाहीं.

गणपतीनें या प्रमाणें करण्याचें कबूल केल्याबरोबर त्याची सूज हळूहळू कमी होऊं लागली व तो बरा झाला. सप्ताह पूर्ण झाल्यावर पिशाच्यानें सांगितलें, तू ब्राह्मणभोजन घाल नाहींतर फिरून उपाधी करीन.

त्यावरून त्यानें ब्राह्मणभोजन घातलें. व त्यापुढें तो पिशाच्चबाधे-पासून मुक्त झाला.

याप्रमाणें विश्वासघात केल्याचें फळ पाठी मागून भोगावें लागतें याकरितां कोणि कोणाचा विश्वासघात करूं नये.

सातारा जिल्ह्यांत कोरगांव येथें राहाणारा शंकरराव म्हादेव बोके या नांवाचा मनुष्य, जो हल्लीं तासगांव येथें मुनसफ कोर्टांत कारकून आहे, त्याला गोदू नांवाची एक मुलगी होती. तिला गुह्येंद्रिय नगून त्या ठिकाणीं एक ल्हान छिद्र लघवी करण्या पुरतें होतें. अशा प्रकाराची ती नपुंसक होती. त्याला संतती कायती एवढीच व तीही अशा प्रकारची त्यामुळें तीं पतिपत्नि आपणास चांगला पुत्र व्हावा ह्मणून देवाची सेवा करीत असत. गोदू मोठी झाल्यावर डॉक्टरांनीं ही कन्याच आहे अशी परीक्षा करून सांगितल्यावरून तिचें पुण्यास लग्न केलें. ती कन्या चौदा वर्षांची झाल्यावर तिला असें वाटूं लागलें कीं मी कन्या नसून पुरुष आहें व ही गोष्ट तिनें आपल्या आई बापांस सांगितली. ती ह्मणाली, तुह्मी मला मुलगी समजून घर काम सांगतां पण मी मुलगी नाहीं व घरकाम करणार नाहीं आणि सासरींही जाणार नाहीं. परंतु तिच्या सांगण्याकडे कोणी लक्ष दिलें नाहीं.

ती पंधरा वर्षांची झाल्या वर तिच्या मनांत कांहीं विचार येऊन घरांत कोणास समजूं न देतां सिरजेस गेली व डॉक्टरकडे जाऊन ह्म-णाली, मी स्त्री नाहीं, पुरुष आहें असें मला समजतें; तर आपण शस्त्र प्रयोग ( ऑपरेशन ) करून याचा बरोबर शोध करावा.

**डॉक्टर**:—तुझे आईबाप वगैरे कोणी आहेत कीं नाहींत.

**गोदूबाई**:—कोणी नाहीं. मी अनाथ एकटी आहें.

**डॉक्टर**:—ऑपरेशन करतांना कदाचित मरण आलें तर तें जो-खीम कोण घेणार.

**गोदूबाई**:—डॉक्टरसाहेब ! मला लिहितां वाचतां येतें त्यामुळें ही जोखीम मजवर राहील असें मीं लिहून सही करून देतें.

डॉक्टरनें गोदूबाईचें ह्मणणें ऐकून त्या प्रमाणें तिच्याकडून लिहून

घेऊन जननेंद्रियावर शस्त्रप्रयोग ( ऑपरेशन ) केला त्यावरून समजून आलें कीं त्याला आंतल्या बाजूस पुरुषासारखें गुह्येंद्रिय आहे. नंतर डॉक्टरनें आवरणाची कातडी कापून काढून तें इंद्रिय उघडें केलें व बंद झालेल्या छिद्रांत नळी घालून तें छिद्र हळू हळू मोकळें केलें. हें नवीन छिद्र सुरु होण्याबरोबर डॉक्टरनें जुनें छिद्र बंद केलें, त्या बरोबर गुह्येंद्रियद्वारें लघवी सुरू झाली, पुढें हळू हळू त्या इंद्रियास चेतना उत्पन्न झाली.

ऑपरेशन झाल्यावर गोदूबाईनें आपलें नांव गांव व आईबापांचें नांव डॉक्टरला सांगितलें. नंतर ती ह्मणाली या ठिकाणीं शाळेंत मास्तर आहेत ते माझ्या बापाला ओळखितात. त्यावरून डॉक्टरांनीं त्या मास्तरला बोलावून आणिलें. ते येण्याबरोबर गोदूबाईस पाहून ह्मणाले, मी हिला व हिच्या बापाला ओळखितों. त्यानें तावडतोब तिच्या बापाला कळविलें. त्यावरून तो तेथें आला.

शंकररावाला अपत्य कायतें ही एकच कन्या होती व त्या कन्येचा एकाएकीं पंधरा वर्षांचा पुत्र झाल्यामुळें त्यांस अतिशय आनंद झाला शस्त्रप्रयोग साफ होऊन गेल्यावर ती श्रीगुरुमूर्तींच्या दर्शनाला नरसोबाच्या वाडीस आली होती. तिचें नांव गोविंद ठेविलें होतें. तिचे कांहींच संस्कार झालेले नसल्यामुळें गांडाबुवांनीं श्रीगुरुमूर्तीस त्या संबंधानें कसें करावें असें विचारिलें.

**श्रीगुरुमूर्ती**:—याच्या वयाला पंधरा वर्षें पुरीं झालेलीं नाहींत ह्मणून जातकर्म, नामकर्म, चौलादि संस्कार करवून यथाविधी उपनयन संस्कार करावा.

त्यावरून ह्या गोविंदाची मुंज शके १८३२ च्या चैत्र मासांत झाली. त्याचे आईबाप श्रीमान असल्यामुळें पुढें गोविंदाचें लग्नही झालें. याप्रमाणें गोदूबाईचा शेवटीं गोविंदराव झाला.

याठिकाणीं श्रीगुरुमूर्ती असतांना निजते वेळीं खालीं लिहिल्या प्रमाणें दररोज शेजारति करीत असत. त्यांच्या समागमें बाबुराव वगैरे भक्त मंडळीही असे.

शेजारति. १ ली.

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधूता ॥ नरसिंहसरस्वति अवधूता ॥ चिन्मयसुखधामीं पहुडा जाऊनि एकांत ॥ १ ॥
वैराग्याचा कुंचा घेऊनि चौक झाडीला ॥ गुरु हा चौक झाडीला ॥ तयावरी सप्रेमाचा शिडकावा केला ॥ २ ॥
पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ति ॥ सुंदर नवविधा भक्ति ॥ ज्ञानाच्या समया उजळून लाविल्या ज्योति ॥ ३ ॥
भावार्थाचा मंचक हृदयाऽकाशीं टांगिला ॥ हृदयाऽकाशीं टांगिला ॥ मनाचीं सुमनें करुनि केलें शेजेला ॥ ४ ॥
द्वैताचें कपाट लोटुनि एकत्र केलें ॥ गुरु हें एकत्र केलें ॥ दुर्बुद्धिच्या गांठी सोडुनि पडदे सोडीले ॥ ५ ॥
आशा तृष्णा कल्पनेचा सांडुनि गलबला ॥ गुरु हा सांडुनि गलबला ॥ दया क्षमा शांति दासी उभ्या शेजेला ॥ ६ ॥
अलक्ष उन्मन घेउनि नाजुक हा शेला ॥ गुरुजी नाजुक हा शेला ॥ नित्य निरंजन सद्गुरुस्वामी निजे शेजेला ॥ ७ ॥

शेजारति. २ री.

आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा स्वामी कृपा दयाळा ॥ पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ॥ धृ० ॥ पावला प्रसाद आतां सुखें पहुडावें ॥ सुखें आतां पहुडावें ॥ आपुल्याला श्रम होती बहुत स्वभावें ॥ आतां० ॥ १ ॥ तुम्हा जागविलें स्वामी आपुल्या काजा ॥ स्वामी आपुल्या काजा ॥ शुभाशुभ कर्म दोष हरावया पीडा ॥ आतां० ॥ २ ॥ तुका ह्मणे दिधलें उच्छिष्टाचें भोजन ॥ दिधलें उच्छिष्टाचें भोजन ॥ नाहीं निवडीलें एक एक भिन्न भिन्न ॥ ३ ॥

शेजारति. ३ री.

नृसिंहसरस्वती मनीं धरुनियां प्रीति ॥ ओंवाळितों शेजारति अंगिकारायप्रीती ॥ ब्रह्मा घेऊनि देवदेवा ॥ लागे कवण्या कवण्या जीवा ॥ उपजवू कोठें केव्हां ॥ संदेह हा मज व्हावा ॥

नृसिंह० ॥ १ ॥ विष्णुही येऊनियां ॥ आज्ञा मागे वंदुनियां ॥ कवण्या जीवा काय खाया ॥ कैसें देऊं कवण्या ठाया ॥ नृसिंह० ॥ २ ॥ येउनियां महादेव ॥ वंदुनीयां पायद्वंद्व ॥ ज्ञान देऊं कवण्या जीवा ॥ आज्ञा करा स्वयमेवा ॥ नृसिंह० ॥ ३ ॥ अंबा ह्मणे बाळा यती ॥ फार झाली असे राती ॥ झोंप आली तुज प्रती ॥ भक्त रक्षुनि श्रम होती ॥ नृसिंह० ॥ ४ ॥ विनविताती भक्तवृंद ॥ सेवा घेउनीयां छंद ॥ पूर्ण देई ब्रह्मानंद ॥ भीमपौत्र नंद स्कंद ॥ नृसिंह० ॥ ५ ॥

शके १८३२ मध्यें चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशीं नूतन वर्षारंभ दरसाल प्रमाणें होत असतां त्या वर्षाचें पंचाग श्रीदत्तपादुकांवर श्रीगुरुमूर्ती यांच्या समोर वाचून झाल्यावर सर्वरोगशमनार्थ निंबपत्रांत मिरें, हिंग, मीठ, जिरें, ओवा घालून त्याचा प्रसाद वांटण्यांत आला. येथें बारशीहून अक्कलकोट स्वामींचे शिष्य बावडेकर शास्त्री श्रीगुरुमूर्तीजवळ येऊन ह्मणाले, माझ्या मनांत वाडीस सोमयागपूर्वक अग्न्याधान करून नंतर संन्यासदिक्षा घ्यावी. व हें काम आपल्याकडून झालें पाहिजे.

श्रीगुरुमूर्ती:—वाडींत श्रीदत्तात्रेयभगवान संन्यासीस्वरूपानें राहात असल्यामुळें या ठिकाणीं पशुघात करणें योग्य नाहीं. पूर्वी या विषयीं रामभाऊ कवीश्वर यानां या कामीं देवानीं बंदी केली होती. तरी त्यांनीं तें न ऐकतां सोमयाग केला. त्यायोगें सहा महिन्याचे आंतच त्याचें देहावसान झालें. यासाठीं या कामास मी तुह्मांला संमति देणार नाहीं. सोमयाग करण्याचा तुमचा विचार होता तर तुमचे गुरु स्वतः दत्तस्वरूप होते व त्यांची तुमच्यावर पूर्ण कृपा होती; त्यावेळीं त्यांची आज्ञा घेऊन तुह्मी सोमयाग केला असता तर त्यांच्या वचनानेंच तुमचा कार्यभाग झाला असता. ते चराचर व्यापून राहिले आहेत. करितां आतां ध्यान करून त्यांची आज्ञा मागा आणि त्यांनीं आज्ञा दिली तर हें करा.

## अक्कलकोटस्वामीचें चरित्र.

या अक्कलकोटकर स्वामीमहाराजांची भूमि, व त्यांचें नांव, गांव, आणि वय याबद्दल अद्याप कोणालाही कांहींच माहिती लागलेली नव्हती.

ते फार करून कोणाशीं कांही बोलत नसत. कदाचित् कांहीं बोलले तर तें बोलणें कोणाला समजत नसे. ज्या कोणाला पाहून ते शिव्या देत असत त्याचें मात्र कल्याण होत असे. त्यांच्या अतिपरिचयाच्या माणसांला मात्र त्यांची कांहीं भाषा समजत असे. ते स्वतः लहान मुलांप्रमाणें खेळणीं जवळ बाळगून त्यांच्या प्रमाणें धुळींत एकटेच खेळत असत. एकादेवेळेस आपल्या आंगावर धूळ उडवून सुखी होत. एका नारळीपात्रांत धूळ भरुन तिला भोंक पाडून ती दुसरींत ओतीत व त्यावेळीं ती जमिनीवर पडतांना पाहून मोठ्यानें हंसत. या प्रकारच्या अनेक क्रीडा ( आत्मरति ) करून ते ब्रह्मानंदांत निमग्न राहून इश्वराप्रमाणें अनेक लीला करीत असत. त्यांच्या पुढ्यांत कोणी कांहीं ठेविलें तर तें वाटेल तो घेऊन जात असे.

एके दिवशीं वाडींतील पूजारी स्वामीच्या दर्शना कारितां अक्कलकोटास गेले आणि त्यांच्यापुढें नारळ दक्षिणा ठेवून नमस्कार करून खालीं बसले. ती दक्षिणा व नारळ एकजण घेऊन जाऊं लागला. त्याला स्वामी ह्मणाले, तूं ही कां घेऊन जातोस ? अजून ह्या पूजाऱ्यांचें पुष्कळ द्यावयाचें आहे. असें ह्मणून त्यानीं ती दक्षिणा, नारळ व आपल्याजवळ जें दुसरें कांहीं होतें तें सर्व वाडीच्या पूजाऱ्यांस देऊन ते स्वतः हसूं लागले. त्यांला किती एक लोक श्रीनृसिंहसरस्वती महाराज समजत होते.

एकसालीं अक्कलकोटास पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ पडला. तेव्हां गांवांतील सर्व लोक मिळून त्यांनीं स्वामीमहारजांची प्रार्थना केली. त्यावेळीं स्वामी ह्मणाले, " यज्ञो वै पर्जन्यः " व हातांनीं इशारा दाखवून ह्मणाले, पशुयाग केल्यावर पाऊस पडेल. ह्या खुणेचा स्वामींच्या संन्निध राहणाऱ्या मंडळींसहवर्तमान सर्व मंडळीनें विचार ठरविला कीं, स्वामीमहाराज स्वतःच यज्ञेश्वर भगवान आहेत. ते वैश्वानरस्वरूपानें सर्वांच्या अंतर्यामी वास करित आहेत. हेच सर्व कृत्यांचे चालक आहेत. हे स्वतः वैश्वानर अग्नि अंतरंगांत वास करून सर्व भक्षण करीत असूनही अभुक्त आहेत. यामुळें कोणतेंही कर्म यांस बंधन कारक होत नाहीं. हेच साक्षात् श्रीदत्तभगवान आहेत. यासाठीं अग्नीमध्यें आहुती न देतां, पशु हनन करून

स्वामीमहाराजांस द्यावा ह्मणजे पाऊस पडेल. असा विचार ठरवून एका धनगराजवळून एक बकरा विकत आणून त्याचें मांस आणून स्वामीमहाराजांपुढें ठेवितांच तें त्यांनीं भक्षण केलें व पुष्कळ हसूं लागले. पुढें लगेच सर्व देशांत पाऊस पडून सर्व लोकांस आनंद झाला.

एके समयीं शृंगेरी मठांतील शास्त्री अक्कलकोट येथील स्वामीच्या दर्शनासाठीं आले होते; त्यांनीं स्वामीच्या बाळचेष्टा पाहून ते बावडेकरशास्त्रयांस ह्मणाले, अशा वेड्या माणसांजवळ तुह्मीं कां राहिलां ? यांच्याजवळ राहून तुमचें कल्याण होईल असें मला वाटत नाहीं. याकरितां आमच्या बरोबर रहाल तर तुह्मांला शास्त्र शिकवूं असें त्यांचें भाषण ऐकतांच बावडेकरशास्त्री त्यांचे बरोबर जाण्यास तयार झाले.

ही हकिगत स्वामीस अंतरदृष्टया समजल्यावरून ते त्याच रात्रीं बावडेकरशास्त्री आपल्या निजावाच्या खोलींत रोजच्या प्रमाणें आंतून कडी लावून निजले होते त्याठिकाणीं फिरत फिरत गेले. स्वामीनीं हात लावल्याबरोबर खोलीचें दार आपोआप उघडलें. त्याचा आवाज कानीं पडतांच बावडेकरशास्त्री जागे झाले. डोळे उघडून वर पाहातात तों श्रीगुरुमहाराज त्यांच्या दृष्टीस पडले. त्यावेळीं दिसणारें त्यांचें तें अलौकिक तेजस्वी रूप पाहून बावडेकरशास्त्री दिपून गेले. स्वामीमहाराज महान् विद्वान् पंडिताप्रमाणें संस्कृत भाषेंत त्यांचे बरोबर बोलूं लागले व ह्मणाले, बावडेकर! तूं शास्त्र शिकण्याकरितां कोठें जात आहेस ? अरे असें पाहा कीं ह्या शास्त्रीबुवानीं कामादि षड्रिपूंस जिंकिले आहेत काय ! असें ह्मणून स्वामीमहाराज त्याच ठिकाणीं अदृश्य झाले.

हें पाहून बावडेकरशास्त्रयांस पश्चात्ताप झाला. ते ह्मणाले अरेरे ! माझें दुर्दैव ह्यावेळीं आड आल्यामुळें मला त्यांचेजवळ कांहीं मागण्याची इच्छा झाली नाहीं. असें ह्मणून ते शोक करूं लागले.

एके समयीं एक ब्राह्मण उदर व्यथेनें अतिशय पीडित झाल्यामुळें अक्कलकोटच्या स्वामीच्या दर्शनास निघून तो अक्कलकोटाजवळ येऊन निजला असतां त्याला स्वप्न पडलें. स्वप्नांत स्वामीमहाराज येऊन त्याच्या पोटावर त्यांनीं तीन वेळ हात फिरविला व सांगितलें तुझा रोग बरा झाला

आतां तूं ऊठ. हें ऐकून तो ब्राह्मण जागा झाला आणि लघुशंकेस जाण्यासाठीं उठला. त्या दिवशीं त्याला इतकी लघवी झाली कीं, जलोदराचें सर्व पाणी लघवीवाटें निघून जाऊन त्याचें पोट अगदीं साफ झालें. व तो बरा झाला. अशा अनेक लीला स्वामीमहाराजांनीं केल्या आहेत.

बावडेकरशास्त्र्यांवर स्वामीमहाराजांची फार कृपा होती. त्यामुळें शरीर सोडण्यापूर्वीं थोडे दिवस त्यांनीं त्यास बारशी गांवीं पाठवून दिले होते. कारण हें आपलें शरीर पडलेलें पाहून त्याच्या मनास फार दुःख होणार व नित्य त्याऱ्या ध्यानांत विघ्न येणार असें त्यांस वाटलें होतें.

स्वामीमहाराजांनीं अंतकाळीं आपलीं खेळणीं जवळच्या एका मनुष्याला देऊन त्याला सांगितलें कीं, बावडेकर येथें आल्यावर त्यांला हीं खेळणीं दे. स्वामीमहाराजांच्या देहावसानानंतर बावडेकर अक्कलकोटास गेले. तेव्हां तीं खेळणीं त्यानें त्यांच्या स्वाधीन केलीं. तीं हल्लीं बारशी येथें शास्त्र्यांच्या घरीं देवघरांत ठेविलीं आहेत.

अक्कलकोटचे महाराज केवळ ईश्वरी अवतारच होते. म्हणून वाडीस यज्ञ करण्यासाठीं त्यांची आज्ञा घेण्यास बावडेकरशास्त्र्यांस श्रीगुरुमूर्तीनीं सांगितलें परंतु तें बावडेकरांस न रुचल्यामुळें ते हट्ट बाळगून मनांत खेद करूं लागले. त्यावरून गांडाबुवानीं श्रीगुरुमूर्तीस विचारिलें.

**गांडा:**—बावडेकर हे अक्कलकोटकर स्वामींचे शिष्य असतां असा दुराग्रह कां धरून बसले आहेत? आपण सांगतां कीं ह्यांच्यावर त्या स्वामींची अत्यंत प्रीति आहे.

**श्रीगुरुमूर्ती:**—गांडा! बावडेकर हल्लीं आपलें पूर्व संचित भोगित आहेत. त्यामुळें येवढ्या समर्थाची कृपा असून त्यांला अशी बुद्धि होत आहे. यांनीं सत्पुरुषाची सेवा केली आहे. ती केव्हांही फुकट जाणार नाहीं. त्याचें फळ पुढें मिळेल.

हें ऐकून गांडाबुवा वगैरे सर्व मंडळींस आनंद झाला.

चैत्रांत नारायणस्वामींच्या समाराधनांचा उत्साह फार चांगला झाला होता. त्या उत्सवांतून श्रीगुरुमूर्ती दररोज मधुकरी आणीत असत. एकदां श्री ध्यानस्थ बसले असतां त्यांस समजलें कीं, वाडींत महामारी सुरू होईल.

त्यावरून श्रींनीं पुजाऱ्यांस सांगितलें कीं, श्रीदत्ताला जलधारारूप अतिरुद्र केल्यानें महामारी बंद होईल.

दुसऱ्यादिवशीं गावांत महामारी सुरू झाली. पुजाऱ्यानीं श्रीगुरुमूर्तीच्या आज्ञेनुरूप अतिरुद्र करण्यास सुरवात केली. त्यामुळें तो रोग बंद झाला.

वैशाख शुद्ध पौर्णिमेदिवशीं श्रीगुरुमूर्तीस श्रीदत्तभगवान ह्मणाले, आपणास अद्याप वाडीस किति दिवस राहावयाचें आहे ?

**श्रीगुरुमूर्तीः**— हे देवाधिदेवा ! माझी राहाण्याची इच्छा नाहीं. आपली आज्ञा होईल तिकडे जाण्यास मी तयार आहें.

याचें उत्तर न मिळाल्यामुळें श्रीगुरुमूर्ती तसेच राहिले. त्यामुळें श्रीदत्तात्रेयानीं सांगितलें कीं, तुह्मी शृंगेरीमठास चला. त्या दिवशीं वद्य द्वितीया झाली होती.

श्रीगुरुमूर्तीनीं पुस्तकें वगैरे गांडाबुवाजवळ देऊन दंड कमंडलु घेऊन ते मठांतून बाहेर पडले. श्रीदत्तपादुकांस वंदन करून पंचगंगा उतरून सांब गावीं मुक्काम केला. श्रीगुरुमूर्ती एकाएकीं गेलेले पाहून पुष्कळ लोक घाबरले व त्यांच्या मागें धावून गेले. त्यांला नमस्कार करण्यास सांपडला नाहीं ह्मणून श्रीनृसिंहसरस्वतीही तिकडे गेले. त्यानीं श्रीगुरुमूर्तीस नमस्कार करून प्रार्थना केली कीं,—

**श्रीसच्चित्सुखमूर्तयेऽस्तु च नमो धीसाक्षिणे श्रीगुरो**
**मायाधीश्वर ते नमोऽस्तु च पुनर्भूयः सदा ते नमः ॥**
**अज्ञार्थं धृतकर्ममार्गवपुषे भ्रातर्नमः पाहि माम्**
**मंदार्थं प्रकटीकृतं च भवता चोपाऽस्तियुक्तं वपुः ॥ १ ॥**
**लीलाविग्रहधारिणे श्रुतिशिरोरत्नं च दातुं प्रभो**
**संसाराद्विरताः पदे च तव ते सक्तास्तदर्थं नमः ॥**
**नो जानंति सुराः स्वरूपमृषयो ब्रह्मा स्वयं श्रीहरिः**
**साक्षाच्छंभुरपीह वेत्ति न गुरो मेऽज्ञस्य का वा गतिः ॥ २ ॥**
**बालस्येव पितुर्वचोऽस्तु मम वाङ्मातश्च ते तुष्टये**
**पक्षी गच्छति खे यथा बलमहं स्तोतुं वचःशुद्धये ॥**

दृश्यं रज्ज्वहिवद्रूपमृगजलं रश्मीषु तद्वद्गुरो
भात्येवास्तु हि सत्क्वचिदसदपि ते दीनप्रभो मे हृदि ॥ ३ ॥
प्रार्थना च सततं मम मातःश्रेष्ठभक्तियुता च सदस्तु धीः ॥
सततं भवतु मे तव दास्यं त्रिविधतापहरं त्रिविधं तत् ॥४॥
द्रियते वसुभिश्चिद्भिर्वसुदेव इतीर्यते ॥
स एवानंद एतस्य निधिर्यस्मिंश्च विद्यते ॥ ५ ॥
वासुदेवानंदसरस्वतीब्राह्मी तनुः स्वयम् ॥
स एवायं दत्तगुरुस्तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ६ ॥

याप्रमाणें प्रार्थना करून सर्वांनीं अपराधाची क्षमा मागून विनंती केली कीं, आपण वाडीस चातुर्मास कराल अशी त्यांस आज्ञा होती.

श्रीगुरुमूर्ती:—रे बाबांनो ! श्रीदत्ताची आज्ञा वाडीहून जाण्याविषयीं झाल्यावरून मी जात आहें. तुह्मी आपले दुर्गुण सोडून श्रीदत्तात्रयाची एकनिष्ठपणें सेवा करा ह्मणजे ते मला थोडक्याच काळांत वाडीस पाठवितील. मला येथें यावयास लावणें तुमच्या हातांत आहे. याप्रमाणें त्यांस सांगून आलेल्या सर्व लोकांस दुसऱ्या दिवशीं वाडीस जाण्याची आज्ञा देऊन श्रीगुरुमूर्ती बेळगांवावरून गुळहोसर या ठिकाणीं आले. तेथें कैवल्यानंद स्वामींच्या आग्रहावरून जेष्ठांत गंगोत्सवसमाप्तिपर्यंत, मलप्रभा कांठीं चिदंबरनाथांच्या मंदिरांत त्यांनीं गांडाबुवासह मुक्काम केला. या ठिकाणीं श्रीगुरुमूर्तींच्या दर्शनाकरितां वाडीहून परशुरामादि मंडळी आली होती. त्यांनीं सर्व रोगशमनार्थ जपादि साधन श्रीजवळ मागितल्यावरून श्रीदत्तात्रेयमहाराजांचें स्तोत्र श्रींनीं त्यांस देऊन सांगितलें दररोज शुचिर्भूत होऊन हें त्रिकाळ पठण करित जा. ह्मणजे कोणत्याही रोगापासून उपद्रव भोगावा लागणार नाहीं.

## ॥ शांतिस्तोत्र ॥

भूतप्रेतपिशाचाद्या यस्य स्मरणमात्रतः ॥
दूरादेव पलायंते दत्तात्रेय नमामि तम् ॥ १ ॥
यन्नामस्मरणाद्दैन्यं पापं तापं च नश्यति ॥
भीतिग्रहार्तिदुःस्वप्नं दत्तात्रेय नमामि तम् ॥ २ ॥

दद्रुस्फोटककुष्ठादि महामारी विषूचिका ॥
नश्यंत्यन्येऽपि रोगाश्च दत्तात्रेय नमामि तम् ॥ ३ ॥
संगजादेशकालोत्था अपि सांक्रमिका गदाः ॥
शाम्यंति यत्स्मरणतो दत्तात्रेय नमामि तम् ॥ ४ ॥
सर्पवृश्चिकदंष्ट्रानां विषार्तानां शरीरिणाम् ॥
यन्नाम शांतिदं शीघ्रं दत्तात्रेय नमामि तम् ॥ ५ ॥
त्रिविधोत्पातशमनं विविधारिष्टनाशनं ॥
यन्नारकभीतिघ्नं दत्तात्रेय नमामि तम् ॥ ६ ॥
अवैदीकृतमंत्रादि प्रयोगा यस्य कीर्तनात् ॥
नश्यंति देवबाधाश्च दत्तात्रेय नमामि तम् ॥ ७ ॥
यच्छिष्यस्मरणात्सद्यो गतनष्टादि लभ्यते ॥
य ईशः सर्वतस्त्राता दत्तात्रेय नमामि तम् ॥ ८ ॥
जयलाभयशःकामदातुर्दत्तस्य यस्स्तवः ॥
भोगमोक्षप्रदस्येयं पठेद्दत्तप्रियो भवेत् ॥ ९ ॥

हें स्तोत्र नित्य पाठ करण्यास सांगितलें. तेथून श्रीगुरुमूर्ती धारवाड येथें आले. त्यांनीं गांडाबुवास सांगितलें कीं, “ एक वर्ष झालें. माणसांची एकसारखी गर्दी पाठीस लागली आहे. आणि जोंपर्यंत तूं मजबरोबर राहशील तोंपर्यंत ही उपाधी कमी होणार नाहीं व त्यामुळें श्रीदत्तात्रेयांनीं सांगितलेला लक्षगायत्रीजप तुजकडून पुरा होणार नाहीं. या करितां तूं भडोच येथें जाऊन जपसमाप्ति करून ब्राह्मण भोजन कर. मी शृंगेरीस पोंचल्यावर तुला कळवीन. तेव्हां तूं तेथें येऊन मला भेट. ” याप्रमाणें श्रीगुरुमूर्तींची आज्ञा झाल्यावरोवर ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेला त्यांला भिक्षा करवून धारवाडाहून गांडाबुवा परत फिरले. ते भडोच येथें आले. त्यांनीं चातुर्मासांत जपसमाप्ति करून ब्राह्मण भोजन केलें.

श्रीगुरुमूर्तींनीं तुंगभद्रानदीच्या किनारीं धारवाड जिल्ह्यांतील हावनूर गांवीं शके १८३२ चा चातुर्मास केला. या गांवचे शाळामास्तर विनायक गोविंद झटक हे श्रीगुरुमूर्तीस ह्मणाले, हे भगवन्! माझ्या दुर्दैवानें मला हा कुष्ठ रोग जडला आहे. आतां माझ्या हातांनीं खाणें पिणें मुद्दां होत नाहीं. या

मुळें मला फार दुःख वाटतें. हे दयानिधे ! मला ह्या दुःखसमुद्रांतून मुक्त करा. त्याची श्रद्धा पाहून त्याला रोगशमनार्थ अनुष्ठान सांगून निमित्त-मात्राकरितां एक औषध सांगितलें. त्याप्रमाणें अनुष्ठान केल्यावर त्या औ-षधानें त्याचा रोग बरा होऊन गलित कुष्ठ साफ निघून गेला.

हिंगोली गांवचा हेमराज मारवाडी आपल्या आईला बरोबर घेऊन या ठिकाणी श्रीगुरुमूर्तींच्या दर्शनासाठीं आला होता. पूर्वी ज्यावेळीं श्रीगुरु-मूर्ती हिंगोलीस गेले होते, त्यावेळीं ह्या बाईची स्थीति अशी होती कीं, तिला वस्त्राचें मुद्रां भान नव्हतें. हें पाहून श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, कीं "या बाईला पिशाच्च बाधा आहे. त्याच्या निवारणार्थ एक यंत्र करून तें तिच्या हातांत बांधून मी सांगेन त्याप्रमाणें पिशाच्चास मुक्तता देण्याकारितां विधि-युक्त क्रिया कराल तर या बाईला बरें वाटेल." त्याप्रमाणें केल्यामुळें त्या बाईला कांहीं गुण आल्यावरून ती त्यांस भेटण्यासाठीं आली होती.

याच ठिकाणीं एक मध्वसांप्रदायी वैष्णवबाईला असा रोग झाला होता कीं, पुष्कळ वर्षेपर्यंत तिला आंथरुणावरूनही उठतां येत नव्हतें. तिला श्रीगुरुमूर्तीजवळ आणतांच त्यांनीं सांगितलें कीं, ह्या बाईला रोग नसून पिशाच्च बाधा आहे. नंतर पाणी मंत्रून तें तिच्या आंगावर शिंप-डतांच तें पिशाच्च तिच्या देहांत प्रवेश करून बोलूं लागलें 'पूर्वजन्मीं या बाईनें मला फार दुःख दिलें आहे परंतु महाराज ! मला आपलें दर्शन झालें त्यामुळें मी या बाईला सोडून जातों.' असें सांगून तें पिशाच्च निघून गेलें व ती बरी होऊन चालत आपल्या घरीं गेली. हें पाहून तेथील वैष्णव लोक श्रीगुरुमूर्तीस ईश्वरस्वरूप मानूं लागले.

चातुर्मास समाप्त झाल्यावर श्रीगुरुमूर्ती तेथून निघाले. त्यावेळीं तेथील लोकांनीं त्यांची प्रार्थना केली. ती खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. तें शृंगेरी मठांत आले. त्यावेळीं त्या मठाचे आचार्य त्याठिकाणीं नव्हते. या ठिकाणीं शृंगी ऋषीचा आश्रम व त्याची मूर्ती आहे. या ठिकाणीं भाष्य-कार भगवान् आद्य श्रीशंकराचार्यमहाराजांनीं मठस्थापना केली. त्यांची श्रीगुरुमूर्तींनीं नमस्कार करून प्रार्थना केली. ती:—

श्रीमद्भगवत्पूज्यपदेश्वर वैदिकमार्गस्थापक शंकर ॥
शिवावतार श्रीमच्छंकर किंकरदरहर त्राहि यतीश्वर ॥ १ ॥
शिवगुरुसद्गृहावतीर्ण मोहांतक जनशिक्षक तारक दांत ॥
खंडितपंडित संहतिमंडित मंडनपंडितदुर्मतशांत ॥ २ ॥
विजितासंगत शास्त्रासंमत सौगतबौद्धादिकराद्धांत ॥
प्रस्थानत्रयभाष्यकृदद्वयमतसंस्थापक दृढसिद्धांत ॥ ३ ॥
भूपभूकमठान्यो दिक्षुमठान् कृत्या चतुरस्तत्र चतुरः ॥
सुरेश्वरार्यप्रमुखाश्चतुरान्न योजयन्यो शिष्यांश्चतुरः ॥ ४ ॥
श्रीमत्परमहंसपरिव्राजक श्रीमच्छंकराचार्यमशोकं ॥
वासुदेवयतिर्भक्त्या नमति स्तुत्वा यथामति पावितलोकम् ॥ ५ ॥

लोकानीं केलेली श्रीगुरुमूर्तीची प्रार्थना—

धन्यहो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची ॥ जाहली त्वरा सुरवरां वि-
मानें उतरायाची ॥ धृ० ॥ पदोपदीं जाहल्या अपार पुण्या-
च्या राशी ॥ सर्वहि तीर्थें घडलीं आह्मां आदिकरूनि काशी ॥
धन्यहो प्रदक्षिणा० ॥ १ ॥
मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थें गाती ॥ नामसंकीर्तनीं नि-
त्यानंदें नाचती ॥ धन्य० ॥ २ ॥ ॥ ॥
कोटिब्रह्महत्या हरति करितां दंडवत ॥ लोटांगण घालितां मो-
क्ष लागे पायांस ॥ धन्य० ॥ ३ ॥
गुरुभजनाचा महिमा अगम्य निगमागमासी ॥ अनुभव जे
जाणती ते गुरुपदींचे अभिलाषी ॥ धन्यहो प्रदक्षिणा० ॥४॥
प्रदक्षिणाकरूनी देह भावें वाहीला ॥ श्रीरंगात्मजविठ्ठल पुढें
उभा राहिला ॥ धन्य० ॥ ५ ॥ ॥

घालीन लोटांगण वंदीन चरण डोळ्यांनि पाहिन रूप तुझें । प्रेमें
आलिंगिन आनंदें पूजिन भावें ओवाळिन ह्मणे नामा ॥ त्वमेव
माता च पिता त्वमेव त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ॥ त्वमेव विद्या
शरणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देवदेव ॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा

बुध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ॥ करोमि यद्यत् सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥

ह्या श्लोकांचें समाधान करून श्रीगुरुमूर्ती हरिहरक्षेत्राचें दर्शन करून मग तेथून वरील ठिकाणीं ह्मणजे श्रृंगेरीमठांत आले होते.

या ठिकाणीं भाष्यकार श्रीशंकराचार्यभगवान् यानीं एक ब्रह्मराक्षसाचें स्थान स्थापिलेलें आहे. त्याची दररोज पूजा होत असते. भाष्यकारभगवान् शंकराचार्य काशीस गेले होते तेव्हां त्यांला या ब्रह्मराक्षसानें काशींतील सर्व गुप्त गोष्टी कळविल्यामुळें ही हकिगत त्यांला माहीत होऊन त्यानीं ब्रह्मराक्षसास काशी सोडून निघून जाण्यास सांगितलें, तेव्हां ती बातमी त्यानें आचार्यांस कळविली. ते ह्मणाले, तूं मजबरोबर चल. मी तुला स्थान देईन. त्याप्रमाणें तो ब्रह्मराक्षस आचार्यांबरोबर श्रृंगेरीमठास आला. त्या ठिकाणीं त्याला त्यानीं एक जागीं स्थापून रोज पूजा नैवेद्याचा बंदोबस्त करून दिला.

मठांतील कोणत्याही मनुष्यानें काहीं कपट केलें तर हा ब्रह्मराक्षस त्याला धरून मठाधिपती आचार्यांच्या स्वाधीन करीत असे. याप्रमाणें आजपर्यंत चाललें होतें परंतु हल्लीं मात्र तो नियम दृष्टीस पडत नाहीं त्यामुळें मठांत अंदाधुंदी चालत आहे.

श्रीगुरुमूर्तीनीं श्रृंगेरीमठ व तुंगभद्रानदीचा किनारा सोडून अरण्याच्या रस्त्यानें वनवासी क्षेत्रामध्यें येऊन दत्तजयंती केली. या ठिकाणीं अधिकारी शिष्यांसाठीं श्रीगुरुमूर्तीनीं वेदांतसाररूप षट्पंचाशिका स्तोत्र करून दिलें.

**ज्यात्मा सच्चित्सुखो दत्तो रक्तोष्णाकाशदीपवत् ॥ मायाब्धिनौर्द्विढाऽसंगा तद्भक्तिर्न तथा प्लवः ॥ १ ॥ भवाध्वतापश्रांतस्य सीतारामः समाश्रयः ॥ यथाऽध्वतापश्रांतस्य सीतारामः समाश्रयः ॥ २ ॥ भवांबुधिनिमग्नस्य तारिणी भगवत्कथा ॥ यथांबुधिनिमग्नस्य तरणिर्विधिचोदिता ॥ ३ ॥ भवतापाभितप्तस्य शरणं न गुरोः परम् ॥ दवतापाभितप्तस्य शरणं न वनात्परम् ॥ ४ ॥ रोचते सुविरक्तस्य न सांसारिकपुंकथा ॥ यथा गिलज्ज्वरार्तस्य सरसा नांदिसत्कथा ॥ ५ ॥**

शृणोति सर्वं संन्यस्य श्रुतिवार्तां स आदरात् ॥ परव्यसनिनी नारी जारवार्तां यथाऽऽदरात् ॥ ६ ॥ कथंचन त्यजेन्नैव विवेकी शांतिगेहिनीं ॥ यथा कामाग्निसंतप्तो विवेकी कांतगेहिनीम् ॥ ७ ॥ मुक्तिर्न सुलभाऽध्यासभातनानात्वदर्शिनः । आदर्शबिंबितानेकद्वारदर्शिशिशोरिव ॥ ८ ॥ धीमाञ्छमादिसंपन्नः सद्गुरूक्त्या लभेत्पदम् । चोरैस्त्यक्तो वने यद्वत्तदभिज्ञगिरा नरः ॥ ९ ॥ भवान्भूमेत्यकर्तात्मत्वं व्रजेत्सद्गुरोर्गिरा । भिल्लपालितराट्पुत्र आप्तोक्त्या राजतामिव ॥१०॥ कूटस्थसच्चिदानंदतनोर्बंधविमोचने । पुत्रस्य जातिर्वंध्याया इव जन्मोत्सवात्ययौ ॥ ११ ॥ वाचारंभणमात्रं चिंतनौ विश्वं न चापरम् ॥ वस्त्वंतरं यथा ध्वांते रज्जौ सर्पविसर्पणम् ॥ १२ ॥ विषयग्रहणेच्छा तु स्वात्मविज्ञानतः पुरा । अज्ञस्य शुक्तिविज्ञानात्पुरेव रजतस्पृहा १३ भ्रममात्रमसद्विश्वं ज्ञातं चेत्तेन कः सुखी । को नाम शुक्तिरौप्येण जातो धनसमृद्धिमान् ॥ १४ ॥ जगदस्तित्ववादो न स्वात्मज्ञाने प्रकाशिते ॥ ध्वांते स्थाणौ पिशाचादि भ्रांतिर्दीप इवाहृते ॥ १५ ॥ आश्चर्यमेतद्विश्वं न पुराद्योर्ध्वं च भाति चेत् ॥ भातु नामैंद्रजालाभचिदात्मनि तु मायया ॥ १६ ॥ असच्चेज्ज्ञस्य तेनापि व्यवहारः क्षणं कुतः ॥ नायं दोषोऽपि जानस्यप्निंद्रजालं हि वीक्षते ॥ १७ ॥ एकोऽपि सन्नयं भूमा मायया भात्यनेकवत् । पुंसो यथाऽक्षिदोषेण चंद्र एको द्वितीयवत् ॥ १८ ॥ आत्मोपाधिवशाद्भाति निश्चलोऽपि हि चंचलः । विकारी निर्विकारोऽपि जलोपाधिगतार्कवत् ॥ १९ ॥ नित्यं भ्रमादिवाभाति मायाभ्रमविजृंभितम् । जगच्चक्रं यथाऽलातचक्रं भ्रांतदृशोरिह ॥ २० ॥ विद्योतते नात्मविद्या यावत्तावच्चिदंबरे । विविधं भाति विश्वं खे गंधर्वनगरं यथा ॥ २१ ॥ आरोपितजगद्बाध आत्मैकः परिशिष्यते । शत्रून्हत्वाऽखिलान्युद्धे महावीरो यथैककः ॥ २२ ॥ विक्षेपः शिष्यते मायावरणेऽपि विद्यातिते । उपादाने विनष्टेऽपि कार्यं तिष्ठति हि क्षणम् ॥२३॥ समे प्रारब्धभोगेऽपि ज्ञानी क्लिश्यति नाज्ञवत्॥ समेऽप्यध्वश्रमेऽध्वज्ञो दैन्यं नैति यथाऽज्ञवत् ॥२४॥ पतत्वद्य युगांते

वा वपुर्मुक्तस्य चित्तनो: । कुंभे भग्ने स्थिते वाय्वोर्हानिलाभौ कुतस्तत: ॥ २५ ॥ संकल्पमात्रं विश्वं सद्भाति मंदमतेर्यथा । संकल्पमात्रभाता स्त्री सत्या विरहिणो भ्रमात् ॥ २६ ॥ स्वस्वरूपास्थितौ सत्यां दु:खं नैव सुखात्मनि । यथा वास्यादिके त्यक्ते कष्टं त्वष्टरि नैव तत् ॥ २७ ॥ नाध्यात्मिकादिछिन्नोऽपि जात्वेकरसतां विभु: । त्यजत्यात्मा यथा लोके पटतां चित्रित: पट: ॥ २८ ॥ कामं सृजतु कूटस्थे माया विश्वं चिदंबरे । नास्या लाभो न वा हानिर्वर्षत्यब्दे यथा दिव: ॥ २९ ॥ करणव्यवहारैस्तु कूटस्थात्मा न लिप्यते । न लिप्यते यथा कूटो लोहानामपि ताडनै: ॥ ३० ॥ तत्तन्मय इवाभातोऽप्यात्मा कोशेभ्य उत्तर: । तेभ्यो विवेचित: शुद्ध: स्फटिको रंगतो यथा ॥ ३१ ॥ मुक्तात्मा व्यवहारेऽपि स्थितस्तेन न लिप्यते । असंगत्वात्ततोऽन्यत्वात्पद्मपत्रमिवांभस: ॥ ३२ ॥ देहादितापतप्तोऽहमिति धीर विवेकिन: । पुत्रदारेषु तप्यत्सु तपामीति मतिर्यथा ॥ ३३ ॥ सच्चिदानंदरूपोऽहमेवं निश्चयवानपि । मर्त्योऽस्मीति कदाचिद्विभ्रमवन्मनुते क्षणम् । ३४ । निराकृत्य त्यजेद्विश्वं सारमास्वाद्य नीरसम् ॥ यथा त्यजति नि:सारं फलं स्वादुरसं पिबन् ॥ ३५ ॥ नात्यंतासन्नमात्मानं मूढ: पश्यति दुष्टदृक् ॥ यथा दिवांध उदितमर्कं लोकप्रकाशकम् ॥ ३६ ॥ विभाव्याज्ञान्यं प्रपंचं सुखं चापि बिभेत्यत: ॥ दीपादितो दृश्यमानां स्वच्छायामिव बालक: ॥ ३७ ॥ माया खादिविकारैर्न ब्रह्मान्यथयितुं क्षमा ॥ विमलं खं यथाऽध्यस्तधर्मा मलिनतादय: ॥ ३८ ॥ व्यभिचारिसुषुप्त्यादि दशा बुद्धिगुणोदिता: ॥ बुधे स्वीया न निर्मोका यथा सर्पगुणोदिता: ॥ ३९ ॥ व्यवहारांगसापेक्ष: स्वप्नो जागृदितीक्षितु: ॥ गृहिणो गेहसापेक्ष वाह्यादिव्यवहारवत् ॥ ४० ॥ ज्ञस्य निद्रा समाधिर्वा सुखा सर्वोपसंहृति: ॥ व्यापाराकुलितस्येव सुखा सर्वोऽपि संहृति: ॥ ४१ ॥ कामं करोतु विधितो मुक्त: कर्ताऽस्य तेन किम् ॥ स्तोकाभ्रच्छादितोऽर्को यो राहुग्रस्तो भवेत्स किम् ॥ ४२ ॥ मिथ्याजगत्समुल्लासात्प्रबुद्धस्य कथं भयम् ॥ व्याघ्रादीन्पश्यत: स्वप्नात्प्र-

बुद्धस्य कथं भयम् ॥ ४३ ॥ आदेयात्मनिरीक्षार्थमनात्मधियमुज्ज्वलाम् ॥ यथाऽऽस्यहीनमुकरो मुखसौंदर्यवीक्षणे ॥ ४४ ॥ क्रमेण वर्धमानेंऽतबोंधे हार्दतमः क्षयः ॥ कलाभिर्वर्धमानेऽब्जे यथा नैशतमः क्षयः ॥ ४५ ॥ प्राज्ञोऽपि बोधितोंऽतर्दृग्ज्ञानात्यन्यन्न किंचन ॥ ग्रासे ग्रासे बोधितोऽपि निद्राण इव बालकः ॥ ४६ ॥ स्वानुभूतिरसास्वादे विषया विरसा विदः ॥ यथाऽऽरनालं विरसं परमामृतपायिनः ॥ ४७ ॥ पूर्वाभ्यस्तसमाधिं ज्ञो वांछत्याप्ताखिलात्मतः ॥ कालात्ययाय राजेव सुसमृद्धोऽपि देवनं ॥ ४८ ॥ नाऽनंदयाति विध्याधिनिस्त्रैगुण्याध्वचारिणम् ॥ निर्व्यापारालसनर देशिका दोशक्तं यथा ॥ ४९ ॥ चिंतयानोऽपि तत्वं स्वं स्वच्छदो न नियस्यते ॥ साम्राज्यगं स्वतंत्र च प्रजाभिरिव राट्सुतः ॥ ५० ॥ परमार्थदृशः क्वापि नेष्टानिष्टे शुभाशुभे ॥ वृष्ट्याऽवृष्ट्याप्यूषरस्थस्यसवृद्धिक्षयाविव ॥ ५१ ॥ चित्रप्रापंचिकैश्वर्यं तत्वज्ञं रंजयेत्कथम् ॥ हावैः स्त्रीवेषधृक्स्वज्ञहृदुन्मथयतीह किम् ॥ ५२ ॥ ज्ञानी क्षीणान्यकर्माऽपि प्रारब्धं सहतेऽवशी ॥ व्यालग्राही गृहीताहिर्यथा तत्कृतपीडनम् ॥ ५३ ॥ प्राप्तकामं स्थितप्रज्ञं स्वयं कामा विशंति तैः ॥ शांता नोत्सर्पति यथा पूर्णाब्धिरचलोंऽबुभिः ॥ ५४ ॥ श्रुत्याद्यावृत्तिं योगाग्न्युज्ज्वालितः पूर्वरूपभाक् ॥ जीव आत्मैव चागन्तुं मलदाहे सुवर्णवत् ॥ ५५ ॥ कीटभ्रमरिदृष्ट्या न चित्रं स्वध्यानतः स्वता ॥ नामरूपोपाध्यपाये सत्यैक्यं सरिदब्धिवत् ॥ ५६ ॥ या षट्पंचाशिका वासुदेवानंदीयमुद्धता ॥ वानवासीपुरि तया प्रीयतामात्रिनंदनः ॥ ५७ ॥

बनवासीगांवी सह्याद्रि घांटावरचा एक ब्राह्मण श्रीगुरुमूर्तीजवळ येऊन प्रार्थना करून ह्मणाला, हे भगवन्! मी घर बांधतों व तें तयार होत आलें ह्मणजे एक पिशाच्च येऊन मजला सूचना देऊन तें घर जाळून टाकितो. असें दहा वेळ झाल्यामुळें मी फार कंटाळून गेलों आहें. या करितां आपण मजवर कृपाकरून कांहीं उपाय सांगून मला या दुःखांतून मुक्त करा. तें ऐकून श्रीगुरुमूर्तींनीं त्या पिशाच्चास बोलावून विचारिलें, तूं याचें घर कां जाळून टाकितोस?

पिशाच्च:—महाराज ! पूर्व जन्मीं यानें मला फार दुःख दिलें आहे. इतकें असूनही याला सोडून जाण्याविषयीं आपली आज्ञा होत असेल तर याजकडून माझ्या मुक्तिकरितां तुमच्या इच्छेप्रमाणें सत्कृत्य करवा म्हणजे मी याला पीडा करणार नाहीं.

त्या ब्राह्मणाला श्रीगुरुमूर्तीनीं कांहीं परिहार सांगून नंतर घर बांधण्यास सांगितलें. त्यामुळें त्याला आतां कांहीं उपाधी होत नाहीं.

हें सह्याद्रिवन फार रमणीय आहे. येथें केळी, सुपारी, नारळी, संत्रें, पेरू, वेलदोडे, फणस, आंबे, जांभूळ, काजू, अंजीर, ऊंस, डाळिंब, जाई, जुई, मोगऱ्या, चमेली, दवणा, मरवा, गुलाब इत्यादि फल पुष्पदायक वनस्पती, शिवाय साग, शिसव, वड, पिंपळ, चंदन इत्यादि उपयुक्त अनेक महान् वृक्ष संमर्द असून डोंगराचीं मोठमोठीं शिखरें आहेत. त्यांतून उत्तम गोड पाण्याचे स्वच्छ झरे ठिकठिकाणीं वाहात आहेत. तसेच पोपट, मैना, चाप, सारस, मोर इत्यादि रम्य पक्षी, वाघ, आस्वल, लांडगे, कोल्हे, डुकरें, व हत्ती यांचे समुदाय जिकडे तिकडे दिसत होते. त्यामुळें हें वन केवळ इंद्राच्या नंदनवनाप्रमाणें मनाला तन्मय करून सोडीत होतें. ही शोभा अवलोकीत श्रीगुरुमूर्ती पश्चिम समुद्रतीरीं असणाऱ्या गोकर्णमहाबळेश्वरनामक ज्योतिर्लिंगाला आले व त्यांनीं त्याची प्रार्थना केली.

## प्रार्थना.

**महाबळेश्वर त्राहि । हालाहालसमाद्भवात् ॥**
**बंधमोचनकृत्त्वत्तो लेखाग्रेष्वपि कः परः ॥**
**श्वपाकोऽप्युद्धृतेत्येवं रवींद्राभिक्षणश्रुतं ॥**
**तारकत्वामपञ्चासिहितकृत्परिपाहि माम् ॥ १ ॥**

त्या नंतर अहल्याबाईच्या धर्म शाळेंतील बळवंतराव कारकुनाच्या आग्रहावरून त्यांनीं त्या ठिकाणीं मुक्काम केला.

श्रीशंकरभगवानाचें आत्मलिंग रावणहस्तें या ठिकाणीं आलें व तें श्रीशंकरपुत्र गणपती यांनीं स्थापन केलेलें आहे.

[library stamp]

# गोकर्णमहाबळेश्वरक्षेत्रोत्पत्ति.

एके दिवशीं रावणानें आपल्या आईला मृत्तिकेचें शिवलिंग करून त्याची पूजा करतांना पाहिलें व ह्मणाला, हे माते ! मी त्रिभुवन-विख्यात रावण तुझा पुत्र असतांना तूं मातीचें लिंग करून त्याची पूजा करतेस, हें मला भूषणावह नाहीं.मी तुझ्यासाठीं प्रत्यक्ष शंकरासच येथें घेऊन येतो. असें ह्मणून तो मानससरोवराजवळ कैलास पर्वतीं जाऊन श्रीशंकरभगवंताची आराधना करूं लागला. त्यावरून त्याचा निश्चय पाहून श्रीशंकर भगवान प्रसन्न झाले. तेव्हां रावण हात जोडून त्यांला ह्मणाला; हे भगवन् ! आपण लंकेत येऊन राहावें. कारण माझी वृद्ध आई मातीचें लिंग करून तुझी पूजा कारिते हें कांहीं मला बरें वाटत नाहीं. तेव्हां शंकर ह्मणाले, रावणा ! मी आत्मलिंग तुला देतों. तें तूं घरीं ने व आपल्या मातोश्रीस पूजेसाठीं दे. मात्र वाटेंत जमिनीवर ठेवूं नकोस. हें लिंग ज्या ठिकाणीं असेल त्याठिकाणी मी नित्य आहें असें समज. तें स्थळ व कैलास यांत मुळींच अंतर नाहीं. असें सांगून ते अंतर्धान पावले. तें लिंग घेऊन रावण लंकेंत यावयास निघाला तेव्हां हें वर्तमान सर्व देवांस समजलें त्यामुळें ते मोठ्या विचारांत पडले. ते ह्मणाले, हें, आत्मलिंग जर लंकेंत जाईल तर हा रावण अजरामर होऊन कोणाला ही ऐकणार नाहीं. व आपली याच्या गुलामगिरींतून कधींच सुटका होणार नाहीं. यासाठीं योग्य उपाय योजून हें लिंग लंकेंत न जाण्याची जरूर तजवीज केली पाहिजे. त्यावेळीं श्रीविष्णु ह्मणाले, सिद्धिबुद्धिदायक गणपतीला पाठवून हर प्रयत्नानें हें लिंग मध्यमार्गांतच राहील असें करावें. ती योजना सर्वांस पसंत पडून त्यांनीं श्रीगणपतीची प्रार्थना केली. त्यावरून बटु ब्रह्मचाऱ्याचा वेष घेऊन रावणाच्या मार्गावर समिधा व दर्भ तोडण्याच्या व गाईचारण्याच्या निमित्तानें जाऊन बसला. इतक्यांत श्रीविष्णूच्या आज्ञे वरून सुदर्शन चक्र सूर्याच्या आड झालें त्यामुळे सूर्याचा अस्तमान समय जवळ आल्यावरून रावणानें संध्यासमयीं अर्घ्य देतां यावें ह्मणून, आपल्या हातांतील आत्मलिंग कांहींवेळ देण्या-

सांठीं जवळ पास ब्राह्मणाचा तपास केला. तेव्हां तो ब्राह्मणस्वरूपी गणपती त्याला दिसला. त्याच्याहातीं लिंग देऊन रावण ह्मणाला मी संध्याकरी पर्यंत हें लिंग तुह्मी सांभाळा. हें जमिनींवर ठेवितां नये. मी लवकरच येतों.

**ब्रह्मचारी**:—माझ्यागाई ओढाळ आहेत त्या भडकून इकडे तिकडे गेल्या तर माझे गुरुजी मला रागें भरतील; याकरितां हें काम माझ्यानें होणार नाहीं.

**रावण**:—मी हा लवकरच संध्या आटपून येतों.

**ब्रह्मचारी**:—माझ्यागाई लांब गेल्या तर मी हें लिंग येथें जमिनींवर ठेऊन चालता होईन. आपली वाट पाहत थांबणार नाहीं.

रावणानें ती गोष्ट कबूल करून तें लिंग त्या ब्रह्मचाऱ्याच्या हातीं दिलें व आपण संध्या करण्यास सुरुवात केली. अर्घ्य देण्याचा सुमारास गाई तुफान होऊन पळून जाउं लागल्यामुळें ब्रह्मचाऱ्यानें रावणास ओरडून मोठ्यानें तीन वेळ बजाविलें कीं माझ्या गाई पळून जात आहेत तूं हें आपलें लिंग सांभाळ नाहीं पेक्षां मी तें जमनीवर ठेऊन निघून जाईन. असें सांगितलें परंतु तो आला नाहीं तेव्हां चवथ्या वेळीं तो तें लिंग जमिनीवर ठेऊन चालता झाला. नंतर रावण येऊन तें उचलूं लागला परंतु तें जमिनीस घट्ट चिकटल्यामुळें त्यास हालेना. तो जोरानें उपटावयास लागला तेव्हां त्याचा वरचा भाग मुरडून गेला. पण तें मोकळें झालें नाहीं. तें वर काढीत असतां मुरडल्यामुळें गोकर्णाकार झालें व मोठ्या शक्तीनेंहीं उपटून न आल्यामुळें त्यास गोकर्णमहाबळेश्वर असें नाव पडलें. तो ब्रह्मचारीस्वरूपी गणपती व त्याच्यागाई त्याच ठिकाणी गुप्त झाल्या. या प्रमाणें या भूकैलासाची उत्पत्ति आहे.

गोकर्णमहाबळेश्वरानजीक एका गांवीं सुब्रानांवाचा एक ब्राह्मणराहातो त्याला पिशाच संबंध आहे. त्याची भाषा तेथील शंकराचार्यांच्या मठांतील शास्त्र्यां शिवाय दुसऱ्या कोणास कळत नाहीं.

त्या मुळें पिशाचाची शास्त्रयांवर कृपा होऊन, कोणास कांहीं पिशाच उपद्रव होऊं लागला कीं, त्याला हा ब्राह्मण पिशाचाजवळ घेऊन जातो. मग तो पिशाच बोलूं लागतो कीं, मी रुद्रगण आहें तुला ह्या उपाधी पासून मुक्त होणें असेल तर तूं या मठाच्या शास्त्रयांस अमुक अमुक वस्तु आणूनदे- त्याप्रमाणें वस्तु त्यानें त्या शास्त्रयांस आणून दिल्या तर तो त्या मनुष्यास उपाधिपासून मुक्त करितो- पुष्कळ दुःखी लोक त्या ब्राह्मणापाशीं येतात. त्यांत बहुतेकांस गुण येतो. ह्या प्रमाणें पिशाच सुद्धां आपलें पूर्वजन्मींचें ऋण अशाप्रकारें वसूल करून देतो. या विषयीं श्रीगुरुमूर्तीस विचारल्या वरून ते ह्मणाले हा रुद्रगण नसून पिशाच आहे. असो. तेथें मकर संक्रांत करून श्रीगुरुमूर्ती गुर्लीहसोरास गेले. व तेथून कृष्णातीरीं गालवक्षेत्रीं जाऊन त्यांनीं मुक्काम केला.

याठिकाणीं गांडाबुवा आज्ञेप्रमाणें श्रीगुरुमुर्तीस येऊन भेटले.

याक्षेत्रांतील ब्राह्मणांनीं आपल्या कल्याणार्थ श्रीगुरुमूर्तीची आज्ञा घेऊन संहिता, रुद्र व पवमान यांचे स्वाहाकार करविले.

श्रीगुरुमूर्तीनीं गांडाबुवास सांगितलें कीं तुझ्या मातोश्रीस पुत्र होत नसल्यामुळें तिनें शिवरात्रीचें व्रत केलें, त्यामुळें तुझा जन्म झाला आहे व तुझी वृत्ती सत्वगुण प्राधान्य झाली आहे याचें कारण हेंच आहे. तसेंच तुला जो हा लाभ झालाआहे, हें सुद्धां त्या व्रताचेंच फळ आहे, या करितां तूं आपल्या मातेला ह्या ऋणांतून मुक्तकर. ह्मणजे तिनें ह्या व्रताचें उद्यापन केलें नाहीं तें तूं कर.

हें ऐकून गांडाबुवानें श्रीगुरुमूर्तीची परवानगी घेऊन द्वादशी व त्रयोदशी या दिवशीं ऋग्वेद व यजुर्वेद यांच्या नियमान्वयें लघुरुद्राचा स्वाहाकार करवून महाशिवरात्रीचे दिवशीं उद्यापन करविलें व दुसरे दिवशीं ब्राह्मण भोजन घालून गांडाबुवा मातृऋणांतून मुक्त झाले. याचें नांव गुरुकृपा.

जो पुत्र मातापित्यांच्या ऋणांतून मुक्त होत नाहीं, त्यांला सद्गती दे-

ण्यासाठीं शास्त्रोक्त कर्मे करीत नाहीं, त्याला पुत्र ह्मणण्यापेक्षां आपल्या उदरीं धोंडा जन्मला असें समजावें. त्यानें आपल्या मातेच्या उदरांत नऊ महिनें वास करून तिला व्यर्थ शिणविलें असेंच समजावें.

श्रीगुरुमूर्ती ह्या गावांत असतांना जमाखिंडी येथील मराठीशाळेचे असिस्टंट मास्तर आपल्या मातोश्रीस घेऊन त्यांच्या दर्शनासाठीं याठिकाणीं येऊन त्यानीं श्रींस विनंती केली कीं, माझ्या मातोश्रीचे सर्व सांधे एकाएकीं काहीं व्याधिमुळें जखडले आहेत. तिला बिलकूल उठतां येत नाहीं. पुष्कळ उपाय केले परंतु काहींच गूण आला नाहीं. मी आपणास शरण आलों आहें. मला काहीं उपाय सांगून या दुःखांतून मुक्त करावें.

श्रीगुरुमूर्तीः—या बाईला काहीं व्याधि नसून पिशाच्चबाधा आहे.

असें ह्मणतांच तें पिशाच्च त्या बाईच्या शरीरांत प्रवेश करून बोलूं लागलें. या बाईनें माझ्या राहण्याऱ्या जागेवर लघुशंका केल्यावरून मी हिला धरिली आहे. आज आपलें दर्शन झाल्यामुळें हिला सोडून जातों. असें सांगून तो पिशाच्च त्या बाईच्या शरीरांतून निघून गेला. नंतर ती बाई चांगली हिंडूं फिरूं लागली.

हें ठिकाण सोडून श्रीगुरुमूर्ती जाऊं लागले त्यावेळीं बाबुराव, आण्णादिक्षीत, शिरोळीकर गंणेशशास्त्रीवगैरे मंडळीनीं त्यांची प्रार्थना केली:—

**तुजला मी शरण श्रीपादराज ॥ धृ० ॥ बुडतों भवसिंधुमाजि तारीं तारीं लाज ॥ भोगीयेलें सुखदुःख पापपुण्यकरोनियां । नानायोनि फिरोनियां नरतनु आलों आज ॥ तुजला० ॥ १ ॥ दीपपतंगाचे परी संसाराची प्रीति भारि । तव भक्ती सोडोनियां विषयाचें करि काज ॥ तुजला० ॥ २ ॥ तापत्रयवडवाग्नीनें पोळलों मी नरहरी । कृष्णदासदीनावरी कृपाकरीं महाराज ॥ तुजला० ॥ ३ ॥**

याप्रमाणें प्रार्थना करून सर्वांनीं साष्टांगनमस्कार केले. त्या सर्वांचें शांतवन करून श्रीगुरुमूर्ती तेथून निघून कृष्णातीरीं जैनपूर गावीं येऊन त्यानीं मुक्काम केला.

त्या ठिकाणीं एका लिंगाइताची स्त्री दर चतुर्दशीपासून प्रतिपदेपर्यंत ३ दिवस बेशुद्धपडून काष्टवत् होत असे. पुष्कळ उपाय केले तरी तिला

म्हणून आला नव्हता. शेवटीं तिला श्रीगुरुमूर्तीजवळ आणितांच ते म्हणाले, श्रीदत्ताला प्रदक्षिणा घातल्यास ही बाई चांगली होईल. ह्या आज्ञेप्रमाणें तिनें कारितांच ती बाई चांगली झाली.

श्रीगुरुमूर्ती गांडाबुवासह तेथून निघून कृष्णातीरानें घटप्रभेच्या संगमावर शके १८३३ च्या चैत्र कृ० आमावास्ये दिवशीं येऊन पोहोंचले. त्या ठिकाणी नारायण स्वामीची पुण्यतीथि करून त्यांनीं मलप्रभा संगमीं स्नान केलें. नंतर गांडाबुवासह ते छायाभगवतीच्या दर्शनास गेले. या ठिकाणीं विश्वामित्रऋषींनीं लोहपिष्ट भक्षण करून साठहजारवर्षे तपश्चर्या केली होती. या ठिकाणीं डोंगर पुष्कळ आहेत परंतु त्यांवर वृक्षाचें नांवही मिळावयाचें नाहीं. त्या ठिकाणीं गोखरूचे कांटे मात्र इतके आहेत कीं, पाय ठेवण्यासही जागा सांपडावयाची नाहीं. तसेंच या भागांत मनुष्यवस्तीही मुळींच नाहीं. छायाभगवतीची पूजा फक्त अक्षय्यतृतीयेदिवशींमात्र होते. व त्यादिवशीं यात्रा भरते. यात्रा संपल्यावर श्रीगुरुमूर्ती गांडाबुवासह पुढें गेले. यावेळीं त्यांला फार त्रास झाला होता.

तेथून पुढें निघतेवेळीं श्रीगुरुमूर्तीस दृष्टांत झाला कीं, तुह्मांला व्याधि जडणार आहे. त्याप्रमाणें कोपरगावीं नरसिंहाचें स्थान आहे त्याठिकाणीं येतांच त्यांस एकाएकीं ज्वर आला. दोन दिवस त्याठिकाणीं मुक्काम केल्यावर ताप कमी होत नाहीं असें पाहून ते तसेच पुढें जाऊं लागले. या प्रांतांत विपूल पैसा खर्च करावयास तयार असतांही दहीं, दूध किंवा ताक मिळेना हें पाहून गांडाबुवा फार घाबरले. इकडचे लोक फार रानटी व निर्दय आहेत. तसेंच बहुतेक ब्राह्मणलोक माध्व सांप्रदायी वैष्णव आहेत. हे लोक भस्म लावणाराचा फार द्वेष कारितात. या अडचणीमुळें श्रीगुरुमूर्तीस ताक मिळालें नाहीं. यामुळें कृष्णा आणि भीमा यांच्या संगमावर काडलूरगांवच्या पश्चिमेस दीडकोसावर एक गांव असून त्या ठिकाणीं ब्राह्मणांचीं तीन घरें होतीं. त्या ठिकाणीं गांडाबुवा ताक मागण्याकारितां गेले. गांवजोश्यांचे घरीं ताक होतें. त्या ठिकाणीं जाऊन गांडाबुवा ह्मणाले, अहो बाई ! मजबरोबर एक स्वामीमहाराज आहेत ते आजारी असल्यामुळें आज चार पांच दिवस बिलकूल जेवले नाहींत. त्यांच्यासाठीं ताकाची जरूर आहे ह्मणून मी

आपल्याकडे आलों आहें. पैसे घेऊन एक लोटीभर ताक द्यावें. तावढतोब तुमची किंमत मी देतों.

त्या घरचा मालक जोशी ह्मणाला, चार पांच दिवस उपाशीं असून सन्याशी मेला नाहीं कसा ? असें ह्मणून त्यानें ताक न देतां त्यास परत लावून दिलें तेव्हां ते उभयतां तेथून काडलूर गावीं आले. त्या ठिकाणीं गांडाबुवानीं तपास केला. तेह्यां यांस एका बाईनें सांगितलें, अजून ताक व्हावयाचें आहे. करितां काहीं वेळाने यावें. त्यानंतर गांडाबुवा स्नानाकारितां कृष्णेवर गेले.

श्रीगुरुमूर्तीनी फार तहान लागल्यामुळें त्यांच्या पश्चात त्या बाईजवळ जाऊन ताक मागितलें. त्यांला पाहून घरच्या मालकानें विचारिलें, तूं येथें कां आलास ? श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, तुमच्या घरच्या मंडळीनें ताक देतों ह्मटलें होतें ह्मणून मी आलों आहें. त्यावर तो ब्राह्मण ह्मणाला जा जा येथून; तुह्माला काहीं यठिकाणीं ताक मिळणार नाहीं. पुनः मला तोंड दाखवूं नकोस.

तें ऐकून गुरुमूर्ती परत आले. इतक्यांत स्नान आटपून गांडाबुवाही आला. त्याला ते ह्मणाले, आतां तूं ताक आणावयास जाऊं नकोस. हें ऐकून त्याला फार आश्चर्य वाटलें.

ज्यांच्या दर्शना साठीं मोठ मोठे राजे, सावकार, विद्वान्. शास्त्री, ब्रह्मचारी फिरतात त्या पुरुषाला यःकश्चित ताका करितां अशा तऱ्हेचें उत्तर मिळावें काय ? अरेरे ! हें तर कृष्णपरमात्म्यास रजका जवळ वस्त्रांची याचना करण्याचा प्रसंग येण्यासारखें झालें. हा ब्राह्मण किती प्रारब्धवान् असावा ह्याचा प्रत्येकानें अवश्य विचार करावा. असो. भाग्य त्याब्राह्मणाचें.

श्रीगुरुमूर्ती तेथून निघून श्रीपाद श्रीवल्लभ महाराजांच्या दर्शनासाठीं कुरवपूर ऊर्फ कुरुगड्डी या गांवीं वैशाख वद्य षष्ठी रोजीं येऊन दाखल झाले. त्यांनीं शके १८३३ चा चातुर्मास याच ठिकाणीं केला. हें स्थान फारच रमणीय आहे. त्याच्या आठही बाजूंनीं कृष्णेचा प्रवाह वाहात असल्या मुळें ह्या स्थानासारखें दुसरें स्थान त्रिभुवनांत मिळणें दुर्लभ. ह्या गांवात ब्राह्मणाची फक्त दोनच घरें आहेत. एक पूजाऱ्याचें.

व दुसरें कुळकर्ण्याचें. त्यांत पुजारी तिघेबंधु व कुळकर्णी दोघेबंधु. ह्यांत कोणाचेंच लग्न झालेलें नव्हतें.

येथील देव ब्रह्मचारी व पूजारी ब्राह्मणही ब्रह्मचारीच. त्यालोकांचा तो शूद्राचार पाहून श्रीगुरुमूर्ती तेथून पुढें जाण्यास निघण्याचा विचार करूं लागले; इतक्यांत देवाची आज्ञाझाली कीं, तुह्मी याच ठिकाणी चातुर्मास करावा व पूजारी यांचे कडील भिक्षा रोज घ्यावी. त्यांचा आचार विचार पाहूंनये. कारण आचारापेक्षां द्रव्यशुद्धि अधीक आहे. व त्यापेक्षां मनशुद्धि जास्तश्रेष्ठ आहे. आजपासून तुह्मी आपल्या पायांचें तीर्थ कोणाला देऊंनका. त्याचप्रमाणें अधिकाराशिवाय मंत्र कोणाला देऊंनये. येथें येणारांनीं वाडी व गाणगापूर येथल्या प्रमाणें वर्तन ठेवावें. पूजाऱ्याचें वर्तन पाहून त्या प्रमाणें वागूंनये. शुचिर्भूत पणा अवश्य राखावा.

श्रीदत्तभगवानाची या प्रमाणें आज्ञाहोतांच श्रीगुरुमूर्तीनीं सर्वांस सांगितलें, तुह्मी पवित्र पणानें राहून देवाची सेवा करावी आणि वाडीस व गाणगापुरास ज्या प्रमाणें वर्तन ठेवावें लागतें त्याचप्रमाणें येथें वागावें असें ह्मणून पूजाऱ्या कडील भिक्षा घेण्यास त्यांनीं सुरवात केली. हें स्थान अगदीं जंगलांत असल्या कारणानें तेथें कोणी येतनसे. त्यामुळें पूजाऱ्यास वाईट प्रकारचा प्रतिग्रह घेण्याचा प्रसंग येत नाहीं. या देवाला निजामसरकारांतून पुजा नैवेद्या निमित्त जमीन मिळालेली आहे. त्यांतून ते पूजारी आपला निर्वाह चालवितात. ह्मणून त्यांची द्रव्य शुद्धि आहे. त्यामुळें त्यांच्या कडील भिक्षा घेण्यास श्रींनीं सुरवात केली. याठिकाणीं त्यांनीं सर्वांला खालीं लिहिल्या प्रमाणें ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला.

हा देह दृश्य जड अन्नविकार माता । तातासवीर्यजअमंगलजीवजाता ॥
प्रेता न पाहति न हा मम रूपभूत । कूटस्थमी तरि सदोदित साक्षिभूत १
त्वङ्मांसलोहिताशिरास्थिसमूहदेह । ज्या आंत श्लेष्ममलमूत्रचि मोहगेह ॥
दे होय नष्ट जड बुद्बुदसे अनंत । कूटस्थ० ॥ २ ॥ मायाविनिर्मितपदार्थसमानदेह । जो बिंदुमात्रअसतां हि विमोहगेह ॥ वाढे क्षणोक्षणि विलक्ष-

णनिश्चितांत ॥ कूटस्थ०॥ ३ ॥ पाण्यावरी लहरि येति जशा तशा ह्या । देहावरी सतत येति दशा अशा ह्या ॥ बाल्यादि शेखि कृमिविड्भसि- तांतकांत ॥ कूटस्थ० ॥ ४ ॥ यद्रक्षणार्थ करितात कुकृत्य दुष्ट । जो षड्रसान्नपरिपोषित होइ पुष्ट ॥ येथेंचि तो पडतसे उघडा अनंत । कूटस्थ० ५ वर्णाश्रमादिक सुखादिक यन्निमित्त । संबंधरूपभयकर्म हि यान्निमित्त ॥ तो हाचि अन्नमयकोश जयासि अंत ॥ कूटस्थ० ॥ ६ ॥ हा प्राण त्या- मधिं सदोदित खेळताहे । जो इंद्रियाकवळुनी मम रूप नोहे ॥ हें ही अचेतनचि चेतन मी प्रशांत ॥ कूटस्थ० ॥ ७ ॥ जें चंचल क्षणभरी न वसे विकारी । तें होय हें मन न मीं कधिंही विकारी ॥ खद्योततुल्य- मति तीहि न मी प्रदीप्त ॥ कूटस्थ० ॥ ८ ॥ हा जात येत असतो जगिं लिंगदेह । अज्ञानकारणतनू नच तीन देह । माझें स्वरूप अज अक्रिय हें अनंत ॥ कूटस्थ० ॥ ९ ॥ कर्ता न मी प्रत्यगभिन्न आत्मा । भोक्ता न मी अद्वयसच्चिदात्मा ॥ हें ज्ञानव्हाया नवरत्नमाला । हे कंठिं घाला हरि देहिकाला ॥ १० ॥ जो कर्मफल दे वारी । स्मरतां कष्ट उद्धरी ॥ भजतां या दत्तदेवा । पदिं हे अर्पिली नवा ॥ ११ ॥

याठिकाणीं इचलकरंजीचा गणपती नांवाचा ब्रह्मचारी ब्राह्मण आला होता. तो एकाएकीं आजारी पडल्यामुळें त्याचें देहावसान लवकरच होईल असें श्रीगुरुमूर्तीस वाटल्यावरून विचार करूं लागले कीं, हा ब्रह्मचारी आहे याचें समावर्तन झालेलें नाहीं. तरी याचा संस्कार कसा करावा ! कारण अग्नि- संस्कार करणें झाल्यास यथाविधि प्रायश्चित्त करून अर्कविधि केला पा- हिजे व त्यासाटीं तो विधि जाणणारा ब्राह्मण पाहिजे. तसा ब्राह्मण येथें नसल्यामुळें अग्निसंस्कार होणार नाहीं. त्याचप्रमाणें जलप्रवाह किंवा भूमि- दाहही होणें अशक्य आहे. असा दुहेरी पेंच उत्पन्न झाल्यामुळें त्यांनीं देवाची प्रार्थना केली कीं, हेभगवन् ! ब्रह्मचारी मरतो त्याचें मला दुःख वाटत नाहीं. परंतु त्याचा मरणोत्तर संस्कार कशाप्रकारें करावा तें मला समजावें किंवा तसा संस्कार करविणारा ब्राह्मण याठिकाणीं पाठवा. नाहीं- तर यास वरीं तरी पोंचता करा.

अशी प्रार्थना केल्यावर तो ब्रह्मचारी बरा झाला. त्याला त्याच्या

घरीं पोंचविल्यावर तो आपल्या गावीं मरण पावला.

याठिकाणीं सोलापूरच्या सखाराम गोपाळ नांवाच्या कारकुनानें आपली बायको सीक झाल्यामुळें तिला त्यानें श्रीगुरुमूर्तीजवळ आणली होती तिला श्रींनीं एक यंत्र करून देऊन अनुष्ठान करण्यास सांगितलें. अनुष्ठान सुरू असतांनांच तिनें मंदमती डॉक्टरचें औषध सुरू केल्यामुळें त्या बाईला स्वप्नांत दृष्टांत झाला कीं, ज्यापेक्षां तुमचा मजवर विश्वास नाहीं त्याअर्थीं तुह्मी मी दिलेलें यंत्र परत द्या. असें सांगून यंत्र हातांतून घेतांच ती बाई जागी झाली व घाबरून पाहते तों यंत्र नाहीं. शोधांतीं तें यंत्र हातांतून निघून अंथरुणाबाहेर जाऊन पडलेलें आढळलें व तेव्हांपासून ती बाई जास्त आजारी झाली. त्यामुळें ती श्रीगुरुमूर्तीजवळ येऊन त्यांस सर्व हकिगत सांगून त्यांच्याजवळ आपल्या अपराधाची क्षमा मागूं लागली. तेह्मां श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, ह्याविषयीं मला काहींच ठाऊक नाहीं. तुह्मी देवाजवळ क्षमा मागा. नंतर त्या बाईनें त्याप्रमाणें केल्यामुळें तिचा रोग बरा झाला.

या ठिकाणीं श्रीगुरुमूर्ती असतांना वऱ्हाडांतील हरदा गांवचा राहिवासी वामनराव नांवांचा गृहस्थ श्रीगुरुमूर्तीजवळ येऊन ह्मणाला, महाराज ! माझ्या मनांत स्वाहाकार करावयाचा आहे. त्यासाठीं तुह्मी मज बरोबर उटीगांवीं यावें व तेथें मजकडून महारुद्रस्वाहाकार करवावा. इतकें बोलतो आहे इतक्यांत एकाएकीं त्याच्या आंगावर एक चिंचेचें पोतें येऊन पडलें. त्यामुळें तो बेशुद्ध होऊन खालीं पडला. तो गृहस्थ फारच वृद्ध असल्यामुळें, आतां हा यांतून वांचत नाहीं अशी सर्व लोकांची खात्री झाली. परंतु श्रीगुरुमूर्तीच्या कृपेनें तो लवकरच सावध झाला. त्याची श्रद्धा पाहून श्रीगुरुमूर्ती त्याच्या बरोबर जाण्यास तयार झाले. नंतर तो त्यांच्याशीं सहवर्तमान वर निर्दिष्ट केलेल्या गांवीं गेला आणि त्यानें यथाविधि महारुद्रस्वाहाकार त्या श्रीगुरुमूर्तीच्या साहाय्यानें पुरा केला.

हें कुरवपूर ( कुरुगड्डी ) स्थान जंगलांत असल्यामुळे, व त्याच्या समोर कृष्णानदीनें वेढा दिलेला असल्या कारणानें तें चातुर्मासांत फारच प्रेक्षणीय बनलेलें होतें. इतकेंच नव्हे तर श्रीदत्तात्रेयांनीं याच ठिकाणीं प्रथम तपश्चर्या केली होती, व याच ठिकाणीं पुनः श्रीदत्तभगवंताचें आ-

गमन झालें मग तेथील शोभा काय वर्णावी ! ! दररोज समाराधना सुरू होती. कृष्णानदी उतरून या ठिकाणीं जाण्यास तुंबड्यांशिवाय दुसरें साधनच नव्हतें. याठिकाणीं दर्शना करितां पुष्कळ लोक येत होते. त्यांच्या खाण्या पिण्याची अडचण होऊं लागली तें पाहून श्रीगुरुमूर्ती गांडाबुवास ह्मणाले.

याजागीं पावसाळ्यांत आजू बाजूस एक एक मैल पर्यंत पाणी पसरतें, तशांत तुंबड्यावर बसून यावयाचें. आसपास जंगल असल्या मुळें कोणतेंही सामान मिळण्याजोगें नाहीं. प्रत्येक चीजवस्तु तुंबड्या वरून आणावी लागते असें हें बिकट स्थान आहे, शिवाय येथें राहण्यास घर नाहीं. स्वयंपाकास भांडीं नाहींत. जाळावयास लांकूड नाहीं. जवळ पास दुकान नाहीं. तरी आतां कसें करावें ?

**गांडाबुवाः**—हे भगवन् ! आपली मजवर कृपा असेल, व माझी आपल्यावर दृढ श्रद्धा असेल तर यांची सर्व व्यवस्था होऊन जाईल. कांहीं हरकत पडणार नाहीं.

**श्रीगुरुमूर्तीः**—गांडा ! तूं तुझ्या बुद्धि प्रमाणें यांची व्यवस्था ठेव.

अशा प्रकारें आज्ञा झाल्यावर सर्वांचा स्वयंपाक एकाच ठिकाणीं करावा ह्मणजे कोणासही अडचण पडणार नाहीं असा गांडाबुवानें विचार करून एक जागा तयार केली व त्याठिकाणीं स्वयंपाक करण्यास सुरुवात केली. अशा प्रसंगी रायचूरचे व्यापारी तुळजाराम. पतंगे, पेष्कारसाहेब व इतर कारकून मंडळी यांनीं त्यांस मदत केली. त्यामुळें राहाण्यास जागा, भांडीं कुंडीं, सरपणास लाकडें वगैरेची एकदम तजवीज होऊन गेली. तुळजारामानी आषाढीपौर्णिमेपासून दीपावळी पर्यंत जेंजें सामान लागे, तेंतें रायचूराहून आणून पुरविलें. याकामीं त्यांनीं फार परिश्रम घेतले. ह्या चातुर्मासांत कुरवपूर इंद्राच्या नंदनवनाप्रमाणें शोभादायक बनलेलें होतें. यात्रेकरू लोकांच्या सोयीसाठीं या ठिकाणीं एक धर्मशाळा बांधण्याचें काम श्रीगुरुमूर्तींच्या आज्ञेवरून रायचूरकर मंडळीनें सुरू केलेलें आहे. त्यांत शंकरराव नांवाच्या सद्गृहस्थानें पुढाकार घेतला आहे. आषाढीपौर्णि-

मे पासून दिवाळी पर्यंत दररोज ह्या ठिकाणी नवीं नवीं पक्वान्नें व पायस यांच्या नैवेद्यांची परंपरा चालली होती. या प्रमाणें उत्सव पूर्ण करून श्रीगुरुमूर्तीं गुरुद्वादशी करून त्रयोदशीच्या दिवशीं श्रीदत्त आज्ञा झाल्यावरून कृष्णातीरीं नरसोबाच्या वाडीस येण्यास निघाले. त्यावेळी सर्व मंडळीनें गदगद कंठानीं श्रीगुरुमूर्तींची प्रार्थना केली.

**आतां गुरुराया परिसा विज्ञापना । दासाची करुणा येऊं द्यावी ॥**
**नेणोनीयां सोय फिरलों दिशा दाही ॥ झालें दुःख देहीं बहुकाल ॥**
**तुमची ब्रीदावली पतितपावन ॥ कीर्ती ऐकून शरण आलों ॥**
**माझा मायबाप गणगोतबंधू ॥ तूंचि कृपासिंधू गुरुराया ॥**
**आतां कांहीं नेणें तुमच्या पायांवीण ॥ संसारीचें भेणें दूर करा ॥**
**जोडूनीयां हात शिर पायांवरी । ठेविलें निर्धारीं जनार्दना ॥**
**तूज मी अनंता काय सांगू आतां । माझी सर्वचिंता असों द्यावी ॥**
**नेणें भक्ति ज्ञान कर्म उपासना । तुज मी नारायणा ध्यातआहें ॥**
**पतित मी पापी दुर्गुणी आगळा । परि आलों गोपाळा शरण तूज ॥**
**पतित तारीले पशु उद्धरीले । पक्षी तेही नेले मोक्षालागीं ॥**
**सिद्धेश्वरह्मणे ऐशी तूझी ख्याती । माधवा श्रीपती तारीं आतां ॥१॥**

प्रार्थनापूर्वक सर्वांनीं श्रीगुरुमूर्तीस नमस्कार केले. श्रीनी त्या सर्वांचें यथोचित भाषणानें शांतवन केलें. तेथून मलप्रभासंगमावर यावयास निघाले त्यावेळीं श्रीदत्ताची आज्ञा झाली कीं, गोदावरीच्या तीरीं निघून जावें. त्यावरून श्रीगुरुमूर्ती कृष्णातीरसोडून खेडगावीं गेले. त्याठिकाणीं भीमानदीचें स्नान करून सोलापुरावरून तुळजापुरास आले. त्या ठिकाणीं श्रीजगदंबेचें दर्शन घेऊन त्यांनीं तिची प्रार्थना केली.

**नमोऽस्तु ते महादेवी शिवे कल्याणि शांभवी ॥ प्रसीद वेदविनुते जगदंब नमोऽस्तु ते ॥ १ ॥ जगतामादिभूता त्वं जगत्त्वं जगदाश्रया ॥ एकाऽप्यनेकरूपासि जगदंब० ॥ २ ॥ सृष्टिस्थितिविनाशानां हेतुभूते मुनिस्तुते ॥ प्रसीद वेदविनुते जगदंब० ।३। सर्वेश्वरि नमस्तुभ्यं सर्वसौभाग्यदायिनि ॥ सर्वशक्तियुतेऽनंते जगदंब० ॥ ४ ॥ विविधारिष्टशमनि त्रिविधोत्पातनाशिनि ॥ प्रसीद देवि ललिते जगदंब० ॥५॥**

**प्रसीद करुणासिंधो त्वत्तः कारुणिकाऽपरा ॥ यतो नास्ति महादेवि जग०।६। शत्रूञ्जहि जयं देहि सर्वान्कामांश्च देहि मे ॥ भयं नाशय रोगांश्च जगदंब० ॥ ७ ॥ जगदंब नमोऽस्तु ते हिते जय शंभोर्दयिते महामते ॥ कुलदेवि नमोऽस्तु ते सदा हृदि मे तिष्ठ यताऽसि सर्वदा ॥ ८ ॥ नाऽज्ञाहनं नार्चनपद्धतिं ते जाने न भक्तिस्त्वयि मे भवांते ॥ अथापि मां त्वं कुलदेवि भक्तकुलोद्भवं पाह्यपि चार्थसक्तम् ॥ ९ ॥**

याप्रमाणें प्रार्थना व नमस्कार करून तेथून वांदनदीतीरीं येऊन त्यानीं श्रीदत्तजयंती केली. त्यानंतर गोदावरीकिनारीं आले. त्याठिकाणीं जोगाईमातेच्यास्थानाचा बापूगोसावी नावांचा दासोपंतांचा वंशज ब्राह्मण, दासोपंतांचा उत्सव सुरू असतां तो सोडून श्रीगुरुमूर्तींच्या दर्शनाकरितां आला. त्याला त्यांचें दर्शन झालें नाहीं. मात्र वाटेंत एक थोबाडींत मारून सांगितलें कीं, तूं दासोपंतांत व माझ्यांत भिन्नपणा पहातोस काय? आज तूं उत्सव सोडून येथें कां आलास? तुला माझें दर्शन होणार नाहीं.

अशाप्रकारचें भाषण ऐकून तो अतिशय घाबरून गेला. त्यानें त्या ठिकाणीं आपल्या अपराधाबद्दल क्षमा मागून परत तो घरीं आला. जर आजमितीलाही देव आपल्या भक्तांचा अभिमान बाळगितात तर ते भक्त ज्यावेळीं प्रत्यक्ष होते त्यावेळीं त्यांच्याबद्दल देवास कितीबरें अभिमान वाटला पाहिजे.? ह्याबद्दल प्रत्येकानें आपण बुद्धिपुरःसर विचार करून पहावा. यावरून प्रत्यक्ष असें दिसतें कीं, श्रीगुरुमूर्ती श्रीदत्तात्रेयावतारी आहेत.

ज्यावेळीं श्रीगुरुमूर्ती कुरवपुरीं होते त्यावेळीं त्यांचे मस्तकावर कावळयानें तीनवेळ चंचुप्रहार केला होता; त्याचा फलादेश असा होता कीं कावळा मांसहारीपक्षी ज्याच्या मस्तकाला टोंचतो तो मनुष्य सहामहिन्याच्या आंत मृत्यु पावतो. त्यावरून श्रीगुरुमूर्ती कधीं कधीं ह्मणत कीं हें, शरीर आतां सहा महिनेपर्यंत राहील किंवा नाहीं ह्याचा नेम नाहीं. करितां याचेवर आतां कोणी प्रीति करूनये. परंतु ह्या सांगण्याबद्दल गांडाबुवाची समजूत पडली नाहीं.

या अरिष्टाच्या शमनार्थ श्रीगुरुमूर्तीस श्रीदत्तभगवानानीं आज्ञा

केली कीं, परळीनजीक वेनसंगमावर गोदावरीचें तुह्मी स्नानकरा. ह्मणजे ह्या अरिष्टाची शांती होईल.

ह्या संगमावर येऊन श्रीगुरुमूर्तींनीं तीन रात्री मुक्काम केला. त्यानंतर गांडाबुवाशींसह परळीस येऊन पांच दिवस मुक्काम केला. त्याठिकाणीं असणाऱ्या जोतिर्लिंगाचें दर्शन केलें. या प्रसंगीं तेथील गृहस्थ नानासाहेब देशपांडे यांनी महारुद्राचा स्वाहाकार केला. त्यावेळीं याजागीं शिवरात्रीच्या उत्सवापेक्षांही मोठी यात्रा जमली होती. श्रीपरळी वैजनाथ सोडून श्रीगुरुमूर्ति निघाले त्यावेळीं त्यांची लोकांनीं प्रार्थना केली.

अनन्यविनंती करीं । चरणद्वयधरी ॥ गुरुराया हो मजदीनाला उद्धरी । ध्रु०॥ हा प्रसंग दुर्धर असे । सौख्य मुळीं नसे ॥ गुरुराया हो म्यां आतां करणें कसें ॥ एकास्थळीं मन न वसे । उगाचि भ्रमतसे ॥ गुरुरायाहो याविषयीं मन रमतसे ॥ कीं जलांत कमल जसें । भ्रमरभ्रमतसे ॥ गुरुरायाहो मज न कळत घडलें असे । मी माझें मानुनी करी । असत्यापरी । गुरुरायाहो मज दीनाला उद्धरी ॥ १ ॥ हें पडलें मज संकट । अति दुर्घट ॥ गुरुरायाहो झाला जड कायाघट ॥ संसारीं अति खटपट । दुःख निपट ॥ गुरुरायाहो बहुजीर्णचि झाला पट ॥ कितिकरणें हो वटवट । विषयहा खट ॥ गुरुराया मी होउनि गेलों स्त्रीलंपट ॥ मी दीनजाणुनी करीं । नित्यचाकरी ॥ गुरुरायाहो मज दीनाला उद्धरी ॥ २ ॥ तनुपडली चिंतानळीं । प्रेम आहळी ॥ गुरुरायाहो मज पाठीं लागला कली ॥ षड्वैरी करिती रळी । सर्वदा छळी । गुरुरायाहो वरी दैवहि झालें बळी ॥ हीं विषयइंद्रियें मोकळीं । कोण आकळी ॥ गुरुराया दुःखें मी तळमळीं ॥ बुडतों मी भवसागरीं । धांव लौकरी ॥ गुरुरायाहो मज दीनाला उद्धरीं ॥ ३ ॥ तुह्मी दयाळु गुरु सज्जना । विनंती माना ॥ गुरुरायाहो मज जाहाली यमयातना ॥ तरी धाउनी ये या क्षणा । करिं रक्षणा ॥ गुरुरायाहो निरसावी अवलक्षणा ॥ तुह्मा काय देउं दाक्षिणा । गुरु या क्षणा । गुरुराया तव चरणी करूं प्रदक्षिणा ॥ दास विनवीतसे वरि वरि । बसुनियां घरीं ॥ गुरुरायाहो मज दीनाला उद्धरी ॥ ४ ॥

गोदावरीकांठीं राजूर गांवीं सीताराम महाराजांनी संहितेचा

स्वाहाकार करविला. त्यावेळीं पुष्कळयात्रा जमली होती. तेथें श्री नरसोबाच्या वाडीहून श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराज, हंपीमठाचे शंकराचार्यमहाराज व दाजीमहाराज टाकळेकर इत्यादि मंडळीही समारंभास हजर होती. या समारंभांत परळीचे गृहस्थ नानासाहेब ह्यानीं फार मेहनत घेतली होती. तसेंच तेथील तालुकेदारसाहेब मुसलमीन जातीचे असूनही आपली कचेरी चार दिवस बंद ठेवून बंदोबस्तासाठीं त्या ठिकाणीं आले होते. यावरून असें दिसून येतें कीं, निजामसरकारच्या राज्यांत हिंदुमुसलमान एकमेकाशीं प्रेमभावानें वागतात व त्यामुळें त्यांच्या राज्यास जास्तच शोभा आली आहे.

या ठिकाणीं उटी गांवच्या वामनराव नांवाच्या गृहस्थानें श्रीगुरुमूर्तीजवळ येऊन त्यांला विनंती केली कीं, हेभगवन्! आपण उटीगावीं येऊन महारुद्राचा स्वाहाकार करावा. त्यावेळीं वामनरावांचे आप्तवर्ग येऊन ह्मणाले स्वामीमहाराज! यांचें चित्त ठिकाणावर नाहीं. त्यामुळें त्यांचामुलगाही ऐकत नाहीं. तर अगस्तीतीर्थावर याच्याकडुन स्वाहाकार कसा होईल? यासाठीं यांच्यामुलास या ठिकाणीं बोलावून आणून त्याच्याकडून करविल्यास ठीक होईल.

ही गोष्ट वामनरावांचे जीवलग स्नेही होते त्यांस पसंत पडली नाहीं. त्यानीं श्रीगुरुमूर्तीची प्रार्थना केली.

**सांगावें कवण्या ठाया जावें, कवणातें स्मरावें कैसें काय करावें कवणापरि मी राहावें ॥ कवण येउनी कुरुंदवाडी स्वामीतें मिळवावें ॥ या द्वारी जेवावे व्यवहारी बोलावें संसारी घालुनि अंगीकारीं। प्रतिपाळिसि जो निर्धारीं॥ केला जो निजनिश्चयस्वामी कोठें तो अवधारी। या विपिनीं माझी करुणा वाणी। कायाकष्टी प्राणी। ऐकुनि घेशिल कानीं। देशिल सौख्य निधानीं। संकटहोउनि मूर्छित असतां पाजिल कवण पाणी॥ त्या वेळा। सत्पुरुषांचा मेळा पाहतसे निज डोळां॥ लाविशि भस्म कपाळा। सोडीं भय तूं बाळा। श्रीपादश्रीवल्लभ ह्मणती अभय असे तुज गोपाळा॥ सांगावें० ॥ घालीनलोटांगण० ॥**

नंतर साष्टांग नमस्कार केले व आग्रह केला कीं, आपण गांडाबुवा-

शींसहवर्तमान अगस्तितीर्थावर यावें. त्या ठिकाणची सर्व व्यवस्था आम्ही ठेवूं. वामनरावाच्या नातलगानीं सांगितलेलें सर्व थोतांड आहे. हें ऐकून श्रीगुरुमूर्ती येण्यास निघाले. त्यामुळें सर्वांस आनंद झाला.

श्रीगुरुमूर्ती राजूराहून निघून आवढ्यानागनाथाच्या दर्शनास गेले. तेथील लोकानीं त्यांची परवानगी घेऊन, ज्या जागीं पूर्वीं त्यानीं चातुर्मास केला होता त्या जागीं श्रीदत्तपादुकांची स्थापना केली होती. तेथून ते वामरावांचा महारुद्रस्वाहाकार करण्यासाठीं उटीगावीं आले. या गावीं अगस्ती ऋषीचा आश्रम आहे. याठिकाणीं वामनरावांचें गुरुस्थान असल्यामुळें त्यानीं महारुद्रस्वाहाकार करविला. वामनराव अति श्रद्धाळू असल्यामुळें त्याठिकाणीं जमलेल्या मंडळीस इतका आनंद झाला कीं, जिकडे तिकडे वामनरावांची कीर्ती गाऊं लागली. या उत्सवांत ब्राह्मणाला दक्षिणा, इतर जमलेल्या सर्व मंडळीस जेवण खाण मिळण्याची त्या ठिकाणीं केलेली व्यवस्था पाहुन श्रीगुरुमूर्ती फार खूश झाले. वामनरावांच्या निमित्तानें श्रीगुरुमूर्ती कृष्णातीर सोडून याबाजूला आले, व त्यामुळें या प्रदेशांतील सर्व लोकांला अनायासें त्यांच्या दर्शनाचा लाभ मिळवितां आला. निरनिराळ्या ठिकाणीं मिळून वीस स्वाहाकार, अग्निहोत्र्यांचे दोन चातुर्मास व दोन जागीं श्रीदत्तपादुकांची स्थापना झाली. ह्या सर्व समारंभांत वामनरावाच्या येथला समारंभ श्रेष्ठप्रतीचा झाला हें केवळ त्यांच्या श्रद्धेचें फळ होय.

श्रीगुरुमूर्ती तेथून हिंगोली वगैरे गांवावरून फिरत फिरत गोदावरीतीरीं गोंड गावीं आले. त्या ठिकाणीं रेणुकामातेचें स्थान आहे. तेथें कायर गांवचा एक ब्राह्मण अंबादास महारुद्रस्वाहाकार करण्यासाठीं आला होता. हा स्वाहाकर गोंड गावीं झाला. या स्वाहकारांत पाथरीचे रा. शामराव चौधरीकर व पाथरीकर वगैरे मंडळींनीं फारच उत्तम व्यवस्था ठेविली होती.

तेथून गोदावरीचें हृदयस्थान जें मंजर्थ त्याचें दर्शन करून, ज्येष्ठ-मासीं गंगासप्तमीचा उत्सव त्यानीं गोदावरीतीरीं उकड गावीं केला. हा दशहाराचा उत्सव समाप्त झाल्यावर तेथून गोदावरीतीरीं राक्षसभुवनानजीक पांचालेश्वर येथें श्रीदत्तस्थान आहे त्याचें दर्शन करून, गांडाबुवासह श्रीगुरुमूर्ती पैठणास आले. तेथें एकनाथ महाराजांच्या आश्रमांत भिक्षा समाप्ती केली.

या ठिकाणीं श्रीएकनाथमहाराजानीं मंदीर बांधून देवप्रतिष्ठा केली होती. त्यांच्या पाटीमागील पुरुषानीं मूर्ती काढून कांहीं फेर फार केल्यामुळें आज बारा वर्षांत त्या ठिकाणीं मूर्तीची स्थापना झाली नाहीं. ही गोष्ट येथील मंडळीनें श्रीगुरुमूर्तीस कळविली. त्यांनीं ती जागा स्वत: पाहून सांगितलें कीं, मूळजागेंतच देवाची स्थापना कराल तर विघ्न येणार नाहीं; कारण जो कोणी सिद्धपुरुषाच्या हातानें कायम झालेली जागा बदलण्याचा प्रयत्न करितो त्याचें कार्य सिद्ध होत नाहीं. त्याकामांत देवलोक विघ्नें उत्पन्न करितात. याकरितां मूळ जागेंतच तुह्मी देवाची स्थापना करा.

या जागी श्रीकृष्णपरमात्म्यानें श्रीखंड्या नांव धारण करून, ज्याटांक्यांत पाणी भरलें होतें तें टांकें अजून कायम आहे. हल्लीं उत्सवांत ज्या दिवशीं त्यांची कावड टांक्यांत पडते त्या दिवशीं टांकें एकदम पाण्यानें भरून जाऊन सगळा चौकसुद्धां भरून जातो. त्यावेळीं टांक्याची पूजा करून उत्सवास प्रारंभ करितात. जोंपर्यंत देवाची कावड येऊन टांकें भरीत नाहीं तोंपर्यंत उत्सव सुरू करीत नाहींत. याप्रमाणें आजपावेतों साक्षात्कार होत आहे. तसेंच ज्या जागेंत श्रीदत्तात्रेयानें पठाणाच्या वेषानें पहारा केला होता, त्या जागीं उत्सवसमयीं श्रीदत्तात्रेयाचें चित्र काढितात. त्याला नमस्कार केल्याशिवाय जो कोणी वाड्यांत देवदर्शनाकरितां जातो त्याला एकदम उपाधी होते. हाही साक्षात्कार अझून पहाण्यांत येतो. यावरून देवांला भक्तांचा अभिमान आहे किंवा नाहीं ह्याचा वाचकानींच विचार करावा.

तेथून निघाल्यावर रस्त्यानें चालतांना गांडाबुवानीं श्रीगुरुमूर्तीस विचारिलें, माणगांवांत दत्तोबा वारल्यावर त्याचा मुलगाही गेला तरी आपल्या घराण्यावर देवाची इतकी अवकृपा होण्याचें कारण काय?

**श्रीगुरुमूर्तीः—** गांडा! आमचेमातामहांनीं दोनवेळ लग्नकेलें. त्यांत प्रथमलग्नाच्या कुटुंबाची प्रजा माझीजननी होय. दुसऱ्या कुटुंबाला कांहीं संतती न होतां ते अपुत्रीक मरण पावले. त्यानें मरते समयीं सांगितलें होतें कीं, माझी मिळकत जो कोणी खाईल त्याचा निर्वंश होईल. ही गोष्ट आह्मांस समजल्यावर आह्मी मातोश्रीस सांगितलें होतें कीं, तुह्मी आपल्या वडिलांची मिळकत घेऊंनका घ्यालतर त्यापासून वाईट परि-

णाम भोगावा लागेल; ह्या करितां ती सर्व मिळकत त्यांचे वंशजांस द्या. जों पर्यंत आह्मी माणगांवीं होतों तोंपर्यंत कोणीही त्या मिळकतीची अपेक्षा केली नाहीं. परंतु आह्मी माणगाव सोडल्यावर मातोश्रीनें आपल्या पित्याची मिळकत लोकांच्या शिकवणी वरून हस्तगत केली. त्या नंतर मातोश्री स्वर्गवासीझाल्या. पुढें आह्मी ब्रह्मावर्तीं असतांना दत्तोबा त्या ठिकाणीं भेटण्यासाठीं आला. त्यावेळीं आह्मी त्याला सांगितलें, तुह्मी आ-जोबाची मिळकत हस्तगत केली हें कांहीं ठीक केलेंनाही. तुमचें कल्याण व्हावें अशी तुमची इच्छा असेल तर ती मिळकत आजोळच्या माणसांच्या स्वाधीन करा. हें सांगणें त्यांला रुचलें नाहीं व त्यांनीं मिळकत परत दिली नाहीं. त्यामुळें मातामहाच्या शापानें त्यांचा पुत्र मरणपावला व तेही मरणपावले; त्याला आह्मीं कायकरावें ! ही मिळकत जो कोणी घेईल त्याचे असेच हाल होतील. हल्लीं ती मिळकत दत्तोबांच्या वडील जांवयां कडे आहे. त्याची ही बायको मेली !

अरेरे ! असा हा शाप श्रीगुरुमूर्तींच्या बंधूंस नडला मग इतरांची गोष्टकाय ? याकारितां कोणीही कोणाची मिळकत त्यानें स्वसंतोषानें दि-ल्याखेरीज घेऊं नये.

दौलताबादच्या किल्यांत श्रीजनार्दन स्वामी महाराजांची समाधी आहे त्याच्या दर्शना करितां श्रीगुरुमूर्ती पैठणाहून त्या ठिकाणीं गेले. या ठिकाणीं श्रीजनार्दन महाराज व श्रीदत्तभगवान सोंगट्यानीं खेळत होते. त्या जागेचें दर्शन करून वेरुळास आले व त्यानीं श्रीघृष्णेश्वर महारा-जांचें दर्शन केलें.

ह्या ज्योतिर्लिंगावर घाव घालण्या साठीं पूर्वीं औरंगजेबानें हात उगारला. त्यावेळीं त्याचा हात तसाच वर राहिला. व दुसऱ्या दिवशीं तो-मरण पावला. याला गांवाबाहेर पुरण्यांत आलें आहे. ह्या ठिकाणीं फार प्राचीन काळच्या गुंफा पाहाण्या सारख्या आहेत. त्यांतील मूर्ती मुसल-मानांनीं खंडित केल्या आहेत. तेथून घाट उतरून श्रीगुरुमूर्ती खान-देशांत आले. आजपर्यंत ज्याज्या ठिकाणीं श्रीगुरुमूर्ती फिरले त्यात्या ठि-काणीं मोठ मोठ्या समाराधना होत होत्या.

चाळिस गांवांजवळ श्रीगुरुमूर्तींनीं गांडाबुवास आज्ञा केली कीं, अशा धिंगाड्यांत ब्रह्मदेवाचेंहीं आयुष्य संपून जाईल. व स्वतःचा विचार न केल्यामुळें पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. तर आमच्या सारख्यांचा आयुष्याचा हिशोब काय ? या कारितां तू हा माणसांचा उपाधि सोडून आत्मा अनात्मा ह्याचा विचार कर. देहाभिमान सोडून आपली कार्य सिद्धी कर. तू भडोच किनारीं राहून अभ्यास कर. तूं जोंपर्यंत माझ्या बरोबर राहाशील तों पर्यंत लोकांची उपाधि कमी होणार नाहीं. तूं गेलास ह्मणजे आलेली मंडळी आपोआप कंटाळून निघून जाईल. भडोज येथेंही उपाधी होऊं लागली तर कोठेंतरी उपाधीरहीत जागा पाहून वृत्ती शांत कर. मीही नर्मदा किनारीं जात आहें तेथें निवृत्तीची जागा मिळाली तर त्या ठिकाणीं चातुर्मास करीन. नाहींतर पुढें निघून जाईन.

ज्येष्ठकृष्ण १४ शके १८३४ रोजीं गांडाबुवा व श्रीगुरुमूर्ती निर निराळ्या ठिकाणीं जाण्यास तयार झाले त्यावेळीं सर्व भक्त मंडळी श्रीगुरुमूर्तीची प्रार्थना करून आपआपले गावीं जाण्यास निघाली.

**प्रार्थना** [ राग प्रभात. ]

ऐका भोळेभाविकजन । नित्य करा गुरुचिंतन ॥ महादोष होती दहन । स्मरणमात्रें करूनियां ॥ धृ० ॥ गुरुसेवा घडेल ज्यासी । काल दंडीना तयासी ॥ अंतीं जाय मोक्षपदासी । गुरुस्मरण केलिया ॥ १ ॥ गुरुच भक्तीचा दाता । गुरु देहासी चालविता ॥ हरे पातकांची व्यथा । गुरुस्म० ॥ २ ॥ गुरु ज्ञानाचा सागरू । गुरु धैर्याचा आगरू ॥ गुरु नेईल पैलपारू । नामस्मरण केलिया ॥ ३ ॥ गुरु मायेचें निरसन । गुरु मायेचें अंजन ॥ गुरुचें अगाध महिमान । मुखें कितीक वदावें ४ गुरु संतांचें निजगुज । गुरु मंत्रांचें निजबीज ॥ गुरूचें ध्यावें चरणांबुज । अनेकतीर्थें त्याठायीं ॥ ५ ॥ जय जय गुरू मायबापा । चुकवीं चौऱ्यांशींच्या खेपा ॥ भक्तराज ध्यातो गुरु बापा । ब्रह्मीं लय लाउनीयां ॥ ६ ॥

ह्या सालाचा चातुर्मास श्रीगुरुमूर्तींनीं नर्मदाकिनारीं चिखलदागांवीं केला. तेथें वडवाणचे ठाकोर साहेब बंदोबस्त ठेवीत होते.

श्रीगुरुमूर्ती चिखल्यांतून निघून नर्मदा किनारीं कातरखेडगांवीं येत असतां जिनुरकर, ब्रह्मणस्पति, अग्निहोत्रीबुवा वगैरे मंडळी त्यांस येऊन भेटली. त्यांस श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, अहो अग्निहोत्रीबुवा ! जर तुमचा विचार गायत्रीपुरश्चरण करण्याचा असेल तर तुह्मी आपला संकल्प पूर्ण करा व त्यावेळीं ब्राह्मणास यथेच्छ अन्नदान करून तृप्तकरा. अन्नसंतर्पणांत तुपाची कसर करूं नका. हें ऐकून अग्निहोत्रीबुवा ह्मणाले, गुरुराज ! मजजवळ पैसा नाहीं. तें ऐकून गुरुमूर्ती ह्मणाले, तुह्मी पैशाबद्दल काळजी करूं नका, त्यावेळीं पैसे आपोआप मिळतील व कदाचीत् देवकार्यासाठीं ऋण काढावें लागलें तरी हरकत नाहीं; कारण कदाचित् हें ऋण देणें राहिलें तर तें देवावर राहील. हें कांहीं प्रपंचांतील सुखसोहाळे भोगण्यासाठीं केलेलें ऋण नव्हे. यासाठीं तुह्मी आपलें इच्छित कार्य उरकून घ्या. हें ऐकून अग्निहोत्रीबुवा ह्मणाले, गुरुदेवा ! आपल्या आज्ञवरून ज्यावेळेपासून मी अग्नि नारायणाची सेवा करीत आहें, तेव्हांपासून हाकाल पर्यंत देवकार्यांत विघ्न आलेलें नाहीं. त्याच प्रमाणे आतां हें कार्यही आपल्या कृपेनें निर्विघ्नपणें पार पडेल. परंतु आपण ह्या कार्याला हजर असावें. हें ऐकून श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, ह्या प्रसंगीं टाकळकर दाजीबुवांस बोलवा व मीही पण हजर आहेंच, असाच निर्धार करून कार्याला प्रारंभ करा. ह्मणजे कोणतेंही विघ्न येणार नाहीं. नर्मदा सोडून दुसरीकडे जाण्याचा माझा विचार नाहीं. तुह्मी तूर्त येथेंच राहा. ह्याजागीं डेही सरकार येणार आहेत. असें त्यांच्या मंडळीकडून समजतें. तर ते आल्यास तुह्मांस पैशांची मदत मिळेल. नाहींतर तुह्मी ह्या लोकांबरोबर डेहीस जावें.

अग्निहोत्रीः—गुरुदेवा ! मी अशा कामांत राजाचे पैसे खर्च करण्यास मिळविण्याची इच्छा करीत नाहीं. मी आजपर्यंत देवकार्याकरितां कोणाजवळही याचना केलेली नाहीं व त्याचप्रमाणें ह्यावेळींही करणार नाहीं. केवळ आपली कृपा व आशीर्वाद पाहिजे.

हें ऐकून श्रीगुरुमूर्ती प्रसन्न झाले व त्यांनीं अग्निहोत्रीबुवांस गावीं जाण्यास परवानगी दिली.

अग्निहोत्रीबुवा घरीं आले. नंतर दाजीमहाराजांस बोलावण्याकरितां

टाकळीस गेले. त्याठिकाणीं त्यानीं दाजीमहाराजांस श्रीगुरुमूर्तींनीं सांगितलेली हकिगत कळविली. त्यावेळीं दाजीमहाराजांवर कोणी दुष्टानें मारणप्रयोग केल्यामुळें त्यांस रक्त पडत होतें. त्यामुळें ते ह्मणाले, अग्निहोत्रीबुवा! पहा ! माझें शरीर अगदीं अशक्त झालें आहे. या प्रसंगीं श्रीगुरुमूर्ती जर मला दुःखांतून मुक्त करतील तर मी जरूर येईन.

**अग्निहोत्री:**—दाजीमहाराज ! आपण सत्पुरूष आहांत आणि श्रीगुरुमूर्ती श्रीदत्तभगवानाचे अवतार आहेत; त्यामुळें ते हें आपल्यावरचें विघ्न दूर करतील. असें ह्मणून ते आपल्या घरीं गेले.

पुढें शुभ मुहूर्त पाहून त्यानीं पुरश्चरणास प्रारंभ केला. इकडे श्रीगुरुकृपेनें दाजीमहाराजांस बरें वाटलें. पण त्यानीं जितुरास पुरश्चरणास जाण्याचें मनांत आणिलें नाहीं. हें श्रीगुरुमूर्तीस प्रशस्त न वाटून त्यानीं पूर्णाहुतीच्या पूर्वीं दोन दिवस दाजीमहाराज गौतमीगंगेवर प्रातःसंध्या करीत असतां त्या ठिकाणीं जाऊन त्यांच्या दंडावर मार देऊन ह्मणाले, मी तुमचें विघ्न दूर केलेंअसतां तुह्मी अग्निहोत्र्यांच्या येथें कां गेले नाहींत ? तें ऐकून दाजीमहाराज घरीं न जातां त्याचवेळीं तशाचस्थितींत एकाचवस्त्रानिशीं टाकळीहून निघून पायीं चालत बावीसकोश अंतरावर असणाऱ्या जितूरगावीं जाण्यास निघाले ते पूर्णाहुतीच्या दिवशीं समारंभास हजर झाले. त्यानीं स्वतःवर आलेली सर्व हकिगत अग्निहोत्रीबुवांस व इतर मंडळींस सांगितली आणि ह्मणाले कीं, स्वामीमहाराज स्वतः दत्तभगवान् अवतार आहेत. याची मला पूर्ण खात्री झाली आहे.

तें ऐकून सर्व लोकानीं श्रीगुरुमूर्तींचें नांव घेऊन जयजयकार करून त्यांची प्रार्थना केली:—

वासुदेव हें नाम मानवा। अखंड उच्चारीं ॥ वास जयाचा चराचरांतरीं। असुनि निराकारी ॥ धृ० ॥ वातसुटुनि मायेच्या, जाहल्या ॥ धुंददिशा चारी ॥ वाहुनि जाइल देहसुनौका ॥ भवपारावारीं ॥१॥ सुतधनदारागारीं ममता ॥ मुळीं आतां न धरीं ॥ सुकर्णधाराधारें उतरें॥ त्वरित पैलतिरीं ॥२॥ देउनि जो निजदान तोषवी ॥ अत्रिमुनिभार्या ॥ देशिकराया सदा नमीं त्या ॥ दत्तात्रेयआर्या ॥ ३ ॥

वदतां वाचे नाम । वासुदेवानंदाचें ।। वश झालें दासाला सहजचि पद श्रीरंगाचें ।। ४ ।।

## गरुडेश्वराची उत्पत्ती व श्रीगुरुमूर्तींचा तेथें वास.

श्रीगुरुमूर्ती कातरखेड्याहून निघाले ते शूलपाणीश्वराचे झाडींतील सकळवनश्रीचा अनुभव घेत घेत शूलपाणीश्वराचें दर्शन करून श्रीगरुडेश्वर क्षेत्रास जाऊन पोंहोंचले. या ठिकाणीं हत्तीचें स्वरूप धारण करून आलेल्या गजासुरास गरुडानें मारिलें होतें. त्या असुराच्या अस्थि प्रवाहाबरोबर पावसाळ्यांत पर्वतावरून वाहात येऊन नर्मदेंत पडतांच त्या राक्षसास दिव्यस्वरूप प्राप्त झालें. असें या स्थळाचें माहात्म्य जाणून तो दिव्यदेही याच ठिकाणीं राहून नियमानें तपश्चर्या करूं लागला. शंभर वर्षांनीं त्याची तपश्चर्या अवलोकन करून भोलानाथ श्रीशंकर प्रसन्न झाले व ह्मणाले, तुझी भक्ती पाहून मी संतुष्ट झालों. कारितां तूं मचपाशीं इच्छीत वर माग.

**गजासूरः**—हेभगवान ! तुह्मी प्रसन्नहोऊन वर देतां तर मला एवढेंच द्या. ह्या स्थानीं तुमच्याबरोबर माझेंही नांव कायम राहावें. जे या स्थानीं स्नान, संध्या, पूजा, तर्पणादि करितील, त्यांच्या पापाचा नाश झाला पाहिजे. जे कोणी अमावास्या, संक्रांत, गजच्छाया, व्यतिपात, क्षयमास, ग्रहण, अधिकमास, रविवारीं, सोमवारीं या स्थानीं स्नानादि करितील त्यानां इतर सर्व तीर्थांपेक्षां लक्षगुण जास्त फळ मिळालें पाहिजे. ज्याप्रमाणें कुरुक्षेत्रादि स्थानें प्राणिमात्रांला पावन करितात त्याचप्रमाणें हें स्थळ पवित्र क्षेत्र व्हावें. मला आपल्या गणांत श्रेष्ठत्व मिळावें. आपण माझें चर्म परिधान करावें. गरुडाच्या निमित्तानें मला हा अलभ्यलाभ झाला ह्मणून त्याचें नांव ह्या स्थळीं कायम राहावें व आपण आजपासून या ठिकाणीं अक्षय राहून भक्तजनांच्या मनकामना पूर्ण कराव्या असा मला वर द्या.

**श्री भोलानाथः**—हे गजासुरा ! तुझें नांव त्रिजगतांत प्रख्यात व्हावें ह्मणून मी आजपसून तुझें चर्म परिधान करितों व या स्थानीं राहून भक्तांच्या मनकामना पूर्ण करितों. तूं या पर्वतावर गरुडाच्यानावें एक लिंग व नर्मदाकिनाऱ्यावर--तुझी हस्तिदेहाची करोटी नर्मदेच्या तीर्थांत पडल्यामुळें

तुला दिव्यस्वरूप प्राप्त होऊन तूं मुक्त झालास. याकरितां—करोटेश्वर या नावाचें एक लिंग अशीं दोन लिंगें स्थापन कर. ह्याप्रमाणें दोन लिंगें त्याचेकडून स्थापन करवून भोलानाथ ह्मणाले, हे गजासुरा ! तूं प्रतिष्ठित केलेल्या लिंगांची दक्षिणाभिमुख बसून जो पूजा करील त्याला मी वांछितफल देईन. जे कोणी शुद्ध व कृष्ण अष्टमी व चतुर्दशीचे दिवशीं जागरण व पूजा करितील त्यांच्या एकवीस पिढ्यांचा मी उद्धार करीन. जे कोणी नाभीपर्यंत जलांत उभे राहून पितरांस जलांजुली देतील त्यांचे पितरांस सपदीच सद्गती देईन. जे कोणी एकाब्राह्मणास भोजन घालतील त्यांला लक्षब्राह्मणभोजन घातल्याचें पुण्य देईन. ज्यांच्या अस्थि ह्याठिकाणीं नर्मदेंत पडतील त्यांला त्यांच्या अस्थि या नदींत असेपर्यंत कैलासांत सुख देईन. नंतर त्यांला धनवानांच्या घरीं जन्म होऊन राजसुखाचा अनुभव मिळेल असें करीन. जो निष्काम असेल त्याला ज्ञानपूर्वक विदेह कैवल्यपद प्राप्त करून देईन. या ठिकाणीं जोकोणी शिवालयादि स्थापन करील व नित्य या तीर्थाचें माहात्म्य श्रवण करील तो सर्व पापांपासून मुक्त होऊन अंतीं शिवसायुज्यपदास जाईल. आजपासून तूं माझेगणांतील मुख्यगण आहेस. असें सांगून त्या ठिकाणीं श्री भोलानाथ गुप्त झाले. गजासूर विमानांत बसून देवलोकीं गेला. तेव्हांपासून करोटीश्वर ( गरुडेश्वर ) हें स्थान प्रसिद्ध झालें. असें श्रीभगवान मार्कंडेयमहामुनींनीं युधिष्ठिरमहाराजाला तीर्थांचीं माहात्म्यें वर्णन करितेवेळीं सांगितलेलें आहे, याकरितां श्रीगुरुमूर्तींनीं येथें येऊन निवास केला.

श्रीगुरुमूर्ती या ठिकाणीं येऊन पोहोंचल्याचें समजतांच पूर्वींच्या भक्तमंडळीनें त्यांची खालीं दिल्याप्रमाणें प्रार्थना केली.

जय जय त्रिमूर्तिवासुदेवदत्ता ॥ जगमां लीला जणावा प्रगटया जिसत्ता ॥ धृ० ॥ दत्तांशःअवतार माणपूरग्रामे । भाक्तिनु फळ देवा गणेशभटधामे १ संवत ओगणीसआगियार ॥ शुभ श्रावणमासे ॥ कृष्णपक्षनीपंचमी भास्करमाकाशे ॥ २ ॥ मध्यान्होत्तरकाले दीदासुखराशी ॥ रमावाईनें उदरे प्रगट्या अविनाशी ॥३॥ आनंद उपजो सऊने जातकर्म कीधूं । वेदाभ्यासी विप्रने दान धन दीधूं ॥ ४ ॥ उपवितनो संस्कार वर्षे आठे कीधो ॥ मंत्रोपदेश शुभरीते भटजीये दीधो ॥ ५ ॥ ब्रह्मचर्य वर्ष बार गृहस्थ

एकवीशे ॥ अन्नपूर्णाशुभलब्ध आश्रमनिमित्ते ॥ ६ ॥ ईश्वरजाणी सति ए सेवा बहु कीधी ॥ प्रसन्न भईनें सतिनें शुभनुक्ति दीधी ॥७। सन्यस्त-दीक्षा लीधी बत्तिस सम वर्षे ॥ दंडकमंडलुधारी फरता बहु हर्षे ॥८॥ परोपकारे विचरी तीर्थाश्रम कीधा ॥ वेदशास्त्र समजावी अनुग्रह बहु दीधा ॥ ९ ॥ चालक भासक जननाछो अंतर्यामी ॥ शरणागतदुःखहर्ता सुखकर्ता स्वामी ॥ १० ॥

## प्रार्थना.

सद्गुरुजी करि ये वंदना । सद्गुरुजी करि ये वंदना ॥ अलौकिक-प्रभु तमदर्शनथी ओघ उठे आनंदना ॥ १ ॥ करो करुणा सेवक उपरटालो बुद्धिमंदना ॥ कामादिपड्रिपुने वारो कापो क्लेश आक्रंद-ना ॥ २ ॥ संशय सघळा छेदी मनना ॥ शांती द्यो मनरंजना ॥ मायावलभी सत्र मुकावो । करो भ्रांतिशत्रखंडना ॥ ३ ॥ दैवीसंपत्ति प्राप्तकरावो । आसुरी दलभंजना ॥ प्राणतणी विनंति उरधारी ॥ आपो सुखे आनंदना ॥ ४ ॥

या ठिकाणीं भडोजहून गांडाबुवा श्रीगुरुमूर्तीच्या दर्शनासाठीं आले-होते. रात्रीचें भजन वगैरे आटपल्यावर श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, कीं, गांडा ! दर्शन झालें ?

**गांडाबुवाः**— होय गुरुजी !

**श्रीगुरुमूर्तीः**— उपाधींत पडावयाचें आहेका ?

**गांडाबुवाः**— हे गुरुमहाराज ! मी आपल्याजवळ उपाधी वाढवि-ण्यास आलों कीं सोडविण्यास आलों हें आपणाला माहीत आहे. मला उपाधी नको ह्मणून फिरत आहें.

**श्रीगुरुमूर्तीः**—उपाधीची गरज असेल तर तूं येथें राहावें. व या ठिकाणीं बसावें. मी समोरच्या लिंबाच्या झाडाखालीं बसेन.

**गांडाबुवाः**—मी आपल्या हृदयांत बसलेला असून इतकें लांब जा-ण्याचें कारण काय ?

**श्रीगुरुमूर्तीः**—जर असें असेल तर तूं येथून निघून जावें.

**गांडाबुवाः**—मी सकाळीं जाईन.

**श्रीगुरुमूर्तीः**—मी सांगतों कीं, आतांच गाडींत बसून आलेल्या मंडळींबरोबर तिलकवाड्यास जा.

गांडाबुवा श्रीगुरुमूर्तीस साष्टांग नमस्कार करून जावयास निघाले. तेह्मां इंदूरचे टिलुशास्त्री त्या ठिकाणीं बसले होते, ते त्यांला ह्मणाले, तुह्मी महाराजांचे प्रिय असूनही आतांच कां निघालां? आह्मासही जाण्याची आज्ञा झाली होती, परंतु आह्मी तसेच राहिलों.

**गांडाबुवाः**—-शास्त्रीबुवा! आमचातर असा नियमआहे कीं, गुरुमहाराजांनीं सांगितल्या प्रमाणें अवश्य करावयाचें. त्यांत बऱ्या वाईट परीणामाकडे लक्ष द्यावयाचें नाहीं. सद्गुरुमहाराजांचें वचन जर मीं उल्लंघन करीन तर आजपर्यंत उपनिषदांचें भाष्य वगैरे श्रवण करविलें; त्याचें फळ कसें मिळेल? याकारितां मी आतांच जाईन असें बोलून निघाले ते रात्रीं तिलक वाड्यास आले. तिसरे दिवशीं श्रीगुरुमूर्ती तिलकवाड्यास येणार होते. परंतु देवाची आज्ञा नसल्यामुळें जावयास तयार होतांच त्यांच्या पोटांत पोटशूळ उठला. तें पाहून टिलूशास्त्रयांनीं गांडाबुवास तिलकवाडा येथें पत्र पाठविलें. तेह्मां गांडाबुवानें छगनमास्तरास पाठवून कळविलें कीं, कांहीं कारणानें देवानें ही पोटशूळाची व्यथा उत्पन्नकेली असावी. औषध वगैरे घेण्याबद्दल आग्रह न कारितां सोबत पाठविलेलें ताक व लिंबाचें सरबत श्रीगुरुमूर्तीस द्यावें. मागाहून समजलें कीं, गाइकवाडच्या राज्यांत पाय ठेवण्यास त्यांस श्रीदत्ताची आज्ञा नाहीं. ह्मणूनच हा पोटशूळ उत्पन्न झाला होता. त्यामुळें तिलकवाड्यास जाण्याचें रहित झालें.

छगनमास्तर श्रीगुरुची आज्ञा घेऊन परत जाण्यास निघाले त्यावेळीं टिलूशास्त्री जवळ होते. त्यांनीं त्यांस अत्याग्रहपूर्वक कळविलें कीं, गांडाबुवास येथें पाठवून द्यावें. त्यावर श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, गांडा आतांच दर्शन करून गेला तरी इतक्यांत त्याला कशास बोलावितां? तें ऐकून शास्त्रीबुवांनीं आग्रह केल्यावरून ते पुनः ह्मणाले, गांडा व मी याच्या मध्यें तुह्मी बोलूंनये. तो आहे व मी आहें तोंपर्यंत तो तुमचें सांगणे ऐकणारनाहीं व मीही ऐकणार नाहीं. इतकें असूनही मी आपणास विचारितों कीं, त्यांनीं तुह्मांस शिफारस पत्र दिलें आहे काय?

**टिलूशास्त्रीः**—नाहीं. मी आपण होऊनच सांगतआहें.

नंतर श्रीगुरुमूर्ती छगनमास्तरास ह्मणाले, मी सांगेन तेवढेच शब्द तूं गांडाला सांग. " कोणतीही चिंता करूंनको तूं तेथें खुशालराहा कदाचित् मी मेलों तर तुझा हिसा लिहून ठेवीन. तो घेऊनजावें परंतु तूर्त येऊं नये. "

**टिलूशास्त्रीः**—स्वामीमहाराज ! आपणावर पूर्णश्रद्धा ठेवणारास असा निरोप पाठविल्यानें त्यास बरें वाटणार नाहीं.

**श्रीगुरुमूर्तीः**—गांडास वाईट वाटेल तर वाटूंदे. हे छगन. ! हा निरोप शब्दशः गांडास कळीव.

छगनमास्तर तेथून तिलकवाड्यास आले. त्यानीं श्रीगुरुमूर्तीचा निरोप गांडास सांगितला. तो ऐकून गांडाबुवा हसूं लागले. तें पाहून जवळच्या मंडळीस आश्चर्य वाटलें. ते ह्मणाले, महाराज या निरोपावरून आह्मांस कांहीं समजलें नाहीं आणि आपणास हसूंआलें तरी ह्याचें रहस्य काय ? हें आह्मा अज्ञानास कळविलें पाहिजे.

**गांडाबुवाः**—ह्या निरोपांत नारळासारखा स्वाद आहे. ज्याप्रमाणें नारळ बाहेरून निरुपयोगी दिसतो परंतु त्याचेआंत उत्तम पदार्थ असतो त्याप्रमाणें श्रीगुरुवचनांत उत्तम रहस्य आहे. अरे ! जे पुरुष षट्रिपूंला स्वाधीन ठेवून स्वरूपानंदांत निमग्न आहेत, ज्यांच्याशीं अज्ञजन वाटेलतसें वर्तन ठेवितात, तरीही जे रागावत नाहींत; ज्यांला ह्या जगांत कोणी शत्रु अगर मित्र नाहींत, शरण आलेल्या पतितांस त्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष करून पावन करितात, असे सत्पुरूष आपल्या अनन्यभक्तावर क्रोध करितील हें संभवनीयतरी आहे काय ? तर मग श्रीसद्गुरु या दासावर कां रागावतील ? बाबानों ! ह्या निरोपाचा खरा अर्थ असा आहे कीं, तूं स्वस्थ राहा. आत्मानात्म विचार करून मन शांत कर. घाबरूं नकोस. माझ्यांत तुझा हिस्सा आहेच. तुझें शरीर माझ्या नजीक असो किंवा दूर असो, त्याची काळजी करूं नको. तुझी सत्यभावना फलद्रूप होईल. बाबानों विचार करा कीं, ज्ञात्यास मरण कोठें आहे ? अज्ञानाजवळ जें अज्ञान आहे तेंच त्याचें मरण होय. श्रीगुरुमूर्ती पूर्ण ब्रह्म असून ते मृत्यूच्या मस्तकावर पाय देऊन

बनले आहेत. माझ्याजवळ अज्ञान वसत असल्यामुळें मृत्यूही वास करीत आहे. याकरितां हीं अभयवचनें पाठविलीं आहेत. मी जर श्रीसद्गुरुजवळ राहिलों तर पुष्कळ लोकांची उपाधी प्राप्त होईल व त्या धांदलींत मला माझ्या स्वतःचा विचार करण्यास वेळ मिळणार नाहीं. यासाठींच हा निरोप पाठविला आहे. हें ऐकून सर्वांस आनंद झाला.

या ठिकाणीं श्रृंगेरी मठाहून ब्रह्मानंदतीर्थस्वामीमहाराज आणि तैलंगणांहून निवृत्तमठाचे अज्ञानंदसरस्वतीस्वामीमहाराज आले होते. त्यानीं चातुर्मास येथेंच केला. श्रृंगेरीमठाचे स्वामीमहाराज महाराष्ट्रीयब्राह्मण आहेत. त्यानीं पूर्वाश्रमीं ब्रह्मचर्य पाळून बद्रिकेदारादि यात्रा करून ब्रह्मावर्ती आले तेव्हां श्रीगुरुमूर्तीनीं त्यांस सांगितलें कीं, तुह्मी दक्षिणयात्रेस जावें. तेथें तुह्मांस श्रीसद्गुरु मिळून तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. त्यानीं ही आज्ञा शिरसा वंद्य करून श्रीगंगेची कावड श्रीरामेश्वरास वाहून ते फिरत फिरत श्रृंगेरी मठांत आले. तेथें जगद्गुरुस्वामीमहाराजांचें दर्शन होतांच, हे जणोकाय वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजच आहेत, असा त्यांस भास झाला व त्यानां फार आनंद झाला. गावांत राहाण्यायोग्य जागा न मिळाल्यामुळें श्रीगुरुमूर्तीनीं तुंगभद्रानदीचे पैलतीरीं स्वतःसाठीं एक जागा तयार करविली होती. तेथें महादेवाचे देवालयांत मुक्काम करून गायत्रीजप करूं लागले. दक्षिण यात्रा केल्यानें ह्यावेळीं त्यांच्याजवळ द्रव्य काहीं शिल्लक नव्हतें. मात्र दोन लंगोट्या, एक सुताचा फडका, एक तुंबी एवढें कायतें त्यांच्याजवळ शिल्लक राहिलें होतें. या तीरीं भिक्षेसाठीं येण्यास होडीवाला पैशाशिवाय उतरीना. त्यामुळें दररोज तुंगभद्रानदी पोहून जावें लागत असे. त्यांच्या जवळ वस्त्र पांघरूण नसल्या मुळें गांवांतील लोक त्यांला अघोरी समजून भिक्षा घालीत नसत. फक्त श्रीजगद्गुरुंच्या अन्न छत्रांतून मूदभरभात मिळतअसे त्यावर निर्वाह करूंलागले. युवावस्था असून आहार भरपूर न मिळाल्याकें त्यांचें शरीर फारच कृशझालें. देह अस्थिपंजर मात्र शिल्लक राहिला. हें पाहून एके दिवशीं श्रीजगद्गुरूंनीं त्यांला जवळ बोलाविलें. तें पाहून लोक ह्मणूंलागले कीं, हा कोणी तरी अघोर पंथी असावा त्यांला जगद्गुरूंनीं सांगितलें, कांहीं हरकतनाहीं त्याला इकडे

पाठवा. तो जवळ येतांच जगद्‌गुरूंनीं विचारिलें कीं, तुह्मी कोण ? कोठून आलांत ! येथें राहून काय करीत असतां ? आपल्या शरीराचे असे हाल कां झाले ? हे प्रेमळशब्द ऐकून ब्रह्मानंदस्वामीस भड भडून आलें. ते गद-गद कंठानें ह्मणाले, हे भगवन् ! मी महाराष्ट्रीयब्राह्मण आहें. मी तीर्थयात्रा करीत करीत येथें आलों आहें. यथाशक्ति गायत्रीं जपकरून महादेवावर अभिषेक करीत आहें. या गांवांत मला राहाण्याला जागा न मिळाल्यामुळें मी तुंगभद्रेच्या परतीरीं राहतों. रोज नदी पोहून भिक्षेसाठीं गांवांत येतों परंतु कोणी भिक्षा घालीत नाहींत. फक्त आपल्या अन्नछत्रांतून मूद-भर भात मिळतो त्यावर कालनिर्गमन करितों. हें शरीर अन्नावांचून असें वाळून गेलें आहे. हें ऐकून श्रीजगद्‌गुरूंस फार वाईट वाटलें. त्यांनीं एकदम कारभाऱ्यास बोलावून विचारिलें कीं, अरे ! तुह्मांस सांगितलें आहेना ! कीं जोकोणी भिक्षेस येईल त्याला एकमनुष्याला पोटभर पुरेल इतकी भिक्षा देतजा ह्मणून ? मग या मनुष्याला आजपर्यंत मुदभरभात कां देतहोतां ? हें ऐकून कारभारी वगैरे मंडळी खजील होऊन खालीं पा-हूंलागली. नंतर जगद्‌गुरूंनीं ब्रह्मानंदस्वामीस वस्त्रपात्र देऊन आपल्या ज-वळ ठेवून घेतलें. त्यांचा मोठा अधिकार पाहून ते ह्मणाले, हे ब्रह्मचारिन् ! तुह्मी संन्यास घ्या. मग तुमची बाह्य उपाधी जाऊन तुह्मांला आत्मानात्म विचार करावयास ठीक पडेल. श्रीचे आज्ञेवरून संन्यास घेऊन दंड धारण केल्यावर त्यांला ब्रह्मानंदतीर्थ नांव पडलें. त्यानंतर त्यांला श्रीजगद्‌गुरूंनीं प्राणायाम आणि लंबिका योग दाखविला व ते त्याचा अभ्यास करूं लागले. पुढें थोड्यादिवसांनीं श्रीजगद्‌गुरूंनीं सांगितलें कीं, मी तुह्मांस उपनिषदांचें भाष्य ऐकवितों तें तुह्मी लक्षपूर्वक ऐका. हें ऐकून ब्रह्मानंदस्वामी ह्मणाले, हे भगवन् ! मला संस्कृत विभक्तीचा गंधसुद्धां नाहीं. त्यामुळें मती कशी चालेल ?

श्रीजगद्गुरूः—हे ब्रह्मानंद ! तुह्मी ह्याविषयीं काळजी करूं नका. पाहातरखरें ? तुह्मांला भाषादि येते कीं नाहीं तें.

असें ह्मणून दररोज ते पूर्णरूपेनें त्यांस भाष्य शिकवूं लागले. त्याचें एकाग्रचित्तानें ब्रह्मानंदस्वामी श्रवण करूं लागले व त्यामुळें त्यांला भाषादि—

कांचें ज्ञान होऊं लागलें आणि ते दुसऱ्यास श्रवण ही करवूं लागले. हें पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें.

पुढें जगद्गुरु समाधिस्थ झाल्यावर त्या ठिकाणीं राहाणें ह्यांला बरें न वाटुन हे गरुडेश्वरीं श्रीगुरुमूर्तीपाशीं आले. हे स्वतः साधनचतुष्टयसंपन्न अधिकारी असल्यामुळें, त्यांची वृत्ती पाहून श्रीगुरुमूर्ती प्रसन्न झाले व प्रशंसा करूं लागले. ती ऐकून ब्रह्मानंदस्वामी ह्मणाले, हें आपल्या कृपेचेंच फळ होय.

या प्रमाणें साधुपुरुषाचा अनुग्रह झाल्यावर मुक्यास वाचा फुटते, पांगुळा मेरुसारखा पर्वत उल्लंघन करूं शकतो. मग ब्रह्मानंदस्वामी मोक्षाचे अधिकारी झाले यांत आश्चर्य तें काय ?

निलूर मठाचे ब्रह्मानंदसरस्वतीमहाराज पूर्वीं गृहस्थाश्रमी होते. त्यांला इंजिनीयरिंग कामाची चांगली माहिती असल्यामुळें दरमहा दीड दोनशें रुपये पगार मिळत होता. इतक्यांत त्यांची पत्नी परलोकवासी झाल्यामुळें व त्यांचा पूर्व प्रारब्धयोग आल्यामुळें ते विचार करूं लागले कीं, या नश्वर देहासाठीं ह्या उपाधी कशाला पाहिजेत ? यांच्यांत गढून गेल्यानें शेवटीं यमदंड भोगावा लागेल. असें ह्मणून त्यानीं नोकरी सोडिली व संन्यास घेतला. कृत पापांचा पश्चात्ताप करून काहीं वर्षे केवळ गोमूत्र पिऊन तपश्चर्या केली. नंतर ते तीर्थयात्रेस निघाले. त्यावेळीं त्यानां ब्रह्मावर्तीं श्रीगुरुमूर्तीचें व शृंगेरी मठांत श्रीसगद्गुरूचें दर्शन झालें. पुढें जगद्गुरूंच्या आज्ञेवरून त्यानीं हरिद्वारांतील आचार्यमठाचा पुनः उद्धार केला. दरभंगादि महाराजांस मध्यस्थ ठेवून श्रीभाष्यशंकराचार्य भगवानाची व शारदेची, आणि श्रीदत्तपादुकांची स्थापना करवून गरुडेश्वरीं चातुर्मास केला. चातुर्मास समाप्तीनंतर दोघे ब्रह्मानंदस्वामीमहाराज भडोच येथें आले व त्यानीं गांडाबुवास दर्शन देऊन ते तेथून यात्रेस निघाले.

या ठिकाणीं बळवंत गंगाधर गोकर्णबुवा आजारी पडल्यामुळें त्यानीं श्रीब्रह्मानंदतीर्थांजवळून दंड घेतला व तेव्हांपासून त्यांस प्रद्युम्नानंदतीर्थ ह्या नावानें संबोधूं लागले.

भडोचहून मणिभाई सदाशीव उमरेठकर यांचा एकुलता एक मुलगा गणपत भ्रमिष्ट झाल्यामुळें श्रीगुरुमूर्तीच्या दर्शनासाठीं श्रद्धेनें येथें आलेला होता.

त्याला श्रीचें दर्शन होतांच तो बरा झाला व आपल्या नौकरीवर रुजू झाला. हें त्याच्या श्रद्धेचें फळ होय.

भडोच येथील राहणारा जमीयतराम नरभेराम, मेवाडा ब्राह्मण शके १८३५ आषाढी पौर्णिमे दिवशीं श्रीगुरुमूर्तींच्या दर्शनाकरितां निघाला तो चांदोरास आल्यावर तेथील ब्राह्मणानें त्याचें भोळेपण व अनोळखीपण पाहून दोन पैसे उपटण्याच्या इच्छेनें कांहींतरी थाप मारून होडीचा वेळ चुकविला. त्यामुळें त्याला पौर्णिमे दिवशीं गरुडेश्वरीं श्रीगुरुमूर्तींच्या दर्शनास जातां आलें नाहीं. तो फार दु:खी झाला व नर्मदातीरीं गेला. त्या ठिकाणीं श्रीगुरुमूर्तींनीं त्याला दर्शन देऊन त्याचेकडून पूजा घेऊन त्याला प्रसाद दिला; परंतु त्याला हेच श्रीगुरुमूर्ती हें पूर्वपरिचय नसल्यामुळें ओळखितां आलें नाहीं. तो भडोचला परत आल्यावर त्याच्या पाहाण्यांत श्रीगुरुमूर्तींची तसबीर आली. त्यावेळीं तो लगेच बोलला, ह्याच स्वामींनीं मला प्रसाद दिला होता. असें ह्मणून आनंदित होऊन मागाहून गरुडेश्वरीं गेला. त्या ठिकाणीं श्रीगुरुमूर्तींला पाहाण्याबरोबर त्याची पूर्ण खात्री झाली कीं, त्या दिवशीं प्रसाद देणारे महाराज हेच आहेत.

शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं:--

**मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भिषजे गुरौ ॥ यादृशी भावना यस्य तस्य सिद्धिस्तु तादृशी ॥ १ ॥**

हें केवळ त्याच्या श्रद्धेचें फळ मिळालें.

हें स्थळ शूलपाणीश्वराच्याझाडींत असल्यामुळें येथें सर्पादिकांची वस्ती अधीक असणें यांत आश्चर्य नाहीं. एके दिवशीं श्रीगुरुमूर्ती देवासमोर बसले असतां त्याजागीं एकाएकीं एक नागआला. त्याला पाहून सर्वलोक घाबरूनगेले. हें पाहून श्रीगुरुमूर्ती त्यास ह्मणाले, बाबा ! तूं आज येथें कां आलास ? हें ऐकून तो नाग श्रीगुरुमूर्तीजवळ जाऊन त्यांच्या आंगावर चढला व त्याने त्यांच्या डोक्यावर फणाधरीली नंतर खालीं उतरून थोडावेळ त्यांच्या मांडीवर बसून खेळला व जाऊंलागला. त्यावेळीं श्रीगुरुमूर्ती त्यास ह्मणाले, बाबा ! येथें श्रीदत्तात्रयभगवानाचे बाळ गोपाळ आलेले आहेत व ते तुलापाहून भितात. याकरितां अत:पर तूं यांला दर्शन

देऊं नकोस हें स्थान तुझेंच आहे याकरितां तूं येथें सुखानें राहा.

त्या दिवसापासून आजतागायत कोणत्याही सर्पानें त्या ठिकाणीं जमलेल्या मंडळीस दर्शन दिलेलें नाहीं.

यास्थळीं नवसरी कसब्याच्या एक पारशी पिशाच्च त्रासाने कंटाळून श्रीगुरुमूर्तीजवळ आला. त्याला पाहून श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, अरे ! तूं येथें कां आलास ? दर्शन झालें आंतां तूं येथून जा.

**पारशीः—**महाराजजी ! मला एक जिंद फार दुःख देत आहे. तो अन्नाचा एक घांस सुद्धां मला खाऊंदेतनाहीं. याकरीतां मी आपणास शरण आलों आहें. कालरोजीं आपलें दर्शन करून येथें खाण्यास बसलों तेव्हां-पासून मला अन्न जाऊं लागलें. याकरितां आपणास सोडून जाऊन मी कायकरूं ? महाराजजी ! मी आपणास परमेश्वरतुल्यसमजतों. आपण मला यादुःखांतून पूर्णपणें मुक्तकराल अशी माझी खात्री आहे.

**श्रीगुरुमूर्तीः—** मी कांहीं परमेश्वर नाहीं. या जगतांत परमेश्वर एकच आहे आणि तो सर्वत्रांचें रक्षण कारितो. याकरितां तूं आपले गांवीं जा.

याप्रमाणें वारंवार सांगितलें असतांही त्या पारश्यानें आपला नि--श्चय सोडिला नाहीं. पुढें कांहीं दिवस श्रीगुरूंनीं त्याचा निश्चय पाहून त्याला ह्या पिशाचदुःखांतून मुक्त केलें.

या ठिकाणीं वडोद्याहून एक दाक्षिणी ब्रह्मणाची स्त्री आपल्या मुला-स मुक्कामावर ठेऊन श्रीगुरुमूर्तीचे दर्शना करितां आली होती. तिला रजोदर्शन झाल्यामूळें चवथे दिवशीं स्नानकरून पर्णकुटींत तिनें श्रीगुरुमूर्ती जवळ ये-ऊन तीर्थ घेतलें. नंतर मुक्कामावर येऊन ती पाहाते तों तिचेंमूल तिला कोठें दिसेना. वहूत स्थळीं शोधकेला परंतु मुलीच पत्ता लागेना तेव्हां ती आक्रोश करूंलागली. हें वर्तमान श्रीगुरुमूर्तीस समजलें. तेव्हां त्यांनीं तिला बोलावून आणून सांगितलें, आज तूं देवाजवळ कांहीं अपराध केला आहे असें मला वाटतें. त्यामुळेंच तुझ्या मुलाचा पत्ता लागत नाहीं. तूं काय अपराध केला आहेस तें सांग ?

**बाईः—**महाराज ! आज मला चवथा दिवस असूनही मी आ–

पल्या दर्शनार्थ देवासमोर आलें होतें.

**श्रीगुरुमूर्ती:**—तूं ब्राह्मणकन्या असून हा अपराध कसा केलास? विटाळशीनें पांचव्या दिवशीं स्नान करून नंतर देवदर्शनास जावें; हें सर्व स्त्रियांस माहीत असून ही तूं चूक कां केलीस? या अपराधाची तूं देवाजवळ क्षमा माग ह्मणजे तुझें हरवलेलें मूल तुला सांपडेल. त्यामुलाचा पश्चिम दिशेकडे तपास करा. तें त्या दिशेला आहे. असें ह्मणून आपणच शोधास निघाले तों एक शूद्र त्यामुलास घेऊन येतांना भेटला. त्यास पाहून श्रीगुरुमूर्तींनीं विचारिलें, अरे तूं ह्या मुलास कोठून आणिलेंस?

**शूद्र:**—मला हें मूल रस्त्यांत सांपडल्यामुळें मी याला आपल्याजवळ आणीत आहें.

श्रीगुरुमूर्तींनीं त्या बाईकडून त्या शूद्राला एक रुपया देवविला. व ते मुलास घेऊन आश्रमास आले. आणि त्यांनीं मुलास विचारिलें, तूं कोठें गेला होतास? तुला कोणी तिकडें नेलें?

**मूल:**—एक जटाधारी आला व तो मला खाऊ देऊन खेळावयास तिकडे घेऊन गेला होता.

तें ऐकून सर्व मंडळी बोलूं लागली कीं, ते स्वत:श्रीदत्तभगवानच असले पाहिजेत. त्यावेळी श्रींनीं सर्वांस बजाविलें कीं, अत:पर अशा प्रकारची चूक कोणी करूंनये. देवाजवळ पवित्रपणानें यावें.

याठिकाणीं अनायासें एक श्रीदत्तमूर्ती आलेली होती. तिची श्रीदत्ताच्या आज्ञेनें श्रीगुरुमूर्तींनीं प्रतिष्ठा करवून भक्तमंडळीस पूजाक्रम दाखविला. त्यांत प्रात:काळीं प्रात:स्मरण व कांकड आरती खालीं लिहिल्या प्रमाणें करावयास सांगितलें.

**( राग प्रभात ) प्रात:स्मरण**

**प्रात: स्मरामि करुणावरुणालयं तं। श्रीदत्तमार्तवरदं वरदंडहस्तम्॥ संतं निजार्तिशमनं दमनं विनीते। स्वांतर्गताखिलमलं विमलं प्रशांतम्॥ १॥ प्रातर्भजामि भजदिष्टवरप्रदत्तं। दत्तं प्रसादसदनं वरहीरदंतम्॥ कांतं मुदा त्रिनयनं भवमोक्षहेतुं। सेतुं वृषस्य परमं**

जगदादिहेतुम् ॥ २ ॥ प्रातर्नमामि प्रयतोऽनसूयापुत्रं स्वमितं यमितोऽनसूयाः ॥ भूयांस आप्तास्तमिहार्तबंधुं । कारुण्यसिंधुं प्रणमामि भक्त्या ॥ ३ ॥

लोकत्रयगुरोर्यस्तु । श्लोकत्रयमिदं पठेत् ॥
श्रीदत्तात्रेयदेवस्य । तस्य संसारभीः कुतः ॥ ४ ॥

कांकड आरती.

कांकडे आरती दत्ता तुजला ओवाळूं । दत्ता तुजला ओवाळूं ॥ प्रेमभावें तूझे चरण हृदयीं कवळूं ॥ धृ० ॥ माया अविद्या ह्या एकत्र वळुनी कांकडा केला । वळुनी कांकडा केला ॥ स्वरूपानुस्मरणें स्नेहामाजी भिजवीला ॥ कांकडे आरती० ॥ १ ॥ विवेकज्ञानाग्नि-ज्वालेवरी सहसा पाजळिला । सहसा पाजळिला ॥ पेटुनियां झगझगीत उजेड हा पडला ॥ कांकडे आरती० ॥ २॥ द्वैतध्वांतां समूळ ग्रासुनि मनोन्मनी शोभा । ग्रासुनि मनोन्मनी शोभा ॥ फांकली तेव्हां पळतसुटे कामादिकशलभां ॥ कांकडे० ॥ ३ ॥ धाउनी आपोआप येउनी कामादिक शलभ । कामादिकशलभ ॥ जळती ज्याच्या अंत योग्यां दुर्लभ ॥ कांकडे० ॥ ४ ॥ कांकडे आरती ऐशी उजळूं सोज्वळ । ऐसी उजळूं सोज्वळ ॥ मी तूं पण हें हरपून होऊं केवळ ॥ ५ ॥ कांकडे आरती० ॥

त्या नंतर राजोपचार पूजा अभिषेक करून मध्यान्ही पंचोपचार पूजा व नैवेद्य अर्पण करावा. सायंकाळीं भजन, आरती, विडा व शयनआरती करून प्रसाद वांटावा.

विडा

विडाघ्या हो नरहरि राया । धरुनी मानवाची काया ॥ यतिवेषा घेउनीयां । वससी दीनासी ताराया ॥ धृ० ॥ ज्ञानहें पूगीफल । भक्ती ज्ञानवल्लीदल ॥ वैराग्य चूर्ण विमळ । लवंगा सत्क्रिया सकळ ॥ विडाघ्या० १ प्रेमरंगीं जैसा कात । एला अष्टभावसहित ॥ जायफळ क्रोधरहित ॥ पत्री सर्वभूतहित ॥ विडाघ्या० ॥ २ ॥ खोबरें हेचि क्षमा । फोडुनी द्वैताच्या बदामा ॥ मनोजाचा वर्ख हेमा । कापूरही शांती नामा ॥ विडाघ्या० ३

कस्तूरी निरहंकार । कोठें न मिळे हा उपचार ॥ भीमपुत्र यास्तव फार । साह्यदेउनी वारंवार ॥ ४ ॥ विडाघ्या० ॥

### अपराध क्षमापन

अपराध क्षमा आतां केला पाहिजे । गुरुहा केला पाहिजे ॥ अबद्ध सुबद्ध गुण वर्णियले तूझे ॥ धृ० ॥ नकळेचि टाळ वीणा वाजला कैसा । गुरु हा वाजला कैसा । अस्ताव्यस्तपडे नादगेला भलतैसा ।१। अपराधक्षमा० नाहीं ताल ज्ञान कंठ सुस्वर । गुरु हा कंठ सुस्वर ॥ झाला नाहीं बरा वाचे वर्ण उच्चार ॥ २ ॥ अपराधक्षमा० ॥ निरंजन ह्मणे तुझे वेडे वांकुडे । गुरु हे वांकूडे ॥ गुणदोष न लावावा सेवकाकडे ॥ ३ ॥ अपराध०

### प्रसाद

पाहें प्रासदाची वाट । धावें धुवोनियां ताट ॥ शेष घेउनी जाईन ॥ तुमचें झालिया भोजन ॥ अहो झाली एक सेवा । तुह्मां आडवूनी देवा ॥ अहो तुकाह्मणे चित्त ॥ करूनी राहिलों निवांत ॥ १ ॥

या प्रमाणें क्रम चालत असतां शके १८३६ चे वैशाख मासीं श्रीगुरुमूर्तीस अतिसराचा उपद्रव सुरु झाला. त्यामुळें त्यांनीं श्रीदत्तभगवानाची प्रार्थना केली कीं, हे दयानिधे ! ह्या आपल्या मूर्तीस नरसोबाच्या वाडीस पाठवूं कीं, दुसरीकडे कोठें पाठवूं ? ज्या प्रमाणें आपली आज्ञा होईल त्याप्रमाणें करीन. हें ऐकून श्रीदत्तभगवान् दर्शन देऊन ह्मणाले, भक्तराज ! मजला गरुडेश्वरींच राहावयाचें आहे कारितां ज्या स्थळीं हल्लीं माझी मूर्ती आहे त्याचस्थळीं एक लहानसें देऊळ बांधून मूर्तीची स्थापना करून पूजा नैवेद्याचा बंदोवस्त करावा. नर्मदातीरीं मजला लीला करावयाची आहे. तें ऐकून श्रीगुरुमूर्तीनीं भक्तमंडळीस त्या प्रमाणें सांगितलें. तेह्मां गांडाबुवानें देऊळ बांधण्या करीतां वर्गणी जमाकरण्यास सुरवात केली. देवळाच्या खर्चापुरती रक्कम ताबडतोब जमाझाली. तेह्मां श्रीगुरुमूर्ती ह्मणाले, या रकमेंतून लवकरच देऊळ तयार करा; माझ्या मनात ह्या देवळांत मूर्ती लवकर बसवावयाची आहे. श्रीदत्तभगवानाच्या मनांत ह्यास्थळीं राहावयाची फार हौस आहे. ते यास्थळीं राहून नानाप्रकारच्या लीला करणार आहेत. याकामांत माझ्या जवळची मंडळी नको. पंच नेमून त्यांकरवीं

ह्या स्थानाची व्यवस्था व्हावी. हें ऐकून श्री. प. प. ब्रह्मानंद स्वामींनीं पंचकमेटी नेमिली. त्यांत नांदोद सरकारचे खाजगी सेक्रेटरी साहेब रा० परशुराम कुबेकरराम भट्ट, बडोद्याचे सबनीस साहेब, श्री. प. प. प्रद्युम्नानंद-तीर्थ आणि गरुडेश्वरचे ठाणेदार साहेब आहेत. नंतर श्रीब्रह्मानंद सरस्वती ह्मणाले, हे भगवन् ! या पंचामध्यें यदा कदाचित् कांहीं कामासंबंधानें मतभेद उत्पन्न झाला तर त्यांनीं आपल्या मनुष्याच्या सल्यानें कामकरावें. याकरितां आपला एक मनुष्य अवश्य असावा असें मला वाटतें, व त्याकारितां मी श्रीनृसिंहसरस्वतीचें नांव दाखल करीत आहें.

**श्रीगुरुमूर्तीः**—मी आपणास प्रथमच सांगितलें आहे कीं, ह्या कामांत माझ्या जवळचीं माणसें नकोत ह्मणून ? तर आतां त्याचेंनांव कशास दाखल करीतां ?

शेवटीं सर्वमंडळीनीं मिळून श्री. प. प. नृसिंहसरस्वतीस्वामींचें--नांव अध्यक्ष या नात्यानें दाखल केलें.

ह्याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर श्रीगुरुमूर्तीस भक्तमडळीनें विनंती केली कीं, प्रकृती सुधारण्यासाठीं कांहीं औषध करावें.

**श्रीगुरुमूर्तीः**—या शरीराला उत्पन्न होऊन साठवर्षेंतर झालीं. आतां यास ठेवून तरी काय करावयाचें आहे. श्रीशंकराचार्यभगवान् स्वतः शंकराचे अवतार असूनही बत्तीस वर्षेंच राहिले. श्रीकृष्णपरात्मा वैकुंठासकट येऊन एकशें पस्तीस वर्षे राहिला. त्या मानानें हें शरीर फार राहिलें. करितां आतां याला औषधाची जरूर नाहीं. बाबांनों ! पूर्वी या शरीरास दोन वेळ सर्पदंश, तीनवेळ कॉलरा, एक वेळ सन्निपात, दोनवेळ महाव्याधी व एकदां कोड इतके रोग झाले त्यावेळीं औषध देण्यास कोण आले होते ? जन्मापासून ज्या वैद्याला मी शरण आलों आहें तोच पण ह्यावेळीं ही आहे. असें ह्मणून भीष्माचार्य शरपंजरीं असतांना शेवटीं जे श्लोक बोलले होते तेच श्लोक त्यानीं बोलून दाखविले.

पूर्वदेहे कृता ये मे व्याधयः प्रविशन्तु माम् ।। अर्दयन्तु च मां दुःखान्युगमे प्रतिमुच्यताम् ।। १ ।। अनुध्येयोऽसि मे देव न मे जन्म भवेत्पुनः ।। अस्माद्ब्रवीमि कर्माणि ऋणं मे न भवेदिति ।२।

उपतिष्ठंतु मां सर्वे व्याधयः पूर्वसंचिताः । अनृणो गन्तुमिच्छामि तद्विष्णोः परमं पदं ॥ ३ ॥

नंतर सर्व लोकांस सांगितलें कीं, औषध घेण्याविषयीं मला कोणी आग्रह करूंनये. श्रीब्रह्मानंदसरस्वतीस्वामी वगैरे इंजिनियरिंग कामाची माहिती असलेल्या मंडळीस देवांनीं सांगितलेली जागा देवालय बांधण्यास पसंत पडली नाहीं. त्यांनीं ती बदलून दुसरीकडे देऊळ बांधण्याचा बेत केला आणि प्रतिष्ठा करण्याचा मूहूर्त श्रीगुरुमूर्तीस विचारिला.

**श्रीगुरुमूर्तीः**—मला कोणतीही वासना नाहीं. या करीतां या पुढें मला कांहीं विचारूं नका. तुह्मीं जाणा व तुमचा देव जाणो.

अशा धांदलीमुळें देवालय बांधण्याचें काम लांवणी वर राहिलें.

शेवटीं शके १८३६ आनंदनामसंवत्सरीं ज्येष्ठ वद्य अमावास्येस रात्रीं श्रीदत्ताच्या समोर उत्तराभिमुख बसून प्राणाला स्वरूपांत समावून विदेहकैवल्यपदाची प्राप्ती श्रीगुरुमूर्तीनीं केली. नंतर कलेवर नर्मदेच्या प्रवाहांत सोडून दिलें.

ही बातमी हां हां ह्मणतां समग्र आर्यावर्तांत पसरली व बहुजनसमाज शोकव्याप्त होऊन गेला. ह्या स्थानांत श्रीगुरुमूर्तीनीं अखंड वास केल्यामुळें त्याचें माहात्म्य कुरवपूर, गाणगापूर, नृसिंहवाडी ह्या स्थानापेक्षां अधिक श्रेष्ठतर झालें.

पूर्वी गजासुराला वर देऊन श्रीमहादेवांनीं त्या तीर्थाचें माहात्म्य वाढविलें होतें. त्याचा श्रीगुरुंनीं पुन्हा जीर्णोद्धार केला. हा त्या लोकां वर केवढा अनुग्रह आहे बरें ? नर्मदाकिनारीं अत्रिमुनींच्या आश्रमी पूर्वी तिन्हीदेव भिक्षुकाच्या वेषाने आले होते त्यावेळीं अनुसूयेच्या तपः सामर्थ्यानें त्यांना बालकत्व प्राप्तझालें. तेह्वां पासून त्रयमूर्तीस नर्मदातटाकाचें भय उत्पन्न झालें. व ते निर्भयस्थान शोधण्या करितां त्रिभुवन फिरले परंतु नर्मदा तटाकाचे सारखें पवित्र स्थान दुसरीकडे न मिळाल्या मुळें ते पुन्हा आपल्या मातोश्री जवळ येऊन राहिले असावे ; पुष्कळ दिवसांनीं ह्या प्रमाणें पुन्हा माय लेंकाची भेट झाल्यामुळें त्यांना केवढा आनंद झाला असेल बरें !

प्रत्येक भक्तानें प्रथम अनुसूयेस जाऊन तेथें तीन रात्र राहावें.

इंद्रमातेचें पूजन करून तिला आपलें कार्य निवेदन करावें व प्रसाद घ्या-वा.तेथून जनकेश्वर, व्यासेश्वर, शुकयोगी. गंगा संगमावर गंगा नाथ, और संगमी शेषशाई, कुबेश्वर, अग्नितीर्थ, कुंभेश्वरीं कुंभनाथ, मीन संगमी गौतमेश्वर, सप्तमातृका, तिलकेश्वर, मणि नागेश्वर व गरुडेश्वरीं करोटेश्वर, नारदेश्वर आणि गरुडेश्वर या अष्ट तीर्थांचें स्नान करून पू.-जाकरून नंतर श्रीदत्तगुरु जवळ जाऊन मनकामना सिध्यर्थ संकल्प पूर्वक सेवा करण्यास आरंभ करावा. नित्य ह्या ठिकाणच्या तीनही महादेवांची पूजा करावी. मनकामना पूर्ण झाल्यावर ब्राह्मण भोजन करून पुन्हा हीं अष्ट तीर्थें करीत करीत अनुसूयामातेची पूजा करून साष्टांग नमस्कार व प्रदक्षिणा करावी. दांपत्य भोजन देऊन सुवासिनीस हळद कुंकू व खण द्यावा. श्री अनुसूयेला वाहिलेलें कुंकू प्रसाद ह्मणून घरीं न्यावें.

या ठिकाणी सेवेसाठीं राहाणाऱ्या भक्तानें प्रातःकाळीं उठून देवालय झाडून साफ सूफ करावें. स्वच्छ सारवून रांगोळयांनीं शुशोभीत करावें. स्नानसंध्या करून शुचिर्भूत होऊन नर्मदेच्या पाण्यानें देवास अ-भिषेक करावा. ब्राह्मणेतरांनीं आणिलेलें पाणी पूजेला घेऊंनये. त्यांला मूर्तीस स्पर्शकरावयास देऊंनये कारण त्या स्पर्शकरणाऱ्या ब्राह्मणेतराचर त्यामुळें आपत्ति कोसळेल.

रुद्र पवमानादि करून अभिषेक करणाऱ्या ब्राह्मणास महत्पुण्य मिळेल. गायत्री किंवा दत्तमंत्रानें अनुष्ठान केल्यास तो थोड्याच दि-वसांत सर्व पापांपासून मुक्त होऊन देवाला प्रिय होईल. देवा पुढें गा-यन करणारा देवाला लवकरच प्रिय होईल. दीपादी प्रज्वलीत करणाराला सुपुत्र प्राप्ती होईल. नंदादीप लावणाराचा वंश वृद्धिंगत होईल. या ठि-काणीं गुरुचरित्राचा सप्ताहा करणाऱ्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. श्री. प. प. वासुदेवानंद सरस्वतीचें जीवन चरित्र वाचल्यानें हे लवकर कृपा करितील. भक्तिपुरःसर प्रदक्षिणा केल्यानें पिशाच्च वाधा नाहीसी होईल, या स्थानाची सेवा केल्यानें महारोग नष्टहोतील. वंध्या पुत्रवती होतील. नारायणबळी आदि श्राद्धें केल्यानें पूर्वजांना त्वरित सद्गति मिळेल. देवाला निंब, तुळसी, पुष्प, शमी पत्रादि वाहिल्यास अनंत पुण्य प्राप्त होईल. सेवा करणारांनीं ब्रह्मचर्य व्रतानें व शुचिर्भूतपणें वागावें. कोणतेंही

व्यसन, पाखंडी, क्रोध आणि आळस सोडून देवाला आत्मशरीरवत् समजून सेवा करावी. जो मनुष्य श्रद्धायुक्त देवाची व ह्या स्थानाची सेवा करील, किंवा वाटेल त्या ठिकाणी राहून श्रीगुरुचरीत्राचा पाठ करिल त्याचे सर्व मनोरथ श्रीदत्तभगवान अवश्य पूर्ण करितील. असा श्रीगुरुमूर्तींचा आशीरवाद आहे.

## उपसंहार

श्री. प. प. वासुदेवानंदसरस्वतीस्वामी श्रीगुरुमहाराज यांचें चारित्र लिहिण्यास सहस्रमुखी शेषासारख्याही असमर्थ आहे. त्या ठिकाणीं मजसारख्या अल्पज्ञ मानवाची मति काय उपयोगाची ! परंतु स्वामीमहाराजांचे यथामति गुण गायन करण्याची मला इच्छा झाल्यावरून मी अनन्यभावानें त्यांची प्रार्थना करितांच त्यानीं माझ्या अंतःकरणांत प्रवेश करून ह्या अज्ञ बालकाच्या वदनांतून जे दोन बोबडे शब्द वदविले ते मी यथामति लिहिले आहेत.

या चारित्राचा श्रद्धाभक्तियुक्त जे कोणी पाठ करितील किंवा श्रवण करितील अथवा श्रीगुरुचे गुणानुवाद गातील त्यांजवर श्रीदत्तभगवानाची कृपा होईल. त्यांला अनायासें संसारांत सुखांचा लाभ होऊन अंतीं सद्गतीची प्राप्ती होईल.

ज्या कोणाला या गुरुचरित्राचें सकाम अनुष्ठान करावयाचें असेल त्यानें चंद्रबळ पाहून त्या कामास आरंभ करावा. निष्कामी जनांस शुभाशुभ पाहाण्याचें कारण नाहीं. स्त्रियांनीं आपल्या पतीची आज्ञा घेऊन हें कृत्य करावें.

पुण्याहवाचन पूर्वक स्वकामनेचा संकल्प करून षोडषोपचारें ग्रथाचें पूजन करावें व नंतर ग्रंथवाचण्यास आरंभ करावा. सातव्यां दिवशीं त्याची समाप्ती करावी. दररोज वाचन झाल्यावर उत्तर पूजा करून ग्रंथास १०८ प्रदक्षिणा घालाव्या. सर्वभूतप्रेतादिबाधा, पिशाचबाधा, या पारायणानें नाहीशा होतील. समाप्तीनंतर ब्राह्मण, सुवासिनी व बटुक पूजन करून त्यांस अन्न अर्पण करावें. जेवणांत विशेषें करून पायस असावा. हा ग्रंथ वाचण्यास सर्व स्त्री पुरुषांला अधिकार आहे.

हा ग्रंथ मी माझे प्रिय श्रीसद्गुरुवासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजयांचें चरणी समर्पण करीत आहें. त्या योगें श्रीदत्तात्रयभगवान संतुष्ट होवोत.

इति श्रीमत् प. प. वासुदेवानंदसरस्वतीस्वामी जगद्गुरुपाद पूज्य गांडाबुवा विरचित श्रीगुरुचारित्र समाप्त. ( आरती )

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभदिगंबरा ॥ आरति हे तव चरणी राहो नतिततिं गुरुवरा ॥ धृ० ॥ दिग्भिर्वेष्टितमम्बरमेव अत्यग्रब्रह्मेति ॥ खं ब्रह्मेति श्रुतिरपि वदतीद् दिगंबरा चेति ॥ दिगं० ॥ १ ॥ दिगम्बरांबर मेव व्यापक पूर्णब्रह्मेति ॥ सच्चित्सुखघनमायातीतादिगंबरा वदति ॥ दिगं० ॥ २ ॥ श्रीपादवल्लभनाम प्राप्त हि नक्रगजेंद्रमिव ॥ द्रौपद्यंबरीषचोरग्रसितद्विजमेव ॥ दिगं० ॥ ३ ॥ दिगंबरा गुरुवासुदेवा दत्तस्त्वं ब्रह्म ॥ कामक्रोधग्रासितं मां लक्ष तथैव झटिति वह ॥ दिगं० ॥ ४ ॥

**विज्ञप्तीः**—हे गुरुभक्तजनहो ! श्रीगुरुमूर्तीनीं अवतार समाप्त केला अर्थात आतां प्रत्यक्ष दर्शनाचा लाभहोणें शक्य नाहीं असें कोणीही मनांत आणू नये. श्रीगुरुमूर्ति केवळ भक्तांची भावना पाहाण्या करितांचं गुप्त झालेले आहेत. जे जे जन ज्या ज्या प्रकारच्या भक्तिप्रेमानें वागतील त्या त्या लोकांला त्या त्या प्रकारें ते दर्शन, प्रसाद करितील हें प्रत्येकानें अनुभवानें जाणावें, ह्या अनुभवा प्रीत्यर्थ खालील पत्रें वाचावीं.

सारंगपूर श्रावण शुद्ध द्वादशी. १८३६

**श्रीमंत ब्रह्मचारी गांडाबुवा यांच्या सेवेशी.**

दास सदाशीव गोपाळ भागवत सारंगपूर याचा शिरसाष्टांग प्रणिपात विज्ञापना. श्री. श्रीदत्तअवतार सद्गुरुमहाराजानीं अवतार समाप्ती करून आह्मां दीन जनांचा त्याग केला. त्यामुळें रात्र दिवस मनास अत्यंत अस्वस्थता होते. परंतु कार्य अर्धवट राहेलें तेह्मां कसें होईल, काय करावें, अशा विचारांत असतां स्वप्नांत श्रीगुरुमूर्तीनी दर्शन देऊन आपणाकडे बोट दाखवून, कार्य सिद्धी होण्या विषयीं आश्वासन दिलें. तेह्मां हा काय चमत्कार झाला असें वाटून एकदम जागा झालों. प्रातःकाळीं स्नान संध्यादि आटपून महाराजांनीं एथें स्थापना केलेल्या दक्षिणायण उत्सव मूर्तीचे दर्शना करितां गेलों. तों एकदम महाराजांचें दर्शन होऊन तटस्थ झालों. कायचमत्कारसांगू ! जसें स्वप्न तशीच जागृती. असो--महाराजांनीं आजपर्यंत हातीं धरिलें. व संकटांतून पार पाडिलें, व पुढेंही सांभाळ करणारे तेच आहेत. पण ह्या स्वप्नाचा निर्णय काय ?

३४९ अनुक्रम........ वि: ३१।८
९५८२ — ४०।४।

असें बरेच वेळ घडत आहे. आपण महाराजांचे प्रिय शिष्य आहांत. आम्ही जरी शिष्य आहोंत तरी आपलें दर्शन हिंगोली येथें झालें; त्यावेळीं एकंदर गुरुभक्तीचा, मनाच्या निदिध्यासाचा, तसाच वैराग्याचा सर्वप्रकार आम्हीं पाहिला आहे. जे महाराजांस प्रिय ते आम्हांस प्रिय असें जाणून सर्व मजकूर आपणास कळविला आहे. महाराजांकडून वारंवार आंगारा मिळत असे त्यामुळें भूतप्रेतापासून होणाऱ्या सर्व प्रकारच्या त्रासांची मुळींच काळजी नसे. बहुत काय लिहूं सर्वस्व पालन महाराजांनींच केलें एवढ्यांत सर्व आलें कळावें हे विज्ञापना.

**पत्र नंबर २** ता. १७। ४। १५ गरुडेश्वर.

**सा. न. वि. वि.**

श्रीगरुडेश्वर येथें श्रीसद्गुरूच्या देवालयाचे बांधकाम सुरू आहे. हें काम करणाऱ्या कारागिरांपैकीं एका कारागिराचा सुमारें १७। १८ वर्षें वयाचा एक मुलगा ज्या ठिकाणीं श्रीसद्गुरुस्वामीमहाराज अरण्यांत बसून पुराण सांगत असत त्या बाजूकडे कांहीं कामा करितां गेला होता. परत येतेवेळीं मार्ग चुकून तो भलती कडे गेला. पुढें अनोखळी वाट लागल्यामुळें तो घाबरला व विचार करीत उभा राहिला. इतक्यांत एकाएकीं संन्याश्याच्या वेषानें श्रीसद्गुरूस्वामी महाराज त्या ठिकाणीं त्याला दिसले. त्यांनीं सरळ मार्गानें त्याला काम चालू असलेल्या देवालयापासीं आणून सोडिलें. त्याला देवालय दाखवून स्वारी अदृश्य झाली.

देवालयाचें काम करिते वेळीं त्याच्या एका हाताला बरीच इजा झाली होती. त्याहातावर स्वामींनीं आपला हात फिरविला. तेव्हां तात्काळ त्याचा हात पूर्ववत बराझाला. पाहातांपाहातां तें रूप अंतर्धान पावलें. मुलानें ती हकिगत आपल्या सहचऱ्यांला सांगितली व आपला हातही चांगलाझाल्याचें दाखविलें. ही गोष्ट आठ दहा दिवसांपूर्वी नुकतीच घडून आली आहे कळावें. **दामोदर पाठक.**

ह्या करितां सर्वांनीं गुरुभक्तीचा मार्ग न सोडितां अनन्य भावानें संदेह रहित होऊन सेवा करावी. त्या योगानें श्रीदत्तभगवान् प्रसन्न होऊन आपले सर्व मनोरथ परिपूर्ण करितील.

**[ शुभं भवतु ]** **समाप्त.**

## म० श्री० प० टेंब्येस्वामीयांच्या चरित्रास आगाऊ झालेले ग्राहक

प्रत. नाव.

१०० श्रीगांडाबुवा भडोज
२५ रामचंद्र विनायक कोनकर; कल्याण.
२० शितिकंठ बाळकृष्ण हळवे. नर्सोबा.
१ ... ... (चांवार्डा
५ केशव कृष्ण चिटणीस. सावंतवाडी.
४ रा. विश्वनाथ देविदास पंत उमरावती
२ रा० गोविंद गणपति काळे पोंवशी.
२ रा० अवधूतराव नागराज पंत तंजा.
१ रा० यशवंत बाळकृष्ण आदेकर. सावं.
१ ,, धोंडो कृष्ण कोपकर. पाटण.
१ वे. रामचंद्र बाळाजी अग्निहोत्री कनेरी
१ ,, वामन पुरो जोशी. वाकली.
१ ,, ना. के. अलोनी. अंमरेली.
१ ,, सदाशिव नारायण देवल देशासपातो २
१ ,, महादेव शंकर भिडे धोंड. पारगांव.
१ ,, पांडुरंग नारायण सुंगळे महागांव.
१ ,, विष्णु जगन्नाथ काळे. अकोला.
१ ,, लक्ष्मण श्रीधर देवधर इचलकरंजी,
१ वे. ,, महादेव भट गाडगीळ. भंडारा.
१ रा. भास्करराव टी. लटे. कारभारी.
१ ,, कृष्णराव व्यंकटराव धर्माधिकारी.
१ ,, प्रल्हाद रामचंद्र चोरघडे. नरखेड.
१ ,. रामचंद्र विनायक पाध्ये राजापूर.
१ ,, विनायक नारायण केळकर. सा.
१ ,, बाळाजी सदाशिव अग्निहोत्री नागपूर.

प्रत. नाव.

१ रा० वामन जनार्दन पडवेकर सावंत०
१ रा० रामचंद्र धाकु गोवेंकर सावंतवाडी.
१ ,, नरहर देव धर्माधिकारी रितपुर.
१ वे० अनंत जनार्दन जव्हे सांगेली.
१ वे० विष्णु आत्माराम अळवणी सा०
१ रा० विनायक महादेव मराठे होडवडे,
१ रा० योगेश्वर विनायक जोशी नागपूर.
१ रा० आबा काशिनाथ दुधभांडे शहाडो-
१ ,, भय्याजी ... निसगांव (ल.
१ ,, गणपत राव इसलामपूरकर सातारा
१ रा. द्वारकानाथ केशव प्रधान मुं. दादर
१ ,, त्रिंबक लक्ष्मण जोशी. वाशीम.
१ वे ,, बाळकृष्ण हरिशास्त्री वैद्य. मुं.
१ रा. वामन गणेश शेंडे पुणें,
१ ,, बाळकृष्ण बुधाजी मोकल हाशिवरें.
१ ,, मोरोसदाशीव पराडकर. मुं माहीम.
१ ,, अनंदराव गणपतराव धैर्यवान मुं.
१ ,, जगजीवन बळवंतराव देशमुख शिरपूर.
१ ,, गणेश रामचंद्र गद्रे. वकील. जालौन
१ ,, वामनराव वासुदेव फणसळकर. सा.
१ ,, वासुदेव बाळंभट पोळकर पुसद.
१ ,, गोविंद रामचंद्र फळणीकर वकील. सा.
१ ,, पुरुषोत्तम नारायण कशाळकर. यमक.
१ ,, काशिनाथ विष्णू झापसेकर सा.

## श्री० प० प० वा० [ टेंब्ये ] स्वामींनीं केलेले ग्रंथ.

**संस्कृत गुरुचरित्र सटीकः**—यांत प्राकृत गुरुचरीत्रांतील सर्व कथा असून अवांतरही बरीच माहिती दिलेलि आहे. यासच द्विसाहस्री गुरुचरित्र असेंही दुसरें नांव आहे. किंमत ३ रुपये. पण तूर्त २॥ रु. ट. माफ.

**दत्तलीलामृताब्धिसारः**—या ओवीबद्ध पुस्तकांत परशुराम, सहस्रार्जुन, मदालसा, आयुराजा, इत्यादिकांच्या रसाळ कथा असून कोशपंचक, ओंकारवर्णन, देहचतुष्टय यांचीही बरीच माहिती दिलेली आहे. किंमत ८ आणे.

**सप्तशती गुरुचरित्र**—या ओवीबद्ध ग्रंथांत मोठ्या गुरुचरित्रांतील सर्व कथा संक्षेपानें आल्या असून प्रत्येक ओवींतील तिसरें अक्षर क्रमानें वाचल्यास **भगवद्गीतेचा पंधरावा आध्याय तयार होतो**. किं. ३ आणे.

**माघमाहात्म्य**—या ओवीबद्ध पुस्तकांत माघस्नानाचा सविस्तर महिमा वर्णन केलेला असून प्रत्येक ओवीच्या पहिल्या अक्षरानें दत्तमालामंत्र साधलेला आहे व सांकेतिक स्थलीं अनेक वेदमंत्र घेऊन तयार झालेलें नर्मदाष्टक स्तोत्रही शेवटीं आहे. किं. २ आणे.

**वेदपादस्तुति सटीक**—या संस्कृत ग्रंथांत ऋग्वेदी संहितेच्या प्रत्येक अध्यायांतील कोणतातरी चरण दर श्लोकाचे अंतीं असून बहुतेक संहितेंतील सुबोध पदांनीं ईश्वराची स्तुति केली आहे. किं. २ आणे.

**कुमारशिक्षा**—या पुस्तकांत बालपणापासून कसें वागावें हें स्पष्ट सुबोध रीतीनें सांगितलें असून त्याचा अर्थ कळावा म्हणून मराठींत अन्वयासह अर्थही दिला आहे. किं. ६ आणे

**पद्समूह आवृत्ती दुसरी**--यांत पदें, स्तोत्रें, आरत्या, पाळणें, इ० संग्रह असून पहिल्या आवृत्तीपेक्षां पदें, स्तोत्रें, आरत्या, अधीक आहेत. किं. ६ आणे

**एकावनश्लोकीगुरुचरित्र**—या लाहानशा विविधवृत्तांच्या संस्कृत पुस्तकांत मोठ्या गुरुचरित्रांतील प्रत्येक अध्यायाचें तात्पर्य असून वृत्तांचेंही नांव प्रत्येक श्लोकांत आहे. नित्यपाठास उत्तम ग्रंथ आहे. किं. ।।। आणा.

**स्त्रीशिक्षा**—या पुस्तकांत स्त्रियांनां आत्मानात्म विचार कळावा म्हणून देवदत्त ब्राह्मणाच्या मुलीला सद्गुरूनीं केलेला बोध संवादरूपानें लिहिला आहे. किं. ४ आणे.

**कृष्णालहरी—सटीक व सार्थ**- हा ग्रंथ गंगालहरीप्रमाणें असून यांत श्रीकृष्णा नदीची स्तुति आहे. किं. ४ आणे.

**श्री गुरुस्तुती मराठीभाषांतर सहित**-या पुस्तकांत मुख्यत्वेंकरून जरी श्रीगुरुदत्तात्रयाची स्तुती केलेली आहे तरी निर्गुणमानसपूजा, सगुणमानसपूजा, अपराधक्षमापन, दकारी अष्टोत्तरशतनामावळी, मनुष्यजन्म सफल होण्याची प्रार्थना, परब्रह्मस्वरूपवर्णन, दत्तात्रेयाची दिनचर्या, कवच इ. विषय आहेत. किं. ३ आणे.

**दत्तमाहात्म्य आवृत्ती दुसरी**-श्री स्वामीच्या एकंदर ग्रंथांत हा ग्रंथ सर्व रसानीं पूर्ण भरलेला असल्यामुळें मोठमोठ्या शास्त्री पंडितांनाही अतिशय प्रिय झालेला आहे. अशा सर्वतोपरि मनोहर ग्रंथाची किंमत अवघी रु. २

**षट्पंचाशिका संस्कृत**—दृष्टांत देऊन आत्मानात्म विचाराचें विरण केलें आहे. किं. ।। आणा.

**समश्लोकी**–गुरुचरित्र–हा सचूर्णिक ग्रंथ संस्कृत असून भक्तिरस प्रधान आहे, शके १८३७ अखेर पर्यंत १ रु. भरून आगाऊ होणाऱ्या वर्गणी दारांस अर्धा आणा फार्म ( डेमी ६ पृष्ठें ) प्रमाणे मिळेल. सर्व पुस्तकांस टपाल व्ही. पी. ख. नि. पडेल. वरील सर्व पुस्तकें इ० कोलापूर पोष्ट नरसोबाची वाडी येथें रा० **शितिकंठ बाळकृष्ण हळवे** बुकसेलर यांचकडे व आमचेकडे विकत मिळतील ग्राहकानीं आपला पत्ता पोष्टासहित बालबोध लिपींत सुवाच्य लिहावा.

---

**रामचंद्र शंकर सप्रे मु० सावंतवाडी. जि. रत्नागिरि.**

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४९ | ५ | आद्य | खाद्य |
| ६४ | ८ | ते दहा दिवस, शूद्राचे घरीं मेल्यास तें एक मास, वाट्या मेल्यास दोन मास व म्लेच्छाचें चार मास पर्यंत आशौच समजावें | त्या घराला दहा दिवस, शूद्र घरीं मेल्यास एक मास, वाट्या मेल्यास दोनमास, व म्लेच्छाचें चार मास आशौच समजावें. |
| ६५ | ६ | आशौच धरावें. मरणाचे पश्चात | आशौच धरावें. अनाथ शवाचा संस्कार करणारास केवळ स्नानमात्र, सुतक नाहीं. मरणाचे पश्चात |
| ६७ | १२ | रजोदर्शन आलें आहे | रजोदर्शन न आलें आहे |
| ६८ | २ | पतितांस | पतिपत्नीस |
| ९४ | १६ | शास्त्रिबुवांस किंचित वाईट वाटलें. ते नारायणरावांस ह्मणाले | नारायणरावांस वाईट वाटलें. तेव्हां शास्त्रिबुवा नारायणरावांस ह्मणाले |
| १०६ | ४ | स्वस्थता | अस्वस्थता |
| १२८ | २ | जलमंडल, सूर्यमंडल व | जलमंडल आहे व सूर्यमंडल |
| १२८ | ३ | अग्निमंडल हीं तेजोमय आहेत. | अग्निमंडल आहे त्या कारितां तेजोमय आहेत. |
| १८५ | ८ | सूत्रात्मवायूप्रमाणें | सूत्रात्मवायू मध्यें |
| १८९ | १२ | ह्यारितां | ह्या कारितां |
| १८९ | २४ | हर्षोनी चित्तीं । गुरुप्रति | हर्षोनियां चित्तीं । दत्तगुरुप्रति |
| १९२ | २३ | स्वमी | स्वामी |
| २१८ | १५ | हत | हृत |
| २१८ | २३ | वेपित हृदा | वेपित हृदः |
| २२१ | ४ | गोमूत्रिका | ग्रंथालंकार |

| | | | |
|---|---|---|---|
| २२१ | ८ | रेवागोमूत्रिकादां | रेवामरतीदखेदां |
| २२१ | ८।९ | या ओळीमध्यें " गोमूत्रिका " हा शब्द पाहिजे. | |
| २२१ | २२ | धर्मदे नर्मदे त्वं | धर्मदेऽधर्मदे त्वम् |
| २२१ | २३ | धन्ये धर्मदे वर्मदे त्वं | धन्ये भर्मदे वर्मदे त्वम् |
| २२५ | २४ | त्याच आश्रमी आले व तेथून | हीं अक्षरें अधीक आहेत. |
| २२६ | १२ | अतपत्तुधवानुमता | अतपत्स्वधवानुमता |
| २२६ | १४ | पीपा | पापी |
| २२७ | २१ | शुद्ध | वद्य |
| २२९ | ९ | प्राचीन | प्राची |
| २३० | ६।७ | " छपन्न सालाप्रमाणें " | हीं अक्षरें अधीक आहेत. |
| २३१ | १३ | राजकोट | द्वारिका |
| २३१ | १४ | जाण्यास | चालण्यास |
| २३३ | ८ | हटकेश्वर | हाटकेश्वर |
| २३३ | २० | मुक्तिचा | क्रममुक्तिचा |
| २३५ | २८ | क्तपडूंलागलें | रक्तपडूंलागलें. |
| २४३ | २१ | मन वळे | मन न वळे |
| २४८ | १० | गांडाबुवाबरोबर | गांडाबरोबर |
| २४८ | १२ | मार्गांत ज्वर येऊन तेथेंच संन्यास घेऊन तो घरीं आला व येतांच मरण | मार्गांत ज्वर येऊन घरीं आला व संन्यास घेऊन मरण |
| २५० | २२ | गमितः | ग्रसितः |
| २५८ | ७ | याचक | अयाचक |
| २५९ | १७ | आग्रहा रुन | आग्रहा वरुन |
| २६० | ८ | मदुरा, मिनाक्षीयन व | मदुरामिनाक्षी व |
| २६० | २० | त्रिवेदी | त्रवाडी |
| २६३ | १८ | रोर | मेरोर |
| २६५ | १८ | जुदाताला | खुदाताला |
| २६९ | २० | ।केल | लोक |

| | | | |
|---|---|---|---|
| २७८ | १२ | पासून | ग्रासून |
| २८१ | १४ | सर्व | सर्वीतार्थरूप |
| २९१ | २० | गणेभट्ट | गणेशभट्ट |
| ३०० | १८ | गांडा:- बावडेकर | गांडा:—गुरुजी ! बावडेकर |
| ३०३ | ८ | यन्नारकभीतिघ्न | यन्नाम क्रूरभीतिघ्न |
| ३०३ | ९ | अवैदीकृत | वैर्यादिकृत |
| ३०३ | २७ | झटक | फाटक |
| ३०४ | १२ | " काहीं " | हीं अक्षरें अधीक आहेत. |
| ३०५ | ७ | कृत्या | कृत्वा |
| ३०६ | ८ | ही हकिगत त्यांला माहीत होऊन त्यानीं | व्यासजी महाराजानीं त्या |
| ३१४ | २० | नरतनू आलें आज | शरण आलें तुज आज |
| ३१७ | २७ | दे | हे |
| ३१९ | १४ | हरदा | हटा |
| ३१९ | २२ | श्रीगुरुमूर्ती त्याच्याबरोबर जाण्यास तयार झाले. | श्रीगुरुमूर्तीनीं येण्याकारितां सांगितलें. |
| ३२२ | ९ | त्या ठिकाणीं | त्या वेळीं मार्गांत |
| ३२४ | १० | उटी | हटा |
| ३२५ | ४ | दर्शनास गेले. | दर्शन करून नरसी गांवीं गेले. |
| ३२५ | ६ | " होती " | हींअक्षरें अधीक आहेत. |
| ३२८ | ३ | आमच्या सार | आमच्या तुझ्या सार |
| ३३२ | २२ | जि सत्ता | निजसत्ता. |
| ३३२ | २९ | दीढा | बीठा |
| ३३३ | २ | भइनें | थइनें |
| ३३३ | ३ | बत्तिस सम वर्षे | छत्तिसमें वर्षे |
| ३३३ | १४ | सुखे | सुख |
| ३४९ | २४ | सिवसा | दिवसा |

दा. क्र. 9268
REFBK-0001274
REFBK-0001274